**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर केलेला प्रबंध**

**प्रबंधाचा विषय**

# ''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान''


संशोधक

**सोनवणे सुजाता रामदास**

मार्गदर्शक

**डॉ.चंद्रकांत अभंग,**

**पुणे**



**सन : २०१८**

# <u>मार्गदर्शकांचे</u> <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, **सोनवणे सुजाता रामदास** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे च्या सामाजिक विद्याशाखेअंतर्गत इतिहास या विषयाच्या विद्यावाचस्पती (Ph.D) या पदवीसाठी **''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान''** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमुद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने हे माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहे.

ठिकाण : पुणे .

दि.  /  /२०१८

मार्गदर्शक

डॉ.चंद्रकांत अभंग

पुणे

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी **सोनवणे सुजाता रामदास** असे शपथपूर्वक लिहून देते की, **''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान''** या शोध प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलीत केली असून तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. सदर माहितीचा या शोध प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : पुणे .

दि.   /   /२०१८                     संशोधक विद्यार्थी

(सोनवणे सुजाता रामदास )

# ऋणनिर्देश

प्रस्तुत शोध प्रबंधात ''मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' या विषयाचा शोध घेण्यात आलेला आहे. हा पीएच.डी. साठीचा शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मागदर्शन व सहकार्य केले त्या सर्वांचे नामनिर्देशन व आभार व्यक्त करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजते.

सदर शोध प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ.चंद्रकांत अभंग के.जे. सोमय्या कॉलेज कोपरगाव, अहमदनगर यांनी संशोधन विषयाच्या निवडीपासून प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करु शकले. म्हणूनच त्याच्या ऋणात राहणे मी पसंत करेन.

संशोधनाच्या या कामासाठी प्रामुख्याने संदर्भ साधने मिळविताना भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर, श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर, राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहमदनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, नटनागर शोध संस्थान सीतामऊ (मध्यप्रदेश),भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे  या सर्व ग्रंथालयामधून वारंवार अप्रकाशित साधने व संदर्भ पुस्तके उपलब्ध झाले. त्या सर्व ग्रंथपालांचे मी आभार मानते.

याशिवाय संशोधनासाठी ज्यांची खास मदत व सहकार्य मिळाले ते माझे गुरुवर्य टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विभाग प्रमुख डॉ.नलिनी वाघमारे, डॉ.संध्या पंडित, डॉ.कुंभोजकर, श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ.श्री शिवाजीराव कर्डिले, प्राचार्य डॉ.विजय जाधव,प्रा.डॉ.राजमोहंमद शेख, प्रा.डॉ.भाऊसाहेब मुळे,प्रा.वर्षा काळे, प्रा.सीमा खांदवे, प्रा.खोल्लम मॅडम, प्रा.मनीषा पुंडे, प्रा.डॉ.वर्षा कीर्तने, प्रा.साठे बी.जी., प्रा.सुरेखा गांगुर्डे व बाणेश्वर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते.

शेवटी माझ्या परिवारातील माझे वडील श्री.रामदास सोनवणे व आई मीना सोनवणे, भाऊ सुरेश सोनवणे माझा मुलगा वैभव, यांचे मानसिक पाठबळ व सहकार्य मिळाले आणि या संशोधन कार्यास वेळ देता आला.

ज्याना मी कधीच विसरु शकणार, ज्यांनी मला नेहमीच मुलीचे प्रेम दिले, आर्थिक सहकार्य व शाब्बासकी दिली. त्यांच्या सहकार्या शिवाय हे होणे शक्य नव्हते. ते माझे सासरे स्व.धर्माजी कानडे याचीही मी ऋणी आहे.

**सुजाता सोनवणे**

# अनुक्रमणिका

## ''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान''


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | प्रास्ताविक | १ ते ११ |
| प्रकरण दुसरे | अहिल्याबई होळकरांच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती | १२ ते ५२ |
| प्रकरण तिसरे | अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील राजकीय योगदान | ५३ ते १४० |
| प्रकरण चौथे | अहिल्याबाई होळकरांचे मराठ्यांच्या इतिहासातील सामाजिक कार्यातील योगदान | १४१ ते १८१ |
| प्रकरण पाचवे | अहिल्याबाई होळकरांचे मराठ्यांच्या इतिहासातील प्रशासकीय योगदान | १८२ ते २४६ |
| प्रकरण सहावे | शिंदे होळकर कलह, लाखेरीचे युध्द | २४७ ते २७९ |
| प्रकरण सातवे | निष्कर्ष | २८० ते ३०१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३०२ ते ३११ |
| | परिशिष्ट | ३१२ ते ३३२४ |

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१प्रस्तावना :-

मानव हा समाजप्रिय प्राणी असल्यामुळे त्यांच्या बुध्दिचा विकास इतर प्राण्यापेक्षा जास्त प्रमाणात झाला. त्यामुळे त्याला भूतकालीन घटनांसंबधी उत्सुकता निर्माण होते निसर्गातील घटना जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो. निसर्गातीील निरंतर माहिती घेत असताना विश्वातील अनेक पैलू उजेडात येत असतात या पैलूंचा अभ्यास वेगवेगळया सामाजिक शास्त्र, विद्याशाखामधुन केला जातो त्या प्रमाणे इतिहास या सामाजिक शाखेअंतर्गत इतिहास लेखन शास्त्रातून त्याचे  प्रस्तुतीकरण होत असते. स्थळ काळ आणि व्यक्ती हे इतिहासाचे तीन अनुबंध आहेत. मानवी जीवनाच्या घडामोडीचा अभ्यास इतिहासात केला जातो. इतिहास ही मानवाच्या कल्याणाच्या  व विकासाच्या दृष्टीने उपकारक ठरणारी शाखा आहे.

इतिहासाचा मानवी जीवनाशी अतिशय निकटचा संबंध आहे. गतकालीन मानवी जीवनाचा तो आरसा असतो. त्यातील महत्वपूर्ण लक्षवेधी घटनांचा इतिहास हा सामाजिक शास्त्राचा आलेख असल्यामुळे वस्तुत: या विषयाचे अध्ययन रोचक व रंजक असते. मानवी जीवन जसे चित्तवेधक त्याप्रमाणे त्यांची कथा देखील मनोरंजक आहे. नवे ज्ञान प्राप्त करण्याची तीव्र इच्छा ही मानावाची उपजत प्रवृत्ती असल्यामुळे आपले पूर्वज कसे होते, त्यांची जीवन पध्दती काय होती हे जाणून घेण्याची जिद्द प्रत्येक व्यक्ती, समाज, राष्ट्र यांना असते हा परिचय इतिहासाद्वारे पूर्ण करण्याचा आनंद मिळतो. इतिहास गतकालीन संस्कृतीचा वारसा जपतो त्याद्वारे प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक कालखंडाची इतिहास जाणीव करुन देतो. आणि अशा प्रकारचे आत्मज्ञान इतिहास मानवाला करुन देतो.

इतिहास गतकाळाला सजीव करत असतो. व सुसंगत एकत्र मांडण्याचा प्रयत्न करत असतो. इतिहासामध्ये स्थळ, काळ आणि व्यक्ती यांना अनन्य साधारण महत्त्व असते. एखाद्या व्यक्तिच्या चरित्राचे किंवा व्यक्तिमत्वाच्या कार्याचे लेखन पहिल्यांदा कुतुहलातून जन्माला येते. नंतर ते शास्त्रीय संशोधनाच्या मार्गाने पूर्णत्वाला जाते. चरित्र विषय कुतुहले ही एक मानवी जीवनातील वृत्ती आहे

व्यक्तिच्या जीवनाविषयक ठराविक स्वरुपाच्या माहितीवर त्यांचे समाधान होत नाही. व्यक्तिमधील सर्वसाधारणतेपेक्षा त्यांच्यातील असाधारणतेविषयी व कार्याविषयी प्रश्न निर्माण होणे गरजेचे असते. असे प्रश्न व्यक्ति जीवनाच्या आधाराने तिच्या जीवनाविषयक तत्त्वज्ञानाचा शोध घेऊ पाहते. या जिज्ञासेतूनच व्यक्तिजीवनाच्या आधाराने ''मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

भारतात तसेच महाराष्ट्रात अनेक व्यक्ति आपल्या कार्याने महान झालेले आहेत. या महानतेमध्ये अहिल्याबाई होळकर यांचा देखील मोठा सहभाग आहे त्या धार्मिक म्हणून पूर्ण जगात माहित आहेत. परंतु आतापर्यत फक्त त्याचे धार्मिक रुपच जगापुढे आले आहे. परंतु मी या संशोधनाद्वारे त्याचे वेगळे रुप जगापुढे आणण्याचे ठरविले आहे. त्यांची राजकीय भूमिका व महाराष्ट्राच्या, मराठयांच्या इतिहासातील त्याचे बहुमौल्य योगदान कशा प्रकारचे आहे हे स्पष्ट करणे संशोधनातील मुख्य उद्‌देश आहे.

## १.२ विषय निवड :

आम्ही आमचा एवढासाच प्रपंच करताना दमून जातो. कर्तव्ये करतांना शिणून जातो. चिडचिड होते. तेंव्हा घरापासून समाजापर्यंत प्रत्येक स्त्रीने आपल्यातील शक्तीचे, सामर्थ्याचे अधिष्ठानाचे, सृजनशिलतेचे महत्त्व ओळखून सार्‍या गुणांचे योगदान समाजासाठी व्हावे हेच अहिल्याबाई होळकरांच्या जीवनगाथेतून घेण्यासारखे आहे. बिकट परिस्थितीत देखील जीवनाला धैर्याने संकटाला सामोरे जाण्याची त्यांची धाडसी वृत्ती समाजाला बरेच काही शिकवून जाते. त्या अत्यंत दूरदर्शी, महत्वाकांक्षी श्रेष्ठ आचार विचार व उपभोगशून्य स्वामिनी हे त्यांचे असामान्यत्व सिध्द करणारे विचार मला त्यांच्याकडे आकर्षित करुन गेले.

भारतीय समाजात प्रामुख्याने स्त्रीची ओळख ही कुणाची तरी मुलगी, बहीण, पत्नि आई अशी आहे. अशा प्रकारच्या भूमिका सांभाळूनही ज्या स्त्रिया स्वत:चा स्वंतत्र ठसा उमटवतात. त्यांची इतिहासात नोंद होते अहिल्याबाई होळकर अशा स्त्रियांपैकी असून आपल्या वेगळेपणाने उठून दिसणाऱ्याही आहेत.

माणसाच्या गुणवत्तेच्या कर्तृत्वाला जखडणाऱ्या दोन गोष्टी खूप महत्वपूर्ण आहेत. त्यामध्ये जात आणि स्त्रीत्व अहिल्याबाईच्या काळात त्या दोन्ही गोष्टी खूप कठोर होत्या. तरी देखील त्यांनी अशा प्रकारच्या परिस्थितीतून कशी वाट काढली व त्यावर मात केली हे देखील महत्वाचे आहे व त्यांनी कशा प्रकारे मराठयांच्या इतिहासामध्ये राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, धार्मिक, वास्तुकलेमध्ये योगदान दिले. यांचा अभ्यास करणे विषय निवडमागील मुख्य उद्देश आहे.

## १.३ साहित्य व संशोधनाचे परिशिलन :-

मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान विषय निवडीचे कारण आणि उद्दिष्टये स्पष्ट करण्यापूर्वी अशा स्वरुपाचे आता पर्यंत झालेले संशोधन अभ्यास आणि परिशिलन (Review) करणे या ठिकाणी आधिक योग्य होईल त्याचा आढावा पुढील प्रमाणे मांडण्यात आलेला आहे. या ग्रंथात अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाचा गौरव केलेला आहे.

सर जॉन माल्कन यांनी A Memorir of central India या ग्रंथात अहिल्याबाईच्या कतृत्वाचा गौरव केलेला आहे. कैलासवासी पंडित कृष्णशास्त्री चिपळूनकर यांनी ''अनेक विद्यामूलतत्त्व संग्रह'' या पुस्तकात अहिल्याबाई होळकरीण'' या विषयावर अकरा पानांचा एक सुंदर उपयुक्त व मनोरंजक निबंध लिहिला आहे. रा. विनायक जनार्दन कीर्तने यांच्या कडून सर जॉन माल्कम यांच्या इंग्रजी पुस्तकाचे अधारे ''मध्य हिंदुस्थानाचा इतिहास'' मराठीत आणवला त्यात अहिल्याबाईच्या कार्याचा उल्लेख केलेला दिसतो. '' काव्येतिहास संग्रह या अत्युत्तम मासिक पुस्तकात होळकरांची कैफियत छापून निघाली. त्यातील अहल्याबाईचे कारकीर्दतील ३६ बंद गहाळ झाले रा. साने यांनी या मासिकांत जी पुस्तके छापविली रा. पारसनीस यांनी ''इतिहासात संग्रह'' छापवयाला त्याच प्रमाणे गोविंद पत्राचार हा अहिल्याबाईचा खाजगी कारभारी होता. त्यांनी देखील अहिल्याबाईच्या कारभाराविषयी लिहिले आहे रा. गजानन चिंतामन देव तसेच रा.बा.ना. देव यांनी संगीत नाटक लिहिले. प्रसिध्द ग्रंथकार रा. विनायक रामचंद्र टिकेकर उर्फ धर्नुधारी यांनी यांनी महाराष्ट्र कुटुंब संग्राहालय पुस्तकातील अहिल्याबाईचे लहानसे चरित्र लिहिले आहे. इंदूर येथील इंग्रजी मदरशाचे माजी शिक्षक कै.अनंत केशव चितळे वाईकर संपादक माजी कादंबरी कल्पद्रुम यांनी भारतवर्षीय युवती रत्नमाला या नावाने एक उपयुक्त पुस्तक लिहीले आहे. त्यात या साध्वीचे चरित्र आहे. रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी ''ऐतिहासिक गोष्ट व उपयुक्त

माहिती'' या पुस्तकात अहिल्याबाईचा अल्प परिचय दिलेला आहे. रा. हरि मोरेश्वर शेवडे यांनी अहिल्याचरित्र काव्य लिहिले आहे.रा.गोविंद एकनाथ गोसावीकृत ''श्रीमती अहिल्याबाई साहेब होळकर'' हे काव्या प्रासादिक व मधुर आहे. रा.बा.ना.देव यांनी इंदुर येथे ब्राम्हण समाजात अहल्याबाई होळकर या विषयावर एक व्याख्यान दिले होते. ते त्यांनी १९०५ साली विविध ज्ञान विस्तार या मासिकात नवव्या अंकात छापले. या निबंधात अहल्याबाईच्या कारकीर्दीचा अनेक बाजूनी विचार केला आहे. महेश्वर दरबारची बातमीपत्रे भाग पहिला या पुस्तकात दरबारचा वकील विठ्ठल शामराज हयास पाठविलेली पत्रे ही पत्रे खूप मार्मीक आहेत त्यात अहिल्याबाईचे बरेचसे रुप समोर आले आहे. याशिवाय ''लोकमाता अहिल्याबाई होळकर एक नवा विचार -संपादक ॲड महिद्र शिंदे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, लेखक अण्णासाहेब डांगे , राष्ट्रमाता महाराणी अहिल्याबाई होळकर- गो.तु. पाटील, अहिल्याबाई होळकर ओम प्रकाश वसंत नजम, संन्यस्त स्वामीनी सौ. पद्मा नातु महिष्मती नयन तारा देसाई होळकर शाहीचा धगधगता इतिहास रणरागीनी अहिल्यादेवी नंदुरबार दप्तर सौ विजया देशपांडे. प्रा. उज्वला नेहे. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हरिभाऊ कोळेकर, लोकरागिनी राजमाता अहिल्याबाई होळकर, -डॉ.महेश खरात, होळकरांची कैफियत- य.न. केळकर होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग एक व दोन ठाकुर वा.वा. होळकर कुलभूषण अहिल्यादेवी डॉ. सुलोचना अशोक इ.

अशा प्रकारे मराठी मध्ये अहिल्याबाई होळकर यांच्यावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्याच प्रमाणे अहिल्याबाई होळकरावर इतर भाषेत चरित्रे लिहिली आहे. हिंदी क्रमिक पुस्तकात व गृहलक्ष्मी या हिंदी मासिकात तिचे चरित्रे आले आहे.

अहिल्याबाईवर ही सर्व पुस्तके चरित्ररुपाने व तिचा जन्म मृत्यु विवाह हे दाखवणारे आहेत. समग्र रुपाने जसे अहिल्याबाई यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजनीतिक, प्रशासकीय कार्याबद्दल प्रकाश टाकणारे संशोधन या पूर्वी झालेले नाही माझा प्रयत्न आहे की राजकिय व प्रशासकीय कार्यावर जास्त प्रमाणात व जे समाजापुढे अहिल्याबाईचे कार्य आलेले नाही त्यावर मुख्यत्वे प्रकाश टाकणे व मराठ्यांच्या इतिहासात अहिल्याबाईंचे योगदान अभ्यासणे हे मुख्य उद्देश आहेत.

## १.४ संशोधनाची तथ्ये :

या शोध प्रबंधासाठी ''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' हा विषय संशोधनासाठी घेण्यात आलेला आहे. संशोधनात तथ्यांना फार महत्त्व असते. तथ्यांशिवाय संशोधन करणे चुकीचे ठरेल.

सामाजिक शास्त्रांमध्ये तथ्ये सर्वसामान्य व्यक्तींना विचारलेल्या प्रश्नांच्या किंवा त्यांच्यासमोर प्रस्तुत केल्या गेलेल्या चेतकांच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या प्रत्युत्तरांच्या किंवा प्रतिक्रियांच्या नोंदीच्या स्वरुपात असतात. अन्य शास्त्रांप्रमाणेच सामाजिक शास्त्रांमध्येही ज्ञानेंद्रियांच्या आधारे होणारा स्थितीबोध वा निरिक्षण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. आमच्या ज्ञानेंदियावर आघात करणाऱ्या गोष्टींमुळे आपणास झालेल्या संवेदनांची नोंद म्हणजेच तथ्य असे म्हणता येईल. म्हणजेच जे व्यक्त वा प्रकट आाणि अवलोकविण्यात आलेले आहे त्यालाच तथ्य असे म्हणतात.थोडक्यात असे म्हणता येईल की तथ्ये म्हणजे व्यक्तींच्या प्रतिक्रियांची नोंद होय''

सामाजिक शास्त्रांमधून संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांची दोन प्रमुख उगमस्थान आहेत. १.कागदपत्रे, पुस्तके व अहवाल मासिके इत्यादीचा उपयोग तथ्ये प्राप्त करुन घेण्यामागे करता येतो.

२. प्रत्यक्ष व्यक्तिंनी, त्यांना विचारण्यात ओलल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरुन तसेच कागद पत्रांमधून सामाजिक शास्त्रांत माहीती मिळू शकते. बखरी सारखी ऐतिहासिक कागदपत्रे रोजनिशी, जीवन चरित्रे अल्प चरित्रे व संख्याशास्त्रीय अहवाल हे तथ्य प्राप्त करुन घेण्याकरीता उपयुक्त असे आधार आहेत अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त अशी माहिती अर्थातच लोकांकडून व वेगवेगळया पुस्तकातून गोळा करता येते.

प्रस्तुत शोध प्रबंधात अशा प्रकारे तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे. ''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकर यांचे योगदान'' या विषयाची तथ्ये पुढीलप्रमाणे आहे.

१.संपूर्ण भारतीय स्त्रियांना अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, नेतृत्वगुणामुळे प्रेरणा मिळाली.

२. स्त्रियांमध्ये बिकट परिस्थितीत विविध संकटांचा सामना करण्याचे धैर्य निर्माण झाले.

३. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची दखल घेण्याची संपूर्ण देशात नवीन चळवळ सुरु झाली.

४. अहिल्याबाई होळकरांच्या प्रशासकीय कार्यामुळे देशाला नवीन राजकीय व्यवस्था मिळाली.

५. अहिल्याबाई होळकरांनी केलेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय, योगदानामुळे महाराष्ट्र व मध्यप्रदेशामध्ये विकासाच्या नव्या पर्वास प्रारंभ झाला.

## १.५ संशोधनाची उद्‌दिष्टये :-

संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी केलेले पध्दतशीर प्रयत्न होय. अर्थात संशोधन ही एक बौध्दिक प्रक्रिया असून तिच्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यांत नवीन ज्ञानाची भर घातली जाते. व्यक्तिशी निगडीत असलेल्या समुह, गट संस्था, समस्या, संस्कृती, धर्म , परंपरा या घटकांचा समावेश सामाजिक संशोधनात होतो. म्हणून कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी विशिष्ट उद्‌दिष्टये डोळयासमोर ठेवावी लागतात. त्याशिवाय संशोधन कार्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही भारताच्या व महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या व्यक्तीच्या कार्य व कर्तृत्वाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक संशोधकांनी केला आहे मात्र अहिल्याबाई होळकर यांच्या मराठयांच्या इतिहासातील योगदानामुळे भारतीयांना समाजामध्ये कशा प्रकारचे सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय व राजकीय बदल व सुधारणा झाल्या व महाराष्ट्राला या स्त्री मुळे कशा प्रकारची प्रेरणा मिळाली हे स्पष्ट करणे मुख्य उद्‌देश आहे. यापूर्वी अहिल्याबाई यांच्या धार्मिक बाबीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. परंतु या संशोधनाद्वारे मी प्रयत्न केला आहे की त्या केवळ धार्मिक नसुन त्यांच्या मध्ये राजसत्ता चालविण्याची ताकत व त्यांचे प्रशासन कौशल्य उत्कृष्ट होते तसेच त्या योग्य शासक व संघटक होत्या या बाजुंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातील उणीवा दूर करुन इतिहासाच्या ज्ञानशाखेत नाविण्यपूर्ण योगदान देण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या अनुषंगाने करीत आहे. त्यासाठीची पुढील उद्‌दिष्टये स्पष्ट करता येतील.

१.अहिल्याबाई होळकरांच्या पूर्वीच्या मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२. अहिल्याबाई होळकर पूर्वीच्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास करणे.

३. अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म,विवाह, पतिचा मृत्यु, राज्यकारभार इत्यादीचा अभ्यास करणे.

४. अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यामुळे सामाजिक भेदभाव मिटवण्याचे कार्य जनतेपुढे आणणे, सामाजिक सुधारणेचा अभ्यास करणे.

५. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रशासकीय योगदानाचा अभ्यास करणे.

६. वास्तुशिल्प विषयक योगदानाचा अभ्यास करणे.

## १.६ संशोधनाची गृहितकृत्ये :-

निश्चित सूत्रे वा अनुमाने बांधली तर संशोधनाचा पुढील मार्ग सुलभ होतो. नित्य नव्या ज्ञान शाखांचा शोध घेताना गृहितकत्ये निश्चित करुन शोध घेतला असता पुढील आकलन करणे सुलभ होते. सर्वसामान्य माणूस आणि संशोधन करणारी व्यक्ती यांच्यात नवीन ज्ञान प्राप्त करुन घेण्याची जी लालसा असते यात फरक असतो. सामान्य माणूस नवीन ज्ञान हे स्वत:च्या फायद्या इतपतच विचार करतो. तर संशोधक हा जो नवीन ज्ञान ग्रहण करण्याचा प्रयत्न करतो त्यात त्याच्या शास्त्रीय व वैज्ञानिक दृष्टीकोन असतो. कारण त्याला मिळणारे जे ज्ञान असते ते इतरांनासुध्दा त्याचा फायदा झाला पाहिजे हा मूळ उद्‌देश असतो. यात कार्यकारणभावाचा संबंध असतो. पुरावा आणि क्रमबध्दता यावर हे ज्ञान अवलंबून असते. त्यामुळे अशी सूत्रे मांडून त्या अनुरोधाने संशोधकास शोध घ्यावा लागतो. व तथ्ये मांडता येतात. अशा शास्त्रीय अभ्यासाच्या पध्दतीस ‘गृहितकृत्य’ हा टप्पा महत्वाचा असतो.

संशोधकास ज्या विषयात संशोधन करावयाचे त्या संबंधात संपादित केलेल्या माहीतीचे वर्गीकरण करतो. त्याच्या आधारे गृहितकृत्याची पार्श्वभूमि तयार करुन संशोधनाच्या बाबतीत काही अंदाज मांडतो या अंदाजालाच शास्त्रीय भाषेत सिध्दांत-कल्पना किंवा गृहितकृत्ये असे म्हणतात.

गृहितकत्यांशिवाय संशोधकाचे कार्य थांबते. संशोधनात सूचना देण्याचे कार्य गृहितकृत्ये करीत असते.

प्रस्तुत शोध प्रबंधात ''मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' या विषयाचा अभ्यास करताना खालील गृहितकृत्ये निश्चित केलेली आहेत. त्यांच्या आधारावरच साधनाचे वर्गीकरण करुन वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करण्यात आले आहे.

**गृहितकृत्ये :**

१.अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक कार्यामुळे लोककल्याणकारी राज्यांची संकल्पना निर्माण होण्यास मदत झाली.

२. अहिल्याबाई होळकर यांच्या राजनितीक योगदानामुळे भारतीय राजकारणात १८ व्या शतकातील एक महत्वाची राजसत्ता म्हणून मान्यता मिळाली.

३. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रशासकीय योगदानामुळे प्रशासनात सुसूत्रता निर्माण झाली आणि मराठयांचे वर्चस्व माळव्यात निर्माण झाले.

४. अहिल्याबाई यांच्या कार्यामुळे समाजामध्ये लोकशाहीची सदृश्य संकल्पना अस्तित्वात आली.

५. अहिल्याबाई होळकर यांच्या योगदानामुळे स्त्रियांना संकटाशी सामना करण्याची प्रेरणा मिळाली.

६. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यामुळे स्त्री शक्तीचा उदय व परिचय झाला.

## १.७ संशोधनाची मर्यादा :

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म मुलतः महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयातील चौंडी या गावात झाला. त्यांचा विवाह झाल्यानंतर त्या मध्यप्रदेश येथील इंदोर मध्ये त्यांचे वास्तव्य राहीले. पुढे पतीच्या मृत्युनंतर त्या सती न जाता त्यांनी महेश्वर येथून राज्य कारभार पाहिला व राज्य कारभार पाहताना त्यांनी अनेक सामजिक, धार्मिक, राजनीतिक प्रशासकीय योगदान आपल्या राज्यकारभारात दिले. या सर्व सुधारणा व योगदान केवळ अहमदनगर जिल्हा किंवा महाराष्ट्र व मध्यप्रदेश पुरते मर्यादित नूसन संपूर्ण देशास उपयुक्त आहे. या संशोधनामध्ये अहिल्याबाई होळकर यांच्या पूर्वीचा महाराष्ट्र व त्यांच्या जन्मापासून त्यांच्याकडे राजसत्ता आल्यापासून त्यांनी केलेल्या लोकोपयोगी सुधारणा, राजकीय,सुधारणा प्रशासकीय सुधारणा, यावर प्रकाश टाकलेला आहे.

## १.८ विषयाचे महत्त्व :

अहिल्याबाई होळकर यांचे कार्य म्हणजे कर्तृत्वाचा काळ होता. सर्वांगिण सर्वस्पर्शी व व्यापक कार्य करणाऱ्या अहिल्याबाई होळकर लोक लोककल्याणकारी कार्य करणाऱ्या आदर्श राजकर्त्या होत्या. त्यांनी आपल्या राज्यात जनतेच्या सोयी सुविधांवर भर दिला. जसे आज देखील म्हटले जाते जनतेला राज्यकर्त्यांकडून काय हवे, तर त्याचे उत्तर असते रस्ते, प्रकाश सुविधा व पाणी व्यवस्था, शेतीव्यवस्था हे सर्व अहिल्याबाईंनी आपल्या राजकीय काळात जनतेसाठी केले आहे. पर्यावरण संरक्षण केले. पशु पक्ष्यांसाठी जगण्याची व्यवस्था केली वैद्यकीय सुविधा आपल्या राज्यात उपलब्ध केली तसेच शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या प्रशासकीय व्यवस्था व्यवस्थित ठेवली हे सर्व पाहता त्याचे मराठयांच्या इतिहासात मोठे योगदान आहे व या सर्व गोष्टींचा आदर्श आधुनिक काळात अवलंबला तर आधुनिक काळ देखील सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. या संशोधनामुळे अहिल्याबाईंच्या  सर्वांगीन योगदानावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## १.९ संशोधनपध्दती :

कोणत्याही विषयात अज्ञात पैलूंचे संशोधन करुन अनुमान काढताना किंवा नवीन सिध्दांत मांडताना कोणती पर्याप्त संशोधन पध्दती उपयोगात आणली याला सामाजिक शास्त्रात फार महत्त्व आहे. सामाजिक शास्त्रात संशोधन करताना प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. ''मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' हे संशोधन करताना ऐतिहासिक वर्णनात्मक, चर्चा सर्वेक्षण इत्यादी संशोधन पध्दतीचा योग्य त्या ठिकाणी समन्वय साधला आहे अशा विविध पध्दतीतून शोध प्रबंधाला पूर्णत्वरुप देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आवश्यक महत्वाची कागदपत्रे जमा करण्यासाठी महेश्वर, इंदौर, चौंडी, सितामऊ इत्यादी ठिकाणी भेटी देऊन आवश्यक माहिती जमा करण्यात आली आहे.

## १.१० संशोधन विषयाच्या प्रकरणांचे नियोजन :

पूर्वासुरींनी ज्या विषयाकडे दुर्लक्ष केले त्यावर संशोधन करुन मी  लेखन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान या विषयावरील संशोधन सात प्रकरणांमध्ये विभागले आहे ते पुढील प्रमाणे

**प्रकरण पहिले**

**संशोधन पध्दती**

या प्रकरणामध्ये विषय निवड का केली तसेच पूर्वासूरींनी केलेल्या लेखन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे यापूर्वी अहिल्याबाई होळकरावर कोण कोणते लेखन झाले यांची माहिती देण्यात आली आहे व हे संशोधन कशा प्रकारे केले आहे हे स्पष्ट केले आहे. संशोधनामध्ये तथ्ये किती महत्वाची असतात हया वर प्रकाश टाकला आहे. संशोधनाची उद्‌दिष्टये स्पष्ट केली आहेत. संशोधनाची गृहितकृत्ये, संशोधनाची मर्यादा, विषयाचे महत्व व संशोधन पध्दती यांच्यावर प्रकाश टाकला आहे.

**प्रकरण दुसरे**

**अहिल्याबाई होळकरांच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती**

या प्रकरणामध्ये स्वराज्याच्या स्थापनेपासून  शिवाजीमहाराज छत्रपती संभाजी, राजाराम महाराणी ताराबाई, पेशवा बाजीराव, तसेच होळकर घराण्याचा उदय, मल्हाररावांचा विजय, जाट राज सुरजमलचा मराठवाडयांबरोबर संघर्ष व कुंभेरीचा संग्राम, अहिल्याबाइ होळकर युगास प्रारंभ इत्यादी घटना घटनांचा उहापोह करण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे**

**अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील राजकीय योगदान १७६१ ते १७७२**

या प्रकरणामध्ये कुराचे युध्द व अहिल्याबाईचा सहभाग, मल्हाररावांचा मृत्यु, अहिल्याबाई व मल्हारराव, मालेराव सुभेदारी पदी, चंद्रचुडचे कारस्थान, रघुनाथराव अहिल्याबाई संघर्ष व रघुनाथरावांवर राजकिय विजय, नारायणराव पेशवेच्या कालखंडातील व त्यांच्या नंतरच्या कालखंडातील अहिल्याबाईच्या राजकीय भूमिका या सर्व घटनांचा उल्लेख केलेला आहे चंद्रावत प्रकरण इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.

**प्रकरण चौथे**

**अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील सामाजिक कार्यातील योगदान**

या प्रकरणामध्ये अहिल्याबाई यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये जे जे समाजोपयोगी कार्य केले आहे त्या संबंधीचा लेखा जोखा मांडला आहे.

**प्रकरण पाच**

**अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील प्रशासकीय योगदान**

या प्रकरणामध्ये अहिल्याबाई कालीन प्रशासन व्यवस्था, प्रांतीय व्यवस्था, खंडणी कर वित्तव्यवस्था, डाकव्यवस्था, संरक्षण, व्यवसाि, न्यायव्यवस्था, अहिल्याबाई व कवायती, कृषीव्यवस्था, होळकर राज्याच्या अन्य आर्थिक बाबी इ.प्रशासकीय व्यवस्थेसंबंधी माहिती दिलेली आहे.

**प्रकरण सहा**

**शिंदे होळकर संघर्ष व लाखेरीचे युध्द**

या प्रकरणात शिंदे होळकर संघर्ष व लाखेरीच्या युध्दा संबंधी कारण मिमांसा केली आहे.

**प्रकरण सात**

**निष्कर्ष**

या प्रकरणामध्ये मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान या शोध प्रबंधाच्या अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

# प्रकरण - दुसरे

# अहिल्याबाई होळकरांच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती

## २.१स्वराज्याची स्थापना :-

मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज उत्कृष्ठ योध्दा, आदर्श शासनकर्ता सर्वसमावेशक, सहिष्णू राजा, भारतीय आणि विशेषत्वाने भारतीय इतिहासावर महत्वपूर्ण ठसा उमटविणारे छत्रपती शिवाजी महाराज या कालखंडात  अजूनही भारतातील समाजकारण राजकारण आणि धर्मकारण मध्ययुगातच वावरत असलेलं. मध्युगातील सारी लक्षण स्पष्टपणे आढळतात. सारे राजकारण संरंजामदारी, वतनदारीचे, धर्माचे राजकारणावरील प्राबल्य जाणवण्याइतपत वाढलेले. साऱ्या राजवटी अनियंत्रित सत्ता उपभोगणाऱ्या या राजवटी सामान्य रयतेवर प्रचंड अन्याय, जुलूम जबरदस्ती करणाऱ्या, सतत लुटमार, जाळपोळ, हल्ले, अत्याचार चालूच. सामान्य जनता हतबल झालेली, श्रीमंत सरदार, जमीनदार, जहागीरदार आपआपला स्वार्थ जोपासण्यात मश्गुल असलेले पर्यायाने परकीय जुलमी राजवटीच्या अन्यायी प्रशासनात सहभागी सारा पराक्रम या परकीय, जुलमी सत्तांकडून होणाऱ्या संघर्षात खर्ची पडत असलेला सुलतानी पातशहांची मर्जी राखुन आपल्या जहागिरी, वतनदारी वाढविण्यातच धन्यता मानणारी अशी अनेक घराणी महाराष्ट्रातही त्याकाळी होती. पातशहांनी दिलेले राजपद मिळविण्यातच त्यांना भूषण होते. मोगल सुभेदारांची मेहरनजर मिळविण्यात सारे मराठी रक्त कित्येकदा सांडले जाई तर कधी आदिलशाही, निजामशाहीच्या चरणी ते वाहिले जाई. सारेच या बलवत्तर जुलमी सत्तांपुढे नतमस्तक होते.

साऱ्या भारतीय समाजाचा आत्मविश्वासच या मध्ययुगात नाहीसा झाला होता. चालुक्याचे, यादवांचे आणि अगदी अलीकडे विजयनगरचे वैभवी साम्राज्य नष्ट झाले होते. उरली होती ती प्रचंड राजकीय अनागोंदी, सल्तनतीमधला अंदाधुंद सत्तासंघर्ष आणि खैबरखिंडीतून होणारी परकीय आक्रमणे गझनी, खिलजी, तुघलक, आणि आता मोगली आक्रमणाने धुमाकूळ घातला होता. यात सारी भारतीय जनता  भरडली जात होती. दक्षिणेतल्या आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही आणि बरीदशाही या सल्तनतीही मोगली हल्ल्यांनी धास्तावले होते. आधुनिक युगातल्या स्वराज्य, स्वातंत्र्य लोककल्याणकारी राज्य किंवा राष्ट्रवाद लोकशाही या विचारांचा स्पर्शही या मध्ययुगीन भारतात झालेला नव्हता. स्वत:चाच धर्म श्रेष्ठ आणि पवित्र व इतर सर्व नापाक ही भूमिका घेऊनच इथल्या सर्व

मध्ययुगीन राजसत्ता उभ्या होत्या. परधर्मसहिष्णूता, स्त्रियांविषयी आदराची भावना या गोष्टीची जाणीवही या समाजात नव्हती. तात्पर्य, मध्ययुगीन भारतातले सर्व राजे राज्य हे सत्ताउपभोगाचे साधन मानत होते. मन मानेल तसा कारभार करणारे होते.या मध्ययुगीन पार्श्वभूमीवर ''६ जून १६७४ ला रायगडावर शिवाजी महाराजांनी सिंहासनाधिष्ठित होऊन छत्रपती बिरुद धारण केले आणि मराठा राज्याचे सार्वभौम शासक बनून मराठी राज्याला वैधानिक स्वरुप प्राप्त करुन दिले.''[१]

कृष्णाजी अनंत सभासद यांनी इ.स. १६९४ मध्ये लिहिलेल्या शिवचरित्रात स्वराज्याचा विस्तार पुढील प्रमाणे दिला आहे. ''सालेरी किल्यापासून गोदावरी नदी अलीकडे (पश्चिम बाजूस) वरघाट, तळघाट, तुंगभद्रापावेतो एक प्रांत व चंदी, वेलोर, ते कावेरी नदीपर्यंतचा एक प्रांत म्हणजेच कर्नाटक''[२] असे दोन प्रांत स्वराज्यात मोडत. शिवाजी महाराजांच्या राज्याचा विस्तार ठोकळमानाने तापी नदीपासून थेट दक्षिणेस जिंजी तंजावर पर्यंत व कावेरी नदी तीरास पोचला होता असे म्हणता येईल.

राजे म्हणून शिवाजीराजांनी आपल्या राज्यातील सर्व जाती जमातींना समान वागणूक दिली. हिंदू मुस्लीम असा भेद त्यांनी कधीही केला नाही तसेच लोकांचे राज्य निर्मिले. सामान्य रयतेला आपले वाटावे असे राज्य निर्माण केले. शिवाजी महाराजांनी आपला पराक्रम, शौर्य, स्वाभिमान व आत्मविश्वासाचे बाळकडू पाजून तयार केलेल्या पिढीच्या वंशजांनी पुढे महाराजांच्या राज्याचे साम्राज्यात रुपांतर घडवून इतिहास घडविला.

वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी महाराष्ट्र राज्याचा निर्माता, सार्वभौम छत्रपती ''४ एप्रिल १६८० साली त्यांचे निधन झाले. चैत्र शुध्द १५ रविवारी शके १६०२ या दिवशी भारताच्या इतिहासातील हा श्रेष्ठ युगपुरुष इतिहासाच्या रंगमंचावरुन अस्तंगत झाला.''[३]

सर यदुनाथ सरकार लिहितात , ``His Splendid Success fired the imagination of his contemperaries and his name because a spell calling the maratha race to new life''[४] अशा प्रकारचा कालखंड शिवाजी महाराजाचा होता.

## २.२ छत्रपती संभाजी :-

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या घराण्यात वारसाबद्दल गृहकलह निर्माण झाला. राज्यभिषेकाप्रसंगी संभाजीचा युवराज म्हणून अभिषेक झाला होता. परंतु संभाजीचा हक्क डावलून त्याचा ''सावत्र भाऊ राजारामाला छत्रपती बनविण्याचा डाव रचण्यात आला. मृत्यूसमयी शिवाजी महाराजांच्या राज्याची पुढील व्यवस्था काही एक ठरविली नव्हती आणि संभाजीचा हक्कही नष्ट केला नव्हता.''[५] शिवाजी महाराजांनी मरणापूर्वी वारसाचा प्रश्न निर्णायकपणे सोडविला नसल्याने संघर्ष निर्माण झाला. गादीचा वारसच मुघलांना मिळाल्याने अष्टप्रधान मंडळाला संभाजीविषयी अविश्वास वाटत होता. संभाजीराजे मोगलांना जाऊन मिळणे कुणालाच आवडले नाही. त्यांच्या वागण्याविषयी अनेक वावडया उठल्या. तशातच राणीसोयराबाईच्या स्वार्थी महत्त्वाकांक्षेतून कटूता आणि संघर्ष उत्पन्न झाला. संभाजीपेक्षा राजारामच कसा योग्य आहे आणि म्हणून तोच कसा राज्यावर यावा या संबंधी मसलती सुरु झाल्या. सोयराबाईने मोरोपंत पिंगळे प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी आणि अण्णाजी दत्तो या मातब्बर मंडळीना विश्वासात घेतले होते. संभाजीला बाजूला सारण्याचे जोरदार प्रयत्न सुरु झाले. महाराजांच्या मृत्युनंतर १५ दिवस तरी रायगडावर सारी संभ्रमावस्था होती. गृहकलहाला ऊत आला होता. ''२१ एप्रिल १६८० रोजी अण्णाजीच्या पुढाकाराने राजारामाचे राज्यारोहन साजरे झाले.''[६] एवढेच नव्हे तर पन्हाळगडावर माणसं पाठवून संभाजीला कैद करण्याचाही घाट घातला गेला. पन्हाळगडावरील अधिकाऱ्यांना तशा सूचनाही पाठविण्यात आल्या होत्या. परंतु नेमकी ही बातमी संभाजीच्याही कानी पोहचली. रायगडावरील हालचालीची त्यांना पूर्ण कल्पना आली. संभाजी राजांनीच आक्रमक धोरण स्वीकारले. पन्हाळगडावरील अधिकाऱ्यांना कैदेत टाकले. तेथील विरोध निर्माण होण्याच्या आतच चिरडून टाकला. पन्हाळगडावरुन त्यांनी सर्व किल्लेदारांना आदेश पाठविला सेनापतीला व इतर अधिकाऱ्यांनाही आपण छत्रपती झाल्याचे कळवले. आणि आपल्या सेवेत रुजू होण्यासाठी फर्माविले. दरम्यान रायगडावरुन अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत पिंगळे आपल्या सैन्यासह पन्हाळगडाकडे निघाले. संभाजीला कैद करण्याच्या इराद्याने मध्ये कराडला सेनापती हंबीरराव मोहित्यांची छावणी होती त्यालाही सोबत घ्यावे या इराद्याने ते दोघेही प्रत्यक्ष त्यांच्या छावणीत डेरे दाखल झाले. हंबीरराव मोहित्यांना सारे राजकारण कळलेले

होतेच. त्यांनी संभाजीचा पक्ष घेतला आणि अण्णाजी दत्तो व मोरापंत पिंगळयांलाच कैद केले. या राजकैद्यांना घेऊन आपल्या सैन्यानिशी हंबीरराव मोहिते पन्हाळगडावर पोहचले.

हंबीरराव मोहित्यांच्या रुपाने मराठी स्वराज्याचा सेनापती संभाजीराजांच्या बाजूला आल्यामुळे त्यांचे पारडे जड झाले. पाठविलेल्या आदेशालाही चांगला प्रतिसाद मिळाला. शेकडो अधिकारी त्यांना येऊन मिळाले. व संभाजी राजांनी त्यानी रायगडावरच स्वारी करण्याची तयारी केली. २० हजारांचे खडे सैन्य तयार झाले दरम्यान रायगडावरील सत्तागटाचे नीतिधैर्यच खचले. ''२० जून १६८० रोजी संभाजी रायगडावर आले. गड सहजपणे हाती आला. सोयराबाई राजारामासह या कटातील सर्वांना कैद करण्यात आले.''[७]

विरोधकांचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी राजांचा सुमारे तीन महिन्याचा काळ गेला. ''संभाजीराजांचे प्रथम मंचकारोहण (३० जून १६८०) आणि नंतर राज्यभिषेक (१६ जानेवारी १६८१) रोजी झाला.''[८] मोरोपंत पिंगळयांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचा मुलगा निळोपंत पिंगळे यांची पेशवे पदावर नेमणूक करण्यात आली. अशा रितीने सोयराबाई आणि तिच्या समर्थकांनी संभाजी राजांविरुध्द केलेले कारस्थान कोलमडले संभाजी राजांच्या कारकीर्दीला अशा रीतीने सुरुवात झाली. परंतु शिवाजीराजांच्या मृत्यूचा फायदा घेऊन औरंगजेब मराठयांचे राज्य धुळीस मिळविण्याचा प्रयत्न करणार ही गोष्ट उघड होती. त्यात पुन्हा सोयराबाईच्या समर्थकांचे सहकार्य आपणास मनापासून मिळणार नाही याची संभाजीराजांना कल्पना होती. तरीसुध्दा या सर्व अडचणीवर मात करण्याचा त्यांनी निश्चय केला.

### २.२.१ बादशहा औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन व संभाजी महाराज व मुगल संघर्ष :-

मिर्झाराजा जयसिंग याच्या मृत्युनंतर रजपुतांची शिल्लक राहिलेली सत्ता नष्ट करुन त्यांचे राज्य मोगल साम्राज्यात विलिन करण्याच्या उद्देशाने बादशहा औरंगजेब यांने आपला पुत्र शहजादा अकबर यास राजस्थानातील राठोडांचे बंड मोडून काढण्यासाठी पाठविले. हा राजस्थानमध्ये पोहचल्यावर राजपुतांनी त्याला दिल्लीचा बादशहा करण्याचे आश्वासन दिले. उदयपूरची सेना आणि वीर दुर्गादास राठोड यांच्यामुळे अकबराची सुप्त इच्छा जागी झाली. अकबराने स्वत:ची नाणी पाडली. औरंगजेबाचा मुक्काम उदयपूरच्या अनासागर भागात होता.अकबर औरंगजेबाविरुध्द चालून

गेला. औरंगजेबाने यावेळी कपटाचा आश्रय घेतला. एक खोटे पत्र तयार केले. ते पत्र राजपुतांच्या हातात पडेल अशी व्यवस्था केली. या पत्रातील मजकुरानुसार अकबर व औरंगजेबाची सेना ऐन युध्दात राजपुताची कत्तल करणार होते. पत्र वाचताच राजपूत अकबराला सोडून गेले. औरंगजेबाचा न लढताच विजय झाला. चाणाक्ष बादशहाने या युध्दात अकबराचा पराभव केला त्यामुळे ''बापाच्या विरोधात छत्रपती संभाजीचे सहकार्य मिळविण्याच्या अपेक्षेने अकबर आपला विश्वासू सहकारी दुर्गादास राठोड याचेसह ११ मे १६८१ रोजी महाराष्ट्रात आला.''[९]

अकबर आपल्या विरुध्द बंड करुन दक्षिणेत गेला. हे समजताच प्रसंगाचे गांभीर्य ओळखून औरंगजेब देखील त्याच्या मागे आला. नोव्हेंबर १६८१ मध्ये तो बुऱ्हाणपूरास आला. औरंगजेब शेवटपर्यंत दक्षिणेत थांबला. औरंगजेब दक्षिणेच्या मोहिमेवर असताना शहजादा अकबराने दोन तीन वेळा उत्तरेकडे जाऊन गादी मिळविण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मदतीने दुर्गादास राठोड बरोबर उत्तरेकडे जाण्याचे अकबराचे सर्व मार्ग असफल झाले. बादशहा बनण्याचे आपले स्वप्न पूर्ण होणार नाही हे जाणून निराशेपोटी '' अकबर फेब्रुवारी १६८७ मध्ये राजापूर बंदरातून इराणकडे निघून गेल्या.''[१०] अकबर जरी निघून गेला असला तरी बादशहा औरंगजेबाच्या रुपाने मराठयांच्या समोर एक नवे संकट उभे राहीले.

प्रत्यक्ष मोगल बादशहा आपल्या प्रचंड फौजेनिशी मराठयांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी दक्षिणेत उतरल्याने मराठे-मोगल यांच्यातील सत्ता संघर्ष सुरु झाला. संभाजी, कवीकलश, अकबर व दुर्गादास यांनी आपापल्या परीने बुध्दी चातुर्याने हालचाली करुन सहा वर्ष बादशहाला सडकून विरोध केला. तेवढया अवधीत जिंजिऱ्याचा सिद्दी, गोव्याचे पोर्तुगिज इत्यादीस बादशहाने संभाजी विरुध्द उभे केले. आणि आपले मोठे मोठे सरदार, शहा आलम, आजम शहा व काम बक्ष हे तिघे पराक्रमी पुत्र यासह प्रचंड फौजेनिशी दक्षिणेत युध्द केले. ''येताक्षणी औरंगजेबाने आपल्या सर्व सैनिकांस पृथक कार्यभाग नेमून देऊन संभाजीच्या प्रदेशावर चहुकडून चाल केली. त्यामुळे संभाजीची ९ वर्षाची सर्व कारकिर्द बादशहाशी झगडण्यास खर्च झाली.''[११]

१६८१ मध्ये औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून १६८४ पर्यंत जवळ जवळ ४ वर्ष मराठयांच्या चिवट प्रतिकारांमुळे औरंगजेबाने आपले लक्ष विजापूर आणि गोवळकोंडा घेण्याकडे वळविले. स्वत: आलमगिर बादशहा गोवळकोंडा आणि विजापूरच्या सल्तनतीवर चालून गेला. प्रचंड

संघर्षानंतर अखेर ''१२सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर मोगलांच्या ताब्यात आले.''[१२] विजापूरच्या आदिलशाही सल्तनतीचा अंत झाला. त्यानंतर मोगल कुतुबशाही संघर्षही प्रखर बनला. शेवटी पुढच्या चारच महिन्याने गोवळकोंडा मोगलांच्या हाती पडले. ''२८ जानेवारी १६८७ रोजी कुतुबशाही सल्तनत संपली.''[१३] अशा रीतीने १६८७ च्या जानेवारी अखेर दक्षिण भारतातल्या दोन सल्तनती संपुष्टात आल्या आणि मोगलांचा जोर वाढला. परिणामी मराठयांचा ताणही वाढला. आता मोगलांची सारी शक्ती मराठयांविरुध्द केंद्रित झाली. १६८७च्या अखेर मोगल अधिक प्रबळ बनले. औरंगजेबाच्या सैन्याचा एक तळ अकलूज येथे उभारला. संभाजीच्या पाठलागावर मोगल सैन्य धावू लागले. तशातच ''मराठयांचा सेनापती हंबीराव मोहिते याचा डिसेंबर १६८७ मध्ये मोगल सरदार सर्जाखान याच्याशी वाईनजीक लढताना गोळी लागून मृत्यु झाला.''[१४]

He (Hambirrao) was the lost of the sambhaji,s supporters and his loss sealed the Raja,s (Sambhaji,s) fate"[15]

## २.२.३ छत्रपती संभाजीचा वध :-

संभाजी महाराजांजवळ असणाऱ्या पराक्रमी सरदारांपैकी हंबीरराव हे शेवटचे होते. तेही ठार झाल्यामुळे संभाजी महाराज अधिकच दुर्बल बनले. त्यांना रसद मिळणार नाही याची व्यवस्था केली गेली. त्यामुळे संभाजी महाराजांना रायगड आणि पन्हाळा प्रदेशामध्ये संचार करणेही अशक्य बनले. तसेच बादशहाने आपले कित्येक चतुर व अनुभवी हेर मुद्दाम संभाजीच्या हालचालीचा व राहणीचा तपास ठेवण्या करीता कैक दिवस आगाऊ पाठविले होते.''[१६] ''त्यांनी मुर्करबखानास येऊन वर्दी दिली की, संभाजीचा मुक्काम संगमेश्वर येथे असून येथे तो विलासात मग्न आहे.''[१७] ''माघ व ७ शुक्र वासरी संभाजीराजे व कवी कलश रायगडास जावयास संगमेश्वरास आले असता. शेख निजाम दौड करुन येऊन उभयतांस जीवंत धरुन नेले. वरकरड लोक रायगडास गेले.''[१८] संभाजीचे अटकेचे वृत्त कळताच बादशहाला अत्यानंद झाला. मराठयांच्या राजा हाती आल्याने आपले दक्षिण जिंकण्याचे स्वप्न साकार होणार असे त्याला वाटले. संभाजीला औरंगजेबापुढे उभे केल्यानंतरचे चित्रण मोगल इतिहासकार ईश्वरदास नागर याने पुढीलप्रमाणे केले आहे.''संभाजीची दयनीय अवस्था झाली असूनही त्याने बादशहापुढे यत्किंचितही मान लवविली नाही. बादशहा अल्लाचे आभार मानताना दिसताच या कठिन प्रसंगातही कवी कलश काव्यात राजांना म्हणतो हे राजन तुला पाहून तुला ताजीम

देण्यासाठी आलमगिर बादशहाही आपल्या आसनावरुन खाली आला आहे.''[१९] अपमानित संभाजीला शरणगती पत्करण्यास सांगितल्यानंतर त्याने इस्लाम धर्माची तीव्र निंदा केली.

खाफी खान लिहितो. '' बादशहाने आज्ञा केली की, प्रथम त्या दुष्टाच्या जिभा उपटून काढून त्यांच्या असभ्य बोलण्याची त्यांना शिक्षा देण्यात यावी. त्यानंतर त्यांचे डोळे त्यांच्या मस्तकाच्या पात्रांतून काढण्यात यावे.''[२०] खाफी खान पुढे लिहितो, ''(११मार्च १६८९) या नंतर त्यांच्या दहा अकरा साथीदारांसह अनन्वीत छळ करुन ठार मारण्यात आले. नरकवासी संभाजी आणि कवी कलश यांच्या तमाम शरीरात पेठा भरण्यात आला. दख्खनमधील प्रसिध्द अशा सर्व शहरातून आणि गावातून ही प्रेते नगारे, कर्णे, शिंगे इ. वाद्यांच्या गजरात मिरविण्यात आली. लोकांना पिडा देणारे, उच्छाद मांडणे हाच त्यांचा पेशा आहे. असे हे दृष्ट त्यांना हीच शिक्षा हवी.''[२१]

छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य त्यांच्या बलिदानाने कळसास पोहचले. ते जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षाचे प्रतिनिधी झाले. त्यामुळे औरंगजेबाला दक्षिणेत स्वत:च्या डोळयासमोरच साम्राज्य लयाला जाताना पाहावे लागले. संभाजीच्या आत्मबलिदानामुळेच संपूर्ण मराठा राज्यात एकजुट आणि संघटितपणा येऊ शकला. संभाजी राजांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी एक व्यापक देशप्रेम, राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली आणि त्यातून मोगल बादशहांविरुध्द मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द सुरु झाले.

## २.३ छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई:-

संभाजी राजांच्या मृत्युने हिंदवी स्वराज्याला फार मोठा धक्का बसला. राजांच्या मृत्युने स्वराज्याची फार मोठी हानी झाली. यातून मराठे सावरु शकणार नाहीत, असा मोगल बादशहाचा समज होता. परंतु प्रसंग ओळखून दु:ख बाजूला सारुन मराठयांनी येणाऱ्या संकटाला धीरगंभीरपणे आणि धैर्याने तोंड देण्याचा निर्णय घेतला. छत्रपती संभाजी महाराजांना ज्या पध्दतीने पकडले त्याच प्रमाणे छत्रपती राजारामांना पकडून ठार मारावे असा विचार औरंगजेबाच्या मनात होता. याचवेळी काही स्वराज्यद्रोहयांनी झुल्फीकारखानाला रायगडावर मारा करण्याच्या जागा दाखविल्या. फितुरांमुळेच राज्य पुन्हा संकटात आले. तसेच मराठयांची राजधानी संकटात आली होती. ''राजमाता येसुबाईवर राज्यसकट चालविण्याची कठिण कामगिरी आली. राजधानी वाचणार नाही हे निश्चित

झाल्याने येसूबाईने एकंदर परिस्थितीचा विचार करुन राजाराम आणि काही निवडक मंत्र्यांनी स्थलांतर करावे असे ठरविले. या निर्णयामागच्या संकटाची जाणीव तिला होती.''[२२]

''राजारामाला येसूबाईस मागे एकटी टाकून निघून जाणे कठिण वाटत होते परंतु नाईलाजाने या कठिण प्रसंगाला तोंड देण्यासाठी राज्याचे अधिकारी शिवाजी (शाहू) राजे राहतील व आम्ही त्यांच्या नावाने कारभार पाहून पूर्वीपेक्षा विशेष पराक्रम करुन औरंगजेबास जिंकून राज्याचे रक्षण करु. अशा सर्वांनी शपथा घेऊन याविषयी सर्वांची एकवाक्यता झाल्यावर करती माणसे बरोबर घेऊन ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम रायगडाबाहेर पडला.''[२३] राजाराम महाराजांबरोबर रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, शकराजी नारायण हेही रायगडावरुन बाहेर पडले. ''आपल्या अधिकाऱ्यांसह रायगडावरुन बाहेर पडून ते प्रथम प्रतापगड व नंतर पन्हाळयास आले. व तेथून मोठया मुश्किलीने मोगली ठाणे चुकवित कर्नाटकातील जिंजी येथे १५ नोव्हेंबर १६८९ रोजी जाऊन पोहचले. मराठी स्वराज्याचे नवे सत्ता केंद्र जिंजी येथे प्रस्थापित झाले.

''ईतिकदखानाने ३ नोव्हेंबर १६८९ रोजी रायगड काबिज केला.''[२५] ईतिकदखानाने झुल्फीकारखान रायगडावर आपले वर्चस्व प्रस्थापिले आणि दरबारी बंदिवानांना आलमगिरापुढे हजर केले. अशा रितीने ''३ नोव्हेंबर १६८९ रोजी रायगडाचा वेढा संपला, रायगड पडला. प्रत्यक्षात मोगलांचा अंमल सुरु झाला. २३ नोव्हेंबर १६८९ पासून राणी येसुबाई आणि शाहूराजे आलमगिराच्या छावणीत राजकैदी म्हणून बंदिस्त झाले.''[२६] अर्थात शाहू राजांना सत्तर हजारी मनसबही बहाल करण्यात येऊन त्यांना वश करण्याचा प्रयत्नही चालू होता.

## २.३.१ मराठा स्वराज्याची नवी घडी :-

मराठा स्वराज्यातील प्रशासन पूर्णपणे उध्वस्त झाले. सरंजामदार, किल्लेदार संभ्रमित अवस्थेत मोगलांना मिळू लागले. मराठी स्वराज्याचा प्राण असलेले किल्ले मोगलांच्या ताब्यात जाऊ लागले. शेवटचा किल्ला रायगडही मोगलांच्या हाती गेला. आता मराठी स्वराज्य संपले असाच भ्रम मोगलांनाही झाला. एकटा छत्रपती राजाराम कर्नाटकात गेला. पण तो आपल्या हातून निसटला याचे दु:ख साहजिकच आलमगिराला झाले. पण मराठा स्वराज्य आपण संपवले असे त्याला निश्चित वाटत असतानाच फिनिक्स पक्षाप्रमाणे, मराठी स्वराज्याच्या शाखेतून पुन्हा स्फुल्लींग पेटले. जिंजि

येथे मराठा स्वराज्याची नवी राजधानी थाटली गेली. ''मराठयांचे राज्य कायम आहे याची जाणिव सर्वत्र होण्याकरिता राजारामाने अष्टप्रधानादिकांच्या नेमणूका करुन राज्याचा व्यवस्थित कारभार चालू केला.''[२७] प्रल्हाद निराजींची नेमणूक प्रतिनिधीपदी करण्यात येऊन त्यांना गौरविण्यात आले. रामचंद्रपंत 'हुकुमतपन्हा बनले त्यांच्यावर शत्रुसैन्याच्या प्रतिकाराची जबाबदारी टाकण्यात आली. तात्पर्य जिंजिवर स्वराज्याच्या कारभाराची व्यवस्था आता नव्याने करण्यात आली. अत्यंत प्रतिकुल व बिकट अशा परिस्थितीत राजारामाने कारभार सुरु केला.

## २.३.२. मोगलांशी लढा :-

औरंगजेबाने ताबडतोब आपला सरदार झुल्फिकार खान (औरंगजेबाचा मावस भाऊ) यास जिंजीकडे रवाना केले. तो सप्टेंबर १६९० मध्ये जिंजिस पोहचला. मोगलांनी जिंजीस वेढा घातला खरा, पण मराठयांनी मोगलांची रसद तोडली. आणि त्यांच्यावर हल्ले करुन झुल्फिकार खानास जेरीस आणले.'झुल्फिकार खानाला मदत करण्याकरिता औरंगजेबाने शहजादा कामबक्ष याला पाठविले होते. परंतु शहजादा कामबक्ष याने राजारामाशी संधान बांधून झुल्फिकारखाना विरुध्द कारस्थाने सुरु केली. अशा भयंकर परिस्थितीत मोगलांना मराठयांच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागले. शेवटी झुल्फिकार खान व असद खान यांने शहजादाला अटक केली आणि मोगल सैन्याने जानेवारी १६९२ मध्ये अत्यंत नामुष्कीने जिंजीचा वेढा उठवून आपले सैन्य मागे घेतले.''[२८]

औरंगजेबाने जातीने मोहिम काढून मराठयांची किल्ले जिंकून घेण्याचा निर्णय घेतला. मराठयांचे किल्ले घेत तो पुढील पाच वर्षापर्यंत महाराष्ट्रात हिंडत होता. या अवधीत मोगल सैन्यांचे जे हाल झाले त्याची तपशिलवार वर्णने साकी मुस्तैद खान, खाफी खान, भिमसेन सक्सेना या समकालीन लेखकांनी दिली आहे. किल्लेदारांना भक्कम रकमा देऊनच मोगलांना किल्ले घ्यावे लागले. किल्ले लढवितांना मराठयांनी एक धोरण ठरविले होते. किल्ला शक्य तेवढा लढवावा. किल्ल्याबाहेरुन मराठा सैन्याने मोगलांवर हल्ल्यावर हल्ले करुन त्यांना हैराण करावे, त्यांची रसद बंद करावी. मोगलांची अधिकांश आर्थिक हानी केल्यावर आता किल्ला अधिक काळ लढविता येत नाही, असे दिसून आले की, मोगलांकडून भक्कम रकमा घेऊन किल्ला त्यांच्या स्वाधिन करावा आणि पावसाळयात मोगल सैन्य किल्ल्याच्या खाली आले की, मराठी सैन्य किल्ल्यांवर चढवून तो ताब्यात घेत असे. असा प्रकार चालू झाला. १६९४ च्या अखेरीस झुल्फिकारखानाने जिंजीच्या

किल्ल्याला पुन्हा वेढा दिला. पुढे वर्षभर जवळपास मोगल सैन्य जिंजिच्या पायथ्याशी होते. मोगल मराठयांमध्ये सतत संघर्ष होत राहिला. मराठयांनी प्रचंड पराक्रम दाखविला. संताजी आणि धनाजीने कर्नाटकात आणि विजापूर प्रदेशात मोगलांवर असंख्य छुपे हल्ले केले तेवढयात १६९५च्या डिसेंबर मध्ये धनाजी जिंजी परिसरात येऊन धडकला. ही बातमी ऐकून झुल्फिकार खानाची पाचावर धारण बसली. त्याने निरवा निरव करुन अखेरच्या लढयाची तयारी केली. बरोबरचा सारा लवा जमा, जनानखाना व इतर सामान सुमान त्याने आर्काटला रवाना केले. ''तिरुवडीजवळ मोगल मराठा संघर्षाची पहिली सलामी झडली.''[२९] अटि तटीचा संघर्ष झाला. पाठोपाठ संताजी येऊन दाखल झाला. संताजी आणि झुल्फिकारखान यांच्यात संघर्ष झाला. खानाने जिंजीहून माघार घेतली. आणि तो अर्काटच्या किल्ल्यात तळ ठोकून बसला. जिंजी परिसरात मराठयांचे सामर्थ्य वाढत चालले. सिराचा सुभेदार कासीम खान संताजी व धनाजीच्या हालचालींना पायबंद घालू शकला नाही. खरे म्हणजे आलमगिर औरंगजेबने त्यास खास आज्ञा देऊन ही कामगिरी त्यांच्यावर सोपवली होती. ''तमिळनाडू, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातील कडप्पा या भागात मराठयांनी कहर उडवून दिला.''[३०]

इ.स. १६९७ च्या अखेर मोगल मराठा संघर्षाचे स्वरुप बदलले परिस्थिती पालटली गेली. सात आठ वर्ष मोगल जिंजीवर तळ देऊन होते. पण त्यांना जिंजीचा किल्ला जिंकता आलेला नव्हता. मोगल बादशहा औरंगजेबाने जिंजी जिंकण्यावरच नेट लावला. अखेर नोव्हेंबर १६९८ मध्ये जिंजीचा वेढा पुन्हा कडक बनला. झुल्फिकाखानाने आपले सारे सामर्थ्य जिंजीवर पणाला लावले. ''म्हणून राजारामांनी आपला पुत्र राजा कर्ण यास खंडो बल्लाळासह झुल्फीकारखानाकडे लटकी बोलणी करण्यासाठी ऑगस्ट १६९७मध्ये पाठविले.''[३१] व असे ठरले छत्रपती राजारामांनी त्यातून निसटून जावे असा मैत्रीचा सल्ला त्यांना झुल्फीकाखानाने पाठविला तो राजारामाने मान्य केला. अशा प्रकारे सर्व मराठे सुखरुपपणे स्वराज्यात पोहचले. त्यानंतर लगेचच ''सात फेब्रुवारी १६९८ रोजी झुल्फिकार खानाने जिंजी जिंकून घेतली.''[३२]

### २.३.३ छत्रपती राजाराम महाराजांचे स्वराज्यात पुनरागमन :-

छत्रपती राजाराम जिंजीवरुन निसटले. ते स्वराज्यात २२ फेब्रुवारी १६९८ मध्ये विशाल गडावर पोहचले. मराठयांच्या स्वराज्यातील हालचालींना आता गती आली. बागलाण आणि खानदेशात मराठयांच्या फौजा मोगलांवर हल्ले करु लागल्या. येसाजी, खंडोजी, परसोजी, नेमाजी

ही मंडळी मोगलावर सतत आक्रमण करु लागली. कोकणात कान्होजी आंग्रे या मराठा सरदाराने पराक्रमाची शिकस्त केली. ''छत्रपती राजारामाने कान्होजी आंग्रे यांना 'मराठा सरखेल' असा किताब बहाल केला.''[३३] मराठी फौजांनी खानदेशातील शहरांवर हल्ले करुन मोगलांना जेरीस आणणे सुरुच ठेवले. मराठे नर्मदा पार करुन माळव्यातही शिरले. मराठयांनी अशा रितीने सर्वच बाजूने जोर धरला. मोगलांनी पुन्हा एकदा मराठयांविरुध्द घनघोर संघर्ष सुरु केला. औरंगजेबाने मराठयांची किल्ले जिंकून घेण्याची मोहिम हाती घेतली. मराठयांनी मोगलांच्या या हल्ल्याला निर्धाराने प्रतिकार केला. गनिमी काव्याने मोगालांवर हल्ले केले. मोगलांच्या वाटा अडविल्या. अचानकपणे सैन्यावर छुपे हल्ले केले. अटितटीने किल्ले लढविले, आणि जेंव्हा अशक्य झाले तेंव्हा सरळ मोठमोठया रकमांच्या बदल्यात किल्ले मोगलांच्या हाती दिले पुन्हा किल्ला जिंकण्याच्या इराद्यानेच.

## २.३.४ स्वातंत्र्ययुध्द संपण्यापूर्वीच्या घडामोडी :-

''राजाराम महाराजानी नव्याने स्थापन केलेल्या राजधानीस सातान्याच्या किल्ल्यास''[३४] ''मोगलांनी (डिसेंबर १६९९) रोजी वेढा दिला. हा वेढा चालू असतानाच राजाराम महाराजांचे सिंहगडावर २ मार्च १७०० रोजी निधन झाले.''[३५] मोगल मराठा संघर्षाचा दुसरा कालखंड त्यांच्या मृत्युने संपला. पुन्हा एकवार महाराष्ट्राची राजगादी उघडी पडली. आता तरी महाराष्ट्र आपल्या सत्तेखाली येईल असे औरंगजेबाला वाटू लागले. परंतु तसे घडायचे नव्हते. राजारामाच्या मृत्युनंतरच्या इतिहासातील आणखी एका तेजस्वी पर्वाची सुरुवात झाली. राजारामाच्या पत्निने आपला लहान मुलगा शिवाजी याला गादीवर बसविले आणि त्याच्या नावाने राज्यकारभारास सुरुवात केली.

''राजाराम महाराजांच्या देहवसानानंतर (इ.स. १७००) राज्यशकट चालविण्याची जबाबदारी ताराबाईंवर येऊन पडली. आपल्या पतींच्या हयातीतच या स्त्रीने राजकारभारात व लष्करी मोहिमेत भाग घ्यावयास सुरुवात केली होती.''[३६] १७०० ते १७०७ या काळातला मोगल मराठा संघर्ष हा ताराबाईंच्या काळात झालेला संघर्ष होय. ''राजारामाच्या मृत्युनंतर लगेच ताराबाईने रामचंद्रांमार्फत सर्व मराठा सरदारांना फर्मान पाठविले. राज्य रक्षणाच्या जबाबदारीची जाणीव त्यांना करुन दिली. त्या नंतर राजपुत्र शिवाजी याचा राज्याभिषेक करुन घेतला. विशाल गडावर हा राज्याभिषेक समारंभ

झाला.''[३७] अर्थातच शिवाजी केवळ ४ वर्षाचा असल्यामुळे राज्यकारभाराची सर्व सूत्रे राजमाता म्हणून ताराबाईने आपल्या हाती घेऊन मोगलांविरुध्द चाललेल्या लढयाचे नेतृत्व स्वत:कडे घेतले. लढयाची सूत्रे हाती आल्यानंतर अल्पावधीतच ताराबाईने आपला विलक्षण दरारा निर्माण केला. सोलापूर, नलदुर्ग, आष्टी, परांडा, औसा, उद्‌गिर नांदेड या मराठवाडयातल्या परिसरात मराठा मोगल संघर्षाच्या अनेक लढाया चकमकी झाल्या. मोगलांच्या ताब्यात गेलेले अनेक किल्ले मराठयांनी परत घेतले. मोगल फौजेची धुळधाण उडविली. सिरोज, मंदसोर, माळवा या प्रांताच्या सरहद्‌दी पर्यंत मराठयांनी धामधूम उडविली. बादशहाने आपली अर्धी हयात मोहिमा करणे आणि किल्ले घेणे यात घालविली. ताराबाई विरुध्द तो शेवटपर्यंत लढत राहिला. पण मराठयांचे बळ आणि बंड हे दिवसेंदिवस वाढत गेले.

१७०७ साल उजाडले. आपले साम्राज्य आपल्या डोळयासमोर कोसळत असल्याचे स्पष्ट चिन्हे औरंगजेबाला दिसू लागले. असहाय्य, अगतिक अवस्थेत मराठयांच्या चौफेर पराक्रमाचे वृत्त ऐकत अत्यंत निराश मनस्थितीत ''अत्यंत निराश होऊन अहमदनगर मुक्कामीच बादशहा औरंगजेबाने दिनांक २० फेब्रुवारी १७०७ रोजी आपला देह ठेवला.''[३८] औरंगजेबाच्या इच्छेनुसार त्याची कबर खुल्ताबाद औरंगाबाद येथे बांधण्यात आली. त्याच्या मृत्युबरोबरच मराठयांचा स्वातंत्र्य संग्राम संपला.

औरंगजेबाच्या मृत्युबरोबरच मोगल मराठा संघर्ष जवळ जवळ संपलाच. २७ वर्षे हा संघर्ष चालू होता. हे लोक युध्दच होते. मराठयांच्या बाजूने सर्व सामान्य रयत एक होऊन प्रचंड मोगली साम्राज्य विरुध्द अस्तित्वाचा लढा देत होती. हा मुकाबला जगातल्या इतिहासातील अद्वितीय असा अभूतपूर्व मुकाबला होता. अफाट मनुष्यबळ, शस्त्रसामग्री, शुर लढवय्या कसलेला राजकारणी, मोगल सम्राट एका बाजूला. दुसऱ्या बाजूला मर्यादित शक्ती तुटपुंजे शस्त्रबळ, काही किल्ले अगदी थोडकी सैन्य शक्ती असा हा विषम संग्राम पण मराठयांची बाजू तरीही शेवटी बलोत्तर ठरली. कारण मराठयांचे स्वातंत्र्य युध्द खरे तर लोकयुध्दच होते. स्वाभिमान, स्वराष्ट्रप्रेम, स्वदेशवरील दुर्दम्य निष्ठा, या प्रेरणांनी प्रेरित होऊन मराठयांनी पराक्रमाचा आदर्श निर्माण केला. न्यायमुर्ती रानडे यांनी मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाबाबत पुढील उद्‌गार काढलेले आढळतात. ''कोणत्याही स्वातंत्र्य युध्दात लुटारु व दरोडेखोर यांना कधीच विजय मिळत नसतो. मराठयांची या स्वातंत्र्य युध्दात सर्व अर्थाने

परीक्षा होऊन त्यात मराठयांचे शौर्य, परिश्रम, दुर्दम्य आशावाद आणि आत्म त्याग इ. गुण प्रकर्षाने दिसून आले. यामुळेच स्वातंत्र्य संग्रामाचा हा सगळा कालखंड मराठयांच्या इतिहासात अत्यंत गौरवशाली ठरला.''[३९]

## २.४ छत्रपती शाहूंचे महाराष्ट्रातील आगमन व राज्याभिषेक :-

औरंगजेबाच्या मृत्युनंतर अनेक घटना घडल्या. मोगल दरबारात यादवी माजली '' शहाजादा मुहम्मद आजमने अहमदनगर येथे स्वत:ला मोगल सम्राट म्हणून घोषित केले''[४०] मराठयांशी चालू असलेला संघर्ष थांबवला ''आपला उत्तरेत असलेला भाऊ शहाआलम याचा विरोध मोडून काढल्याशिवाय आपल्याला निरंकुश सत्ता लाभणार नाही याची खात्री आजमशहाला होती आणि म्हणून मराठयांबरोबर सुरु असलेला लढा बंद करुन दिल्लीकडे तो घाईघाईने ससैन्य निघाला.''[४१] या सुमारास छत्रपती संभाजीचा पुत्र शाहू आणि त्याची आई येसूबाई मोगलांच्या कैदेत होती. ''दिल्लीच्या रोखाने जात असतांना झुल्फिकारखान आणि काही मुत्सद्यांच्या सल्ल्यानुसार आजमशहाने शाहूची (८ मे १७०७ रोजी) सुटका केली.''[४२] त्यांच्यात एक करार झाला. त्यानुसार शाहुराजांनी मोगल जहागीरदार म्हणून मराठा स्वराज्य सांभाळावे तसेच दक्षिणेतील सहाही सुभ्यांतून चौथ आणि सरदेशमुखी वसूल करावी. अशा काही अटी लादण्यात आल्या त्या अटींच्या बदल्यात शाहूंची सुटका झाली.

दरम्यान मोगल शहाजाद्यांमध्ये संघर्ष अटळ ठरला ''शहाजादा आजम आणि शहाजादा शहाआलम यांच्यात आग्र्याजवळ मोठी लढाई झाली. त्यात शहाजादा आजम मारला गेला ८जून १७०७ रोजी शहाजादा शहाआलम विजयी झाला व तो मोगलसम्राट बनला. बहादूरशहा या नावाने त्याने राज्यकारभार सुरु केला.''[४३] त्याने कालांतराने शहाजादा कामबक्षलाही मारले. १७०९ पर्यंत बहादुरशहाने मोगल राजकारणात आपले बस्तान व्यवस्थित बसवले. दरम्यान शाहूचे दक्षिणेकडे मार्गक्रमण चालूच होते. तो लांबकानी येथे पोहचला. तेथे प्रथम परसोजी भोसले त्याला सामील झाला आणि शाहू जसजसा दक्षिणेकडे स्वदेशी येऊ लागला तसतसे लहान मोठे सरदार त्याला येऊन मिळू लागले. शाहूचे सहकारी आणि सैन्य वाढत जाऊ लागले. त्याचबरोबरच मराठयांच्या इतिहासाला नवा रंग आणि नवा आकार प्राप्त होत गेला.

या घटनेसंबंधी पहिली प्रतिक्रीया महाराणी ताराबाईंनी व्यक्त केली. महाराणी ताराबाईनी सुरवातीस शाहूराजांना तोतया ठरविण्याचा प्रयत्न करुन पाहिला. तो अयशस्वी झाल्यावर तिने मराठी स्वराज्यावरचा शाहूराजांचा अधिकारच अमान्य केला. ‘‘शिवाजीराजांनी निर्मिलेले स्वराज्य संभाजीराजांचे कारकीर्दीत पूर्णपणे नामशेष झाले होते. राजाराम महाराजांनी ते पुन्हा निर्मिले तेंव्हा या राज्यावर राजाराम महाराजांचा व त्यांचे वारसांचा खरा हक्क पोहोचतो असे म्हणून ताराबाईने आपला पुत्र दुसरा शिवाजी हाच खरा छत्रपती होय ही भूमिका घेतली.’’[४४] त्यामुळे मराठी राज्यात दोन गट उघडपणे पडले. त्याची परिणती ‘‘अश्विन वैद्य पक्षात बहुधा धनत्रयोदशी म्हणजे १२ ऑक्टोबर १७०७ चे सुमारास खेड येथे लढाई होऊन शाहूस जय मिळाला.’’[४५] या विजयाबरोबरच शाहुंची राजकीय घोडदौड अधिक वेगाने सुरु झाली. ‘‘जानेवारीत म्हणजे शाहू माळव्यातून निघाल्यापासून आठ महिन्यांनी सातारा राजधानी त्यांच्या कब्जांत येऊन तो मराठी राज्याचा मालक बनला. त्यानंतर सुमुहूर्त पाहून माघ. शु.१ सोमवार शक १६२९ तारीख १२ जानेवारी सन.१७०८ रोजी त्याने आपला राज्याभिषेक समारंभ उरकला’’[४६] व राज्याभिषेकासमयी शाहूने नेमणूका केल्या, त्या बहुधा पूर्वी कामावर असलेल्या कुटंबातूनच केल्या. ‘‘बहिरोपंत पिंगळे यास पेशवेपद तर धनाजी जाधवास सेनापती पद देण्यात आले.’’[४७]

## २.५ बाळाजी विश्वनाथाचा उदय मराठा मंडळाचे कार्ये :-

उत्तरेकडे जाताना झुल्फिकारखानाच्या आग्रहावरुन शहजादा आझमने ८ मे १७०७ मध्ये शाहूला मुक्त केले. शाहू महाराष्ट्रात येताच काही ज्येष्ठ कनिष्ठ मराठा सरदार त्याला येऊन मिळाले. ऑक्टोबर १७०७ मध्ये शाहूने खेडच्या लढाईत ताराबाईच्या सैन्याचा पराभव केला. लढाईतील विजयापेक्षाही शाहूच्या राजकारणपटुत्वामुळे धनाजी जाधव हा रणझुंजार सेनापती शाहूच्या गोटात दाखल झाला. ही घटना अधिक महत्वपूर्ण ठरली. धनाजीबरोबर खंडो बल्लाळ आणि बाळाजी विश्वनाथ हेही शाहूकडे आले. पण ‘‘घाटगे, घोरपडे, चव्हाण, कान्होजी आंग्रे यांसारखे मातब्बर सरदार अद्यापही ताराबाईंच्या पक्षात होते. कान्होजी आंग्रेनी ज्यावेळी बहिरोपंत पिंगळे पेशवे यास अटक करुन छत्रपती शाहुंपुढे प्रश्न निर्माण केला. तेंव्हा या प्रश्नाला सामोरे जाण्याची जबाबदारी सोपविण्यापूर्वी शाहूने प्रतिनिधींशी सल्ला मसलत करुन बाळाजी विश्वनाथाला पेशवेपदाची वस्त्रे दिली.’’[४८] युध्दाचा प्रसंग टाळून बाळाजी विश्वनाथने कान्होजीस भेटीसाठी बोलविले आणि प्रत्यक्ष

भेटीत शाहुकडे येण्यामध्ये कान्होंजींचे कसे हित आहे हे त्यांना बाळाजीने पटवून दिले. कान्होजी आंग्रे शाहुंच्या गोटात दाखल झाले.

"स्वराज्याच्या हक्काचा गुंता सोडविण्यासाठी बाळाजी विश्वनाथाला दिल्लीच्या मुगल बादशाहाकडून सनदा आणण्याचा मार्ग बिनतोड वाटला. आणि छत्रपती शाहुनेही बाळाजीच्या योजनेस संपूर्ण पाठिंबा दिला."[४९] बाळाजी विश्वनाथाने दिल्लीहून आणलेल्या सनदामुळे प्रत्यक्षात मराठयांवर मोगलांचे कोणतेही वर्चस्व प्रस्थापित झालेले आढळत नाही. या सनदामुळे शिवाजीने स्थापन केलेल्या स्वराज्याचा सनदशीर हक्क शाहूला प्राप्त झाला. "दक्षिणेतील खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बिदर, हैद्राबाद आणि विजापूर या सहा मोगली सुभ्यातील चौथाई व सरदेशमुखीच्या वसुलीचे अधिकार मराठयांना मिळाले."[५०] चौथाई व सरदेशमुखीच्या वसुलीमुळे दक्षिणेतील मुगल सुभ्यामध्ये मराठयांचा दरारा तर वाढलाच परंतु त्याचबरोबर महसुलाचे उत्पन्न वाढल्यामुळे स्वराज्याची आर्थिक परिस्थिती मजबुत झाली. या सनदा प्राप्त करुन घेण्यात बाळाजी विश्वनाथाने आपल्या धोरणीपणाचा, बुध्दिमत्तेचा आणि मुत्सद्दिगिरीचा प्रत्यय दिला.

आपल्या असाधारण राजकारण पटुत्वाच्या व मुत्सद्देगिरीच्या जोरावर बाळाजी विश्वनाथाने शाहूंची बाजू बळकट केली. बाळाजी विश्वनाथाची दुसरी महत्वपूर्ण कामगिरी मराठा मंडळ किंवा संयुक्त राज्यव्यवस्थेची निर्मिती ही होय. शाहुंशी झालेल्या या बादशाही तहाने मराठे शाहीच्या राज्यव्यवस्थेला नवे वळण लाविले. मराठयांनी बचावाचा डाव खेळण्याचे सोडून चढावाच्या धोरणाची अंमलबजावणी सुरु केली. त्यामुळे त्यांचे परराष्ट्रीय राजकारण जोराने चालू झाले. परराज्यातील घडामोडीवर नजर ठेवून त्या धोरणानुसार स्वराज्याचा कारभार बदलण्याची जरुरी असल्याचे त्यांना दिसू लागले. तसेच रयतेच्या हक्काचे संरक्षण करणे याबाबत बाळाजी विश्वनाथ अतिशय काटेकोर व दक्ष होता. 'पराक्रमी सेवक' असे शाहुने बाळाजीचे वर्णन केले आहे. बाळाजीने दिल्लीच्या राजकारणात मराठयांचा प्रवेश करवून बाजीरावाच्या भावी साम्राज्यवादाचा मार्ग मोकळा केला. "१७२०च्या मार्च महिन्यात कोल्हापूरच्या मोहिमेवरुन परत आल्यावर बाळाजी विश्वनाथ साताऱ्यावरुन सासवडास गेला आणि तेथे चैत्र शुक्ल ६ शके १६४२ शनिवार ता. २-४-१७२० रोजी मृत्यु पावला."[५१] जेष्ठ पुत्र बाजीराव, दुसरा चिमाजी अप्पा, भिऊ बाई, आणूबाई, अशी बाळाजी विश्वनाथाला चार आपत्ये होती.

## २.६ पेशवा बाजीराव :-

बाळाजी विश्वनाथाच्या कारकिर्दीत त्यांच्या बरोबर बाजीरावाने अनेकदा प्रत्यक्ष युध्दात आणि राजकीय व्यवहारात भाग घेतल्यामुळे या दोन्ही क्षेत्रात बाजीरावाचा हात धरणारा कोणताही पुरुष बाळाजीच्या मृत्युसमयी शाहुच्या दरबारात नव्हता. ‘‘चैत्र बहुल सप्तमी गुरुवार शके १६४२ म्हणजे १७ एप्रिल सन १७२० रोजी बाजीरावास शाहू छत्रपतीकडून पेशवाईची वस्त्रे कऱ्हाड नजीक मसूर मुक्कामी मिळाली.’’[५२] बाजीरावाने आपल्या कर्तृत्वाने ही निवड योग्य असल्याचे सिध्द करुन दाखविले. ‘‘या लढावू पेशव्याने मोडकळीस आलेल्या मोगली सत्तेची शकले तोडून तो मुलुख आपल्या ताब्यात घेऊन नव्या दमाच्या सरदाराची तेथे स्थापना केली.’’[५३] त्या सरदारांमध्ये एक होते मल्हारराव होळकर. त्यांच्या काळात अनेक कर्तृत्ववान घराने उदयास येऊन त्यांनी मराठेशाहीची सेवा केली. स्वराज्याचा बहुदिशांनी विस्तार करण्याचे काम केले. महाराष्ट्राच्या व भारताच्याही इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. त्यामध्ये एक होते होळकर घराणे.

## २.७ होळकर घराण्याचा उदय :-

होळकर घराण्याचे वंशज आज महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या इतरही भागात विखुरलेले आहेत. ‘‘होळकर राजघराण्याचे पूर्वज गोकुळ (मथुरा ) येथील राहणारे होते. मथुरामधून सुरुवातीला ते चित्तोड मध्ये स्थायिक झाले. चित्तोड मधून दक्षिणेकडिल औरंगाबाद जिल्हयामध्ये काही काळ वास्तव्य केले.’’[५४] त्यानंतरच्या कालखंडामध्ये इंदुरच्या होळकर राजघराण्याचे गाव म्हणजे पुण्याजवळील वाफगाव हे होय. तेथून ते फलटण परगण्यातील होळकर या गावी आले.’’[५५] होळ येथे येण्यापूर्वी त्यांचे वीरकर हे आडनाव रुढ होते. होळ येथे स्थायिक झाल्याने त्यांचे होळकर हे आडनाव प्रचलित झाले.’’[५६]

तेथे चारशे वर्षा पूर्वी मालीबा नावाचा एक धनगर जातीचा गृहस्थ होऊन गेला.[५७] त्यानंतरच्या अकराव्या पिढीतला पुरुष खंडोजी हा त्या गावचा चौगुला होता.[५८] चौगुला म्हणजे ग्रामाधिकारी[५९] हा खंडोजी म्हणजे मल्हाररावांचा पिता. मल्हाररावांच्या आईचे नाव जीवाई होते. ही तळोदे गावातील साबाजी बारगळ यांची पुत्री होती.[६०]

चैत्र शुक्ल ९ सवंत १७५० शके १६१५ पुण्य नक्षत्रे अर्थात १६ मार्च १६९३ रोजी खंडोजी होळकर यास पुत्र रत्न लाभले.''[६१] मल्हारी मार्तंड कुलदैवत असल्याने त्यांचे नाव मल्हारी ठेवण्यात आले. मल्हारी तीन वर्षाचा असताना खंडोजी मरण पावला.''[६२] खंडोजीला जीवाई शिवाय इतर पत्नी असून त्यांनाही पुत्र होते. त्या पुत्राकडून म्हणजेच मल्हाररावाच्या सावत्र भावाकडून मल्हाररावांना सतत त्रास होऊ लागला.''[६३] त्यांच्या भाऊबंदांनी सर्व हिरावून घेतल्यामुळे खंडोजीची पत्नी जीवाई''[६४] मल्हारीला घेऊन आपले बंधू भोजराज बारगळ यांच्या आश्रयास गेली.''[६५] भोजराज बारगळ हा त्या गावातील एक सधन शेतकरी व चौगुला होता. व त्यासोबतच कंठाजी कदम बांडे यांच्या सैन्यात तो २५ स्वारांचा नायक होता.''[६६]

मल्हाररावांच्या बालपणीच्या दोन आख्यायीका महेश्वर, इंदौर भागात प्रसिध्द आहेत. एक म्हणजे एकदा तो शेतात थकून झोपी गेलेला असता उन्हापासून त्याचे संरक्षण करण्याकरिता एका भल्या मोठया नागाने त्याच्या डोक्यावर फणा उगारुन छत्र धरले. नागाने असे छत्र धरले की राजयोग संभवतो अशी समजूत आहे. दुसरी आख्यायीका अशी आहे की, भोजराजाला खुद्द लक्ष्मीने स्वप्नात दृष्टांत देऊन सांगितले की त्याचा भाचा अत्यंत भाग्यवान असून त्याच्या नशिबी राजयोग आहे. धनगर जमातीतील हा सामान्य शेतकऱ्याचा मुलगा पुढे मराठा साम्राज्यातील एक नामवंत नेता व इंदुरच्या राज घराण्याचा संस्थापक झाला. म्हणून या आख्यायिका जनमनाने ग्राहयही मानल्या.

## २.७.१ मल्हाररावांचा लष्करात प्रवेश :-

मल्हारराव आपले मामा भोजराज यांच्या घरी वाढला. पेशव्यांचा सरदार कंठाजी कदम बांडे याच्या पथकात २५ स्वारांचा भोजराज प्रमुख असल्यामुळे त्यांने आपल्या पथकात मल्हाररावाला नोकरी दिली.''[६७] प्रथम लहान लहान लढयांत शौर्याची कामे केल्यामुळे तो लवकरच प्रसिध्दीस आला. ''इ.स. १७२० च्या जुलै महिन्याच्या सुमारास मराठयांचा पूर्ण पाठिंबा असलेला दक्षिणेचा मुगल सुभेदार आलम अली, निजामाचे बाळापूर येथे युध्द झाले.''[६८] बाजीरावाने या युध्दात प्रत्यक्ष भाग न घेता, निजामांच्या हालचालीवर सक्त नजर ठेवली होती. या युध्दात मल्हाररावने अतिशय पराक्रम गाजविला. स्वत: बाजीरावाने मल्हाररावाचा पराक्रम बघितला होता. मल्हारराव अनेक दिवस कंठाजी कदम बांडे यांच्या सैन्यात होता. नोकरीच्या शोधात जाण्याकरीता मल्हाररावाने भोजराज बारगळ आणि कंठाजी कदम बांडे यांच्याकडे नोकरी पत्करली व त्यानंतर पुढे मल्हाररावाने बडवानी

शासक मोहनसिंग याच्याकडे नोकरी पत्करली.''[६९] मोहन सिंगाने मल्हाररावाच्या सैनिक खर्चाकरिता दंत वाडयाची जहागिरी दिली.''[७०] बाजीराव व मोहनसिंग यांच्यात भांडण जुंपले असता, मल्हाररावाने ते सामोपचाराने मिटविले.''[७१] पेशव्यांच्या सेवेत जाण्याचा मल्हाररावांचा प्रयत्न सुरु होताच. इ.स. १७२१ च्या सुमारास बापूजी प्रभुच्या मध्यस्थीने मल्हाररावांने पेशव्यांकडे सेवेत घेण्याची विनंती केली ''बाळापूरच्या युध्दातील त्याचे शौर्य व इमानीपणा पाहून मल्हारराव आपल्या पदरी असावा असे बजीरावास वाटत होते.''[७२] बाजीरावाने मल्हाररावाला आपला लहान बंधू चिमाजीच्या पदरी नेमले इ.स. १७२५ च्या सुमारास पेशव्यांने ५०० स्वाराची मनसब मल्हाररावास दिली.''[७३] पेशव्यांच्या सेवेत गेल्यानंतर मल्हाररावाच्या भाग्योदयाला सुरुवात झाली. हयाच काळात निजामउल्कमुल्क मोगलांच्या दख्खन राज्याची स्थिती मजबूत करण्यासाठी प्रयत्न करु लागला होता. दिल्लीच्या तत्कालीन मुगल सम्राटाने घाबरुन जाऊन माळव्याच्या संरक्षणाची जबाबदारी जमिनदार बहाद्दूरवर सोपविली. गिरिधरबरोबर मराठयांना मोठया प्रमाणात संघर्ष करावा लागला.

### २.७.२ मराठयांची माळव्यातील कामगिरी व माळवा विजय :-

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदु धर्म , हिंदु संस्कृती हयांच्या संरक्षणासाठी हिंदु साम्राज्याची स्थापना केली त्यांच्या वंशजांनी पुढे हया हिंदु साम्राज्याच्या विस्तारासाठी संरक्षणासाठी तन,मन, धनाने प्रयत्न केला.

मुगल शासन भारतात प्रस्थापित झाल्यानंतर हया मुसलमानी राज्यकर्त्यांचा धर्म , संस्कृती, भाषा आणि राज्यपध्दती या हिंदूपेक्षा निराळया असल्यामुळे येथील समाजावर विविध प्रकारचा परिणाम होणे अपरिहार्य होते. हया राज्यकर्त्यांच्या अत्याचारामुळे हिंदु जनता त्रस्त झाली होती. तसेच हया अत्याचारापासून मुक्त होऊ पाहत होती. माळव्यातील जनता सुध्दा अत्याचारामुळे दु:खी झालेली होती. अशा परिस्थितीत बाजीरावासारखा धडाडीचा सेनानायक मिळातच त्याच्या निशाणाखाली हजारोंनी सैनिक जमा होण्यास वेळ लागला नाही. ''येसाजी सतकर, संताजी मोरे, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, उदाजी पवार, जिवाजी, तुकोजी पवार, घाटगे, घोरपडे, कदमबांडे, भोसले, जाधव, चिवळकर, रणदिवे, रणनवरे, असे शेकडो नामांकित पथके पेशव्यास सामील झाले. खानदेश नेमाडातून चौथ, सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्यास पेशव्यास वेळ लागला नाही याच सैन्यानिशी नर्मदापार होऊन पेशव्याने माळव्यात प्रवेश केला. मोगल अंमलास कंटाळलेल्या

माळव्यातील हिंदू जनतेने मराठयांचे स्वागतच केले.''[७४] सर जॉन माल्कम म्हणतात की, ''औरंगजेब बरोबर युध्द होताच त्याला तंग करण्याच्या उद्‌देशाने मराठयांनी माळव्यावर आक्रमण केले. इ.स. १६९० च्या एका जुन्या पत्रानुसार माहित होते की, मराठयांच्या आक्रमणाच्या कारणामुळे त्यावर्षी माळव्यामध्ये उत्पन्नात घट आली होती.''[७५]

## २.८ माळवा विजयासाठी मराठयांना करावी लागलेली युध्दे :-

औरंगजेबाच्या अत्याचाराला कंटाळून राजपूत राजांनीही मोगलांच्या शत्रूंना मदत करण्यास सुरुवात केली होती. राजपुत राजांच्या मदतीमुळे आणि प्रेरणेमुळे मराठयांनी माळव्यामध्ये प्रवेश केला. जयपूरचे महाराजा सवाई जयसिंहाचा मोगल दरबारामध्ये दबदबा होता हिंदुवर होणाऱ्या अत्याचारामुळे जयसिंह व्यथित होत असत. सवाई जयसिंग सुरवातीपासून मराठयांना अनुकुल होता. त्यानेही मराठयांना फार मोलाची मदत केली. औरंजेबाच्या पाडावानंतर रजपुत आणि मराठे यांच्या मदतीने हिंदुना त्यांचे पूर्वीचे वैभव आपण मिळवून द्यावे अशी त्याची इच्छा होती सवाई जयसिंगाला माळव्यातील मोगलांची सत्ता दुर्बल करावयाची होती. त्याच्या प्रेरणेने माळव्यातील जमीनदार आणि बुंदेलेचे राजपुत औरंगजेबाच्या अत्याचारामुळे मराठयांच्या बाजूने झाले होते. बाजीरावाचा पराक्रम पाहून लोक त्याला आपला नेता मानू लागले होते. बाजीरावाचे प्रमुख सहाय्यक शिंदे, होळकर, पवार हयांच्या मुत्सद्यीगिरीमुळे, बहादुरीमुळे, माळव्यावर विजय प्राप्त करणे सोपे झाले. ''जयपुरचे महाराजा सवाई जयसिंग तसेच इंदौर चे तत्कालीन प्रभावशाली व्यक्ती नन्दलाल मण्डलोई त्याच्या बाजूने होते. त्याच्याकडून त्यांनी माळवाच्या बाकीच्या छोटया-मोठया जहागिरदाराला ही आपल्या बाजूने केले. यामुळे त्यांना माळवा विययात यश आले.''[७६] माळवा विजयासाठी मराठयांना मुख्यत: खालील युध्दे करावी लागलेली होती.

### २.८.१ सारंगपूरचे युध्द इ.स. १७२४:-

माळवा विजयासाठी मराठयात सर्वात प्रथम सारंगपुरचे युध्द करावे लागले. हे युध्द मुगल प्रतिनिधी राजा गिरीधर बरोबर झालेले होते.।''[७७] तत्कालीन मुगल सम्राटाच्या दरबारामध्ये ज्या हिंदु मुत्सद्यांनी आपले विशेष स्थान निर्माण केले होते. त्यामध्ये गिरीधर बहादुर हा होता. ज्यावेळेस निजाम उल्कमुल्क हयाची लोभी दृष्टी माळव्यावर आहे हे लक्षात येताच मुगल बादशहाने गिरीधर

बहादुरला माळव्याचा सुभेदार नेमले. या नियुक्तीमध्ये जयपुरचे सवाई जयसिंग आणि जोधपूरचे महाराज अजितसिंह यांचा सुध्दा हात होता. तत्कालीन मुगल सम्राट महंमद शाह याने हे पाहिले की, निजाम उल्कमुल्कची लोभी दृष्टी माळव्यावर पडणार आहे तेंव्हा त्यांनी राजा गिरीधर याला माळव्याचा सुभेदार म्हणून नियुक्त केले.''[७८] राजा गिरीधर बहादुरने मराठयांना अधिक सहकार्य करावे असे जयसिंगाला वाटत होते. परंतु माळव्यात मराठयांचा प्रवेश होऊ नये अशी मोगल बादशहाची तीव्र इच्छा असल्यामुळे गिरीधर बहादुर आणि त्यानंतर दया बहादुर या दोघांना मराठयांशी सतत संघर्ष करावा लागला. या त्यांच्या कार्यात त्यांना रजपुतांचे सहकार्य मुळीच मिळाले नाही. त्यामुळेच रजपुतांनी विशेषत: सवाई जयसिंगाने माळव्यात मराठयांना येण्याचे निमंत्रण दिले. जयसिंगाने नंदलाल मंडलोईमार्फत मराठयांशी संपर्क साधून माळव्यात मराठयांना येण्याचे निमंत्रण दिले. ''इ.स. १७२४ मध्ये राजा गिरीधर आणि मराठे यांच्यामध्ये सारंगपूर मुक्कामी एक भीषण युध्द झाले यामध्ये मल्हारराव आणि चिमाजी आप्पा यांचा मुख्य हात होता. यामध्ये राजा गिरीधर मारले गेले. मराठयांचा विजय झाला. आणि माळवा विजयाचे प्रथम युध्द समाप्त होऊन दुसऱ्या दृश्यास प्रारंभ झाला.''[७९]

## २.८.२ तिरलाची लढाई -१७३१

राज गिरीधर यांच्या मृत्युनंतर पुढील दोन वर्षापर्यंत बाजीराव पेशवा तथा मल्हारराव होळकर या मुत्सद्याचे ध्यान निजामाकडे गेले. पेशव्यांनी माळव्यातून आपली सेना परत बोलविली. दिल्लीचे तत्कालीन मुगल सम्राटाने दया बहादुरला गिरीधरच्या जागेवर माळव्याचा सुभेदार नियुक्त केले. दयाबहादुर वरील स्वारी व विजय ही मल्हाररावांच्या जीवनातील महत्वाची घटना होय. महंमद शहाच्या कारकीर्दीत माळव्यात अंदाधुंदी माजली होती. दयाबहादूर माळव्याचा सुभेदार होता. राज्यकारभारात अव्यवस्था झाल्याबरोबर शेतकरी रयतेची मोठी आबाळ होऊ लागली. पाहिजे त्यांनी यांवे आणि रयतेकडून पैसे उकळावा असा प्रकार चालू लागला. दया बहादूर आणि त्यांच्या हाताखालचे मुनीम यांनी रयतेस इतके पिळून काढले की, माळव्यातील ठाकूर व जमिनदार हे बादशहाकडे दाद मागून थकले. सरकारात आपली दाद लागत नाही असे पाहून ते जयपूरचा राजा सवाई जयसिंग यास शरण गेले. सवाई जयसिंग मोठा पराक्रमी व धुर्त होता. इतर रजपुत राजाप्रमाणे त्याने बादशहा विरुध्द उघडपणे उठाव केलेला नव्हता त्याने माळव्यातील ठाकरास असा सल्ला दिला

की, तुम्ही मराठयांना बोलवा म्हणजे ते तुमची दाद घेतली माळव्यातील ठाकरात इंदूरचा जमिनदार राव नंदलाल चौधरी हा प्रमुख व मातब्बर सरदार असून त्याज पाशी दोन हजार फौज चांगली तयार होती. त्याजकडे नर्मदेवरील उताराचा बंदोबस्त ठेवण्याचे काम होते. जयसिंगाच्या सल्ल्याने नंदलालने बाजीरावाशी बोलणे सुरु केले. बाजीरावाची फौज बऱ्हाणपूर नजीक छावणी देऊन राहिलेली होती. तिच्या आघाडीवर मल्हारराव होळकर बारा हजार फौजेनिशी जय्यत तयारीने होता. राव नंदलाल याने मल्हारराव होळकर यांजकडे आपला वकील पाठविला. आणि त्यास नर्मदा उतरुन माळव्यात बोलविले. नर्मदेवरील उताराचा व पलिकडच्या डोंगरातील घाटांचा उपयोग तुम्हास चांगला करुन देऊ. असे अभिवचन मिळाल्यामुळे मंडलोईच्या मदतीने धरमपूर आणि महेश्वर यांच्या दरम्यान अकबरपूर म्हणून नर्मदेवर एक गाव आहे. त्या ठिकाणी नर्मदा उतरुन मल्हारराव माळव्यात आला. दयाबहादूरास ही खबर लागताच तो मल्हाररावास अडविण्याकरता गेला. परंतु मल्हाररावांस माळव्यातील मंडलोई वगैरे लोकांनी आगावू इशारत दिल्यामुळे तो तांडा घाटाने न येता मांडवगडच्या पूर्वेकडिल भैरव घाटाने माळव्यात आला. मल्हाररावांची व दयाबाहादुराची गाठ धार नजीक तिरला गावी पडली. लढाई होऊन दया बहादुर मारला गेला.''[८०] याप्रमाणे माळवा प्रांत मराठयांना हस्तगत झाला. माळव्यामध्ये मराठयांच्या विजयाची पताका फडकू लागली. मोगल शासनाऐवजी आता पेशव्यांची शासन व्यवस्था चालू लागली. दुसऱ्या कोणापासून रयतेस इजा न पोहचावी अशी तजविज केली. पूर्वीचे मोगल अंमलदार त्यांनी काढून टाकले आणि आपले दक्षिणी अंमलदार नेमले. काही रजपुत जहागिरदारानी मराठयांस जुमानले नाही. त्यांच्या जमीनी मराठयांनी खालसा केल्या. आणि त्यांच्या जागी आपले नवीन जमीनदार नेमले. यावेळी रयतेला संतुष्ट ठेवण्याची खबरदारी मराठयांनी चांगलीच ठेवली होती. मराठयांना माळव्यात फार मोठे यश मिळाले होते. हे यश मिळवून देण्यात नंदलाल मंडलोईची फारच मदत झाली होती. दुर्दैवाने तो जास्त काळ जगला नाही. माळव्यातील विजयाची वार्ता ऐकताच बाजीरावाने नर्मदा नदी ओलांडली. या नवीन मिळालेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्यासाठी तो माळव्यात आला. ''१७३२च्या जुलै महिन्यात आपल्या वतीने शिंदे होळकर,पवार यांना चौथ वसूलीच्या कामावर नेमून, पेशव्यांनी माळव्याच्या उत्पन्नाची वाटणी केली. वाटणीबद्दल ठराव अनेकदा झाले आहेत. शिंदे, होळकर, यांच्याकडे प्रत्येकी २२।। टक्के पवारांच्याकडे १०टक्के आणि राहिलेला वसुल पेशव्यांकडे अशी वाटणी झाली. पवारांनी धार आणि देवास, होळकरांनी इंदुर आणि शिंदे यांनी उज्जैन येथे आपापली ठाणी

दिली.[८१] दयाबहाद्दूराची समाप्ती झाल्यानंतर माळव्याच्या सुभेदारीवर महंमद खान बंगश नामक एका मुसलमान सरदाराची दिल्लीपतीने नेमणूक केली.[८२] बंगषची माळव्यावर नेमणूक झाली त्यावेळी त्याने निजामाच्या हालचालीवर नजर ठेवावी अशी त्याला अंत:स्थ रितीने सूचना देण्यात आली होती. पण नंतरच्या काळात बंगष व निजाम हे काहीतरी कारस्थान करीत असून हे दोघे एकत्र होऊन दिल्लीवर चाल करुन बादशहास आपल्या हातात घेतील अशी धास्ती दरबारातील उमरावास उत्पन्न झाली. बंगषला माळव्याच्या सुभेदारीवरुन दूर करण्यास ते संधी शोधू लागले. ही संधी त्यांना लवकरच मिळाली. मराठी फौजांनी पुन्हा एकदा नर्मदा ओलांडली. सुभेदाराच्या मदतीस जाऊन स्वत:ची खराबी करुन घेण्यापेक्षा मराठयांना पैसा देऊन आपला बचाव करणे माळव्यातील जमीनदारास जास्त सुरक्षितपणाचे वाटले. सुभ्यातील छोटे छोटे संस्थानिक , राजेरजवाडे जमीनदार उघड उघड रीतीने मराठयांस सामील झाले. दिल्लीहून कुमक आल्याशिवाय मराठयांचा प्रतिकार आपल्या हातून होणे शक्य नाही. असे बंगषने लिहून कळविताच त्याला परत बोलावून जयसिंगाची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक करण्यात आली.''[८३]

## २.८.३ शिंदे होळकरांच्या स्वाऱ्या

१७३२च्या अखेरीस सवाई जयसिंगाची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक झाली.''[८४] जयसिंग, राजपुत, राजेरजवाडयातील प्रमुख असून जयपूरच्या विस्तृत राज्यांवर त्यांची सत्ता चाले. तो हिंदु संस्कृतीचा अभिमानी होता. आपण व मराठे मिळून मोगल बादशाहीचा बंदोबस्त करावा, कारभारात हिंदुचे वर्चस्व होऊन हिंदुपदपातशाही स्थापन व्हावी असे त्यांचे विचार होते. मराठयांच्या गुजरात, माळव्यावरील मागण्या मान्य करुन त्यांना बादशाहीचे पक्षपाती बनवावे या धोरणाास अनुसरुन त्याने सुभेदारी चालविली. सुभ्याच्या रक्षणासाठी आलेला पैसा मराठयांशी वाटून घेऊन त्याने काही काळ युध्द थोपवून शांतता मिळविली.

१७३२ पासून मराठयांचे माळव्यातील आक्रमणे दोन दिशांनी चाले. शिंदे होळकरांच्या हाताखालील फौजा गुजरातमार्गे पश्चिम माळव्यात शिरत. दुसरी ईशान्य दिशेने बुंदलेखंडात जाऊन बुंदेल्यांची मदत घेऊन, ग्वाल्हेर -गोहद पर्यंतचा मुलुख उध्वस्त करीत १७३३ मध्ये मंदसोर जवळ सवाई जयसिंग व मराठी फौजा यांचे युध्द झाले. '' सवाईचा चंडोल कामास आला. होळकरांकडील शेदोनशे घोडी जाया झाली. व दहा वीस बरी माणसे कामास आली.''[८५] शेवटी जयसिंग तह

करण्यास तयार झाला. नाइलाजाने १७३३मध्ये मंदसौर येथे मराठयांना शरण आला. त्याने मराठयांनी माळव्यात वसूल केलेल्या चौथाई व सरदेशमुखींच्या खंडणी व्यतिरिक्त ६ लक्ष रुपये देऊन मराठयांशी समझोता केला.

अशा प्रकारे मराठयांशी तह झाल्यावर जयसिंग जयपूरला परतला. व नंतर त्याने माळव्याकडे मुळीच लक्ष दिले नाही.

## २.९ खासगी जहागिर

ऑक्टोबर १७३० मध्ये पेशवा बाजीरावाने मल्हारराव होळकरास माळव्यातील ७४ परगने सरंजाम म्हणून देऊन माळवा प्रांत त्यांच्या हवाली केला. ''[८७] याचाच अर्थ १७३० मध्ये माळवा प्रांतावर मराठयांचा प्रत्यक्ष ताबा प्रस्थापित झाला होता. ''माझी सेवा लक्षात घेऊन माझ्या पत्नीला - गौतमी बाईला खासगी जहागिरी देण्यात यावी अशी विनंती मल्हाररावांनी१७३३ ला केली.''[८८] मल्हारराव चिमाजी अप्पांच्या दिमतीत होता. चिमाजीने बाजीरावास मल्हाररावांची विनंती मान्य करण्याची शिफारस केली. मल्हाररावांची माळव्यातील मोलाची कामगिरी लक्षात घेऊन त्यांची विनंती पेशव्यांनी मान्य केली.''[८९] छत्रपती शाहुंच्या आज्ञेने बाजीरावाने मल्हाररावास लिहून कळविले की, या नंतर खासगी व दौलत वेगवेगळे राहतील. २० जानेवरी १७३४ रोजी बाजीरावाने गौतमी बाईच्या नावाने ''खासगी'' जहागिर दिली.''[९०] त्यावेळी ''खासगी''चे उत्पन्न २९९०१० होते. ही जहागिर प्राप्त झाल्यानंतर इंदौर संस्थानची खऱ्या अर्थाने स्थापना झाली. होळकरशाहीच्या गादीवर असणाऱ्या पुरुषांप्रमाणे त्यांच्या पत्नीकडे ''खासगी''चा अधिकार देण्यात आला. अर्थातच होळकरांच्या गादीवर असलेल्या पुरुषांची मुख्य पत्नीच ''खासगीची'' वारस होत असे.''[९२] ''खासगीची '' जहागिर प्राप्त करुन घेण्यास मल्हाररावांचा दुरदर्शीपणा दिसून येतो. आपल्या कुटंबास त्यायोगे राज्यकारभारात प्रवेश त्यामुळे कुटुंबातील स्त्रियांना राजकारभाराचे धडे गिरवता आले.

## २.९.१ खासगीचा मान होळकरांनाच

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ''खासगीचा'' मान लाभला फक्त होळकरांना. होळकरांपूर्वी व नंतर जे सरदार झाले. त्यापैकी कोणालाही ''खासगीचा'' मान प्राप्त झाला नाही. विशेष म्हणजे शिंदे,

भोसले, जाधव, गायकवाड, पवार इ. मोठमोठी सरदार मंडळी असता. होळकरांनाच ‘‘खासगी’’ जहागिर मिळाली.’’[९३] यावरुन माळव्यातील मल्हाररावांच्या कामगिरीवर पेशवा बाजीराव व चिमाजी अप्पा बेहद खुश होते. हे प्रत्ययास येते.

माळव्याची  मोहिम ही मल्हारराव होळकर यांच्या उदयास कारणीभूत झाली. या मोहिमेत मल्हाररावांनी मोलाची कामगिरी केल्यामुळे बाजीरावांचा त्यावर विश्वास बसला. त्यामुळे पुढील अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या बाजीरावाने मल्हाररावांवर सोपविल्या.

## २.१० मल्हाररावांच्या उत्तरेकडील मोहिमा

अत्यंत धोकादायक बनलेल्या मराठयांपासून मोगल सत्तेचे रक्षण करण्यासाठी दक्षिणेतून निजामास बोलवावे हा विचार दिल्ली दरबारात झाला. दरबारी मुत्सद्याच्या आग्रही सल्ल्यानुसार बादशहा महंमुदाने निजामाला दिल्लीत बोलावले. खुद्द निजामही दिल्लीच्या निमंत्रणाची आतुरतेने वाट पाहत होता. कारण मोगल सत्तेच्या पाठबळाच्या जोरावर आपण बाजीरावांचा अगदी सहज पराभव करुन कायमचा काटा काढू शकू असा निजामाचा कयास होता.

३० हजार निवडक शाही फौज आणि उत्कृष्ट मोघली तोफखाना बरोबर घेऊन ऑक्टोंबर १७३७ मध्ये निजाम दिल्लीहून बुंदेलखंडामार्गे माळव्यांकडे निघाला. मार्गात सादत खान आणि ओर्छा, नरवर आदि अनेक ठिकाणचे छोटमोठे मोघली मनसबदार बादशाही हुकुमाने निजामाला ससैन्य येऊन मिळाले.’’[९४]  आपल्या गुप्त हेरांकडून निजामांच्या सर्व हालचालींची खडान्खडा बित्तंमबातमी बाजीरावला मिळत असे. पिता निजामाच्या मदतीसाठी नासिरजंग चा प्रचंड फौजेसह उत्तरेकडे निघण्याच्या तयारीत होता. बाजीरावाने वसई मोहिमेतून तातडीने चिमाजी अप्पाला परत बोलावून घेतले. आणि उत्तरेस पित्याच्या मदतीसाठी जाणाऱ्या नासिरजंगचा मार्ग  रोखून धरण्यासाठी ‘‘चिमाजी आप्पाला तापी तिरावर वरण गाव येथे निवडक सैनिकाच्या सुसज्ज सैन्यदलासह ठेवले. चिमाजी अप्पाचा निरोप घेऊन डिसेंबर १७३७च्या सुरुवातीस ८० हजार रणझुंजार मराठी फौजेसह निजामांचा व्युह उधळून लावण्याच्या दृढ निर्धाराने बाजीरावाने नर्मदा ओलांडली.’’[९५] उत्कृष्ट तोफखाना शाही मुगली फौजेनिशी निजाम माळव्यात उतरताच बाजीरावांच्या माळव्यातील मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, तुकोजी व यशवंतराव पवार या मराठा सरदारांनी मराठयांच्या हुकमी गनिमी

काव्यांच्या युध्द तंत्राचा पुरेपूर वापर करुन निजामाला व त्यांच्या प्रचंड फौज फाटयाला त्रस्त व हैराण करुन सोडले. माळव्यातील मराठा सरादारांनी निजामाचा सातत्याने पाठलाग करुन त्याला भोपाळपर्यंत रेटत आणले आणि भोपाळमध्ये आश्रय घेण्यास भाग पाडले. बाजीरावाने रचलेला डाव त्याच्या सरदाराने १००टक्के यशस्वी केला. अर्धी लढाई बाजीराव येथेच जिंकला.

भोपाळमध्ये आश्रय घेण्यास विवश झालेल्या निजामाने आपल्या प्रचंड फौजफाटयास पाठीमागे भोपाळचा किल्ला, बाजूला विस्तीर्ण तलाव आणि समोरुन वाहणारी छोटी नदी यांच्यातील बंदिस्त व सुरक्षित मैदानावर आपली लष्करी छावणी ठोकली.''[९६] धुर्त निजाम येथे चुकला. आणि अलगद बाजीरावाने रचलेल्या सापळयात अडकला. भोपाळमध्ये निजामाने आश्रय घेताच, बाजीरावाने आपल्या कडव्या, रणझुंजार ताज्या दमाच्या ८० हजार फौजेनिशी येऊन भोपाळला सक्त वेढा आवळला.[९७] उत्कृष्ट तोफखान्याच्या जोरावर निजामाने आपल्या लष्करी तळाचे संरक्षण केले. परंतु त्या पलीकडे तो काहीही करण्यास असमर्थ ठरला. बाजीरावाने निजामाची रसद पुरवठयांचे सर्व मार्ग रोखून धरले. आणि निजामाचा रसद पुरवठा साफ तोडला. सफरदजंग व कोटयाचा राजा यांनी निजामाला रसद पोहचविण्याचा केलेला प्रयत्न मल्हारराव होळकरांनी उधळून लावला. आणि त्यांना जबर पराभूत करुन दूरवर पिटाळून लावले.''[९८] निजाम एकाकी पडला. अखेरीस नंतर निजाम पाण्याच्या टंचाईमुळे त्रासून फौजे भोवती तोफांचा गोल बांधून एकदाची ती जागा सोडून निघाला! तथापी त्याचा तोफखाना चांगला जय्यत असल्यामुळे मराठयास त्याजवर हल्ला करवेना म्हणून तेही निजामाभोवती असलेला आपला वेढा कायम ठेवून तेही तसेच चालले याप्रमाणे थोडे दिवस गेल्यानंतर निजामास पूर्णपणे कळले की, मराठे आपणास मोकळे सोडित नाहीत ! तेंव्हा निरुपाय होऊन तो शेवटी शरण आला. आणि राणोजी शिंद्यांच्या मार्फत त्याने श्रीमंतांशी तहाचे बोलणे लाविले.[९९]

अखेरीस निजाम हरला व बाजीरावास शरण गेला. मराठयांनी जे जे मागितले ते ते देण्यास तो कबूल झाला. तेंव्हा सर्व माळवा प्रांत व नर्मदा आणि चंबळ या नद्यांच्या मधील प्रांत मी तुम्हास बादशहांकडून देऊन शिवाय स्वारी खर्च पन्नास लाख रुपये असा तहनामा निजामाकडून स्वदस्तुरचा लिहून घेऊन श्रीमंतांनी तारीख ११ फेब्रुवारी सन १७३८ रोजी आपल्या फौजेचा वेढा

उठविला.''[१००] याप्रमाणे विजय संपादून मराठी फौज दक्षिणेकडे परतली. मार्गात बाजीराव साहेब व मल्हारराव होळकर चंबळ नदीच्या काठच्या प्रांतातून खंडण्या घेत घेत पुण्यास येऊन पोहचले.

## २.११ पेशवे पोर्तुगिज संघर्षात मल्हाररावांची भूमिका :

गोवा आणि मुंबई ते दमण असा किनारपट्टीचा प्रदेश पोर्तुगिजांच्या प्रभावाखाली आलेला होता. मुंबई ते दमण या पोर्तुगिज प्रदेशाची राजधानी वसई येथे होती.''[१०१] वसई आणि कोकण परिसरात पोर्तुगिजांनी हिंदुवर अनेक निर्बंध लादले होते. त्यांच्या तक्रारी पेशव्यांकडे येऊ लागल्या. फिरंगी लोकांकरिता दरसाल विनाकारण शिबंदी खर्च वाढवित बसण्यापेक्षा एकदम सर्व फौजेसुध्दा त्याजवर स्वारी करुन त्यांची खोड तोडून टाकावी म्हणजे तिकडील खटखट मिटेल व त्याप्रमणे सर्व फौजे सुध्दा फिरंग्यांवर जाण्याविषयी चिमाजी अप्पास आज्ञा दिली.''[१०२]

नंतर चिमाजी अप्पांनी मल्हारराव होळकरास आपल्या फौजेनिशी पुढे जाण्यास आज्ञा दिल्यावरुन त्यांनी ठाण्यास येऊन तेथील किल्यावर हल्ला केला. ही बातमी फिरंग्यास कळताच तिकडून जनरल पेद्रो दमेल हा तयारी करुन तेथे आला. मल्हारराव होळकर तेथील पानबुरुंजास तयार केलेल्या लादण्याचे आश्रयाने लढत होते.''[१०३] मल्हाररावांचे लोक निर्भयपणे लढत होते. तोच मल्हाररावांच्या एका गोलंदाजाने नेमकी बुरुंजाच्या वरच्या बाजूस तोफ डागून पेद्रो दमेल यास ठार केले ! त्यामुळे इतर फिरंगी लोक वसईकडे पळून गेले. व मल्हाररावास जय प्राप्त झाला. इकडे अप्पासाहेबांनी स्वत: थोडया फौजेनिशी मोहिमेस जाऊन मोर्चे लावले. आणि राणोजी शिंदे वगैरे सरदारास इतर बंदरे घेण्यास सांगितले. मोहिम सुरुंग लावून सर केल्यावर अप्पासाहेब वसईकडे वळले.''[१०५] नंतर अप्पासाहेबांनी सर्व फौजेसुध्दा वसईस मोर्चे लाविले. त्यावेळी त्याजजवळ मल्हारराव होळकर विठ्ठल शिवदेव, रानोजी शिंदे, शंकरजी नारायण, मानाजी आंग्रे, पिलाजी जाधवराव, रानोजी शितोळे वगैरे सरदार आपापल्या फौजेनिशी होते.''[१०६]

## २.१२ नादिर शहावर स्वारी करण्याची तयारी

उत्तरेकडे रुमशामचा (इराणचा) बादशहा नादिरशहा याने दिल्लीवर स्वारी करुन तेथे फार अनर्थ केला. तेंव्हा त्याच्यावर स्वारी करण्याच्या उद्देशाने श्रीमंत बाजीरावसाहेब निघाले. त्यांनी निघतेवेळी वसईस मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे वगैरे त्यांचे दौलतीचे आधारस्तंभ ''सरदारास

पाठविण्याविषयी अप्पासाहेबास पत्र लिहिल्यावरुन मल्हारराव व इतर सरदार तसेच उत्तरेकडे कुच करुन श्रीमंतास जाऊन भेटले.''[१०८] वसईची हकीकत कळल्यावर त्यांस खूप आनंद होऊन त्यांनी मल्हाररावास शाब्बासकी दिली इतक्यात नादिरशहा परत गेल्याची बातमी त्यास समजल्यावरुन दिल्लीवर जाण्याचा बेत होऊन श्रीमंतांची छावणी खानदेशात नर्मदातीरी पडली.

### २.१३ बाजीरावसाहेबांचा मृत्यू :-

रावेर येथे बाजीराव साहेबांची प्रकृती बिघडली. त्यावरुन औषधोपचार वगैरे सुरु केले. परंतु दिवसेंदिवस प्रकृतीस आराम न पडता जास्तच बिघडत चालली शेवटी मौजे कलमडे, ''परगणे रावेर या गावी वैशाख शुध्द १४ शके १६६२ या दिवशी (२८ एप्रिल सन १७४० रोजी) श्रीमंत बाजीरावसाहेबांचा काळ झाला.''[१०९]

### २.१४ नानासाहेबांस पेशवाईची वस्त्रे मिळतात.

बाजीरावाच्या अकस्मात निधनाने पेशवाईची वस्त्रे कोणाला द्यावी याबाबत मराठयांमध्ये वादविवाद सुरु झाला. शेवटी ''नानासाहेबांस ता.२५जून १७४० रोजी पेशवाईची वस्त्रे मिळाली.''[११०] त्यावेळी त्यांचे वय १९ वर्षाचे होते. बाळाजीला पेशवाई पद देऊ नये यासाठी शाहूला अनेक मराठा सरदारांनी सांगितले परंतु शाहूने दूरदृष्टीने घेतलेल्या निर्णयाला दूर करु शकली नाही. आपल्या पित्याप्रमाणे नानासाहेबाचेही साम्राज्यविस्ताराचे धोरण होते. बाजीरावाने दिल्लीला धडक दिल्यावर इराणच्या नादिरशहाने दिल्लीची लूट केल्याने मराठयांची जी मानहानी झाली ती भरुन काढणे नानासाहेबांचे महत्त्वाचे उद्‌दिष्ट होते. त्याचबरोबर राजपुतांशी सलोखा प्रस्थापित करण्याचे त्यांचे उद्‌दिष्ट होते. दोराहा सराईच्या तहात निजामाने कबूल केलेली माळव्याची सनद अद्याप मराठयांच्या हाती लागली नव्हती. नानासाहेबांनी आपल्या हया उद्‌दिष्टांच्या प्राप्तीसाठी पाऊले उचलण्यास सुरवात केली.

### २.१५ माळव्याची सुभेदारी

बाजीरावाने माळव्यात पाय रोवण्यात यश मिळविले होते. परंतु दिल्लीपतींकडून माळव्याची सुभेदारी मिळवून आपला तेथील अंमल पक्का करण्याचा त्यांचा मनसुबा पुरा झालेला नव्हता. हेच

काम नानासाहेबाने प्रथम हाती घेतले. हे काम मुत्सद्‌गिरीने पार पाडता येईल अशी त्यांची धारणा होती. निजामउलमुल्क वयस्कर झाला होता. ''निजामाचा मोठा मुलगा गाजीउद्‌दिन दिल्लीत होता. त्यास तेथील दरबारातच मोठी जागा देऊन गप्प करण्यात निजाम यशस्वी झाला होता. परंतु धाकटा मुलगा नासिरुद्‌दिन हयाने मात्र दक्षिणेत धुमाकुळ सुरु केला होता.''[१११] अशा अडचणीच्या प्रसंगी निजामउल्कमुल्कास मदत करुन त्याचे मार्फत बादशहाकडून माळव्याची सुभेदारी मिळवावी हया हेतूने नानासाहेबाची '' जानेवारी च्या युध्दात अदिलबार (एदलाबाद) जवळ त्याची निजामा बरोबर भेट झाली.''[११२] निजामाशी मैत्रीची बोलणी झाली. नानासाहेबांस पंधरा लाख रुपयांची प्राप्तीही झाली; पण माळव्याच्या सुभेदारीविषयी मात्र निजामाने टाळाटाळच केली. माळव्याच्या सुभेदारीविषयी थेट बादशहाशी पत्रव्यवहार सुरुच होता. पण दिल्ली दरबार अजिबात दाद देत नव्हता. मराठे सरदार माळव्यात स्वस्थ बसले नव्हते. ''शिदे तसेच होळकर यांनी ५ व २७ जानेवारी तसेच ८ मार्चला क्रमाने धार,बंदे आणि देवरीवर अधिकार प्राप्त केला''[११३] नानासाहेब स्वत:ही माळव्यात दाखल झाला. बोलणी चालू असली तरी त्याचवेळी मुलुख काबीज करीत राहून प्रत्यक्षात आपला ताबा बसवीत जाण्याचा उद्योग त्याने स्वत: व सरदारांमार्फत चालूच ठेविला. ''पेशव्यांनी माळव्यात प्रवेश करताच शिरोज व भिलसा यांच्याकडून कर वसुल केला.''[११४] बोलणी चालू असली तरी त्याचवेळी मुलुख काबीज करीत राहून प्रत्यक्षात आपला ताबा बसवीत जाण्याचा उद्योग त्याने स्वत: व सरदारांमार्फत चालूच ठेविला.

पहिला बाजीरावाचे कारकीर्दीत मराठे राजस्थानातही घुसले होते. तेथे काही राजे रजवाडयांविषयी मराठयांनी आक्रमक राजकारणे केली असली तरीही जयपूरच्या सवाई जयसिंहाशी मात्र बाजीरावाने सख्य राखले होते. नानासाहेबाने पुढे तेच धोरण चालू ठेवण्याचे ठरविले. इ.स. १७४१ च्या मेमध्ये तो सवाई जयसिंहास भेटाला आणि जयसिंहाने आपले वजन खर्ची घालून पेशव्यास बादशहांकडून माळव्याची सुभेदारी मिळवून द्यावी आणि त्या बदल्यात मराठे जयसिंहास नेहमी सहाय्य करतील अशा स्वरुपाच्या मैत्रीच्या कराराचे बोलणे नानासाहेबाने लावले.''[११५] पण हया भेटीतून काहीही निष्पन्न झाले नाही. ''निजामउल्कमुल्क किंवा जयसिंह हयांच्यासारख्या कोणत्याही मध्यस्थीचा काहीही उपयोग होणार नाही शेवटी आपण जी ताकद दाखवू तीच खरी हे लक्षात घेऊन नानासाहेबाने आक्रमक पवित्रा घेतला.''[११६] त्याचाच परिणाम होऊन ''इ.स. १७४३त

दिल्लीचे बादशहा व श्रीमंत नानासाहेब या उभयतांमध्ये एक नऊ कलमांचा तहनामा ठरुन बादशहाने त्याअन्वये माळवा प्रांताची सुभेदारी नानासाहेबास दिली, आणि 'पेशवे' या कराराप्रमाणे वागतील, न वागू लागल्यास आम्ही त्यांस वागावयास लावू व इतके करुन जर ते आमचे न ऐकता या तहनाम्याच्या कलमांविरुध्द वागू लागले तर आम्ही त्यांची नौकरी सोडून देऊ, अशा प्रकारच्या जामिनकीबद्दल काही प्रमुख मराठे सरदारांच्या बादशहाने हया तहनाम्यावर सहया करुन घेतल्या. त्या सर्वात मल्हारराव होळकर मुख्य होते.''[११७] यावरुन बादशहाचे दरबारी मल्हाररावांची योग्यता त्यावेळी पेशव्यांच्या बरोबर गणली जात होती. असे म्हणण्यास हरकत नाही. बादशहाच्या शिक्यांनिशी सनदा पेशव्यांच्या हातात पडायला १७५० साली उजाडावे लागले. मधल्या काळात मराठे सरदार माळव्या बाहेरील प्रदेशात हल्ले करीतच होते.

## २.१६ बुंदी प्रकरण मराठयांचा राजस्थानातील प्रवेश :

उत्तर हिंदूस्थानातील बुंदेलखंड म्हणून ओळखला जाणारा प्रदेश त्याच्या भौगालिक स्थानामुळे लष्करी कारवायांच्या दृष्टीने फार मोक्याचा असा होता. मल्हाररावांच्या उत्तरेकडील मोहिमेवर राजपुतान्यातील प्रकरण महत्त्वाचे आहे. यावेळी राजपुतान्यात बुंदी प्रकरण उद्‌भवले त्यामुळे मराठयांना राजपुतान्यात प्रवेश करण्यास वाव मिळाला.

इ.स. १७४३ मध्ये बुंदीचे राजे उमेदसिंहच्या आईने जयपूरचा राजा ईश्वरसिंहच्या विरोधात मदत मिळविण्यासाठी मल्हाररावांना निमंत्रीत केले. याचे प्रमुख कारण होते की, बुंदीच्या बऱ्याचशा प्रदेशावर ईश्वरसिंहाने कब्जा केलेला होता. मल्हाररावांनी हया निमंत्रणाचा स्वीकार केला आणि ''लाखेरी मुक्कामावर जयपूर आणि मराठयांच्या फौजेमध्ये युध्द झाले आणि या युध्दामध्ये जयपूरच्या फौजेचा मोठया प्रमाणात पराभव झाला.''[११८] ईश्वरसिंगाने मल्हाररावास होळकरांकडे तहाविषयी बोलण्यास वकील पाठविले तेंव्हा मल्हाररावांनी सांगितले की ''बुंदीचे राज्य व पंचवीस लाख रुपये रोकड द्याल तर जाग्यावरुन हालू देऊ''[११९] ईश्वरसिंगाने नाइलाजास्तव ''वीस लाख रुपये व बुंदीच्या राज्याचा सनदा मल्हाररावास दिल्या''[१२०] तेंव्हा त्यांनी त्यास जयपूरास जाऊ दिले. मल्हाररावांनी वचनाप्रमाणे उमेदसिंग हाडे यास बुंदीच्या गादीवर बसून आपण इंदुरास निघून गेले.

## २.१७ राजपुतान्यातील घडामोडीतील मराठयांचे हस्तक्षेप

राजपुतान्यात एक दुसरे राजकारण उपस्थित झाले. सवाई जयसिंग इ.स. १७४३ मध्ये मरण पावला. ईश्वरसिंग आणि माधवसिंग असे त्याचे दोन मुलगे होते एक उदेपूरकरांच्या कन्येचा मुलगा माधवसिंग व दुसरा ईश्वरसिंग पूर्वी ''जयपूर, जोधपूर आणि उदेपूर येथील राजांमध्ये राणा उमराव यांचे कारकीर्दीत असा ठराव झाला होता की, उदेपूरकरांच्या मुलीचा मुलगा वडील समजून गादीवर बसण्याचा अधिकार त्याजकडे असावा''[१२१] या नियमाप्रमाणे पहाता सवाई जयसिंगाच्या मागे गादीवर बसण्याचा हक्क माधवसिंगचा होता. तथापि तो वयाने लहान व ईश्वरसिंग मोठा होता म्हणून त्यास मरते वेळी गादीवर बसवून सवाई जयसिंग मृत्यु पावले. नंतर पुढे ईश्वरसिंगाचा राज्याभिषेक झाला. परिणामी जयपूरच्या राज्यात एक माधवसिंगचा व दुसरा ईश्वरसिंगाचा असे दोन पक्ष निर्माण झाले.

इ.स. १७४३ मध्येच माधवसिंगच्या मातेने मल्हाररावांना विनंती केली की, माधव सिंगचा वास्तविक पहाता जयपूरच्या गादीवर अधिकार आहे तेंव्हा ती गादी परत मिळवून देण्यासाठी मदत करावी. मल्हाररावांनी ही विनंती मान्य केली आणि त्यांनी आपल्या फौजेसह कूच केली मल्हारराव होळकरांच्या कुशल पराक्रमी झुंजार सैनिकांनी ईश्वरसिंगाचा पराभव केला. मल्हाररावांनी अभ्यासपूर्व रणनिती, युध्दातील बारकावे, युध्दातील आजपर्यंतचा अनुभव या जोरावर त्यांनी विजय मिळविला. अत्यंत निराशजनक अवस्थेत ''ईश्वरसिंगाने विषारी नाग चावून घेऊन ता १४ डिसेंबर १७५० रोजी प्राण दिला.''[१२२] यामुळे मराठे रामपूरा, भानपूरा, तोडा, नवाई हे चार परगणे माधवसिंगास देऊन बाकीचे राज्य ईश्वरसिंगकडे ठेवण्यास कबूल असतानाही ईश्वरसिंगाच्या हट्टामुळे आणि त्या हट्टापायी त्याने मरण पत्करल्यामुळे संबंध राज्यच माधवसिंगास मिळाले या उपकारांबद्दल ''मल्हाररावांस माधवसिंगाने ७६ लक्ष रुपये रोख, टोक रामपूरा, हिंगलाजगड, व धाकटा रामपूरा हे प्रांत जहागीर दिले. व दरसाल साडेतीन लक्ष रुपये खंडणी देण्याचे कबूल केले.''[१२३]

माधवसिंग अत्यंत कृतघ्न होते. त्याने स्वार्थापोटी दोन कृती केल्या पैकी एक म्हणजे ''प्रमुख प्रमुख मराठे सरदारांना जेवावयास बोलावून अन्नात विष घालवयाचे आणि त्यांना मारुन टाकावयाचे ही एक कृती. दुसरी कृती म्हणजे सापडतील त्या मराठयांची कत्तल करावयाची. पैकी

कुणीच मराठा प्रमुख जेवावयास न गेल्यामुळे माधव सिंहाचा मराठयांना विष घालून मारण्याचा प्रयत्न फसला पण मराठी सैन्यातील सर्वसामान्य लोकांची कल्पना झाली की, आता माधवसिंहास सर्वच राज्य मिळणार असल्यामुळे तो मराठयांना त्रास देण्यासारखे काही कारणार नाही, पण त्यांची फसगत झाली. वरील समजुतीमुळे हजार दोन हजार मराठे बाजार हाट करण्यासाठी जयपुर शहरात गेले. तेंव्हा माधवसिंहाने शहराचे दरवाजे बंद करविले आणि बाजारहाट करण्यास आलेल्या मराठयांपैकी सापडेल त्यास मारुन टाकले. मराठयांचे नशीब असे की, या बाजार हाट करणाऱ्यांमध्ये महत्त्वाचे लोक कोणीच गेले नव्हते.''[१२४]

अशा प्रकारे जयपूरच्या उत्तराधिकारी संघर्षात मराठयांनी भाग घेतला. पण त्यापासून मराठयांना कोणत्याही प्रकारचा फायदा मिळाला नाही त्याचप्रमाणे रजपुतांचा विश्वासही ते जिंकू शकले नाही. पण रजपूत मराठा संघर्षाचा फायदा पठाणांनी उठवला आणि त्यांनी भारतातील मुस्लिम सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान दिल्लीमध्ये मराठयांच्या दृष्टीने एक मोठी घटना घडून आली. ''इ.स. १७५१ मध्ये दिल्लीचा शिया वजीर सफरदजंग यास बादशहाचे रोहिले वगैरे जे शत्रू त्यांना हाकून लावण्यास मराठयांनी बहुमोल मदत केली होती. त्याचा परिणाम एवढा मोठा झाला. की इ.स. १७५२ च्या साधारणत: आरंभी दिल्लीचा बादशहा व मराठे यामध्ये एक तह घडून आला. त्यात असे ठरले की काही अटींवर मराठयांनी मुघली पादशाहीचे अंत:शत्रू व बहि:शत्रू यांपासून रक्षण करावे.''[१२५] बादशहा दुर्बल झाल्याचे पाहून राजस्थानातील संस्थानिक त्याला विचारीनासे झाले. तेंव्हा असे जे आडदांड अंत:शत्रू त्यापासून बादशाहीचे रक्षण करणे मराठयांचे कर्तव्य ठरले.

## २.१८ जाट राजा सूरजमलचा मराठयांबरोबर संघर्ष व कुंभेरीचा संग्राम

बादशाही मोडकळीस आल्याचे पाहून जाटांनी उचल खाल्ली त्यांच्यापैकी एक संस्थानिक सुरजमल जाट हा मुघली बादशाहीस मानीनासा झाला. तेंव्हा इ.स. १७५२ च्या तहाप्रमाणे मराठयांनी जाटांना वठणीवर आणणे भागच होते. तसेच हया तहानुसार ''पेशव्यांना आग्रा आणि अजमेरची सरदेशमुखी प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला. परंतु भरतपुरच्या जाट शासक सुरजमल स्वत: आगऱ्यावर अधिकार प्राप्त करण्याची इच्छा ठेवत होता कारण की ते त्याच्या मथूरा क्षेत्राच्या

जवळ होते. इकडे त्याला सफदरजंगचे समर्थन होते. म्हणून मोगल सम्राटही त्याची घृणा करत होते. या सर्व कारणाने प्रेरीत होऊन मल्हारराव होळकर यांच्या  मुलाने खंडेरावांनी रघुनाथराव बरोबर सुरजमलच्या विरुध्द युध्द छेडले''[१२६] सामोपचाराने प्रकरण मिटविण्याची बुध्दी रघूनाथरावांची नव्हती त्यामुळे गाजीउद्दिन व मल्हारराव हट्टास पेटले तेणे करुन निष्कारण संग्राम उद्भवला ''दादासाहेब चालून आले तेंव्हा जाटाचा कारभारी रुपराम कटारे चौधरी पुढे येऊन भेटला दादासाहेबांनी एक करोड रुपये खंडणीची मागणी केली. रुपराम चाळीस लाख पर्यत देण्यास कबूल झाला.तेवढयावर तडजोड करणे अशक्य नव्हते. सूरजमल्ल सैन्यबळे व द्रव्यबळे दोन्ही दृष्टीने सामर्थ्यवान होता. मराठयांची चढेलपणाची मागणी पाहून त्याने दादासाहेबांकडे पाच बंदूकीच्या गोळया व  दारु पाठवून कळवले, चाळीस लक्ष देतो ते घ्या  नाही तर युध्द. दादांनी विषाद मानून लगेच कुंभेरीस मोर्चे बसविले.''[१२७] त्यावेळेस सूरजमल जाटची दोन शहरे डीग आणि कुंभेरी प्रसिध्द होती. त्यापैकी जाटाशी युध्द करुन त्यांना नमविण्यासाठी मल्हारराव होळकरांनी त्यांची राजधानी जी कुंभेरी तीस वेढा घातला''[१२८]

हा वेढा चालू असता मराठयांच्या दृष्टीने एक दुर्दैवाचा प्रसंग ओढावला. मल्हाररावांच्या चिरंजीवावर म्हणजेच खंडेरावावर कुंभेरीच्या किल्ल्याला मोर्चे लावण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. ''१७ मार्च १७५४ रोजी दुपारच्या जेवणानंतर किल्ल्याला मोर्चे लावण्याच्या कामाची देखरेख करण्यासाठी खंडेराव आला होता. ते खंदकाजवळ पोचत नाही तोच किल्ल्यावरुन तोफांचा मारा सुरु झाला. जेजाल्याची (लहान तोफ) गोळी त्याच्या मानेला लागून तो गतप्राण झाला.''[१२९]  असा हा कर्तव्यदक्ष, खंदावीर मल्हारराव आणि खंडेराव या पितापूत्रांचे एकमेकांवर अथांग प्रेम होते. मल्हाररावांचा शब्द खंडेरावांनी कधीही मोडला नाही. पुत्राच्या मृत्यूला कारण झालेल्या जाटांचा सूड काढण्यासाठी मल्हारराव हयात भर पेटलेले होते.

## २.१९ अहिल्याबाई होळकर युगास प्रारंभ :-

''अहिल्याबाईचा जन्म वैशाख  कृष्ण सप्तमी सोमवार ३१ मे १७२५ मध्ये अहमदनगर जिल्हयातील जामखेड तालुक्यातील सीना नदीच्या काठी चौडी नावाच्या गावी झाला.''[१३०] अहिल्याबाईच्या पित्याचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशिलाबाई होते. तिचे पिता चौंडी या गावाचे पाटील होते.''[१३२]

अहिल्या चरितम या संस्कृत महाकाव्यात सखारामशास्त्री भागवत यांनी अहिल्याबाईची जन्मतिथी दिली आहे. आणि तसेच अहिल्याबाईंची कुंडलीही दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे

''श्री शालिवाहन शके गिर्याब्धिरस भूमिते ।।


काल्पिते जेष्ठेवद्ये य सप्तम्यामरूणेदये।।३१।।

लग्ने बूधे खौ शुक्रे, गुरौ भाग्ये सकेकि।।३२।।

अस्मित्रमुनुमिते काले माणकोजी वधू शुभा।।

कन्यां प्रासूत रुचिरा सुद्यौ दिन्दुकलामिव।।

प्रथम सर्ग




[133]

१८ व्या शतकात धनगर जमातीत जन्मास आलेल्या या तेजस्वी अहिल्येची आई सुशीलाबाई व वडील माणकोजीराव शिंदे हे धार्मिक वृत्तीचे आणि सात्त्विक प्रवृत्तीचे असल्याने त्यांनी अहिल्येला लहानपणीच तिच्यावर धार्मिक संस्कार केले. ''अहिल्याबाईच्या जीवनाला आकार देण्याच्या कामी तिच्या आईचा फार मोठा वाटा होता.''[134] धार्मिक प्रवृत्तीच्या आईचे संस्कार लहानपणापासूनच अहिल्याबाईवर झालेले होते. उपवास, पुजा-पोथी, धर्मग्रंथाचे वाचन मनन यांची गोडी लहानपणापासून तिला लागली होती. सात आठ वर्षे वयातच अहिल्याबाई धर्मशील बनली होती.

''अहिल्याबाईंच्या वडिलांनी अतिशय चांगले संस्कार करुन तिला वाढविले. आपल्या पित्याच्या आणि पाच भावंडाच्या सहवासात अहिल्येचे शिक्षण घरीच होऊ लागले.''[135] त्याकाळी स्त्रियांना शिक्षण मिळत नसे तरी अहिल्याबाई मोडी दुसरी पर्यंत शिकलेल्या होत्या. त्यांना मोडी

लिहिताही येत होती.''[१३६] आपल्या पित्याच्या आणि पाच भावंडाच्या सहवासात अहिल्येचे शिक्षण घरीच होऊ लागले.

## २.२० विवाहः-

प्राचीन काळी बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती होळकरांच्या कुटुंबात खुद्द मल्हाररावांचे लग्न वयाच्या ८व्या वर्षी झाले होते. म्हणून त्यांनी आपला मुलगा खंडेराव यांचा विवाह वयाच्या १० वर्षी अहिल्याबाईंबरोबर वयाच्या ८व्या वर्षी करण्यात आला. यावरुन असे दिसून येते की, अहिल्याबाईचा विवाह तत्कालीन प्रथेप्रमाणे बालविवाह होता. ''सन १७३३ मध्ये अहिल्यादेवीचे लग्न पुणे येथे खंडेरावांबरोबर मोठया थाटामाटात झाले. लग्नासाठी छत्रपती शाहू स्वत: उपस्थित होते.''[१३७]

विवाहानंतर खंडेराव व अहिल्याबाईंना इ.स. १७४५ मध्ये देपालपूर येथे एक पुत्र झाला. त्याचे नाव मालेराव ठेवले. व त्यानंतर तीन वर्षांनी एक कन्या झाली. तिचे नाव मुक्ताबाई ठेवले. अशा प्रकारे अहिल्याबाईंना एक मुलगा व एक मुलगी असे दोन अपत्ये होती.

## निष्कर्ष:-

महाराष्ट्राची अस्मिता शिवकालातच तयार झाल्याचे प्रत्ययास येते. औरंगजेबाबरोबर मराठयांनी जो स्वातंत्र्याचा लढा दिला. त्यावरुन मराठयांच्या स्वातंत्र्यप्रियतेची, देशभक्तीची कल्पना येण्यासारखी आहे. परंतु अठराव्या शतकातल्या मराठेशाहीचे चित्र बदलले. दिल्लीला सतत बदलते बादशहा आणि अंदाधुंदी, पुण्याला बदलते पेशवे त्यांच्या हाताखाली बलाढय फौज बाळगून असलेले मातब्बर मराठे सुभेदार, सरदार, शिवरायांच्या स्वराज्याचा अर्थ मुलुखगिरी असा करुन, मराठयांनी राज्यविस्तार असा केला. या सर्व राजकीय परिस्थितीमुळे पसरलेली अशांतता, असुरक्षितता आणि याच अठराव्या शतकात आणि सर्वसामान्य कुटुंबात अहिल्याबाईंचा जन्म १७२५ मध्ये झाला. परंतु मराठेशाहीचा आधारस्तंभ ठरलेले सुभेदार मल्हारराव होळकर यांची सून म्हणून १७३३ मध्ये त्यांनी इंदूरच्या होळकर घराण्यात गृहप्रवेश केला. त्याबरोबर कुंभेरीच्या संग्रामातील खंडेरावांच्या मृत्युबरोबरच माळव्यातील राजकारणातही अहिल्याबाईंचा प्रवेश झाला आणि मराठयांच्या इतिहासातील एका तेजस्वी पर्वाला सुरुवात झाली.

## संदर्भ सूची


१) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड १, पुणे, २०१० पृ.२३३

२) उपरोक्त : पृ.२७७

३) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, नागपूर, १९८८ पृ.१११

४) Sarkar sir jadunath, History of Aurangzib valume IV, publisher-orient Longman Ltd, Calcutta, first edition 1919, Impression, 1972, P.no.190

५) सरदेसाई गो.स : मराठी रियासत, खंड २ अ) उग्र प्रकृती संभाजी क) स्थिर बुध्दि राजाराम , मुंबई, २०१० पृ.२२

६) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास पृ.१२५

७) उपरोक्त: पृ.२७७

८) कुलकर्णी अ.रा. : अशी होती शिवशाही, पुणे, २००० पृ.११४, पवार डॉ.जयसिंगराव (संपादीत) छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, १९९० पृ.५३

९) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड २, पृ.२७

१०) सरदेसाई गो.स (संपादक), पेशवे दप्तर खंड ३१, मुंबई, १९३१, पृ.४२-४५

११) सरदेसाई गो.स मराठी रियासत, खंड २, पृ.१८

१२) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१३३

१३) उपरोक्त : पृ.२७७

१४) सरदेसाई गोस : मराठी रियासत खंड २, पृ.१८

१५) Sardesai G.S : New History of the Marathas,volume-I, Bombay, second Impression 1957, P.no.85

१६) सरदेसाई गो.स : मराठी रियासत, खंड २, पृ.११०

१७) उपरोक्त: पृ.२७७

१८) उपरोक्त : पृ.११०,११

१९) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड १, पृ.४०७-४०८

२०) पगडी सेतूमाधव (संपादक) : मराठयांचे स्वातंत्र्य युध्द, पुणे, १९६२, पृ.२०

२१) उपरोक्त: पृ.२७०

२२) कुलकर्णी अ.रा : अशी होती शिवशाही, पृ.१२१

२३) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड २, पृ.१५४

२४) उपरोक्त : पृ.१६१

२५) उपरोक्त : पृ.१६५

२६) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१४३

२७) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड २, पृ.१८०

२८) पगडी सेतू माधव : मराठे व औरंगजेब, पुणे, पृ.९

२९) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१४७

३०) पगडी सेतू माधव : मराठे व औरंगजेब, पृ.१२

३१) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) खंड १, पृ.१४९

३२) उपरोक्त : पृ.१५५

३३) डॉ. प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१४९

३४) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) मराठयांचा इतिहास खंड १, पृ.४३३

३५) देशपांडे प्र.न : मराठयांचा उदय आणि उत्कर्ष, पुणे, २००१, पृ.२१९

३६) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड १, पृ.४४२

३७) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१५१

३८) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड १, पृ.४४७, ४४८

३९) डॉ.कोलारकर श.गो : भारताचा इतिहास (प्राचीन व मध्ययुगीन प्रारंभापासून १७०७ पर्यंत) नागपूर, २००१, पृ.३४९

४०) डॉ. प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास , पृ.५६

४१) पुरंदरे कृ.वा संपादक : पुरंदरे दप्तर भाग-१, पुणे १९२९, पृ.१२,१३

४२) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड २, पुणे,२००६ पृ.२

४३) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१५७

४४) उपरोक्त : पृ.१५८

४५) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड ३ (पुण्यश्लोक शाहू अ.पेशवा बाळाजी विश्वनाथ क.पेशवा बाजीराव), मुंबई, २०१०, पृ.४६

४६) उपरोक्त : पृ.५०

४७) उपरोक्त : पृ.५१

४८) सरदेसाई गो.स.मराठी रियासत खंड २, पृ.१०

४९) डॉ.आचार्य धनंजय : पेशवा बाळाजी विश्वनाथ आणि पहिला बाजीराव, नागपूर, २०११ पृ.१

५०) उपरोक्त : पृ.१५९

५१) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह (संपादक) : मराठयांचा इतिहास, खंड ३, पुणे, २०१०, पृ.१९०

५२) उपरोक्त : पृ.२३३

५३) कुलकर्णी अ.रा : मध्ययुगीन महाराष्ट्र, पुणे, २००७, पृ.२९

५४) भंडारी एस.आर., भारत के देशी राज्य खंड-प्रथम ११-४.१९२६ पृ.२१

५५) पुण्यापासून ४० मैलांवर नीरा नदीच्या काठी होळ नावाचे खेडे आहे

५६) पुरूषोत्तम : देवी श्री अहिल्याबाई होळकर चरित्र, मुंबई, १९३३, पृ.४

५७) नाडकर्णी सीताराम लक्ष्मण : होळकरांच्या राज्याचे सामान्य वर्णन, मुंबई, १९१९, पृ.७

५८) उपरोक्त

५९) पुरूषोत्तम : देवी श्री अहिल्याबाई होळकर चरित्र, पृ.४

६०) ठाकुर वा.वा (संपादक), होळकर शाहीच्या इतिहासाची साधने, भाग १ ला, इंदूर १९४४, पृ.२१

६१) उपरोक्त: पृ.१६१

६२) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड ३, पृ.३८३

६३) केळकर यशवंत नरसिंह : होळकरांची कैफियत, पुणे, १९५४, पृ.१

६४) तळोदे (खानदेशात) सुलतानपूर येथील भोजराज बारगळची बहिण

६५) केळकर यशवंत नरसिंह : होकरांची कैफियत, पृ.१

६६) कंठाजी कदम बांडे हा पेशव्यांचा सरदार होता

६७) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड ३, पृ.२३३

६८) बेहरे ना.के : पहिला बाजीराव पेशवा, १९३०, पृ.१३२

६९) गुजर डॉ. यादव : मल्हारराव होळकर व त्यांचा काळ , नागपूर, १९९१ पृ.८

७०) ठाकूर वा.वा (संपादक) : होळकर शाहीच्या इतिहासाची साधने भाग१, पृ.२१

७१) गुजर डॉ.यादव : मल्हारराव होळकर व त्यांचा काळ, पृ.८

७२) बेहरे ना. के : पहिला बाजीराव पेशवा , पृ.१३२

७३) सरदेसाई गो.स : मराठी रियासत खंड ३, प.३२४

७४) कुलकर्णी अ.रा, खरे ग.ह - खंड २, पृ.३२४

७५) भंडारी एस.आर., भारत के देशी राज्य, पृ.८

७६) उपरोक्त : पृ.१०

७७) उपरोक्तः पृ.११५

७८) उपरोक्तः पृ.११५

७९) उपरोक्त : पृ.११५

८०) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पुणे, १८९३, पृ.१५

८१) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह., खंड-२, मराठयांचा इतिहास, पृ.४९-५०

८२) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पुणे, १८९३, पृ.५९

८३) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह. मराठयांचा इतिहास, खंड-२, पृ.५२

८४) उपरोक्तः पृ.११८

८५) उपरोक्त : पृ.५३

८६) आचार्य धनजंय : पेशवा बाळाजी विश्वनाथ आणि पहिला बाजीराव, नागपूर, २०११ पृ.७४

८७) उपरोक्तः पृ.५३

८८) अहिल्या स्मारिका, वर्ष-१९७०, इन्दौर, प्रकाशित, संपादक- सं.का.दिक्षित, रामसेवक गर्ग, हिरालाल शर्मा, पृ.१०
८९) उपरोक्त: पृ.५३
९०) भागवत अ.ना : होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, खंड-१, ले.३, प्रकाशक होळकर सरकार पुस्तकमाला
९१) रघुवीरसिंग : मालवा में युगांतर या अराजकता, प्रकाशक-श्री मध्य भारत हिंदी साहित्य समिती, १९३८, पृ.३११
९२) अहिल्या स्मारिका, वर्ष १९७३-७४, अहिल्याबाई होळकर चॅरीटेबल ट्रस्ट, इन्दौर प्रकाशित, संपादक सं.का दिक्षित, रामसेवक गर्ग, हिरालाल शर्मा, पृ.५३
९३) भागवत अ.ना : होळकर शाहीच्या इतिहासाची साधने, खंड-१, ले.३
९४) आचार्य धनजंय : पेशवा बाळाजी विश्वनाथ आणि पहिला बाजीराव, पृ.८०-८१
९५) उपरोक्त : पृ.८१
९६) उपरोक्त : पृ.८२
९७) उपरोक्त : पृ.८२
९८) उपरोक्त : पृ.८२
९९) अत्रे मुरलीधर : सुभेदार थोरले मल्हारराव होळकर, पृ.५२
१००) डॉ.प्रभाकर देव : मराठयांचा इतिहास, पृ.१७७
१०१) अत्रे मुरलीधर : सुभेदार थोरले मल्हारराव होळकर, पृ.८७
१०२) उपरोक्त -पृ.८८
१०३) उपरोक्त-पृ.८८
१०४) उपरोक्त-पृ.८८
१०५) उपरोक्त -पृ.८८
१०६) उपरोक्त : पृ.९२
१०७) उपरोक्त: पृ.९२
१०८) उपरोक्त : पृ.९२
१०९) कुलकर्णी अ.रा. खरे, ग.ह. (संपादक), मराठयांचा इतिहास, खंड-२, पृ.८२

११०) उपरोक्त पृ.९०

१११) अमितकुमार : मराठों का इतिहास, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २०१०, पृ.११८

११२) उपरोक्तपृ.९०

११३) उपरोक्तपृ.९०

११४) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपादक), मराठयांचा इतिहास, पृ.९०

११५) उपरोक्त ९१

११६) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पुणे, १८९३, पृ.९५

११७) भंडारी एस.आर, भारत के देशी राज्य प्रथम खंड, पृ.२०

११८) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पुणे, १८९३, पृ.६४

११९) उपरोक्त : पृ.६४

१२०) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पृ.९८

१२१) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. : मराठयांचा इतिहास, खंड-२, पृ.२२४

१२२) अजे मुरलीधर मल्हार, कवठेकर, सुभेदार थोरले मल्हारराव होळकर चरित्र, पृ.१००

१२३) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह : मराठयांचा इतिहास खंड-२, पृ.२२४

१२४) उपरोक्त : पृ-२२४

१२५) अमितकुमार, मराठों का इतिहास, पृ.१२३

१२६) सरदेसाई गो.स : मराठी रियासत (पेशवा बाळाजीराव) खंड-४, मुंबई-२०१०,पृ.४६७

१२७) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह : मराठयांचा इतिहास, खंड-२, पृ.२२७

१२८) लोही म.ना : देवी अहिल्याबाई होळकर वास्तव दर्शन, नागपूर,२००१,पृ.२५

१२९) ठाकूर वा.वा : होळकर शाहीच्या इतिहासाची साधने, भाग-१, पृ.२१

१३०) उपरोक्त पृ.९०

१३१) उपरोक्तपृ.९०

१३२) उपरोक्तपृ.९०

१३३) शर्मा हिरालाल गणेश मतकर : अहिल्या स्मृती प्रथम पुष्प, प्रकाशक, सार्वजनिक देवी श्री

अहिल्याबाई जन्मोत्सव समिती, इंदौर, १९८८, पृ.८,९

१३४) बेडदे धनंजय : लोकमाता अहिल्यादेवी होळकर गौरव ग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०००, पृ.९५

१३५) वीर मच्छिंद्र बाबासाहेब : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, औरंगाबाद, पृ.४४

१३६) उपरोक्तपृ.९३

१३७) उपरोक्त : पृ.९३

# प्रकरण तिसरे

# अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील राजकीय योगदान

## ३.१ थोरले माधवराव पेशवेपदी :-

ता.२३ जून १७६१ रोजी पेशवा नानासाहेब पर्वतीवर मरण पावले. त्याचा मृत्यू थोडा बहुत अपेक्षित असल्यामुळे एकाएकी घाला पडावा तसा प्रकार झाला नाही. त्यावेळी पेशव्यांच्या कुटूंबात रघुनाथवराव हेच कर्तेधर्ते पुरुष होते. वडीलकीच्या नात्याने राज्याचा भार अंगावर घेऊन मराठयांचे नाव उज्ज्वल राखण्याची तयारी व पेशवे पदासंबंधीची जबाबदारी आता त्यांच्यांवर होती. बायकांत वडील गोपिकाबाई दादापेक्षा निदान दहा वर्षांनी मोठी. मानी व करारी स्वभावाची होती. पण या दोघांचे विचारप्रवाह भिन्न भिन्न प्रकारचे होते रघुनाथरराव चंचल होते. सर्वांचे म्हणणे ऐकून व सल्लागारांची लायकी ओळखून स्वत:चे निश्चित मत बनविण्याची ताकद त्यांच्या अंगी नसल्यामुळे त्यास नेहमी दुसऱ्यांच्या तंत्राने चालावे लागे. शिवाय आपण मोठे कर्तबगार अशी त्याला घमेंड होती म्हणून नानासाहेबांच्या मृत्यूनंतर सर्व कारभार आपल्या हाती ठेवावा, आपण पेशवे व्हावे असे त्यास वाटू लागले. माधवराव वयाने लहान. त्याला काय समजते या विचाराने आलेल्या संधीचा उपयोग करुन पेशवाई पद घ्यावे आणि पानिपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी लगोलग उत्तरेत जावे असा विचार रघुनाथरावाने ठरविला. ''तद्नुसार त्याने बादशहा व शुजाउद्यौला यांस पत्रे लिहून गोपाळराव व त्याचे मार्फत उत्तरेचे संधान चालू केले पण पुण्यास जवळच्या एकाही व्यक्तीला रघुनाथरावांचा हा मनोदय योग्य वाटला नाही.''[१] माधवरावांचे वय लहान सोळा वर्षाचे असले तरी नानासाहेबांच्या वंशाकडेच पेशवाई चालावी असा विचार सर्व जाणत्या मानसांनी केला. एकानेही रघुनाथरावांच्या विचाराला अनुकूलता दर्शविली नाही. पेशवाईच्या वस्त्रांच्याबाबतीत माधवरावांना उघड विरोध करण्याचे धाडस रघुनाथरावांस झाले नाही. माधवरावांस पेशवाईची वस्त्रे देण्याचा निश्चय झाला. ''ताराबाईंच्या संमतीने रामराजाकडून सोमवार आषाढ व ३ ता. २० जूलाई १७६१ रोजी माधवरावास वस्त्रे मिळाली.''[२] बरोबर कारभारी निळकंठ महादेव उर्फ बाबा पुरंदरे यास दिवाणगिरीची व सखारामबापूस मुतालिकिची वस्त्रे देण्यात आली.''[३] पदग्रहणाचा हा कार्यक्रमविधी साताऱ्यास पार पडल्यावर सर्व मंडळी पुण्यास आली.

पुण्यास आल्यावर रघुनाथरावांचा नूर पालटला. माधवरावांस आपले छायेत ठेवून आपणच कारभार करावा त्यास बोलू देऊ नये अशा डौलाने त्याने बंदोबस्त चालविला. याच कारणास्तव सुरवातीपासून कारभारांत तेढ उत्पन्न झाली. यामुळे उघड दोन पक्ष उपस्थित झाले.

यावेळी मराठी राज्याची परिस्थिती संकटमय होती. ''मराठयांपूर्वी केलेल्या मोहिमांचे फार मोठे कर्ज यावेळी राज्यावर होते. पेशव्यांच्या मृत्यूमुळे व प्रशासकीय अस्तव्यस्ततेमुळे राज्याचा राजकोषही यावेळी रिक्त होता.''[४] पानिपतच्या युध्दापूर्वी मराठयांनी जाट, रजपूत रोहिले, बुंदेले यांना वठणीवर आणले होते. परंतु आता मराठयांच्या पराभवानंतर त्यांच्या या शत्रूंनी पुन्हा डोके वर काढले. पंजाब प्रांतावर रोहिल्याची सत्ता प्रस्थापित झाली. तर नजीबखान रोहिल्यांने दिल्लीच्या मोगल बादशाहीवर पुन्हा वर्चस्व प्रस्थापित केले.''[५] पूर्वीचे अनुभवी माणसे गारद झालेली, अशा अडचणीत राज्याचा निभाव लागणे कठिण झाले.

## ३.२ निजामाचा उठाव : पुण्यातील स्वारीः-

मराठा राज्याची संकटमय परिस्थिती नानासाहेबांचा मृत्यु आणि पेशवे घराण्यातील भाऊबंदकी हयांच्या वार्तांनी निजामाला नवा हुरुप चढणे स्वाभाविक होते. '' त्याने पेशव्यांच्या घोरपडे, निंबाळकर, जाधव आदी मराठे सरदारांना हाताशी धरुन डिसेंबर, १७६१ मध्ये पुण्यावर हल्ला केला. ''[६] ''निजामाचे सैन्य जाळपोळ करीत महाराष्ट्रात शिरले. टोके आणि प्रवरा संगम ही हिंदूंची तीर्थस्थाने समजली जात; ती त्याने उध्वस्त करुन टाकली.''[७] अशा रितीने निजामाच्या या स्वारीमुळे मराठयांवर फारच मोठे संकट येऊन कोसळले. ''पुण्यातील पेशवे कुटुंबियांनी सुध्दा आक्रमणाच्या भितीमुळे लोहगड पुरंदर आणि सिंहगड या ठिकाणी आश्रय घेतला.''[८] अशा कठीण परिस्थितीत रघुनाथराव आणि माधवराव हयांनी इतर सर्व मराठा सरदारांनी आपल्या मदतीला धावून यावे असे आवाहन केले. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. पेशव्याने फौजा गोळा केल्या. ''मराठे आपल्यावर चालून येणार ही कल्पना निजामास होती. सुमारे साठ हजार फौजा जमवून तोही पुण्याच्या रोखाने चालून आला. ठिकठिकाणी चकमकी झडू लागल्या. मोगल मराठे झगडत लोणी उरुळी पावेतो आले. वाटेत लहान मोठे संग्राम होतच होते.''[९] ''उरुळीस निजामाचे सहा मुक्काम झाले. एकदम चढाई करुन मोगल साफ बुडवावा असा आवेश समस्त मराठे सरदारांस चढला असता दादाने काल हरण करुन अंतस्थ सल्ल्याचा संदर्भ लाविला. मोगलांवर कृपावंत झाले. सलूख

झाल्याचे दादाने एकदम जाहीर केले.''[१०] ५ जानेवारी १७६२ रोजी पेशवा लिहितो. ''निजाम अलीशी लढाई असता जेर होऊन त्यांनी मोगलअली रामचंद्र जाधव फूटोन आले. चाळीस लक्षांचा मुलूख निजामापासून घेऊन सल्ला केला.''[११]

अशा प्रकारे निजामाचे राज्य नष्ट करण्याची एक फार मोठी संधी मराठयांना मिळाली परंतु दुर्दैवाने रघुनाथरावांचे राजकारण यावेळी मराठयांच्या आड आले. निजामाचे राज्य नष्ट केल्यास माधवराव आपल्याला काहीच किंमत देणार नाही आणि मराठा राजकारणातून आपला अस्त होईल अशी भिती रघुनाथरावाला वाटत होती आणि म्हणून त्याने केवळ ४० लाखाचा प्रदेश घेऊन निजामास जीवदान दिले आणि युध्द थांबविले तरी पुण्याच्या कारभारात धुमसत असलेला चुलते-पुतण्यांचा संघर्ष जोराने उसळू लागला.

### ३.३ रघुनाथरावांचे राजकारण: आळेगावचा बनाव :-

माधवराव आणि रघुनाथराव यांच्यामध्ये आता कायमची दुफळी निर्माण झाली. परिणामी राज्याचा कारभार योग्य तऱ्हेने होईनासा झाला. कर्नाटकच्या स्वारीवरुन रघुनाथराव माधवरावाला तसाच टाकून परत फिरले. रघुनाथरावाला समजण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. चुलत्या पुतण्यामधील संघर्ष आता अटळ होता.

शेवटी काहीतरी एकदा सोक्षमोक्ष लागला पाहिजे अशी दोन्ही पक्षी मनाची तयारी झाली. ''सप्टेंबर १७६२ मध्ये राघोबाने निजामाकडे सूत्र लावले जानोजी भोसले वगैरे कित्येक मराठे त्याला मिळाले.''[१२] रघुनाथरावांचे आव्हान स्वीकारण्याखेरीज पेशव्यांना गत्यंतर उरले नाही. दोन्ही पक्ष युध्दाच्या तयारीस लागलेले पाहून पुष्कळ सरदारांची त्रेधा उडाली.

''उभय पक्षांनी भावी संग्रामाची सिध्दता ताबडतोब केली. मुरादखान व विठ्ठल सुंदर आपल्या फौजा घेऊन दादांस सामील झाले इकडून त्रिंबकराव रास्ते, मल्हारराव होळकर, पिराजी नाईक निंबाळकर इ. सरदारांसह माधवराव दादासाहेबांच्या रोखे नगरच्या बाजूस चालून गेला.''[१३] ''युध्दातील पहिला संग्राम व ६ रविवार ता. ७ नोव्हेंबर रोजी घोडनदीवर बनून आला.''[१४] ''आपसांतील हा युध्दप्रसंग माधवरावांचे अंत:करणास अत्यंत झोंबला. आपणच पडते घेऊन चुलत्यास समक्ष भेटावे असे त्याच्या मनाने ठरविले त्यासाठी त्याने मल्हारराव होळकरास मध्यस्थीस

पाठविले.''[१५] दरम्यान रघुनाथरावाने ठरविले की लढूनच कायतो शेवटचा निकाल करुन घ्यावा. ''रघुनाथरावाने १२ नोव्हेंबर १७६२ रोजी पेशव्यांच्या आळेगावच्या तळावर चाल केली. मोठा संग्राम घडून आला. माधवरावांची तीन चारशे माणसे ठार झाली काही जखमी झाली. हिच स्थिती रघुनाथरावांच्या सैन्याची सुध्दा होती. पण माधवरावांच्या सैंन्याचा धीर सुटला त्यामुळे माधवराव रातोरात भीमा उतरुन अलीकडे आले. फौजेस अन्नाची विवंचना सुरु झाली. त्यामुळे सगळयांच्या मते समझोता करावा असा विचार होऊ लागला. शेवटी माधवरावांनी दोन्हीकडून मराठा राज्याची हानी होते असा विचार करुन दादासाहेबांस स्वत: भेटले''[१६] निष्कारण संहार टाळण्याकरिता माधवरावाने चुलत्यास शरण जाण्याचा हा जो नम्रतेचा मार्ग स्वीकारला त्यामुळे अल्पकाळ रघुनाथारावाकडे प्रमुखपण आले. माधवरावांसोबतच्या संघर्षासाठी रघुनाथरावाने निजामअलीची मदत मागितली होती.''[१७] ''रविवार ता. २१ नोव्हेंबर रोजी अविंधाच्या व श्रीमंताच्या भेटी झाल्या. ता.२३ रोजी विठ्ठल सुंदर श्रीमंताचे डेऱ्यास मेजवानीस आले उदईक निजाम अली श्रीमंताकडे मेजवानीस येणार उभयतांचा स्नेह चांगला झाला. पेशजी उद्गीरवर घेतलेली ८५ लक्षांची जागीर व दौलताबाद किल्ला देऊन सल्ला केला.''[१८]

भाऊसाहेबाने कष्टाने मिळालेला प्रदेश केवळ या दुहीत सोडावा लागणे हे राष्ट्रीय लांछन होय. निजामाने आपला जितका स्वार्थ साधता येईल तितका साधून घेतला आणि जवळजवळ ६० लक्षांच्या मुलुखाचे दान आपल्या पदरात पाडून घेतले.

## ३.४ निजामाने रचलेल्या कारस्थानाचे स्वरुप व राक्षसभुवनचे युध्द :-

सत्ता हाती येताच रघुनाथरावाने माधवरावाच्या समर्थक सरदारांचा व मंडळीच्या जहागिऱ्या व उत्पन्नाची साधने जप्त करुन आपल्या समर्थकांना वाटली.''[१९] त्यामुळे ही नाराज झालेली मंडळी त्यांच्या पूर्वीच्या जहागी-या प्राप्त करून देण्याचे निजामाने कबूल केले. इतकेच नव्हे तर नवीन जहागीरी व किल्ले, हक्के व मानमरातब देण्याविषयी निजामाकडे बसून त्यांनी कराराच्या याद्या लिहून दिल्या.''[२०] नागपूरकर जानुजी भोसल्यास सातारच्या छत्रपती हाती आल्यावर साताऱ्याच्या गादीवर बसविण्याचे आमिष दिल्या गेले. ''[२१] पेशव्यांच्या विरुध्द भोसले व निजाम यांच्यामध्ये साठचाळिशीचा तह झाला. म्हणजे जी काही नवीन प्राप्ती उभयतांचे प्रयत्नाने होईल तिजपैकी शेकडा

६० ऐवज निजामास व चाळीस भोसल्यास मिळावा. या कराराने भोसले निजामाचे पूर्वीचे वैर माळवून त्यांचे अल्पकाळ सख्य जमले.''[२२]

अशा प्रकारे निजामाने पेशवे व सातारचे छत्रपती यांचाच नव्हे तर साऱ्या मराठी राज्याचा नाश करण्याचा घाट घातला.

१७६३ च्या मे महिन्यात निजामाने पुणे जाळले.[२३]पुण्याचा विध्वंस झाल्यामुळे रघुनाथराव अत्यंत दु:खी बनला आणि तो निजामाविरूध्द सूड घेण्याची संधी पाहू लागला. निजामाचा सूड घेण्याची त्याला इतकी घाई झाली होती की त्याने आपण एकदम हैद्राबादवर हल्ला चढवू, असा प्रस्ताव समोर मांडला, परंतु ज्येष्ठ मराठा सरदारांनी त्याला योग्य संधीची वाट पाहण्यास सांगितले घाई केल्यास उद्दीष्ट साध्य होणार हे ही रघुनाथरावास पटवून दिले.''[२४]

## ३.५मल्हाररावांची अडवणूकीची भूमिका परंतु राक्षसभुवनच्या युध्दात गाजविलेला पराक्रम

निजामाचा बंदोबस्त करण्याच्या मोहिमेसाठी मल्हाररावास बोलविणे केले. परंतु मल्हारराव होळकर कमी अडेलखोर नव्हता. आणखी आपल्याशिवाय आता पेशव्यांचे अडणार असा रंग दिसू लागताच त्याने तरी जास्त आढयता का धरु नये? विठ्ठल शिव देवच्या आमंत्रणावरुन मल्हारराव येत नाही असे दिसताच बापूने आपले वजन खर्च करुन पाहिले.  परंतु मल्हारबा पडला पक्का वस्ताद तो थोडाच बापूला दाद देणार!शेवटी दादाने माधवरावाला मल्हाररावाकडे पाठविले. तेंव्हा कुठे मल्हाररावाला कौल लागला.''[२५] परंतु त्याने माधवरावाकडून १० लक्षाची जादा जहागिर करार करुन घेतल्यावर आपली जागा सोडली.''[२६]    पुण्याचा विध्वंस झाल्यामुळे रघुनाथराव अत्यंत दु:खी बनला आणि तो निजामाविरुध्द सूड घेण्याची संधी पाहू लागला. निजामाचा सूड घेण्याची त्याला इतकी घाई झाली होती की त्याने आपण एकदम हैद्राबादवर हल्ला चढवू असा प्रस्ताव समोर मांडला परंतु इतर जेष्ठ मराठी सरदारांनी त्याला योग्य संधीची वाट पाहण्यास सांगितले. घाई केल्यास मराठे सरदारास फोडून आणण्याचा प्रयत्न सुरु झाला. हे काम मल्हारराव होळकरांकडेच सोपवले. माधवरावाने पूर्वी कबूल केलेल्या दहा लक्षाशिवाय आणखी १५ लक्षाची जहागीर घेण्याचा पेशव्याकडून करार करुन घेऊन त्याने या कामास सुरुवात केली.[२७]

पण अशा खैरातीने जास्तच तूट उत्पन्न झाली. तेंव्हा पेशवा माधवराव व दादासाहेब, सखाराम बापू अशांनी औरंगाबाद येथे एकत्र विचार करुन सर्वावर नवीन पट्टी बसविण्याचा प्रयोग ठरविला. प्रत्येक सरदाराने आपल्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश सरकारांत द्यावा. संकटसमयी राज्याची नड सर्वांनी मिळून निभावली पाहिजे अशी योजना ठरविली. त्यामुळे मोठा घोळ पडला. शेवटी हा प्रकार सर्वांकडून सक्तीने अंमलात आणविला. होळकरांनी मोठे अकांडतांडव केले पण शेवटी त्याने कबूली दिली.''[२८]

बलाढय सरदाराला आपल्या स्वराज्याच्या ध्येयाच्या कामी सहभागी करुन घेण्यासाठी सरंजामदार पध्दत अस्तित्वात आली. राज्यवृध्दीसाठी ती आवश्यक होती पण सरंजामी पध्दत कालांतराने मध्यवर्ती सत्तेला डोईजड होते.हयाचा अनुभव मराठी सत्तेला यावयास लागला. निजामाने दिलेले आव्हान मराठयांनी स्वीकारले.

''खलबत सुरु झाले निजामाचे यश आपआपसांतल्या फुटीवर अवलंबून आहे ही गोष्ट सर्वाच्या निदर्शनास आली. तेंव्हा फुट भरुन काढण्याचे काम सर्वानुमते मल्हारराव (काका) कडे आले.मागे हे म्हटलेले आहे. मल्हाररावांनी जानोजी भोसले भवानराव प्रतिनिधी, पिराजी नाईक, निंबाळकर व घोरपडे इत्यादिकांच्या समजुती सामदामादि चतुर्विध उपायांनी  फुटलेले सरदार माघारी फिरविले. सर्वांची हमी आपण स्वत: अंगिकारली आणि सर्व मराठी दळ एकत्रित केले. आणि सर्व सैन्य राक्षसभुवन येथे निजामासमोर आले.

१०ऑगस्ट १७६३ मध्ये राक्षसभुवन येथे लढाई होवून त्यात निजामाचा वाईट रितीने पराभव झाला.''[३०] पानिपतच्या पराभवाने खचून न जाता मराठयांनी पुन्हा एकदा कंबर कसली या कामात श्रीमंत थोरले माधवरावसाहेब व सुभेदार मल्हारराव होळकर हे अग्रगण्य होते.''[३१]

राक्षसभुवनचा प्रसंग आटोपल्यानंतर माधवरावाचा विचार उत्तरेचा कारभार हाती घ्यावा असा होता. पण पैशाच्या अडचणीमुळे प्रथम त्याला कर्नाटकात (हैदर) जाणे जरुर भासले. त्याने शिंदे-होळकरांचे सख्य जुळवून तेच उत्तरेचे माहीतगार म्हणून त्यास त्या कामगिरीवर रवाना केले.''[३२]

इ.स. १७६१ ते १७६६ पर्यंत म्हणजे आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी उत्तरेच्या राज्याला समर्थपणे धरुन मराठयांनी राज्याची घडी पुन्हा पूर्ववत बसून दिली.''[३३]

## ३.६ कुराचे युध्द - इंग्रजांकडून पराभूत ३ मे १७६५

### अहिल्याबाईचा हया युध्दातील सहभाग :-

भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षक मराठे पानिपतामुळे विस्कळीत झाले. पानिपताच्या तिसऱ्या युध्दात मराठयांचा जो पराभव झाला त्यामुळे उत्तर हिंदुस्थानातील मराठयांचे वर्चस्व नष्ट झाले. परंतु अब्दालीस भारतातील इतर सत्ताधिशांची मदत असूनसुध्दा त्याला मराठयांचा पराभव करणे किती कठीण गेले हे त्याने ओळखल्याने त्याने पुन्हा भारताकडे फिरुन पाहिले नाही. वि.दा सावरकर म्हणतात, ‘‘पानिपतात मराठयांनी लढाई गमावली (हरले) पण युध्द जिंकले’’[३४]

अहमदशहा अब्दाली उत्तरेतून निघून गेल्यानंतर राजकारणात नवीन प्रवाह निर्माण झाले ते असे.

अ) दिल्लीचा पातशहा हतबल होत्साता कोणाचे सहाय्य मिळेल या विवंचनेत होता.

आ) बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांताची ‘‘दिवाणी’’ कंपनी सरकारच्या ताब्यांत गेली होती. एकास नबाब करावे, दुसऱ्याची उचलबांगडी करावी आणि पुन्हा मागचाच बरा म्हणून स्थापावे असा प्रकार तेथे चालू होता.

इ) नागपूरकर भोसले त्या प्रांतावर (बंगालवर) आपला हक्क सांगतच होते. बुंदेलखंडात बुंदेले आपले स्वातंत्र्य शोधू लागले होते.

ई) जाट अंतर्वेदीत व आजूबाजूस हातपाय पसरुन होते.

उ) यमुनेच्या पलीकडे रोहिले दंड ठोकून उभे होते आणि

ऊ) रजपुतान्यातील रजपूत मराठयांशी, पूर्वीचा भाव विसरुन निराळयाच दृष्टीने वर्तु लागले होते.’’[३५]

असे उत्तरेकडील राजकारण तयार झाले. मराठयांचे राज्य संपले असा आभास उत्तरेत पाहिले चार-दोन महिन्यापर्यंत निर्माण झाला. याच सुमारास उत्तरेत रजपुत राजे प्रबळ बनले. जयपुरचा माधोसिंग हा त्याचा प्रमुख नेता होता. आणि तो मराठयांचा कट्टर शत्रू होता परंतु ‘‘बुंदी प्रांतात

मांगरोलभटवाडा येथे ता.२९ व ३० नोव्हेंबर सन १७६१ दोन दिवस शिंदे होळकरांनी भीषण संग्राम करुन माधोसिंग व इतर रजपूत यांचा फन्ना उडविला. तेणे करुन मराठे मेले नाहीत अशी सर्व हिंदुस्थानची खात्री झाली.[३६]

आणि याच कालखंडात मल्हारराव होळकर यास दक्षिणेत परत बोलाविल्यामुळे मराठे बरीच वर्षे उत्तर हिंदुस्थानातील समस्यांकडे लक्ष देऊ शकले नाहीत याचाच फायदा इंग्रजांनी बंगालमध्ये घेतला.

दिल्ली येथील मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यामुळे एके काळी असलेले सुभेदार वंशपरंपरने नबाब बनण्याच्या मार्गास लागले. बंगाल हा अशा प्रकारचाच सुभा होता. आलिवर्दीखान व सिराजउद्यौला हे एकामागून एक नबाब झाले. सिराजउद्यौला कारकीर्दीत त्याच्या सेनापतीस फितवून ईस्ट इंडिया कंपनीने बंगालच्या राजकारणात प्रवेश करुन घेतला मिरजाफरास गादीवर बसून सर्व सूत्रे कंपनीने आपल्या हातात घेतली. पुढे मिरजाफरास गादीवरुन काढून मीरकासीमास कंपनीने गादीवर बसविले.

मीरकासीम कर्तबगार होता. त्याने आपली राजधानी मुर्शिदाबादहून मोंघीर येथे नेली. युरोपियन धर्तीच्या कवायती फौजा उभारण्यास सुरवात केली. कंपनीचे नोकर खाजगी व्यापार करुन सवलती मिळवत होते. त्यामुळे स्थानिक व्यापार बंद पडू लागले. म्हणून मीर कासीमने सर्वच व्यापारावरील कर उठविला त्याचा कंपनीच्या व्यापारावर अनिष्ठ परिणाम झाला. कंपनीने त्यामुळे मीर कासीमला नबाब पदावरुन दूर केले पुन: पुन: मीरजाफरास गादीवर बसविले. मिरकासीम स्वस्थ बसणारा नव्हता. ''आपल्या सारख्या स्थितीत असणाऱ्या दिल्लीच्या बादशहास व आयोध्येच्या सुजाउद्यौला नबाबास मिळून त्रिवर्गाने पाटणावर स्वारी केली बक्सार येथे सन १७६४ मध्ये लढाई होऊन त्रिवर्गाचा पराभव झाला.''[३७]

चार दोन महिन्यात बादशहा व वजीर असे कोसळून पडले. हा प्रकार सुजाउद्यौलाच्या जिव्हारी लागला. संकटात त्याला पूर्व परिचित शिंदे होळकरांचे स्मरण झाले. सुजाउद्यौलाने आपला वकील मल्हारराव होळकरांकडे पाठविले. मल्हारराव होळकर पत्रात लिहितात.

''अंतर्वेदीच्या बंदोबस्तासाठी अनुप शहरी आलो तेथे नबाब सुजाउद्यौला येऊन भेटले. कित्येक प्रकारे निखालस भाव बोलून साहय व्हावयाचा करार करुन गेले. या ऊपर इटाव्यास आलो. तेथील काम उरकून गंगातीरी जाणार''[३८]

अशा प्रकारे मल्हारराव व सुजाउद्यौला हयांच्यात करार होऊन मल्हारराव सुजाउद्यौलाच्या मदतीस जाण्यासाठी तयार झालेले होते. याच दरम्यान म्हणजे ११ फेब्रुवारी १७६५ या दिवशी इंग्रजांनी अलाहाबादचा किल्ला काबीज केला. मल्हाररावांनी ओळखले आता इंग्रज पेटलेले आहेत. पुन्हा लढाई अटळ आहे. तयारीत सतत असले पाहिजे. त्यांनी त्या दृष्टीने पाऊले उचलायला सुरवात केली. सुरक्षित ठिकाणी पण संभवनीय रणक्षेत्राच्या जवळ तोफांच्या दारुचा आणि युध्दाला आवश्यक सामग्रीचा पुरवठा करणारे केंद्र असणे आवश्यक होते. सुजाउद्यौलाला मदत करण्याच्या दृष्टीने मल्हाररावांनी तयारी सुरु केली. यावेळी अहिल्याबाई होळकर स्वारीत होती. तिचा नाद तीर्थयात्रेचा मथुरा वृंदावनकडे ती देवदर्शन करु लागली हा प्रकार सासऱ्यास खपला नाही. त्याने बहुत रोषाची पत्रे बाईस लिहून ताबडतोब ग्वाल्हेरकडे जाऊन लष्कराची तयारी करण्याची आज्ञा केली. [३९]

अहिल्याबाईनी देवदर्शन आटोपते घेतले आणि मल्हाररावांच्या आज्ञेनुसार युध्दसाहित्याची निर्मिती व पुरवठा करण्यास सज्ज झाल्या अहिल्याबाईंना लष्कराची तयारी उत्तमरित्या करण्याच्या दृष्टीकोनातून मल्हाररावांनी दारुगोळा पुरविण्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे पत्र लिहिले ''तुम्हास दरमजल ग्वाल्हेरीस जाण्याविषयी अगोदर पत्रे लिहिली त्याप्रमाणे कुच दरकूच ग्वाल्हेर पर्यत जाणे आणि तेथे गेलियावरी पाच सात मुक्काम करुन थोरल्या तोफेचे गोळे हजार पाचशे पावेतो व जंबुरियाचे गोळे होतील तितके जरुर करवावे याशिवाय जंबुरेही शंभर पावेतो कारखाना लावून तयार करवावे बाणाच्या पातिका शेरेदारु मावे ऐसी पतिका उत्तम निवडक पाहून ज्या मिळतील त्या घेणे ये विषयी हयगय नसावी, जातेसमयी तुम्हास जंबुरयि करता सांगितले आहे. त्याप्रमाणे गोळयांचा साचा करुन जंबुरे जरुर करविणे ग्वाल्हेरी पलीकडे तुम्ही जाल, तेव्हा, तोफखान्याचे खर्चाची बेगमी एक महिन्याची करुन मग पुढे तुम्ही जाणे''[४०]

अशा प्रकारे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना युध्दसामग्रीची व्यवस्था कशा प्रकारे करावी हे सांगितलेले दिसून येते. त्याचप्रमाणे तोफा पाठवतांना कशी दक्षता घेतली जावी याचे मार्गदर्शन खालील पत्रावरुन दिसून येईल.

''तोफा तुम्ही ग्वाल्हेरीस पाठवाल, त्या समयी बैलास चारा,, चंदी गडी माणसाच्या रोजमुरीयाची वगैरे नेमणूक देणे आणि आम्ही येथून ग्वाल्हेरीस सरंजाम पाठविला आहे. त्याची सुमारी थोरलेतोफांचे गोळे ४०००, जंबुरीयाचे गोळे १००००, बाणांच्या अणकुचीदार १००० एकूण पंधरा हजार पाठविले आहे. त्यांच्यात महिना मान पावेतो रा. गोविंद शामराव लिहून पाठवितील त्याप्रमाणे ऐवजाची बेगमी करुन देणे'' [४१] अहिल्याबाईनी मल्हाररावांच्या सल्ल्याप्रमाणे युध्दसामग्रीची तयारी केली. मल्हारराव इंग्रजांशी युध्द करण्यास तयारच होते. दरम्यान अहिल्याबाईने लष्कर व युध्द साहित्य मल्हाररावांकडे पाठविल्यानंतर तो शुजाच्या सैन्याला येऊन मिळाला.[४२]

इंग्रजही युध्दाकरता सज्ज झालेले होते. रोहिले मराठे व सुजा या त्रिवर्गाच्या फौजा आपल्यावर चालून येतात हे कळल्याबरोबर इंग्रजांनी अलाहाबादेवरुन कूच केले.[४३]

अलाहाबादेवरुन कूच करुन फ्लेचरच्या नेतृत्वाखालील इंग्रजी सैन्याने मल्हाररावावर चढाई केली. इंग्रजांचा उत्कृष्ट तोफखाना व शिस्तबध्द सैनिक यांच्यासमोर आपला टिकाव लागणार नाही हे आळखून मल्हाररावानी गनिमी तंत्राचा उपयोग केला ''मल्हाररावांच्या टोळयांनी त्यांच्या आजुबाजूस घिरटया घालून सभोवारचा प्रदेश इतका उध्वस्त करुन टाकिला की दाणा वैरणीची आपणास पंचाईत पडेल अशी इंग्रजांस धास्ती वाटू लागली [४४] पण अखेर ता.३-५-६५ रोजी कुराचे मैदानात इंग्रजांचा तोफांचा मारा सुरु झाला. इंग्रजांच्या तोफांपुढे व शिस्तबध्द सैन्यांपुढे मल्हाररावांचा गनिमी कावा अपयशी ठरला. मल्हारराव व शुजा यांचे सैन्य काल्पीपर्यंत मागे आले.[४५] अशा प्रकारे मल्हाररावांस इंग्रजांपुढे माघार घ्यावी लागली. अलाहबादेतून त्यांस हुसकावून देणे तर दूरच परंतु उलट त्यांनी मल्हाररावांस काल्पीवरही टिकू दिले नाही.

''ता.२२ मे राजी फ्लेचरने दोन निवडक तुकडयांनिशी यमुना ओलांडून काल्पीवर होळकरांचा तळ होता. तेथून त्यास हुसकून दिले. मात्र आणखी मराठयांचा पाठलाग करीत पुढे जाणे धोक्याचे वाटून फ्लेचर मागे फिरुन अलाहबादेस परत गेला ''[४६]

एतद्देशीय सत्तांना इंग्रज भारी झाले. पाश्चात्य तोफांपुढे गनिमी कावा निरुपयोगी ठरला. पानिपतावर याच बाबतीत मल्हाररावांचा भाऊसाहेबांशी विरोध बनला पण आता कुराच्या मैदानावर त्यांना प्रत्यक्ष प्रचिती आली.

‘‘वास्तविक मराठयांनी बदलत्या परिस्थितीशी समन्वय साधून भाला व तलवार ही जुनी शस्त्रे कालबाहय झालीत याची जाण ठेवून नवीन पध्दत शस्त्रे तोफा व बंदुका आत्मसात करायला पाहिजे होत्या. मल्हाररावांसारख्या श्रेष्ठ सेनानीला हे कळले नसेल असे म्हणता येणार नाही.पण वय झाल्यामुळे त्यांच्यात पूर्वीची उमेद राहिली नव्हती. त्यावेळी मल्हाररावांचे वय ७२ वर्षाचे होते. [४७]

कुराच्या मैदानावरील या लढाईत मल्हाररावांची फजिती झाली असे बऱ्याच इतिहासकारांनी म्हटले आहे. श्री कृ.वा. पुरंदरे यांनी कोडीत (जि. पुणे ) अजे दप्तरातील एका पत्राद्वारे याचे खंडन केले आहे. ‘‘होळकरांनी या लढाईत झुंज मातब्बर दिली व शत्रूचेही (इंग्रजांचे) बरेच नुकसान केले. असे त्यांनी दाखवले आहे. तसेच ‘‘हजार बाराशे घोडे चारशे उंट, फिरंगी दोन पलटणे, बाणाच्या कैच्या व वीस पंचवीस निशाणे पाडाव करुन आणीली’’[४८] यावरुन असे म्हणता येईल कि वय झालेले असले तरीही मल्हाररावांनी कुराच्या युध्दात उत्तम कामगिरी केलेली दिसते वयाचा व पराक्रमाचा संबंध नसतो हे त्यांनी दाखवून दिलेले आहे.कुराच्या युध्दातून खालील बाब निषन्न झाली. ‘‘ श्रीप्रयागी किल्ल्यांत अंमल फिरंग्यांचा आहे कुरजहानाबादचा मुलुख त्यांनी बादशहास भक्षावयास दिला तो घेऊन बाहुल्याप्रमाणे पातशहा आहेत. दिल्लीकडे पुढे जाण्याचा जोर नाही. [४९] हा इत्यर्थ या संग्रामातून निष्पन्न झाला.

तसेच हया लढाईचे वर्णन खालीलप्रमाणे केले जाते.

‘‘होळकरांचे व इंग्रजांचे युध्द यमुनापार झाले. इंग्रजांपाशी तोफांचा मारा फार, तेंव्हा निघाले, काल्पीस आले. इंग्रजाने गाजीउद्यीन व सुजा यांचे लष्कर लुटले [५०] १७६५ सालीच क्लाईव्हने बादशहापासून बंगालची दिवाणी मिळवली. याप्रमाणे बंगालात केलेला हा प्रवेश मराठयांना फलदायी झाला नाही गनिमी कावा हा सद्य परिस्थितीत निरुपयोगी आहे हे पुन्हा एकवार सिध्द झाले. आाधुनिक शस्त्रास्त्रांची आणि आधुनिक युध्दपध्दतीची गरज हया युध्दाच्या निमित्ताने मराठयांना निर्माण झाली.

## ३.७ मल्हाररावांचा मृत्यू :-

कुराच्या युध्दात अपयश आल्यानंतर मल्हाररावांचे लक्ष आगामी लढयांचे डावपेच आखण्याकडे होते. त्यासाठी मल्हाररावांना शिंद्यांच्या साहाय्याची गरज भासून त्यांनी महादजीला

आपल्याकडे बोलावले आणि महादजीही दतियाकडे मल्हाररावास भेटण्यास गेले दरम्यान ''दादाची स्वारी चाळीस हजार फौजेनिशी दक्षिणेतून निघून स. १७६६ च्या एप्रिलात झाशी जवळ आली तो शिंदे होळकरांनी बंदेलखंडाचा अंमल बसवून गोहदच्या जाठावर चढाई सुरु केली होती. [५१] अशा प्रकारे मल्हाररावांनी महादजी शिंद्यांच्या मदतीने बुंदेलखंडावर अंमल बसविला होता. आणि त्यांनी गोहदच्या जाठावर चढाई केली होती. कुराच्या लढाईच्या अगोदर ज्याप्रमाणे दूरदर्शीपणे लढाईची आधीपासून तयारी मल्हाररावांनी केली होती त्याचप्रमाणे गोहदच्या जाठावर स्वारी करण्याआधी त्यांनी पूर्वतयारी केली होती. आणि युध्दाची व्यवस्थाही करण्याची जबाबदारी आधीप्रमाणे आहिल्याबाईवर सोपवली होती.''गोहद कराकडील गढीचा जमाव अधिकार पूर्ती मनांत आणून मग तोफखाना पाठवीत जाणे शहसर्वयागुंता न जाणे दबावाने जितके काम हाईल तितके काम करीत जाणे तोफखाना आपल्या पासून कोणाच्या भरवशावर सर्वथा लांब पाठवावयाची तजवीज न करीत जाणे तोफखान्याची आब राखून आपला वसा साधेतो. करीत जाणे. ''[५२] मल्हाररावांनी आहिल्याबाईस युध्दसाहित्याच्या सुरक्षिततेविषयी सांगितलेले दिसते. त्याचप्रमाणे योग्य निर्णय घेऊन शस्त्रास्त्रांसबंधी निर्णय घेण्याची सुचनाही केलेली दिसते व युध्दाचे साहित्य तसेच पावसाळयाआधी कशी तयारी करुन ठेवावी या बद्दल उपरोक्त पत्रातून मार्गदर्शन केले आहे. त्याचप्रमाणे युध्दसाहित्याबरोबरच द्रव्य व्यवस्था करण्याची जबाबदरी मल्हाररावांनी अहिल्याबाईंवर सोपविली होती. त्याचे उदाहरण पुढील प्रमाणे देता यईल

गोहदकराकडील एक दोन गढया मातब्बर घ्यावयाच्या होत्या. ''तेथे तोफा लावून ठाणी खाली करुन घेवून रा. गोविंद शामराव यांचा अंमल पेशजी प्रमाणे चालत आला सांप्रत मोहिम जायची आहे. लोकांस खावयास द्यावे लागते. त्याकरिता खेमसी करमी यांजपासोनला करात रुपये लक्ष २००००० घेऊन हे पत्र तुम्हास हुंडीदाखल लिहिले असे तरी पत्र पावताच सदरहू दोन लाख रुपये सावकार मजकूर याजला देऊन पावती घेणे. चिठ्ठी जो समयी पावाल तेच क्षणी भरती करुन देणे ये विषयी हयगय करु नये'' [५३] अशा प्रकारे मल्हाररावांनी संपूर्ण तयारी निशी गोहदच्या जाटावर चढाई केली होती. हयाच दरम्यान रघुनाथरावांच्या नेतृत्वाखाली उत्तर हिंदूस्थानची मोहीम सुरु होऊन रघुनाथराव हे झाशीजवळ आपल्या ४० हजार सैन्यासह पोहोचले होते. ''झाशी येथे काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर तेथून भेलसा, भांडेर, टेहर, वेलोरी येथे मुक्काम करीत १८ मे १७६६

रोजी राघोबादादा आलमपूर येथे पोहचला.[५४] लगेचच मल्हारराव राघोबादादांना भेटायला गेले. "शिंदे घराण्याचा सरंजाम महादजी शिंदेस मिळवून देण्याकरीता मल्हाररावाने रघुनाथरावांची भेट घेतली. [५५] रघुनाथरावंची भेट झाल्यानंतर दोनच दिवसांनी वैशाख शु. ११ मंगळवारी, २० मे १७६६ रोजी झाशीजवळ आलमपूर येथे मल्हाररावांचा मृत्यू झाला." [५६] मातुश्री दारकाबाई व बनाबाई यांनी सहगमन केले अहिल्याबाई समीप होती तिने पुत्र मालेरावास इंदुरी पत्र पाठवून धीर दिला. एकच पुत्र खंडेराव पूर्वी कुंभेरीवर वारला दोघी मुली उदाबाई वाघमारे व सीताबाई हयात होत्या. [५७] जवळचा नातलग तुकोजी होळकर हाताखाली वाढविलेला होता. त्याने अहिल्याबाईच्या हुकमतीखाली पुढे होळकरशाहीचा कारभार चालविला. मल्हाररावांची स्त्री हरकूबाई म्हणून खांडाराणी होती. तिनेही पुढे कारभारात भाग घेतला.

"अहिल्याबाई त्यांची सून होती. आपल्या वंश परंपरेला अनुसरुन त्यांनी आलमपूर मध्ये सन १७६७ ते १७७५ च्या मध्ये स्वत:च्या देखरेखीखाली एका भव्य स्मारकाची उभारणी केली. "[५८] हे स्मारक अत्यंत भव्य व कलात्मक आहे. हया स्मारकामध्ये मराठा-मुगल शैलीचे मिश्रण आहे. हया स्मारकांच्या रुपाने अहिल्याबाईंना मल्हाररावांच्या प्रती वंदनीय भावना प्रगट केलेली आहे.

"रघुनाथरावांनी मल्हाररावांच्या अंत्यसंस्कारावर व इतर विधीवर २ लाख रुपये खर्च केले मल्हाररावांच्या सन्मानार्थ आलमपूरचे नाव मल्हारनगर ठेवले. [५९] पेशवा माधवरावाने, विठ्ठल शिवदेव यास पाठविलेल्या पत्रात मल्हारजीची योग्यता मोजक्या शब्दात व्यक्त केली आहे. "मातब्बर सरदार मोठया दाबाचे होते. त्यांचा भावी पदार्थ तसाच होता. सरदार जुन्यांपैकी तेवढे होते. शिंद्यांची तो सरदारी मोडीस आली. होळकर तिकडे होता. तेणे करुन वचक होता." [६०] पेशव्यांनी त्यांच्या समाधीकरिता १५ गावाचे उत्पन्न लावले."[६१]

मल्हारराव हे आपल्या काळातील महान वीरांपैकी एक होते. थोरले बाजीराव नानासाहेब, माधवराव याच्या कारकीर्दीत झालेल्या बहुतेक प्रसिध्द लढायात ते जातीने हजर होते. मल्हारराव हे शूर व मुत्सद्दी असून चतुर राजनीतिज्ञ सुध्दा होते. मिळालेल्या संधीचा उपयोग करुन घेण्यामध्ये ते माहिर होते तसेच मराठेशाहीचा विस्तार व दरारा उत्तर हिंदूस्थानात बसविण्यास मल्हाररावाचे पराक्रम बरेच कारणीभूत आहेत. ते त्या काळातील प्रसिध्द राजनीतीज्ञ होते म्हणूनच आपल्या मागे ते करोडो

रुपयांची संपत्ती व विशाल राज्य अहिल्याबाईंच्या हाती सोपवू शकले. त्यांच्या मरण्यासमयी त्यांच्या राज्याचे उत्पन्न ७५ लक्ष होते. - [६२]

## ३.८ अहिल्याबाई व मल्हारराव :-

मल्हाररावांच्या मृत्युचे अहिल्याबाईस तीव्र दु:ख होणे स्वाभाविकच होते. ''सासऱ्याच्या मृत्युमुळे त्यांची दौलत सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर आली. पतीच्या मृत्युनंतर जवळपास १२ वर्षापर्यंत सासऱ्याच्या हाताखाली राज्यप्रशासनात ती तरबेज झाली होती. खंडेरावांच्या मृत्युनंतरही तिचे नाव कागदपत्रांतही लिहिले जाऊ लागले.-[६३]

लष्करी प्रशासनाचा अहिल्याबाईंना दांडगा अनुभव आलेला होता. मल्हाररावाच्या मार्गदर्शनाखाली अहिल्याबाईंना राजकीय लष्करी, राज्यकारभार विषयक शिक्षण प्रशिक्षण, अनुभव मिळालेले होते. त्यावरुन अहिल्याबाईचे राजकारणी शिक्षण कसकसे विकसित होत गेले. हे खालील पत्रावरुन लक्षात येईल.

## ३.९ श्री मल्हारराव होळकर हयांची अहिल्याबाईस पत्रे :-

### ३.९.१ राज्यकारभार विषयक पत्र :-

चिरंजीव अहिल्याबाई प्रती मल्हारजी होळकर आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष आपणास पत्र श्रीमंताचे की कुसाजी पाटील शिंदे मौजे पिपरंखेड येथील संबुगीर गोसावी याने कुसाजी मजकुर याचा पुतण्या व सेत व मळे व घर जप्त केले म्हणून कळले त्यास वाफगावी व जेथे मुले माणसे त्याची असतील तेथे तुम्ही गोसावी यासी ताकीद उत्तम प्रकारे करुन इसम मजकुरांची जप्ती शेत मळे यांची जे असतील त्याची ताकीद करुन सोडून द्यावी त्यावरुन हे पत्र लिहिले आहे. तरी वाफगावी शिंदे मजकुराचा पुतण्या आहे. तो सोडून देणे व पिंपरखेडी गोसावी याने माणसे कैद केली असतील ती माणसे व सेत मळे यांची मोकळिक करणे ऐसी ताकीद करुन सोडून देवविणे १५ बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद मार्तुब सुद: (ता. ३डिसेंबर सन १७६२) [६४]

वरील पत्रावरुन असे लक्षात येते की मल्हारराव हे आपल्या राज्यापासून दूर असले तरी राज्यातील प्रत्येक घडामोडीकडे त्यांचे लक्ष होते. त्याचबरोबर राज्यातील प्रजेवर कोणत्याही अन्याय होणार नाही हयाची दक्षता मल्हाररावांची ठिकाणी दिसते आणि हाच संस्कार पुढे अहिल्याबाईंनी देखील प्रजेवर अन्याय होणार नाही अशाच पध्दतीने राज्यकारभार केलेला दिसतो. त्याचप्रमाणे मल्हाररावांचा अहिल्याबाईवरील विश्वास व्यक्त होतो. व मल्हाररावांनी आपल्या हयातीतच राज्यकारभारविषयक जबाबदाऱ्या अहिल्यांबाईंवर टाकण्यास सुरवात केल्यामुळे अहिल्याबाई राजकारण कुशल बनत गेल्या.

### ३.९.२लष्करी शिक्षणविषयक पत्रे :-

इंग्रजांच्या विरोधात सुजाउद्यौलास मदत करण्यासाठी मल्हारराव गेले असताना त्यांना मदत करण्याचे कार्य अहिल्याबाई अतिशय चोखपणे करीत होत्या. मल्हारारावांनी अहिल्याबाईस दारुगोळा पुरविण्याच्यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना केल्या होत्या.

१. ता.३१ जानेवारी सन १७६५ चिरंजीव अहिल्याबाई होळकर यांसी प्रती मल्हारजी होळकर आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करणे विशेष तुंम्हास दरमजल ग्वाल्हेरीस जावयाविषयी अगोदर पत्रे लिहिली आहेत त्याप्रमाणे कूच दरकूच ग्वाल्हरेपर्यंत जाणे आणि तेथे गेलियावरी पांच सात मुक्काम करुन थोरल्यातोफेचे गोळे हजार पाचशेपावेतो व जंबुरियाचे गोळे होतील तितके जरुर करवावे याशिवाय जंबुरेही शंभरपावेतो कारखाना लावून तयार करवावे बाणाच्या प्पालका शेर दारु मावेपालेक उत्तम निवडक पाहून ज्या मिळतील त्या घेणे, त्याविषयी हयगय नसावी जातेसमयी तुम्हास जंबुरियाकरिता सांगितले आहे. त्याप्रमाणे गोळयाचा साचा करुन जंबूरेजरुर करविणे,ग्वाल्हेरी पलिकडे तुम्ही जाल तेंव्हा तोफखान्याचे खर्चाची बेगमीएक महिन्याची करुन मग पुढे तुम्ही जाणे छ. ६ साबान बहुत काय लिहिणे (पैवस्त छ १२ साबान मु. आग्रा)[६५]

२. तोफा पाठविताना कशी दक्षता घेतली जावी हयांचे मार्गदर्शन व बैलसाठी चारा व घोडयासाठी चंदी हे तोफा नेण्याच्या कामी महत्वपूर्ण घटक त्यामुळेच बैल आणि घोडा हयांच्या खाण्याविषयीची दक्षता हे सर्व खालील पत्रावरुन दिसून येईल.

ता.(१० फरवारी सन १७६५) चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर आशिर्वाद उपरी येथील कुशल माघ शुध्द ५ मुक्काम दिल्ली जाणून यथास्थित असे विशेष राजश्री गोविंद शामराज यांनी लिहून पाठविले की किल्यावर तोफा उतरावया करिता लिहून पाठविले आहे. त्याचप्रमाणे तोफांचा सरंजाम नाही त्याची आज्ञा काय,म्हणोन त्यावरोन येथोन लिहोन पाठविले की तोफा किल्ल्यावरील न आणणे आम्ही येथून तोफा थोर, चार पाठविल्या आहेत, त्या शहरांत ठेवणे आणि तोफा तुम्ही ग्वाल्हेरीस पाठवाल त्यासमयी बैलांस चारा, चंदी गाडीमाणसांच्या रोजमुरियाची वगैरे नेमणूक देणे आणि आम्ही येथून ग्वाल्हेरीस सरंजाम पाठविला आहे. त्याची सुमारी :- थोरेले तोफांचे गोळे ४०००, जंबुरियाचे गोळे १००००, बाणांच्या गोळया अणकुचीदार १०००, एकूण पंधरा हजार पाठविले आहेत. त्यांच्यात महिना मान पावेतो रा. गोविंद शामराव लिहून पाठवितील त्याप्रमाणे ऐवजाची बेगमी करुन देणे. इकडील वर्तमान तर छ. १८ साबानी नजीबखान पुत्रासह डेरीयास भेटीस आला त्याची आमची भेट जाहली उपरांतीक जाटासी व गाजुद्दीनखान याचे भेटीस गेले. तेही भेटले पुढे जे होईल ते लिहून पाठवू तुम्ही हया लिहिण्याच्या प्रमाणावर मुक्काम करुन राहणे. दरमजल जाणे सलूख यथास्थित ठरलिया उपरीच इकडील बंदोबस्त सत्वरच होईल. जाणिजे छ. १९ साबान बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद मार्तब सुदा (पैवस्त छ २५) साबान माघ मासे [६६]

३. वरील पत्रात मल्हाररावांनी अहिल्याबाईना तोफखान्याच्या संदर्भात दक्षता कशी घ्यावीहया संदर्भात मार्गदर्शन केले पण अहिल्याबाईच्या लक्षात आले तोफखान्याची सोय ग्वाल्हेरात होणे शक्य नव्हते. त्यासाठी निराळया जागेची शोधाशोध सुरु झाली. बराच तपास केल्यावर सिरोज गावी तोफखाना ठेवणे सोयीचे होईल आणि ते शक्यही आहे याची खात्री झाली. मल्हाररावांचा सल्ला घेण्याची यावेळी त्यांना आवश्यकता वाटली नाही तेवढा वेळही नव्हता. मल्हाररावांची परवानगी येईपर्यत तोफखान्याचा बारदाना कुठेतरी ठेवणे हे काही सोपे नव्हते. अहिल्याबाईंनी बेलाशक तोफखाना सिरोजला हालवला नंतर मल्हाररावांना हा बदल कळविला. लगेचच दिल्लीहून मल्हाररावांनी अहिल्याबाईंना लिहिले.

"ता. २३-२-१७६५ चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पोचले लेखनार्थ अवगत झाला ग्वाल्हेरीस तोफखाना ठेवावयाची सोय नव्हती. त्याकरिता शिरोंजेस घेऊन जातो तेथे तोफखाना ठेवू म्हणून लिहिलेऐसियासी तोफखाना शिरोजी ठेवनू तेथे बैलांस चारा दाण्याची सोयउत्तम प्रकारे करुन देऊन तोफासुध्दा ठेवणे आणि तुम्ही इंदुरी जाणे तेथे गेलियावरी सेधव्याचा व सुलतानपूरचा बंदोबस्त जरुर करणे वरकरड इकडील मजकूर तुम्हास लिहिला. प्रस्तुत दिल्लीहून कूच झाले. अंतर्वेदीतून बुंदेलखंडाचे सुमारे येत असो. पुढील मनसुबा उपयोगी पाहू तैसा घडून येईल आणिजे छ. २ रमजान बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद मोर्तब सुद - (पैवस्त छ १३ रमजान फाल्गुन मास मुक्काम थोरली नदी ) [६७]

वरील पत्रावरुन असे म्हणता येईल की ज्यावेळेस अहिल्याबाई परिस्थितीनुरुप स्वत: एखादा महत्वपूर्ण निर्णय घेतला तेंव्हा मल्हाररावांनी त्या निर्णयाची अवहेलना केली नाही त्यामुळेच पुढील काळात अहिल्याबांईचा स्वत:वरील विश्वास वाढून स्वनिर्णयाचीत्यांना सवय लागली आणि राज्यकारभार करण्यास त्या तरबेज होत गेल्या.

४. मल्हाररावांनी अहिल्याबाईंना केवळ युध्दसाहित्याची तयारी, त्याची दक्षता हयागोष्टी शिकविल्या नाही तर सर्व युध्द साहित्याची तयारी पावसाळयाच्या अगोदर कशी करावायाची हे सुध्दा सांगत ते खालील पत्रावरुन लक्षात येईल.

ता. २३-२-१७६५ चिरंजीव अहिल्याबाई यांसी प्रती मल्हारजी होळकर आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणेन स्वकीय लेखन करीत जाणे विशेष तुम्हांसमागमे ताजू तोफखाना घेऊन

आला आहे. त्यास तोफखाना झाडून सिरोजेस येऊन, तेथे बैलांस चारा, पोटभर व चंदीची बेगमी करुन देऊन मग तुम्ही पुढे जाणे राजश्री चिमणाजी गोविंदमामलेदार यांस बैलाच्या चाऱ्याविषयी व तोफखान्याच्या डागडुजीकरिता ताकीद करुन तोफांची झाडून तयारी

करुन ठेवणे येविषयी असावधता नसावी ते प्राती लवकरच येतो तिकडे आलियावरी तोफांचे प्रयोजन लागेल ते समयी पत्र जाईल ते घडीस स्वार होऊन जलद येऊन पावे (पर्जन्य काल यास्तव) दोर, दोरखंड, कान वगैरे सामान सांभळून सिध्दता करुन ठेवावी बैल ताजे जरुर

राखणे तोफखान्याचे तयारीविषयी ताजुस लिहिले आहे. आणि तुम्हीही ताकीद करुन बैलाची वगैरे तरतूद चांगली करविणे जाणिजे छ. २ रमजान बहुत काय लिहिणे, हे आर्शिवाद [६८]

थोडक्यात पावसाळया अगोदर यध्दसाहित्याच्या तयारीविषयक पत्र आहे.

५. दिल्लीहून कुच करुन निघालेले मल्हारराव अनूप शहराजवळ कर्णवास येथे पोहोचले येथे आल्यावर त्यांच्या लक्षात आले, अब्दाली येणार अशा वार्तामुळे भोवतालचे वातावरण शांत नव्हते. त्यांनी अहिल्याबाईंना कळविले की तुम्ही ग्वाल्हेरी मुक्काम करुन असावे आम्हीही लौकर त्याप्रांती येतो.

त्यावेळी अहिल्याबाई ग्वाल्हेरास होत्या. गोहदचे राज्य तेथून अगदी जवळच होते मल्हाररावांच्या मनात गोहद करांचे पारिपत्य करण्याचा मनसुबा होता. हे अहिल्याबाईना माहित होते. अहिल्याबाईच्या हाती तोफखाना होता. लढाईतले डावपेच त्यांना माहित झालेले होते. अहिल्याबाईंनी स्वत:च्या अधिकारात धडाक्यात एक निर्णय घेतला गोहदकरांच्या एका गढीवर तोफा रोखल्या होळकरांच्या तोफा रोखल्या जाताच गोहदकर हादरुन गेले गढी खाली करुन दिली. या महत्त्वाच्या निर्णयाबाबत अहिल्याबाईंनी मल्हाररावांची परवानगी किंवा सल्ला घेतला नव्हता. मल्हाररावांना ही बातमी कळताच अहिल्याबाईच्या हया निर्णयाचा म्हणजेच कोणत्याही परिणामाचा विचार न करता ही जी त्यांची कृती होती त्यामुळे मल्हारराव अस्वस्थ झाले. आपण अहिल्याबाईविरुध्द कृती केली तर या दुहीचा फायदा गोहदवाल्यांने ताबडतोब उठविला असता. हे जाणून असलेल्या मल्हाररावांनी आपला तोल जरही ढळू दिला नाही हे खालील पत्रावरुन कळून येईल.

''चिरंजीव आहिल्याबाई यांसी प्रती मल्हाररावजी होळकर आर्शिवाद उपरी येथीलकुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष येथील वर्तमान अगोदर तुम्हास लिहून पाठविले आहे. त्यावरुन कळले असेल. तुर्त येथील मजकूर तरी दिल्लीहून आमचे तुंबळ होउन छ. १२ रोजी अनुपशहरानजीक कर्णवास येथे आलो. या स्थळी हुताशनी होईल तदोत्तर उपयोगी मनसबा दिसेल तसा कौल केला जाईल. गिलच्याचे भानगडीस नजीब खान आहे. अब्दाली सरहद्दीकडे आला म्हणून बोलवा असे त्याजकडे नजीबखान रवाना केला. त्याजकडील तहरहाची पुर्ती केली. यावरील पुढील

तरतुद करणे ते करण्यात येईल.  ठीक खबर येईतोपर्यंत गंगातीरी मुक्काम होतील गिलच्याकडील बातमी पक्की  लागलीयावरी सकुराबादचे रोखे येथेच होईल दुसरे देवकासीद यासमागमे पत्रे तुम्हांस पाठविली ती पावोन रवानगीचे तजविजीत असाल त्यास मार्गाचे ठीक नाही. भरवाशाचे

पथक नसे याजकरिता रवानगी केली.नसली तरी तुर्त कोणासही इकडे न पाठविणे. तुम्ही अवघी ग्वाल्हेरीस मुक्काम करुन असावे. आम्हीही लवकरच ते प्रांती येतो तिकडे आलियावरी तुम्हांस बोलवावयाचे झाल्यास बोलावून घेऊ. गोहदककडील एक गढी तोफा लावून तुम्ही खाली केली म्हणून येथे कासीदाने सांगितले त्यास तुम्ही ग्वाल्हेरीस राहून तोफेचे गोळे व जंबुरियाचे गोळे यांचा कारखाना लावून सरंजाम पूर्ववत करवणे आयंदा आम्हांस गोहदकराचे पारपत्य जरुर कर्तव्य आहे. रवानगी कराल तरी भरवशाची सोबत सामान चांगले असेल आणि तुमची निशा पडली तर रवानगी करणे नाही तरी तेथेच असावे रवाना छ. ११ रमाजान बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद मोर्तब सुद

(पैवस्त छ. २३ रमजान ता. १६ मार्च सन १७६५ ई.) [६९]

या पत्रात मल्हाररावांची राजकारणी परिस्थितीनुरुप बुध्दीचातुर्याचे दर्शन होते.त्याचबरोबर मल्हाररावांना खरे म्हणजे गोहदच्या चढाईविषयी अहिल्याबाईना काहीतरी लिहावयाचे होते. परंतु सरळ धीर होत नव्हता. म्हणून गिलचे नजीब ते तोफांचे गोळे रवानगी आहे  आधीतपाशिलाने लिहिलेले विषय पुन्हा घोळले पण त्यांचे निश्चितच समाधान नव्हते. त्यामुळे या पत्राला पुरवणी जोडली गेली त्या पुरवणी पत्रात त्यांनी लिहिले.

‘‘चिरंजीव अहिल्याबाईस आशिर्वाद उपरी गोहदकराडील गढीचा जमाव अटोकाटपूर्ता मनास आणून मग तोफखाना पाठवीत जाणे शहसर्वथा गुंता न जाणे दबावाने जितके काम होईल तोवर करीत जाणे तोफखाना आपल्यापासून कोणाच्या भरवशावर सर्वथा लांब पाठवावयासी तजवीज न करीत जाणे तोफखान्याची आब राखून आपला  नक्षा साधेतो अर्थ करीत जाणे छ. ११ रमजान हे आशिर्वाद मोर्तब सूद :- पैवस्त छ. २३ रमाजान खमसासितैन [७०]

गोहदकराने आरंभी गढी खाली करुन दिली. तरीनंतर लढाईची शक्यता होती त्याची अहिल्याबाई आणि मल्हारराव दोघांनाही कल्पना होती तरी येथे अहिल्याबाईनी सल्ला मागितला नाही. पण मल्हाररावांनी तो दिला. हया राजकीय पेचप्रसंगात मल्हाररावांनी  नाते संबंध सून सासरा मानपान अंहपणा हा गोष्टीना महत्त्व दिले नाही. त्यामुळेच अहिल्याबाईचे राजकीय कर्तृत्व पुढील काळात विकसीत झाले.

६. युध्द मोहिमेवर असताना मल्हारराव आपल्या मोहिमेतील घडामोडीची बातमी अहिल्याबाईस कळवित असत. युध्द साहित्याबरोबरच अर्थ द्रव्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी मल्हाररावाने अहिल्याबाईवर सोपविली होती.

''ता. २८ मार्च सन १७६५ चिरंजीव अहिल्याबाईस आशिर्वाद विशेष गोहदकराकडील एक दोन गढया मातबर घ्यावयाच्या होत्या तेथे तोफा लावून ठाणी खाली करुन घेऊन रा. गोविंद शामराव याचा अंमल पेशजीप्रमाणे चालत आला सांप्रत मोहिम जाटाची आहे. लोकांस खावयास द्यावे लागत याकरिता खेतसीकरमसी याजपासोन लष्करात रुपये दो लक्ष २००००० घेऊन हे पत्र तुम्हास हुंडीदाखल लिहिले असे तरी पत्र पावताच सदरहू दोन लक्ष रुपये सावकार मजकूर याजला देऊन पावती घेणे चिठ्ठी जे समयी पावाल तेचक्षणी ऐवजाची भरती करुन घेणे येविषयी हयगय एकंदर न करणे तुम्हांस आमची अगत्य असली तरी ऐवजाची सरबराही होऊन सावकार मजकुरास ऐवज क्षेपनिक्षेप पावता होय ते गोष्ट करणे. [७१]

''सासू गौतमाबईचा मृत्यू होईपर्यंत खाजगीच्या कारभाराची दीक्षा अहिल्याबाईस तिच्याकडून मिळत होती. [७२] गौतमीबाई नंतर आपल्या दोन पत्नी हयात असताना सुध्दा मल्हाररावाने खाजगीची जबाबदरी अहिल्याबाईवरच सोपविली होती. मक्तेदारानां खाजगीचा ऐवज अहिल्याबाईचे जमा करावयास सांगितले होते.

''राजश्री नारो बाळाजी यांसी की मौंजे लिंबगाव तालुके काल्हेर मक्ता करुन दिला. त्याचा ऐवजी इसनेसीतेन सालचा २१ - २४७५ -२-० प्रमाणे २१-१४८५० - १२-० पैकी वसूल खाजगीकडे रुजू रुपये १२०० ब्याण्णवशे बाकी ५६२०-१२-० ऐन बाकी ८१४ -४-० व्याजाबद्दल एकूण ६४६५ एकूण सहा हजार चारशे पासष्ट रुपये खाजगीकडे ठेविले आहेत. तर सदरहु ऐवज चिरंजीव अहिल्याबाई जमा करतील अहिल्याबाई यांजकडे ऐवज जमा करविला.'' ८६३६-१० महादजी रंगनाथ पिंपळसकर कडील ६४५६ -० -० नारो बालाजी व्याज सुध्दा१५१०१ -१०-० (१० ऑगस्ट १७६५) [७३]

सुभेदार मल्हारराव होळकरांच्या तालमीत अहिल्याबाई तरबेज होत गेल्या राजकारण, राज्यकारभार व्यवहारी शिक्षण अद्ययावत राजकीय क्षेत्रातील ज्ञान युध्द तयारी, युध्दसाहित्य, युध्दकला, या सर्व बाबतीत त्या कुशल बनत गेल्या त्यामुळे अहिल्याबाईचा स्वत:वरील विश्वास

वाढत जाऊन राजकीय क्षेत्रात त्या आपल्या वेगळा ठसा उमटू शकल्या मल्हाररावांच्या मृत्युनंतर होळकरशाहीच्या राज्यकारभाराची सूत्रे अहिल्याबाईंनी हाती घेतली आणि त्या स्वतंत्रपणे राज्यकारभार करु लागल्या.

## ३.१० मालेराव सुभेदारपदी :-

मल्हारराव मृत्यु पावल्यानंतर सरदारीची वस्त्रे पेशवा माधवरावाने अहिल्याबाईचा पूत्र मालेराव यास २३ जुलै १७६६ रोजी दिली.[७४] मालेरावाचा जन्म इ.स. १७४५ मधील असून तो यावेळी एकवीस वर्षाचा होता.[७५] २३ जुलै १७६६ रोजी पेशव्यांनी मालेरावास सरंजाम देतेवेळी खुद्द अहिल्याबाईस एक पत्र लिहिले. त्या पत्रात पेशवे म्हणतात. ''सरकारचा हिशेबाचा मागील फडसा कारकिर्द कैलासवाशी मल्हारजी होळकर व सन खमस व सीत दुसाला करुन देऊन, फारखती घेऊन मालेराव होळकर तुम्हांकडे आले आहेत. सविस्तर गंगाधर यशवंत सांगतील त्याप्रमाणे तजवीज करुन आपला सर्व बंदोबस्त महाल, गाव, खेडी यांचा यथापूर्ण करणे आणि मातब्बर फौज सरंजामाची (देऊन) कार्तिकमासी मशार निल्हेची रवानगी जलद इकडे करणे, वरकड, कोणे गोष्टीची चिंता न करणे, आजपर्यत कैलासवासी मल्हारजी होळकर यांनी सेवाचाकरी करुन सर्व प्रकारे आपल्या स्वधर्माची शर्थ केली. मालेराव निष्ठेने तशीच सेवा करतील त्यांचा पूर्ववत प्रमाणे मानमरातब रक्षून हिंदुस्थानची कामकाजे त्यांच्याच हातून घेतली.जातील[७६]

यावरुन माधवराव पेशवा अहिल्याबाई हयांच्यातील दृढ संबंध लक्षात येतात तसेच अहिल्याबाईना पेशव्यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे दिसते. त्यांना पेशवे दरबारात मान होता हे दिसून येते. त्याबरोबर त्यांच्यावरील विश्वासही व्यक्त होतो. त्यामुळे होळकरांच्या राज्याचा कारभार अधिकृतपणे मालेरावावर सोपवलेला असला तरी राज्याचा कारभार अहिल्याबाईवरच असल्याचे दिसते. सासऱ्याचे छत्र हरपले हा राज्यकारभार आज घटकेला तरी मालेराव पेलू शकत नाही याची त्यांना पूर्ण जाणीव होती. ''मालेरावाला वेडाचे झटके येत तो वक्रबुध्दीचा, व्यसनी दुराचारी आणि वेडसर होता.''[७७] या परिस्थिती संबंधी कोणाकडेही तक्रार करता येणार नव्हती कोणला जाब विचारता येणार नव्हता परमेश्वराने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काया वाचा मने आपणच स्मरुन पार पाडणे आहे. ही अहिल्याबाईंची ठाम धारणा होती.

प्रत्यक्ष सनद मालेरावाच्या नावाने आल्यामुळे असेल कदाचित, मालेराव कामकाजात काही प्रमाणात लक्ष घालू लागला. त्याने जबाबदारपणे मल्हाररावांच्या मृत्युची वार्ता सावेर परगण्याच्या कामाविसदाराला कळविली. भाषा पोक्त होती.

''तीर्थरुप सुभेदारांचे शरीरास समाधान नव्हते. शेवटी वैशाख शुध्द ११ मंगळवारी कैलासवासी झाले. ईश्वरसत्ता आपल्या परगण्याची व्यवस्था चांगली ठेवणे मागील ऐवज गडी माणसाद्वारे तीथरुप मातोश्री आईपासून पावता करणे त्यांचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करावी सरकारात नेमणूकीचा आकार पोहोचविणे व इमाने इतबारे वागणे''[७८]

सुभेदारीची सनद त्याच्याकडे आल्यावर लोकही आपोआप त्याच्याकडे विचारपूस करण्यासाठी येऊ लागले. आजोबांचे छत्र अचानक नाहीसे झाले तेंव्हा घरचे कर्ते पुरुष आपणच आहोत याची जाणीव त्याला झाली.मालेरावाने महेश्वर परगण्यातील चोळी तालुक्याच्या कमाविसदाराला कळविले.

''राजश्री कमाविसदार वर्तमानभावी तालुके चोळी परगणे महेश्वर यांस मालेराव होळकराचे पत्र वेदमुर्ती शेषभट बिन लक्ष्मणभट उंबरनीकर गोत्र अगस्ती सूत्र आश्वलायन वस्ती औरंगाबाद यांनी इंदूर मुक्कमी येऊन विदित केले की अभीष्टचिंतनार्थ सरकारतून वर्षासन करुन दिले पाहिजे ते चालविणे श्रेयस्कर हे ब्राम्हण विद्यापात्र स्नानसंध्याशील आहेत लक्षात घेऊन सरकारातून वर्षासनाची २०० रुपयाची नवीन सनद दिलेली आहे यास आक्षेप न घेणे या पत्राची प्रत लिहून घेऊन अस्सल पत्र वेदमुर्तीस देणे आहे. हे लक्षात घ्यावे'' (२२ जानेवारी १७६७)[७९]

मालेरावांच्या वागणूकीत बराच बदल जाणवत होता. राज्यकारभार करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी सुरवात केलेली होती. आणि अचानक मालेराव आजारी पडले उत्तमातला उत्तम औषधोपचार करण्यात आला.

''मालेरावास मल्हारजीने संपादिलेली दौलत वारस हक्काने मिळाली पण तो अल्पायुषी निघाला ३१ मार्च १७६७ रोजी त्याचा मृत्यु झाला.

### ३.११ चंद्रचुडाचे कारस्थान :-

मालेराव वारल्यानंतर गादीवर कोणाला बसवायचे असा प्रश्न उपस्थित झाला. अहिल्याबांईना एक मुलगी होती. पण तिला धर्मशास्त्राप्रमाणे गादीवर बसण्याचा अधिकार नव्हता. अहिल्याबईच्या मनात काय विचार सुरु आहे याचा थांगपत्ता कोणासही लागेना.

''चाळीस वर्षे ज्याने होळकरांची इमाने इतबारे नौकरी केली त्या कारभारी गंगाधर यशवंत चंद्रचुड उर्फ तात्यासाहेब यांची अशावेळी मती फिरली.[८१] पेशवा माधवरावाचे व चंद्रचुडाचे सख्य नव्हते. रघुनाथराव व माधवरावांचा पेशवाईसाठी संघर्ष सुरुच होता. चंद्रचुडाने रघुनाथरावाला निरोप पाठविला. ही दौलत बैतल माल जाली. त्यात आपण सुभेदाराचे चिरंजीव हे जघन्य ते पक्षी आपण दरमजल घेऊन दौलत समेटावी. येथे शोकाने गालब होऊन मनुष्यमात्र गिरफदारीत आहे. आपले येणे सत्वर जाहले असता समय आहे. या भावे प्रेष गेला.[८२]

मल्हारराव होळकर मयत होउन उत्तरेतील राजकारणात गंगाधर तात्या चंदचुड यास नवीन तेज चढले. जुना, अनुभवी सर्व अनुसंधाने ओळखणारा हा एकटाच पुरुष आता दादाचा आधार व मुख्य हस्तक बनला. शिंदे होळकर हे दोन औत्तरीय दौलतीचे मुख्य खांब, ते कब्जांत घेऊन आपली छाप बसविण्याचा खटाटोप गंगाधरतात्याने आरंभिला दादाला स्वयंप्रज्ञा नव्हतीच त्यामुळे तात्याची घमेंड वाढली. या दृष्टीने आता नवीन रचना उत्तरेत बनू लागली. मालेराव मेल्याने होळकरशाही तात्याच्या कब्जात आली.[८३]

रघुनाथरावाचा मुक्काम उज्जनीजवळ होता. होळकरांचा मुख्य चालक गंगोबातात्या यावेळी दादाचे छावणीत होता. त्यास दादाने अंतस्थपणे वश करुन घेतले. खरी मालकीण अहिल्याबाई इंदुरास होती. तुकोजी होळकर फौज घेऊन कोटयाकडे कामगिरीवर होता. अशा वेळी दादाने गंगोबातात्याशी गुप्त कारस्थान रचुन केवळ पैसे उकळण्याच्या बुध्दीने इंदुरास बाईकडे बोलणे करण्यास पाठविले.[८४]

व्यवहारात स्वत: दादाने बाईचे समाधानासाठी भेटीस जाणे जरुर होते ते त्याने न करिता सोनाराकडून कान टोचण्याचा हा प्रयोग त्याने रचिला तात्याने इंदूरास बाईची भेट घेऊन ताडले की बाई यावेळी असहाय आहे. दादासाहेब फौजबंद असून चालून आले म्हणजे बाई शरण येऊन आपला

संचय हवाली करील. अहिल्याबाईला दत्तक पुत्र देऊन कारभार गंगोबाने करावा असा घाट सिध्द झाला. तात्याने दादास कळविले. 'तुम्ही बेधडक इंदूरवर चालून या.[८५] आणि यानंतर लगेचच अहिल्याबाई व रघुनाथराव यांच्या संघर्षाला सुरुवात झाली.

## ३.१२ रघुनाथराव अहिल्याबाई संघर्ष - रघुनाथरावांवर अहिल्याबाईचा राजकीय विजय :-

रघुनाथरावाच्या या योजनेची माहिती अहिल्याबाईस कळली. ''ती बाई माणूस मालकाच्या या प्रचंड फौजेपुढे तिचा निभाव कसा लागणार !पूर्वीची चार कारकून मंडळी, मल्हाररावांची रक्षा हरकूबाई आणि कन्या उदाबाई वाघमारे जवळ होत्या. त्यांनी रघुनाथ गानुने बाईस भर दिला.दादा चालून आले तर बेलाशक दोन हात करावे. पराभव झाला तरी बाईला वैगुण्य नाही तिचे नैतिक सामर्थ्य निभावून नेईल त्यावरुन बाईने घाईने लढण्याची सिध्दता केली.[८६]

गादीची मालकी, उत्तमपक्ष नथ्याबा फणसे यांसी अधिकार खरा परंतु लेकरु [८७] ही वेळ भूतकाळातील गोष्टींचा विचार करण्याची नव्हती त्वरीत निर्णय घेण्याची वेळ होती आणि हयाच दृष्टीकोनातूनच अहिल्याबाईंनी तुकोजी होळकरास पत्र लिहिले की, ''फौज जेथील तेथे मुस्तकीस ठेवून तुम्ही जेवीत असल्यास पाणी प्यायला आम्हापाशी यावे.[८७]

रघुनाथरावास हया सर्व गोष्टीची खबर लागत होती. रघुनाथरावाने रागावून ताबडतोब होळकरांचे खानदेशाचे महाल जप्त करण्यासाठी आयतोळे नावाच्या आपल्या एका सरदारास पाठविले. इकडे अगोदरच अहिल्याबाईंने बनाजी मतकर व बुळे यांना आपली पथके घेऊन खानदेशात पाठविले होते.[८९]

बुळयांचे व आयतोळयांचे झुंज घेउन बुळयांनी आयतोळा मोडला, जखमी झाला, हे वर्तमान ऐकताच दादाची स्वारी क्रुध्द झाली व इंदुरावर स्वारी करण्याचा बेत चालविला.[९०]

अहिल्याबाई म्हणते मजपाशी एक रुपयाही नाही. दादासाहेबांचे चित्तात मुलूख दिल्हा तो घ्यावा शिवाय नजर घ्यावी. दादासाहेबांपूढे कोणाचाही वक्र चालत नाही. मर्जी बहुत कठिण झाली आहे.[९१] दीड दोन महिने रघुनाथरावाने होळकरांच्या दौलतीत हा घोळ घातला. ''सन १७६७ चे

एप्रिल मे चे दादाचे मुक्काम उज्जैन प्रांतात झाले बाईपुढे त्याचे सामर्थ्य फिके तिने दादोबा वाघोलीकर हा आपला वकील मोठा विश्वासू होता. त्यास पुण्यास माधवरावाचे भेटीस पाठवून त्यास सर्व हकीकत कळविली आणि दादाने चालविलेला अत्याचार त्याचे नजरेस आणिला.''[९२] माधवराव पेशव्यांना चुलत्याचे हे वर्तन बिलकुल पसंत पडले नाही त्यांनी अहिल्याबाईस कळविले. ''तुमचे दौलती विशी पापबुध्दी ठेवील त्यांचे पारिपत्य बेलाशक करावे आणि आपले दोघे विश्वस्त हुजुर पाठवावे''[९३] या माधवरावांच्या सूचनेनुसार नारो शंकर व शिवाजी गोपाळ या दोन आपल्या खाजगीकडील इसमास तिने माधवरावांकडे पाठवून निकाल आणिवला पेशव्यांने तुकोजी होळकरांचे नावाने सरदारी करुन दिली.[९४]

दादाच्या फौजेत नागपूरकर भोसले, गायकवाड व इतर मंडळी होती त्याजला बाईकडून इशारे गेले आज आमच्यावर वेळ आलेली आहे उद्या तुमच्यावर हीच वेळ येईल याचा विचार करुन फौज मदतीस पाठवावी मल्हाररावांचे घरात ही एकच व्यक्ती कर्तबगार [९५] असून तिच्याबद्दल चुहूकडे मोठा आदर होता. होळकर शिंदे, भोसले, सर्व एकवटले आहेत बाईपुढे त्यांचे सामर्थ्य फिके पडले.[९६]

अशा प्रकारे तुकोजीला सरदारकीची वस्त्रे माधवरावांकडून मिळवून देऊन व नागपूरकर भोसले गायकवाड हया मंडळीना सत्य परिस्थितीची जाणीव करुन देऊन आपल्या राजकीय मुत्सद्देगिरीने आपली बाजू भक्कम केली.

एवढे सर्व होण्यास अवधी लागला. आणि रघुनाथराव दादा तर इंदुरवर चढाई करुन निघाले. आहिल्याबाईनी लढाईची पूर्व तयारी केली असल्याने लढण्याची सिध्दता केली.''क्षिप्रा, उतरला असता तुमची आमची तलवार चालेल याचा विचार करुन पाऊल टाकणे''[९७] अहिल्याबाईनी रघुनाथरावास इशारा दिला. रघुनाथरावाच्या हाताखालचे सर्व सरदार बेदिल झाले.[९८]महादजी शिंद्यांना चालून जाण्यास सांगितले असता तो बोलला, ''मी जातीने पेशव्यांची चाकरी पाहिजे ती करण्यास सिध्द आहे, पण या कामास मी आपली फौज लावणार नाही.''[९९]

गायकवाड व  नागपूरकर भोसले उघडपणे अहिल्याबाईस सामील झाले. बाईची तयारी व कडक भाषणे याचा परिणाम सर्वावर होऊन दादा अत्यंत खजील झाला. महिनाभर सर्वच घोळ माजून राहिला. लोक सर्व मौज आतुरतेने पाहत होते.''[१००]

तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार करता रघुनाथरावास अहिल्याबाईपुढे माघार घेण्यास भाग पडले. त्यांनी अहिल्याबाईस कळविले, ''आम्ही केवळ सांत्वनार्थ आपल्या भेटीस येतो, सरदारीत घालमेल करीत नाही''[१०१] यावर अहिल्याबाईनी कळविले की, ''असे आहे तर फौज घेऊन येण्याचे प्रयोजन नाही. सडे यावे.''[१०२] त्यावर रघुनाथरावाने खर्चास ७लाख रुपये व तोफा मागण्यासाठी गोविंदराव गानु यास उज्जनीहून इंदुरास अहिल्याबाईंकडे पाठविले. मागाहून स्वत: इंदुरास गेले. संवत्सर प्रतिपदा (३० मार्च) तेथे केली.[१०३] रघुनाथरावाने सांगितले, ''आज पाडवा आहे. लाख दोन लाखाचे कापड लोकांस द्यायला पाहिजे. ''अहिल्याबाईने सांगितले, श्रीमंत वाडयात येतील ते समयी काय अनुकुल पडेल तो पोशाख देऊ त्याजवरुन मग पाच तोफा घेतल्या.''[१०४]

रघुनाथरावाने अहिल्याबाईंची भेट सामोपचाराने घेतली. तिनेही त्यांचा सत्कार यथायोग्य केला. भोसले गायकवाड इत्यादी यांचाही यथायोग्य सरदारांचाही गौरव करुन तिने निरोप दिला.''[१०५]

आपल्या सरदाराने मुख्यत: गायकवाडाने आपली आज्ञा न ऐकता अहिल्याबाईचा पुरस्कार केला. याची रघुनाथरावाला चीड आली. त्याने लगेच गुजरातेत जाऊन गायकवाडाचे महाल जप्त करण्याचा प्रयत्न चालविला. पण ती गोष्ट सिध्दीस नेणे त्यास सिध्द झाले नाही.[१०६]

अशा रितीने हताश व कर्ज बाजारी होऊन पुतण्यावर सर्व राग काढण्याच्या तयारीने नर्मदा उतरुन रघुनाथराव परभारे आनंदवल्लीस गेला.[१०७]

त्याचप्रमाणे आपले कारस्थान फसलेले बघून गंगाधर यशवंत चंद्रचुड, उर्फ गंगोबातात्या देवदर्शनास जातो. म्हणून दक्षिणेत आला. रघुनाथरावाला हा आणखी काही उपदव्याप करायला लावील या भीतीने पेशवा माधवरावाने त्याला आणकाईच्या किल्ल्यात बंदिस्त ठेवले.[१०८] आपली

संपत्ती पेशवे जप्त करणार म्हणून संपत्ती त्यापेक्षा दानधर्मात गेलेली काय वाईट असा विचार करुन त्याने ९६ लक्ष ३२ हजार रुपये दानधर्मात खर्च केले.[१०९]

रघुनाथरावाबरोबर राजकारण करुन आपली होळकरांकडील चाळीस वर्षाची सेवा गंगोबा तात्याने मातीमोल करुन टाकली.

थोडक्यात अहिल्याबाईने आलेल्या संकटाचा यशस्वीपणे मुकाबला केलेला दिसून येतो. वैयक्तिक दु:खा पेक्षा स्वराज्यावरील संकट मोठे आहे आणि त्याचे निवारण करणे हे प्रथम एका राजकर्त्यांचे कर्तव्य आहे. हे त्यांनी आपल्या कृतीतून सिध्द केले. त्यामुळे त्यांना छत्रपती शिवाजीराजांप्रमाणे आपल्या राज्याचे सुराज्य बनविता आले. त्याचप्रमाणे अहिल्याबाईमधील सुप्त राजकीय मुत्सद्देगिरीचा गुण दिसून आला. आपण खऱ्या अर्थाने मल्हारराव होळकरांचे योग्य वारसदार आहोत हे त्यांनी सिध्द केले.

अहिल्याबाईंचे कर्तृत्व सिध्द झाले पण केवळ पैशाच्या हव्यासापोटी व स्वार्थासाठी पेशवा घराण्यातील श्रेष्ठ पुरुषांने अडचणीत सापडलेल्या एका महिलेवर हल्ला करावा ही घटना या घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी अतिशय लाजिरवाणी बाब ठरली. स्वार्था करीता स्वकीयांनाही लुबाडण्याची रघुनाथरावांची वृत्ती दिसून आली.

पेशव्यांच्या सेवेत असणाऱ्या होळकर घराण्याच्या एका विधवा महिलेच्या राज्यावर स्वारी करणे हे कृत्य मराठयांच्या प्रतिष्ठेला, प्रतिमेला व स्वाभीमानाला तडा देणारे ठरले. परंतु शिंदे भोसले, गायकवाड यांसारख्या श्रेष्ठ सरदारांनी अहिल्याबाईच्या संकटसमयी त्यांना साहाय्य देऊन मराठयांची प्रतिष्ठा, स्वाभीमान, प्रतिमा यांना धक्का लागू नये यासाठी प्रयत्न केलेला दिसून येतो.

## ३.१३ तुकोजी होळकरांचा उदय:-

तुकोजीचा जन्म सन १७२५ म्हणजे अहिल्याबाईच्याच वेळचा असून तो पहिल्या मल्हाररावांचे हाताखाली वाढला.[११०] मल्हाररावाने आपल्या अनेक नातेवाईकांना जातीतील लोकांना, राजकारणात व लष्करात सामावून घेतले व इंदूर येथे आणले अशाच मंडळीत तुकोजी हा होता. त्याने मल्हाररावांची अत्यंत प्रमाणिकपणे, मनोभावे कामगिरी केली. त्याची एकनिष्ठता मनांत आणून

मल्हाररावांने त्याचे पुत्रवत पालन केले व त्याची पहिल्या प्रतीच्या सरदारात योजना केली.[१११] मल्हाररावांचा त्याजवर विश्वास व प्रेम होते[११२] मल्हाररावांजवळ काम करून तुकोजीने अनुभव मिळविलेला होता. त्यामुळेच मल्हाररावांच्या पश्चात होळरांच्या राज्यकारभारात तुकोजी होळकरांचा उदय झाला तो कशा प्रकारे झाला हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१७६६मध्ये मल्हारराव होळकरांचे निधन झाले. त्यानंतर अहिल्याबाईंनी होळकर राज्यांच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली पेशवा माधवरावाने तिचा मुलगा म्हणजे मल्हाररावांचा नातु मालेराव यास सरदाराची वस्त्रे देऊन प्रत्यक्ष व्यवहार अहिल्याबाईनी पाहावा अशी व्यवस्था केली.[११३] इ.स. १७६७ मध्ये हा मालेरावही मरण पावला.[११४]

मालेरावाच्या मृत्युनंतर होळकरशाहीच्या वारसाहक्कांसंबधाचा प्रश्न दादा माधवरावांच्या भांडणामुळे उत्पन्न झाला होता. मालेरावाच्यामृत्युसमयी दादा जवळच उज्जनीस होता. आणि उत्तरेकडील व्यवहारांवर त्यांचीच हुकुमत होती. दादाने लगोलग तुकोजीस वारस ठरवून इंदूरची व्यवस्था चालवली आणि स्वारी करण्याचा धाक घालून अहिल्याबाईंचे मन दुखविले. त्याबरोबरच आपण राज्याचे मालक समजून तिने ताबडतोब माधवरावांचे व सरदारांचे मन आपल्या बाजून वळविले. [११५] अहिल्याबाईंनी फौज जमवून राघोबादादांविरुध्द चार हात करण्याची सिध्दता केली. माधवरावांपर्यंत हया वार्ता गेल्याच त्याने अहिल्याबाईस राघोबाचा मोड करण्याच्या कामी उत्तेजन दिले आणि मल्हाररावाने वाढविलेला एक आप्त आणि होळकर कुटंबातला एकमेव पुरुष तुकोजी हयाला सरदारीचे काम दिले.[११६] तसेच अहिल्याबाईने तुकोजी होळकराच्या मदतीने कारभार पहावा असा निर्णय पेशव्यांनी दिला.[११७] राज्यकारभारात कागदोपत्री मुद्रेवर अर्थात सुभेदारीवर तुकोजीचे नाव असे[११८] बाकी राज्याची सुत्रे अहिल्याबाईच्याच हाती होती.[११९] ज्या काही घडामोडी मराठा राज्यात घडत असत त्यात अहिल्याबाईच्या वतीने तुकोजी पार पडीत असे .[१२०]

अशा प्रकारे होळकरांच्या राज्यकारभारात तुकोजी होळकरांचा उदय झाला. व तसेच मल्हाररावांच्या नंतर होळकर राज्याची धुरा ही अहिल्याबाई होळकर व तुकोजी होळकर यांच्या हाती आली. लष्करी कामगिरी तुकोजी होळकरांवर सोपविली गेली. व अंतर्गत राज्यकारभाराची जबाबदारी अहिल्याबाईकडे आली. ही जबाबदारी त्यांनी पुढील काळात यशस्वीपणे पार पाडलेली दिसून येते.

## ३.१४ पेशवा माधवराव-रघुनाथराव संघर्ष :-

ता. २३ जून १७६१ रोजी पेशवा नानासाहेब पर्वतीवर मरण पावले. त्यावेळी पेशव्यांच्या कुटुंबात रघुनाथराव हेच कर्ते धर्ते पुरुष होते. वडीलकीच्या नात्याने राज्याचा भार अंगावर घेऊन मराठयांचे नाव उज्वल राखण्याची तयारी व तख्त संबंधीची जबाबदारी आता त्यांच्यावर होती. बायकांत वडील गोपिकाबाई दादापेक्षा निदान दहा वर्षांनी मोठी परंतु मानी व करारी स्वभावाची होती.पण या दोघांचे विचारप्रवाह भिन्न दिशांनी वाहू लागले. रघुनाथराव चलचित्त होते. सर्वांचे म्हणणे ऐकून व सल्लागारांची लायकी ओळखून स्वत:ची ताकद आजमावण्याची कसब त्यांच्या अंगी नसल्यामुळे त्यास नेहमी दुसऱ्यांच्या तंत्राने चालावे लागे. शिवाय आपण मोठे कर्तबगार आहोत अशी त्याला घमेंड होती म्हणून नानासाहेबांच्या मृत्यूनंतर सर्व कारभार आपल्या हाती ठेवावा, आपण पेशवे व्हावे असे त्यास वाटू लागले. माधवराव लहान. त्याला काय समजते या विचाराने आलेल्या संधीचा उपयोग करुन पेशवाईचे पद घ्यावे आणि पानिपतचे अपयश धुऊन काढण्यासाठी लगोलग उत्तरेत जावे असा विचार रघुनाथरावाने ठरविला. ''तद्‌नुसार त्याने बादशहा व शुजाउद्यौला यांस पत्रे लिहून गोपाळराव बर्व्यांचे मार्फत उत्तरेचे संधान चालू केले पण पुण्यास जवळच्या एकाही व्यक्तीला रघुनाथरावांचा हा मनोदय योग्य वाटला नाही.''माधवरावांचे वय लहान सोळा वर्षाचे  असले तरी नानासाहेबांच्या वंशाकडेच पेशवाई चालावी असा विचार सर्व जाणत्या माणसांचा व्यक्त झाला. एकानेही रघुनाथरावांच्या विचाराला अनुकूलता दर्शविली नाही. पेशवाईच्या वस्त्रांच्याबाबतीत माधवरावांना  उघड विरोध करण्याचे धाडस रघुनाथरावांस झाले नाही. माधवरावांस पेशवाईची वस्त्रे देण्याचा निश्चय झाला. ''ताराबाईंच्या संमतीने रामराजाकडून सोमवार आषाढ व ३ ता. २० जूलाई १७६१ रोजी माधवरावास वस्त्रे मिळाली.''[१२१] बरोबर कारभारी निळकंठ महादेव उर्फ बाबा पुरंदरे यास दिवाणगिरीची व सखारामबापूस मुलकीची वस्त्रे देण्यात आली.''वस्त्रांचा हा विाधी साताऱ्यास पार पडल्यावर सर्व मंडळी पुण्यास आली.

पुण्यास आल्यावर रघुनाथरावांचा नूर पालटला. माधवरावांस आपले छायेत ठेवून आपणच कारभार करावा त्यास बोलू देऊ नये अशा डौलाने त्याने बंदोबस्त चालविला. याच कारणास्तव सुरवातीपासून कारभारांत तेढ उत्पन्न झाली. यामुळे उघड दोन पक्ष उपस्थित झाले.

रघुनाथरावांनी पुण्यात आपल्या भोवती माणसे जमविण्याचा आणि आधिकाऱ्यांना फितवून, लालुच दाखवून माधवरावांच्या कारभारात व्यत्यय आणण्याचा उद्योग चालूच ठेवला माधवराव पेशवे त्या सर्व खोडसाळपणाला पुरुन उरत होते. जून १७६५ मध्ये तर रघुनाथरावांने निम्म्या पेशवाईच्या वाटणीची मागणी केली माधवराव पेशव्यांनी अर्थातच ती मोठया नम्र भाषेत पण निर्धाराने फेटाळून लावली.[१२२] रघुनाथरवाने मग बाहेरपडून काही पराक्रम करुन दाखवावा म्हणून उत्तर हिंदूस्थानाचा रस्ता धरला.

दादासाहेबांची हिंदुस्थानचा रघुनाथरावांची स्वारी उत्तरेत येताच मराठयांच्या आकांक्षांना तेज चढले पुष्कळांकडून त्याजकडे मदतीच्यामागण्या आल्या अल्पकाळ आशा पल्लवीत झाली की जाठ, शीख, रोहिले या सर्वास मिळून दादा बादशहांची व्यवस्था दिल्लीस लावतील. बादशहानेही आपले वकील दादासाहेबांकडे पाठविले. त्याबद्दल क्लाइव्हला भारी राग आला. पण परिणामास काहीच आले नाही. गोहदकर जाठाने मराठयांस अडवून धरल्यामुळे त्याचा निकाल लावल्याशिवाय रघुनाथरावाला पुढे चंबळपलिकडे जातांच येईना.

मराठयांची खंडणी न देता गोहदकराने विरोध केला. युक्तीने प्रकरण मिटवून बादशहास दिल्लीस आणण्याची बुध्दी रघुनाथरावास झाली नाही. रघुनाथरावाने गोहदचे किल्ल्यास वेढा घातला. अनेक हारकती उत्पन्न होऊन प्रकरण लांबत गेले. ''२४ नोव्हेबर १७६६ नारो शंकर लिहितो ''दादासमागमे आलीया नफा झाला तो लिहिता पुरवत नाही. इजतवाचून घरास आलो. म्हणजे मिळवली किल्ला जेर होत नाही सिंदे नको म्हणत असता दादांनी हल्ला करविला आपण खासा मोर्चात जाऊन बसले. हरि भिडे याजकरवी निशाण उपटून खांद्यावरी नेले. आम्हांकडील नामी माणूस ठार झाले. निशाण जळाले. तीन तीन हल्ला एकामागे एक ऐशा केल्या दादांचा हिरमोड फार झाला. वेढा उठविणे जिवावर आले. जाठ शरण येईना शेवटी महादजी सिंद्यांचे मध्यस्थीने गोहदकरांने पंधरा लाख खंडणी करार केले तेव्हा गोहेदचे मोर्चे उठले. भेटी व्हावयाच्या ठरल्या चमेली पलीकडे जवाहीर सिंग अलीकडे दादासाहेब जाठाचे चित्तांत दंग्याचा संशय आला. त्याने मध्यस्थ नारोशंकर व अनुपगीर उमरावगीर गोसावी यांजवर झुंज केले. पांच सातशे माणूस पडले.''[१२३] हा प्रकार मार्गशीर्ष शु.७ ता. ८ डिसेंबर स. १७६६ चा होय.

यावेळी जाठांचा एक सरदार दानाशा नावाचा भारी उपदव्यापी होता. त्याने मराठयांच्या विरुध्द कारस्थाने रचून निरनिराळयां जाठ धुरीणांचे ऐक्य बनविले. गोहदचा छत्रसाल त्यांत सामील झाला. पारचे रोहिले सरदार त्या संघात मिळाले. पंजाबचे शीख दिल्लीवर जोर करुन आले होते. तेही यास मिळाणार अशी भीषण परिस्थिती दादापुढे निर्माण झाली.[१२४] पुढे दिल्लीकडे गेल्यास आपली धडगत नाही अशी खात्री होऊन अपयशाच्या भितीने रघुनाथराव इ.स.१७६७च्या फेब्रुवारीतच चमेलीहून परत फिरले.

मराठयांची गेलेली प्रतिष्ठा पेशवे घराण्यातील जेष्ठ व अनुभवी रघुनाथराव पुन्हा मिळवून देईल अशी त्यांच्याकडून सर्वाची अपेक्षा होती पण अंदाजे दीड वर्षाच्या मोहिमेत कोणतीही भरीव कामगिरी त्याने केली नाही. बरेचसे कर्ज डोक्यावर घेऊनच तो दक्षिणेस परत आला.''[१२५] रघुनाथरावाने आपल्या या मोहिमेच्या अपयशासाठी माधवराव पेशव्यास दोष देण्यास सुरुवात केली.[१२६] आपल्या अपयशाचे व मानहानीचे कारण हा पुतण्या होय. हेच त्यांच्या मनाने घेतले. आनंदवल्लीस येताच रघुनाथरावाने राज्याच्या वाटणीचे टुमणे पेशवे माधवरावांकडे चालू केले. आणि फौज जमवत रघुनाथराव बाहेर पडले. उघड आव्हानच त्यांनी पेशव्यास दिले. पण पेशव्याला असले घातक कौंटुबिक युध्द मनापासून नको होते. चुलत्यास समक्ष भेटून निकाल लावण्याची शिकस्त माधवरावाने केली. त्यासाठी मध्यस्थांची कामगिरी पेशवे माधवरावांनी सखाराम बापूवर सोपवली. बापूची मध्यस्थी यशस्वी ठरली. काका पुतण्याने परस्परांना भेटण्याचे ठरविले. आनंद वल्ली येथे इ.स. १७६७ च्या २५ सप्टेंबर पासून ते २५ ऑक्टोंबर पर्यंत काका पुतण्याची वाटाघाटी व बोलणी सारखी सुरु होती.''[१२७]

वाटाघाटी सुरु असताना माधवरावांनी रघुनाथरावांना स्पष्टपणे विचारले की, ''तुमच्या मनात काय आहे., दौलतीचा कारभार करणे असेल तर आम्ही सांगू तसे वागले पाहिजे. नाही तर पाच लक्षाची जहागीरी लावून घेतो. ती घेऊन स्वस्थ बसा. दुसरे ढंग आम्ही चालू देणार नाही. लोकांच्या नादी लागून राज्याची वाटणी मागता, बखेडे करता, सरदारांच्या घालमेली करता. हे प्रकार इत:पर आम्ही चालू देणार नाही.''[१२८] माधवरावाने रघुनाथरावास विनाअट शरणागती पत्करण्यास अथवा युध्दास तयार राहण्यास सांगितले.

पेशवा माधवरावाने जी कठोरता दाखविली त्यामुळे रघुनाथराव नरमला. उत्तरेच्या मोहिमेत झालेले २५ लाख रुपयाचे कर्ज फेडण्याची जबाबदारी पेशव्यांनी घ्यावी शिवाय योग्य ती पेन्शन पेशवा देत असेल तर आपण राजकारण संन्यास घेऊ असे रघुनाथरावाने सुचविले.''[१२९] वरील मागण्या मान्य केल्यास गृह कलह संपुष्टात येईल असे वाटून पेशव्याने काकांच्या मागण्या मान्य केल्या. दोघांत ३ ऑक्टोंबर १७६७ रोजी विजया दशमीच्या मुहुर्तावर अनंदवल्ली येथे तह झाला. शिवनेरी अहमदनगर, अशिरगड, व सातारा हे चार रघुनाथवांच्या ताब्यातील महत्वाचे किल्ले पेशव्यांनी खाली करुन मागितले.''[१३०] व त्या मोबदल्यात रघुनाथरावाला दहा लाखाची जहागिरी देण्यात यावी असे ठरविण्यात आले. या तहाद्वारे माधवरावाने आपणास निर्माल्यवत बनविले. याची रघुनाथरावाला खंत वाटून त्यांनी हैदर अली, निजाम, जानोजी भोसले, दमाजी गायकवाड इ. कडे संधाने चालविले. हे लक्षात घेऊनच इंग्रजांनी मॉस्टीनच्या नेतृत्वाखाली ब्रोम नावाच्या दुसरा एक स्वतंत्र इसम नजराने देऊन मुद्याम रघुनाथरावाच्या भेटीस पाठविला. रघुनाथरावानेही त्याची भेट घेऊन कळविले.'' आमचे मनात पुतण्याबद्दल भारी द्वेष उत्पन्न झाला आहे. साल मजुकरी त्याजवर चालून जाण्यास आता अवधि नाही. पण पावसाळा संपताच आम्ही त्याजवर चढाई करणार त्यासाठी आपण तोफा, दारुगोळा, व फौज अशी मदत आम्हास केली पाहिजे.'' [१३१] त्यावर इंग्रज वकीलाने विचारले ''नुसता खर्च घेऊन मदत पाठविणे आम्हास शक्य होणार नाहा, काही विशेष फायदे आम्हास मिळतील तर आपल्या विंनतीचा विचार होईल.''[१३२] इंग्रजांना वसई, साष्टी, वगैरे जागा हव्या होत्या. इंग्रजांच्या आधारावर रघुनाथरावाने पुन्हा एकवार माधवरावाशी युध्द करण्याची तयारी केली. या कारवाया माधवरावास कळल्या नसत्या तर आश्चर्य पण यामुळे माधवरावाच्या डोळयात चांगले अंजन घातले गेले. गेल्यावर्षी समेटाच्या नादात लागून आपण या प्रकरणाचा सोक्षमोक्ष केला नाही. याबद्दल माधवराव पेशव्यांना वाईट वाटले. माधवरावानेही खुळे पणाने पुतण्यावर चढाई करण्याची घोषणा केली. त्यावेळी दक्षिणेत असलेल्या शिंदे होळकरांना माधवरावांने थांबवून घेतले. तुकोजी होळकरांचा मुक्काम यावेळी वाफगावी होता. माधवरारवांचा हुजऱ्या तुकोजी होळकरांना बोलावून घेऊन गेला. कारण माधवरावांना तुकोजींची निष्ठा कोणाकडे आहे याची खात्री करावयाची होती. यावेळी तुकोजी होळकर पेशवा माधवरावाला म्हणाला, ''आमची क्रिया कै. बाजीरावरसाहेबांची व कै.सुभेदार या उभयतांची वचनप्रामाण्य झाले आहे.तेच आम्ही अनादी जाणतो. जो त्यांच्या गादीवर तोच आमचा मार्तंड दुसऱ्याशी आम्हास कारण नाही. ''[१३३] होळकरांचा कारभारी, गंगोबा तात्या

यांचा कल मात्र रघुनाथरावांकडे होता. यावेळी कारभारी गंगोबातात्या चंद्रचुड तुकोजींचा कल कोणाकडे आहे याचा अंदाज घेत होता. तुकोजी गंगोबा तात्याला म्हणाला. ''मी बेईमान व्हावयास कोणाकडेच जात नाही. तात्या जाणा तुम्ही जाणा. [१३४] असे उत्तर देऊन आपण तटस्थ असल्याचा संकेत तुकोजीने दिला. व तो चांदवडास निघून गेला.

## ३.१५ घोडपची लढाई १७६८ :-

माधवराव पेशव्याने संग्रामाची सिध्दता केली. महादजीस बोलावणे जाताच तो केदारजीसह सन १७६८ च्या मे महिन्यात राहुरी येथे पेशव्यास सामील झाला. ''[१३५] रघुनाथराव घोडप येथे तळ ठोकून बसला होता. चांदवडास पेशव्याचे पत्र तुकोजीकडे आले असता. तुकोजीन गुप्तपणे माधवरावास निरोप पाठविला की, आपण नाशिकला मुक्काम करावा. आम्ही व दादासाहेब कुच करुन घोडपच्या सुमारे जाऊ लागलो म्हणजे. आपण आम्हांवर चालून यावे. आपले फौजेचा धुलोरा, कोशा पाहिला म्हणजे घोडे घालून लुटून येतो. ''[१३६] याप्रमाणे श्रीमंत माधवराव साहेबांची स्वारी पाहताच पूर्व संकेताप्रमाणे तुकोजींनी घोडे घालून दादासाहेबांची फौज लुटून घेतली. श्री कृपेने श्रीमंतास यश आले. पण दादासाहेब संधीचा फायदा घेऊन किल्ल्यावर गेले. ''[१३७] या प्रसंगी सुभेदाराने पेशव्यांना विनंती केली की, ''घोडे सोडून पाय उतारहोऊन किल्ल्यावर जाऊन धरुन आणितो! हुकूम झाला पाहिजे.'' [१३८] त्यावर पेशव्यांनी आज्ञा केली की, ''आता कोठे जातात? धरुन घेऊ हकनाक माणसे जाया करु नये.'' [१३९] दुसऱ्या दिवशी घोडपच्या किल्लेदाराने रघुनाथरावास पेशव्यांच्या स्वाधीन केले.

या प्रकरणामुळे पेशवा माधवरावांची मर्जी तुकोजींवर बसली. माधवराव पेशव्यांनी तुकोजी होळकर सुभेदार यास पुन्हा वस्त्र अलंकार देऊन इंदुरास रवाना केले.''[१४०]

तुकोजी हा घोडपच्या लढाईच्या वेळी माधवरावांसोबत नसावा कारण अहिल्याबाई तुकोजीस दोष देताना म्हणते.''प्रथम तो घोडपेचे साली दादासाहेबांकडे डौल दिला. ते दादासाहेबांचे तसे झाले. ते मसलत फसली.''[१४१]

गो.स. सरदेसांईच्या मते यावेळी तुकोजी तटस्थ असला तरी आतून त्याचा पाठिंबा रघुनाथरावाला होता.[१४२] तुकोजी चुलत्यास सामील आहे असे कळल्यावर पेशव्यांनी ता.८ जुन

१७६८ रोजी 'तुकोजी होळकर शिलेदार यांजकडील दरोबस्त सरजांम' एकदम जप्त केला. ''[१४३] यात तुकोजीस शिलेदार हा शब्द लावून होळकरांच्या गादीशी त्याचा काही संबंध नाही. असे माधवरावाने दर्शविल्याचे दिसते.''[१४४] तुकोजीने लगोलाग माधवरावास भेटून आपली. खरी हकीगत कळवून त्यांची खात्री केली की दादास सहाय्य करणारा गंगाधर यशवंत होय.मी नव्हे, त्यावरुन पुढे दहाच दिवसांनी म्हणजे ता.१८जून १७६८ रोजी माधवरावाने गंगाधर यशवंताची जप्ती करुन तुकोजींची जप्ती उठविली[१४५] गंगाधर तात्यास पकडून नगरच्या किल्ल्यावर ठेवले. सुमारे तीन वर्ष कैदेत कुचंबल्यावर गंगाधर तात्याने ३० लाख रुपये दंड भरला. तेंव्हा सन १७७२ च्या फेब्रुवारी पेशव्याने त्यांची सुटका केली. ''[१४६]

पेशव्याने चुलत्याची अमर्यादा यत्किंचित न करता त्यास पुण्यास आणले.''[१४७] या संबधाने राजवाडे म्हणतात, ''दादाने संस्थानद्रोह केला. त्याबद्दल त्यास करावे तसे शासन न करीता कीड तशीच राहू दिली. या किडीच्या आश्रयाने सरदारांना राज्याच्याविरुध्दवागण्यास अवसर मिळाला.''[१४८] रघुनाथरावाचा बंदोबस्त केल्यावर किंवा त्याला पराभूत केल्यावर १७६९ पुन्हा मराठयांचा फौजा उत्तरेत गेल्या.

## ३.१६ उत्तरेच्या मोहिमेच्या अगोदरची राजकीय परिस्थिती :-

पानिपतपूर्वी मराठयांना अब्दालीचा विरोध होता. आता पुढे अब्दालीचा अस्त झाला त्याबरोबर त्यांना दबावणारी इंग्रजांची शक्ती निर्माण झाली. राजकारण व लष्करी सामर्थ्य या दोनही बाबतीत इंग्रज मराठयांना वरचढ होते. पण हिंदी सत्ताधीशांप्रमाणे त्यांचा कारभार व्यक्तीगत नसून हळुहळू पदरांत पडेल ते घेऊन एकएक मजल गाठावी असा त्यांचा क्रम होता. हल्ली ते मराठयांना पाण्यात पाहू लागले येनकेन कारणाने मराठयांचे सामर्थ्य खच्ची करावे त्यांचा आश्रय बादशहाला मिळू नये हा इंग्रजांचा मुख्य प्रयत्न होता. उलट बादशहाने दिल्लीस जाण्याविषयी आतुर होऊन त्यांना टोचणी लावली तेंव्हा ते नाना सबबी दाखवून त्यास झुलवू लागले. बादशालाही त्यांचा हा डाव उमगला. शुजाउद्यौलाचे हातपाय पूर्ण बांधले गेले, म्हणून तोही स्वतंत्र राहीला नाही. जाठ रोहिले यांना इंग्रज फारशी किंमत देत नव्हते. मराठयांच्या उच्छेदापूरता इंग्रज त्यांचा उपयोग करीत. ता.२१ नोव्हेंबर सन १७६७ च्या पत्रात इंग्रज गव्हर्नर व्हेरेल्स्टने शुजास कळविले, ''आम्ही मराठयांकडे असे धोरण ठेविले आहे की, जेणेकरुन त्यांनी आमच्या शत्रुंस मदत करु नये. त्यांच्याशी दाट स्नेह

आम्ही कधी केला नाही व करणार नाही ते आमची मदत केवळ स्वार्थासाठी चाहतात. मानवीजातीच्या कल्याणासाठी नव्हे हा प्रकार महशूर आहे. न्याय व परहितेच्छा यांची चहाड आम्ही बाळगीत असल्यामुळे मराठयांशी स्नेह ठेवणे आमच्या स्वाभिनाास युक्त नाही.''[१४९]

यापूर्वीच रघुनाथरावाचे वकील निळो गोपाळ व धोंडो खंडेराव कलकत्ता व बनारस इ. ठिकाणी जाऊन इंग्रजांशी स्नेह जोडण्याच्या उद्योगात होते. इंग्रजही त्यांना गोड गोष्टी बोलू अंतर्यानातला थांग लागू देत नव्हते. मात्र रघुनाथरावाचा उद्देश मराठी राज्याचा नसून पुतण्याला आवरण्याचा होता.स. १७६७त पेशव्याचा सरदार त्रिंबकराव पेठे बुंदेलखंडात अंमत बसवीत होता. रघुनाथराव गेल्याबरोबर जवाहीरसिंग जाठाने नर्मदोत्तरचा मराठयांचा अंमल उठवून देण्याचा चंग बांधला त्यासाठी फ्रेंच सेनानी रीन मॉडेक यास त्याने मोठया पगारावर चाकरीस ठेवून त्याजकडून कवायती फलटणे बनविली. तेणेकरुन त्यांचे बळ वाढले. शिवाय दानाशा, समरु, मुहकमसिंग हे त्याचे सहायक कल्पक व चतुर होते. दानाशा  नवलसिंगाचा मेहुणा जवाहीरचा उजवा हात होता. जवाहीरच्या मृत्युनंतर त्यानेच जाठांचा पुरस्कार करुन मराठयांवर शस्त्र चालविले परंतु याच दरम्यान १७६७च्या ''मावंदाच्या लढाईत मराठयांचे दोन शत्रू जयपुरचा माधोसिंग व भरतपूरचा जवाहीरसिंग जाट एकमेंकाशी लढून हतबल झाले. ही गोष्ट मराठयांना उपकारक बनली. ''[१५०] रोहिल्यांनी माधोसिंगची मदत केली होती. पण विजयाचा फायदा घेण्यास तो जगला नाही. ''लढाईनंतर लगेच २१ डिसेंबर रोजी माधोसिंग मरण पावला. त्यास दोन पुत्र अल्पवयी होत.एक पृथुसिंग व दुसरा प्रतापसिंग अहल्याबाईने पृथुसिंगास वस्त्रे देऊन कारभार त्याच्या मातुश्रीस सांगितला आणि खुशालीराम बोहरा याचे सल्ल्याने कारभार चालावा अशी व्यवस्था ठरविली.''[१५१]

जवाहीरसिंग जाटालाही लवकरच मृत्यु आला. स.१७६८च्या जुलाईत हत्तीच्या टकरा पाहत असता एका सैनिकांने सिबंदीच्या कटकटीवरुन त्याचा खून केला. असा हा निधडया छातीचा पुढारी नाहीसा झाल्याने जाटांची सत्ता कमकुवत बनली. उत्तरेकडील क्षेत्र यावेळी असे निर्वेध झाले असता. मराठयांचा एकही पुढारी त्या बाजूस हजर नव्हता. एकटा लक्ष्मणशंकर झाशी येथे आपली निभावाणी करुन होता. या वेळची उत्तर हिंदुस्थानची स्थिती आप्पाजी मैराळ यानी पेशव्यास कळविली ती पुढील प्रमाणे सांगता येईल.''गंगाधर गोविंद सुपे कछोरकर बुणग्यांत होते. सडी फौज पुढे एक मजल होती.

गौराचे गाव मेहरा वगैरे जाळले, लुटले त्यासी परस्परे गावातून लढाया झाल्या गुजराचे गाव प्यादे स्वार होऊन धुम करितात. ''[१५२]

### ३.१७ उत्तरेतील मोहिम :-

घोडपवर रघुनाथरावांचा बखेडा थांबला तरी त्यातुनच नागपूरकर भोसल्यांचा दुष्टावा निर्माण झाला. त्याचे निराकरण करण्यात पेशव्यांचे आणखी एक वर्ष गेले. हया दोघांचा बंदोबस्त केल्यानंतर माधवराव पेशव्याने उत्तरेची मोहीम हाती घेतली. ''रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मराठी सैन्य उत्तर हिंदुस्थानात रवाना झाले. विसाजी कृष्ण यास रामचंद्र गणेशाचे कारभारी नेमण्यात आले. रामचंद गणेश बऱ्हाणपूर मार्गे २५ मे १७६९ रोजी नर्मदा किनारी पोहचला. ''[१५३]

पानिपतावर गेलेल्या मराठयांच्या सत्तेची पुन:र्स्थापना करणे जाटांकडून आणि बुंदी आणि कोटयातील राजपुतांकडून थकीत खंडणीची वसूली करणे, इ.स. १७५४ पर्यत मराठयांच्या सैनिकी मदतीच्या मोबदल्यात बादशहाकडून मिळालेल्या दुआबातील प्रदेशावर हक्क प्रस्थापित करणे तसेच दिल्ली व आसपासच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करुन शुजाउद्यौलास बादशहाचा वजीर नेमणे या उद्‌देशानेउत्तर हिंदुस्थानची मोहीम मराठयांनी सुरु केली. ''[१५४] माधवराव पेशव्यांची आज्ञा होती की तडक दिल्लीस जाऊन दिल्ली हस्तगत करावी. पण जेंव्हा सर्व सरदार मंडळी उत्तरेकडे आली. तेंव्हा त्यांनी येथील परिस्थितीचा अंदाज घेतला.आणि त्यांनी एकदम दिल्लीस न जाता बादशहा नजीबखान वगैरे निरनिराळया मंडळीशी बोलणी करुन मग दिल्लीस जावे असे ठरविले.

### ३.१७.१ जाटाचे पारिपत्य :-

तिघा सरदारांनी तीन कार्यक्रम वाटून घेतले. रामचंद्र गणेश कानडे, विसाजी कृष्ण बिनीवाले, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, कानडे बुंदेलखंडाकडे वळले, शिंदे उदेपूराकडे व होळकर बुंदीकोटयाकडे ''[१५५] आप आपल्यापरी खंडणी वसूल करण्याकडे ही मंडळी गुंतली होती. होळरकरांचा सरदार खंडूजी अरगडे ता. ४-१२-६९ रोजी लिहितो. ''बुंदी कोटयांचे प्रकरण बारा लक्ष पर्यंत चुकणार आहे. पुढे जाटाचे मुलखांत जाऊन जाटांचे पारिपत्य केल्यास माधवसिंग पन्नास लाख व बादशहा पन्नास लाख इतके देण्यास तयार आहे. जाटाने आमच्या तोंडावर दहाविस हजार

फौज पाठविली आहे. ''[१५६] या जाटाचे पारिपत्य करण्यासाठी एकूणसत्तरचे चे अखेरीस सर्व फौजा निरनिराळया कामगिऱ्या आटपून चंबलवर एकत्र होऊन जाटांचे मुलखांत शिरल्या. त्यांनी नवलसिंगास गाठिले. हा नवलसिंग जवाहिरसिंगाचा भाचा होय. त्याचे विरुध्द त्याचा भाऊ रणजीतसिंग मराठयांस मिळाला. पूर्वीची चुरस तर खरी पण हे निमित्य लढाईस पुरे झाले. जाटाचा मोड झाला फौज लुटली गेली. ही लढाई सन १७७० ता. ५एप्रिल रोजी गोवर्धन येथे झाली. नवलसिंगाकडे मिस्टर सुमरु व फ्रेंच जनरल रिनमॉडेक हे युरोपियन अंमलदार होते. त्याचा सुभेदार तुकोजीराव होळकरांनी पराभव केला. [१५७]

याप्रमाणे जाटाचा पराभव करुन मराठा फौजांनी पुढे चाल केली. आणि आग्रा व मथुरा काबीज केले. मराठयांच्या या व पूर्वीच्या विजयाने उत्तर हिंदुस्थानांत वर्चस्व वाढू लागले कंपनी सरकारच्या पोटांत त्यांमुळे धास्ती वाटू लागली. बादशहास आशा वाटून त्याने इंग्रजांकडे निकडीचे बोलणे सुरु केले. इकडे मराठेही असावध नव्हते त्यांच्या प्रयत्नाने बादशहाचा वकील मराठयांचे छावणीत येऊन बादशहाबद्‌दल रदबदली करत होता. तिकडे दक्षिणेकडून पेशव्यांनी सरदारबरोबर नजराणा पाठवून कंपनी सरकारास आपला स्नेहसंबंध दर्शविला. अशा तऱ्हेने मराठयांनी एकाबाजूस जाट इ. उत्तरस्थ राजे रजवाडयास नरम केले कंपनी सरकारास स्नेहसंबंध दाखवून तटस्थ केले. दिल्लीच्या बादशहाकडे अनुसंधान बांधून आपली शक्ती आणियुक्ती त्यास पटवून दिली. आणि रोहिल्यासही एकटेच करुन सोडले.

### ३.१७.२रोहिल्याचा पाडाव -नजीब खान :-

१७७० च्या गोवर्धनच्या लढाईत समरु व माडेक या युरोपियन सेनानीचा मराठयांनी पराभव केल्यामुळे त्यांची जरब चहुंकडून बसली आग्रा आणि मथुरेचे ठाणे घेतले आता पुढे कोणती कामगिरी हयाची वाटाघाट सरदारांनी केली. आणि याच दरम्यान नजीबखनाने भेट घेऊन मराठयांचा आश्रय मागितला. त्याला खात्री पटली होती की मराठे आपला सूड उगविणार त्याचा मुख्य आधार होळकर प्रमुख होताच, त्याच्याशी नजीबाने संधान बांधून अत्यंत आर्जवाने कळाविले. ''तुमच्याशी वैर बांधण्याची माझी बिलकूल इच्छा नाही मी तुमचे सर्व कार्य भाग आपण होऊन पुरे करुन देतो. तुमचा अंतर्वेदीतला अंमल पूर्ववत बसूवन देतो बंगसादि पठाणचा बंदोबस्त करतो दिल्लीत तुमची व्यवस्था लावतो. ''[१५८]

पलीकडे अंतर्वेदीत जाठांचा मुलुख होता. तो कब्जात घेणे जरुर होते. नजीबखानास यावेळी अब्दालीसारख्या दुसऱ्या कोणाचेही पाठबळ बाहेरच नव्हते. पण शुक्रतालची आठवण महादजी सिंद्यांच्या अंत:करणवर कोरलेली होती ती तो कशी विसरणार. त्याने निक्षून बजावले. या खानाच्या थापांवर विश्वास ठेवणे घातक होईल. ''दहा वर्षापूर्वी भाऊसाहेबांनी मथुरेवरुन एकदम दिल्लीवर चाल केली तोच क्रम आपण आताही पाळू या म्हणजे एकदम सर्वत्र आपला जम बसेल. ''[१५९]

''यावर होळकरांचे म्हणणे पडले. की दिल्लीचा मालक बादशहा हजर नसता राजधानी हस्तगत केल्याने निष्कारण गैरसमज वाढून शत्रू उत्पन्न होतात. सदाशिवराव भाऊने दिल्ली घेतल्याबरोबर मराठयांविरुध्द वातावरण बनत गेले. जवानबख्त, झीनत महाल, इत्यादिकांस निष्कारण धास्ती बसून ते आपल्या विरुध्द खटपटी करतील कदाचित खुद्य बादशहा व सुजाउद्योला इंग्रजांची मदत घेऊन दिल्लीचा कब्जा घेण्यास धावून येतील तर आपली त्रेधा उडेल, अशा स्थितीत बाहेरच्या सर्व पक्षांशी आपले विचार ठीक करुन मगच दिल्लीस हात घालावा. त्यायोगे ग्वाल्हेर, चंबळ, आग्रा, अंतर्वेद इ. आपल्या भागचा पाया मजबुत राहून मराठी सत्ता निर्वेध बनेल. त्यासाठी नजीब खनाचा उपयोग करावा. त्याचा बंदोबस्त करण्यास उशीर लागणार नाही.[१६०] अशी भरपूर सर्वांची एकत्र चर्चा झाली. शेवटी रामचंद्र गणेश कानडे, विसाजी बिनीवाले तुकोजी होळकर या त्रिवर्ग सरदारांनी महादजींच्या विरोधास न जुमानता अंतर्वेदीत जाण्याचा निश्चय कायम केला ही सर्व वाटाघाट युध्दाच्या उच्च पातळीची अलीकडील कौन्सिल ऑफ वॉर सारखी होती तीत वैयक्तीक मतलब नव्हता. तितक्यात पेशव्यांनी या संबधीचे मत कळविले की, ''नजीबाशी कायमची दोस्ती करु नये दिल्लीच्या मसलतीत त्याचा शक्य तितका उपयोग करुन घ्यावा आणि मागहून त्यास जेर करावे. ''[१६१]

पेशव्यांच्या निर्णयानुसार रामचंद्र गणेश व इतर सरदारांनी नजीबखानला निरोप पाठवून निष्टेनी व इनामदारीने मराठयांना मदत करण्याचे व दुआबातील मध्य भागाचा सनदा शहजादाकडून मराठयांच्या नावे करुन देण्याचा अटीवर त्याच्याशी मैत्री करण्याची तयारी दर्शविली. ''[१६२]

नजीबखानाला नाममात्र मराठयांशी सख्य करावायाचे होते त्याकरिता कोणत्याही अटी मान्य करण्याची त्यांची तयारी होती. ''नजीबाने पानीपतापूर्वी दुआबातील जितका प्रदेश मराठयांचे ताब्यांत

होता तेवढयाच्या सनदा शहाजाद्यांकडून आणवून मराठयास दिल्या आणि मराठयांच्या छावणीत त्यांचे आणि त्यांच्या पुत्राचे जाणे येणे निर्धास्त होऊ लागले.[१६३]

जाठांची मामलत पुरी करुन लगेच स. १७७०च्या एप्रिलांत मराठी फौजा मथुरेवर यमुना उतरुन अंतर्वेदीत शिरल्या. त्यांबरोबर साहयास नजीबखान होता फरुखबादच्या नबाब अहंमदखान बंगश याने पानिपतापूर्वी आपले साडेसोळा परगणे ताम्रपटाने मराठयांस दिले होते ते पुढे त्यांने अलीकडे परत घेतले ते व अंतर्वेदीतला जाठांचा मुलुख कबजात घेणे हे या चढाईचे पहिले मुख्य प्रयोजन होते. रामचंद्र गणेशाने बंगसाकडे परगण्याची मागणी केली ती त्याने झिडकारुन लावली त्याबरोबर त्याचे मुलखांत गंगेवर जाऊन रामघाटावर मराठयांनी छावणी केली. नदीपलिकडे बंगसाचा तळ होता. [१६४]

पावसाळयांमुळे नद्यांना पूर आलेला होता त्यामुळे मराठयांना हालचाली करता येत नव्हत्या. त्यांना मागेही जाणे शक्य नव्हते.[१६५]

मराठे कोंडीत पकडले होते. ‘‘शुक्रताल येथे दत्ताजी शिंदेची जी फसगत झाली होती त्याची जाणीव रामचंद्र गणेशला होती. ’’[१६६] नजीबखान व बंगश यांची अंतस्थ सूत्रे खेळू लागली त्याचवेळी शुजा व इंग्रज मराठयांना गिळण्यास टपून बसले होते. हा अडचणीचा प्रसंग पुण्यास कळून तेथेही चिंताक्रांन्त वातावरण बनले पेशव्याने ताबडतोब जास्त फौज उत्तरेत पाठविण्याची सिध्दता केली. [१६७] पण मराठयांच्या सुदैवाने या विश्वासघातकी नजीबखानाचा छावणीतच अकस्मात ३१ ऑक्टोबर १७७० रोजी मृत्यु झाला. ’’[१६८] मराठे भयानक संकटातून वाचले त्यामुळे पेशव्यानी पुण्याहून फौजा पाठविण्याच्या रहीत केल्या रामचंद्र गणेशाने युक्तीने बाजी सावरुन संकटाचे निवारण केले. आगाऊ सर्व व्यवस्था ठरवून हलके माघार घेत ते यमुनेअलीकडे आले.

‘‘नजीबखनाला सहकार्य देण्यासंबंधी तुकोजीचे धोरण चुकीचे होते हे यावरुन स्पष्ट होते. या चुकीच्या धोरणामुळे तुकोजी होळकर व रामचंद गणेश पेशव्यांच्या नजरेतून उतरले. ’’[१६९]

सरदार अंतर्वेदांत उतरल्यावर जाठांच्या तहाची शिष्टाई कैक दिवस चालूच होती तिचा निकाल लागून ता. ८ सप्टेबर स.१७७० ला तह पुरा झाला. (१) नवलसिंगाने ६५ लाख रक्कम हप्त्याहप्त्याने मराठयांस द्यावी, (२) दरसाल ११ लाख खंडणी भरावी आणि (३) रणजित सिंगाने

राज्याचा हक्क सोडून वीस लाखांची जागीर स्वीकारावी असा ठराव झाला.''[१७०] अशा प्रकारे रणजितसिंह जाटाने राज्यावरचा हक्क सोडून दिला व एका लाहानशा जहागिरीवर समाधान मानले.परिणामी जाट व मराठे यांच्यात दीर्घकाळ चालत असलेल्या संघर्षाचे रूपांतर मैत्रीत झाले.

उत्तरेकडील व्यवहारांकडे माधवराव पेशव्यांचे लक्ष सारखे लागलेले होते.पेशव्याचे पत्र ता.२१ डिसेंबर १७७० चे रामचंद गणेश व विसाजी कृष्ण या त्याच्या दोघां मुख्य चालकांस लिहिलेले त्यातील आशय असा ''भाऊसाहेबानंतर हिंदुस्थानांत तुम्ही सरदार सरकारची फौज घेऊन तमाम अमीर राजरजवाडे उन्मत्त झाले त्यांस शिक्षा करुन अंमल बसवावा. दक्षिणी कायम आहे अशी आवई अब्दाली शीख वगैरेवर बसवावी सिंदे होळकर पराक्रमी होते ते पहिल्यापेक्षाही अधिक करुन दाखवतील हा भरवसा फार होता. तुम्हांस जाऊन वीस महिने जाहले, किती उपयोगी कर्मे तुम्ही व त्यांनी संपादिलीत त्याचे मनन करावे. सरकारांत रुपया दृष्टीस न पडे  सिंदे होळकरांत परस्पर फुट तुम्ही उभयतां मुखत्यार परस्पर भांडता तुम्हीसारे एकदील असता तर जाठ जिवंत  कसा राहू शकता! समरु फिरंगी सांभाळून कसा जाता नजीबखनाने तुम्हांस अंतर्वेदीत उतरावयाची मसलत दिली. तुम्ही लढाई मारली असता. यश त्यास दिल्हे खंडणी पासष्ट लाख केली ती तरी झाडून पदरांत पैका पडला नाही. आता नजीबखान मृत्यू पावला मोठी व्याधी गेली प्रस्तुत त्यांच्या घरांत कलह शत्रुचा नि:पात व्हावा ऐसा समय आहे. झाबेताखाना अगोदर तुम्ही दिल्ली हस्तगत करुन आपला बंदोबस्त करावा. शुजास वजारत करुन पातशहास तख्तावर बसवावा होळकर झाबेताखानाबद्दल हिसके मारतील, त्याचे कारभारी फितुर करतील, पाय मोडून गोष्टी सांगतील त्या तुम्ही ऐकू नयेत. तुम्ही व सिंदे एक झाल्यास होळकर न येऊन काय करतील ! झाबेताखानास दगा न करावा त्यास नजीबगडास जाऊ द्यावा उत्तम न वर्तेल तर पारपत्य करावे. तुम्ही मनसुब्यास चुकला धन्याचे आज्ञेप्रमाणे करावे ते न केले आता प्रथम दिल्लीचे कार्य करावे सबब तुम्हांस सर्व खोलून लिहिले आहे. धण्याचे हित सर्वांनी करुन दाखवावे धणी कृपाच करतील जाणीजे.'' ''[१७१]

एकूणच उत्तरेकडील राजकीय परिस्थितीतील महत्त्वपूर्ण बाबी त्यांनी रामचंद गणेश व विसाजी कृष्ण यांना सांगितलेल्या होत्या. त्याचप्रमाणे एकूण राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करुन पुढील उद्योगाच्या सूचना केल्या.

## ३.१८ तुकोजीचे झाबेताखानास सहाय्य :-

माधवराव पेशव्यांच्या सल्ल्यानुसार रामचंद्र गणेश आदी मराठा सरदारांनी आपल्या कार्यवाहीस नियोजनपूर्वक सुरवात केली.

रामचंद्र गणेशने अल्प वेळ माघार घेतले याचा अर्थ बंगसास वठणीवर आणण्याचा प्रयत्न त्याने सोडला असा नाही. कल्पक सेनानीची युक्ती त्याने पुरेपूर लढविली. ''बंगसाला पाठिंबा होता रोहिल्यांचा नजीबखान मेला तेव्हा झाबेताखान मराठयांच्या छावणीत होता. त्यास रामचंद्र गणेशने लगेच नजर कैद बसविली. महादजीने सुचविले रोहिल्यांचे सर्व करार पुरे करुन घेतल्याशिवाय यास सोडू नका बादशकडून वस्त्रे व सरंजाम झाबेताखानासाठी येत होता. तो रामचंद गणेशाने प्रथम आपल्या मुक्कामावर बोलविला.[१७२] पूर्वी पनिपतप्रसंगी मल्हारराव होळकर व नजीबाखान यांच्या परस्पर संरक्षणाच्या शपथा झालेल्या होत्या म्हणूनच ऐन युध्दाच्या गर्दीतून नजीब खानाने मल्हाररावास संग्रामातून बाहेर सुरक्षित पोहविले त्याची आठवण याप्रसंगी झाबेताखानाने तुकोजीने होळकरास देऊन आपणास वांचवावे अशी त्याची विनवणी केली. त्यावरुन तुकोजी एका अंधाऱ्या रात्री झाबेताखानास छावणीतून बाहेर काढून दिले.''[१७३] एवढेच नव्हे तर तुकोजीने झाबेताखानास नजीब गडास सुखरुपणे पोहचविण्याची सुध्दा सोय केली [१७४] ''त्याबरोबर त्याने पूर्वी प्रमाणे मराठयांचा उच्छेद मांडिला त्याने बादशहांकडून मीरबक्षीचा हुद्या मिळवून मराठयांची कारस्थाने हूणन पाडण्याची खटपट सुरु केली. ''[१७५] यावरुन तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार न करता तुकोजी होळकराने चुकीच्या धोरणाचा अवलंब केल्याचे दिसून येते.

''अहिल्याबाईनी सुध्दा झाबेताखान प्रकरणाबद्दल तुकोजीला दोष दिला आहे. ''[१७६]

पुढे १७८४ - ८५ मध्ये झाबेताखानाने पुन्हा एकदा होळकरांचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पण हयावेळेस मात्र त्याचा सामना अहिल्याबाईशी होत्या त्यांनी झाबेताखान प्रकरणी तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार करुन कसा निर्णय घेतला हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

झाबेताखान रोहिला नजीबखनाचा मुलगा बापाच्या पश्चात थोडीबहुत जागीर सांभाळून रोहिलखंडात राहत होता. संधी सापडली असता तो बादशाही शत्रुस मिळून त्रास देण्यास कमी करणार नव्हता. आफरासिआब खानाने पूर्वी एक एका बंडखोराचा बंदोबस्त आरंभिला, तेंव्हा त्याने

झबेताखनास ‘मरट येथे भेटीस बोलावून शपथप्रमाण ठरविले की, तुम्ही आम्ही एक विचारे असावे. या प्रांती शीखांचा उपसर्ग चालू देऊ नये. पुन: आपण एक विचारे वागून बादशाहीचा अंमल बसवू असा ठराव त्याजबरोबर करुन वस्त्रे वगैरे देऊन ऑक्टोबर स.१७८४ त घोसगडास रवाना केले.’’[१७७] यानंतर लवकरच अफरासिआबखानाचा वध होऊन महादजी शिंदे रोहिलखंडात अंमल बसवू लागला तेंव्हा ‘‘झबेताखानाने अहल्याबाईकडे संधान बांधिले. मल्हाररावाच्या वेळेपासून हे रोहिले म्हणजे होळकरांचे मानसपूत्र बनले होते. झाबेता खानाने बाईस कळविले की आमचा हेतू तुम्हांपाशी काही दिवस येऊन राहावे आणि तुमचे हातून आमचा बंदोबस्त व्हावा. परंतु बाई अशा कामात पडणारी नव्हती.’’[१७८] महादजीचा सर्व रोष या रोहिल्यावर आहे हे जाणून तिने खानास मोघम उत्तर दिले की तुकोजी होळकर त्या बाजूस मोहिमेस येतील तेंव्हा बंदोबस्त करतील ’’[१७९]

अशा प्रकारे अहिल्याबाईच्या राजकीय मुत्सद्येगिरीचे दर्शन यातून होते. त्याद्वारे अनेक पेचप्रसंगातून त्यांनी स्वत:ची सुटका केलेली दिसते. सुरक्षित राज्यकारभार करणे  हे तत्त्व त्यांनी पाळलेले दिसते.

## ३.१९ मराठयांची दिल्लीवर स्वारी - शहाआलमची दिल्लीच्या सिंहासनावर प्रतिष्ठापना :-

दिल्लीच्या प्रकरणांत नानाविध व्यक्ती व त्यांचे निरनिराळे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे सर्वाचा संतोष राखणे व एकवाक्यता करणे कठिण झाले. इंग्रज तर मराठयांचा उद्योग सर्वथा हाणून पाडीतच होते. मुनीरुद्यौला म्हणून बादशहाचा  वकील इंग्रजाजवळ असे त्यास त्यांनी बादशहाकडे पाठवून त्यांची चांगली कान उघडणी केली की, ‘‘तुम्ही मराठयांचा आश्रय करु नका’’[१८०] इकडे सरदारांनी इंग्रजांशी हातघाईचा प्रसंग येऊ दिला नाही. माधवराव पेशव्यांने आपला वकील हरिपंडित यास नजराने देऊन कलकत्यास पाठविले. ता. २७ सप्टेंबर स.१७७० च्या पत्रात पेशव्याने इंग्रजांस कळविले. ‘‘आम्ही रामचंद्र गणेशास हिंदुस्थानचे बंदोबस्तात पाठविले आहे. या कामी तुमच्या सूचना येतील त्या आम्ही मान्य करु यास्तव हरि अमानजी पंडित या वकिलास आपल्याकडे रवाना केले आहेत. ’’[१८१]

तथापी इंग्रज महाकपटी त्यांनी नाना युक्त्या करुन बादशहाला भंडावून सोडले. त्यामुळे त्यांची द्विधा मनस्थिती होऊन त्याने एक वर्षाचा अवधी फुकट घालविला नाही तर तो पूर्वी दिल्लीस पोचू शकला असता सुरवातीपासून त्यांच्याबरोबर मराठयांचे बोलणे चालू होते. सर्वापेक्षा या बाबतीत महादजीची उत्कंठा भारी होती त्याने बादशहास धाक घातला, ''आम्ही बादशहा दुसरा बसवून गाजीउद्यीनास वजिरी देतो.''[१८२] हा घाव बादशहाच्या वर्मी बसला अंतर्वेदीत मराठे शेर झाले आता दिल्लीला काय उशीर इंग्रज शुजा वगैरे गडबडून गेले की दिल्लीस पुन्हा उलथपालथ होणार बादशहाने इंग्रजांस कळविले, ''मराठी फौजा दिल्लीच्या दोन कोसांवर आल्या गाजीउद्यीन व मीरकासीम त्यांजबरोबर आहेत. अशा वेळी तुम्ही आम्हास लष्करी साहय न कराल तर आमचा कारभार आटोपला असे समजा. ''[१८३] सैफुद्यीन महंमद हा बादशहाचा वकील मराठयांच्या छावणीत होता. त्यास महादजीने दिल्लीस पुढे पाठवून ता. ७ फेब्रुवारी स. १७७१ रोजी नगरांत शहाआलमची द्वाही फिरविली आणि झाबेता खानाकडून दिल्लीचा ताबा मागितला झाबेतखानचा हस्तक कासीम अलीखान व बेगम झीनत महाल यांनी कळविले, आम्ही किल्ल्याचा ताबा देणार नाही. ''[१८४] मराठयांनी लगेच तोफांचा मारा सुरु केला ''त्यावेळी मराठी फौजेचे संचालन तुकोजी व महादजी करीत होते. यांच्याच प्रयत्नाने दिल्ली जिंकता आली.'' [१८५] अशा प्रकारे मराठयांनी दिल्ली शहर व किल्ला हस्तगत करुन अंमल बसविला ''ता. १२ एप्रिल रोजी मराठयांचा व बादशहाचा करार झाला. आणि त्याप्रमाणे ता. १ एप्रिल रोजी बादशहा आलाहाबादेहून निघाला आणि ता. २५ डिसेंबर रोजी मोठया समारंभाने दिल्लीत येऊन त्यांने सिंहासनारोहन केले. [१८६]

अशा प्रकारे माधवराव पेशव्याचा हेतू सिध्दीस गेला सर्व हिंदुस्थानावर मराठयांचा दबदबा निर्माण झाला. उत्तरेच्या राजकारणावर पुन्हा मराठयांच्या वर्चस्वाची मोहर उठविली गेली. पानिपतचा दारुन पराभवाचा कलंक धुवून निघाला व तसेच छ.शाहुंची कल्पना ही मोगल साम्राज्यातर्गत स्वराज्य ही होती व तीच या काळातही कायम राहिलेली दिसून येते.

## ३.२० नजीबखानाची फिटाफिट व त्याचा मुलगा झाबेताखानाची फजिती :-

आता फक्त झाबेताखान तेवढा एकटा विरोधक राहिला महादजीला त्याचा सूड घेण्याची उत्कंठा असून पैशाची अडचण भागविण्यासाठीविसाजीपंत व महादजी यांनी सन. १७७२ च्या

फेब्रुवारीत बादशहास घेऊन रोहिल्यावर चाल केली. ''[१८७] झाबेतखानाची दाणादाण उडून तो जीव बचावण्यासाठी काळोख्या रात्री शुक्रतालमधून निघून गंगेपलीकडे बिजनोर प्रांतात पळून गेला मराठा लगोलग त्याचा पाठलाग करुन मुलुख उध्वस्थ करीत नजीबगडावर धावले झाबेताखान तेथूनही निसटला आणि रोहिल्यांचे ते मुख्य ठिकाण मराठयांनी हस्तगत केले. [१८८] झाबेताखानाची मुलें माणसे सर्व दौलत मराठयांचे हाती आली. [१८९]

मराठयांनी नजीबाबादवर हल्ला करुन नजीबची कबर खोदून अस्थी जाळून टाकल्या व पानिपतचा कलंक धुवून काढला. [१९०]

नजीकच रोहिल्यांचा दुसरा किल्ला घोसगड म्हणून होता तोही मराठयांनी घेऊन त्यांचा अगदी उच्छेद करुन सोडला.कत्तल लूट जाळपोळ इत्यादी बाबतीत पूर्वीच्या कृत्याचा पुरेपूर सूड या प्रसंगी मराठयांनी उगविला. [१९१] नारायणरावाने सरदारांचे अभिनंदन करुन कळविले, झाबेताखानास मोडून ताराज केले. तो पळून पहाडात गेला, युध्द मोठे झाले शुक्रताल घेतले, पथ्थरगड घेतला त्यांची दौलत हत्ती घोडे तोफा वगैरे सरंजाम पाडाव केला, स्वामीच्या फौजेस मोठे यश आले याचा विस्तार लिहिला तो श्रवण होउन संतोष झाला. तुम्ही सर्वांनी अमित यश संपादिले रोहिला अतिगर्वित होता. त्यांनी फार अन्याय केले होते, त्यांचे पारिपत्य यथायुक्त केले. मोठे यश संपादिले.''[१९२]

या विजयाबद्दल माधवरावाने सरदारांचे अभिनंदन करुन कळविले वर्तमान श्रवण करुन फार संतोष जाहला जाबेताखान रोहिला पातशाहीत फौजेने व मर्दुमीने अतिगर्वित होता. तुम्ही सर्वांनी एकदिल होऊन रोहिल्याचे पारिपत्य केले. धन्याचा नक्षा हिंदुस्थानात वृध्दिंगत केलात. शाबास तुमची सर्वांनी एकनिष्ठेने सेवा करुन स्वामी कृपा संपादिली सिंदे होळकरांच्या वडिलांनी महत्कार्य करुन शत्रू पादाक्रान्त केले. त्याचरितीने हे ही करितात या दौलतीचे स्तंभ आहेत.''[१९३]

अशा प्रकारे मराठयांनी हिदुस्थानातील राजेरजवाडयावर जरब बसून उत्कृष्ट पराक्रम केला आणि माधवरावांनीही आपल्या पराक्रमी सरदारांचा गौरव केलेला दिसून येतो.

## ३.२१ झाबेताखानाच्या पराभवानंतर उत्तरेकडील राजकारणाचे विविध रंग :-

मराठयांच्या झाबेताखानावरील विजयामुळे इंग्रज, शुजाउद्यौला, बादशहा इत्यादी मंडळी अस्वस्थ व दुश्चित झाली ''[१९४] त्यामुळे मराठे जेंव्हा दिल्लीमध्ये होत त्यावेळेस इंग्रज शुजाउद्यौला आणि खुद्द बादशहाने मराठयांविरुध्द कटकारस्थानास सुरवात केली कटकारस्थान करण्याव्यतिरिक्त ते काही करु शकत नव्हते कारण त्या काळात मराठयांचा वचकच उत्तरेकडील राजकारणावर बसलेला होता. त्याच दरम्यान ''झाबेताखानाकडील मीर बक्षीचे पद काढून महादजीने ते बादशहाकरवी पेशव्यांचे बंधू नारायणरावास दिले.[१९५] हे पद प्राप्त झाल्यामुळे शाही फौजेवर मराठयांना अधिकार प्राप्त झाला.[१९६] हे पाहून शुजाउद्यौला व इंग्रज अस्वस्थ झाले शिवाय बादशहाला सुध्दा हि गोष्ट मनापासून आवडलेली नव्हती मग काय हया तिघांनी मिळून आपल्या पुढील कारस्थानास सुरुवात केली. ''बादशहाने मीर्झा नजफखान यास मीरबक्षी करुन मराठयांचा पाडाव करण्याची सूचना केली. दिल्लीबाहेर मराठयांचा तळ असता बादशहाची पंधरा हजार फौज ता. १८ डिसेंबर १७७२ रोजी एकाएकी मराठयांवर चालून आली त्या प्रसंगी मराठयांनी बादशहाचा पराभव करुन त्यास शरण येण्यास भाग पाडले. ''[१९७]

आतापर्यंत रोहिल्यांनी मराठयांबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित केलेले नव्हते. शेवटी मराठयांनी रोहिल्यावर चढाई केली. ''हया चढाईचे कारण सांगितले जाते की रोहिल्यांनी ५० लाखरुपये देण्याचे जे वचन दिले होते. त्याचे पालन केलेले नव्हते रोहिल्यांनी सुध्दा जोरदार मुकाबला केला. आसद पूरपासून त्यांना माघार घ्यावी लागली.''[१९८]

''या मोहिमेत सुभेदार तुकोजीरावांनी रोहिल्याची फौज फोडून मोडून फस्त केली. खुद्द सेनानायक अहमदखानास पकडून कैद केले. सर्व मुरादाबाद जिल्हा ताब्यात घेतला. [१९९] त्यावेळी शुजाउदौला व इंग्रज त्यांचा मराठे मंडळात फुट पाडवयाचा प्रयत्न सारखा चालू होता. बादशहाच्या मिरबक्षिगिरीबद्यल होळकर आणि शिंद्यात मतभेद झाला. यामुळे मराठी सरदारात दोन पक्ष दिसू लागले. [२००] त्यामुळे हे प्रकरण चिघळले. तेव्हा महादजी राजपुताकडून खंडणी वसूल करण्याच्या निमित्ताने दिल्लीवरुन राजपुतान्याकडे निघून गेला. [२०१]

एवढयात पेशवे माधवरावांच्या मृत्युची बातमी येऊन पोहचली. एकंदर स्थितीचा विचार करुन सुभेदार तुकोजीराव मुरादेबादेतून निघून दिल्लीस आले. नंतर नवलसिंग यांच्याशी होळकरांची लढाई भरतपूर व डिंग यांच्यामध्ये होऊन जाटांचा पूर्ण पराभव झाला. या युध्दात खुद्द तकोजीराव हजर होते. लढाई होळकरांनी मारली तीन्ही लष्करांची लुट एकत्र करुन जबरदस्तीने बरहुकुम हिस्स वाटून दिला. फौज माघारी फिरुन जाटांपासून खंडणी वसूल करुन सुभेदार इ.स. १७७३ इंदुरात आले.[२०२]

उत्तरेची मोहिम रंगात आली होती. इतरत्र विजय झाल्यामुळे मराठयांस नवी उमेद चढली होती.पण याच उमेदीच्या काळात माधवराव पेशव्याचा मृत्यु झाला. त्यामुळे मराठेशाहीचे आतोनात नुकसान झाले खंबीर नेतृत्व राहिले नाही. आणि त्याचा परिणाम मराठ्यांच्या राजकारणावर पडल्याशिवाय राहिला नाही. शिवाजी महाराजांनी स्थापिलेले सुराज्याचे रक्तरंजीत राज्यात रुपांतर केंव्हा झाले हे कळले नाही. मराठा राजकारणाचे रंग बदलत गेले.

## ३.२२ पेशवे नारायणराव प्रकरण प्रसंगी अहिल्याबाईंची भूमिका:-

पेशवे माधवरावाने आपला धाकटा भाऊ नारायणराव यास पेशवेपद मिळावे अशी इच्छा व्यक्त केली होती. त्याप्रमाणेच सखाराम बापू व नाना फडणीस यांनी नारायणरावाचे सल्लागार म्हणून कारभार पाहवा अशी माधवरावांची भूमिका होती.

माधवरावांच्या मृत्युनंतर सुमारे एक महिन्याने ''साताऱ्याला वाटाघाटी होऊन १३ डिसेंबर १७७२ रोजी रविवारी (मार्गशीर्ष) वैद्य ३ शके १६९४ रोजी नारायणरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली.''[२०३] यावेळी त्याचे वय १७ वर्षाचे होते.''[२०४] त्यावेळी चालीप्रमाणे अष्टप्रधानांसही वस्त्रे देण्यात आली. सखारामबापूस कारभाऱ्याची, नाना व मोरोबेंदादा हयास फडणिशीची त्याचप्रमाणे मुजुमदार, चिटणीस, वाकनीस वगैरेस पूर्वीचीच पदे कायम ठेवून वस्त्रे मात्र पुन: हया समयी दिली.[२०५]

नारायणरावांसारख्या अननुभवी पेशव्याला यथायोग्य मार्गदर्शन करण्याऐवजी व पाठिंबा देण्याऐवजी पेशवे दरबारात गटबाजीचे व कटबाजीचे राजकारण सुरु झाले. माधवरावांचा चुलता रघुनाथराव या राजकारणचा सूत्रधार बनला आणि हया कारस्थानामध्येच ''३० ऑगस्ट १७७३रोजी

शनिवारवाडयात नारायणरावाचा खून झाला.[२०६] हे वर्तमान समजताच शिंदे होळकर काही फौज पागा सरंजाम घेऊन पुण्यास दाखल झाले.[२०७]

### ३.२३ रघुनाथराव पेशवेपदी :-

नारायणरावाच्या वधानंतर रघुनाथरावाने स्वत: पेशवे झाल्याचे जाहीर केले. शहराच्या बंदोबस्तासाठी गारद्यांच्या चौक्या बसविण्यात आल्या रघुनाथरावाने आपला दत्तक पुत्र[२०८] अमृतरावाला साताऱ्यास छत्रपतींकडे पाठवून आपल्यासठी पेशवाईची वस्त्रे आणली पुणे येथे दरबार भरवून ही वस्त्रे धारण करण्याची हिंमत झाली नाही. ३१ ऑक्टोंबर १७७३ रोजी भीमानदीजवळ आळेगाव येथे कोणताही समारंभ न करवता त्याने ही वस्त्रे स्वीकारुन आपल्या नावाचा शिक्का तयार केला.[२०९] तेंव्हापासून दादासाहेब पेशवा म्हणून राज्यकारभार करु लागले.

### ३.२४ बाराभाईचे कारस्थान :-

रघुनाथरावाने कट कारस्थान करुन हस्तगत केलेले पेशवेपद कोणालाही पसंत पडले नाही.म्हणून नाना फडणीस व इतर मुत्सद्यांनी रघुनाथरावास पेशवे पदावरुन उच्चाटन करण्यासाठी एक योजना आखली नारायणरावांची विधवा पत्नी गरोदर होती गंगाबाईस सुरक्षित स्थळी ठेवायचे व तिला पूत्र झाल्यावर त्यांच्या नावाने पेशवाईचा कारभार चालवायचा असे मुत्सद्यांनी ठरविले या योजनेचे मुख्य सूत्रधार ''नाना फडणीस, सखाराम बोकील, हरिपंत फडके, त्र्यंबकराव पेठे, भवानराव प्रतिनिधी, तुकोजी होळकर, महादजी शिंदे, मालोजी घोरपडे, मारोबा फडणीस, रास्ते, पटवर्धन, बापूजी नाईक यांचा समावेश होता. एकूण बारा मुत्सद्यांनी ही योजना आखलेली असल्यामुळे त्यास बारभाईचे कारस्थान असे संबोधले जाते.[२१०]

''२७ फेब्रुवारी १७७४ रोजी छत्रपतींनी रघुनाथरावास पेशवेपदावरुन दूर केल्याचे आज्ञापत्र काढले.[२११] राज्यातील मुख्य अडतीस लोकांना ते पाठविण्यात आले.[२१२] त्यामुळे बाराभाईची परिस्थिती मजबुत झाली.

## ३.२५ सवाई माधवराव पेशवा :-

''नारायणरावाची पत्नी गंगाबाई हिला पुरंदर किल्ल्यावर बुधवार १८ एप्रिल १७७४ रोजी पुत्र झाला.[२१३] त्याचे २९ एप्रिलला बारसे झाले असावे.[२१४] तो सवाई माधवराव म्हणून ओळखला जातो. सवाई माधवरावांना वयाच्या ४०व्या दिवशी २८ मे १७७४ रोजी पेशवाईची वस्त्रे देण्यात आली.[११५] माधवरावासाठी पेशवाईचे वस्त्रे शिक्के कटयार गंगाबाई गरोदर असताना पुरंधरला सुमुहुर्तावर आणून ठेवले होते.[२१६] रघुनाथरावाला २९ मे १७७४ रोजी पेशवेपदावरुन हाकलून लावले.[२१७]

वयाच्या ४०व्या दिवशी एका मोठया सत्तेच्या उच्चपदी पोहचलेला सवाई माधवराव हा जगाच्या इतिहासातील कदाचित एकमेव प्रमुख राज्यशासक असेल. त्याला पितृसुख तर नव्हतेच पण मातृसुखही दीर्घकाळ मिळाले नाही. कारण गंगाबाईचा मृत्यु तो सव्वातीन वर्षाचा असतानाच झाला. त्याचे बालपण पुरंधरवरच संरक्षणात गेले. २६ एप्रिल १७७९ च्या मध्यरात्री सुमुहुर्तावर माधवरावाने शनिवारवाडयात प्रवेश केला.[२१८]

## ३.२६ बाराभाईंचा रघुनाथरावांशी लढा :-

सखारामबापू बोकील नाना फडणीस इत्यादी मुत्सद्यी विरोधात गेल्याने रघुनाथरावाने मुधोजी भोसल्यास बोलावून घेतले. मराठे शाहीतील अस्थिरता लक्षात ठेवून हैदरअलीने कर्नाटकातील मराठयांच्या प्रदेशवार हल्ले सुरु कले. -हैदरअलीचा बंदोबस्त करण्यासाठी रघुनाथरावाने पुणे सोडले.[२१९] नेमकी ही संधी साधून नाना फडणीस व इतर मुत्सद्यांनी रघुनाथरावांच्या विरुध्द कारस्थान रचले.या कारस्थानानुसार रघुनाथरावाला अटकाव करण्यासाठी बारभाईच्या फौजेचे नेतृत्व त्रिंबकराव पेठे व हरिपंत फडके यांचेकडे होते.[२२०] पंढरपूर पासून आठ मैलावर कासेगाव याठिकाणी त्रिंबकराव पेठेशी रघुनाथरावाने तडजोडीची बोलणी सुरु केली. रघुनाथरावाने पाठविलेल्या शांततेच्या प्रस्तावामुळे त्रिंबकाराव पेठे बेसावध राहिले. याचा फायदा घेऊन रघुनाथरावाने पेठयांवर अचानक २६ मार्च १७७४ रोजी आक्रमण केले.[२२१] गाफील राहिल्यामुळे या कासेगावच्या लढाईत त्रिंबकराव पेठे सारखा शूर सरदार पराभूत होऊन जखमी झाला आणि पुढे आठ दिवसांनी त्याचा मृत्यु झाला त्रिंबकरावपेठेची निधनाची वार्ता कळताच छत्रपतींच्या [२२२] संरक्षणासाठी साताऱ्याला गेलेला

हरिपंत फडके त्वरेने रघुनाथरावांच्या रोखाने निघाला हरिपंताने पराभूत फौजेला धीर देऊन संघटीत केले. या वेळेपावेतो निजाम व साबाजी भोसले यांना आपल्या पक्षात ओढण्यास बाराभाईंस यश आले. त्यामुळे बारभाईच्या मदतीला निजामाचे व साबाजीचे सैन्य गेले त्यामुळे मराठयांची बाजू सावरल्या गेली. फडके, निजाम व भोसले यांच्या सैन्यापुढे आपला निभाव लागणार नाही असे वाटून रघुनाथराव माळव्याकडे शिंदे होळकरांची मदत मिळविण्याकरिता निघाला.

## ३.२७ बारभाई संबंधी अहिल्याबाईंची राजकीय भूमिका:-

बाराभाईंच्या कारस्थानास अहिल्याबाईचा पूर्ण पाठिंबा होता. अहिल्याबाईचे आणि रघुनाथरावाचे संबंध कसे काय होते हे सांगितलेल्या हकीगतीवरुन कळणारच आहे. बारभाई जेंव्हा रघुनाथरावाच्या मागे लागले तेंव्हा त्यांनी एकदम माळव्यांतच भरारी मारली त्यांचा असा विचार होता की, आपण अहिल्याबाईकडे गेल्यास आपणास त्यांचा आश्रय मिळेल. परंतु जेव्हा रघुनाथराव हे माळव्यात आले तेंव्हा आहिल्याबाईंनी आपली राजकीय भूमिका कशा प्रकारे निभावली हे पुढील प्रमाणे सांगता येईल.

''दादासाहेबांचा विचार महेश्वरांस जाऊन होळकरांस आपलेसे करावे अशा बेताने कसरावदेकर आले . तो बाईसाहेबांनी कृष्णाजी मुरार यांजबरोबर फौज देऊन दादासाहेबांचे मुकाबल्यास पाठविले. या प्रसंगी आपले येणे अप्रशस्त आपण धनी आपल्यास प्रतिकुल कोण आहे पण प्राप्त प्रसंगाची हवा पाहिली असता आम्ही मारले जाऊ यास्तव आपणास नर्मदा उतरणेस सल्ला नाही.'' तेंव्हा अली मोहनचे राज्यातून महीचे सुमारे गेले.[२२६]

अहिल्याबाईचे धोरण पेशव्यास अनुकुल असेच होते. हयाच दरम्यानचा रघुनाथरावांबद्दल अहिल्याबाईचा संवाद पुढील प्रमाणे सांगता येईल.

वकीलसाहेब (विठ्ठल शामराज ) अहिल्याबाईच्या भेटीस गेले असता. अहिल्याबाईंनी त्यांना रघुनाथरावांच्या वर्तमान स्थितीबद्दल विचारले त्यांत कशा पध्दतीने संवाद झाले ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

वकील साहेब अहिल्याबाईच्या भेटीस गेले असता. अहिल्याबाईंनी त्यास दादसाहेबांकडील वर्तमान विचारले ''राजश्री हरिपंत तात्या फिरुन पुण्यास गेले व तुकोजी होळकर वाफगावांस गेले म्हणून ऐकतो तुम्हांकडे काही पत्रे आली की काय दादासाहेबांचा बंदोबस्त कसा जाला काही तुम्हांस लिहिले आले असेल यावर वकीलांनी उत्तर केले. आतांशी तात्या पुण्यास आले आहेत दादासाहेब कुंभारीधरण गावाजवळ गंगाउत्तरतीरी तामसवाडी म्हणून लहान गाव आहे तेथे आहेत नवा वाडा राहण्यास करवितात. तात्यांनी दोन तीन महिन्याची खर्चाची श्रीमंताची बेगमी करुन राजश्री विसाजी अप्पाजी आठवले त्यांजवळ ठेऊन, काही फौजही ठेऊन पुण्यास गेले. तेथे श्रीमंताचे मर्जीनुरुप काय बंदोबस्त कर्तव्य तो करतील आम्हाकडेही काही अद्याप पत्रे आली नाहीत. परंतु असे वर्तमान ऐकले आहे.

हे भाषण ऐकून अहिल्याबाई म्हणाल्या ''ईश्वर करा त्यांची त्यांची घरांत समजुत पडो.नी दुनियाचा कांच तुटो यांत सर्वांचे बरे आहे. पेशजी श्रीमंत राजश्री नानासाहेबांनी आम्हासं दादासाहेबांचे वर्तमान लिहिले होते. पुढे जसा तह होईल तसे लिहून पाठवू म्हणून आहांस पत्र लिहिले होते. तुम्हांसही पत्रे आली होती. यावर वकील बोलले कि, ''आतांशी तात्या गेले आहेत श्रीमतांची त्यांची भाषणे होतील पक्केपणे काय निश्चय होईल तो आपल्यास लिहितील'' त्यावर अहिल्याबाई म्हणाल्या ''नाना कृपा करितात तेवढे आमचे तिळी आहे तात्यांची ममता आम्हांकडे नाही वकील -''आपल्यास असा भास आहे परंतु उभयंता शरीरे मात्र दोन आहेत प्राण एकच आहेत केवढया मसलती गाढ पडल्या तितक्या निवारण राज्यभाराचा बंदोबस्त करितात. त्यामध्ये सम विषम जाबसाल कित्येक पडत असतील तेथे कोठे तीव्र कोठे सौम्य असे पै 'दरपै' जाबसाल करणे प्राप्तच आहेत. त्या अर्थी ज्याचे जसे कामावर बोलणी स्थूल सूक्ष्म होतात. तसे आपलाले भावी भवितात.परंतु उभयतांत द्वैताचा लेश नाही. आपणही लहानमोठा राज्यभार करीता कारभार सांप्रत आपल्यास सावकाशवाटत नाही परंतु अशांतही कारभार करणे कंपश कोणाशी बोलणे प्राप्त आहे की नाही अहिल्याबाई, ''खरी गोष्ट आहे जेथे न पोहच तेथेच विस्कळीत होते. शाबास त्यांचीच छाती! त्यास उपमा देयास दुसरा नाही. दादासाहेबांनी इतकी घाण केली!''[२२७]

थोडक्यात असे म्हणता येईल की, दादासाहेब हे स्वत: दुहीची परिस्थिती उत्पन्न करण्यास कारण मात्र झाले. पेशवाई जावयास ते अथवा त्यांचे पुत्र हे मूळ कारण होते. हे कधीही विसरता कामा

नये. दुर्योधनाच्या वेळेपासून तो दादासाहेबांच्या वेळेपर्यंतच काय पण आतापर्यंतही मोठयामोठया लोकांची अशी समजूत आहे की, त्या त्या काळी जी वाईट परिस्थिती उत्पन्न झाली ती व्यक्तीने उत्पन्न केली. पण हा निव्वळ भ्रम आहे. एक व्यक्ती जर असे अनर्थ करते तर मग एकीचे महत्त्व ते काय? दुर्योधनास शकुनि, कर्ण इत्यादिकांचे त्यांचे हितचिंतक सामील होते. पण भीष्म द्रोणाचार्य यासारखे सत्यवादीही कर्तव्यनिष्ठवानही त्याच्याच बाजूने होते सखारामबापूने तरी काय हेच केले नारायणरावधासारखे ज्याने पातक केले त्यास ‘‘देहांत प्रायश्चित्त सांगणारा एकच रामशास्त्री मिळावा येथूनच पेशवाईच्या अधोगतीस सुरवात झालेली दिसते.

शिवाजी महाराजांनी सामदाम करुन आधी सुराज्य केले. त्यांस साधुसंतांचे सात्विक जीवन मिळाले त्यामुळे रोपे चांगली जोमदार निघून ती खडतर आघात सहन करु लागली हे सात्वीक शिक्षण पेशवाईत नव्हते. त्यामुळे चोहोंकडे स्पोटक वातावरण तयार झाले. रामशास्त्री, नाना फडणीस, हरिपंततात्या, महादजी, अहिल्याबाई यांच्या सारखी जिवंत जीवनाची सात्वीक जीवनाची मंडळी निघाली तर सभोवतालचे वातावरण दमट होऊन मोठा  भडका उडावयास मध्ये थोडा विरंगुळापडे पण त्यातल्या त्यात रघुनाथरावांसारख्या व्यक्तीचा जर उदय झाला तर जिकडे तिकडे सपाटून भडका उडायचा. असा प्रकार शेवटी शेवटी मराठेशाहीत माजला. यावरुन त्याकाळची मराठेशाहीची परिस्थिती किती शोचनीय होती हे कळते. या परिस्थितीतून वर  काढावयास शिवाजीसारखा महात्मा एखादाच होतो. त्यावेळी दादासाहेबांविरुध्द जी थोडी बहुत मंडळी होती त्यातच अहिल्याबाई देखील होत्या.

## ३.२८ रघुनाथरवांचा पाठलाग व गुजराथेतील मोहीमः-

अहिल्याबाईंनी रधुनाथरावास आपणा विरुध्द येथील वातावरण असल्याने आपण नर्मदा उतरणे योग्य होणर नाही असे सांगितल्यामुळे रघुनाथराव अलीमोहनचे राज्यातून महीचे सुमारे गेले.

‘‘राघोबा उत्तरेकडे निघून जात असता हरिपंत फडके यांनी साबाजी भोसले व निजाम यांच्या मदतीने त्याचा पाठलाग केला. [२२८]

‘‘दादासाहेबांनी आता अगदी निरारळाच मार्ग काढिला सुरत व भडोच येथील इंग्रजांच्या आश्रयास जाण्याकरिता व गोविंदराव गायकवाडाचे सहाय्य मिळविण्याकरिता दादासाहेबांनी सन

१७७५च्या प्रारंभी गुजराथेकडे पळ काढिला[२२९] त्यामुळे हरिपंत फडक्यांनी रघनुाथरावांचा सामना कशा पध्दतीने करावा हे कळेना सबब शिंदे होळकर यांजला मदतीस पाठविले. शिंदे व नाना फडणीस यांचा अंतस्थ मेळ काही कारणीभूत शिंद्यांचे जाण्यास दिनावधी लागली. होळकर दरकूच पोहचून कोंडाईबारी गुजराथचा काकड तेथे हरिपंततात्या होळकर मिळोन दादासाहेबांशी लढाई मातब्बर झाली. मानाजी फांकडे वगैरे पांच चार सरदार जखमी पाडाव करुन होळकरांनी आणिले. तसाच पाठलाग केला. दादासाहेब भडोचेस दाखल झाले. तेथे काही उपद्रव करावा तर इंग्रजांशी वैर करुन आज शहास गंतुन पडावयाचे कारण नाही. ऐसी मसलत हरिपंतातात्यांनी करुन माघारी फिरले.[२३०]

## ३.२९ हरिपंत तात्यांची अहिल्याबाईच्या दरबारी शिष्टाई:-

गुजराथेतील मोहीम अपयशी ठरल्यानंतर सुभेदार इंदुरास गेले. हरीपंततात्यांनी फौज खानदेशांत पुणे मार्गाकडे रवाना करुन सडे अहिल्याबाई पुण्यवान व कारस्थानी दोन्ही अंगे एक सारखी तेंव्हा दर्शन घेऊन जावे या भावे महेश्वरास आले.[१३१] हरिपंततात्याचा उद्‌देश अहिल्याबाईंना भेटून त्यांना बारभाईच्या कारस्थानात सामील करुन घेण्याच्या इराद्याने महेश्वरला आले होते.त्यांचे परिचित होळकरांचे एक सरदार कृष्णाजी मुरार यांना भेटून त्यांनी अहिल्याबाईकडे आपल्या कामाचा श्रीगणेश करावा असा आग्रह धरला. तेंव्हा कृष्णाजी मुरार यांनी स्पष्ट उत्तर दिले. की ‘‘अशा गोष्टी बाईसाहेबांशी आम्ही कोणीही बोलण्याइतके कोणाचेही पुण्य नाही. येथे त्यांचे मुखावाटे आज्ञा होईल तितका व्यवहार करुन आहो, अगोदर पुत्रशोक, त्यांत राज्य दुसऱ्याचे स्वाधीन केले. त्यांत मनस्वी किलाफ. मातुश्रीच्या स्वभावांत पीळ सूर्योदयापासून पुनः सूर्योदयापर्यंत सदाचरणाच्या घटका नेमलेल्या त्यांत अवकाश करुन हांक मारली असता प्रश्न करतील तितकी विंनंती करावी अधिक बोलले असता मर्जी कोणे कलास जाईन ही भीती उदास म्हणून गवताची पेंडी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल इतकी मुखत्यारी कोणकडे नाही. हा विषय आपण समक्ष बोलले असता. रुकार अथवा अन्य विचार उत्तरात काय निषन्न होईल तो खरा’’[२३२] पुढे तिसऱ्या दिवशी तात्यांची व अहिल्याबाईंची भेट झाली. आणि तात्यांनी बोलणे सुरु केले तेव्हा अहिल्याबाई म्हणाल्या, ‘‘आपले बोलणे मुत्सदी काव्याचे आमचा विषय पाहता गैरसमजुती बद्‌दल आमच्या उपमा अन्यत्रास देतात ते आम्ही प्रत्यक्ष, त्यात बायका माणसे आमची समजुती काय? आम्हास जे बोलणे ते

उघडे बोलावे त्याचे उत्तर करु.''[२३३] तेंव्हा हरिपंत तात्यांनी बारभाईमध्ये सामील होण्यासाठी बेल उचलून शपथ क्रीया करावी लागेल असे सांगितले. तेंव्हा अहिल्याबाईनी अतिशय समर्पक भाषेत उत्तर दिले. ''तात्या ईश्वर इच्छेकडून मजवर सर्वापरी गहजब अशांत म्या दौलत दुसऱ्यांचे स्वाधीन करुन राहिले. आयुष्यते परत्रेचे विचारात काढावे अशा भावी नर्मदातीरी क्षेत्र पाहून दिवस लोटते. तथापी आमचा हा विचार कैलासवासी मल्हारजी होळकर यांनी श्रीमंताचे गादीशी केला. त्यात अवघे आम्ही बांधलो. आहो जागजांगा असे विचार घडु लागले असता, आमच्या बुध्दीने बेल म्हणजे भाजीपाला त्याचे साधन असे आहे ! आपण श्रीमंताचे दौलतीचे खैरख्वाहआहां आपण वेगळे बोलणे बोलता हेच अप्रशस्त[२३४] असे सडेतोड उत्तर केले. तेंव्हा हरिपंत तात्या फडके यांना काय बोलावे ते सुचेना शेवटी हरिपंत तात्यांना पोटशुळाची कायमची व्यथा होती. यावेळी विषय बदलण्यास ती त्यांना उपयोगी पडली. ते अहिल्याबाईंना म्हणाले. ''उपद्रव विशेष होत चालला. आज्ञा होईल तरी मी डेऱ्यास जाईल''[२३५] असे बोलून तेथून निघण्याची परवानगी अहिल्याबाईंकडून घेतली दुसरे दिवशी हरिपंत तात्या वाडयात आले. एकांती बाईसाहेबांशी कित्येक प्रकारची बोलणी होऊन बिदा मागितली वस्त्रे अलंकार देऊन बिदा केले. ते पुण्यास आले.[२३६]

थोडक्यात असे म्हणता येईल की, हरिपंत तात्या यांना अहिल्याबाईंच्या दरबारातून यश आणि अपयश यां दोघांचा नजराना मिळाल्यासारखे झाले अपयश म्हणजे अहिल्याबाईने बेलपत्र घेऊन बारभाईंशी एकनिष्ठ राहण्यासंबंधी नकार दिला. ही झाली एक बाजू दुसरी बाजू सत्यताप्रधान, प्रशासकीय कुशलतेची, मुत्सद्दपणाची आहे यात अहिल्याबाईंची धन्याशी एकनिष्ठपणे आपण बांधलेले आहोत असे सांगितले आहे. मनाची एकनिष्ठता खरी केवळ शिवावरी बेल उचलून देण्याचे नाटक केले ते खरे नव्हे. बेल म्हणजे काय झाडाचा पाला. या अहिल्याबाईच्या बोलण्यावर हरिपंत तात्यांना आणखीन  काही बोलण्याची गरज भासली नाही.

## ३.३० तुकोजी होळकर व अहिल्याबाई यांच्यात वैमनस्य, महादजी शिंद्यांची मध्यस्थी, अहिल्याबाईचा बाणेदारपणा :-

सन १७६६मध्ये मल्हारराव होळकर मरण पावला तेंव्हा त्याचा कारभार माधवराव पेशव्याने मल्हाररावाची सून अहिल्याबाई हिला सांगून बाहेर मोहिमा करण्यासाठी तुकोजी होळकराची नेमणूक

केली द्विमुखी कारभार बिलकूल यशस्वी झाला नाही. तुकोजीचे व अहल्याबाईचे तीस वर्षात कधीच पटले नाही.[२३७]

होळकरशाहीचा कारभार सर्व अहिल्याबाई करीत होती. आणि तुकोजी बाहेर मोहिमेवर राहून चाकरी करी. तुकोजी शूर परंतु भोळा, विकारवश परप्रत्ययनेयबुध्दि होता. तसाच तो मद्यपि व विषयलंपट असून त्याचे पुत्रही त्याच्याच सारखे निपजले.[२३८] तुकोजीचा भोळसरपणा, बेहिशोबीपणा आणि व्यसनीपणा यामुळे अहिल्याबाई आणि तुकोजी यांच्यात वारंवार बेबनाव होत राहिला.''तुकोजीच्या सरंजामी खर्चासाठी पेशव्यानं त्याला जागीर दिली होती.[२३९] तरी तुकोजीचे पैशाच्या मागणीसाठी पत्रे नेहमीच अहिल्याबाईस येत असत. जे खर्चाची निकड फौजत फार आहे काही खर्चास द्यावे. [२४०] त्यावर जे सारा मुलकी ऐवज त्यांनी ओढून नेला जागा जागा त्यांनी आपले बंदोबस्त करुन गेले आहेत आता माझ्या हाती काय आहे? कोठून खर्चास पाठवावे असे बाई बोलत.[२४१] त्यांचा कारभारी नारो गणेश या दोघांत वितुष्ट आणण्यात कसूर करीत नव्हता. त्यामुळे त्यांच्यातील बेबनाव वाढतच गेला.

तुकोजी होळकर गुजराथची स्वारी करुन खानदेशात होते अहिल्याबाईंशी बेबनाव किंवा वितुष्ट निर्माण झाल्यामुळे तुकोजीला आपण होऊन महेश्वरास अहिल्याबाईकडे जाणे प्रशस्त वाटत नव्हते. तेंव्हा महादजी शिंदे यांना इंदुरास बोलवून तुकोजीने त्यांच्याशी बोलणे केले की, ''तुम्ही आमचे बंधू, ते पक्षी मातुश्रीसाहेबांकडे जाऊन आपसांतील सफाई करावी.[२४२] तेंव्हा महादजी शिंदे बोलले की ''श्रीमंत, मोंगल, भोंसले या प्रकरणी अधिक उणे जाब असल्यास त्यांतील व्यवस्था आपले मानोगतानुरुप घडून येईल. पण बाईसाहबांपाशी जाऊन यश यावे असे मनोत्साहात वाटत नाही. परंतु घरचे काम, ते पक्षी जातो घडेल ते खरे[२४३] असे बोलोन एक पालखी व चौघे खिजमतगार व दोन घोडे कोतवाल इतक्यांनिशी महेश्वरास आले.[२४४] बाईसाहेबांस समजताच मुकुंदराव हरीदिवाण यांस सामोरे पाठवून बहुत समारंभाने किल्ल्यावर आणेन वाडयातच राहावयाची सोय केली. [२४५] इ.स. १७८० च्या २८ डिसेंबरपासून इ.१७८१ च्या जानेवारीपर्यंत महादजी शिंदेचा मुक्काम महेश्वरास होता.[२४६] त्यांच्या बोलण्यात मुख्य विषय तुकोजीचाच होता. संमेटाचे पर्यावसन होत नाही हे पाहून महादजी शिंदे अहिल्याबाईस बोलले की ''बाईसाहेब आपण इतकी अंगवणाची बोलणी बोलता परंतु आम्ही पुरुष आहोंत आपले ढंगावर आलो. असता आपण काय

कराल?[२४८] यावर अहिल्याबाईचे उत्तर ''जसे तुम्ही आपल्या बाया सुपारीच्या खांडा सारख्या तोंडात टाकून गिळून गेला तोच बोध तुकोजी होळकरास करुन उभयतां फौजबंदीने येण्याचे करावे इंदुरीहून तुमचे कूच त्याच दिवशी हत्तीचे पायांत अंडी घालून तुमची खात्री करीन तरच मल्हारजी होळकरांची सून तुमचे मनात गुबार होता तो तुम्ही बाहेर काढला या गोष्टीस चुकाल तर तुम्हांस मार्तडाची शपथ.[२४७] बाईच्या रागावर महादजींनी गोष्ट हसण्यावर नेण्याचा उपाय शोधून कटुता टाळली आणि ते इंदूरी निघून आले. त्याच सुमारास नारो गणेशाने सैन्यास फितुर करण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा सैनिकांनी उत्तर दिले. ''अन्यांसी व शिंद्यांशी एखादे वेळेस श्रीमंताशी तुम्ही लढाई केल्यास आम्ही तुमचे चाकर आहोत तुमचे पुढे मरु मात्र अहिल्याबाईशी तुम्ही लढाई करु म्हणाल तर आम्ही तुमचे चाकर नाही.[२४९]सैनिकांनी नारो गणेशाच्या फितुरीला स्पष्ट नकार दिला तर महादजी शिंदेंनी नारो गणेशाच्या फितुरीला काहीशा प्रमाणात साथ देण्याचे कबुल केले पण तुकोजी व अहिल्याबाई यांच्यात वितुष्ट आले असूनही तुकोजी अहिल्याबाईंशी प्रामाणिक राहिला त्याचे म्हणणे हे होते की, ''बाईसाहेबांचे पायाशी हरामखोरी मजकडून एकरुप व्हावयाची नाही कदाचित ढंग दोषे करुन तिचे मनांत मजविषयीही पाप आल्यास मी हात बांधून रुबरु जाईल मग ती प्राण घेवो वा कैदेत ठेवो ते मजला कबूल आहे. परंतु हरामखोरी माझे प्राणांत प्राण आहे तोपर्यंत होणार नाही या करिता दौलत उद्या जात असेल तर आज जावो. मी जोडा संभाळून राहील माझे वस्तु ही गोष्ट सुतराम होणार नाही.[२५०] तुकोजी होळकरांचा असा ठाम निश्‍चय पाहून महादजी शिंदे नारो गणेशाची बोलोन उज्ज्नीस गेले नंतर तुकोजी होळकर पुण्यास निघून गेले.

सारांश, अहिल्याबाई होळकर आणि तुकोजी होळकर ह्यांच्यातील बेबनाव पूर्णत: नष्ट झाला नाही. ह्यांच्यासाठी ते दोघे जबाबदार होते किंवा परिस्थिती कारणीभूत होती दोघांच्या भांडणात नारो गणेशाने प्रमाणापेक्षा जास्त हस्तक्षेप केल्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण त्यात तो यशस्वी झालेला दिसत नाही. महादजी शिंदेचे त्यांच्यातील मत भेद नष्ट करण्याचे तडजोडीचे प्रयत्न यशस्वी झालेले दिसत नाहीत. सर्वांनी एकत्र जमून सामोपचाराने निकाल करण्याचा योग कधीच आला नाही. त्याचप्रमाणे अहिल्याबाईमधील करारीपणा बाणेदारपणा निर्भयता कठोरता हे गुणही दिसून आले.

### ३.३१ पेशवा सवाईमाधवरावाचे लग्न :-

सवाई माधवरावाचे लग्न केशव भैरव थत्ते नाईक (टोकेकर) यांची कन्या रमाबाई हिचे सोबत १० फेब्रुवारी १७८३ रोजी सोमवारी (शुभकृतनाम संवत्सर माघ शु. ९ शके १७०४ ) रोजी पर्वतीवर मोठया थाटाने झाला. [२५१] अहिल्याबाईंनी पेशव्यांच्या विवाहाचे आमंत्रण गेले होते त्यावर त्या बोलल्या. ''माझ्या चित्तांत लग्नास येण्याचे होतेच परंतु पूर्व सूचना असती तर खामुखा येणे न होते. तेथे गेल्याने माझीही कामे फार होती परंतु दिवस थोडे राहिले असो. मुख्य गोष्ट श्रीमंताचे लग्न शुभकार्य झाले. यात आम्हास समाधान आहे. जेथे तुकोजी बाबा आहेत तेथे आम्हीच आहोत.[२५२] अहिल्याबाईंसही पेशव्यांच्या विवाहनिमित्त ११८ मोती असलेली माळ जरीचे पातळ, पैठणी व शाल आदि लग्नाची वस्त्रे पाठवून बहुमान केला गेला.[२५३] सवाई माधवरावंचे लग्न हे मराठयांच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण घटना होती त्याच प्रमाणे त्याच साली आणखी एक महत्त्वपूर्ण घटना कि ज्यामुळे मराठयांच्या चिंतेचा भार कमी झाला आणि त्यांना साम्राज्यांच्या शत्रुकडे राज्य कारभाराकडे लक्ष देता आले ती घटना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### ३.३२ रघुनाथरावांचा मृत्यु ११ डिसेंबर १७८३ :-

सालवीच्या तहानंतर इंग्रजांनी दादासाहेबांस रुखसत दिली.[२५४] दादासाहेबांचा विचार गोदातीरी रहावें असा होता. नानांनीही त्या अर्थी त्यांस पत्रें लिहिली. होती तरी पण श्रीमंत दादासाहेबांनी परशरामभाऊ, हरीपंत फडके ह्यांच्यापासून पृथक इनामपत्रे व बेल भंडार घेऊन ते १७८३ च्या जुलै महिन्यांत खानदेशात आले. त्यांस आणावयास तुकोजी होळकर, फडके व रास्ते गेले होते. त्यांची व दादासाहेबांची बोलणी झाली.[२५५] त्यांना तुकोजी होळकरने सुरक्षिततेची अभिवचन दिले.[२५६] ते गोदावरीतीरी कोपरगावी दरमहा २५००० रुपये नेमणूक होऊन राहिले. सन १७८३ साली डिसेंबर ता.११ रोजी ते स्वर्गवासी झाले.[२५७]

## ३.३३ टिपूवरील स्वारी, टिपू मराठयांच्या लष्करावर छापा घालतो. तुकोजीचा दूरदर्शीपणा:-

कोपरगाव येथे रघुनाथरावांचे निधन झाले त्यामुळे पुण्याच्या पेशवे सरकारचा बराचसा चिंतेचा भार कमी झाला. इंग्रज स्वस्थ बसले आणि निजाम आणि हैदर यांजकडे वळण्यास मराठयांना संधी प्राप्त झाली.

हैदर या सुमारास मृत्यु पाऊन त्याचा मुलगा टिपू हा सत्ताधीश झाला होता. गादीवर येतांच त्याची इंग्रजांशी गाठ पडली बिदनुरास इंग्रजी फौज त्याने कैद केली होती आणि इंग्राजांस त्याने आपले म्हणणे मान्य करावयास लाविले.[२५८]

सन १७८० च्या तहाने नरगुंद व कित्तुर या संस्थानांवर मराठयांचे सार्वभैमत्व असे आणि संस्थानाकडून मिळणारी खंडणी मात्र हैदरने घ्यावयाची होती टिपूच्या मनात या अटीचे अतिक्रमण करुन दोन्ही संस्थाने शक्यतर आपल्या राज्यांत सामील करावी असा विचार झाला. पोटांत हा डावपेच आणि बाहेर प्रकार दुसरा म्हणजे पेशव्यांचे दरबारी मित्रत्वाच्या नात्याने वकील पाठविला हे सर्व ओळखून नानांनी तुकोजी होळरांसह यादगिरी येथे निजामाची ता.२१ मे सन १७८४ रोजी भेट घेतली[२५९] पुणे सरकारच्या वतीने नाना फडणीस तुकोजीराव होळकर आणि हरिपंत फडके प्रमुख होते. या भेटीमध्ये परस्परातील मतभेद दूर करुन टिपू सुलतानाच्या राज्यावर हमला करण्याचे गुप्त नियोजन केले गेले.[२६०]

येवढया अवधीत नरगुंद व कित्तुर ही संस्थाने बळजबरीने काबीज करुन टिपूने आपल्या राज्यात सामील केली इतकेच नाही तर घटप्रभा मलप्रभा या दोन नद्यांमधील व बेळेगांवचे आसपासचा मुलुख घेऊन मिरजेच्या किल्ल्यावर जाण्याचा रोख दाखविला[२६१] यामुळे मराठयांना टिपुविरुध्द त्वरीत आक्रमण करणे भाग पडले. तेंव्हा मसलत प्राप्त होऊन हरिपंततात्याबरोबर फौज देऊन भोसले मोगल सामील करुन हरिपंत तात्या व सुभेदार व मोंगलांकडील जमाव व भोसल्यांकडील फौज मिळून लाख फौजेचे जमाव करुन टिूपचे मुलुखात शिरले. सावनूर बंकापुरावर लढाई मातबर होऊन टिपू उधळून आपले मुलखंत गेला. मागे हेही दरकूच चालले.[२६२] टिपुचा

कागदपत्र येणे तो सुभेदाराकडे यावा इतरांशी त्याने गरज ठेविलीच नाही.[२६३] टिपू सुलतान व तुकोजी होळकर ह्यांच्यातील ह्या लढाईच्या दरम्यानचा राजकीय पत्रव्यवहार थोडक्यात सांगता येईल.

होळकरांच्या पत्रांत टिपूने लिहिले होते की, ''वकील मातबर पाठविले आहेत. याचा बहुमान करुन ज्या गोष्टीकडून दोन्हीकडील खलष दूर होय ते करावे.[२६४] त्यावर होळकरांनी जबाब लिहीला की, ''वकिलांची परवानगी करितो, कधी करावी हे उत्तर येताच रवानगी करितो म्हणून पत्रे येत असता दरम्यान छापा आला ही गोष्ट न व्हावी त्यास आपण दाना दुरंदेशी आहेत असे असता ही गोष्ट घडू नये त्यास ज्या समयी सरकारांत वकिलाचे प्रयोजन लागले ते समयी आणविले जातील.[२६५] हे तुकोजी होळकरकरांचे उत्तर बोणदापणाचे होते. तहाबद्दल मध्यस्थी टिपूची तुकोजी होकरांकडेच होती पण टिपूचे हे वागणे वरवरपणाचे होते. त्यांचा अंतस्थ हेतू मात्र वेगळा होता.

नादी लावून श्रीमंतांचे फौजेवर छापा टाकावा असा मनसबा करुन तयारी केली[२६६] हे वर्तमान सुभेदारास समजताच अवघे सरदारांस इतल्ला करुन, बुणगे पिछाडी डोंगर यांचे आश्रयाने अलीकडे ठेवून सडे भारी घोडा राऊत असा सर्वांस इतल्ला केला. कोण ऐकून घेतले मोंगल भोसले यांनी थट्टा केली की, सुभेदारांस म्हातारपणी फार दिवस वांचावे हा अभिलाष उत्पन्न झाला आहे. अशा भावी बोलले ते सुभेदारांचे कानावरही आले तथापि क्षमा करुन आपले बुणगे दामदस्त राहूटीपाल पडदे बेलबाधी या काही एक न ठेविता एक बिचोबा व पलंग मात्र ठेविला बाकी आपला गोट सडा जरी केला.[२६७]

तुकोजी होळकरांनी सर्व सरदारांना हल्ला होण्या अगोदर सावधानतेचा इशारा दिलेला होता पण त्या इशाऱ्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केले शेवटी १७८६च्या नोव्हेंबरमध्ये ''सायंकाळची संध्या आटपून हरिपंत तात्या मोगल व भोसले यांसह आवशीस कलकेरीकडे निघाले तो वाटेत बारी होती तीतून बाजारबुणगे व लष्कर जात असता टिपूच्या फौजेने त्यावर बाणाचा अतोनात वर्षाव केला व बेदडयाच्या झुंडी येऊन बेलाशक बाजार बुनगें लुटूं लागल्या भोसल्यांचे बुनगे बरेच लुटले गेले आणि मोगलांची तर आतोनात नासडी झाली.[२६८] या मोहिमेत टिपूने मराठयांच्या लष्करावर घातलेला हा शेवटचा छापा होय.[२६९] त्यावेळी सगळयांना वाटले तुकोजी होळकरांच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले त्याचे फळ मिळाले ''मग टिपू सुलतानाने फौज लुटून नेऊन वेगळी उभी केली. त्यात सुभेदारांकडील

एक म्हातारीचा बैल जाते व पाळा तेंव्हा त्यांस आश्चर्य वाटले.[२७०] ज्यांनी हिंदुस्थान काबीज केले, तेथे अशा सावधानीनेच राहीले म्हणून गुजारा झाला. मराठयांच्या सावधगिरीपुढे त्यांचे काही चालेना.

''स. १७८७ च्या जानेवारीत तहाचे बोलणे सुरु होऊन एप्रिलांत तो पूर्ण झाला या तहाने मराठयांस नरगुंद व कित्तुर ही संस्थाने माघारी मिळाली व पासष्ट लाख रुपये मिळाले सालवीचा तह होळकरांच्या मार्फत घडून आला.''[२७१]

## ३.३४ टिपू सुलतानाच्या स्वारीच्या वेळी तुकोजी होळकर यांना अहिल्याबाईंनी मदत केल्या संबंधीचे पत्रे :-

श्रीमंत मातोश्री साहेबांस यशवंत गंगाधर यांजकडून ता. १ जून ८४ साहेबी छ: ३० ची पत्रे सेवकांस व नाना व श्रीमंत सुभेदार व राजश्री नारो गणेश यांस ऐसी चार पत्रे व सुभेदारांस खर्चास पदमसी तिलोकसीचे दुकानची हुंडी १००००० फालगून शुध्दची पावली. आज्ञा की बाळाजीपंत नानाचे विचारे हुंडी चिरंजीवांकडे लष्करात रवाना करावी. आज्ञेप्रमाणे नानास पत्र देऊन हुंडीविषयक विनंती केली त्यावरुन त्यांनी हरीपंताचे विचारे हुंडी व पत्रे लष्करांत रवाना करुन आपणास जाब दिला. तो सेवेशी पाठविला आहे. टिपूचे मसलतीस खर्च व पुढेही दरमहा चालला पाहिजे.मसलतीचे ओझे सर्व सुभेदारांवर आहे फौजेचा खर्चही भारी त्यात महागाई श्रीमंत नानाची आज्ञा वारंवार ऐवजाविशी होती व आपणही कमी न करिता यश घेतले सांप्रतचा प्रसंग शेवटाखाली आला आहे म्हणोन वगैरे[२७१]

थोडक्यात सुभेदार तुकोजीरावांनी मागितलेली रक्कम अहिल्याबाईंनी पाठविली आहे. सरकारी वकील जी सूचना करीत आहे ती बरीच महत्वाची आहे ज्या मोहिमा पूर्णत्वास गेल्या त्यात किती खर्च आला त्यापैकी प्रत्येक सरदारांच्या शिरावर शिरस्त्याप्रमाणे किती खर्च करावयाचा आणि त्यातून किती पोच झाली हे संबंध पुढे आल्याशिवाय अहिल्याबाईनी पैसे पाठविण्यात कुचाराई केली असे मोघम म्हणणे धाडसाचे ठरेल तशातही ज्या रकमा पोहचत त्यांत जमाखर्च करतांना कारकूनाची मखलासी कशी चाले हे स्पष्ट होते.

**३.३५ उत्तरेतील राजकारण :- या राजकारणातील अहिल्याबाई होळकरांची भूमिका व सहभाग (इ.स.१७८२ ते १७९५) :-**

जवळपास १७७४ पासून १७८२ पर्यंत महादजी शिंदे, तुकोजी होळकर इतर मराठा सरदार रघुनथारावांचा प्रश्न, इंग्रज-मराठा युध्द, टिपू विरोधातील संघर्षात व दक्षिणेतील राजकारणात गुंतुन पडल्याने त्यांच्या माघारी उत्तरेतील राजकारणत बरीच उलथापालथ झाली होती.

तशातच उत्तरेतील राजकारणातील महादजी शिंद्यांची सक्रिय व अत्यंत प्रबळ उपस्थिती नाहीशी होताच मराठयांच्या लहानमोठया शत्रूंनी विरोधकांनी पुन्हा उचल खाऊन त्यांच्या विरुध्द बंडाचे निशाण उभारले त्यामुळे महादजी शिंदेंना होळकरांनी कशा पध्दतीने हया संघर्षात साथ दिली हे पुढीलप्रमाणे सांगाता येईल.

**३.३६ महादजी शिंदेंना होळकरांनी केलेली मदतः-**

उत्तर हिंदूस्थानातील परिस्थिती मराठयांच्या विरुध्द गेलेली होती गोहदकर जाट यांचा इरादा ग्वाल्हेर घ्यावी असा होता ती मुळातच लढवय्यी जमात होती. ''जाटाने कानपूर छावणीत फिरंग्यांशी पैगाम धाडला. पांच लक्ष रुपये आम्ही तुम्हास देतो तुम्ही ग्वाल्हेरीचा किल्ला घेऊन आम्हास द्यावा.[२७३]इंग्रजांनी हे कबूल करुन आपल्या चार पलटणी रवाना केली व एका अंमलदाराकडून दुसऱ्या अंमलदारांकडे किल्ला जात होता अशी संधी पाहून ''उरवाईचे माजी किल्लेदारांकडील जमादार होता त्याजला पंचवीस हजार रुपये देऊन फितुरांत आणून त्या मार्गी किल्ल्यावर चढून आले. हे वर्तमान माजी किल्लेदार गोविंद यांजला समजताच त्यांनी तरवार धरली. ते सावध हे बेसावध तथापि निमक खाण्याची शर्त करुन जुवामर्दीने देह अवसान जाहले.[२७४]

गोविंद शामराज मृत्युमुखी पडताच ग्वाल्हेरचा किल्ला इंग्रजांच्या हाती आला. तेंव्हा अंबाजीबरोबर महादजी शिंदे यांनी दहा हजार फौज घेऊन इंग्रजाच्या मुकाबल्यास रवाना केले श्रीमंतास पत्र लिहिले की ''ग्वाल्हेर प्रांती फिरंग्यांची पलटण घेऊन ग्वाल्हेर घेऊन पुढे चाल करुन शिरोज घेतली आम्हीही त्यांचे मुकाबल्यास अंबाजी इंगळे दहा हजार फौज देऊन रवाना केले सांज सकाळ आम्हीही कुच करुन जातो. फौजेची खर्चाची मदत झाली पाहिजे.[२७५] असे पत्र लिहून महादजी शिंदे आंबोजी इंगळयांच्या पाठोपाठ काही अंतर ठेवून निघाले फक्त काही अंतरावर मागे

होते. ‘‘आंबाजी इंगळे याचा व पलटणांचा मुकाबला लागला समोर मुकाबाला करुन लढाई करावी तर पुरे पडणे हे तर कठिणच म्हणून ,खांद्यावर भाला टाकून भोवतालचे हिंडून रसद चारा पाणी यांजवाचून जेर केले मागे महादजीबाबा हा दबाव सबब पुढे चालावयाची हाव सोडून मागे ग्वाल्हेरीचे मैदानात आले तेथे अंबाजी इंगळे व महादजी शिंदे एकत्र होऊन घेराघेरी आरंभिली ऐसा क्रम ८ महिने चालला.[२७६] अशा आणीबाणीच्या प्रसंगी महादजी शिंदेयांनी अहिल्याबाईंना पत्रे लिहून फौजेची मदत मागितली त्यावरुन ‘‘अहिल्याबाईंनी बाळूजी इंगळे सरदार व राजाराम रणसोड बराबर देऊन दहा हजार फौजेनिशी शिंदे यांस सामील झाले.[२७७] पुन्हा गनिमी काव्याचे सततचे धावपळीचे युध्द सुरु झाले अहिल्याबाईंनी पुन्हा सदाशिव मल्हार बक्षी बावांनी रवाना केले धोंडदेवही आंबूजीस सामील होण्याकरिता भेलशापुढे गेले[२७८] मराठयांना मदत मिळत असूनही इंग्रजांबरोबर गनिमी काव्यानेच त्यांना युध्द करावे लागले त्याच दरम्यान ‘‘काशीचा राजा चेतनसिंग याने जमीयत करुन फिरंग्यांची पांच पलटणे कापून काढली काशीचे राज्यात टोपी पाहिली असता कंठस्नान घालावे हा क्रम चालला तेंव्हा पायबंद पक्का बसला. मग त्यांनी पाटील बावाशी सलुख करुन निघोन गेले.[२७९]

## ३.६७ गोहदच्या स्वारीच्या वेळी महादजी शिंद्यांना अहिल्याबाईंकडून राजकीय सल्ला :-

उत्तर हिंदुस्थानात गोहदच्या राण्यास इंग्रजांनी अनुकूल करुन घेतले होते. त्याच्या मदतीने यमुना उतरुन एक इंग्रजी फौज याचवेळी अलीकडे आली होती. या फोजेचा मुख्य सेनानायक पोफॅन होता. त्याने इ.स. १७८०च्या ऑगस्ट माहिन्यात ग्वाल्हेरचा किल्ला घेतला. [२८०] पुढे शीप्री कोल्हारसकडे आक्रमण केले. ग्वाल्हेरचा किल्ला मूळचा गोहदच्या राण्याचा होता. पोफॅनने ग्वाल्हेर जिंकताच किल्ला आपले कब्जात ठेविला तेणे करुन राण्यास वाईट वाटले.[२८१] व त्यामुळे तो इंग्रजांशी सुध्दा विश्वास घातानेच वागत होता.[२८२] या गोष्टीचा फायदा पाटीलाबावाने घेतला आणि गोहदवाले राणाजीस इमान प्रमाणे बेल भांडार होऊन उभयता एकदिल होऊन इंग्रजांस राणाजींनी भयप्रीत दाखवून इंग्रजांस तेथून उखडले.मसलत यशस्वी झाल्यावर पाटीलबाबा राणाजीचेच मूळ खणू लागले ही गोष्ट राणाजींच्या वकिलाने बाईच्या कानावर घाताली त्यावेळेस हे करणे योग्य नाही असे पाहून अहिल्याबाईने महादजीस लिहिले.की सर्वांशीच आपण वाईट झाल्याने पुढे कोणी आपले बेलभंडारास पातेजून (विश्वास करुन) हिंदुस्थान हस्तगत कसे होईल यास्तव यांसी सलूख

प्रस्तुत राखून पुढे कामे करा पुढे प्रसंगोपात आपले टोफ खालीच आहेत. आताच यांसी बिघडू नये इंग्रजाचे पारिपत्य पुरतेपणे जाले नाही. पण अहिल्याबाईंचा हा दूरदर्शीपणाचा राजकीय सल्ला महादजी शिंद्यांनी मानला नाही.

महादजीने गोहादविरुध्दच आपल्या मोहिमला प्रारंभ करुन २७ जुलै १७८३ ग्वाल्हेरचा किल्ला जिंकून घेतला आणि गोहदच्या राज्याची अशी काही नाकेबंदी केली त्यामुळे गोहदच्या राजाला शरणागती घेण्याशिवाय काहीच पर्याय शिल्लक राहिला नाही.(२६ फेब्रुवारी १७८४)[२८५]

## ३.३८ लालसोटचे युध्द (१७८७) :-

गोहदच्या विजयानंतर महादजी शिंद्यांचा दिल्लीचा मार्ग मोकळा झाला. २५ ऑक्टोबर १७८४ रोजी महादजीने ग्वाल्हेरहून आग-याकडे कूच केले.[२८५] आणि येथून पुढे लालसोट युध्दाची पार्श्वभूमी तयार होत गेली ती कशी हे पुढीलप्रमाणे सांगता येईल. ''जाटास धरुन कैद केले तो इकडे नजीब खानाचा काळ दिल्लीस झाला. तेंव्हा सुने रान पाहून चमडावती उतरुन आग-याचा किल्ला घेतला. त्यासमयी लाला नौबतराय कोणी कायस्थ पाटिलबावांचे प्रियपात्र बनले होते. त्याजला फौजेची कंपूची बक्षीगिरी सांगून जिवबादादा,बाळोबा तात्या वगैरे शेणवई यांचे काही एक न चालता लाला नौबतराय सांगेल ती पूर्वदिशा. आग्रा येथील किल्ल्यात आपले अम्मलदार नेमून जयपूरचे मुलखात स्वारी केली. जयपूर वाल्यांनी, जोतपूरवाले व हमदानी नजीबखानकडील सुभा व आपली जमीयत एकत्र करुन लालसोटच्या मुक्कामी मुकाबला केला.[२८६] या युध्दात महादजी व मराठे पराभूत होऊन त्यांना माघार घ्यावी लागली.[२८७] ''या लढाईत पाटीलबुवांची पलटणे जैपूरवाल्यांकडे फितुर झाली हे पराभवाचे मुख्य कारण होय.[२८८] महादजी शिंद्यांचा विश्वासघात करण्यात आला. ''हिदुस्थानीयाणी दवलतच गारकेली होती. पाणपत होण्यात बाकी नव्हती परंतु श्रीमंताचे पुण्येकरुन व पाटीलबावांचे दैवेकरुन बचाव जाहला की गोष्ट थोरली जाहली.[२८९] यावेळी महादजी अत्यंत सावध होता त्याने मोठया धैर्याने कुशलतेने व दृढ आत्मविश्वासाने परिस्थितीवर नियंत्रण मिळवून लालसोटवर होणारे पानिपत टाळले.[२९०] युध्द सामुग्री खाद्य पदार्थाचा अभाव व पिण्याच्या पाण्याचे संकट या परिस्थितीत काही काळासाठी माघार घेण्याचा अतिशय मुत्सद्दीपणाचा निर्णय महादजीने यावेळी घेतला व मराठयांना एका मोठ्या संकटापासून वाचवले.[२९१]

### ३.३९ लालसोटच्या युध्दाप्रसंगी अहिल्याबाईंची मुत्सद्देगिरी

महादजी गंभीर संकटात सापडला असता त्याला यावेळी अहिल्याबाई व तुकोजी होळकरांकडून कोणतीही मदत मिळाली नाही. याबद्दल त्यांच्यावर प्रखर टीका केली जाते. उत्तर हिंदुस्थानातील या दुखांबी  मराठी सत्तेचा एक खांब महादजी ढासळून पडत असता दुसरा खांब होळकरशाहीचा कसा वागला ते पाहिले म्हणजे मराठ्यांबद्दलचा आदर बाहेर सर्वत्र मावळला असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारणच राहत नाही.[१९२]

या राष्ट्रीय संकटाच्यावेळी महादजीने अहिल्याबाईंना वारंवार मदत मागितली महादजीने अहिल्याबाईस पत्र लिहिले.

''गोहदचे मसलतीमुळे पेचांत येऊन कर्जदार झालो पुढे पातशहाची मसलत पडली इंग्रज पातशहास आपलेकडेस घेत असता चमेल उतरुन जाऊन, आमदानीचे पारीपत्य करुन पातशहाचा बंदोबस्त केला. सारे दौलतीचा खर्च त्याचा चालून आपले फौजेसाठी सांभाळून राजेरजवाडे यांची पारपत्यें केली यामुळे इंग्रज वगैरे सर्वास असह्य झाले.पुढे जयपूरचे मसलतीस दोन वर्षे लागली. त्यांत घरचे फितुरामळे लढाई फत्ते केलेली विलग झाले. याजकरिता माघारे येऊन कुटुंब ग्वाल्हेरीस माघारी पाठवून दिले. पुढे जमाव करुन रांगड्यांचे पारिपत्य करावे हाच इरादा परंतु फौजेखेरीज होत नाही. याविषयी देशाहून फौज आणविली. त्यास ऐवज रवाना करावा तर ओढीचा प्रसंग दोन वर्षे या मुलखांत आफत पर्जन्याची झाली. त्याकरिता मुलखाचा पैसा आला नाही. साहुकारास ऐवजाकरिता म्हणावे तर साहुकार इतबार या समयास करीत नाही. पादशहीत आमचा पाय शिरला, याजकरिता वजीर वगैरे रांगडे व इंग्रज सारे एकच झाले आहेत म्हणून ऐवजाची सरबरा व फौज व पेंढारी यांची तरतुद लवकर व्हावी पूर्वापार वाडवडिलांस मसलती पडल्या तेंव्हा परस्परे साहित्य झाले आहे फौजेविषयी व ऐवजाकरिता देशी कारभारी यांस लिहिले आहे. त्यांजकडून साहित्य होणे येणे  ते होईल; परंतु तुर्त तुम्ही ऐवजाची व फौजेची रवानगी लवकर करावी.[१९३]  लालसोटच्या लढाईत महादजी जवळजवळ पराभूतच झालेले होते अशावेळी ते पेंढारी मागत होते. पुष्कळदा जे फौजेला जमत नसे ते पेंढारी करुन जात असत. पेढाऱ्यांनी लूट करुन महादजींना भरपूर धनसंपत्ती मिळवून दिलीअसती पण अहिल्याबाई आपल्या नीती नियमांपासून निश्चयापासून डळमळल्या नाहीत त्यांनी महादजींना कळविले.

''भाऊपणा पूर्वीपासून कसा चालत आला? पेंढारी, हजार स्वार बोलविले हे काय? फौज दहापांच हजार म्हणाल तर पाठवून देऊ पूर्वीप्रमाणे यथाविभागे चालावे.[२९४] सुभेदार तुकोजीरांवांनी याच पत्रास अनुलक्षून पुणे दरबाराकडे मागणी केली. सोबती संकटांत आम्हांस बिदा करावे.[२९५] एकास पत्रास ही दोन उत्तरे पाहिली म्हणजे अहिल्याबाईंचे राजकारणपटुत्व आणि तुकोजी होळकरांची नुसती शिपाईगिरी ही लक्षात येते.

अहिल्याबाईच पत्रात ''यथाविभागे चालावे या शब्दांतील खोच त्यांचे पूर्वांपार पध्दतीच्या इ ाानाचे दर्शक आहे. [२९६]

ह्या वाटण्या सन १७५१,५२ स.१७५५,५६ सन १७६४,६५ व सन १७६९, याप्रमाणे स्थळ काल व व्यतत्यनुरुनप घडत आल्या होत्या.[२९७] हे विभाग अहिल्याबाईच्या लक्षात होते. आणि त्यांनी महादजी शिंदे ह्यांना त्याची जाणीव करुन दिली.

सन १७५१,५२ पर्यंत चौधाई सरकार व तीन हिस्से उभयतां सरदाांपैकी दीड हिस्सा होळकर व दीड हिस्सा शिंदे, सन १७५५-५६ मध्ये एक हिस्सा सरकार एक हिस्सा होळकर व एक हिस्सा शिंदे १७६४-६५ सरकार सतरा लक्ष, होळकर पांच लक्ष व शिंदे तीन लक्ष याप्रमाणे थेडाबहूत फरक करुन वहिवाट चालली होती.[२९८] १७६९ वाटणीचा हिस्सा शिरस्ते प्रमाणे २५ चौथाई सरकार, ७५ तीन हिस्से सरदार रु. ३७.८.० होळकर व ३७.८.० शिंदे एकूण ७५ कुल रुपये १००चे हिस्सेरसीप्रमाणे[२९९] वरील हिस्स्याच्या वर्णनावरुन यथाविभाग वाटणी या शब्दाची खोली स्पष्ट होईल तसेच राज्यकारभारातील प्रत्येक बारीकसारीक व महत्वपूर्ण गोष्टीची माहिती अहिल्याबाईना होती हे स्पष्ट दिसून येते त्याचप्रमाणे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना प्रत्येक राजकीय बाबींची माहिती दिलेली होती. हे ही दिसून येते व त्या माहितीचा वापर अहिल्याबाईंनी केलेला दिसून येतो.

यथा विभाग वाटणी याचा खुलासा पाटीलबूवांकडून टाळण्यात आला. त्यावर अहिल्याबाईंनी उत्तर पाठविले की, ''तुम्ही फौजेविषयी व पेंढाऱ्याविषयी दोन तीन वेळा लिहिले त्यास समय हाच आहे. या समयी साहित्य घडावे हे लक्ष आमचे परंतू दोन तीन जोड्या काशीदाच्या मुजरद देशी रवाना केल्या चिरंजीव तुकोबास पत्रे व सरकारंत पत्रे लिहिली आहेत.तिकडून मातब्बर

फौज आणविली आहे. त्यांची उत्तरे हा कालवार येत नाहीत. तिकडील जाबसाल काय येतो त्यासरशी तजवीज केली जाईल. तुर्त दोन हजार पेंढारी व सरंजामी फौज हजार पाठविल्याने तिकडे दाब पडतो असे नाही. देशीहून फौज मातब्बर येईल तोवर आपण आपले फौजेनिशी डिगेस आसपास असावे तुम्ही लिहिले की पादशहा व इंग्रज वगैरे रांगडे एक झाले तर त्याचे कारण काय? तुम्हांकडून तेथे बंदोबस्त आहेच. पातशहाची मसलत जैपूरकरांशी किंवा इंग्रजांशी हे संधान वरचेवर राखीत जावे. रांगड्यांशी मसलत ते करणार नाहीत.[३००] अहिल्याबाईंनी ऐवज दिला नाही त्याऐवजी सल्ला दिला. आपण कितीही दिले तरी आता काही निभावणार नाही. असेच त्यांची राजकारणीबुध्दी त्यांना सांगत असावी वरील सर्व पत्रे त्याला अहिल्याबाईंची उत्तरे ह्यावरुन आहिल्याबाईच्या राजकारणी वृत्तीचे दर्शन होते त्याच प्रमाणे आणीबाणीच्या प्रसंगातही आपल्या नीतीमत्ता ढासळून न देण्याचे त्याला धरुन त्यांच्या निश्चयी स्वभावाचे दर्शन होते.

### ३.४० लालसोटनंतर उद्‌भवलेले मराठ्यांवरील संकट :-त्याला अहिल्याबांईचा यशस्वी सामना -चकरड्याची लढाई:-

लालसोट येथे महादजी शिंदे यांनी माघार घेतल्यामुळे राजपुतान्यातील राजे एकत्र होऊन त्यांनी विचार केला की, ''दक्षिण्यांचा अंमल ज्यांच्या जिल्ह्यांत आहे त्यांने उठवून द्यावा ऐसी पत्रे रामपुरा, सावेर, इंदूरचे जमीनदारापर्यंत आली या मसलतीस रुकार, बुंदी, कोटेकर यांचा मात्र पांचविश्वे यावर उदेपूरची दहा हजार फौज येऊन निबाहेडा, जावद वगैरे ठाणी उठविली.[३०१] तेव्हा आहिल्याबाईनी आबाजीपंत राघो रणसोड पागनीस यांचे मावसबंधू यांचेबरोबर हुजरात सरंजाम दीड हजार व काही शिलेदार ऐसी तीन हजारांची फौज त्यांचे मुकाबल्यास पाठविलीच.[३०२] चकरडा प्रांत मेवाड येथील मुक्कामी राणाजींचे फौजेने दोन प्रहार छापा घातला. अंबाजीपंत मारले गेले. फौज भय खाऊन रणांतून पळून गेली. व जावदेस जमा झाली हे वर्तमान महेश्वरी अहिल्याबाईस समजतात.[३०३] आबाजी रणसोड यांचे डेरे बाहेर करुन शरीफभाई निसबत पागा हुजरात याजला पाठवून करवंदीप्रमाणे थालनेर येथे पेंढारी पडले होते. ते दरोबस्त आणून जमादारास मेजवानी करुन वस्त्रे दिली. आणि ताकीद केले की, ''मेले हो! तोंड दाखवावयास आला तर मेकसू घालून मारुन टाकीन मेवाड होते की नव्हते असे करुन टाका.[३०४] पेंढारी व आबाजी रणसोड व शरीफभाई रवाना झाले. ''शिलेदारांना एकसारखा युध्दसाहित्याचा पैशाचा पुरवठा होईल याची तजवीज केली. चकरड्याची

लढाई जिंकल्यानंरतर  मेवाडचा राजा होळकरास मिळाला व त्याने चंदावताकडून रामपूरा घेवविला.[३०५]

अशा प्रकारे राजपुतांचा पुरता मोड झाला रामपुरा हातचा गेला उदयपूरचे सेनेने आक्रमण सुरु केले, त्यावेळी महादजीचा परिवार उज्जनीस होता. तेथे शिंदे बाया अगदी घाबरुन गेल्या त्यांची अहिल्याबाईस महेश्वरास पत्रे आली की, “ आम्ही आपलेजवळ येतो.[३०६] अहिल्याबाईंनी ताबडतोब उत्तर पाठविले कि आल्यास तुमचे घर आहे. परंतु तुमच्या अब्रुस कमीपणा शिंद्यांच्या बायका भीतीने पळाल्या असा शिंद्यांचा दुर्लौकिक होईल म्हणून तुम्हीआहात तेथेच रहा तसाच प्रसंग पडल्यास तीन प्रहरांत तुमचे पाशी दाखल होईल; घाबरु नये  असे उत्तर लिहून खाजगत डेरा बाहेर दिला तेथे रोज फौजची हजेरी शंभर स्वार आले ते रवाना केले. पन्नास आले ते रवाना केले. पाचशे आले ते रवाना केले.[३०७]

याशिवाय पाटीलबाबा ग्वाल्हेरमध्ये आहेत फौजेची कमी आहे बदनक्षा होण्याची भीती आहे. दिवस रात्र चैन नाही. ग्वाल्हेराहून आबाजी रणसोड व शरीफ भाईची रोज दोनतीन पत्रे येत होती. अहिल्याबाईच्या मनात सहाय्यता देण्याचा बेत होता. या वेळी दक्षिणेत तुकोजीस हे वर्तमान कळले. वर्तमान मिळताच सोबती अडचणीत आहे. मला सोबतचे मदतीस जाऊ द्या अशी तुकोजीने नानास विनंती केली.[३०८] पुढे चाळीस पन्नास लाखांचे सरंजामानिशी कोणी मातब्बर मनुष्य बऱ्हाणपुरास नाईकाकडे लवकर पाठवावा अशी पाटीलबावाची दोन पत्रे अहल्याबाईस आली. त्यावरुन अहल्याबाईने लगेच राजश्री बाजी विठ्ठल याची रवानगी नाईकाकडे केली.[३०९]

अशा प्रकारे अहिल्याबाईंनी लालसोट युध्दानंतर उद्‌भवलेल्या युध्दजनक परिस्थितीत एखाद्या लढवय्या राज्यकर्त्याला शोभेल असे योग्य निर्णय घेतले परिस्थितीवर योग्य नियंत्रण प्रस्थापित केले. त्याप्रमाणे अहिल्याबाईवर महादजीस सहाय्यता केली. नाही त्यांच्या युध्दांत व अन्य गोष्टीत सहाय्य करण्याची जरुरी अहिल्याबाईंनी समजली नाही असा आरोप केला जातो परंतु वरील प्रसंगाचे विवेचन पाहिले असतो.हा आरोप आपोआप गळून पडतो.

## ३.४१ चंद्रावंत प्रकरण-चंद्रावतांच्या आक्रमणाचा अहिल्याबाईंनी केलेला यशस्वी प्रतिकार:-

लालसोटच्या युध्दाच्यावेळेस महादजी शिंदेच्या मदतीला अलीबहाद्दर यास तुकोजीरावांच्या विनंतीवरुन त्यांस महादजी शिंदेंच्या मदतीस उत्तर हिदुस्थानात नाना फडणीसांनी रवाना केले हया गोष्टी होईपर्यंत सन १७८७ चा डिसेंबर उजाडला. या सुमारास रामपुऱ्याकडे चंद्रावतांनी उचल खाल्ली व त्यांचा बंदोबस्त करण्याची अहिल्याबाईंवर जबाबदारी पडली पण चंद्रावंतांची बंड करण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. मल्हाररावांच्या मृत्युच्या पश्चातच त्यांनी रामपुऱ्यामध्ये बंड करण्यास सुरवात केलेली होती आणि अहिल्याबाईंनी प्रत्येक वेळी त्यांचा पराभव केलेला होता हेच रामपूरचे चंद्रावंत हयांच्याशी प्रथमपासून अहिल्याबाईनी कशाप्रकारे संघर्ष केला हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## ३.४२ चंद्रावंताचे पूर्ववृत्त :-

रामपूरची हकीकत ज्ञानकोशकार देतात ती येणे प्रमाणे: येथे सातव्या शतकापासून तो नवव्या शतकापावेतो बौध्द धर्मीय लोक राहत असत धमनार पोलोदोनगर आणि खोलवी ह्या ठिकाणी त्यांचे चैत्य आणि विहार गुहांचे काही अवशेष दृष्टीस पडतात नवव्या शतकापासून तो चौदाव्या शतकापर्यंत हा जिल्हा परमार रजपूत राजांच्या ताब्यात होता. पंधराव्या शतकात माळव्यांच्या मुसलमानांच्या ताब्यात व नंतर हा उदेपराकडे गेला. हा जिल्हा सन १७२९  जयपूरचा राजा सवाई जयसिंग यांचा दुसरा मुलगा माधवसिंग यास मिळाला. माधवसिंगाकडून हा जिल्हा सुभेदार मल्हारराव होळकर यांजकडेस आला.''[३०९]

### ३.४२.१ चंद्रावत व अहिल्याबाई संघर्ष इ.स.१७६८ ते १७८७

रामपुरा चंद्रावंतांच्या अधिपत्याखाली होता पण मल्हाररावांनी त्यांचे क्षेत्र सिमित करुन त्यांना रामपुराक्षेत्रामध्ये २१ गावांची एक छोटीशी जहागीरी दिली.[३१०] यामुळे चंद्रावतामध्ये मोठा असंतोष निर्माण झालेला होता. मल्हाररावांच्या दबावाखाली ते दबून राहिले पण त्यांच्या मनातील द्वेष गेलेला नव्हता. मल्हाररावांच्या मृत्युनंतर ह्या असंतोषाला तोंड फुटले रामपूरा परत मिळविण्यासाठी चंदावंतांनी अहिल्याबाईविरुध्द सशस्त्र उठाव केला. ''अहिल्याबाईंनी ह्या तत्कालीन राजकीय

परिस्थितीला ओळखून गंगाधर यशवंतचे पुत्र अन्नाजीच्या नेतृत्वाखाली लक्ष्मणसिंहाच्या विरुध्द एक सेना पाठविली आणि स्वंय सैन्याला इतर कुमक पाठविण्याची व्यवस्था केली.[३११] परिणाम हा झाला की अहिल्याबाईच्या सेनेने चंद्रावंताचा पराभव केला आणि चंद्रावंताचा नेता लक्ष्मणसिंह याने अहिल्याबाईसमोर शरणागती पत्करली. ''अहिल्याबाईंनी त्याची ३१ गावांची जहागीरी तेंव्हा त्याला दिली जेंव्हा त्याच्या स्वामीभक्त व चांगल्या आचरणाविषयी कोटा आणि बुंदीच्या राजांनी खात्री दिली.[३१२] या संदर्भातील पत्र अहिल्याबाईंनी रामपूरच्या कमाविसदार गोविंदकृष्ण यांस पाठविले ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

गोविंदकृष्ण यांजला पत्र की लक्ष्मणचंद्रावत यांचे बंदोबस्ताकरिता परगणे मजकुर येथून गावे व जमिनी नेमून दिल्या; त्यांची याद अलहिदा पाठविली आहे. त्याजप्रमाणे बुंदीकर कोटा बांसवडेकर यांजकडून मातब्बर जामीन घ्यावे की महाली बशर्त दंगा न होय. ऐसा करार ठरवून मग गाव त्यांजकडे सांगणे जे गाव सरकारांतून दिले त्या गावी गढी न बांधावी असा करार करुन मग गाव देणे[३१३] गावे दिल्यामुळे चंद्रावंताचे उत्पन्न वाढले तरी त्याबरोबर त्यांची लष्करी शक्ती वाढून देऊन उपयोगाचे नव्हते म्हणून गावामध्ये गढी बांधावयाची नाही अशी चंद्रावंतावर अट घालण्यात आली.

## ३.४२.२ १७७१ मधील संघर्ष :-

चंद्रांवत आणि अहिल्याबाई ह्यांचा पहिला संघर्ष १७६८मध्ये झाला. काही काळ संघर्ष थांबला पण चार वर्षानंतर पुन्हा तुकोजीराव होळकर आपल्या सेनेसह उत्तरेकडील युध्दात व्यस्त असल्याचे पाहून चंद्रावतांनी पुन्हा १७७१ मध्ये रामपुऱ्यामध्ये बंड उभारले '' याप्रसंगी मातोश्रीसाहेबांजवळ फौजेचा जमाव फारसा नव्हता त्यांनी तातडीने लोकांची जमवाजमव केली आणि त्यांचे सैन्य उभारुन आपल्या पाहऱ्यावरील शूरशिपाई शरीफभाई यांचे हाताखाली ते सैन्य दिले आणि चंद्रावतांवर पाठविले. ही लढाई मंदसोरच्या उत्तरेस पळसूडा म्हणून एक गाव आहे तेथे झाली युध्दाची व्यूहरचना मातेश्री स्वत: करीत होत्या या युध्दात पहिल्या पहिल्याने होळकरांच्या सैन्याचे रजपुतांच्या कडव्या लोकांपुढे काही चालेना ते मागे हाटले पण या पिछेहाटीने न डगमगता मातोश्रींनी पुन्हा व्यूहरचना बदलून शेवटी चंद्रावंताचा पराभव झाला.[३१४] पराभवाचे स्वरुप खालील पत्रावरुन लक्षात येईल.

दंडवत विशेष उपरी चितोडकडहून राजश्री रावत भीमसेनाने

एक किंवा दोन पत्रे पाठविली की चंद्रावतांच्या

जाबसालासाठी तुम्हांकडील कोणी भला माणूस पाठवून देणे.

त्यास त्याजकडे येथे पाठवावयासी कोणी नाही तेथून राजश्री

नारो विश्वनाथ योजला पाठवून देणे

म्हणजे त्याला भीमसिंगाकडे पाठवू[३१५]

हे पत्र १७७१ चे आहे दंडाचा अंगीकार करुन नंतर अहिल्याबाईंनी शरण आलेल्यास तह करुन दिला कारणअहिल्याबाई हे जाणून होत्या की ''राजपूत राजे आणि ठाकूर यांच्याद्वारा निम्बाहेडा प्रांतातून चंद्रावंताना मदत दिली जात होती होळकरांची सेना मोठ्या प्रमाणात उत्तरेतील युध्दामध्ये सहभागी झालेली होती त्यामुळे अहिल्याबाईंनी चंद्रावंताबरोबर समझोत्यासाठी उदयपूरचे महाराणा अरिसिंहची मध्यस्थी महत्वपूर्ण मानली[३१६] समझोत्याच्या अटी अहिल्याबाईंसाठी महत्वपूर्ण होत्या ''अहिल्याबाईना निम्बाहेडा परगण्याची स्थिती व महत्व माहित होते होळकर राज्याच्या उत्तरेकडील सीमेचे ते प्रवेशद्वार होते त्यामुळे अहिल्याबाईंनी कुटनीतीचा वापर करुन १७७४मध्ये महाराणा अरिसिंहकडून निम्बाहेडा प्राप्त करुन घेतले.[३१७]

अशा प्रकारे चंद्रावंतांना बाहेरील भागातून मिळणारी मदत अहिल्याबाईनी बंद करुन टाकली त्यांना सर्व बाजूंनी म्हणजे आर्थिक, सैनिकी बाबतीत चंद्रावंतांना कमकुवत करण्याचा हा प्रयत्न होता. ह्यातून अहिल्याबाईमधील सैनिकी व कुटनितीज्ञ रुपाचे दर्शन होते.

### ३.४२.३ १७८२ - ८३ मधील संघर्ष :-

सन १७८२-८३ मध्ये चंद्रावंतांनी पुन: उपद्रव मांडला. ''दुष्काळाची स्थिती निर्माण झाली होती त्याचा फायदा उठवून रामपुऱ्याच्या चंद्रावंतांनी त्या क्षेत्रातील भिल्ल आणि मनासा ह्यांच्या बरोबर मिळून काही गावे आणि बाजार लुटण्यास प्रारंभ केला.[३१८] त्यामुळे अहिल्याबाईंनी आबाजी विष्णू यांना चंद्रावंतांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले त्यांनी पडदा आणि मनासा येथील

चंद्रावंतांच्या किल्ल्याच्या तटबंदीला नष्ट केले.[३१९] सप्टेंबर १७८२ मध्ये अहिल्याबाईनी व्यंकोजी बाबूराव ह्यांना शेवटी घोडदलासह आन्त्रीच्या चंद्रावंताविरुध्द पाठविले पण त्यातून विशेष काही साध्य झाले नाही[३२०].

१७८३ च्या प्रारंभी भाटखेडीचे विजयसिंह चंद्रावत आणि दंतोलीचे सालमसिंह चंद्रावंत या दोघांनी मिळून अहिल्याबाईंच्या विरुध्द विद्रोह करुन कंजार्डा गाव आपल्या अधिपत्याखाली घेतला. अशा प्रकारे संगठीत झालेल्या चंद्रावंताचा सामना करण्यासाठी अहिल्याबाईंनी नानाजी भास्करांच्या नेतृत्वाखाली एक छोटीशी सेना  तोफेसहित पाठविली.[३२१]

पण चंद्रावंताच्या पराभवाची  कोणतीच लक्षणे दिसेनात शेवटी हे बंड कशा प्रकारे शमविले गेले हे खालील पत्रावरुन दिसेल.

''कृष्णाजी तानदेवांचे पुत्र लक्ष्मणराव कृष्ण हे चंद्रावत वगैरे मनासावर गेले होते. दोनशे स्वार हजार पायदळ यांजसंगाते होते इंदुरहून दोन तोफा नेल्या होत्या. परंतु मनासाचा जोर अधिक यास्तव भोपाळवाले पठाण सरदेवर होते लक्ष्मणरावांनी आपलेकडे बोलविले. ते दोनशे लोकांनिशी पठाण यांस सामिल झाले. मनासाचे पारिपत्य करुन पठाणांनी कामकाज चांगले केले. यास्तव लक्ष्मणरावांनी या पठाणांस पंचवीस लोकांनिशी महेश्वरी घेऊन आले. लक्ष्मणरावांनी बाईजवळ पठाणांचे मर्दुमीची तसिफ केली. बाईंनी त्यास मेजवानी दुरोजा पाठविली आणि नंतर पठाणास भेटीस वाड्यात बोलविले बाई आंतसमोर बसली अलिकडे दालनांत यांनी आपले लोक व मुत्सद्दी बसविले दहा पंधरा खाशांनिशी पठाण आले. दुरुन बाईस मुजरे केले दोन घटका बसले होते विडे देऊन बिदा केले.[३२२]

ह्या पत्रावरुन १७८३साली चंद्रावंतांनी पुन: उपस्थिलेला उपद्रव किती युक्तीने राबविला आणि त्यातच नवे मित्र जोडले हे पाहण्यासारखे आहे. ''ह्या तहनाम्यानुसार हे  निश्चित झाले की विजयसिंह आणि लक्ष्मणसिंह हे भविष्याकाळामध्ये विद्रोह करणार नाहीत  रामपुरा परगण्यामध्ये होळकर राज्याचे अधिकारी, मामलेदार यांना होळकर राज्याच्या हिताच्या संदर्भात पूर्ण सहकार्य करतील.[३२३]

१७८३ मध्ये अहिल्याबाईंनी विजय मिळविला असतानाही समेटाचे धोरण पाळलेले परंतु अहिल्याबाईचे हे उदार धोरण समजण्याची पात्रता चंद्रावतांनी दाखविली नाही त्यांच्या मनातील विद्रोहाची भावना अहिल्याबाई पूर्णपणे काढू शकल्या नाहीत वास्तविक पाहता रामपूरचे चंद्रावंत हे आपली स्वतंत्र सत्ता पुन्हा स्थापित करु इच्छित होते त्याच दृष्टीकोनातून पुन्हा विद्रोह करण्याची संधी १७८७ मध्ये त्यांना प्राप्त झाली.

## ३.४२.४ १७८७ मधील अहिल्याबाई आणि चंद्रावंताचा शेवटचा संघर्ष :-

इ.स. १७८७ साली रजपुतांनी शिंद्यांना लालसोट येथे माघार घेण्यास भाग पाडले. त्यांनी होळकरांचा निबांहेडा म्हणून महाल होता तो खालसा केला आणि तेथे मराठे यांची फौज होती ती हाकलून जावद शहर घेतले. निंबाहेडा येथे शिवाजी नाना हे होळकरांचे सुभेदार होते राण्यास शरण गेले हा प्रकार पाहून रामपुऱ्यांचे चंद्रावंत स्वस्थ बसेनात रजपुत चकरड्या व चलदू गांवापर्यंत येउन धडकले तेव्हा ते त्यांस जाऊन मिळाले दोंघांनी मिळून होळकरांविरुध्द बंड उभारले.[३२४]

जेंव्हा अहिल्याबाईंना होळकर सेनेच्या पराजयाची चंद्रावंताच्या विद्रोहाची आणि रजपूत सेनेच्या आक्रमणाची खबर मिळाली तेव्हा त्यांनी आबाजीपंत राघोरणछोड इत्यादी लोकांबरोबर आपले सैन्य युध्दास पाठविले राण्यासच्या सैन्याने मराठी सैन्यावर चकरड्या मुक्कामी छापा घातला. त्यांत आबाजीपंत मारले गेले.[३२५] परंतु हे युध्द निर्णायक ठरले नाही. उलट रजपूत सेना अधिक आक्रमक  बनली. त्यामुळे अहिल्याबाईंनी राघोजी रणछोड ह्याच्यामदतीसाठी शरीफभाईंच्या नेतृत्वाखाली एक सेना पाठविली आणि स्वत: महेश्वर येथून प्रस्थान करुन रणक्षेत्राच्या दिशेने निघाल्या[३२६] याच दरम्यान अहिल्याबाईंनी शिवाजीनानाच्या मदतीस आपले बंधू  तुळाजी शिंदे यांस पांच हजार स्वारांसह पाठविले. शिवाजी नानाने मदसोर किल्याचा आश्रय धरुन तेथे फौजबंदी केली होती.[३२७] अहिल्याबाई स्वत: या रणक्षेत्रात आल्या त्यांनी युध्दापूर्वी पूर्ण सैनिकी तयारी केली आणि सैनिकांना हरप्रकारे प्रोत्साहन दिले.त्यांनी युध्दाची व्यूहरचना तयार केली या व्युहरचनेचे वैशिष्टये असे होते की ‘‘रणक्षेत्रापासून दूर अशा नाल्यांमध्ये तसेच तेथिल आजूबाजूच्या झाडीमध्ये तीन हजार सैनिकांची एक तुकडी लपवून ठेवली होती की जणे करुन रक्षणक्षेत्रातील आपल्या सैनिकांचे मनोबल कमी व्हायला लागले किंवा ते पराभूत व्हायला लागले तर ही ताज्या दमाची सैनिकी तुकडी त्यांच्या मदतीला जाईल व युध्दामध्ये विजय प्राप्त होईल.[३२८] अहिल्याबाईच्या सैनिकी प्रतिभेच हे ज्वलंत

उदाहरण आहे. शेवटी हरकियाखाल म्हणजेच (नाल्याजवळ)चल्दू गावाच्या जवळ अहिल्याबाईंची सेना आणि रजपुतांची सेना यांच्यामध्ये भयंकर युध्द झाले.[३२९] राण्यांचा प्रधान मालदास मेथा मारला गेला त्याचप्रमाणे कनोर व सादडी येथील ठाकूर व पुष्कळसे लोक जखमी झाले. त्यांत सादडीच्या ठाकरास कैद केले.[३३०]

याप्रमाणे रजपुतांची वाताहत केल्यावर होळकरांचे सैन्य दुसरे दिवशी कूच करुन जावद निबांहेडा, राणीपुरा वगैरे किरकोळ महालांत ठाणी बसवून रामपुऱ्याकडे आले रामपुराही सत्ताविसाव्या दिवशी आम झाला चंद्रावत पळून आमदेस गेला. आमदेस मोरचे लागले ''ज्वाला'' तोफ रामपुऱ्यास होती ती आणली मग मोरचे जमवून ज्वाला जाय होती म्हणून निम्मे बार भरुन एक गोळा मारला तो इकडील अलग फोडून भवानींसिंग चंद्रावंत निजला होता.त्याचे वरील खपरेल उडून पलीकडे सफल फोडून मग तो गोळा पार झाला, त्यांतच त्याचे टांके ढिले झाले दुसरे दिवशी हल्ला करावा असा आबाजी रणछोड व शरीफभाई यांचा विचार ठरल्यावर हे वर्तमान चंद्रावंतास समजले त्यांनी मार्गात दारु बिछाऊन दिल्ही की हल्ला येताच बत्ती द्यावी म्हणजे माणसे उडून जातील अशा भावी त्यांनी दगा केला पण इकडे मार्तंड साहय हल्ला आला नाही तो.अगोदर भवानीसिगाचे बंधू सोभागसिंगकडून किल्ल्याबाहेर जागा जागा माणसे बसविण्यात आली. त्यांतुन तोड्याचा गुल पडून दारुचा भडका उडाला तो पन्नास माणूस जळून जातीने सोभागसिंग चंद्रावत हाही फार जळाला. इतक्यात हल्ला जाऊन पोहचला त्याजला उचलून नेण्याचे किल्लेवाल्यास न बनता तो हाती सांपडला.[२३१]

या प्रसंगाचे वर्णन करताना हिंगणे लिहितात का, परंतु किल्लेवाल्यांनी हल्ला मारुन काढला. सोभासिंगास घेऊन आले त्याने रदबदली फार केली. परंतु न एकता सोभागसिंग चंद्रावत तोफेच्या तोंडी देऊन उडवून दिला. सोभागसिंग हा चंद्रावतात शूरत्वाचा व कर्तृत्वाचा होता; तोही खर्ची पडला. तेव्हा भवानी सिंगाची हिंमत न पुरता तो तीनशे स्वारांनिशी रात्री पळून गेला चहुकडे जलुश वाढून पूर्ववत बंदोबस्त झाला. राज्यांत राज्य प्रजेस चैन[३३२]

पुण्यास नाना फडणवीसास हेवर्तमान कळताच पुण्यात अहिल्याबाईचा गौरव करण्यासाठी तोफा उडविण्यात आल्या.[३३३] नानाने पुणे दरबारात ''अहिल्याबाईची स्तुती केली बाईसाहेबांचे स्तुति स्तोत्रे सहा घटिकांपर्यंत गेले शापादपि शरादपि असे बायकांत अहिल्याबाई दिसण्यात आली

आजपावेतो स्नानसंध्या धर्माची प्रवृत्ती ऐकण्यात येत होती. आज पराक्रमाची गोष्टच मोठीच केली पुण्याचा  दरवाजा म्हणजे महिष्मती नर्मदातीर आम्हास आज समजल.''संपूर्ण मानकरी सरदार यांनी माना डोलविल्या.''[३३४]

अशा प्रकारे अहिल्याबाईंनी आपली सैनिकी प्रतिभा, राजनैतिक दूरदर्शिता सातत्य आणि साहसाच्या बळावर फक्त राघोबा पेशव्यांविरुध्द तलवार न चालविता मुत्सद्येगिरीने रक्ताचा एक थेंब न सांडता युध्द जिंकले नाही तर चंद्रावंताविरुध्द आक्रमण युध्दनीतीचा प्रभावी वापर करुन चंद्रावंताना पराभूत केले त्यांच्या सशक्त विद्रोहाला कुचलून टाकले व दक्षिण राजस्थान आणि मेवाडमध्ये पुन: मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. ही आश्चर्याची गोष्ट आहे की जेथे १७८७ मध्ये लालसोट येथे रजपुतांनी  महादजी शिंदेसारख्या पराक्रमी दिग्गजांला माघार घेण्यास भाग पाडले त्याच रजपुतांना आहिल्याबाईंनी पूर्णपणे पराभूत केले.

### ३.४३अहिल्याबाईवर दु:खाचा डोंगर कोसळला :-

अहिल्याबाईंनी आपल्या आयुष्यात कुटुंबातील सासरे, सासू, पती व पुत्र यांचे मृत्यु बघितले होते.  परंतु दुर्दैव त्यांची पाठ सोडीत नव्हते. नोव्हेंबर १७९० मध्ये नातू नथ्योबाचा आजारपणात मृत्यु झाला. कार्तिक शुध्द ९ सोमवारी तृतीय प्रहरी देवाज्ञा झाली.[३३५] उभयंता स्त्रिया लहान होत्या त्यांत एक वर्ष अठराची व एक वर्ष दहाची त्यांनी धैर्य मोठे करुन सहगमन केले. समागमे (अहिल्या)बाईंनी पायउतार चरण चाली स्मशानास गेली.[३३६] आपल्या नातवाच्या मृत्युचे अहिल्याबाईस तीव्र दु:ख झाले.

पुण्याहून नाना फडणीस, नागपूरहून सेनासाहेब सुभा रघुजी भोसले, निजाम, पेशव्यांच्या दरबारी असलेला होळकरांचा वकील यशवंत गंगाधर चंद्रचुड, कृष्णगडहून शेखरशरीफ भाई, मल्हारराव (दुसरा), काशीराव होळकर यांची सांत्वनपर पत्रे अहिल्याबाईस आली.[३३७] नातवाच्या मृत्युने खिन्न झालेल्या अहिल्याबाईस महायात्रेस जाण्याचे बोलू लागल्या. परंतु तुकोजीनी त्यांचे सांत्वन करुन समजूत घातली.[३३८]

नातवाच्या मृत्युच्या दु:खातून सावरल्या जात नाही तोच अहिल्याबाईंचा जावई यशवंतराव फणसे याचा नोव्हेंबर १७९१ मध्ये आजारपणात मृत्यु झाला. कार्तिक शु ।।१५ परलोकास गेले.

मोठा अनर्थ झाला वय फार थोडे[३३९] अहिल्याबांईची मुलगी मुक्ताबाई व तिच्या दोन सवती यावेळी सती गेल्या.[३४०] या मृत्युसत्राने अहिल्याबाई हादरुन गेल्या.

पेशवे सवाई माधवराव, नाना फडणीस, नागपूरकर सेनासाहेब सुभा रघुजी भोसले, नागपूर, पुणे, हैद्राबाद, जयपूर येथील वकिलांचे सांत्वनपर पत्रे अहिल्याबाईस आली.[३४१] नातु जावई व मुलगी या जवळच्या नातेवाईकांच्या मृत्युमुळे शोकाकूल झालेल्या अहिल्याबाईची मन:स्थिती राज्यकारभारातून निवृत्तीची झाली होती.[३४२] तुकोजीने वारंवार पत्रे पाठवून सुभेदारांच्या पायाची व स्वत:च्या गळ्याची शपथा देवून असा विचार मनातही न आणण्याची विनंती अहिल्याबाईला केली.[३४३] हळूहळू अहिल्याबाईंनी राज्यकारभारात लक्ष घालण्यात सुरवात केली.[३४४]

# संदर्भ सूची


१) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड-५ (अ) निग्राहक माधवराव (क) अपयशी नारायणराव (ख) दूराग्रही रघूनाथराव, मुंबई, २०१०, पृ.क्र.२८

२) उपरोक्त : ३०

३) उपरोक्त खोबरेकर वि.गो.,मराठयांचा स्वा-यांचे मुक्काम, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, प्रकाशन, मुंबई, इ.स.१९७७, पृ.क्र.२९४

४) लुनिया बी.एन., मराठा प्रभुत्व भाग-३, आग्रा, प्रथमावृत्ती १९८५, पृ.क्र.३,४

५) डॉ.एस.एस. गाठाळ, मराठयांचा इतिहास, औरंगपूरा, औरंगाबाद, २००८, पृ.क्र.२९१

६) कुलकर्णी अ.रा.पुण्याचे पेशवे, पुणे, द्वितीय आवृत्ती २०००, पृ.क्र.४८

७) कोलारकर श.गो., मराठयांचा इतिहास, (शिवकाळापासून मराठयांच्या पाडावा पर्यंत), इ.स.१६०० ते १८००, नागपूर, चतुर्थ आवृत्ती १९९७, ९८

८) उपरोक्त , पृ.क्र.३१३

९) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.३३

१०) उपरोक्त ३३

११) उपरोक्त ३४

१२) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपादक), मराठयांचा इतिहास खंड-३, पुणे, २०१०, पृ.क्र.६

१३) सरदेसाई गो.स. मराठी रियासत,खंड-५, पृ.क्र.४३

१४) उपरोक्त, पृ.क्र.४४

१५) उपरोक्त पृ.क्र.४४

१६) उपरोक्त पृ.क्र.४५

१७) खरे वा.वा.(संपादक) ऐतिहासिक लेखसंग्रह भाग-१, कुरूंदवाड भाऊ खाना छापखाना, १९०८, पृ.क्र.९३

१८) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.४७

१९) उपरोक्त , पृ.क्र.४८,४९

२०) खरे वा.वा (संपादक) ऐतिहासिक लेख संग्रह भाग-१ पृ.क्र.९३

२१) जोशी शं.ना.थोरले माधवराव पेशवे शकावली, पुणे, १९२९, पृ.क्र.४०१

२२) सरदेसाई गो.स. मराठी रियासत,खंड-५, पृ.क्र.५३

२३) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपादक) खंड-३, पृ.क्र.१०१

२४) कोलारकर श.गो.मराठयांचा इतिहास , (शिवकाळापासून मराठयांच्या पाडावा पर्यंत) पृ.क्र.३१६

२५) सहस्त्रबुध्दे सखाराम अच्युत, श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, मुंबई, पृ.क्र.६२

२६) उपरोक्त, पृ.क्र.६२

२७) काळे यादव माधव, नागपूर प्रांताचा इतिहास, बुलढाणा, १९२४ पृ.क्र.१५१

२८) सरदेसाई गो.स.मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.५६

२९) ठाकूर वा.वा.होळकरशाहीचा इतिहास भाग-१, इंदौर,१९४४, पृ.क्र.१२३

३०) रोडे सोमनाथ शंकर, मराठयांचा इतिहास, १९९८-९९, पृ.क्र.३८३

३१) ठाकूर वा.वा. (संपादक) होळकर शाहीच्या इतिहासाची साधने भाग-२, इंदौर, १९४४, पृ.क्र.२९६

३२) सरदेसाई गो.स.मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.६५

३३) ठाकूर वा.वा.होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, भाग-२, पृ.क्र.२९६

३४) उपरोक्त , पृ.क्र.३००

३५) ठाकूर वा.वा. होळकर शाहीचा इतिहास भाग-१, पृ.क्र.१२७

३६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड-४ (पेशवा बाळाजीराव), मुंबई,२०१०,पृ.क्र.६५८

३७) ठाकूर वा.वा.होळकरशाहीचा इतिहास भाग-१, पृ.क्र.१३२

३८) उपरोक्त : ६३

३९) सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.१३१

४०) ठाकूर वा.वा.होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, इंदौर,१९४४, पृ.क्र.१२६,१२७

४१) उपरोक्त, पृ.क्र.१२९,१३०

४२) गुजर यादव, मल्हारराव होळकर व त्यांचा काळ, नागपूर, १९९१, पृ.क्र२०५

४३) विविध ज्ञानविस्तार, नोव्हेंबर , डिसेंबर १९३३, अंक ११.१२, लेखांक-१, पृ.क्र.३०३

४४) ठाकूर वा.वा.होळकरशाहीचा इतिहास, भाग-१, पृ.क्र.१३२

४५) गुजर यादव, मल्हारराव होळकर व त्यांचा काळ, पृ.क्र.२०६

४६) सरदेसाई गो.स : मराठी रियासत,खंड-५, पृ.क्र.१३२

४७) ठाकूर वा.वा. होळकराशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१,पृ.क्र.२१

४८) सरदेसाई गो.स. : मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१६१

४९) उपरोक्त, पृ.क्र.१३२

५०) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास, पृ.क्र.१३२

५१) सरदेसाई गो.स : मराठी रिसासत खंड-५, पृ.क्र.१३७

५२) ठाकूर वा.वा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, पृ.क्र.१३७

५३) उपरोक्त , पृ.क्र.१५०

५४) गुजर यादव : मल्हारराव होळकर व त्यांचा काळ, पृ.क्र.२०७

५५) ठाकूर वा.वा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, पृ.क्र.२५३,२५४

५६) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे वर्ष ९ वे, त्रैमासिक अंक २२१, पृ.क्र.३१,३२

५७) सरदेसाई गो.स. : मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१३७

५८) मतकर गणेश : इन्दौर की विश्व वंदनीय मातोश्री अहिल्याबाई होळकर २, इन्दौर, २००९, पृ.क्र.९

५९) Malcom, Sir John, Amemoir of central India Vol.I, publisher-Thacker spink and company, Calcutta, 3rd Edition 1880

६०) ठाकूर वा.वा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, पृ.क्र.२५४

६१) उपरोक्त, पृ.क्र.२५५

६२) केळकर नरसिंह चिंतामण : मराठे व इंग्रज, पुणे, द्वितीय आवृत्ती १९१८, पृ.क्र.१४१

६३) पुरूषोत्तम श्री. अहिल्याबाई होळकर चरित्र, मुंबई, १९३३, पृ.क्र.६२

६४) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग २, पृ.क्र.१६१

६५) उपरोक्त, पृ.क्र.१६१,१६२

६६) उपरोक्त

६७) उपरोक्त : पृ.क्र.१६२,१६३

६८) उपरोक्त : पृ.क्र.१६३

६९) उपरोक्त : पृ.क्र.१६४

७०) उपरोक्त : पृ.क्र.१६५

७१) उपरोक्त, पृ.क्र.१६५

७२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.१७५

७३) ठाकूर वा.वा.होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, भाग-१, पृ.क्र.१०६,१०७

७४) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१७२

७५) उपरोक्त, पृ.क्र.१७२

७६) वाड चि.ग.,पारसनीस द.बा (संपादक), इतिहास संग्रहात प्रसिध्द झालेली साधने दप्तरातील सनदा पत्रातील माहिती (शाहू राजे व त्यांचे पुढील कारकिर्द) मुंबई,१९१७, पृ.क्र.२०९

७७) अवधूत शास्त्री, धर्म भास्कर मे, जून १९७५ अंक १२, पृ.क्र.९४

७८) खडपेकर विनया, ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर, २००७, पृ.क्र.९४

७९) उपरोक्त, पृ.क्र.९४

८०) कुलकर्णी अ.रा,.खरे ग.ह. मराठयांचा इतिहास, खंड-३, पृ.क्र.४३१

८१) पुरूषोत्तम श्री अहिल्याबाई होळकर चरित्र, पृ.क्र.८९

८२) केळकर यशवंत नरसिंह, होळकरांची कैफियत , १९५४, पृ.क्र.४२,४३

८३) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.२१९,२२०

८४) उपरोक्त, पृ.क्र.१७२

८५) उपरोक्त, पृ.क्र.१७२

८६) उपरोक्त, पृ.क्र.१९७

८७) केळकर य.न.,होळकरांची कैफियत , पृ.क्र.४३

८८) उपरोक्त पृ.क्र.३७

८९) विविध ज्ञान विस्तार एप्रिल, मे १९३४, अंक ४-५, लेखांक-२, पृ.क्र.६७

९०) उपरोक्त, पृ.क्र.६७

९१) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर, खंड-२९, मुंबई, १९३३, पृ.क्र.१७५,१७७

९२) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.१७३

९३) उपरोक्त, पृ.क्र.१७३

९४) उपरोक्त पृ.क्र.१७३

९५) केळकर य.न., होळकरांची कैफियत पृ.क्र.४३

९६) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१७३

९७) केळकर य.न., होळकरांची कैफियत पृ.क्र.४६

९८) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.१७३

९९) उपरोक्त, पृ.क्र.१७३-१७४

१००) उपरोक्त, पृ.क्र.१७५

१०१) उपरोक्त, पृ.क्र.१७६

१०२) उपरोक्त, पृ.क्र.१७३

१०३) उपरोक्त, पृ.क्र.१७५

१०४) उपरोक्त, पृ.क्र.१७५

१०५) केळकर य.न., होळकरांची कैफियत, पृ.क्र.४७

१०६) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१७४

१०७) उपरोक्त, पृ.क्र.१७४

१०८) पुरूषोत्तम, श्री अहिल्याबाई होळकर चरित्र, पृ.क्र.१००

१०९) उपरोक्त, पृ.क्र.१०१

११०) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-७, (उत्तर विभाग-२, सवाई माधवरावांचा उत्तरायु : क्रम), मुंबई, २०१०, पृ.क्र.१३

१११) गोखले वा.दा, अहिल्याबाई होळकर, पुणे, १९४९, पृ.क्र.१०

११२) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत, खंड-७, पृ.क्र.१४

११३) आठवले सदाशिव, सासवडकर, मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, नागपूर, दुसरी आवृत्ती-१९८२, पृ.क्र.१५३

११४) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.,मराठयांचा इतिहास, खंड-३ पृ.क्र.१४

११५) सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड-७, पृ.क्र.१७

११६) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास खंड-३, पृ.क्र.१४

११७) Thakur w.w., Life and life work of Shri Devi Ahilyabai Holkar, Indore, P.14

११८) उपरोक्त, पृ.क्र.१४

११९) उपरोक्त, पृ.क्र.१५

१२०) पुरूषोत्तम श्री अहिल्याबाई होळकर चरित्र पृ.क्र.१०८

१२१) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.२८

१२२) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., खंड-३, पृ.क्र.८

१२३) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१३९

१२४) उपरोक्त, पृ.क्र.१३९

१२५) उपरोक्त, पृ.क्र.१७२

१२६) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर, खंड-२९, मुंबई, १९३३, पृ.क्र.१८४

१२७) सरदेसाई गो.स., मराठी रिसासत खंड-५, पृ.क्र.१७७

१२८) उपरोक्त, पृ.क्र.१७७

१२९) राजवाडे वि.का, मराठयांच्या इतिहासाची साधने खंड-१३, पुणे, इ.स.१९०९, प्रस्तावनामधील

१३०) खरे वा.वा.(संपादक) ऐतिहासिक लेखसंग्रह भाग-३, प्रकाशक य.वा.खरे, मिरज, पृ.क्र.७४०

१३१) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१८०

१३२) उपरोक्त, पृ.क्र.१८०

१३३) केळकर य.न.,होळकरांची कैफियत, पृ.क्र.३७

१३४) सरदेसाई गो.स.मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१८१

१३५) उपरोक्त, पृ.क्र.१८१

१३६) साने काशिनाथ नारायण, होळकरांची कैफियत, का.ना.डेक्कन कॉलेज, शालिवाहन शके १८०८, पृ.५१

१३७) उपरोक्त, पृ.क्र.५१

१३८) उपरोक्त, पृ.क्र.५१

१३९) उपरोक्त, पृ.क्र.५१

१४०) उपरोक्त, पृ.क्र.५२

१४१) पारसनीस द.बा. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे खंड-१, लेखांक ३२, मुंबई १९१०

१४२) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१८१,१८२

१४३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१६

१४४) उपरोक्त, पृ.क्र.१६

१४५) वाड गणेश चिमणाजी (संपादक)थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी भाग-१, इ.स.१९११, पृ.क्र.१८०,१८१

१४६) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-७, पृ.क्र.१८४

१४७) उपरोक्त, पृ.क्र.१८४

१४८) उपरोक्त, पृ.क्र.१८४

१४९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.१४२

१५०) उपरोक्त, पृ.क्र.१४२

१५१) उपरोक्त, पृ.क्र.१४२

१५२) ठाकूर वा.वा.,होळकरशाहीचा इतिहास भाग२, इंदूर १९४६, पृ.क्र.२९९

१५३) लुनिया बी.एन. मराठा प्रभुत्व, भाग-३, आगरा, १९८५, पृ.क्र.६०

१५४) Sarkar J.N, Fall of the Mughal Empire Vol.३, Calcutta, P.61

१५५) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, इंदौर, पृ.क्र.३००

१५६) उपरोक्त, पृ.क्र.३००

१५७) उपरोक्त, पृ.क्र.३०१

१५८) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१४६

१५९) उपरोक्त, पृ.क्र.१४६

१६०) उपरोक्त, पृ.क्र.१४६

१६१) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, इंदौर, पृ.क्र.३००

१६२) खरे य.वा. मराठा राज्याचा उत्तरार्ध खंड-१, मिरज, १९२७, पृ.क्र.२६३

१६३) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, इंदौर, पृ.क्र.३००,३०१

१६४) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१४७

१६५) खरे य.वा. मराठा राज्याचा उत्तरार्ध , पृ.क्र.२३९

१६६) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१४७

१६७) उपरोक्त, पृ.क्र.१४७

१६८) सरदेसाई गो.स.,मराठों का नवीन इतिहास खंड-२, आगरा, तृतीय आवृत्ती संस्करण जानेवारी १९७२, पृ.क्र.५३७

१६९) सरकार जदुनाथ, मोगल साम्राजका पतन खंड-३ रा, आगरा, १९७२,पृ.क्र.१४

१७०) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१४८

१७१) उपरोक्त, पृ.क्र.१४९

१७२) उपरोक्त, पृ.क्र.१४९

१७३) उपरोक्त, पृ.क्र.१४९

१७४) केतकर श्री. व्य. (संपादक) महाराष्ट्र ज्ञानकोष, पुणे, पृ.क्र.२१३

१७५) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१४९

१७६) पारसनीस द.ब. महेशवर दरबाराची बातमी पत्रे भाग-१, मुंबई-१९१०, पृ.क्र.३२

१७७) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.९३

१७८) उपरोक्त, पृ.क्र.९३

१७९) उपरोक्त, पृ.क्र.९३

१८०) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१५२

१८१) उपरोक्त, पृ.क्र.१५२

१८२) उपरोक्त, पृ.क्र.१५३

१८३) उपरोक्त, पृ.क्र.१५३

१८४) उपरोक्त, पृ.क्र.१५३

१८५) उपरोक्त, पृ.क्र.१५३

१८६) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ.क्र.३०२

१८७) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र. १५६

१८८) उपरोक्त, पृ.क्र.१५७

१८९) उपरोक्त, पृ.क्र.१५७

१९०) सरदेसाई गो.स.,पेशवे दप्तर, खंड-२२, मुंबई, १९३२, पृ.क्र.३३

१९१) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१५७

१९२) उपरोक्त, पृ.क्र.१५७

१९३) उपरोक्त, पृ.क्र.१५८

१९४) उपरोक्त, पृ.क्र.१५८

१९५) खरे य.वा. मराठा राज्याचा उत्तरार्ध खंड-१, मिरज, १९२७, पृ.क्र.२४४

१९६) भारतीय राज्यों का इतिहास पृ.क्र.२९,३०

१९७) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१५९

१९८) भंडारी एस.आर, भारत के देशी राज्य प्रथम खंड ११-४-२६, पृ.क्र.३०

१९९) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ.क्र.३०३

२००) उपरोक्त, पृ.क्र.३०३

२०१) खरे य.वा., मराठा राज्याचा उत्तरार्ध खडं-१, पृ.क्र.२४५-२४६

२०२) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ.क्र.३०४

२०३) पुरंदरे कृ.पा. पुरंदरे दप्तर, भाग-३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे,१९२९, पृ.क्र.१४८

२०४) लुनिया बी.एन., मराठा प्रभुत्व भाग-३, पृ.क्र.९९

२०५) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.२९९

२०६) कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह. मराठयाचा इतिहास, खंड-३, पृ.क्र.५२

२०७) केळकर य.न. होळकरांची कैफियत, १९५४

२०८) सरदेसाई गो.स.,पेशवे दप्तर खंड १९, गर्व्हमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१ पृ.क्र.७७

२०९) सरदेसाई गो.स.,पेशवे दप्तर खंड १९, गर्व्हमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१ पृ.क्र.७

२१०) रोडे सोमनाथ शंकर, मराठयांचा इतिहास, १९९७-९८, पृ.क्र.४००

२११) सरदेसाई गो.स.,मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.३५४,३५५

२१२) उपरोक्त, पृ.क्र.

२१३) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९१, पृ.क्र.११४

२१४) सरदेसाई गो.स. ऐतिहासिक लेखनमाला , भाग-२, सातारा,१९४०, पृ.क्र.३६७

२१५) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, पृ.क्र.११४

२१६) सरदेसाई गो.स. कुलकर्णी कृ.पा.काळे या.मा, ऐतिहासिक पत्रव्यवहार पुणे. पृ.क्र.१३२

२१७) कुलकर्णी अ.रा. पुण्याचे पेशवे, पुणे, द्वितीय आवृत्ती २०००, पृ.क्र.६५

२१८) उपरोक्त, पृ.क्र.६५

२१९) रोडे सोमनाथ शंकर, मराठयांचा इतिहास, पृ.क्र.४००

२२०) सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड-५, पृ.क्र.३५९

२२१) लुनिया बी.एन. मराठा प्रभुत्व, भाग-३, पृ.क्र.९९

२२२) उपरोक्त

२२३) राजवाडे वि.का मराठयांचा इतिहासाची साधने खंड-१०, लेख-८९ते९२, १०२,१०३ पुणे

२२४) सरदेसाई गो.स. पेशवे दप्तर, खंड ३६,२५,३०, मुंबबई, १९३३

२२५) उपरोक्त, पृ.क्र.३६,२५

२२६) य.ना. केळकर होळकरांची कैफियत, पृ.क्र.६८

२२७) पारसनीस द.ब. महेशवर दरबाराची बातमीपत्रे, भाग-१४, लेखांक ११०, पृ.क्र.२१८,१९

२२८) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. मराठयांचा इतिहास पृ.क्र.५४

२२९) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, इंदौर, पृ.क्र.३०६

२३०) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.७१

२३१) उपरोक्त, पृ.क्र.

२३२) उपरोक्त, पृ.क्र.७१,७२

२३३) उपरोक्त, पृ.क्र.७२

२३४) उपरोक्त, पृ.क्र.७३

२३५) उपरोक्त

२३६) उपरोक्त, पृ.क्र.७४

२३७) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड-५, पृ.क्र.१९

२३८) उपरोक्त, पृ.क्र.२१

२३९) लोही म.ना. देवी अहिल्याबाई होळकर वास्तवदर्शन, नागपूर, २००१, पृ.क्र.३२
२४०) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, भाग-१, पृ.क्र.६
२४१) उपरोक्त, पृ.क्र.
२४२) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.७५,७४
२४३) उपरोक्त, पृ.क्र.७४
२४४) उपरोक्त, पृ.क्र.७४
२४५) उपरोक्त, पृ.क्र.७४,७५
२४६) पारसनीस द.ब. महेशवर दरबाराची बातमीपत्रे, भाग-१, पृ.क्र.३३
२४७) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.७५
२४८) उपरोक्त, पृ.क्र.७५,७६
२४९) लोही म.ना. देवी अहिल्याबाई होळकर वास्तवदर्शन, पृ.क्र.६४
२५०) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.७६
२५१) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास पृ.क्र.११७
२५२) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ.क्र.३१४
२५३) पारसनीस द.ब. महेशवर दरबाराची बातमीपत्रे, भाग-१, पृ.क्र.१०
२५४) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास  पृ.क्र.३१४
२५५) उपरोक्त, पृ.क्र.३१४
२५६) भंडारी एस.आर, भारत के देशी राज्य, पृ.क्र.३३५
२५७) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-१, पृ.क्र.३१४
२५८) उपरोक्त, पृ.क्र.३१५
२५९) उपरोक्त, पृ.क्र.३१५
२६०) भंडारी एस.आर, भारत के देशी राज्य, पृ.क्र.३५
२६१) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास, पृ.क्र.३१५
२६२) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र,८१
२६३) उपरोक्त, पृ.क्र.८१
२६४) उपरोक्त, पृ.क्र.२१४
२६५) उपरोक्त, पृ.क्र.२१४
२६६) उपरोक्त, पृ.क्र.८१
२६७) उपरोक्त, पृ.क्र. ८२
२६८) उपरोक्त, पृ.क्र.२१४

२६९) उपरोक्त, पृ.क्र.२१४

२७०) उपरोक्त, पृ.क्र.८२

२७१) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास,  पृ.क्र.३१८

२७२) उपरोक्त, पृ.क्र.३१९

२७३) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.८२

२७४) उपरोक्त, पृ.क्र.८३

२७५) उपरोक्त, पृ.क्र.८३

२७६) उपरोक्त, पृ.क्र.८३

२७७) उपरोक्त, पृ.क्र.८३

२७८) सरदेसाई गो.स. मराठी रियासत उत्तर विभाग-१, पृ.क्र.३४०

२७९) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.८५,८६

२८०) खरे वा.वा. ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग-७, पृ.क्र.३५,३२

२८१) सरदेसाई गो.स. मराठी रियासत उत्तर विभाग-१, पृ.क्र.३४०

२८२) उपरोक्त, पृ.क्र.३५६

२८३) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे भाग-१, पृ.क्र.१२४

२८४) कोलारकर श.गो. मराठयांचा इतिहास, शिवकाळापासून मराठयांच्या पाडावा पर्यंत, पृ.३९९

२८५) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.८६

२८६) लुनिया बी.एल. मराठा प्रभुत्व भाग-३, पृ.क्र.२१८

२८७) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-१, पृ.क्र.३२७

२८८) भागवत अ.ना. होळकरशाहीतील ऐतिहासिक पत्रव्यवहार १९२५, पृ.क्र.२६१

२८९) लुनिया बी.एल. मराठा प्रभुत्व भाग-३, पृ.क्र.२१८

२९०) उपरोक्त, पृ.क्र.२१८

२९१) सरदेसाई गो.स. मराठी रियासत उत्तर विभाग-७, पृ.क्र.३३४

२९२) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-१, पृ.क्र.३२३

२९३) उपरोक्त, पृ.क्र.३२४

२९४) उपरोक्त, पृ.क्र.३२४

२९५) उपरोक्त, पृ.क्र.३२४

२९६) उपरोक्त, पृ.क्र.३२४

२९७) उपरोक्त, पृ.क्र.३२४

२९८) उपरोक्त, पृ.क्र.३२५

२९९) उपरोक्त, पृ.क्र.३२५

३००) उपरोक्त, पृ.क्र.३२७

३०१) केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.क्र.२७

३०२) उपरोक्त, पृ.क्र.८७

३०३) उपरोक्त, पृ.क्र.८७

३०४) उपरोक्त, पृ.क्र.८८

३०५) उपरोक्त, पृ.क्र.८८

३०६) उपरोक्त, पृ.क्र.९०

३०७) बर्वे एम. डब्लू देवी अहिल्याबाई होळकर , पृ.क्र.८६

३०८) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, भाग-१, पृ.क्र.१२३

३०९) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, इंदौर,१९४५, पृ.क्र.१६६

३१०) शास्त्री अवधूत, देवी अहिल्याबाई होळकर इंदौर,१९७५, पृ.क्र.१५२

३११) उपरोक्त, पृ.क्र.१५२

३१२) उपरोक्त, पृ.क्र.१५२

३१३) ठाकूर वा.वा. होळकर शाहीचा इतिहास इंदौर, पृ.क्र.१६७

३१४) उपरोक्त, पृ.क्र.१६७

३१५) उपरोक्त, पृ.क्र.१६८

३१६) शास्त्री अवधूत, धर्म भास्कर देवी अहिल्याबाई होळकर, पृ.क्र.१८४

३१७) उपरोक्त, पृ.क्र.१८४

३१८) शास्त्री अवधूत (संपादक), धर्म भास्कर, देवी अहिल्याबाई होळकर,होळकर विशेषांक, मे जुन १९७५, पृ.क्र.१५३

३१९) उपरोक्त, पृ.क्र.१५३

३२०) उपरोक्त, पृ.क्र.१५३

३२१) उपरोक्त, पृ.क्र.१५३

३२२) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग-२, पृ.क्र.१६७

३२३) उपरोक्त, पृ.क्र.१७०,१७१

३२४) उपरोक्त, पृ.क्र.१७२

३२५) उपरोक्त

३२६) शास्त्री अवधूत धर्म भास्कर, देवी अहिल्याबाई होळकर, पृ.क्र.१५३

३२७) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास, भाग २ रा, पृ.क्र.१७२

३२८) उपरोक्त, पृ.क्र.१५३

३२९) उपरोक्त, पृ.क्र.१५३

३३०) उपरोक्त, पृ.क्र.१७२, १७३

३३१) उपरोक्त, पृ.क्र.१७२

३३२) पारसनीस दत्तात्रय बळवंत, होळकर दरबारातील हिंगण्याची वकिली, मुंबई, १९११, पृ.क्र.२१

३३३) उपरोक्त, पृ.क्र.२१

३३४) उपरोक्त, पृ.क्र.२१

३३५) गोखले वा.दा. अहिल्याबाई होळकर पूणे १९४९, पृ.क्र.४२

३३६) उपरोक्त, पृ.क्र.४१

३३७) ठाकूर वा.वा. (संपादक), होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, भाग-१, पृ.क्र.३०४, ३०५, ३०६

३३८) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, भाग-२ रा, पृ.क्र.२१३

३३९) उपरोक्त, पृ.क्र.२२८

३४०) ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास, पृ.क्र.३५३

३४१) उपरोक्त, पृ.क्र.३५६

३४२) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, पृ.क्र.२३१

३४३) ठाकूर वा.वा. (संपादक), होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, भाग-१, पृ.क्र.३५३, ३५४

३४४) पारसनीस द.ब. महेश्वर दरबाराची बातमीपत्रे, भाग-२ रा, मुंबई, पृ.क्र.२१३

## प्रकरण चौथे

## अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील सामाजिक कार्यातील योगदान

अहिल्याबाई होळकर यांनी केलेले सामाजिक कार्ये महान आहे. समाजात गौरवशाली वर्तमान निर्माण करण्याची शक्ती असते. त्या शक्तीला ओळखूनच अहिल्याबाई होळकर यांनी सामाजिक सुधारणा घडवुन आणण्याचे कार्ये केले. त्यांनी आपल्या कादकीर्दींमध्ये अनेक सामाजिक कार्य केले. म्हणूनच आज देखील त्या सामाजिक सुधारणा करणाऱ्या राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी जे सामाजिक कार्य केल. त्यावर आपण प्रकाश टाकू.

### ४.१ अहिल्याबाई होळकरकालीन सामाजिक परिस्थिती:

अहिल्याबाई होळकर यांच्या काळात राज्यात सर्वत्र शांतता होती व शांततेमुळे त्यांच्या राज्यात सामाजिक सुव्यवस्था निर्माण झाली होती. अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यात काही पारंपरिक अंधश्रध्देवर आधारलेल्या सामाजिक संकेताला त्यांनी थारा दिला नाही. त्यांची जीवनदृष्टी मूलत: परिवर्तनशील व पुरोगामी होती. त्या काळात पुष्कळ जाती जमातीमध्ये व विशेषत: राजेरजवाड्यात बायकांना पडदानशीन ठेवण्याची पध्दती रुढ झाली होती. ती पडदा पध्दती अहिल्याबाईंनी पाळली नाही. अशा पध्दतीने समाजातील रुढ चालीरितींना विरोध करणे सोपे नव्हते. परंतु अहिल्याबाई होळकर यांनी ते करण्याचे धाडस दाखविले. त्याचप्रमाणे ''अहिल्याबाईंची हिंदु धर्मावर पूर्ण निष्ठा व अखंड श्रध्दा होती. ती धर्मसहिष्णू होती. सर्व धर्मांना ती समान लेखत असे. हिंदुंना त्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे व मुसलमानांना इस्लाम धर्मानुसार न्याय देण्याची तिने व्यवस्था केल्याने सर्व समाज संतुष्ट होता.''[१] यावरुन असे लक्षात येते की, अहिल्याबाई होळकर हिंदु असून देखील इतर धर्मातील लोकांना समान लेखत होत्या व धर्मानुसार न्याय व्यवस्था असल्याचे दिसून येते.

त्याच प्रमाणे तत्कालीन समाजात प्रजेला चोर, लुटारुंपासून उपद्रव होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. ''एकदा नेमाडमध्ये भिल्लांनी उच्छाद मांडला. चोऱ्या, डाके, लुटमार हा नित्याचा खेळ झाल्याने लोकजीवन असुरक्षित झाले. छोटे जमीनदार भिल्लांना आश्रय देत त्या मोबदल्यात त्यांच्याकडून वाटाही घेत.'भिल्ल कवडी' नामक यात्रेकरुकडून कर वसूल करीत''[२] अशा प्रकारे अहिल्याबाई होळकरकालीन सामाजिक परिस्थिती होती. जमीनदार लोक पैसे कमविण्यासाठी अशा

प्रकारचे उद्योग करीत होते. अहिल्याबाई होळकर यांनी या स्थितीतून बाहेर येण्यासाठी व ही परिस्थिती बदलण्यासाठी भिल्लांच्या प्रमुखाला बोलावून यात्रेकरुंना त्रास होऊ नये अशी समज दिली. काही लोकांनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही म्हणून त्यांनी कठोरपणे भिल्लांचा बिमोड केला व शरण आलेल्या भिल्लांना शेतीवाडी व कामधंदा मिळवून दिला व यात्रेकरुंच्या संरक्षणाची जबाबदारी भिल्लांवर सोपविली. आज देखील खेडेगावामध्ये भिल्लांना शेती राखण्याचे काम दिले जाते. व शेतात पिकणाऱ्या धान्याचा काही हिस्सा त्यांना मजुरी म्हणून किंवा देखभालीपोटी दिला जातो.

अशा प्रकारची सामाजिक परिस्थिती अहिल्याबाई यांच्या काळात होती.

## ४.२ अहिल्याबाई होळकर यांचे पाणी पुरवठा संबंधी सुधारणा :

संभाव्य दुष्काळांना तोंड देणे, एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांची पाण्याची सोय करणे इत्यादी कारणांसाठी प्राचीन काळापासून राज्यकर्ते कर्तव्य बुध्दीने तलाव व विहीरी बांधत असत. अशोक, शेरशहासूर , पेशवे, अहिल्याबाई इत्यादी राज्यकर्त्यांनी अशाच समाजोपयोगी पाणी पुरविण्याच्या संबंधी सुधारणा केलेल्या दिसतात.

### ४.२.१ विहीरी:

अहिल्याबाई होळकर यांनी समाजातील लोकांची पाणी पिण्याची व्यवस्था व्हावी म्हणून अनेक ठिकाणी विहीरी खोदण्याचे काम केलेले दिसते. ''चांदवड हे होळकरांच्या स्वदेश विभागाचे प्रमुख केंद्र होते. तेथील रंगमहालात एक विहीर , रेणूका मंदिरात दुसरी विहीर, नरोटी बारव म्हणून प्रसिध्द असलेली तिसरी विहीर, विठोबा बारव म्हणून ओळखली जाणारी चौथी विहीर अशा चार विहीरी चांदवड परिसरात अहिल्याबाईंनी बांधल्या.''[३] ''त्याचप्रमाणे अहिल्यापूर ता.शिरपूर जि.धुळे, सकरगाव ता.निफाड जि. नाशिक, कसबे ओझर, जि.नगर, पुण्याजवळील वाफगाव, तुळजापूर, भीमाशंकर, पाळधी ता. जामनेर,जि. जळगाव, जेजुरी उज्जेन या प्रमाणे अहिल्याबाई होळकर यांनी विविध ठिकाणी मध्यप्रदेश, राजस्थान व महाराष्ट्र इत्यादी ठिकाणी पिण्याच्या पाण्याकरिता विहिरी, तलाव व घाटनिर्माण केले. विहीरी बांधण्याचे उल्लेख सापडतात.''[४]

अशा प्रकारे समाजातील लोकांची गरज व समस्या पाहून अहिल्याबाई होळकर यांनी पिण्याच्या पाण्याची समस्या दूर व्हावी म्हणून विविध १६ ठिकाणी विहीरी खोदल्या व लोकांच्या समस्या दूर केल्याचे दिसून येते. आज देखील सरकार काही ठिकाणी शेतकऱ्यांना विहीरीसाठी अनुदान देत असल्याचे दिसून येते व त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाल्याचे दिसून येते.

**४.२.२ तलाव :**

भारतामध्ये प्राचीन काळात तलाव निर्माण करण्याची परंपरा आहे. ज्याप्रमाणे नद्यांना धार्मिक महत्त्व प्राप्त झाले होते त्याचप्रमाणे तलांवाना देखील धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तलावामुळे पावसाळ्यात पाणी संचय करण्याचे काम होते. व तेच पाणी उन्हाळ्यात पशु, पक्षी आणि माणसांसाठी उपयोगी पडते. तसेच मोठ्या तलावातील पाण्याचा शेतीलाही पाणीपुरवठा करता येतो याचे महत्त्व ओळखून अहिल्याबाई होळकर यांनी खालील तलावांची निर्मिती केली. व यातून मोठ्या प्रमाणात समाजकार्य व समाजहित घडून आल्याचे दिसून येते

१ जेजुरीचा मल्हार तलाव - जेजूरी महाराष्ट्र

२. त्र्यंबकेश्वरचा मोती तलाव- नाशिक महाराष्ट्र

३. चांदवड येथील रेणूका तलाव - महाराष्ट्र

४.परळी वैजनाथ येथील तलाव - महाराष्ट्र

५. ओंकारेश्वर येथील तलाव - महेश्वर मध्यप्रदेश ''[५]

**४.२.३ जलकुंभ :**

प्राचीन काळापासून भारतामध्ये जलकुंडाना महत्त्व आहे. जलकुंडाचा संबंध धर्माशी येतो. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणारे जलकुंड पवित्र मानलेली असून त्यात स्नान केल्याने पितरांचा उध्दार होतो असे समजले जाते. अहिल्याबाईनी आपल्या काळात अनेक ठिकाणी जलकुंड बांधलेले आहेत. ते खालीलप्रमाणे.

१. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त कुंड.

२. शिवालय तीर्थ-घृष्णेश्वर वेरुळ मराठवाडा.

३. केशव कुंड-रावेत.

४. हरिहर तीर्थ - परळी वैजनाथ.

५. म्हसवे ता. पारोळा येथील कुंड (प्रति खानदेश).

६. सप्तशृंग गडावरील शिवालय तीर्थ (नाशिक).

या ठिकाणी यात्रेकरुंच्या सोयीसाठी जलकुंभ बांधून घेतली.''[६] जलकुंडामुळे यात्रेकरुंच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होत होती. त्याचप्रमाणे धार्मिक कार्य करण्याची व्यवस्था होत होती. आजही या जलकुंडाच्या ठिकाणी धार्मिक विधी करण्यासाठी लोक जाताना दिसून येतात.

### ४.२.४ घाट :

हिंदू धर्मामध्ये प्राचीन काळापासून नदीला अत्यंत पवित्र असे स्थान आहे. नदीत स्नान केल्याने पाप धुवून निघतात, अशी हिंदुधर्मीयांची समजूत आहे. आणि म्हणूनच तीर्थक्षेत्री असलेल्या नदीत भाविक स्नान करतात. एवढेच नाही तर प्राचीन काळात गावे किंवा शहरे मोठ मोठ्या नदीच्या किनाऱ्यावर वसलेली दिसून येतात. अहिल्याबाई यांनीही नदीचे महत्त्व ओळखून यात्रेकरुंच्या सोयीसाठी अनेक नद्यांवर घाट बांधले ते पुढील प्रमाणे-

१. चौंडी येथील घाट.

२. पैठण येथील नागघाट.

३. नाशिक येथील घाट.

४. पुणतांबे येथील अहिल्या घाट.

५. बीड येथील घाट.

६. पंढरपूर येथील घाट.

७. महेश्वर येथील घाट-महेश्वर येथील घाटांची संख्या २८ आहे.

८. बऱ्हाणपूर येथील तापी नदीवरील घाट.

९. काशी येथील घाट.

१०. उज्जैन येथील घाट.

११. अयोध्या येथील घाट.

१२. मथुरा येथील घाट.

१३. हरिद्वार येथील घाटाचा जीर्णोध्दार.

१४. प्रयाग येथील घाट.

१५. श्री कुरुक्षेत्र व श्री नेमीपारण्य येथील घाट.

१६. गयातीर्थ येथील मदाधर घाट.

१७. पुष्कर येथील घाट.

१८. मंडलेश्वर येथील घाट.''[७]

अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी लोकांच्या सोयीसाठी विविध नद्यांवर घाट बांधलेले आहेत. आज देखील या घाटाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होतो. लोकांना आंघोळीसाठी व विविध धार्मिक विधीसाठी लोक या घाटाचा उपयोग करतात. अहिल्याबाई होळकर यांनी महाराष्ट्रात सहा तर महाराष्ट्राबाहेर बारा असे एकूण अठरा घाट बांधलेले आहेत. व अशा प्रकारचे समाजकार्य अहिल्याबाई होळकर यांनी केलेले दिसून येते.

### ४.३ अहिल्याबाई होळकरांनी बांधलेल्या धर्मशाळा :

मध्ययुगीन काळात प्रवासाची साधने अतिशय मर्यादित होती. त्यामुळे प्रवाशांना व यात्रेकरुंना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. प्रवाशांची सुविधा व्हावी म्हणून अहिल्याबाई होळकर यांनी विविध ठिकाणी धर्मशाळा बांधून फार मोठे सामाजिक कार्य केलेले दिसून येते. यात्रेकरुंसाठी अहिल्याबाई होळकर यांनी अनेक ठिकाणी धर्मशाळा बांधलेल्या आहेत. ते पुढील प्रमाणे -

१. हिमालय पर्वतावरील श्रीबद्रिनाथ येथे जाणाऱ्या रामगडचट्टी, बंदर चट्टी, व्यासगंगा, नुगनाथ येथे धर्मशाळा.

२. केदारेश्वर येथील धर्मशाळा.

३. उत्तर काशी येथील धर्मशाळा.

४. हरिद्वार येथील धर्मशाळा.

५. श्री क्षेत्र अयोध्दा येथील धर्मशाळा.

६. श्री क्षेत्र गया येथील धर्मशाळा.

७. श्री क्षेत्र वृंदावन येथील धर्मशाळा.

८. श्री नेमीशारण्य येथील धर्मशाळा.

९. श्री अमर कंटक येथील धर्मशाळा.

१०. उज्जैन अंगपात येथील धर्मशाळा.

११. ओंकारेशवर येथील धर्मशाळा.

१२. श्री क्षेत्र नाशिक येथील धर्मशाळा.

१३. चौंडी येथील धर्मशाळा.

१४. श्री रामेश्वर येथील धर्मशाळा.

१५. चांदवड येथील धर्मशाळा..

१६. वणी सप्तशृंग गडावरील धर्मशाळा.

१७. भिमाशंकर येथील धर्मशाळा .

अशा विविध ठिकाणी धर्मशाळा बांधल्या.''[८] या सर्व धर्मशाळामुळे एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी प्रवाशांची जी राहण्याची गैरसोय होत होती ती दूर झाली व प्रवास करताना थकल्यानंतर हक्काची राहण्याची जागा प्रवाशांना उपलब्ध होत होती. आज देखील धार्मीक ठिकाणी असणाऱ्या धर्मशाळांमध्ये प्रवाशी थांबतात व अशा धार्मिक शाळांमध्ये पैसे ही कमी लागतात. उत्तर प्रदेश बिहार या ठिकाणी या धर्तीवर सराय म्हणजेच धर्मशाळा बांधलेल्या आहेत व त्यामाध्यमातून प्रवाशांची व धार्मिक कार्यासाठी जसे चारीधामला जाणाऱ्या लोकांची अशा धर्मशाळेमध्ये विना मोबदला किंवा जेमतेम मोबदला घेऊन राहण्याची व्यवस्था होते. हे सर्व सामाजिक कार्य पाहिले असता मला असे वाटते की, अहिल्याबाई होळकर खरोखरच प्रजाहित जपणाऱ्या राज्यकर्त्या होत्या.

## ४.४ अहिल्याबाई होळकर यांचे पुल बांधणी कार्य :

अहिल्याबाई होळकर यांनी घाट, विहिरी, तलाव, धर्मशाळा याचबरोबर एक गाव दुसऱ्या गावाशी व एक शहर दुसऱ्या शहराशी जोडले तर कशा प्रकारचे फायदे होऊ शकतात हे ओळखले

होते. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यांमध्ये प्रवास आणि व्यापार यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक पुलांचे कामे केलेली दिसून येतात.

१.बंगाल-कर्मनाशिणी नदीवरील पूल- नाना फडणीसाने एका इंग्रज इंजिनियरच्या मदतीने कर्मनाशीणी नदीवर पूल बांधला.

२. त्र्यंबकेश्वर-कुशावर्तावरील पूल.

३. मालेगाव-मोसल पूल. अशी पुलांची बांधणी केली आहे.''[९] अशा प्रकारे पुल बांधणी करुन विविध गावे एकमेकांना जोडण्याची कामे अहिल्याबाई होळकर यांनी केलेली दिसून येतात. आजही आपण पाहतो की, केवळ पुल नसल्यामुळे अनेक गावे व रस्ते जोडली गेलेली नाही व त्यामुळे गावांचा, शहरांचा विकास खुंटला आहे. अशा नवनवीन योजना सरकारने राबविल्या पाहिजेत व विविध ठिकाणच्या पुलाचे कामे केली गेली पाहिजेत जेणेकरुन गावांचा व शहरांचा विकास होईल व शेती मालाची ने आण करणे सोपे होईल. अहिल्याबाई होळकर यांनी हे ओळखले होते. म्हणून त्यांनी पूल बांधणीस आपल्या काळामध्ये महत्त्व दिले होते.

### ४.५ अहिल्याबाई कालीन समाजातील सती प्रथा :

''सतीची चाल फार प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे. सतीच्या चाली मागे धार्मिक, अंधश्रध्दा दिसून येते. कारण पती निधनानंतर एखादी स्त्री जेंव्हा सती जात असे तेंव्हा तिच्या अंगावरील सर्व दागदागिने दान म्हणून विधी करणाऱ्याला मिळत असत.स्वभाविकच ते अशा स्त्रियांना सती जाण्यास विरोध तर करीत नसतच पण धर्माचा बडगा दाखवून जबरदस्तीने पतीच्या चितेवर पाठवित. कुटुंबातील दीर वगैरे मंडळीचाही स्वार्थीपणा असे. कारण तत्कालीन धर्मशास्त्राप्रमाणे पतीनिधनानंतर त्याच्या मालमत्तेचा वारस त्याच्या विधवेकडे जात असे.''[१०] अशा स्थितीत त्या विधवेस सती जाण्यास भाग पाडणे अशा मंडळीच्या हिताचे असे.

एकंदरीत पाहिले असता सतीची चाल ही अत्यंत क्रुर व दुष्ट रुढी होती. पतिनिधनानंतर लगेच त्याच्या विधवेच्या सहगमनाची तयारी तिचे नातेवाईक करीत असत. अशा वेळी दु:खाने खचलेली ती स्त्री घराण्याच्या प्रतिष्ठेपायी सती जाण्यास तयार होई किंवा तिला राजी केले जाई. ती आगीच्या

भयाने पळून जाऊ नये म्हणून तिला तेथे बांधून ठेवले जाई. भडाग्नी दिल्यानंतर तिच्या आर्त किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून वाद्यांचा मोठा गजर केला जाई तेथे जमलेले सर्वजण हे धर्मकृत्य आसूरी आनंदाने पाहत असत. तिचे जीवन म्हणजे प्रगतीच्या दिशने निघालेल्या भारतीय स्त्री जीवनाला उन्नतीची योग्य दिशा दाखविणारा दिपस्तंभ होय. आपल्या धर्मशास्त्रात विशेषत: निपुत्रिक विधवांना पतीच्या नातलगाच्या लहरीनुसार जीवन जगण्यास तयार व्हावे लागे. असे परावलंबी अपमानीत जीणे जगण्यापेक्षा स्वाभिमानाचे मरण बरे असे वाटून उच्चवर्गीय प्रतिष्ठित घराण्यातील स्त्रिया सती जात असत. धनिकांच्या निपुत्रिक विधवांना संस्थानिकांच्या अधिकाऱ्यांची दत्तकासाठी परवानगी लागे व परवानगी मिळविण्यासाठी मोठमोठ्या रक्कमा, नजराणा म्हणून द्यावा लागे. याला अहिल्याबाई होळकर यांनी आळा घातला होता.

सती विरोधातील सुधारणा करण्यात अहिल्याबाई होळकर यांनी पुढाकार घेतला परंतु सासऱ्याच्या विनंतीवरुन सती न जाण्याचा त्यांचा निर्णय त्यांच्या स्वभावाची साक्ष पटवणारा आहे त्यांचे पती खंडेरावाच्या चितेवर ज्या अकरा जणी सती गेल्या हया आपल्या सवतींना सती जाण्यापासून प्रवृत्त केले नाही. तसा एक प्रयत्न त्यानी मुक्ताबाईच्या बाबतीत करताना पाहिला परंतु त्यात त्यांना  यश आले नाही.मुक्ताबाईच्या उद्‌गारात तत्कालीन विवाहित स्त्रीच्या वैवाहिक अगतीकतेची जाणीव पहावयास मिळते.

त्याकाळी सती प्रथेस विरोध करणे एवढे सोपे नव्हते. परंतु मल्हारराव होळकर यांनी धाडस दाखविले व या धाडसामुळेच अहिल्याबाई होळकर यांचे सती जाणे थांबले. मल्हाररावाच्या एकुलत्या एक मुलाचे निधन झाल्यामुळे ते खुप दु:खी झाले होते. ''अहिल्याबाई सुवासनीचे सोळा शृंगार करुन कपाळाला कुंकवाचा मळवट भरुन कापराच्या माळा गळ्यात घालून सतीच्या वेशात आपल्या सर्व सवतींना घेऊन गौतमीबाई, हरकुबाई, बनाबाई, द्वारकाबाई या सासवांच्या दर्शनास आल्या. त्यांचे हे रुप पाहून पुन्हा रडण्याचा हलकल्लोळ उडाला. मालेराव, मुक्ता, अहिल्यादेवींच्या पायाला मिठी मारुन आई  आई म्हणून रडू लागले. थोडावेळ कुणालाच काही समजेना.''[११] अहिल्याबाई होळकर सती चालल्या ही बातमी मल्हाररावांना रणांगणात समजली. आपल्यावर आकाश कोसळले असा भास त्यांना झाला. खंडेरावाचे मांडीवर घेतलेले शिर बाजूला ठेवून ते सैरभैर झाल्यासारखे सती जाणाऱ्या अहिल्येच्या मार्गावर आडवे धावत गेले. सतीच्या वेशातील या आपल्या लाडक्या सुनेला

पाहून त्यांचे दु:ख एवढे अनावर झाले की ते अक्षरश: अहिल्येच्या समोर गडबडा लोळू लागले. तिचे पाय धरले आणि काकुळतीला येऊन म्हणाले, ''पोरी तू सती जाऊ नकोस, या म्हाताऱ्याला तुझ्या प्राणांची भीक घाल. महापराक्रमी वीर मल्हारराव असे विरघळलेले पाहून सगळ्यांचीच अंत:करणे तुटत होती.''[१२] एवढेच नाही तर मल्हाररावांनी अहिल्याबाई होळकर यांना अनेक पोथ्या पुराणातील दाखले दिले व तिला सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मल्हारराव म्हणाले. ''पोरी कसला पतीव्रता धर्म घेऊन बसलीस तू पोथ्या पुराणे वाचलीय राजा जनक मरण पावल्यावर त्यांच्या तिन्ही राण्यांपैकी कोणी सती गेले का? अभिमन्यु रणात पडल्यावर उत्तरा सती गेली का? शहाजीराजे गेल्यावर आऊसाहेब सती चालल्या, शिवाजी राजांनी त्यांना मागे आणले नाही का? अग तू सती गेलीस तर प्रजेची मुलाबाळाची काळजी कोण करील ही जहागीरी कोण सांभाळील माझं या म्हाताऱ्याचं एवढे तू ऐक तू तर माझा खंडू आहे. अहिल्या गेली मी म्हणेन ऐक पोरी ऐक या म्हाताऱ्याला सगळीकडून उन्हाळा करु नकोस म्हणून मल्हारराव अहिल्येचे पाय धरण्यास पुन्हा खाली वाकले. त्यांचे हात वरचेवर धरत अहिल्यादेवी म्हणाल्या मामंजी हे काय करताय? सगळ्या जगाने तुमच्या पायाचे दर्शन घ्यावे असे तुम्ही. आणि लेकीचे पाय धरता? चला आज अहिल्या मेली मी तुमचा लेक खंडू जिवंत आहे.''[१३] अहिल्याबाईंना मल्हाररावांनी अडवले समजूत काढली म्हणून त्यांनी सती जाण्याचा आपला बेत रद्द केला मात्र खंडेरावाच्या अन्य बायका सती गेल्या त्यात एक मुसलमान स्त्री रमजानी पण होती. त्या सर्वांना मात्र कोणीच अडवले नाही.

यामध्ये मल्हाररावाचा स्वार्थ जरी असला, तरी त्यांनी अहिल्याबाई होळकर यांना विरोध केलेला दिसतो. या मागे त्याचे जनहित दिसून येते. पुढे अहिल्याबाई होळकर यांनी राजविलासाचा उपभोग न घेता समस्त जीवन संन्याशासारखे व्यथित केले व समाज सुधारणा घडवून आणल्या.

## ४.६ अहिल्याबाई होळकर व स्त्री-पुरुष समानता :

स्त्री-पुरुष असमानतेमुळे स्त्रियांच्या व पुरुषांच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होतो व या असमानतेमुळे स्त्रियांच्या आर्थिक विकास थांबाला आहे. त्यामुळे स्त्रियांचे जीवन परावलंबी झाले आहे. जातीव्यवस्थेत व्यवसाय स्वतंत्र नव्हते व्यक्तिला आपल्या जातीचा व्यवसाय आवडो अगर न आवडो तोच व्यवसाय करण्याची त्याच्यावर सक्ती होती. उपजीवीकेसाठी दुसरा कोणताही व्यवसाय हया व्यक्तिला निवडता येत नव्हता. त्यामुळे तऱ्हेतऱ्हेचे उत्पादन व्यवसाय वर्षानुवर्षे जुन्या पध्दतीनेच

केले त्यामुळे खेड्याची आर्थिक स्थिती विकासाला पोषक नव्हती. जातीव्यस्थेमुळे उच्च जातींनी आपल्या अधिकाराचा गैर फायदा करुन कनिष्ठ जातीचे जीवन अतिशय कष्टमय करुन ठेवले होते. वरीष्ठ जातींनी कनिष्ठ जातींचे सातत्याने शोषण केले. त्यामुळे कनिष्ठ जातीतील लोक मागासलेले राहिले. वर्षानुवर्ष दारिद्र्यात खितपत पडल्यामुळे त्यांची स्थिती उपेक्षित व दयनिय बनली.

प्राचीन आणि मध्ययुगात लिंग भेदावर आधारित सामाजिक स्तरीकरण अस्तित्वात होते. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांचे गौणस्थान होते. भारतात आजही कुटुंबात स्त्रियांना गौण स्थान आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या आपण कितीही गप्पा मारल्या तरीही भारतातील स्त्रियांना आजही जेवढ्या प्रमाणात दर्जा प्राप्त असायला पाहिजे तो मिळालेला नाही. कनिष्ठ जातीतील स्त्रियांमध्ये तर शिक्षणाचे नगण्य प्रमाण आहे. ज्यांना शिक्षण मिळते त्यांना त्यांचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी उपयोग होत नाही.

उच्च ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करणाऱ्यांनाच उच्च स्थिती प्राप्त होते. राजकारणातही स्त्रियांना आरक्षण दिले तरी गरीब स्थितीतील स्त्रियांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी उपयोग होईल असे वाटत नाही. आजही स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांचे स्त्रीत्व आडवे येते. कारण भारतीयांच्या विचार करण्याच्या पध्दतीत कोणताही बदल झालेला नाही.

स्त्रियांना अज्ञानात ठेवून रुढी आणि परंपरेच्या नावावर त्यांचे शोषण करण्यासाठी यंत्रणा आपल्या देशात फार पूर्वीपासून मान्यता पावलेली आहे. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे शोषणाचे विचार त्या करु शकत नाहीत. स्त्रियांवरील अन्यायाविरुध्द आवाज उठवून सुधारणा घडवून स्त्रियांसाठी शिक्षणाचा ओढा निर्माण करणे हाच सुधारणांचा मुळ गाभा आहे. त्यांच्या अधिकाराच्या व हक्काच्या जाणिवा निर्माण करणे गरजेचे आहे. अलिकडे स्त्री जागृत होत आहे. मुठभर स्त्रियांपर्यंत ही चळवळ पोहचली आहे. स्त्रियांवर होणाऱ्या जुलुमातून तिची मुक्तता करण्याच्या दिशेने एकेक पाऊल पुढे टाकली जात आहेत. त्यासाठी सरकारने अनेक अनुकूल कायदे केले आहेत. पण तरीही ही समस्या सुटू शकेल असे वाटत नाही.

अहिल्याबाईंनी अठराव्या शतकात स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येतात. त्यांनी आपल्या राज्यात सैनिकी प्रशिक्षण सुरु केले. केवळ पुरुषच नव्हे तर स्त्रियांची सेना

देखील त्यांनी सुरु केली होती. आज २१ व्या शतकात स्त्रिया सैन्यामध्ये, एस.टी कंडक्टर व कंपन्या व सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. हाच विचार अहिल्याबाई होळकर यांनी अठराव्या शतकात केला होता. ''महिलांची सेना तयार केली, महिला सैनिकांना शस्त्र चालविण्यास शिकविले, युध्द आणि युध्दनीतिचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या सैनिकांमध्ये खूप उत्साह होता.''[१४] अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर काळात केवळ पुरुष नाही तर स्त्रिया देखील सैन्यात भरती होऊन युध्द कौशल्य शिकत होत्या व स्त्री-पुरुष समानता त्या काळात दिसून येत होती. आज देखील अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन कार्यातून प्रेरणा घेऊन स्त्रियांचे अनेक प्रश्न सोडविले जाऊ शकतात अशी माझी धारणा आहे. अठराव्या शतकातल्या अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा उपयोग २१ शतकातील स्त्रीचे प्रश्न सोडविण्यासाठी होऊ शकतो. अहिल्याबाई निग्रही आणि संयमी होत्या. त्या वेळी समाजव्यवस्था इतकी प्रतिकुल असून सुध्दा त्यांनी प्रजेचे अत्यंत जटील प्रश्न सोडविले. पती व्यसनी असूनही त्यांनी त्याच्याशी कधी दुर्व्यवहार केला नाही. आदर्श जीवन कसे जगावे चारित्र्य शुध्द कसे राखावे याचेच शिक्षण त्यांच्या वर्तनातून मिळते. अहिल्याबाई होळकर यांच्या ठायी परिपूर्ण राज्यकर्ती या गुणांचा अतिशय समतोल आणि परिपूर्ण आविष्कार दिसतो. एकंदरित त्यांच्या सर्व विचारांवर प्रकाश टाकला असता असे दिसून येते की, त्यांनी आपल्या कार्यकाळामध्ये स्त्री-पुरुष समानता आणलेली दिसून येते.

### ४.७ अहिल्याबाई होळकर आणि सर्वधर्म समभाव :

''अहिल्याबाई होळकर नेहमी म्हणत स्नानाने देह शुध्दी, ध्यानाने मन शुध्दी आणि दानाने धनशुध्दी होते. त्याग आणि जनसेवा हा ईश्वर भक्तीचा एक मार्ग आहे असे त्या मानत.''[१५] त्यांचे कार्यक्षेत्र फक्त त्यांच्या राज्यापूरते मर्यादित नव्हते. आज ज्याला आपण सर्वधर्मसमभाव म्हणू तो त्यांनी २०० वर्षापूर्वीच कृतीत आणला होता. त्यांच्या दानाला, प्रेमाला, जातीधर्माच्या सीमा नव्हत्या. म्हणूनच साधूसंताबरोबरच मुल्ला, मौलवी यांनाही त्यांनी दान केले. त्यांची ही धार्मिक उदारता पाहून निजामांच्या राज्यातील अनेक मुसलमान अहिल्याबाई होळकर यांच्या आश्रयाला येऊन राहीले. मुस्लिम संतांना जमीनी देऊन मस्जिद, दर्गेही बांधून दिले. मुस्लिम फकिरानाही श्रावणात खैराती दिल्या जात. फकिरांना त्या सांगत.''आम्ही आपल्या दर्ग्यास वर्षासने देतो, मंदिरांचा नाश करणाऱ्या आपल्या भावांना सांगा, धर्म वैर करायला शिकवत नाही. ईश्वर अल्लाह एकच आहे.''[१६]

अहिल्याबाई होळकर यांनी ठिकठिकाणी गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यात्रेकरुंच्या मुक्कामासाठी भक्कम अशा धर्मशाळा बांधल्या. तेथे सर्व जातिधर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश होता. वाटसरुंना थेट पाण्यापर्यंत जाऊन पाणी घेता यावे यासाठी पूर्ण देशभर पायविहीरी निर्माण करण्यात आल्या होत्या. आजही या पायविहीरी 'अहिल्याबाई बारव' म्हणून ओळखल्या जातात.

अहिल्याबाई होळकर यांनी ठिक ठिकाणच्या उत्तमोत्तम गुणवंत कलाकारांना महेश्वरला आमंत्रित केले. त्यामध्ये शास्त्री, पंडित, मुल्ला, मौलवी होते. मुर्तिकार, कवी, लेखक, वैद्य,पंडित, ज्योतिषी असणाऱ्या विविध जाती जमातीतील बुध्दिवंत होते.''[१७] यावरुन असे लक्षात येते की त्या सर्वच कलाकारांचा गौरव करत होत्या. ते मग कोणत्याही जाती धर्माचा असो. अहिल्याबाई होळकर माणसाच्या जातिधर्मापेक्षा त्यांच्यातील गुणवत्तेला, निष्ठेला, पराक्रमाला महत्त्व देत होत्या. त्याचे उत्तम उदाहरण म्हणून त्यांनी आपल्या पूर्वीच्या मुस्लिम कंचनीचे श्राध्द करुन केलेला सन्मान आहे. भिल्ल, दरोडेखोरांना दिलेले अभय त्यांचे केलेले पुनर्वसन आहे किंवा, दरोडेखारे भिल्लांच्या बंदोबस्त करणाऱ्या कुणाही शूर तरुणांना आपली कन्या देण्याचा निर्णय हे सारेच निर्णय अहिल्याबाई होळकर यांचा मानवतावाद व सर्वधर्मसमभाव स्पष्ट करतो.

अहिल्याबाई होळकर यांच्या काळात विविध धर्म संप्रदाय होते. अहिल्याबाई होळकर स्वत: शैव-शिवभक्त होत्या. परंतु त्यांनी दान धर्म करताना व देवस्थान जीर्णोध्दार करताना अशा धर्म सीमा मानल्या नाही. त्यांनी नाशिक, त्र्यंबकेश्वर, आयोध्या, उज्जैनी ओंकार, कर्नाटक, काशी, कुरुक्षेत्र, केदारनाथ, कोल्हापूर, गंगोत्री, आनंदकानन, आलमपूर, गया, चिखलदरा, जगन्नाथपुरी, जांब, जांबघाट, चांदवड, जेजुरी, तराना, द्वारका, देवप्रयाग, दारुकवन, नाथद्वार, नीलकंठ, महादेव, परळी, पंढरपूर, प्रयाग, पैठण, पुणतांबे, बद्रीनारायण, विठुर मंडलेश्वर, मथुरा, महेश्वर, रामेश्वर, रावेत, वृंदावन, वेरुळ,श्रीशैल, संगमनेर, सातारा, सप्तशृंग गड, सुलकेश्वर, सोमनाथ, हरिद्वार,हंदियाअशा अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. जुन्या मंदिरांचा, देवस्थानचा, जीर्णोध्दार केला. धर्मशाळा, अन्नछत्रे उघडली. या यादीमध्ये अनेक ठिकाणांचा समावेश करता येतो.

एका कवीने एक महान काव्य रचले. ते अहिल्याबाई होळकर यांच्या दरबारात आले आणि म्हणाले, ''पुण्यश्लोक मातुश्री मी केलेले काव्य आपणास कवीच्याच तोंडून ऐकवावे अशी इच्छा आहे. अहिल्याबाई म्हणाल्या दरबाराच्या कामाच्या वेळेत सवड नाही. तुम्ही सुट्टीच्या दिवशी दुपारी

नर्मदेच्या घाटावर या तेथे तुमचे काव्य ऐकू. चार दिवस गेले सुट्टीच्या दिवशी सायंकाळच्या प्रहरी अहिल्यादेवी जल विहारासाठी आल्या. नौकेत बसल्या. त्यांच्याबरोबर दोनदासी व कारभारी होते. कवीराज आपल्या काव्याचे बाड घेऊन आले. कविता वाचल्या सर्व कविता अहिल्यादेविंच्या कार्याचे वर्णन करणाऱ्या होत्या. देवीच्या चेहऱ्यावर कोणतेही भाव नव्हते. थोडावेळ वाचन झाल्यावर देवीने कविचे काव्य आपल्या हातात घेतले. एक एक पान आपल्या कपाळी लावून नर्मदेला अपर्ण करत त्या म्हणाल्या वा! काव्य फार उत्तम आहे. सरस्वतीचा एवढा काव्य विलास आम्ही क्वचितच पाहिला असेल पण हे अर्थपूर्ण शब्द नर्मदामाईलाच शोभतात आम्ही मर्त्य माणसे आम्हाला ही शब्दफुले शोभणार नाहीत. ज्याने आपणास निर्माण केले या निसर्गकर्त्या ईईवरावर आपण खंड काव्य लिहावे अशी माझी इच्छा आहे. कवी पंथ निराश झाले. देवीने कवीस दरबारात बोलावले आपल्या खासगी पैशातून त्याला द्रव्य दिले. त्याचा सन्मान केला. कवीला आनंद झाला.''[१८] अशा प्रकारे त्यांच्या वर्तनातून लक्षात येते की, त्या ईश्वराला सर्वश्रेष्ठ मानत व आपली स्तुती केलेली त्यांना आवडत नसे. त्या स्वत:ला साधारण मानव मानत व त्यांचा सर्वधर्म समभावावर विश्वास होता. म्हणून त्यांनी आपली स्तुती करणाऱ्यास ईश्वर स्तुती व मानव स्तुती करण्यास सांगितले.

मानवता हाच धर्म मानणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांच्या बद्दल सर जॉन माल्कम यांनी नोंदविलेले निरीक्षण बोलके आहे. ते लिहितात, ''हिंदुस्थानातील लोक अहिल्यादेविंना देवता मानतात व तशी त्यांची योग्यताही होती. स्त्री असून निगर्वी, श्रध्दाळू असून प्रजाहितदक्ष, प्रजेवर योग्य तितकाचा अंमल गाजविणारी स्वत: योगी असल्यासारखी वागणारी अशी ही राणी होती. कर्तव्य आणि परमेश्वरावर भरवसा या दोन गुणांचे ती उत्कृष्ठ उदाहरण होय. जॉन बेली या कवियित्रीनेही अहिल्याबाईंच्या गुणगौरवार्थ कविता केल्या. बेलीच्या मते अहिल्याबाई शांतताप्रिय असून त्यांची तुलना काही दृष्टीने इंग्लंडची महाराणी इलिझाबेथ यांच्याशी करता येते. कविवर्य मोरोपंतांनी अहिल्याबाईंचा काव्य गौरव करताना त्यांची तुलना गंगेशी केली होती.''[१९] अशा प्रकारे त्यांच्याविषयी विविध उदाहरणाद्वारे असे लक्षात येते की, त्यांच्या ठिकाणी सर्व धर्माबद्दल आदर होता व त्यांनी आपल्या जीवनात कधीच धार्मिक भेदभाव केला नाही.

## ४.८ अहिल्याबाई होळकर यांचे सामाजिक कार्यासाठी दानधर्म :

सेवा त्याग आणि दानधर्माला हिंदु संस्कृतीमध्ये खूप महत्त्व आहे. संपूर्ण जगतातील जीवांच्या सेवेला देवांची सेवा मानली जाते. अहिल्याबाई होळकर यांनी आपले सारे जीवन राज्यासाठी आणि देवाच्या पूजेसाठी समर्पित केले. अहिल्याबाई नेहमी म्हणत, ''स्नानाने देहशुध्दी, ध्यानाने मन शुध्दी, दानाने धन शुध्दी होते''[२०] अहिल्याबाईंच्या मते आपली संस्कृती भोगापेक्षा त्यागावर उभी आहे. सर्वामध्ये देवाचा अंश आहे असे मानुन प्राणीमात्रांना सुख देणे, सेवा करणे, मदत करणे, हाही भक्तीचाच प्रकार मानलेला आहे. अहिल्याबाईंचे सारे जीवन त्याग आणि सेवा यासाठीचे होते. असे म्हटले तर त्यात काही चुक नाही. त्यांनी जी सेवा केली, ते क्षेत्र फक्त राज्यापुरते किंवा विशिष्ट लोकांपर्यंतच सिमित नसून पूर्ण देशासाठी आणि सर्व मानव जाती साठी होते. संपूर्ण विश्व त्याच घर आणि सारे विश्वातील जीव जंतु त्यांचे कुटुंब होते. सगळ्यांचे दु:ख दूर करण्यासाठी सगळ्यांना सुखी करण्यासाठी जीवनभर कार्यरत राहील्या.

आपल्या जीवनकाळामध्ये जेवढे सेवा कार्य दानधर्म आणि निर्माण कार्य केले. त्यांनी त्याचा हिशोब ठेवला नाही. हे कार्य पूर्ण भारतवर्षामध्ये पसरलेले आहे. हे कार्य खूप मोठ्याप्रमाणात आहे. अहिल्याबाई होळकर आदर्श हिंदु माता होत्या. धर्म, संस्कृती आणि जीवन चरित्र या गोष्टींना त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होते. कारण संस्कृती आणि जीवन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यापैकी एक जरी बाजूला सारली तर जीवनाला काहीच अर्थ राहत नाही. सांस्कृतिक अर्थाने जो जीवन जगतो त्याचे जीवन कृतार्थ होते. अहिल्याबाई होळकर धार्मिक होत्या त्याचबरोबर, पोथीवाचन, पुराण कथांचे पठण व कीर्तन प्रवचन यांचे श्रवण करणे हे त्यांच्या दैनिक कार्याचे अभिन्न अंग होते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन धार्मिक व आध्यत्मिक बनले होते. धर्मावर आणि ईश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवून सत्कार्य करणे म्हणजेच अध्यात्मिकता होय. अध्यात्मिकतेमुळे मनुष्याचे जीवन आदर्श बनते.

अहिल्याबाई होळकर कोणालाही दु:खी कष्टी, उपाशी, तहानलेला पाहू शकत नव्हत्या. सगळ्यांना सुखी करण्यासाठी अन्न, कपडे, धन, इत्यादी माध्यमातून त्या गोरगरिबांची मदत करत असत. कोणीही दु:खी मुनष्य त्यांच्यापाशी येऊन निराश होऊन कधीही जात नव्हता. सन व

उत्सवाच्या वेळी त्या गरिबांना अन्न, मिठाई आणि वस्त्र देत असत. त्यांनी महेश्वर, कोल्हापूर, चिंचवड इत्यादी व अन्य ठिकाणी गरिबांच्या मदतीसाठी विशेष सुविधा करुन ठेवल्या होत्या.

अहिल्याबाई होळकर यांनी कुठे कुठे आणि किती दान केले याचा पूर्ण तपशिल त्यांच्या राज्याच्या दप्तरी नाही. परंतु मोठ्या परिश्रमाने जे प्राप्त झाले आहे त्याचे विवरण देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी तिथे मंदिरामध्ये पूजाअर्चेची व्यवस्था केली होती तेथे त्यांनी अन्नछत्राचीही व्यवस्था केली होती. म्हणूनच आजही त्यांची द्विशताब्दी साजरी करताना आपणास त्यांनी बांधलेले मंदिरे, घाट, पूल हे मूर्त स्वरुपात त्यांची आठवण करुन देतात.

अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली काही मंदीरे व त्यांनी केलेला दानधर्म यांची काही स्थाने पुढीलप्रमाणे-

| | **स्थान** | **केलेले कार्य/दान** |
|---|---|---|
| १. | अंबागाव- | येथील मंदीरामध्ये दिवाबत्तीची व्यवस्था केली. |
| २. | अयोध्या - | श्रीराम मंदीराचे बांधकाम केले. |
| ३. | अमरकंटक - | धर्मशाळा बांधली. |
| ४. | आनंद कानन - | विश्वेश्वराच्या मंदीराचा जीर्णोध्दार केला. |
| ५. | आलमपूर - | येथे मल्हाररावाला मृत्यू आला होता त्याच्या स्मृतिप्रत्यर्थ एक छत्री उभारली. छत्रीसमारे खंडेराव मार्तडांचे एक मंदिर बांदले. सदावर्त स्थापण केले आणि हरिहरेश्वराचे मंदीर बांधले. |
| ६. | उज्जैन - | चिंतामणी गणपतीचे मंदीर बांधले आणि महाकालेश्वर पूजेची व्यवस्था केली. |
| ७. | ऋषीकेश - | एक मंदीर बांधले. |
| ८. | ओंकार - | अंमलेश्वराचे मंदीर,एक बगीचा आणि एक छत्रीचे काम केले. |
| ९. | कर्नाटक - | गरिबांना मदतीची व्यवस्था केली. |
| १०. | काशी - | काशी विश्वेश्वराच्या मंदीराचा जीर्णोध्दार केला. गौतमेश्वर आणि अहिल्या द्वारकेश्वर नावाची दोन मोठी मंदीरे बांधली. |

ऑक्टोबर १७८५ मध्ये मन:कर्णिका घाट बांधला. दशाश्वमेध घाट बांधला.

११. कुरुक्षेत्र - मंदीरे आणि घाट बांधले.

१२. केदारनाथ - एक धर्मशाळा आणि पाण्याचे कुंड बांधला. जो जमिनीपासून ३००उंच आहे.

१३. कोल्हापूर - मंदीराच्या पूजेची व्यवस्था केली.

१४. गंगोत्री - येथे विश्वनाथ, केदारनाथ, भैरव आणि अन्नपूर्णा अशी चार मंदिरे बांधली आणि सहा धर्मशाळा बांधल्या.

१५. गया - विष्णू मंदीराचा जीर्णोध्दार केला.

१६. चिंचवड - गरिबांना करण्याची दान करण्याची व्यवस्था केली.

१७. चिखलदरा - त्या ठिकाणी नर्मदा परिक्रमा करण्यास येणा-यांसाठी अन्नछत्र चालू केले.

१८. चित्रकुट - राम पंचकुटीची स्थापना केली.

१९. चौंडी - येथे एक महादेवाचे मंदीर व घाट बांधला.

२०. जगन्नाथपूरी - मुख्य मंदीराच्या पूजेसाठी पुजाऱ्यांना काही गावे धर्मार्थ दिली.

२१. जामगाव - रामदास स्वामींच्या मठाला मदत केली.

२२. जामघाट - सुंदर मार्गद्वार बांधले.

२३. जेजुरी - मार्तंडाचे मंदीर बांधले.

२४. टोकी - अन्नदानाची व्यवस्था केली.

२५. तराना - नील भंडारेश्वर शिवमंदीर बांधले.

२६. त्र्यंबकेश्वर - दगडाने बनविलेले दोन तलाव आणि दोन मंदिरे बांधली.

२७. देव प्रयाग - सदावर्त चालू केले.

२८. द्वारका - पूजाअर्चेसाठी पुजाऱ्यांना काही गावे दिली.

२९. दारुकवन - नागेश्वराच्या मंदीराच्या पूजेची व्यवस्था केली.

३०. नाथद्वार - एक धर्मशाळा बांधली.

३१. नाशिक - श्रीराममंदिर बांधले.

| | | |
|---|---|---|
| ३२. | निफाड - | दिंडोरी गावाच्या मार्गावर एक कुंड बांधले. |
| ३३. | निलकंठ महादेव - | येथे निलकंठ महादेव नावचे एक शिवालय बांधले. |
| ३४. | नैमिषारण्य - | महादेवाची मुर्ती बनविली. |
| ३५. | परळी - | वैजनाथाच्या मंदिराचा जिर्णोध्दार केला. |
| ३६. | पंढरपूर- | श्रीराममंदीर बांधले. लोकांना दान धर्माद्वारे मदत केली. |
| ३७. | प्रयाग - | एक विशाल घाट बांधला. |
| ३८. | पुष्कर - | एक मंदिर आणि एक धर्मशाळा बांधली. |
| ३९. | पैठण - | अन्न छत्र कायमस्वरुपी केले. |
| ४०. | पुणतांबे - | एक घाट बांधला. |
| ४१. | बद्रिनारायण - | श्रीहरिचे मंदीर, धर्मशाळा आणि अनेक कुंड बांधले. |
| ४२. | विठूर - | ब्रम्हघाट बांधला. |
| ४३. | बीड- | जुन्या घाटाची दुरुस्ती केली. |
| ४४. | भुसावळ - | एक मंदिर बांधले. |
| ४५. | मंडलेश्वर- | शिवालय आणि एक घाट बांधला. |
| ४६. | मथूरा - | एक धर्मशाळा बांधली. |
| ४७. | महेश्वर - | बरेच घाट, मंदीरे आणि छत्र्या बांधल्या, एक सदावर्त स्थापन केले. |
| ४८. | रामेश्वर- | एक धर्मशाळा बांधली. |
| ४९. | रावेत - | एक कुंड बांधले. |
| ५०. | वृंदावन - | एक अन्नछत्र स्थापन केले. लाल दगडाची एक बारव बांधली तिच्यात ५७ पायऱ्या आहेत. |
| ५१. | वेरुळ - | घृष्णेश्वर मंदीराचा जीर्णोध्दार केला आणि एक कुंड तयार केले. |
| ५२. | श्रीशैल - | मल्लिकार्जुन नावाचे शिवमंदिर बांधले. |
| ५३. | संगमनेर- | राममंदीर बांधले. |
| ५४. | सप्तशृंग गड- | एक धर्मशाळा बांधली. |
| ५५. | सुलतानपूर- | मंदीराचे बांधकाम केले. |

५६. सुलवेश्वर - अन्नछत्र स्थापन केले. महादेवाचे मोठे मंदिर बांधले.

५७. सोमनाथ - सोमनाथ महादेवाच्या मंदिराचा जीर्णोध्दार केला.मुर्तीची प्रतिस्थापनाही केली.

५८. हरिद्वार - धर्मशाळा बांधली.''[२१]

अशा प्रकारे विविध ठिकाणी त्यांनी दान धर्माचे कार्य केलेले दिसून येते.

## ४.९ सामाजिक रुढी परंपरा व अहिल्याबाई होळकर :

अहिल्याबाई होळकर यांचा काळ हा सर्वार्थाने स्त्रीदास्याचा काळ होता. स्त्रीवर अनेक बंधने होती. सतीची दुष्ट चाल आणि पतिव्रतेच्या भ्रामक कल्पना यामुळे पतीच्या मृत्यूबरोबर स्त्रीने आपलेही आयुष्य संपवावे असे अपेक्षित असे. मुलगी आठ वर्षाची झाली की तिचे लग्न केलेच पाहिजे शिवाय या मुलीच्या नशिबी किती सवती असतील यांवर निर्बंध नव्हता. वयस्कर विधवा स्त्रीला आपल्या संपत्तीचा विनियोग करण्याचा अधिकार नव्हता. लग्न बंधनातही परंपरावादी विचार होते. हुंड्याची जीवघेणी प्रथाही होतीच. या पार्श्वभूमीवर एक स्त्री राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाईंचे वेगळेपण नजरेत भरण्यासारखे आहे.

खंडेरावांचा मृत्यु झाला. तेंव्हा अहिल्याबाईंचे वय २९ वर्ष होते. मुले लहान होती. तत्कालीन रुढीप्रमाणे अहिल्याबाई सती जाण्यास निघाल्या. पण मल्हाररावांच्या विनंतीला मान देऊन अहिल्याबाई चितेपासून परत फिरल्या. आपल्या कर्तृत्वाने विधवा स्त्री देखील पुरुषा इतकीच कर्तृत्ववान असते हे त्यांनी सिध्द केले. दुर्दैवाने आपल्या आयुष्यात त्यांना नऊ सवती, दोन सुना, दोन नातसुना, मुलगी मुक्ता आणि तिच्या दोन सवती यांना सती जाताना पाहावे लागले. आपल्या परीने अहिल्याबाईंनी त्यांना विरोध केला. मालेरावांच्या बायका आठ नऊ वर्षाच्या होत्या त्यावेळी त्यांनी सती जाऊ नये यासाठी अहिल्याबाईंनी अडविले. व्याहयाशी वाद घातला. ''ज्या पतीकडून या मुलीली कधी सुखाचा शब्द वा प्रेम मिळाले नाही त्याच्यासाठी त्याने सती का जायचे?''[२२] असा प्रश्न अहिल्याबाई यांनी उपस्थित केला. मात्र आमचं घराण सतीचं आहे. आमच्या घरी विधवा नाहीत.''[२३] असे प्रतिउत्तर देऊन व्याहयांनी विरोध मोडून काढला. असा विरोध म्हणजे व्याह्यांना धर्मविरोध वाटला. त्यावेळी धर्माचे स्वरुप समजावून देताना बाई म्हणाल्या. ''हा धर्म नाही ही केवळ स्वार्थी

कुटुंबीयांनी लादलेली अंध रुढी, अंधश्रध्दा आहे. सती गेल्यावर स्वर्ग मिळतो म्हणतात कुणी पाहिला आहे स्वर्ग? काय हे बाईचं जिणं? बाई मेली तर पुरुष सती नाही जात, तो पंधराव्या दिवशी बोहल्यावर चढतो.''[२४] त्यांच्या मनाविरुध्द त्यांच्या सुनांना, नातसुनांना सती दिले गेले. प्रत्येक वेळी नातेवाईकांचा रेटा, जबरदस्त होता. तुम्ही सती न जाऊन धर्मविरोधी कृत्य केले आहेच. त्या पापात इतरांना सहभागी करुन घेऊ नका हा भाव प्रत्येकाच्या नजरेत असेच. अहिल्याबाई येथे हतबल ठरल्या.

अहिल्याबाईंच्या काळात दुसरी रुढी परंपरा अशी होती की, मुलामुलीचा विवाह आपापल्या जातीतच व्हावा. परंतु अहिल्याबाई यांनी भिल्ल दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी ''जो असा दरोडेखोरांचा बंदोबस्त करेल त्याच्याशी मुक्ताचे लग्न करुन देण्यात येईल. अशी दवंडी दिली होती.''[२५] या पणामध्ये अनेक धोके होते. रुढीला आव्हान देणे होते. भिल्लांच्या निर्वेधपणे चालणाऱ्या लुटमारीत सरदारांचाही थोडाफार वाटा होता हे लक्षात घेऊनही केवळ प्रजेच्या कल्याणासाठी अहिल्याबाईंनी काळाच्या पुढे जात हा पण लावला. त्यामुळे ज्या काळात मुलीच्या लग्नाचे रुढीमान्य वय आठ वर्षे होते तेथे मुक्ताचे लग्न अठराव्या वर्षी झाले. तो पर्यंत अहिल्याबाईंना लोकांची दूषणे टीका सहन करावी लागली. सुदैवाने त्यांना यशवंतराव फणसे हा शुर जावई मिळाला. अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांच धाडस पाहिले असता. त्यांनी बालविवाह प्रथा तसेच इतर जातीतील विवाह करुन त्यांनी हे दाखविले की, रुढी परंपरेमध्ये न अटकता दूरदृष्टीचा विचार केला पाहिजे.

अहिल्याबाई म्हणत, ''ज्या रुढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रुढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या रुढींना आम्ही अंधश्रध्दा म्हणतो. तशा रुढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा. मुक्ताचं लग्न रुढी मोडून ठरलं आणि रुढी मोडूनच झालं. याच पध्दतीने अहिल्यादेवींना हुंडा पध्दतीचा संताप होता. त्या म्हणत, स्त्रीच्या कौतुकाची नुसती ढोंग. तिला देवी म्हणावं, देवता म्हणावं, आदिशक्ती म्हणावं आणि तिच्या गृहप्रवेशाचे पैसे घ्यावे, सोनं घ्यावं, मानपान करुन घ्यावा म्हणूनच त्यांनी राज्यात हुंडाबंदी जारी केली. हुंडा देणारा,घेणारा आणि मध्यस्थ या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतुद त्या कायद्यात होती.''प्रजेला सुख लागावे म्हणून ही स्त्री दक्ष राहिली. अशा स्वार्थी रुढी तोडणे फार कठिण असते. पण ते काम अहिल्यादेविंनी केले. ''ऐसी

कळवळ्याची जाती । लाभीविण करी प्रती।।''[२६] लाभावाचून प्रेम करणाऱ्या अहिल्याबाई एका राज्याच्या सत्ताधीश होत्या. आपल्या सत्तेचा उपयोग त्यांनी प्रजेसाठीच केला. हा त्यांच्या चारित्र्याचा विशेष आहे. आपल्या वैयक्तिक दु:खाचे गाठोडे बाजूला ठेवून त्या प्रजेसाठी राबल्या.

आणखी एक रुढी परंपरा म्हणजे, भाद्रपद महिन्यातल्या पितृपक्षात अहिल्याबाई होळकरांकडे पूर्वजांचे श्राध्द होते. स्वत: अहिल्याबाई श्राध्दाचे पाणी सोडीत. आंबादास गुरुजींना त्या म्हणत, ''मजला स्त्री ही ईश्वरानेचे केले. मला विधवाही त्यानेच केले. मी जशी आहे तशी करते.''[२७] लोकनिंदा सहन करणे खूप कठिण आहे. पण ती सहन करुनही अहिल्याबाईंनी आंधळ्या रुढींवर प्रहार केले. सतीच्या रुढीची चीड हुंड्याचा संताप आणि मुक्तेच्या लग्नाचा पण लावण्याचे धारिष्ट्य आपण पाहिले. अंध रुढी तोडणाऱ्या आणखी काही घटनांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मुक्तेचे लग्न झाले तेंव्हा खंडेराव नव्हते. मालेराव हा पुत्र अत्यंत दुर्गुणी होता. अशावेळी मुक्तेचे कन्यादान स्वत: अहिल्यादेवीने केले. कन्यादान हे वडील म्हणजेच पुरुष करत असतात. परंतु अहिल्याबाईंनी कन्यादान करुन ही रुढी देखील मोडीत काढली. अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी रुढी परंपरेचा चांगल्या कार्यासाठी विरोध केलेला दिसून येतो.

### ४.१० अहिल्याबाई होळकरकालीन शिक्षण व्यवस्था :

अहिल्याबाईहोळकर केवळ होळकर राज्यातच नव्हे तर, संपूर्ण भारतामध्ये आपल्या दानशुरतेबाबत प्रसिध्द होत्या. त्यांनी अनाथांच्या मदतीबरोबर त्यांच्या शिक्षणासंबंधी देखील कार्य केले आहे. पाठशाळेमध्ये मुख्यत: धार्मिक आणि नैतिक शिक्षण दिले जात होते. हे शिक्षण धार्मिक ग्रंथाच्या कथांच्या माध्यमाने दिले जात होते. त्यांनी महेश्वराला आपल्या राज्याची राजधानी बनविले. व वेगवेगळ्या प्रदेशातील विद्वानांना कायमस्वरुपी जाहागिऱ्या प्रदान केल्या. त्यामुळे हे विद्वान आपल्या उदरनिर्वाहासाठी इकडे तिकडे न भटकता महेश्वर मध्ये स्थायीक झाले. व साहित्य निर्मिती व शिक्षणाकडे लक्ष देऊ लागले. अहिल्याबाई होळकर यांनी तेलंगणा, गुजरात, संगमनेर तसेच नर्मदेचे किनाऱ्यावर राहणाऱ्या वेगवेगळ्या विषयांच्या विद्वानांना महेश्वरमध्ये संरक्षण दिले. ते वेगवेगळ्या विषयात निष्णात होते. त्यामध्ये मल्हार भट्ट, जाणोबा, पुराणीक, रामचंद्र रानडे, काशीनाथशास्त्री, दामोदरशास्त्री, निहील भट्ट, भैय्याशास्त्री, ऋग्वेदी गोटू शास्त्री, मनोहर बर्वे, बलीरामजी, गणेश भट्ट, त्र्यंबक भट्ट, महंत सुजान, गिरी गोसावी, त्र्यंबक बुवा, हरीदास,

आनंदरामजी, गोविंदराम पांडे, बालकृष्ण भट्ट जोशी, दाजी रघुनाथ तथा गणेश राम इत्यादी होते.''[२८] यावरुन असे लक्षात येते की, अहिल्याबाई होळकर यांनी शिक्षणाला आपल्या राज्यात किती महत्त्व आहे हे ओळखले होते व त्यानुसार त्यांनी महेश्वर आपल्या राजधानीमध्ये धार्मिक आणि नैतिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. तसेच शिक्षणासाठी चांगल्या शिक्षकांची आवश्यकता असते, हे देखील ओळखले होते. त्यानुसार शिक्षकाची व्यवस्था देखील त्यांनी केली होती व त्यांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांनी शिक्षकांना जाहागिऱ्या देखील दिल्या होत्या. त्यामुळे ते सर्व शिक्षक राज्यात राहत होते व शिक्षण देण्याचे कार्य व्यवस्थित करत होते. अहिल्याबाई होळकर कमी शिकलेल्या असून देखील त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या शिक्षणाची काळजी घेत होत्या. यावरुन असे वाटते की, त्या एक आदर्श राज्यकर्त्या होत्या.

त्यांनी सुरु केलेल्या शिक्षण व्यवस्थेला अनुसरुन त्यांच्या मृत्युनंतर तुकोजीराव होळकर (द्वितीय) यांनी थोडे प्रयत्न केले परंतु त्यांना विशेष यश आले नाही. परंतु यशवंतराव होळकर प्रथम यांनीही महेश्वरालाच राजधानी ठेवली. परंतु यांचा बराचसा वेळ युध्दामध्येच गेला. इ.स.१८४४ मध्ये तुकोजीराव होळकर (द्वितीय) राजगादीवर आरुढ झाले. त्यांनी प्रशासनासाठी शिक्षण व्यवस्थेला किती महत्व आहे हे समजून घेतले व आपल्या इंदौर राज्यात शिक्षण व्यवस्था विकसीत केली. परंतु या सर्व गोष्टींचा पाया स्वत: अहिल्याबाई होळकर यांनीच घालून दिला होता.

## ४.११ अहिल्याबाई होळकर आणि सामाजिक आरोग्य :

आपले राज्य समृध्द व्हायचे असेल तर प्रजेसाठी विविध योजना देणे आवश्यक असते. हे अहिल्याबाई होळकर यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी प्रजेच्या हितासाठी आपल्या राज्यामध्ये विविध सुधारणा घडवून आणल्या होत्या. त्यांनी लोकांसाठी रस्ते, पुल, पाणी, विहीरी, बारव, तलाव या सारख्या व्यवस्था केल्या होत्या. त्या एवढ्यावरही थांबल्या नाहीत. त्यांनी प्रजेचे आरोग्य व्यवस्थित राहावे यासाठी आपल्या राज्यामध्ये दवाखान्याची निर्मिती देखील केली होती. त्यांनी आयुर्वेदशास्त्रातील औषधी वनस्पतींच्या बागांची निर्मिती केली होती. एवढेच नव्हे तर मानवी आरोग्य निरोगी राहावे यासाठी शासकीय सुविधा देखील निर्माण केल्या होत्या. ''रोग नाहीसे व्हावेत तसेच, जनतेची शारीरिक प्रकृती चांगली, व्यवस्थित व निकोप राहावी याकरीता मोफत औषधांची सोय केलेली होती. याशिवाय वैद्यांच्या राहण्याची आणि उदरनिर्वाहाची सोय केलेली होती. ''[२९]

अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यामध्ये प्रजेसाठी दवाखाने सुरु केलेले दिसून येतात. यावरुन असे म्हणता येईल की, त्या प्रजाहितदक्ष होत्या. सुरु केलेल्या दवाखान्यांसाठी लागणारे औषध उपलब्ध व्हावे म्हणून औषधी वनस्पतींच्या बागांची निर्मिती देखील त्यांनी केली होती. त्याचप्रमाणे दवाखान्यासाठी लागणारे वैद्य देखील उपलब्ध केले होते व त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली होती. त्यांच्या उदरनिर्वाहाची काळजी देखील घेतली होती. अशा प्रकारे त्यांनी प्रजेसाठी दवाखाने, औषधे व वैद्य आपल्या राज्यामध्ये उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. आज याच धर्तीवर आपल्या देशामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना राबविली जाते व यामुळे बऱ्याचशा गोरगरीबांच्या आजारावर निदान व औषध मिळण्याचे काम या माध्यमातून होताना दिसते. अहिल्याबाईंचे हे कार्य पाहिले असता असे वाटते की, त्या खूप दुरदृष्टीच्या राज्यकर्त्या होत्या. व नेहमी त्यांच्या डोळ्यासमोर प्रजाहित होते.

अहिल्याबाई होळकर यांनी सुरु केलेले हे दवाखाने त्यांच्यानंतरही होळकर राज्यात चालू राहिलेले दिसून येते. महाराजा तुकोजीराव (द्वितीय) यांनी गादी सांभाळल्यानंतर गुरुवार दिनांक २७ जुन १८४४ मध्ये हे कार्य इंदोर नगरात चिकित्सालयाची स्थापना झाल्याचे दिसून येते. याच दवाखान्यांना पुढे पंचायती दवाखाने म्हणून संबोधले जाऊ लागले. कारण की, ग्वालियर, इंदौर व मालवा, यासारखे छोटे राज्य या दवाखान्याला अनुदान देत होते. इंदौर राज्य प्रतिवर्ष ५००रु. चे अनुदान देत होते.''[३०] हिच पध्दती पुढेही चालूच राहिली. याप्रकारे अहिल्याबाईंनी केलेले कार्य पुढेही त्यांच्या वंशजांनी चालुच ठेवलेले दिसून येते.

अहिल्याबाई होळकर यांनी या प्रकारे आपल्या राज्यामध्ये इतर सुख सोयी प्रमाणेच दवाखान्यावर देखील लक्ष्य दिलेले होते त्यांचा या मागील उद्देश असा होता की, गोरगरीब जनतेची व्यवस्था व्हावी, औषधावाचून कोणाचाही बळी जाऊ नये. गरीबातील गरीबाला औषधे उपलब्ध व्हावीत. पैस नाहीत म्हणून औषध मिळत नसत व हेच हाल दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात दवाखान्याची व्यवस्था केली होती.

## ४.१२ अहिल्याबाई होळकर यांचे पशु-पक्षी विषयी प्रेम :

अहिल्याबाई होळकर  केवळ माणसावरच नव्हे तर पशू-पक्षांवरही प्रेम करत होत्या. त्यांनी पशुपक्षी, स्थलचर, जलचर प्राणी यांना देखील त्यांनी आपल्या पोटच्या लेकरासारखं सांभाळलं. रोज गोसेवा केल्याखेरीज त्या अन्न ग्रहण करत नव्हत्या. त्यांनी गायीगुरासाठी कुरणे राखून ठेवली होती. यात नवल नाही. पण गंमत म्हणजे उभ्या पिकावर येणाऱ्या पाखरांच्या धाडी हाकलण्यासाठी होणारा गोफण गुंफण्याचा प्रकार पाहूनही त्यांचे मन दु:खी होत असे. सुगीच्या दिवसात त्या अंतरा अंतरावर पिकांच्या शेतीचा एक वाटा पाखरांसाठी राखून ठेवत. आजच्या काळात वेगवेगळ्या राज्यामध्ये विविध प्रकारचे अभयारण्य केलेले दिसून येतात. या अभयारण्य योजनेपेक्षाही त्यांची ही योजना खूप महत्त्वाची वाटते.

महेश्वरच्या कुंडातील मासोळ्यांना कुणाला मावशीबाई म्हणून तर कुणाला आत्याबाई म्हणून त्या स्वत: भरवत असत. तेंव्हा केवढे विलोभनीय दृश्य दिसत असेल. काही मच्छल्यांच्या नाकात तिने सोन्याच्या संकुल्या बसविल्याचा उल्लेख आहे.''[३१]

याचप्रमाणे त्या दरवर्षी काही पिकविलेले शेत त्या मुद्दाम राखून ठेवत असत.''[३२] मानवता धर्म अहिल्याबाईंनी खुप चांगल्या प्रकारे ओळखला होता. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यामध्ये केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी यांच्यावर देखील खुप प्रेम केलेले दिसून येते. त्यांनी आपल्या राज्यामध्ये गायीसाठी कुरणे, पिकवलेल्या पिकातील एक वाटा पाखरासाठी राखण्याची व्यवस्था केली माशांना कणकेच्या गोळ्या व मुग्यांना साखर घालण्यासाठी लोकांच्या नेमणुका केल्या होत्या.''[३३] याप्रमाणे पशु व पक्षी जलचर प्राणी यांची काळजी घेऊन त्यांनी जगाला वेगळ्या मानवधर्माची ओळख करुन दिली.

याच प्रमाणे त्यांनी मोकाट हिंडणाऱ्या जनावरांची देखील काळजी घेतली. जनावरांसाठी गावोगावी कुरणांच्या जमिनी राखून ठेवल्या जायच्या. तशा प्रकारे गावालगत गायरान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमिनी गायीगुरांसाठी चारण्यासाठी राखून ठेवल्या जात. पक्षांसाठी धान्याने चांगल्या पिकलेल्या जमिनीतील उभी पिके त्या विकत घ्यायच्या आणि त्या पक्षांसाठी खुली ठेवत असत. व त्या शेतावर पक्षी येऊन धान्य खाण्याचा मुक्त आनंद घेत असत. आजच्या काळात लोकांनी

जनावरांच्या गायरानावर अतिक्रमण केलेले दिसते व याच धर्तीवर देशभरात पशुपक्षी अभयारण्य सुरु झालेले दिसतात. परंतु  एवढयावरच न थांबता प्रत्येक गावामध्ये जनावर व पक्षी यांना पाणी पिण्यासाठी हौदाची निर्मिती झाली पाहिजे. वन्य जनावरांना देखील उन्हाळ्यामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध झाले पाहिजे. पाणी व अन्न उपलब्ध न झाल्यामुळे चिमण्या हा पक्षी खूप कमी झाल्याचे दिसून येते. मोरासारखा पक्षी तर फक्त चित्रामध्ये पाहण्याची वेळ आपल्यावर आली आहे. अहिल्याबाईंनी ही वेळ येऊ नये म्हणून त्या काळी पशु पक्षी व जलचर प्राण्यासाठी वेगवेगळ्या सुख सोयी केल्या होत्या. आज देखील अशा योजनांची आवश्यकता आहे.

अहिल्याबाई होळकर यांनी ओळखले होते की, कुत्रे हे जनावर गावाची, घराची, पिकांची राखण करणारे जनावर म्हणून ओळखले जाते. ते कडबा गवत किंवा वाळलेले धान्य खात नाही. अशा या उपयुक्त व महत्वाच्या जनावराच्या पोटाची आबाळ झाल्यामुळे ती मरतुकडी अवस्थेत जगताना, रस्त्या रस्त्याने भटकताना दिसतात. अशा कुत्र्यांच्या अन्नाची काळजी घेतली. अण्णासाहेब डांगे म्हणतात, ‘‘माझे मूळ गाव कोंडोली (वारणा) ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हे आहे. माझ्या लहानपणी त्या गावात केंव्हातरी वर्षातून एकदा दोनदा गावात झाडू मारणाऱ्या बाया असत. त्यापैकी एखादी बाई ज्वारीच्या भाकरींनी भरलेली पाटी डोक्यावर घेऊन किंवा खांद्यावर घेऊन त्यातील एकेक भाकर रस्त्यावर दिसेल त्या कुत्र्यासमारे टाकताना दिसायची. एकदा मी आजोबांना विचारले ही बाई कशाकरीता कुत्र्यांना भाकरी टाकते. तेंव्हा आजोबांनी दिलेले उत्तर असे आहे. अहिल्याबाई होळकर नावाची एक राणी होती. ती कोल्हापूरास अंबाबाईच्या दर्शनाला तिचा मुक्काम आपल्या गावात पडला सकाळी छावणी उठून जाताना शिल्लक राहिलेले रात्रीचे खरकटे अन्न एका बाजूला पडलेले होते. त्यावर ते खाण्यासाठी गावातील कुत्री तुटून पडली होती. त्यातील गलेलठ्ठ कुत्री मरतुकड्या कुत्र्यांच्या अंगावर जाऊन त्यांना चावे घेऊन त्यांना बाजूला काढून आपणच ते अन्न खात आहेत. हे त्या राणीने बघितले. त्या मरतुकड्या कुत्र्यांना अन्न मिळाले नाही म्हणून दीनवानेपणाने ती बाजूला उभी राहीली होती. त्यांची तिला दया आली व गावच्या पाटलांना जवळ बोलावून त्यांच्या हातात पंधरा रुपये दिले व म्हणाल्या याच्या पैशातून कुत्र्यांना भाकरी टाकत जावा. त्यावेळी गाव लहान होते. तीन चार रुपयांना पोटभर जोंधळे मिळायचे. आता गावचा पसारा वाढला आहे. धान्याच्या किंमतीही वाढल्या आहेत. ती राणी मरुन शे-दीडशे वरस झाली तरी सुध्दा इंदुरातुन दर वर्षी अजुन

पाटलाच्याकडे पंधरा रुपये येतात. त्यातनं जेवढ्या भाकरी करुन कुत्र्यांना टाकता येतील तेवढ्या टाकत्यात.''[३४] अशा प्रकारे आपण पाहतो की, त्यांची ही योजना अगदीच अभिनव अशी वाटते. कुत्र्यांना केवळ हाड ऐकण्याची सवय आहे त्या कुत्र्यांसाठी त्यांनी भाकरीची सोय करुन दिली आहे. आज आपण पाहतो की, माणसे कुत्र्यासारखी अन्नासाठी वनवन फिरताना दिसतात. त्याचप्रमाणे मानसिक रोगी देखील बिगर कपडे व भूकेले फिरताना दिसतात. परंतु त्यांची दया माया कोणालाही येत नाही. परंतु अहिल्याबाई होळकर यांनी सुरु केलेली परंपरा आजच्या शासन कर्त्यांनी राबविली पाहिजे व जनकल्याण व पशुपक्षी यांचे कल्याण झाले पाहिजे असे वाटते.

### ४.१३ अहिल्याबाई होळकर यांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन :

आजच्या आधुनिक काळात सारेजण पर्यावरणाविषयी चर्चा करताना दिसतात. अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या काळात पर्यावरण समाजासाठी किती आवश्यक आहे हे जाणले होते. हे पर्यावरण योग्य ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केल्याचे दिसून येते. रस्त्याच्या दुतर्फी ओसाड व पडिक डोंगरावर त्यांनी लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर यांची भरपूर झाडे लावलेली दिसतात. या झाडांची मुळे खोलवर दूरवर जाऊन जमिनीत नैसर्गिक गारवा टिकून राहतो व झाडांमुळे पाऊस मोठ्या प्रमाणत पडतो हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यामध्ये झाडे लावण्याची व्यवस्था केली होती. यातुनच पुढे अभयारण्याची कल्पना उदयास आलेली दिसते. त्यांनी असा नियम बनविला होता की, ''प्रत्येक शेतकऱ्यांनी वीस झाडे लावलीच पाहिजे. त्यातील अकरा झाडे सरकारची तर नऊ झाडे शेतकऱ्यांची होती. संबंधीतांना लागणारे लाकूड त्या झाडापासून घेतले जात असे. योग्य जागी पाणी, तलाव विहीरी बांधून पाण्याची सुबत्ता निर्माण केली होती. नदीचे वाहते पाणी खराब होऊ नये यासाठी मूळ प्रवाहापासून एक प्रवाह बाजूस वळवून त्याचा उपयोग स्नान, कपडे धुणे, जनावरांना पाणी आदी कामासाठी केला जात होता. तेच पाणी पुढे शेतीस देण्याची उत्तम सोय केल्याने पाणी प्रदुषण होत नव्हते. परिणामी शेतमाल भरपूर सकस येत असे. इतकेच नव्हे तर वनीकरण जलसंवर्धन, जलवितरण यास्तव स्वतंत्र खाते निर्माण झाले होते. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे असा विचार त्यांनी समाजात रुढ केला होता.''[३५] यावरुन असे वाटते की, त्यांनी झाडाचे महत्त्व ओळखले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या राज्यामध्ये झाडे लावण्याविषयी नियम बनविला होता. आजच्या काळात असेच झाडे लावण्यासाठी नियम केले

जातात. हे नियम अधिक कठोर करण्याची आवश्यकता आहे. जेणे करुण झाडे लावली व जगविली जातील.

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यात ठिकठिकाणी आंब्याची झाडे, आंबराई लावण्यास उत्तेजन दिले. तसेच लिंब, चिंच, पिंपळ वा अशा प्रकारची वृक्ष लावावीत. या झाडांचे संवर्धन करावे यासाठी झाडे लावणाऱ्यांना रोजगार मिळत असे. झाडे तोडू नये असे बंधन होते. हे सर्व किंवा अशा प्रकारचे बहुतेक काम शेतकऱ्यांवर सोपविले होते. फळे, फुले यांच्या बागा बनविल्या होत्या. औषधी वनस्पतीची काळजी घेऊन त्यांची वाढ करण्यास किंवा प्रसार करण्यास, लागवड करण्यास त्यांनी उत्तेजन दिलेले होते. अभयारण्य बनविली होती. आज आपण झाडे लावा, झाडे जगवा. त्यांचे संरक्षण करा असे म्हणतो किंवा त्याबाबतचे कार्यक्रम राबविले जातात. हे कार्य अहिल्याबाई होळकर यापूर्वीच म्हणजे २००वर्षापूर्वी आपल्या राज्यात करत होत्या.''[३६] अहिल्याबाई होळकर यांनी त्याकाळी रोजगार हमी योजना सुरु केली. चिंच, लिंब, पिंपळ, वड, आंबा ही झाडे जगविणाऱ्यांना कायमस्वरुपी रोजगार दिला. झाडे तोडणाऱ्यांना बंधने घातली व शिक्षाही दिल्या. मानवी जीवनात वनस्पतीचा औषधासाठी उपयोग होतो. औषधी वनस्पतींना उत्तेजन देऊन आयुर्वेदशास्त्रासाठी भरीव कामगिरी केली. अभयारण्य निर्माण करुन झाडे लावा, झाडे जगवा हा मूलमंत्र दिला. औषध उपचाराचे महत्त्व त्यांनी जाणले होते. नवनवीन औषधे लागवडीसाठी, संशोधनासाठी त्या मदत करत होत्या. नातु नथोबाच्या क्षयरोगामुळे झालेला मृत्यु जावई यशवंतराव फणसे यांचा कॉलरामुळे झालेला मृत्यु, आईसारखे प्रेम करणारी सासू, गौतमी होळकर यांचा दम्याच्या आजारामुळे झालेला मृत्यु, गुरु मागर्दर्शक असणारे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांचा कानाचा ठणका लागून झालेला मृत्यु अशाप्रकारे मानवी जीवनाला अनेक आजारांनी रोगजंतुनी व्यापले आहे. मानवी जीवन आजारापासून मुक्त करण्यासाठी त्यांनी औषधी वनस्पतींना महत्त्व दिले व अशा वनस्पतीच्या लागवडीला महत्त्व दिले.''[३७] अहिल्याबाई होळकर खरोखरच दूरदृष्टीच्या राज्यकर्त्या होत्या. आजच्या आधुनिक काळात आपण जे वेगवेगळे वृक्ष लागवडीचे कार्यक्रम राबवत आहोत ते त्यांनी २००वर्षापूर्वीच राबविलेले दिसून येते. आज आपण म्हणत आहोत. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे जमिनीची धुप होते. पाऊस कमी पडतो. जमिनीची सुपिकता कमी होते. भूजल पातळी खोल जाते.

पक्षांना प्राण्यांना पाणी मिळत नाही. हे सर्व अहिल्याबाई जाणत होत्या. म्हणूनच त्यांनी पर्यावरणावर लक्ष दिले होते. तसेच जलसंवर्धन सारखे कामेही त्यांनी आपल्या राज्यात राबविले होते.

''अहिल्याबाई राखीव कुरणे पक्षांसाठी अभयारण्य, राखून जोपासले. त्यांच्या राज्यातच नव्हे तर भारतभर त्यांची भटकंती चालू असे. त्यामुळे कुरणांसाठी, अभयारण्यासाठी योग्य जागा हेरुन आसपासच्या लोकांना त्यासंबंधी मार्गदर्शन करुन त्यांचे सहकार्य घेऊन काम यशस्वी करण्यात येई. शेतकऱ्यांच्या पिकांचा, भाजीपाल्याचा, पाखरांपासून नाश होऊ नये याची खबरदारी घेण्याची योजना त्यांच्या जवळ असे. काही वेळेस शेतकऱ्यांचे उभे पिक शासनातर्फे विकत घेऊन ते राखून ठेवले जाई.''[३८] याप्रमाणे त्या आपल्या राज्यातील शेतकऱ्यांची तसेच पशुपक्षांची काळजी घेत असे.

पर्यावरणात समतोल निर्माण करण्याची आपली क्षमताही अहिल्याबाईंनी दाखविली आहे. त्याचे एक उत्तम उदाहरण सांगता येईल. ''राजधानी म्हणून महेश्वर सिध्द झाल्यानंतर महेश्वर इंदौर अशी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली. हा मार्ग विंध्य पर्वत रांगांतून जाणारा महेश्वरहून निघाल्यानंतर इदौरकडे जाताना रामकुंड चौली आणि जांब अशी प्रमुख विश्रांतीची ठिकाणे तसेच सैन्याच्या पाडावाची ठिकाणी होती. पुष्कळ ठिकाणी पाण्याची व्यवस्था होती. पण जांब या गावी मात्र पाण्याची भयानक टंचाई भासत असे. विंध्य पर्वतातून उगम पावणाऱ्या चोरल नदीचा एक प्रवाह जांब गावातून वाहत असे. पण फक्त पावसाळ्यात इतर वेळेस तो कोरडा पडे. त्यामुळे वाहतूक करणाऱ्यांवर मोठी आपत्ती ओढवत असे. हे लक्षात आल्यावर या विषयातील तज्ञ अशा सल्लागारांकडून योजना तयार करुन घेतली आणि ती अंमलात आणली. योग्य ठिकाणी चारेल नदीवर धरण बांधून कृत्रिम सरोवर निर्माण करण्यात आले आणि वर्षभरात त्यात पाणी उपलब्ध झाल्याची खात्री पटल्यावर समयसूचक अहिल्याबाईंनी स्वत: मल्हाररावांच्या पुण्यतिथीचा मुहुर्त साधून अधिकृतरीत्या समारंभपूर्वक सरोवराचे उद्‌घाटन केले. त्यावेळी संबंधीत व्यक्तीचा योग्य तऱ्हेने गौरव करायला त्या विसरल्या नाहीत. अशा अनेक छोट्या मोठ्या गोष्टी पर्यावरण संबंधात अहिल्याबाई होळकर यांनी हेतूपूर्वक पार पाडल्या.''[३९]

अशा प्रकारची पर्यावरणविषयक सर्व कामे पाहिली असता. पर्यावरण हा अहिल्याबाईचा आवडीचा प्रेमाचा विषय होता. तसेच या विषयाची किती आश्चर्यकारक जाण त्यांना होती. तसे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोना आखल्या आणि लोकांच्या गळी

उतरवल्या, अंमलात आणल्या. वनस्पती व झाडे त्यांची मित्र होते. अशा प्रकारचे कार्य त्यांनी पर्यावरणासंबंधी केल्याचे दिसून येते.

### ४.१४ अहिल्याबाई होळकरांचे हुंडाविषयक दृष्टीकोन :

आपल्या देशामध्ये हुंडापध्दती आजही अस्तित्वात आहे. लग्न समारंभामध्ये मुलीकडून मुलास किंवा मुलाकडून मुलीस हुंडा देण्या घेण्याची वाईट प्रथा आपल्या समाजामध्ये आहे. आजच्या समाजात मुलीकडून मुलास हुंडा देण्याची प्रथा अस्तित्वात आहे. या प्रथेमुळे कितीतरी मुलींचे लग्न होत नाही. कारण त्यांचे पालक आर्थिक परिस्थितीमुळे हुंडा देऊ शकत नाही. तसेच बऱ्याच वधु पित्यास एकंदर आपली जमीन विकावी लागते. किंवा कर्जबाजारी व्हावे लागते.

अहिल्याबाईंच्या काळात देखील हुंडा पध्दती अस्तित्वात होती व अहिल्याबाई यांनी या पध्दतीस कडाडून विरोध केलेला दिसतो. याचे कारण पाहावयाचे झाल्यास महेश्वर मधील एका प्रसंगाने हे लक्षात येईल. एक दिवशी महेश्वर येथील दरबारात चार-पाच ब्राम्हण आले. त्यातील एक ब्राम्हण हात जोडून म्हणाला, ‘‘मातोश्री आम्ही गरीब ब्राम्हण आहोत, गरीब असल्याने आमच्या मुलीचे लग्न होणे बहुत कठिण झाले आहे.’’[४०] ब्राम्हणांचे हे म्हणणे ऐकून अहिल्याबाई यांना आश्चर्य वाटले. व त्या म्हणाल्या तुमची बहुसंख्य घराणी शिक्षित, उत्तम, मग अडचणी त्या काय? यावर ब्राम्हणांने सांगितले. आम्हा ब्राम्हणास द्रव्य लोभाचा शाप आहे. मातोश्री द्रव्यखेरीज कन्या कुणी पदरी घेत नाही. बहुत द्रव्य मागत असतात. व त्यांनी अहिल्याबाई यांना यातून मार्ग काढण्याची विनंती केली.

अहिल्याबाईनी हे म्हणणे ऐकून घेतले व यावर मार्ग काढण्याचे त्यांनी ठरविले. मात्र त्यांनी मुकुंद हरीस बोलावले आणि लिहिण्यास सांगितले. ‘‘श्री शंकर आज्ञेवरुन हुकुम जारी करण्यात येतो की, कोणत्याही जाती किंवा जमातीत विवाहचे समयी कोणी कन्येचे द्रव्य देईल त्यांचेकडून जितके द्रव्य मिळाले असेल तेवढे सरकारकडून भरणा करुन घेतले जाईल आणि या शिवाय दंडही भरावा लागेल. विदीत होय.’’[४१] यावरुन लक्षात येते की,अहिल्याबाई या प्रजाहितदक्ष होत्या. जनतेने मांडलेल्या समस्यावर तत्काळ लक्ष देऊन अंमलबजावणी करत होत्या. त्यामुळे जनतेच्या समस्या सुटण्यास तत्काळ मदत होत होती. त्यांनी एवढेच नव्हे तर त्या पत्राच्या पन्नास नक्कल करुन

प्रांतोप्रांती पाठवून दिल्या त्यामुळे ब्राम्हणांना खूप आनंद झाला व त्यांनी अहिल्याबाई यांना आशिर्वाद दिला.

यावरुन असे लक्षात येते की, अहिल्याबाई हुंडाविरोधी होत्या देणे किंवा घेणे ही पध्दत त्यांना मान्य नव्हती. त्यांनी आपल्या प्रशासनाकडून या पध्दतीस बंदी घातलेली होती.

आजच्या २१ व्या शतकामध्ये हुंडा दिला व घेतला जातो व त्याचे वाईट परिणाम समाजात दिसून येतात. अनेक मुला मुलींचे लग्न या कारणामुळे झाली नाहीत. तसेच अनेक वधुपिता या हुंडा पध्दतीमुळे कर्जबाजारी झाले व आत्महत्या घडु लागल्या आहेत. ज्या प्रमाणे अहिल्याबाईंनी आपल्या काळामध्ये हुंडाविषयक फर्मान काढून दंडाची शिक्षा ठेवली होती त्याच प्रकारचे कठोर नियम आजच्या काळात आहेत. परंतु ते आणखीन कठोर करुन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. २०० वर्षापूर्वी अहिल्याबाईंनी जे कार्य केले आहे ते पाहून असे वाटते की, त्या पुढारलेल्या विचारांच्या होत्या व त्यांनी समाजातील अनिष्ठ रुढी परंपरांचा विरोध केला व समाजहित जोपासण्याचा प्रयत्न केला.

### ४.१५ अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रीजागृतीसाठी केलेले कार्य :

मूळ भारतीय संस्कृतीही स्त्री प्रधान मातृसत्ताक पध्दतीवर आधारित होती. परंतु पुढे तिचे रुप बदलत गेले. स्त्रीला केवळ भोग वस्तु समजले जाऊ लागले व त्यामुळेच तिची अवस्था अधिकच अत्यंत केविलवाणी व दयनीय झाली. धर्माच्या नावावर अनेक जाचक व निष्ठूर नियम बनवून स्त्रियांची अक्षरश: विटंबना करण्यात आली. अहिल्याबाई होळकर यांनी त्या काळातील स्त्रियांची परिस्थती पाहिली व त्यांस अनुसरुन स्त्री जागृतीसाठी कार्य करण्याचे प्रयत्न केले.

अहिल्याबाईंनी स्त्री जागृतीचे जे कार्य हाती घेतले त्या कार्यास मल्हाररावांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्या पाठिंब्याच्या जोरावर हया मोहिमेस अहिल्याबाईंनी सुरुवात केली. सर्वात प्रथम अहिल्याबाईंनी स्त्रियांची मानसिक अवस्था तयार करण्याच्या दृष्टीकोनातून आधी स्त्रियांना सणवारांच्या निमित्ताने वाड्यावर बोलावण्यास सुरुवात केली व स्त्रियांना समजेल अशा भाषेत स्वत:च्या उन्नती बाबत जागृत होण्यास प्रवृत्त केले. त्यांच्या सामाजिक परिस्थितीची जाणिव अहिल्याबाईंनी स्त्रीवर्गाला करुन दिली. तसेच चूल आणि मूल  हेच केवळ तुमचे क्षेत्र नसावे तर समाज त्याची परिस्थिती आणि आपल्यावर

येऊ शकणाऱ्या संभावित धोक्यापासून संरक्षण याबाबतीत आपले विचार मांडले जेणेकरुन स्त्रियांच्या मनात सामाजिक जबाबदारीचे भान स्वसंरक्षण याबाबत त्या जागरुक होतील आणि त्यांचा नैतिक विचारांचा पाया पक्का होईल याची काळजी घेतली. या नैतिक शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षण दिले. ज्यांची क्षमता होती त्या स्त्रियांना निदान घोड्यावर स्वार होऊन स्वारी करणं, तलवार व काठी चालवता येणं. यात तयार केले''[४२] अशा प्रकारे अहिल्याबाई यांनी प्रथमत: स्त्रियांना एकत्र केले. व त्यांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणिव करुन दिली. व नंतर स्वसंरक्षणाविषयी शिक्षण दिले. आज आपण स्त्री संरक्षणाविषयी जे वेगवेळे प्रयोग राबवत आहोत जसे की निर्भय कन्या अभियान, बेटी बचाव अभियान त्याच प्रकारचे स्वसंरक्षणाचे धडे अहिल्याबाई यांनी २०० वर्षापूर्वी देण्याचा प्रयत्न केला व आपण आधुनिक काळाचे प्रतिनिधित्व करीत आहोत हे दाखवून दिले.

प्रजेच्या पालन पोषणाची जबाबदारीही राजकर्त्यांची आहे. ही भूमिका अहिल्याबाई आधीपासूनच बजावत आल्या होत्या. अहिल्याबाई लग्न होऊन आल्या दिवसापासून सिता सतत अहिल्याबाई बरोबरच होती. साहजिक ती त्यांची लाडकी व जवळची सेविका होती. आपण अहिल्याबाईंच्या सगळ्यात जवळच्या आहोत हयाचा तिला अभिमान होता आणि त्यामुळे इतरांवर गाजवत असलेला रुबाब पाहताना अहिल्याबाईंना खूप गंमत वाटली. पुढे सीता एका बाळाला जन्म देऊन मरण पावली. ज्यावेळेस अहिल्याबाईंना सीताच्या निधनाची बातमी कळाली अहिल्याबाईंनी सीतेच्या मुलींच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. हा निर्णय त्यांनी भावनेच्या आहारी जाऊन घेतलेला नव्हता. अशा नाजुक प्रसंगी मुलीच्या दुधाची व्यवस्था त्यांनी तत्काळ केली. तसेच दुसरी सेविका विठी तिची सून, नुकतीच बाळंत झालेली होती. विठीला त्यांनी सुनेला वाड्यावर घेऊन यायला सांगितले की, जेणे करुन बाळ उपाशी राहणार नाही. अशा प्रकारचे निर्णय अहिल्याबाई यांनी घेतले. तेंव्हा त्यांनी त्यांच्या सासू गौतमाबाई किंवा इतर कुणाचाही विचार घेतला नव्हता. परंतु गौतमाबाईंनी त्यांना पाठिंबा दिला. ''दु:ख तर झालेच पण आपल्या सुनेच्या वागणूकीमुळे समाधानाने मन भारावले एवढ्या परिस्थिती निर्णय घेणे आणि तोही योजनापूर्वक उगाच आपण भावनेच्या भरात काहीतरी ठरविले असे नाही तर त्या बाळाची सोय कशी होईल याचा सुध्दा नीट विचार केला.''[४३] अशा प्रकारे अहिल्याबाई यांनी मुलीला वाचविण्यासाठी त्यांच्या दुधासाठी त्यांच्या घरातील मंडळींना त्यांना टाकून देऊ नये म्हणून त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी घेतली. आज आपण हीच योजना नवीन

रुपात पाहत आहोत. म्हणजेच मुली वाचवा मुलीला जगू द्या. अहिल्याबाई होळकर यांनी अशा प्रकारे स्वत: जबाबदारी घेऊन मुलीचे संरक्षण केलेले दिसून येते.

त्याच प्रमाणे बालविवाह ही प्रथाही त्या काळच्या समाजामध्ये रुढ होती. अहिल्याबाईंनी मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन मुले होती. त्या काळात मुलीचे लग्न आठव्या वर्षी केले जायचे. मुक्ताचा जन्म १७४८ मध्ये झाला. तर लग्न १७६६ मध्ये झाले. म्हणजे वयाच्या आठरावे वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिचा विवाह अहिल्याबाईंनी केला. आज २१ व्या शकतकात अल्पवयीन मुलीचे लग्न होऊ नये म्हणून कायदे केले जातात. अहिल्याबाईंनी २५० वर्षापूर्वी स्वत:च्या मुलीचे लग्न सज्ञान झाल्यावर केले. यावरून अहिल्याबाई किती पुरोगामी होत्या हे लक्षात येते.''[४४] अहिल्याबाई अंध रुढी परंपरेच्या विरुध्द होत्या. त्या वेळ प्रसंग येता अंध रुढी परंपरेविरूध्द पेटून उठत आज आपण पाहतो की, २०० वर्षा नंतरही बाल विवाह विरुध्द कायदा करुनही बालविवाह होताना दिसतात. अहिल्याबाईंनी बालविवाहाविरुध्द रणशिंग फुंकून त्याची सुरुवात स्वत:च्या मुलीपासून केली. हा त्यांचा आदर्श आजही घेण्यासारखा आहे.

त्याचप्रमाणे अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रियांसाठी स्त्रियांच्या प्रगतीसाठी हुंडाबंदी कायद्याची अंमलबजावणी केली. मल्हाररावांनी ,नातू मालेराव याचे लग्न बहाड कुटुंबातल्या मैना नावाच्या मुलीशी करण्याचे निश्चित केले. तेंव्हा अहिल्याबाईंनी मैनाच्या आईवडीलांना सांगितले. ''आपली कन्या चंद्राची कोर आहे पण माझ्या मुलात काही उणीवा आहेत. त्या आपणास स्प्टपणे सांगते. मालेराव माझा मुलगा हा फार वाईट, टवाळखोर, नशेबाज, क्रुर, दुर्गुणी आहे. असे असूनही आपण आपली लेक आमच्या घरी देता चांगली गोष्ट आहे. बाकी आपणाकडून आंम्हास सुतळीच्या तोड्याची सुध्दा अपेक्षा नाही. आपल्या मुलीस मातृप्रेमाला इथे काहीही उणे पडणार नाही.''[४५] यावरुन अहिल्याबाईंचा स्पष्टपणा व खरेपणा दिसून येतो. तसेच त्या हुंड्यांची अपेक्षा न बाळगणाऱ्या वाटतात. आपल्या मुलाचे दुर्गुण सांगणाऱ्या माता दिसून येतात. आजच्या काळात विवाह जमविताना खोटे बोलले जाते. व नंतर याचा परिणाम असा होतो की विवाह मोडतात व स्त्रीचे नुकसान होते. हे टाळण्यासाठी त्यांनी मुलाचे सर्व दुर्गुण सांगितले.

त्यांनी आपल्या काळात म्हणजेच १८ व्या शतकात हुंडा घेणारा, हुंडा देणारा आणि मध्यस्थी करणारा यांना शिक्षा ठोठावण्याचा कायदा केला. आज २१ व्या शतकात हुंडा बळीचे शेकडो प्रकरणे

घडताना दिसतात. आजही हुंडा देणे घेणे हा अत्याचार नसून शिष्टाचार आहे. परंतु यामुळे स्त्री दयनीय होते. हे अहिल्याबाईंनी ओळखले होते. व स्त्री प्रगतीसाठी हुंडा बंद होणे हे महत्त्वाचे होते.

अहिल्याबाई होळकर यांनी विधवांसाठी देखील मोलाचे काम केले आहे व त्यांच्यावर होणारे अन्याय बंद केले. सिरोज येथील धनाढ्य सावकार हेमदास हा निपुत्रिक होता. तो मेला तेव्हा तेथील अधिकाऱ्यांनी त्याच्या विधवेस सांगितले की, तुमची संपत्ती बेवारस असल्याने सरकार जमा करण्यात येईल ती घाबरली व म्हणाली. असे करु नका. तेंव्हा अधिकाऱ्यांनी तीन लाख रुपये मागितले. जेंव्हा अहिल्याबाईंना ही गोष्ट समजली. तेंव्हा त्या खूप संतापल्या. अधिकाऱ्याला कामावरुन काढून टाकले आणि तिला मूल दत्तक घेण्याची परवानगी दिली. त्याकाळी विधवेला मूल दत्तक घेण्याची परवानगी नव्हती. अशा विधवांची संपत्ती राजेरजवाडे, सरकारदरबारी जमा करुन घ्यायचे. तेंव्हा अहिल्याबाईंनी अशा स्त्रियांना सांगितले की, ''हा पैसा तुमच्या पतीचा आहे तुम्हीच त्याच्या वारस आहात. तुम्ही तुमच्या इच्छेने हा पैसा, संपत्ती एखाद्या अन्न छत्राला द्या. पाणपोई उघडा, नदीवर घाट बांधा किंवा विहीरी खोदा आणि दान धर्माचे पुण्य घ्या. असा नेक सल्ला त्यांनी त्या विधवा स्त्रियांना दिला.''[४६] अशा प्रकारे त्यांनी विधवा स्त्रियांना अधिकार दिला होता व त्यांच्यासाठी दत्तक वारस घेण्याची परवानगी दिली होती.

याचप्रमाणे अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यातील पडदा पध्दतीही बंद केली होती. त्याकाळात पडदा पध्दती होती. ती पध्दत मुख्यत: मुस्लिम राजवटीतून निर्माण झाली. पुढे हिंदु राजे राजवाड्यात सुध्दा बायकांना पडदा पध्दती सुरु झाली. पण अहिल्याबाईंना ही पडदा पध्दत मान्य नव्हती. त्यांनी ती पाळली नाही. आणि पडदा पध्दत पाळलीच पाहिजे असे बंधन कोणावरही लादले नाही.

अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी स्त्री जागृतीसाठी मुलींचे संगोपण करण्याची जबाबदारी स्त्रियांना स्वसंरक्षणाच धडे, विधवांना दत्तक अधिकार, व बालविवाह यांसारख्या अनिष्ठ प्रथा थांबवून स्त्री जागृती करण्याचे कार्य केले.

**४.१६ अहिल्याबाई होळकर आणि पारंपारीक उद्योग व्यवसाय :**

राज्यात विकासासाठी उद्योग व्यवसाय वाढीला लागणे आवश्यक आहे. याची अहिल्याबाईंना जाणीव होती म्हणून त्यांनी त्याकडे विशेष लक्ष दिले. उद्योग व्यवसाय वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्या काळात राज्यात अनेक वस्तू बाहेरच्या देशातून विक्रीस येत होत्या. यामुळे स्थानिक व्यापारी आणि उद्योजकांचे नुकसान होत असे. म्हणून त्यांनी स्थानिक लोकांना मदत करुन व्यापार उद्योग वाढीला मदत केली.

स्वदेशी वस्त्र व्यवसायाला मदत केली राज्यात वस्त्र व्यवसाय वाढीला लागावा म्हणून अहिल्याबाईंनी हैद्राबादचा निजाम उल-मुल्क यांना खलिता पाठवून विणकर आणि रंगारी कारागिरांना आपल्या राज्यात बोलावून घेतले निजाम उल-मुल्क अहिल्याबाईंना आपली बहीन मानी. तो त्यांचे नेहमी शुभ चिंतीत असे. त्यांनी चांगल्या कुशल विणकर व रंगारी कारागिरांना महेश्वरी पाठविले. त्यात सखाराम घोंगडे नावाचा विणकर आईबरोबर महेश्वरास आला.[४७]

अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी काळाची गरज ओळखली होती व त्यामुळेच त्यांनी उद्योग व्यवसायास चालना दिली व बाहेरच्या राज्यातून वस्त्र उद्योग व्यवसायास कारागीर आणून चालना दिली व बाहेरच्या राज्यातून वस्त्र उद्योग व्यवसायासाठी मजुर बोलवले होते. सखाराम घोंगडे बरोबर त्यांच्या विश्वासातले अनेक विणकर त्याच्या बरोबर आले होते. अहिल्याबाईंनी त्या विणकराची राहण्याची व व्यवसायासाठी लागणारी जागा हयांची व्यवस्था केलेली होती. त्याचबरोबर त्यांना आर्थिक बाबतीतही मदत केलेली होती. त्यामुळेच विणकऱ्यांना आपला पारंपरिक व्यवसाय सुरळीतपणे करता आला. विणकरांची उत्तम व्यवस्था लावून दिली. हातमाग घातले गेले व त्यावर झरझर वस्त्रे विणली जाऊ लागली.[४८] अहिल्याबाई यांनी केवळ त्यांना आपल्या राज्यात घेऊन आल्या नाही तर त्यांची राहण्याची व्यवस्था देखील केली. हातमाग सुरु झाले पहिला पोत तयार झाला. सखाराम घोंगडे हा विणकर हा पोत घेऊन अहिल्याबाई समोर हजर झाला. कापडाची घडी त्यांनी अहिल्याबाई समोर ठेवली. त्या रेशमी वस्त्राचा तो सुंदर चंदनी रंग पाहूनच अहिल्याबाई अतिशय प्रसन्न झाल्या. त्या सखाराम घोगडे यांना म्हणाल्या ''इतकं सुंदर वस्त्र तयार करणाऱ्याचं नाव घोंगडी नको. तुम्हाला तर रेशीमवाले नाव सार्थ ठरेल. हा आता महेश्वराच्या रेशम व्यवसायाचा श्रीगणेशा झाला.[४९] अहिल्याबाईंनी स्वदेशी वस्त्र व्यवसायाला प्रोत्साहन दिल्यामुळे महेश्वर हिंदुस्थानातील

वस्त्रोद्योगाचे मोठे केंद्र बनले. त्यामुळेच महेश्वर आजही महेश्वर साड्यांच्या बाबतीत प्रसिध्द आहे. अशा प्रकारे अहिल्याबाईंनी पारंपरिक वस्त्रोद्योगांना प्रोत्साहन दिले. ज्या योगे रोजगाराची संधी तरुणांना उपलब्ध झाली. बेकारीची समस्या कमी झाली. सुरवातीला आर्थिक मदत देऊन उद्योग सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे ते आर्थिक बाबतीत सक्षम तर झालेच त्याच बरोबर राज्यात नवीन उद्योग धंद्यांना चालना मिळाली.

अहिल्याबाईंच्या काळात त्यांनी महेश्वर नगरीचे राजकीयदृष्टया महत्त्व वाढविले. तसे औद्योगिकदृष्टयाही महत्त्व वाढविल्याचे दिसून येते. मागावर वस्त्र विणण्याच्या उद्योग धंद्यास मोठी चालना दिली. विणकरांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करुन त्यांना उद्योग धंदे स्थापन करण्यासाठी सर्व प्रकारचे सहाय्य केले. येथील कापड त्या काळात अतिशय प्रसिध्द होते. महेश्वरी लुगडी तर भारतभर प्रसिध्द पावलेली होती. आजच्या काळात देखील महेश्वरी लुगडी प्रसिध्द असलेली दिसून येतात. हे सर्व पाहता अहिल्याबाईंच्या ठिकाणी दुरदर्शीपणा असल्याचा दिसून येतो. त्यांनी स्वदेशीचे उत्पादन व वापर या बाबी आचरणात आणलेल्या होत्या.

अहिल्याबाई यांनी केवळ वस्त्रोद्योगालाच नाही तर आपल्या राज्यात शिल्पकार, पाथरवट, कारागिर यांनाही राजाश्रय दिला व त्यांच्या कलेचे त्यांना योग्य मूल्य दिले. त्यामुळे महेश्वरचे नाव पर्यटनक्षेत्रात भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासात अहिल्याबाईंनी प्राप्त करुन दिले. त्याकाळात शिल्पकारांसाठी कलाकारांसाठी मोफत घरकूल योजना राबविली. प्रतिभावंतांना निवारा मिळाला, पैसा मिळाला,त्यांच्या श्रमातून त्यांच्या श्रमशक्तीतून हे घडत आहे. त्या श्रमविरांसाठी त्यांनी विशेष असे प्रभावी योजना राबविल्या.’’[५०]

अशा प्रकारे अहिल्याबाई होळकर यांनी पारंपरिक व्यवसायाला चालना दिल्याचे दिसून येते.

### ४.१७ भारतीय वास्तुकले मध्ये अहिल्याबाई होळकर यांचे योगदान :-

भारतीय इतिहासामध्ये १८ व्या शतकाचा उत्तरार्ध राजनीतिक अस्थिरतेचे युग समजले जाते. हे युग म्हणजे ज्यामध्ये राजनीतिक, सामाजिक आणि नैतिक मुल्यांचा ऱ्हास झालेला होता. शासन आणि व्यवस्थेच्या नावावर अत्याचार वाढत होते. न्याय आणि शासन व्यवस्थेमध्ये विश्वासाचा अभाव दिसत होता. सर्व मिळून स्थिती अशी निर्माण झाली होती की, नवनिर्माण आणि शांती चा

विचार ही केला जाऊ शकत नव्हता. अशा या युगात बिकट परिस्थितीमध्ये होळकर राज्यची राजमाता अहिल्याबाई यांनी अत्यंत कठीन परिस्थितीचा सामना ज्या धर्मनिष्ठेने न्यायाने आणि नीतीने केला तो खूपच कौतुकापर आणि चिरस्मरणीय आहे. अहिल्याबाई होळकर याचा कार्यकाल अंधारामध्ये एक महत्त्वपूर्ण प्रकाश किरणाच्या समान आहे. अशा निरंकुश आणि अराजकताने भरलेल्या काळात अहिल्याबाई यांनी आंतरिक आणि बाहय संकटाचा सामना मोठया धैर्याने केला. तसेच न्याय आणि नीतीचा अवलंब केला. आपल्या सर्वमुखी प्रतिभेमुळेच अहिल्याबाई हया लोकमाता अहिल्या बनल्या. अहिल्याबाई यांच्या मोठयापणाचे अनेक पहेलु आहेत. त्याच्या प्रसिध्दीचा सर्वाधिक मोठा भाग त्याच्या वास्तुकलेतील योगदान आहे.

### ४.१७.१ अहिल्याबाई होळकर यांच्या वास्तुकलेची वैशिष्टये :-

पती खंडेराव, सासरे मल्हारराव तसेच पुत्र मालेराव यांच्या मृत्युनंतर १७६७ मध्ये होळकर राज्यांची धुरा अहिल्याबाई होळकर यांच्या खांदयावर आली. अहिल्याबाई यांच्या २४ वर्षाच्या कारर्कीदीमध्ये त्यांनी वास्तुकलेचा विकास तसेच दानशूरता यांचा जवळचा संबंध दिसून येतो. त्याच्या कारकीर्दीमध्ये वास्तुकलेचा विकास व त्याला प्रोत्साहन मिळालेलं दिसून येते. त्यांनी त्यांच्या काळात आपल्या राज्यात व राज्याबाहेर अनेक ठिकाणी मंदिरे, घाट, धर्मशाळा, वेशी, छत्री, विहिरी निर्माण केलेल्या दिसून येतात. त्यांची मुख्यत्वे तीन वैशिष्टये दिसून येतात.

१) अहिल्याबाई यांच्याद्वारे तयार केलेल्या सर्व इमारती सत्तेच्या प्रदर्शनसाठी नसून आरामासाठी नसून, लोकहितासाठी आणि सार्वजनिक उपयोगासाठी निर्माण केल्या होत्या.

२) अहिल्याबाई यांनी निर्माण केलेल्या वास्तु राज्यात आणि राज्याबाहेर सर्व भारतात पसरलेल्या आहेत. याच क्षेत्र बद्रीनाथ ते रामेश्वरम, द्वारका हे जगन्नाथ पर्यंत पसरलेले आहे. या सर्व वास्तु अहिल्याबाई यांच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाचे प्रतिक आहे.

३) हया वास्तु किंवा निर्माण कार्याची देखभाल कायमस्वरूपाची व्यवस्था केली गेली होती.तसेच मंदिरे, घाट आणि धर्मशाळा इत्यादीची दुरूस्ती तसेच इतर खर्चासाठी जवळपासच्या काही गावाच्या मिळकतीची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आली होती. जिथे अशी व्यवस्था नव्हती तिथे सरकारी खजिन्यातून व्यवस्था केली गेली होती. हया सर्व व्यवस्थेमागे

अहिल्याबाईंनी निर्माण केलेल्या वास्तुला स्थायित्व प्राप्त व्हावे व त्याच्या मृत्युनंतर ही ते चालू रहावे अशी भावना होती.''५१

### ४.१७.२ अहिल्याबाई कालीन मुख्य इमारती व त्यांची वैशिष्टये :-

- **धर्मशाळा :-**

अहिल्याबाईंनी बनवलेल्या इमारतीमध्ये धर्मशाळेचे स्थान खूप महत्त्वपूर्ण आहे. हया काळात सामाजिक उपयोगितेसाठी धर्म शाळेना फार महत्त्व होते. हया काळी प्रवासी सुविधा उपलब्ध नसतांना देखील तीर्थयात्रा व पिंडदानास त्या काळाची धार्मिक आणि सामाजिक रूढी होती. जवळपास संपूर्ण देशात तीर्थयात्रेच्या ठिकाणी थांबण्याच्या उद्देशाने सर्व सुखसुविधाने उपयुक्त मोठ-मोठया धर्मशाळेचे निर्माण अहिल्याबाईंनी केले होते. याच बरोबर या वास्तु सामाजिक गरजेच्या देखील होत्या. अहिल्याबाई यांनी अमरकंटक, केदारनाथ, अयोध्या, गंगोत्री, नाथद्वारा, पुष्कर, बन्द्रीनारायण, मथुरा, रामेश्वर, तसेच हरिद्वार इत्यादी ठिकाणी धर्मशाळेचे निर्माण केलेले दिसून येते. त्याच्या वास्तुकलेची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) मुख्य प्रवेशद्वार खूप उंच आहे. आणि तेथे पहारेदाराची व्यवस्था केलेली आहे.

२) सर्व बाजूच्या भिंती खूप उंच-उंच आहेत.

३) इमारती समोरील परीसर मोकळा आणि तसेच मध्यभागी तुळशीचे रोपटे लावलेली आहेत.

४) सगळया बाजूंनी खोल्या तसेच खोल्या समोर पडव्या आहेत.

५) सर्व धर्मशाळेचे बांधकाम पक्क्या विटांचे आहेत.

६) जवळपास सर्व धर्मशाळा मध्ये शिवलिंग आढळून येते.

७) सर्व धर्मशाळेमध्ये अन्नछत्राची व्यवस्था होती.

८) इमारती मध्ये स्वच्छता करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती व त्याच्या मानधनाची कायमस्वरूपी व्यवस्था केली गेली होती.

९) सर्वच धर्मशाळा नदीच्या व विहिरीच्या जवळपास असल्याचे दिसून येते कारण पाणी सहज उपलब्ध व्हावे हा त्यामागील हेतू होता.

१०) महेश्वर येथील धर्मशाळा विशेष आहेत. येथील धर्मशाळेच्या भिंतीवर नृत्य करणाऱ्या स्त्री-पुरूषांचे चित्र आहेत.

अशाप्रकारे धर्मशाळांचे वैशिष्टये आहेत.

- **मंदिर :-**

अकबर आणि जहांगीर यांच्या शासन काळास सोडून इतर मुस्लिम काळात हिंदू वास्तुना नेहमीच धर्मान्धतेचे शिकार व्हावे लागले. मराठयाच्या उत्थानाबरोबरच हिंदू वास्तुकलेचा देखील विकास झालेला दिसून येतो. अहिल्याबाई यांनी भारताच्या इतर भागात देखील मंदिर निर्माण कार्य केलेले दिसून येते. तसेच काही मदिरांचा जीर्णोध्दार ही केलेला आहे. असे मानले जाते की, अहिल्याबाई यांनी बारा ज्योर्तिलिंगाची स्थापना संपूर्ण भारतात केली. शिव मंदिरे आणि राम मंदिरे देखील बांधली यांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे

१) या मंदिरामध्ये शिरवट, कळस, सभा मंडप अशा पारंपारिक पध्दतीचा समावेश आहे.

२) काही ठिकाणी या मंदिराच्या कार्यात भूरक्या रंगाच्या दगडाचा उपयोग केला आहे.

३) मंदिराच्या दारांवर शिलालेख लिहिलेले आढळतात.

४) बऱ्याचशा मंदिरामध्ये द्रविड शैली चा प्रभाव असल्याचे दिसून येते.

५) मूर्तीची स्थापना खूप आकर्षक आहे.

देवी अहिल्याबाई यांनी निर्माण केलेल्या मंदिराची संख्या ६५ पेक्षा अधिक आहे.

- **घाट :-**

देवी अहिल्याबाई यांनी निर्माण कार्यामध्ये नदीवर बांधलेल्या घाटांना विशेष महत्त्व आहे. बनारस मधील सुप्रसिध्द मणिकर्णिका घाट १७८५ मध्ये निर्माण केला गेला. या घाटासाठी २५०००/- रूपये खर्च आला. दशाश्वमेघ घाट ही याचा वर्षी पूर्ण झाला. बनारस मध्येच स्त्रियासाठी मणिकर्णिका घाट बनवला गेला होता.त्याचप्रमाणे हरिद्वार मध्ये ही दक्षिणेकडे गंगानदीच्या किनाऱ्यावर कुशावर्त घाट आहे तो ही खूप महत्त्वपूर्ण आहे. आज देखील पिंडदान कार्य मुख्यत्वे याच घाटावर केले जाते.

अहिल्याबाई ने बनवलेल्या घाटामध्ये सर्वाधिक उल्लेखनीय घाट महेश्वर घाट आहे. महेश्वर अहिल्याबाई यांच्या राज्याची राजधानी होती. येथे अहिल्याबाई यांनी बऱ्याचशा छत्रि

बनवल्या तसेच मंदिरे आणि घाटांची निर्मिती केली. घाटावर जाण्यासाठी विशाल असे प्रवेशद्वार बनवले. हे प्रवेशद्वार इतके मोठे आहे की हत्तीवर बसलेल्या माणसासकट जाता येते. हे प्रवेशद्वार खूपच आकर्षक असे आहे.

अयोध्या येथील शरयू घाट, मयुरा येथील कालिकादेह घाट, कुरूक्षेत्र येथे पंचकुंड घाट, पुणतांबे येथील गोदावरी नदीवर घाट, प्रयाग, मंडलेश्वर अशा प्रकारच्या अनेक घाटांचे निर्माण लोकमाता अहिल्याबाई यांनी केले आहे. या घाटांचे वैशिष्टे पुढील प्रमाणे आहे.

१) पाण्यामध्ये खूप उंच पायऱ्या बनवल्या आहेत.

२) चबुतऱ्यावर शिवलिंगाची स्थापना केलेली आहे.

३) घाटा मधून देवस्थानापर्यंत जाण्याचा मार्ग बनवलेला आहे. जेणेकरून यात्रेकरूना सोयीचे झाले पाहिजे.

४) घाटाच्या वरती शिवलिंग बनवण्यात आले आहे.

- **जलकुंड आणि विहिरी :-**

देवी अहिल्याबाई यांनी भारताच्या विभिन्न भागामध्ये काही जलकुंडाची निर्मिती केली आहे. यामध्ये केदारनाथ येथील जलकुंड तसेच वृंदावन मध्ये बनवलेली विहिर विशेष लक्ष्य आकर्षित करते. केदारनाथ येथील कुंड जमिनीपासून ३०० फूट उंच आहे.तेथे पहुचने खूप अवघड आहे. वृंदावन येथील विहिर लाल दगडांची बनवलेली आहे. त्यामध्ये ५७ पायऱ्या आहेत. बद्रीनाथ वेरूळ आणि रापेट येथील जलकुंड सुध्दा उल्लेखनीय आहेत.

- **जामघाट येथील मार्गद्वार :-**

देवी अहिल्याबाई यांनी काही मार्गद्वार देखील निर्माण केले आहेत. यामध्ये जामघाट येथील मार्गद्वार अधिक प्रसिध्द आणि विशेष उल्लेखनीय आहेत. इंदौर आणि महेश्वर यांच्या मध्ये जामघाट नावाचे प्रसिध्द स्थान आहे. येथे अहिल्याबाई यांनी विशाल असे मार्गद्वार बनवले आहे. या मार्गद्वाचे नाव जामघाट असे आहे. हा दरवाजा जवळपास ७५ फूट लांब, ७० फूट रूंद आणि जवळपास ४५ फुट उंच आहे. या मार्गद्वाराच्या दोन्ही बाजूस मोठे स्तंभ आहेत. दुसऱ्या मजल्यावर सज्जे आहेत. दक्षिणेकडील भिंती मध्ये तीन खिडक्या आहेत. मार्गद्वारा पासून १८ मैल लांबीवर नर्मदा नदी

वाहताना दिसते. दरवाजाच्या छतावरून विंध्याचल आणि सातपुडा पर्वतांच्या रांगा अती सुंदर दिसतात.

- **मल्हारराव होळकर यांची छत्री :-**

होळकर वंशाचे संस्थापक मल्हारराव यांचा मृत्यु २० मे १७६६ मध्ये आलमपूर येथे झाला. अहिल्याबाई यांनी त्याच्या स्मरणार्थ आलमपूर येथे एक छत्री बनवली. ही छत्री साधारण आहे. परंतु ऐतिहासिक दृष्टया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

- **राष्ट्रीय वास्तुकलेस प्रोत्साहन :-**

वरील विवेचनाने स्पष्ट होते की, प्रवासासाठी उपलब्ध साधनांचा अभाव असताना देखील अहिल्याबाई यांनी वास्तुकलेस प्रोत्साहन दिले. भौगोलिक आणि राजकीय दृष्टया वेगळया असणाऱ्या भारत देशात धार्मिक राजधान्यांचे राष्ट्रीयकरण करण्याचे श्रेय अहिल्याबाई होळकर यांना आहे. वास्तुकलेसंबंधी हे कार्य रोमांचकारी होते. जेव्हा आम्ही हे पाहतो की, त्यावेळी संपूर्ण भारत युध्दात आणि अराजकतेमध्ये बुडलेला होता. अहिल्याबाई यांचे हे कार्य राज्यापुरते मर्यादित नसून संपूर्ण भारतभर पसरलेले आहे. यामुळे भारतीय वास्तुकलेस प्रोत्साहन मिळाले. अहिल्याबाई यांच्या कार्यामुळे अनेक ठिकाणी वास्तु निर्माण झाल्या व या कार्यात त्यांचे मोठे योगदान दिसून येते.

## समारोप

अहिल्याबाई होळकर यांचे सामाजिक काम पाहता असे वाटते की, त्यांनी प्रत्येक घटकासाठी काम केलेले आहे. केवळ मानवजातीचाच विचार न करता पुश-पक्षासाठी देखील त्यांचे काम दिसून येते. तसेच समाजात असणाऱ्या रुढी, परंपरा यांना देखील विरोध केला व त्या मोडित काढण्याचा प्रयत्न केला. जसे सती प्रथा, हुंडा प्रथा, बालविवाह प्रथा याचा कडाडून विरोध केला. राज्यात पिण्यासाठी विहीरी, तलाव, घाट, रस्ते यांची निर्मिती केली. वेगवेगळ्या कार्यासाठी दानधर्म केला. स्त्रियांच्या उध्दारासाठी प्रयत्न केला. सर्वधर्म समभाव राखण्याचाही प्रयत्न केला. तसेच शिक्षण आणि आरोग्य या गोष्टींकडेही लक्ष दिले. हे सर्व त्यांचे कार्य पाहिल्यावर असे वाटते की त्या एक प्रजाहितदक्ष राज्यकर्त्या होत्या. त्यांनी सामाजिक उन्नतीसाठी अटोकाट प्रयत्न केले.

## संदर्भ सूची


१) वीर मच्छिंद्र : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर , औरंगाबाद १९८६, पृ.३३,३४

२) शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक, संपादक, अहिल्या स्मरणिका इंदौर, १९७३-७५, पृ.क्र.८२

३) पाटील सुलोचना होळकर कुलभूषण अहिल्यादेवी पुणे, २०००, पृ.क्र.३२१

४) उपरोक्त : पृ.क्र.३२

५) पाटील सुलोचना : होळकर कुलभूषण अहिल्यादेवी, पृ.३२१-३३०

६) उपरोक्त : पृ.क्र.३३५-३४९

७) उपरोक्त : पृ.क्र. ३०७-३१७

८) उपरोक्त : पृ.क्र.३५९

९) उपरोक्त : पृ.क्र.३६३

१०) वीर मच्छिंद्र : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, पृ.क्र.४९

११) डांगे अण्णासाहेब : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, पुणे, १९७६, पृ.क्र.५४

१२) उपरोक्त पृ.क्र.२५

१३) उपरोक्त पृ.क्र.३०

१४) तँवर विरेंद्र : अहिल्याबाई, इंदौर, १९५६, पृ.३५

१५) घोणसे श्यामा : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुणे, १९६२, पृ.क्र.१९

१६) उपरोक्त : पृ.क्र.२५

१७) उपरोक्त : पृ.क्र.३०

१८) विर मच्छिंद्र : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, पृ.क्र.७०

१९) घोणसे श्यामा : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पृ.२९

२०) सोनाग्रा रतनलाला : महाराष्ट्राचे शिल्पकार , पुणे, १९७३ पृ.क्र.६७

२१) शर्मा उदयभानु लोकमाता अहिल्या इंदौर  १९६३, पृ.क्र.५५,५६,५७

२२) घोणसे श्यामा : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पृ.२८

२३) उपरोक्त : २८

२४) उपरोक्त : २८

२५) उपरोक्त : २९
२६) उपरोक्त : २९
२७) उपरोक्त २१
२८) दिक्षित रामसेवक, गर्ग होरालाल (संपादक) अहिल्या स्मरणिका १९७० पृ.क्र.५५
२९) मोडक प्रमिला, अहिल्याबाई होळकर, जीवनकार्य १९५०, पृ.क्र.६६
३०) दीक्षित रामसेवक : गर्ग हीरालाल अहिल्या स्मरणिका, पृ.क्र.६७
३१) शास्त्री अवधूत, धर्म भास्कर देवी अहिल्याबाई होळकर विशेषांक १९७२ पृ.८६
३२) उपरोक्त पृ.क्र.४०
३३) उपरोक्त पृ.क्र.८४
३४) डांगे अण्णासाहेब : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाग-२, पुणे - १९७६,पृ.क्र.२१
३५) मोडक प्रमिला अहिल्याबाई होळकर, जीवनकार्य औरंगाबाद, १९८०, पृ.११५-११६
३६) उपरोक्त : पृ.क्र.७०
३७) गायकवाड चंद्रशेखर पुरोगामी विचारांची जीवनधारा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौथी आवृत्ती पुणे, १९८३, पृ.क्र.२१५
३८) लेले सुमित अहिल्याबाई होळकर पुणे २००९, पृ.२५
३९) उपरोक्त : २१
४०) मोडक प्रमिला अहिल्याबाई होळकर, जीवनकार्य उपरोक्त पृ.७८
४१) उपरोक्त : १९
४२) नातु पद्मजा सन्यस्त स्वामीनी इंदौर २००८, पृ.३१
४३) उपरोक्त पृ.क्र.३५
४४) कोळेकर हरिभाऊ, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मुंबई, १९८०, पृ.क्र.१८
४५) उपरोक्त : पृ.क्र.२०
४६) उपरोक्त : पृ.क्र.२३
४७) उपरोक्त : पृ.क्र.६९
४८) नातु पद्मजा, सन्यस्त स्वामीनी पृ.क्र.९१
४९) उपरोक्त : पृ.क्र. ९१,९२
५०) गायकवाड चंद्रशेखर, पुरोगामी विचारांची जीवनधारा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मुंबई-२००६ पृ.क्र.३६
५१) गर्ग समाविष्ट, शर्मा हिरालाल : अहिल्या स्मारिका - इंदौर १९७५ (५ वे पुष्प) पृ.क्र.३३

# प्रकरण पाचवे

## अहिल्याबाई होळकरांचे मराठयांच्या इतिहासातील प्रशासकीय योगदान

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन केलं. पेशव्यांनी आणि त्यांच्या मराठा सरदारांनी माळव्यात मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोवली. प्रमुख मराठा सरदारांमध्ये होळकर, शिंदे आणि पवार यांची गणना केली जाते. पेशवा बाजीरावाने या तीनही सरदारांवर माळव्याची जबाबदारी सोपवली इंदूरात होळकर, उज्जैन मध्ये शिंदे व धार व देवास मध्ये पवारांनी आपापल्या घराण्याची स्थापना करुन मध्य भारतात आपला प्रभाव निर्माण केला. आणि नंतर उत्तर भारतात मराठी सत्तेचा विस्तार झाला. भारताच्या इतिहासात १८ व्या शतकाचा मध्यकाळ म्हणजे राजकीय अस्थिरता आणि प्रशासकीय अव्यवस्था यांचा काळ होता. असे ब्रिटिश इतिहासकारांचे अनुमान आहे. प्रशासनात अस्थिरता ही त्या काळातील सामान्य बाब होती. प्रबळ मोगल साम्राज्याचे विघटन व त्याबरोबर त्या क्षेत्रात अन्य सत्तांचा स्थिर होऊ घातलेला प्रभाव हे त्यामागे मुख्य कारण होते. उत्तर भारतात मराठ्यांच्या सत्तेची स्थापना १८ व्या शतकाच्या चौथ्या व पाचव्या दशकात झाली तेथील मराठी सत्ताधिशांनी  प्रस्थापित राज्यव्यवस्थेत विशेष बदल केला नव्हता. मल्हारराव होळकरांच्या काळात त्यांच्या राज्याची असलेली प्रशासन व्यवस्था थोड्या बहुत फरकाने अहिल्याबाईंच्या काळातही सुरु होती. मल्हाररावांच्या मृत्युनंतर अहिल्याबाई होळकर यांच्या हातात होळकरशाहीचे प्रशासन आले. अहिल्याबाई ह्यांनी आपली प्रशासन व्यवस्था चोखपणे ठेवली. व त्यामुळे त्यांनी तीस वर्षाहून आधिकाधिक काळ अत्यंत सफलतापूर्वक शासन केले.

### ५.१ अहिल्याबाई कालीन प्रशासन व्यवस्था :

अहिल्याबाईंनी आपल्या राज्याचा राज्यकारभार पाहताना तो अधिक सोयीचा व्हावा म्हणून त्यांनी त्यांचे तीन विभाग केले होते. ते पुढीलप्रमाणे-

''१) सातपुड्याच्या दक्षिणेकडील प्रदेश, स्वदेश व खानदेश २) सातपुड्याच्या उत्तरेकडील प्रदेश-महेश्वर लगतचा प्रदेश ३) महेश्वराच्या उत्तरेकडील प्रदेश-यात इंदुर, तराना व राजपुतान्यातील काही प्रदेश होता.''[१] या भागातच होळकरांस खंडणी देणारे लोक राहत.''[२]

ही व्यवस्था मल्हाररावाच्या वेळची असून तीच व्यवस्था पुढे अहिल्याबाईंच्या काळात जशीच्या तशी चालू ठेवण्यात आली. ज्याअर्थी अहिल्याबाई होळकर यांनी ही प्रशासकीय व्यवस्था जशीच्या तशी चालू ठेवली त्याअर्थी व ही प्रशासन व्यवस्था सुव्यवस्थीत असावी आणि त्यांनी पाडलेले हे तीन भाग प्रशासनाच्या दृष्टीने सोयीस्कर असावेत ह्याच प्रशासन व्यवस्थेचे मल्हाररावांच्या मृत्युनंतर दोन भागात अधिकार विभागणी करण्यात आली.

### ५.१.१ तुकोजी होळकर व अहिल्याबाई यांच्यातील प्रशासकीय दृष्ट्या विभागणी :

ज्याप्रमाणे प्रशासन व्यवस्थेचे तीन भाग केले गेले होते त्याचप्रमाणे प्रशासकीयदृष्टया देखील अधिकारांची विभागणी झाली होती. तुकोजी होळकर आणि अहिल्याबाई होळकर यांच्याकडे प्रशासकीय अधिकार होते.

''तुकोजी होळकर हा जेंव्हा दक्षिणेकडील भागाचे काम पाहत असे, तेंव्हा अहिल्याबाई मध्यल्या भागाचे काम व उत्तरेकडील भागाचे काम पाही. यावेळी खंडणी देणारे लोक आपली खंडणी तिच्याकडे पाठवित. पण तुकोजी होळकर हा जेंव्हा उत्तरेकडील भागात असे तेंव्हा बुंदेलखंडातील वसुल राजपुतान्यातील खंडण्या वगैरे काम जे तो दक्षिणेत असताना अहिल्याबाई पाही. ते तो पाही. यावेळी अहिल्याबाई मध्यभागाचे व दक्षिणेचे असे दोन्ही ठिकाणचे काम पाही.''[३] म्हणजेच तुकोजी दक्षिणेत असला की, अहिल्याबाई उत्तरेचे काम पाही व तो उत्तरेत असला की अहिल्याबाई दक्षिणेचे काम पाही पण माळव्यातले म्हणजे मध्य भागाचे काम पाहण्याचा प्रसंग तुकोजीवर कधीही आला नाही.

'' मध्यभागावर अहिल्याबाईंचे कायम नियंत्रण असले तरी माळव्यातील तीन महाल नेमाडमधील एक महाल असे चार महालाखेरीज संपूर्ण माळव्यातील होळकरांचा प्रदेश तुकोजीच्याच नियंत्रणाखाली राहत असे. याशिवाय देशीचे व खानदेशाचे २५ लक्ष उत्पादनाचे महाल तुकोजीकडे होते. हिंदुस्थानातील प्रदेशाचा कारभारही तुकोजीकडेच होता. तुकोजी उत्तरेच्या स्वारीत असतानाही अहिल्याबाईंनी देशींच्या महालाची व्यवस्था पाहिली. परंतु कारभारात हस्तक्षेप मात्र केला नाही. परंतु निकड भासली म्हणजे देशीच्या कमाविसदारांना बोलावून हिशोब केलेत आणि ते हिशोब तुकोजीकडे रवाना केलेत.''[४]

अशा प्रकारे अहिल्याबाई आणि तुकोजी होळकर यांच्यात अधिकाराची विभागणी झालेली होती. पण संस्थानचा खजिना अहिल्याबाईंनी आपल्याकडेच ठेवला होता. ही संस्थानची तिजोरी बरीच मोठी असून अहिल्याबाईंनी त्याचा उपयोग आपल्या प्रजेच्या व हिंदुस्थानच्या एकंदर हितार्थ केला. याशिवाय त्यांच्याकडे बरीच मोठी खासगी होती. त्याचाही बंदोबस्त त्या ठेवीत होत्या. या खासगीचा खर्च व तिजोरीचा खर्च त्या आपल्या इच्छेप्रपमाणे करीत. बाकी राहिलेला जो राज्याचा भाग म्हणजे दौलत त्याचे उत्पन्न एकंदर राज्याचा खर्च भागविण्यात जाई.

## ५.२ अहिल्याबाईंच्या जहागिरीची स्थिती, सीमा आणि आर्थिक स्थिती (खाजगी व दौलत) :

प्रशासकीय दृष्ट्या अहिल्याबाई होळकर आणि तुकोजी होळकर यांच्यात अधिकाराची विभागणी झालेली होती पण अहिल्याबाईंच्या प्रशासकीय व्यवस्थेचे उपयुक्त मूल्यांकन तेंव्हा होऊ शकते जेंव्हा त्यांच्या जहागिरीची स्थिती, सीमा व आर्थिक म्हणजेच खाजगी व दौलत ह्यांचे स्वरुप जाणून घेऊ ते स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

“त्यांचे राज्य उत्तरेमध्ये रामपुरा, भानपुरा परगण्यापर्यंत दक्षिणेत चांदवड पर्यंत पसलेले होते. विभिन्न भूखंडात हे राज्य वसल्यामुळे त्यामध्ये भौगोलिक एकतेचा अभाव होता. काही परगणे मालवा भागात होते तर काही राजपूतांना व निमाड क्षेत्रात तर काही दख्खनच्या पठारापर्यंत पसलेले होते. ज्यांची कोणतीही भौगोलिक सीमा नव्हती.”[५] सर्व मिळून अहिल्याबाईचे राज्य १२६ परगण्यांमध्ये पसरलेले होते. या राज्याच्या उत्तरेस उदयपूर आणि कोटा राज्याच्या सीमा लागून होत्या. उत्तर पूर्वेत झालावाड, पूर्व दिशेत ग्वालियर देवास, धार, भोपाल आणि दक्षिणेत ग्वालियर, धार बडवानी, निमाड व पेशव्याचे राज्य तसेच बडवाणी आणि डुंगरपूर ची सीमा होती. तसेच सुभेदार मल्हाररावांच्या काळात वार्षिक उत्पन्न ७५ लाख होते तर अहिल्याबाईंच्या काळात ११ / ४ करोड वार्षिक पर्यंत पोहोचले होते.”[६]

अशा प्रकारे होळकरांच्या प्रशासनातील काही परगणे माळवा, राजपुताना व नेमाड क्षेत्रात तर उरलेले दक्षिणच्या पठारात होते. म्हणजेच होळकरांच्या राज्याला निश्चित अशी प्राकृतिक सीमा नव्हती तरी सुध्दा अहिल्याबाईनी २८ वर्षे आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था कायम राखली.

त्यामुळेच राज्याचे उत्पन्न हे ७५ लाखावरुन सव्वा करोड पर्यंत वाढले. यातूनच अहिल्याबाईंचा प्रशासकीय कौशल्य दिसून येते.

राज्यकारभाराच्या दृष्टीने होळकरांच्या जहागिरीचे प्रामुख्याने दोन भाग होते १. खाजगी २.दौलत

### ५.२.१ खासगी :

इ.स. १७३३ मध्ये मल्हारराव होळकरांनी पेशवा बाजीरावाकडून आपली पत्नी गौतमाबाईच्या नावाने खासगी जहागिर मागून घेतली ''त्यावेळी त्या जहागीरीचे उत्पन्न ३लक्ष रुपये होते पुढे त्यात भर पडत जाऊन अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत १५ लाख रुपये खासगी जहागीरीचे उत्पन्न झाले होते. सुभेदार मल्हाररावांच्या मृत्युसमयी १६ कोटीची शिल्लक मल्हारावांच्या खजिन्यात होती.''[७] या १६ कोटी रुपये शिल्लक असलेल्या रकमेवर आणि १५ लाख उत्पन्नाच्या खासगी जहागिरीच्या उत्पन्नावर अहिल्याबाईंची संपूर्ण मालकी होती.[८] मल्हाररावांच्या मालकीची जी खासगी गावे होती त्यांचे उत्पन्न सरकारात जमा न होता खासगीकडे जमा होत असे.[९]

खासगीची प्रशासकीय यंत्रणा वेगळी होती. ''खाजगी व्यवस्थेच्या अंतर्गत होळकर राज्यात दिवाण, फडणीस क्रमशः कोष आणि जमा-खर्चाचा पूर्ण हिशोब वेगळा ठेवत होते.''[१०] या विभागाशी संबंधित सील सिक्के, दिवाणी आणि मुलकी व्यवस्था तसेच न्याय सर्व वेगवेगळया प्रकाराने व्यवस्थित होते[११] अनेक वेळा खाजगी संपत्तीतून पैश्यांच्या व्यवस्थेसाठी पैसा दिला जात होता.''[१२] ही व्यवस्था विपरीत परिस्थितीमध्ये केली जात होती.

प्रत्येक परगण्यातून होळकरांना दरमणी दोन शेर या हिशोबाने नजराण्याचे उत्पन्न मिळत असे इ.स. १७८० साली पुढील प्रमाणे शेरी नजराण्याचे उत्पन्न मिळाले होते.

| | |
|---|---|
| २४,१४५-९-० | प्रांत स्वदेशपैकी |
| ०७,८८६-१-० | प्रांत नेमाडपैकी |
| ५७,२९७-०-० | प्रांत माळवापैकी |
| ८९,३०९-४-० | शेरी नजराणा |

शेरी नजराण्याऐवजी गावे

| | |
|---|---|
| १६१५० | प्रांत हिंदूस्थान |
| ११९६६ | प्रांत दक्षिण थाळनेर येथील मौजे भामरे |

उखलवाडी

| | |
|---|---|
| २७३१६ | प्रांतवार गाव गणना |
| २६,३०० | प्रांत दक्षिण (२ परगणे व काही खेडी) |
| ८७,५०० | प्रांत हिंदुस्थान (इंदुर, सावेर, कासारी इत्यादी परगण्याचा समावेश |
| रुपये ११,३८०० | चोळीसाठी |
| २३०४२५ | बेरीज एकंदर जमेबद्दल |

खासगी उत्पन्नाचे विवरण

| | |
|---|---|
| ८९,३०९ | शेरी नजराणा |
| १,१३,८०० | चोळीसाठी |
| २७,३१६ | प्रांतवार गावगन्ना |
| २,३०,४२५ | शिवाय भेटी व नजराणे, भेटीची पातळे व |

बागांपैकी उत्पन्न [१३]

**५.२.१.१ खंडणी व कर :**

| | |
|---|---|
| २४,१४५ | प्रांत स्वदेश (१३ परगण्यांचा समावेश) |
| ७,८६६ | प्रांत नेमाड (११ परगण्यांचा समावेश) |
| ५७,२९७ | प्रांत माळवा (२९ परगण्यांचा समावेश) |
| २६,१५० | प्रांत हिंदुस्थान |
| १,१६६ | दक्षिणेतील परगणा |
| १,१६,६२४ | |

खंडणी व कराद्वारे मिळणारे हे उत्पन्न देखील खाजगीत जमा होत असे.[१४]

अशा रितीने प्रांत स्वदेश, प्रांत माळवा, प्रांत नेमाड, प्रांत हिदुस्थान, प्रांत दक्षिण येथून येणारे शेरी नजराण्याचे उत्पन्न आणि खाजगी जहागिरीतील महत्त्वाचे उत्पन्न खाजगीकडे जमा होत असे.

### ५.२.२ दौलत :

सुभेदार मल्हाररावांच्या मृत्युसमयी त्यांच्या दौलतीचा सरंजाम ९५ लक्षाचा होता.[१५] अठराव्या शतकाच्या सुरुवातीला होळकरांच्या वर्चस्वाखालील माळव्याचे वार्षिक उत्पन्न सुमारे १कोटी रुपये होते.[१६] अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत उत्पन्न १कोटी पाच लाखाच्या आसपास झाले.[१७] माळव्याचा निम्म्यापेक्षा जास्त प्रदेश होळकरांच्या ताब्यात होता.[१८] प्रशासकीय व्यवस्थेसाठी या प्रदेशाचे विभाग पाडण्यात आले होते. **दक्षिण विभाग** १)मौजा वाफगाँव और ८ अन्य गाँव २) तालुका देपूर (संगमनेर), प्रांत गंगथाडी३.) तालुका कोरुल ४) परगणा चांदोड (चॉदवड) ५) परगणा शिवगाँव, प्रान्त गंगथाडी ६)परगणा आम्बड[१९] ७ )परगणा वेरुल ८) परगणा शितूर (ढाडल गॉव) ९) परगणा अडगाँव (नाशिक) १०) मौजा वाडजिरी ११) परणाना पड १२) परगणा पिसौर १३) परगणा उडवडी , १४) परगणा कानपूर १५) परगणा नागर १६) परगणा जामगाँव व १७) परगणा काशी बडगॉव (पांच महाल)[२०] **जिला खानदेश** : १८) परगणा गलना १९) परगणा वडील २०) परगणा नन्दूरबार २१) परगणा सुलतानपूर २२) परगणा भालनेनर (इसमे २ इनामगाँव थे) २३) परगणा उटून २४) परगणा आडवड २५) परगणा कष्टी चन्दनपूर २६) परगणा रावेर २७) मौजा निहालोड (इसमे ५ गॉव थे)[२१] २८) मौजा आम्बा (दो गाव) २९) मौजा कानवर्णी[२२] **जिला निमाड :** ३०)-४८ इस जिले में १९ परगणे थे[२३] ४९ सेंधवा ५० नागलवाडी ५१ ब्राम्हणगाँव **मध्यविभाग :** ५२तालुका महेश्वर, चोली कढाई ५३ निमावर, इसमे पॉच महाले थे[२५] ५४ परगणा देपालपूर ५५ किला कुशलगड ५६ परगणा सुन्दरसी[२६] **उत्तरी विभाग :** ५६-६६ परगणा रामपूरा, परगणा गरोठ, परगणा, भानपूरा, परगणा चन्दवासा, परगणा पार्दा परगणा, मनासा, परगणा, ऑत्री परगणा कुकडेश्वर, परगणा खडावडा, परगणा आमड ६७ परगणा नारायणगढ, ६८ परगणा आमलमपर ,६९ औरंगाबाद ७० काटकूट ७१ इंदौर, ७२ साँवेर, ७३ बेटमा[२७] ७४ परगणा हासलपूर ७५ परगणा तराणा ७६ परगणा कायथा ७७ परगणा महिदपूर ७८ जारीपूर ७९ माचलपूर ८० परगणा खेराबाद बाकनी ८१ परगणा लावनी ८२ परगणा पिपलोद तलट्टी ८३ हिंडोल ८४ परगना कोठडा-चिखलदा[२८] **राजपूतों तथा अन्य लोगों के पास :**

८५ परगणना देवली (परतापगड) ८६ परगणा झाबुआ ८७ परगणा डुंगरपूर बासवाडा ८८ परगणा जावरा ८९ परगणा बर्दावड ९० परगणा पिपलोदा ९१ परगणा मल्हारगड ९२ परगणा संजीत ९३ परगणा ताल मांडवाल ९४ परगणा पिडावा ९५ परगणा सिराज [२९] परगणा निम्बाहेडा ९७ परगणा निम्बाहेडा ९८ परगणा गूगल चाबडा ९८ परगणा टोंक ९९ परगणा कोटा १०० संस्थान जयपूर १०१ बुॅंदी और लखेरी १०२ परगना इन्द्रगढ १०३ रामपूरा खुर्द १०४ संस्थान उदयपूर (चितोड) १०५ संस्थान शिवपूर १०६ संस्थान नरसिंहगढ १०७ परगणा और १०८ परगणा पचपहाड १०९ परगणा डग११० परगणा गंगराड १११ परगणा कोठडी ११२ परगणा सुनेल ११३ परगणा रायपूर ११४ परगणा सांधरा ११५ परगणा किशोरी पट्टन ११६ कुॅंच (बुन्देलखंड) ११७ परगणा प्रान्त हिंदुस्थान ११८-१२६ अंतर्वेद यामध्ये नऊ परगणे होते.[३१]

अशा प्रकारे दक्षिण विभाग, खानदेश, नेमाड जिल्हा, मध्यप्रदेश, उत्तर विभाग, रजपुत, आणि अन्य लोकांकडून असे एकूण १२६ ठिकाणाहून लक्षावरी वसूल होत असे अनेक कोटीच्या घरात वसूल जात असे अर्थात वसूलीसाठी अहिल्याबाईंनी चोख व्यवस्था केलेली होती. तरीही वसूलीसाठी सतत पत्रे पाठवून मानपाठ एक करावी लागे. कोटाचे राजे जालिमसिंह झाला यांच्याकडील पैशांसाठी आहिल्याबाईंनी लिहिलेली पत्रे हया पत्रातून अहिल्याबाईच्या वसूलीचे कडक धोरण दिसून येते ती पत्रे पुढीलप्रमाणे

१) संवत १८५२ वैशाख शुध्द ६

(२४ अप्रैल १७९५)

श्री म्हालसाकांत

राजश्री राज जालमसिंग झाले गोसावी यॉंसि अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्ने। अहिल्याबाई होलकर विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिये लिहित जाणे विशेष. संस्थान कोटे येथील सरकारचे मामलतीचा यैवज येणे त्याचे जाबसालाविषई तुमचे तर्फेने राजश्री बापूजी आनंदराव बोलले त्याची उत्तरे मशार निलेसी बोलून रवानगी केली असता आद्याप जाबसाल निर्गमात येत नाही. यास्तव हल्ली हे पत्र लेखन केले असे तरी तुम्ही दिवसगत न लाविता मामलतीचे यैवजाचा निर्गम सत्वर करुन देणे. लांबणीवर टाकिल्यावर तुम्हासच भारी पडेल. याच पुरता विचार करुन लांबणीवर न टाकिता जल्द निकाल होय ते करणे ये विषयी सविस्तरे मारनिलेस लिहिले आहे. त्या अन्वये बोलतील. २।। छ ४ सवाल सुमाखमस तिसेन मया १ अलाफ बहुत काय लिहिणे हे विनंती

श्री
मोर्तब
सुद

२) मो.छ.२० माहे सवाल सन
मजकूर वैशाख वद्य ७ संवत
१८५१ (१०मे १७९५[३२]

श्री

राजश्री राज जालमसिंग संस्थान कोटे गो ।। यांसि अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो ।। अहिल्याबाई होळकर विंनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष संस्थात मार कडून पहिल्या हप्तीयाचा ऐवज येणे त्याची निशा राजश्री शंकराजी मुरार यांनी करुन दिल्ही. याउपरी दुसरे हप्तीयाचा ऐवज येणे याजकरीता पंत मशार निलेस येथून पाठविले. त्याजला जाऊन च्यार पाँच महिने होत आले. अद्याप ऐवजाची तोड पडत नाही. तर हे गोष्ट उपयोगी नसे त्यावरुन हली हे पत्र सादर केले असे. तर पत्र दर्शनी दुसरे हप्तीयाचा यैवज झडियानशी मारनिलेकडे पावता करणे जर तुम्ही हताचे पायावर घातलीयाने फौजा त्याप्रांती आलीयावर तुम्हास जड पडेल. आसे समजोन संस्थानचा यैवज झाडियानशी मारनिलेकडे देऊन सत्वर रवाना करुन हुजूर येऊ पोहोनचे ते करणे २।। छ.२६ (?) बहुत काय लिहिणे हे विनंती.

श्री.
मोर्तब
सूद[३३]

या पत्रावरुन स्पष्ट होते की शेवट पर्यंत अहिल्याबाई राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी जागृत होत्या. वेळच्यावेळी अहिल्याबाई या कर, खंडणी, चौथाई, सरदेशमुखी वसूल करुन सरकारी तिजोरी मजबुत ठेवित हेही दिसून येते हा त्यांचा राज्यकारभाराविषयी गुण होता. राज्य कारभारातील प्रत्येक गोष्टीकडे अहिल्याबाईंचे लक्ष होते हे निदर्शनास येते.

अहिल्याबाईंची प्रशासन व्यवस्था कार्यक्षम असून राज्याला किंवा व्यक्तिला एखाद्या घटनेबाबत ती स्पष्ट निर्देश देत असे. एकाकी कोणताही निर्णय ही प्रशासन व्यवस्था घेत नव्हती. हे दिसून येते.

अहिल्याबाईंच्या दृढ निश्चियी स्वभाव व कार्यक्षम प्रशासन व्यवस्था यामुळेच खासगी व दौलत हे राज्यकारभाराचे भाग मजबुत झाले होते. आणि त्यांच्या बळावर शासकीय व प्रजाहिताच्या विविध कल्याणकारी योजना राबविल्या गेल्या.

**५.३ प्रांतीय व्यवस्था :**

आजच्या काळात जशी राज्याची विभागणी आहे. जसे राज्य, जिल्हा, तालुका व गाव त्याचप्रमाणे अहिल्याबाई होळकरांच्या काळात देखील प्रशासन व्यवस्था सुरळीत चालावी म्हणून सरकार, परगणा किंवा महाल आणि खेडी अशी विभागणी केलेली होती.

राज्याच्या मोठ्या विभागांना सरकार म्हणत, प्रत्येक सरकारात १० ते ४० जिल्हे असत. त्यास परगणा अथवा महाल म्हणत. प्रत्येक परगण्यात ५० ते ३०० खेडी होती.[३४] परगण्याचे तालुक्यात विभाजन केलेले असे. प्रत्येक तालुका ६ ते ३० खेडी मिळून बनलेला असे.[३५]

होळकरशाहीत दिवाण हा सर्वोच्च अधिकारी होता. त्याला पगारापोटी जहागिर दिली होती. त्याशिवाय पालखी हत्ती नोकर यांचा खर्चही सरकारातून दिला जात असे. परगण्यातून ठराविक हिस्सा दिवाणाला मिळत असे. कधी कधी शिबंदीच्या पगारातून रुपयामागे एक आणा दिवाणाला मिळत असे.[३६]

परगण्याच्या मुख्याधिकाऱ्याला कमाविसदार (मामलेदार) म्हणत. परगण्यातील सर्व जमाखर्चाचे अंदाजपत्रक वर्षाच्या सुरुवातीला फडणीसांकडून कमाविसदारास दिले जात असे. मंजुर केलेला खर्च वजा जाता. बाकी पैसा सरकारी खजिन्यात त्यांना जमा करावा लागत असे.[३७] परगण्यातील महसूल वसुली करीता कमाविसदाराला त्या परगण्यातील मंडलोई (जमीनदार) मदत करीत असत.

परगण्यातील जमीनीची मोजणी, महसूल इत्यादी बाबतची माहिती परगण्याच्या कानुनगो कडील दप्तरात असे. ते दप्तर मंडलोईच्या ताब्यात असले तरी, दप्तर सांभाळण्याची जबाबदारी कानुनगो या अधिकाऱ्याची असे. कानुनगो नावाचा आनुवांशिक दप्तरदार अधिकारी नेमलेला असे.[३९]

परगण्यातील जमिनीची मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यास 'मिर्धा' म्हणत. जमिनीची मोजणी करण्याची पध्दती मुसलमानांनी सुरु केली असल्याने 'मिर्धापद' बहुधा मुसलमानांकडे असे.[४०] शेतकऱ्यात जमीनीसंबंधी होणाऱ्या तंट्याबाबत त्यांचा निर्णय मान्य केला जात असे.[४१] पाटील हा प्रत्येक गावाचा प्रमुख असून बहुतांशी हे पद आनुवांशीक असे. त्यांना १० ते २०० बिघे जमीन महसूलमुक्त बक्षीस दिलेली असे. खेड्याच्या आकारमाना प्रमाणे गावातून दंड व कर पाटील वसुल करीत असे.[४२] गावातील महसूल दप्तर सांभाळण्याचे काम पटवारी (तलाठी) करी. पटवारी हा सरकारी नोकर असे.[४३] याशिवाय बलाई (ढेर) चौकीदार, व्याधी, (पारधी), परसोयी, सुतार, न्हावी, धोबी, इत्यादी नोकर व बलुतेदार असून त्यांना जमीनीच्या उत्पन्नातून हिस्सा मिळत असे.[४४]

होळकरशाहीत अशा प्रकारे प्रांतीय व्यवस्था होती. अहिल्याबाईंनी प्रत्येक गावी सक्षम कार्यतत्पर अधिकारी नेमलेले होते.

## ५.४ अहिल्याबाईंचे सरंजामदार व इतर अधिकारी , जमीनदार, टाकेदार, वर्गासंबंधीचे धोरण :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळी सरंजामी पध्दत नव्हती. पुढे श्री छत्रपती राजाराम महाराजांच्या काळी औरंगजेबाच्या धामधुमीत,कठिण आणि अस्थिर परिस्थितीत सरंजाममध्दती अस्तित्वात आली. आणि ती त्यावेळी यशस्वीही ठरली. पहिले बाजीराव पेशवे यांनी उत्तर हिंदुस्थानचे जे धोरण अंगीकारले आणि तडीस नेले त्यावेळी ही सरंजामी पध्दत तर कायमची स्थिरावली.

सुभेदार मल्हाररावांनी माळव्याची स्थिर स्थावरता झाल्यावर या पध्दतीचा अंगिकार करुन आपल्याबरोबर दक्षिणेतून आलेल्या शूर पुरुषांस सरंजाम देऊन स्थिरस्थावर केले. ''अहिल्याबाईंनी मल्हाररावांच्या पश्चात तीच व्यवस्था सुरु ठेवली जहागीरदारांना सदैव पूर्ण पाठिंबा देऊन त्यांना महत्त्व प्राप्त करुन दिले होते. जहागीरदारी प्रथा ही अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वपूर्ण अंग होते. आपआपल्या प्रदेशात जहागिरदारांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते. या जहागिरदारांना वेळप्रसंगी आपली फौज सरकारच्या मदतीला पाठवावी लागे.[४५]

प्रत्येक सरंजामी सरदारांचा गोट असे. त्या गोटांत सरदारसान्निध्य असलेले शास्त्री, पंडित, पुराणिक, वैद्य व ज्योतिषी यांचाही योगक्षेम चाले. पागे, पथके, हिशेबी कारकून यांचाही समावेश त्यात असे. नालबंदी करणारे, चांभार, धोबी, तंबू ठोकणारे व शिवणारे या सर्वांचा समावेश व

निर्वाह या गोटांत होई.[४६] त्या प्रमाणे अहिल्याबाई त्यांचा बोज राखीत व वेळप्रसंगी कानउघडणी करीत असत. ह्यांची दोन उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

सुभेदार तुकोजीरावांनी स्वारींतुन खर्चाच्या पट्टीचा कागद अहिल्याबाईंकडे पाठविला तो कागद नामंजुर झाला. काही काळाने तुकोजीरावांनी विनंती केली की सरंजामी सरदारांवर यादी बसवून रक्कम जमा करुन पुण्यास पाठवावी. त्यावर अहिल्याबाईनी उत्तर पुढीलप्रमाणे पाठविले.''सरंजामी सरदारांस त्यांचा त्यांचा खर्च आहे त्यांच्या गोटांतील हजेरीप्रमाणे त्यांस नेमणूक आहे ते स्वत: जातीनिशी तळावर सेवेत हजर असता त्यांच्यावर यादी करावी हा न्याय कोठचा?[४७] याप्रमाणे सरदारांची योग्य वेळी बाजू धरली. पण अन्यायाची समयी त्यांची बाजू न धरता रयतेची बाजू धरुन सरदारांस त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

महत्पूरचे सरंजामी सरदार रयतेपासून अन्यायाने वसूल करु लागले. रयतेने आहिल्याबाईंकडे धाव घेतली सरदारांस व रयतेच्या पुढाऱ्यांस आपणा समक्ष बोलावून दोघांचेही म्हणणे समारोसमोर ऐकून घेतले. रयतेस सरदारांकडून न्याय देवविला आणि सरदारांसही आपले प्रशासनातील कौशल्य दाखविले.[४८]

सरंजामी सरदार मोठया मानाचे; त्यांस 'राजे' ही पदवी होती; तरी पण रयतेच्या संबंधांचे वागणूकीत न्यून पडताच त्यांची बाजू न  धरता रयतेची बाजू घेतली. कारवाईचा दीर्घसूत्रीपणा न अंगिकारिता दोन्ही पक्षास समोरा समोर आणल्यामुळे सत्य बाहेर पडण्यास विलंब लागला नाही. वादांचे बी मूळातच उखडून टाकले इतर सरंजामी सरदारांस धडा पोहचला आणि आपोआप सरंजामी सरदरांवर नियंत्रण प्रस्थापित झाले आणि त्यांच्यात आदरयुक्त भीती निर्माण झाली त्यामुळे प्रशासनात एकप्रकारचा सुसुत्रीपणा निर्माण झाला. मुद्दाम चुका करण्याची किंवा कामचुकारपणाची कोणाचीही हिंमत झाली नाही. एवढी दहशत सरंजामदार सरदारांमध्ये निर्माण झाली त्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

(ता.२९ मार्च सन १७८९) श्रीमंत महाराज मातुश्रीबाई साहेबांचे सेवेशी आज्ञाधारक चिमाजी बुळे दंडवत विनंती विज्ञापना ऐसीजे सरदारी कर्जदार जाहली याजमुळे स्वारीसमागमे चाकरीस जाणेचा योग घडला नाही. सांप्रत महाराजांस विनंती करुन करार केला असे पुढे स्वारीस दोनशे स्वार सरनौबत यांजबरोबर पाठवितो. त्याची सिध्दता आजपासून करुन अखेर जेष्ठमासी

सरंजाम लष्करात दाखल करितो व मागाहून आम्ही विजयादशमी करुन जाऊ गेलो तरी महाराजांचे विचारांस येईल ते करावे मिती चैत्र शु. ३ शके १७११ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.[४९]

यातून हे स्पष्ट होते की,बुळे सरदार एवढ्या मोठ्या मानाचे व आप्त पण कामात हलगर्जीपणा होताच आपण होऊनच अहिल्याबाईंना विनंती करतात काम पुन्हा सुरळीत होईल अशी ग्वाही देतात म्हणजेच अहिल्याबाईंचा अधिकाऱ्यांवरील वचक लक्षात येतो.

सरंजामी सरदारांविषयी संबंध अशा प्रकारचा होता त्याचबरोबर अधिकारी वर्गासबंधी वागणूक दूरदृष्टीची, प्रेमाची आणि माणसे सांभाळून धरण्याची असल्यामुळे लायक माणसांचा पदरी संग्रहच होत गेला. यासबंधी खालील उदाहरणे महत्त्वपूर्ण आहेत.

सन १७७६ राजकीर्द श्रावणास मुक्काम महेश्वर शके १६९८ दुर्मुखनाम संवत्सरे. श्रावण शुध्द ५ ते दिवशी राजश्री गोविंद रघुनाथ, गोत्र काश्यम, सूत्र हिण्यकेशी, शाखा तैतीर्य, उपनाम गानू, पाटील मौजे कलबस्ते तालुके संगमेश्वर प्रांत राजापूर यांनी कसबे महेश्वर प्रांत नेमाड येथील मुक्कामी विंनंती केली की आम्ही कुटुंबवत्सल पुरातन या राज्यातील सेवक सरकारची सेवा बहुत दिवस केली. यास्तव कृपाळू होऊन एक गांव आम्हांस खर्चाचे बेगमीस इनाम करुन दिल्हा पाहिजे. म्हणोन त्याजवरोन मनास आणिता मशारनिल्हे पुरातन सेवक सेवा एकनिष्ठपणे फार दिवस केली. याचे चालविणे आवश्यक जाणोन मौजे बागरदा परगणे सावेर हा गाव खेरीज हक्कदार व इनामदार करुन बाकी अंमल दरोबस्त थल, मोड व थल भरीत, कुलबाब सुध्दा पंत मशारनिल्हे यांस संसाराचे बेगमीस साल मजुकरांपासोन इनाम करार करुन देऊन ही सनद सादर केली असे. तरी मौजे मजकुर खेरीज हक्कदार इनामदार करुन बाकी अंमल दरोबस्त थालमोड थलभरी, कुलबाबसुध्दा मशारनिल्हेस दुमाला करुन देऊन चालविणे. प्रतिवर्षी नवीन पत्रांचा आक्षेप न करिता या पत्राची प्रती लिहून घेऊन हे अस्सल पत्र पंत मशारनिल्हेस भोगवटियास परतोन माघारे देणे म्हणोन सनद.[५०]

थोडक्यात रा.रा. गानू यांस त्यांचे मागण्यावरुन जहांगिर दिली म्हणोन उल्लेख आहे हे गानू खासगीवाले या उपनावाने प्रसिध्द आहेत. अहिल्याबाईंच्या खासगीकडील कारभार हे पाहत म्हणून खासगीवाले हे नाव पुढे झाले. अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत जी धर्मदाय कृत्ये झाली ती बहुतेक या गोविंद रघुनाथ गानू यांचे देखरेखीलखाली झाली. तेंव्हापासून हे यांचे वंशज ''खासगी दिवाण'' या नावाने संबोधले जातात.

ता. २.०६.१७९२ श्री मार्तंडभैरव प्रसंन्न

गंगाजल निर्मळ मातुश्री बाईसाहेब स्वामी गोसावी यांस

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्नेहांकित निळकंठराव तुकदेव चिटणीस कृतानेक साष्टांग दंडवत विनंती उपरी. येथील वर्तमान माघ शुध्द १० पावेतो किल्ले निफाड येथे आपले कृपावलोकने करुन सुखरुप आहो विशेष. आम्ही श्रीमंत सुभेदार व खंडेरावबाबा मालरावबाबा कैलासवासी झाल्यावर इंदुरीहून घरी बसलो. आपणापाशीही न आलो.मातोश्रीचा वृध्दापकाळ यामुळे राहिले. तो आमचे स्त्रीस देवआज्ञा झाली. मुले लहान हे ईश्वरे वाईट केले असो.श्रीमंत तुकोजीरावही नेत होते ते न गेलो. दरख चिटणिशीचा चालू करावयास दहा हजार नजर दयावे लागत होते. आमचे जाणे न झाले आता चि.रा. मैराळराव बापू आपल्याजवळ आहेत फार उत्तम आहे. आम्हांपासून रुसून गुजराथेत जात होते तो उंबराण्याचे तळावर चि.रा. मल्हाररावबाबांची भेट झाली. आमची पागा व पालखी सरंजाम घरीपोहचविला. चिरंजीवास पांच सात घोडी बसावयास याप्रमाणे सडे ठेविले. इकडे दाजीबा विंचुरी आले त्यांही आम्हांस व मातुश्रीस धरुन नेले. त्यांजला परभारी सरकारी पत्रे आली मग सोडले यांप्रमाणे श्रीने दोष श्रीमंत शाहुछत्रपती व कैलासवासी सुभेदार साहेबापासून न लागला तो दैवास आणिला ही लज्जा आपणांस असावी. पूर्वी श्रीमंत सुभेदार, रा. गंगाधरपंत तात्याही दरमहा रु.२२५ रोजमुरा व नालबंदी घरबेगमीस रुपये ४००० व पालखीस रुपये ६०० सरंजाम व सणगे दसऱ्यास व पाडव्यास आंख रु. १२०० दर पोषाखास सणगे साडेतीन प्रमाणे देऊन सव्वाचवदाशे लोकांनिशी चाकरी घेत होते. आता आपण वडील धनी आहा कळेल त्या रीतीने मुलास रीतीस लावून सन्निध ठेवणे याची लज्जा सर्व आपणांस असावी चिरंजीव ओटींत आहे. अपराध क्षमा करुन पावन करावे. बहुत काय लिहिणे लोभवृध्दी करीत असावी हे विनंती.[५१]

हे हुजुरचिटणीस घराण्यातील पत्र आहे. त्यामध्ये चिटणीस घराण्याशी घरोबा व ऋणानुबंध दृष्टीस तर पडतोच शिवाय राज्यकर्ता आणि अधिकारी वर्ग ह्यांच्यातील भावनात्मक संबंधही लक्षात येतो आणि त्याचबळावर अहिल्याबाईंनी राज्यकारभार यशस्वीरित्या करुन दाखविला.

अहिल्याबाईंची पदावर असलेल्या अधिकाऱ्याच्या कामकाजावर कशाप्रकारे नजर होती आणि त्यांच्याद्वारे जनतेवर अन्याय झाल्यास त्या कशाप्रकारे त्यांच्यावर रागवत आणि त्यांनी केलेल्या अन्यायाबद्दल जाब विचारीत हे खालील पत्रावरुन दिसून येते.

चांदवड येथील मामलेदाराने एका बोहऱ्याचा छळ चालवला होता. ही हकीकत अहिल्याबाईंना कळातच त्यांनी मामलेदारास ठणकावले की, " प्रजेची हरप्रकारे इज्जत केली पाहिजे. सन्मान केला पाहिजे तुमच्याबद्दल पुन्हा कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याचा परिणाम चांगला होणार नाही."[५२] त्याचप्रमाणे तुलाराम होळकर या मामलेदारास अहिल्याबाईंनी लिहिलेले पत्र आहे.

चिरंजीव तुलाराम होळकर यास अहिल्याबाईचा आशिर्वाद. तुम्ही शेगाव परगण्यात लोकांवर मनमानेल तसा जुलुम करुन त्यांच्याकडून पैसे वसूल केले आहेत. प्रजेच्या मामल्यासाठी महालाच्या अधिकाऱ्यांना तुम्ही तंग केलेत. ह्याचे काय कारण? तुम्हास कळविण्यात येते की आजपर्यंत तुम्ही मन मानेल त्याप्रमाणे रुपये वसूल केलेत. त्याचा खुलासा सरकारात पेश करावा या पुढे देण्याघेण्याच्या संबंधात स्वार पाठवून कोणत्याही प्रकारचा अन्याय केलात आणि त्याबद्दल तक्रार आली तर तुमचे हे कार्य अक्षम्य समजले जाईल.[५३]

. अशा प्रकारे अधिकाऱ्यांचे जाबजबाब घेत त्यांनी सदैव प्रजेच्या पाठीशी राहून राज्यकारभार केला. त्याचबरोबर नोकरवर्ग आणि त्यांची कुटुंबे यांच्या सुखसोयीकडे अहिल्याबाईंचे नेहमी लक्ष असे नोकरवर्गाचा पगार नेमाने महिन्याच्या महिन्याला चुकता झालाच पाहिजे असा त्यांचा हुकुम होता. सर्वात मुख्य गोष्ट ही की आपल्या नोकरवर्गाशी अहिल्याबाईंची वागणूक नेहमीच माणुसकीची व अतिशय स्नेहाची असे. एकदा त्यांना समजले की दूर कोठेतरी आपली चाकरी बजावीत असणाऱ्या एका नोकराची मुलगी आजारी आहे त्यांनी लगेच सांडणी स्वाराबरोबर त्यांच्याकडे औषधे पाठविली आणि त्याला लिहिले की, "मुलीची प्रकृती बरी व्हावी यासाठी आणखी ज्या कशाची गरज लागेल ते मला कळावे, ताबडतोब व्यवस्था करीन."[५४]

एकदा नागलवाडीच्या कमावीसदाराने त्यांना लिहिलेल्या पत्रात राज्याची हालहवाल लिहिल्यावर, अलीकडे आपणास पोटशूळ झाला असल्याने शेवटी लिहिले लगेच अहिल्याबाईंनी योग्य औषधोपचाराची व्यवस्था केली. अशा प्रकारे नोकरवर्ग किंवा सरदार यांच्याकडून त्यांना येणाऱ्या पत्रात राज्यकारभाराबाबतच्या गोष्टीबरोबरच आपल्या खासगी जीवनातील आणि कुटुंबातील अडीअडचणीचाही नि:संकोचपणे उल्लेख केला जाई. एकदा एका चाकराने लिहिले होते "माझी आई खूप आजारी आहे, घरात एकंदरीने फारच दुर्दशा झाली आहे."[५५] हे पत्र वाचून अहिल्याबाई स्वत: त्या चाकराच्या घरी गेल्या व त्याचे सांत्वन केले त्याला लागणाऱ्या सर्व सवलती ताबडतोब

देवविल्या. आपल्या प्रजाजनांपैकी आणि नोकरवर्गापैकी जे कोणी आजारी असतील त्यांच्या समााचाराला स्वत: जाण्याचा अहिल्याबाईचा नियम होता.[५६]

अशा आपुलकीच्या वागणुकीमुळे सर्व नोकरवर्गाची त्यांच्यावर असीम श्रध्दा जडली होती. आपल्यावर त्यांनी सोपविलेले काम चोखपणे बजावत व त्यासाठी आपली सारी शक्ती पणाला लावत असत. उत्तम कामगिरी बजावणाऱ्यांना अहिल्याबाईकडून वेळोवळी महावस्त्रे, आभूषणे व पारितोषिके दिली जात व त्यांचा गौरवही केला जाई म्हातारपण आलेल्या नोकर वर्गाची सर्व व्यवस्था त्या सरकारी खर्चाने करीत असत.[५७]

आपल्या सरदारांचे काम आणि जीवन याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. नियमाविरुध्द किंवा प्रजेचे अहित करणारी वागणूक कोणीही केलेली असो. त्या त्याची गय करीत नसत. त्या कधीही अधिकाऱ्यांच्या हातचे बाहूले बनल्या नाहीत. प्रजेचे हित  डोळयापूढे ठेवून आपल्या विवेकबुध्दीनेच त्यांनी राज्यकारभार केला.

अहिल्याबाईंनी सर्व अधिकाऱ्यांना शिस्तबध्द नियंत्रणात ठेविले होते. कोणत्याही प्रकारची आगाऊ सूचना न देता त्या अधिकाऱ्यांच्या कामाचे अत्यंत सूक्ष्मपणे निरीक्षण व तपासणी करीत असत.

एकदा महदपूरच्या जहागीरदाराने प्रजेकडून अन्यायाने करवसूली केली. त्यांचे अधिकारी कोबंड,तूप वगैरे वस्तु मागू लागले याची तक्रार येताच त्या स्वत: महदपूरला गेल्या. चावडीवर थांबून लोकांचे जबाब घेतले. खात्री करुन घेतली तेवढ्यात जहागिरदाराचे कानी अहिल्याबाई आल्याची वार्ता गेली ते फळफळावळाचे करंडे घेऊन आले. अहिल्याबाई कशालाही शिवल्या नाहीत. त्यांनी जहागिरदारास समज दिली आणि सांगितले की, ''या तक्रारींची आधी दखल घ्या. फराळ करण्यास तेंव्हाच येऊ आज पाणीसुध्दा पिणार नाही.''[५८]

या घटनेमुळे त्या जहागिरदाराची वागणूक कायमची सुधारली त्याने जास्तीचा कर जनतेस परत दिला. अहिल्याबाई अशा अचानक भेट देत त्यामुळे अधिकाऱ्यांवर त्यांचा दाब असे. धाक असे. दोषी अधिकाऱ्यांविषयी कारवाई करण्यास त्या कधीच कचरल्या नाहीत. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणे त्यांनी कोणालाही शक्यच ठेवले नव्हते. एका श्रेष्ठ शासकाच्या अंगी आवश्यक असलेले सर्व प्रशासन कौशल्य अहिल्याबाईंच्या ठायी होते. त्यामुळे अधिकारी वर्ग नेहमीच सावध राहून काम करीत असे. कामचुकारपणा करणारा, लाचखाऊ व प्रजेचा छळ करणारा अधिकारी

अहिल्याबाईंच्या हातून शिक्षा झाल्याविना सुटतच नसे. त्यांनी आपल्या सर्व अधिकाऱ्यांना, नोकरवर्गांना सक्त ताकीद देऊन ठेवली होती की, "ते व सर्व राज्य यंत्रणा प्रजेला सुखी व समृध्द बनविण्याकरिता आहे. प्रजेची पिळवणूक करुन तिला गांजण्यासाठी नव्हे."[५९]

अशा प्रकारे अहिल्याबाईसारखा एक आदर्श व श्रेष्ठ शासक आणि त्यांच्या हाताखाली योग्य व चारित्र्यसंपन्न अधिकारी वर्ग लाभल्यामुळे राज्य कारभाराची संपूर्ण यंत्रणा फारच उत्तम व प्रजाहितदक्ष बनली होती. या सुशासनामुळे प्रजा अत्यंत सुखी होती. नुसती प्रजाच नव्हे तर अहिल्याबाईंचा सर्व अधिकारी व अंमलदारवर्गही अतिशय सुखी व समाधानी होता.

सरंजामदार, चिटणीस, सबनीस, अधिकारी वर्ग हे प्रशासनातील महत्त्वाचे घटक होते त्याचप्रमाणे जमीनदार, टाकेदार हा घटक सुध्दा महत्त्वाचा होता या घटकाबरोबर सुध्दा अहिल्याबाईंचे संबंध आपुलकी व जिव्हाळ्याचे होते त्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

अप्पाजी जमीनदारंचा मृत्यु झाल्याचे ऐकून अहिल्याबाईंनी तुकोजी होळकरास पत्र लिहिले की, चि.रा. तुकोबास, अप्पाजीरावांच्या मृत्युचे वृत्त ऐकून चित्तास अत्यंत खेद झाला आहे. ते येथे आले होते तेंव्हा त्यांना दत्तक घेण्यास सांगितले होते. ते प्रथमपासून आमचे सेवक आहेत पुढे संस्थान चालले पाहिजे म्हणून तुम्हास लिहिले जात आहे की, त्यांच्या गोत्राचा लहान चांगला होतकरु बालक आणून दत्तकविधान करवून घ्यावे ठिकाण पूर्ववत चालत राहील असा प्रयत्न करावा (पारनेर दप्तर २१-६-१७७८)[६०]

अशा प्रकारे प्रशासनातील प्रत्येक घटकाबरोबर अहिल्याबाईंचे संबंध आपुलकी जिव्हाळ्याचे तर होतेच शिवाय त्यांच्यावर नियंत्रण सुध्दा होते.

राज्यकारभारातील प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो हयाची जाणीव अहिल्याबाईंना होती. टाकेदार हा सुध्दा प्रशासनातील महत्त्वाचा घटक होता म्हणजेच तो राज्याचा आर्थिक स्रोत होता त्यांच्याबरोबर सुध्दा अहिल्याबाईंचे संबंध अतिशय चांगले होते हे पुढील विश्लेषणावरुन दिसून येईल.

अहिल्याबाईंचे आपल्या टाकेदाराशी व अशाच प्रकारच्या इतर लोकांशी जे वर्तन असे, ते मोठे सौम्य असे. यामुळे त्यांच्या हाताखालचे टाकेदार क्वचित प्रसंगी खंडणी देण्यास हरकत करीत मऊ दिसले की कोपराने खणावयाचे हा एक जगाचा नियमच आहे या सार्वजनिक नियमास अहिल्याबाईंचे टाकेदार अपवाद कोठून असणार? हे लोक आपली खंडणी देण्यास टाळाटाळ

करतात ही गोष्ट अहिल्याबाईंच्या लक्षात आली की त्यांनी त्या लोकांस सक्तीची पत्रे पाठवावी यामुळे टाकेदारास दहशत बसून अहिल्याबाईंचे कार्य लागलीच होत असे. परंतु इतर मराठ्यांनी आपल्या हाताखालच्या खंडणी देणाऱ्यास फारच छळले. यामुळे ते लोक असंतुष्ट होऊन ते मराठ्यांचा द्वेष मात्र करावयास लागले हा प्रकार शेवटी मराठ्यांस फारच अहितकारक झाला. कारण त्या लोकांस मराठ्यांपासून फारच जाच झाल्याने ते मराठ्यांचे पक्के वैरी झाले. याप्रमाणे त्या वेळच्या पुष्कळशा प्रमुख सरदारांनी खंडणी देणाऱ्यांस आपले कायमचे शत्रू करुन त्यांची एक प्रचंड विरोधी संघशक्ती निर्माण केली. त्याचा यथासांग इतिहास कर्नल टॉड याच्या सुप्रसिध्द ''राजस्थानचा इतिहास'' त्यात पाहावयास मिळेल.[६१]

पण अशा कृत्यात अहिल्याबाईने कधीही हातभार लाविला नाही. त्यांनी आपल्या टाकेदारांस कधीही छळले नाही इतकेच नव्हे तर त्यांची चांगली भरभराट व्हावी हा त्यांचा मोठा हेतू होता. त्यांची भरभराट झालेली पाहून त्यांना फारच संतोष होत असे.[६२]

त्यांच्या भरभराटीवर आपली भरभराट आहे. त्यांच्या संतोषावर आपले स्थायिकत्व आहे. अशा स्वार्थमय हेतूनेही इतर मराठ्यांनी त्यास वागविले नाही. मग निरिच्छ हेतूने वागविल्याचे लांबच राहिले पण अहिल्याबाईंकडे ही राजकीय दूरदृष्टी होती राज्याचा आर्थिक स्रोत टाकेदार आहेत हयांची त्यांना जाणीव होती व त्यांचे समाधान संतोष म्हणजेच निरंतर आर्थिक स्रोत चालू ही दूरदृष्टी अहिल्याबाईजवळ होती हे स्पष्ट होते. राज्य यंत्रणांचा अगदी वरचा भाग सरंजामी सरदार आणि त्याचाच खालचा दुसरा भाग म्हणजे दिवाण सबनीस इ. अनेक हया दोन्ही भागाशी अहिल्याबाईंची वागणूक अत्यंत जिव्हाळ्याची आपुलकीची होतीच शिवाय त्यांच्यावर नियंत्रणसुध्दा होते. म्हणजेच प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजेच अधिकारी वर्ग त्यांच्याशीच संबंध चांगले असल्यामुळे राज्यकारभार करताना त्यांना कोणत्याही प्रकारची अडचणी आल्या नाहीत आणि यशस्वी राज्यकर्त्या म्हणून त्याकाळात त्यांची किर्ती वाढत गेली.

सरदारांवर अन्याय होणार नाही हयांची काळजी घेतली. तसेच तो जनतेवर अन्याय करणार नाही हयांचीही काळजी घेतली म्हणजेच सरकार राज्य-जनता हयांच्यामध्ये समन्वय साधून त्यांनी आपले राज्य भरभराटीला आणले.

राज्याचे आर्थिक स्रोत जमीनदार, टाकेदार हयांच्या विषयीचे धोरण सुध्दा आपुलकी जिव्हाळयाचे होते त्यामुळे त्यांच्या काळात जमीनदार, टाकेदार, ह्यांनी प्रशासनात कधीही आडकाठी करण्याचा प्रयत्न केला नाही शिवाय त्यांच्याकडून आर्थिक स्रोत कायम चालू राहिला.

### ५.५ वित्तव्यवस्था :

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात संपूर्ण देशात अस्थिरतेचे वातावरण होते. आंतरिक अव्यवस्था, ईर्षा, द्वेष आणि गृहकलहाला महत्त्व दिले जाते होते. पेशवा लष्कारी मोहिमेमध्ये व्यस्त राहत होते. उत्तर भारतामध्ये रघुनाथराव आणि महादजी शिंद्यांच्या आक्रमणामुळे मराठे रजपुत तथा मुस्लीम शासक सतत युध्दामध्ये गुंतलेले राहत. सैनिकी कारवाया आक्रमणे, युध्द, जाळपोळ या सर्व गोष्टींमुळे व्यापार आर्थिक व्यवहार यात सुसूत्रता राहिली नव्हती. तसेच जनतेच्या आर्थिक जीवनामध्ये स्थिरता राहीली नाही. अशा अस्थिर परिस्थीतीमध्ये अहिल्याबाई होळकरांनी राजकीय मुत्सद्येगिरीचा वापर करुन तसेच सुसज्ज अशा सैनिकी बळावर आपल्या राज्याचे संरक्षण केले. मेवाडचे राजपुत आणि रामपुऱ्याच्या चंद्रावत सोडून अन्य शासकांनी होळकर राज्यावर आक्रमण करण्याचे धाडस केले नाही. अहिल्याबाईंनी आपल्या सैनिकी बळावर व कुटनीतीने चंद्रावंतांचा पूर्णपणे पराभव केला. बाहय शत्रुंपासून आपल्या राज्याचे रक्षण तर केलेच पण त्याचबरोबर अहिल्याबाईंनी आपली प्रशासकीय प्रतिभा, राजनैतिक समझदारी विवेकशीलता, प्रज्ञा वत्सलता आणि जनकल्याणाची भावना यातून आपल्या राज्यामध्ये लोकप्रिय शासन आणि शांती प्रस्थापित केली. राज्यातील आंतरिक शांतता आणि बाहय आक्रमणांपासून राज्याचे संरक्षण यामुळे राज्यातील जनता सुखी संतुष्ट होत गेली. तसेच आर्थिक जीवन देखील संपन्न झाले.

अहिल्याबाईच्या राज्यात शांतता व सुव्यवस्था नांदत होती याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कृषी क्षेत्रातील प्रगती होय. वित्तव्यवस्थेबाबत मल्हाररावास विशेष ज्ञान नव्हते. परंतु भूमिकर असो किंवा खंडणी असो किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या वसुलीच्या बाबत मल्हारराव फार कठोर होता.[६३] इ.स. १७६५ मध्ये अहिल्याबाईने ग्वाल्हेरच्या छावणीतून मल्हाररावास घरखर्चाबाबत पाठविलेल्या अंदाजपत्रकावरुन मल्हारराव घरखर्चाबाबत फार काटकसरी होता हे स्पष्ट होते.[६४] अहिल्याबाईंनी मल्हाररावांच्या काळात अनेक कायद्यात सुधारणा केल्या करपध्दती सौम्य असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नानुसार सारा वसूल केला जात असे.

प्रशासकीय व्यवस्था आणि शेतसारा वसुलीच्या दृष्टीकोनातून राज्याचे अनेक परगण्यामध्ये विभाजन करण्यात आले होते. एका परगण्यात ५० पासून ३०० गावे होती. परगण्यानंतरचा खालचा भाग त्यामध्ये पाचपासून वीस-तीस गावे होती परगण्यामध्ये शेतसाऱ्यची वसुली जमीनदार, मंडलोई, कानूनगो, पटवारी, पटेल आदी लोकांद्वारे होत असे. हे सर्व परगणे कमाविसदाराच्या अधिकाराखाली होते. अहिल्याबाईंनी कायद्याच्या स्वरुपात कमाविसदाराचे सरदाराचे कर्तव्य आणि अधिकार निर्दिष्ट केले होते.[६५] त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे पाहता येईल.

अहिल्याबाईंच्या राज्यात कमाविसदारावर कारभाराची जबाबदारी सोपवितांना त्यांना लेखी आदेश दिला जाई. त्यात महालाची व्यवस्था, शिवबंदी, ठाणेजात, नाकेजात, भोजन, पालखी वगैरेचा सर्व खर्च धरुन त्यांना देण्यात येणारे वेतन लिहिले जाई. आणि कामे कोणकोणती करावी लागतील असा उल्लेख असे. त्यात भिल्ल, चोर वगैरेंचा बंदोबस्त करावा. जमीनदार आणि फडणवीस यांच्याकडून सरकारी कामकाज करुन घ्यावे. भूमिगत जो माल येईल तो जमा करुन घ्यावा हिशोबाच्या तपासणीच्या वेळी सरकारी नियमा प्रमाणे तपासणी करताना त्यात काही अफरातफर किंवा फितुरी आढळल्यास दंड, शिक्षा करण्यात येईल. नुकसान झाल्यास वेतनातून वसुल करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख केला जाई. अशाप्रकारे अहिल्याबाईंनी कमाविसदारांच्या बाबतीत कर्तव्य आणि अधिकार निर्दिष्ट केले होते. त्याचबरोबर त्यांच्यावर होणाऱ्या संभाव्य कार्यवाहीची जाणीवही करुन दिली.[६६]

अहिल्याबाई आपल्या प्रजेकडून नेमस्त कर घेई पुष्कळ दिवसाच्या कराराने जमीन पट्ट्याने देण्याची पध्दत अहिल्याबाईंनी काढली असे सरजॉन मालकम यांनी म्हटले आहे. ती बटाई पध्दतीत चवथा हिस्सा घेत असे. त्या वेळी पीयत जमीनीची एक ते दीड व अडाणाचा चार ते पाच असा दर होता. ती आपल्या प्रजेकडून उत्पन्नाचा चवथा हिस्सा घेई[६७] तसेच व्यापारिक केंद्र व बाजाराच्या जवळ असणाऱ्या जमिनीचा जमीन महसूल हा २ रुपये प्रति बीघा होता.[६८]

शेतसाऱ्याव्यतिरिक्त कामाविसदार आणि जमीनदार अन्य प्रकारचे कर सुध्दा वसुल करत होते. धान्याचे प्रचंड उत्पादन आणि राज्याच्या बाहेर धान्याची निर्यात यावरुन असे प्रतीत होते की शेती आणि शेतकऱ्यांची चांगली स्थिती होती.

माळवा भारताच्या मध्यभागात येत असल्याने येथून भारताच्या उत्तर आणि दक्षिणेतून महाराष्ट्र, खानदेश, राजस्थान, गुजरातमधून जाणारे येणारे राजकीय व दळणवळणाचे व्यापारी मार्ग

होते. आणि या मार्गावरुनच व्यापारी मालाची वाहतूक केली जात होती. याच राजमार्गावरुन त्याकाळी आंतरप्रांतीय व्यापार होत होता. होळकर राज्यातून हयाच राजमार्गावरुन व्यापारी मालाची आयात निर्यात केली जात होती. या आंतरप्रांतीय व्यापारातून होळकर राज्याला जकात कर मोठ्या प्रमाणावर मिळत होता.[६९]

अहिल्याबाईंच्या काळात गहु, ज्वारी, मका, वगैरे धान्य अफु, कापूस, तीळ, आलसी आदी गोष्टींचे उत्पादन जास्त झाल्याने अन्य प्रांतामध्ये त्याची निर्यात केली जात असे. याबरोबरच वनस्पतीपासून बनविलेले रंग विशेषकरुन केसरी रंग आणि कपड्याचीही निर्यात केली जात असे.[७०]

राज्यामध्ये आयात होणाऱ्या वस्तुमध्ये मीठ, मसाले, नारळ, तीळ, सुपारी, तांबे, पितळ, लोखंड, मोती, रत्न, सोने, चांदी, कच्चे रेशीम वस्त्रे, तंबाखू, आदी वस्तु होत्या.[७१] सावकार व सराफी यांचा एक विशेष वर्ग आयात आणि निर्यातच्या व्यापारामध्ये सहभागी होता. राज्यामध्ये आयात आणि निर्यात केल्या जाणाऱ्या व्यापारी मालावर सायर किंवा जकात कर घेतला जात होता. होळकर राज्यामध्ये जकात कर महत्त्वाचा आर्थिक स्रोत होता.

ज्या परगण्यामध्ये जकात कर लावला जात होता.तेथील जमीनदारांचा हिस्सा त्या जकात करामध्ये असायचा. भिल्लांच्या क्षेत्रातून जाणाऱ्या व्यापारी मालावरसुध्दा भील कौडीच्या स्वरुपात कर घेतला जाता होता. त्या करांवर अधिकार भिल्लांच्या प्रमुखाचा होता.[७२]

प्रत्येक परगण्यातील राजस्व विभागातील कर्मचारी जकात वसुल करुन राजकोशात जमा करीत परगण्यात जकातीचा स्वतंत्र हिशोब ठेवला जात असे. मौल्यवान वस्तुच्या किंमतीनुसार जकात ठरविली जात असे. तर धान्य कापूस मीठ इत्यादी वस्तुवरील जकात १०० बैलाच्या ओझ्यामागे ठरविली जात असे.[७३] जमीनी अथवा गावे इनाम दिली असली तरी त्या गावातून जकात वसुल करण्याचा सरकारला हक्क होता.

अहिल्याबाईच्या राज्यात शांतता असल्याने चितोड, जावड, भिलवारा, मंदसोर, रतलाम, खाचरोद, कोटा, जयपूरा, शुजालपूर, उदेपूर, उज्जैन, अहमदाबाद, बडोदा, भडोच, सुरत, पुणे, जालना, बऱ्हाणपूर, अमरावती, हैद्राबाद इ. शहराशी व्यापार चालत असे. त्यात प्रामुख्याने कापड, तंबाखू, अफु, गुरे इतर किराणा माल व धान्याची निर्यात होत असे. गुजरात, मुंबई येथून सोने, चांदी, मोती, सुपारी बुंदेलखंडातून हिरे माणके, नीळ इ. पदार्थ आयात होत.[७४]

आयात आणि निर्यात हया व्यवहारामध्ये असणाऱ्या सावकार व्यापाऱ्यांजवळ सशस्त्र माणसे नेहमीच जवळ असत. हे व्यापारी व सावकार आयात, निर्यात होणाऱ्या मालाची वाहतूक व्यवस्थित व्हावी या उद्देशाने जकात अधिकारी, सेनानायक चोर लूट करणारे ठाकूर आणि डाकूंना नियमितपणे पैसा पुरवत होते. दलाल मध्यस्थी आणि व्यापारी हयांचा एक मोठा वर्ग वेगवेगळ्या नगरामध्ये आणि प्रांतामध्ये उत्तर भारत, गुजराथ, खानदेश दक्षिण आदी राज्यातून अन्य व्यापाऱ्याचा माल ने आण करण्याचे काम करत होते. हयासाठी ते जकात, सुरक्षेसाठी होणारा खर्च ते करत होते परंतु हे सर्व करण्याच्या बदल्यात ते व्यापाऱ्याकडून विशिष्ट धनराशी घेत होते. आंतरप्रांतीय व्यापारातील व्यवहारासाठी हुंडी पध्दत प्रचलित होती. हुंडीच्या देवघेवीसाठी सुध्दा सावकार व सराफाचा एक विशेष वर्ग कार्यरत होता. त्यांचा संबंध अन्य प्रांत आणि इलाक्यातील सावकारांबरोबर होता.[७५] अनेक प्रकारचा जकात कर घेतला जात होता. राज्याची सीमा, नगर सीमेमध्ये प्रवेश, नदी, घाटावर कर घेतला जात होता. नदी ओलांडून जाणाऱ्या व्यक्तीवर, नदीपलीकडे ने-आण करणाऱ्या व्यक्तीवर सुध्दा कर घेतला जायचा पण हया कराचे प्रमाण मात्र खूप कमी होते.[७६] मालाने भरलेल्या प्रत्येक बैलगाडीवर जवळवळ २ रुपये जकात कर घेतला जायचा. अफुने भरलेल्या प्रत्येक बैलगाडीवर चार ते पाच रुपये कर घेतला जात असे. अन्य वेगवेगळ्या वस्तुवर त्याचे मूल्य वजन आणि संख्या याला अनुसरुन कर घेतला जात असे.[७७]

मंडलोई आपल्या परगण्यात तर पाटील आपल्या गावात येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात वसूल करीत[७८] आपल्या मालांवर अथवा गुरांवर सायर माफ करुन सुरक्षितपणे व सुरळीतपणे आपला माल पोहचवून द्यावा याबद्दल शिंदे, पवार, निजाम, पेशवे अहिल्याबाईंस विनंती करीत. त्यांच्या विनंतीचा मान ठेवित अहिल्याबाईंनी त्यांच्या मालावर जकात न घेण्याचे आदेश आपल्या अधिकाऱ्यास दिल्याचे दिसून येते सायर वसुलीचा मक्ता दिला जात होता.[७९]

अशा प्रकारे आर्थिक व्यवस्थेमध्ये मुख्य रुपाने शेतकरी, मजूर, कारागीर लहान लहान व्यावसायीक आणि धंदे करणारे व्यापारी व सावकारी वर्ग होते. विविध प्रकारचा आर्थिक व्यवहार हाच लोकांमध्ये विभाजीत झालेला होता. आर्थिक जीवनाचे हे वेगवेगळे भाग तत्कालीन युगातील आर्थिक जीवनावर प्रकाश टाकतात.

## ५.६ जमीनमहसूल - कृषिव्यवस्था :

मध्ययुगीन अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असल्यामुळे जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. याकाळात जमीन महसूल गोळा करण्याचे काम देशमुख, देशपांडे या परंपरागात अधिकाऱ्याकडे होते. हे प्रशासकीय काम करण्याबद्दल त्याना सारा माफ असलेली जमीन दिलेली असे. अशा जमिनीस वतन असे म्हणत आणि वतन मिळालेल्या अधिकाऱ्यास 'वतनदार' असे म्हणत. आपल्या अधिकाराखालील प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कामही या वतनदारांकडे असे. त्यासाठी ते थोड्या प्रमाणात फौजफाटा पदरी बाळगत असल्यामुळे वतनदार शिरजोर बनत. व प्रसंगी राजाची सत्ताही जुमानत नसे. ते ठरल्यापेक्षा जास्त महसुल जबरदस्तीने वसूल करुन रयतेचे शोषण करत. हवा तसा महसूल घेत दुष्काळ, नापिकी झाली तरी त्याची वसूली चालूच. या वसुलीला नियम नव्हता त्यांची मर्जी हाच नियम होता.

ही सारी परिस्थिती शिवाजी राजांनी बदलली, जमीन महसुलीत मूलगामी बदल घडवून आणले. जमिनीची मोजणी केली, जमीना कस पाहून प्रतवारी पाडली. मोजणीसाठी परंपरागत साखळीचे परिणाम काढून टाकून 'काठी' चे परिमाण स्विकारले. पण शिवाजी महाराजांसारख्या कालखंडानंतर पुन्हा वतनदारीला महत्त्व प्राप्त झाले किंबहूना ती काळाची गरज बनली. पुन्हा रयतेचे हया बाबतीत हाल सुरु झाले. निसर्ग-नियमानुसार उदय-ऱ्हास पुन्हा उदय हया प्रक्रिया निरंतर चालू असतात. त्याचप्रमाणे अहिल्याबाईच्या कालखंडात पुन्हा एकवार जमीन महसूल प्रक्रियेत मत्त्वपूर्ण बदल झाले. अहिल्याबाईंनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम शेती व शेतकरी यांच्या उन्नतीकडे विशेष लक्ष पुरविले. संपूर्ण प्रजेचे जीवन शेतीवरच आधारीत आहे आणि चांगल्या राज्यव्यवस्थेचा मूळ पाया आणि राज्याचा विकास करायचा असेल तर शेतकऱ्याला प्रगतीपथावर ठेवणे आवश्यक आहे हे अहिल्याबाई जाणून होत्या. त्यादृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलण्यास सुरुवात केली. सारा वसुलीत लवचिकता आणली. सारा वसुली पैसा किंवा धान्य या रुपात परिस्थितीनुसार करण्यात येत असे. अहिल्याबाईचे शेतकऱ्यांवर विशेष प्रेम होते. मोगलांच्या राज्यात मनमानीप्रमाणे कर आकारला जात असे. पण परगणे होळकरांच्या राज्यात समाविष्ट झाल्यावर तो कर एकदम निम्मा होत असे. शेतीचे उत्पन्न बघून सारावसूलीची आकारणी करण्यात येत असे.

शेतकऱ्यांच्या अडचणी वेळेतच सोडवाव्यात, अतिवृष्टी, अनावृष्टी टोळधाड झाल्यास सारा माफ केला जाई. सैन्याच्या हालचालीने पिकाचे नुकासान झाले तर सरकारकडून नुकसान भरपाई

दिली जाई.[८०] पडीत जमिनी लागवडीखाली आणण्याचे वसूली अधिकाऱ्यांना आदेश असत. अधिक सारा वसुल करण्यात आला तर तो परत करण्याची तरतुद केली. अधिकाऱ्याने अन्यायाने पैसा वसूल केल्याचे आढळल्यास जातीने चौकशी करुन त्या अधिकाऱ्यास कडक शिक्षा करीत. वसुलीच्या कामावर प्रामाणिक माणसाची नेमणूक करुनही कोणी अप्रामाणिक निघालाच तर त्याला जबर दंड केला जात असे.[८१]

त्याचवेळीच्या पध्दतीनुसार काही ठिकाणी माणसांना गावे भाडेपट्ट्याने देत असत. त्यामुळे तीच व्यक्ती श्रीमंत होत असे. त्यामुळे संस्थानाला काहीच उपयोग होत नसे. भाडे पट्ट्याने देण्याची पध्दत अहिल्याबाईंनी बंद केली. उत्पन्नाचा चौथा हिस्सा घेण्याची पध्दत चालू केली. पाटील, पटवारी यांना महसूल वसूलेचे अधिकार दिले. जमिनदार व शेतकरी यांना त्यांच्या जमिनीचे अधिकार प्राप्त करुन दिले.[८२]

अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत उत्पन्नाच्या दृष्टीने स्वदेश, खानदेश, नेमाड, माळवा, घडोळी, जयपूर, झालावाड बुंदेलखंड, नरवार, अंतर्वेद आणि मेवाड हे प्रांत होते.[८३]

खरीप पिके कापल्यावर महसूलाची निश्चिती केली जात असे. महसूलाची रक्कम रोख आणि धान्याच्या स्वरुपाने स्वीकारली जात असे. मजुराचा पगार व पुढील वर्षाकरीता पेरण्यासाठी लागणारे बियाणे यासाठी आवश्यक ते धान्य काढल्यानंतर राहिलेल्या धान्यातून निम्मा हिस्सा अथवा २/५ हिस्सा सरकारात कर रुपाने द्यावा लागत असे. त्याला ‘बटाई महसूल’ असे म्हणत.[८४]

अहिल्याबाई बटाई पध्दतीत चवथा हिस्सा घेत असे. त्यांच्या वेळी लागवडीखालील जमिनीचा एक ते दीड व अडाणाचा चार ते पाच असा दर होता. अहिल्याबाई आपल्या प्रजेकडून उत्पन्नाचा चवथा हिस्सा घेई. पाटील, पटवारी, जमीनदार यांचे हक्क व अशाच इतर गोष्टी त्या आपल्या धार्मिक कृत्यापैकी एक भाग समजे. हे सारे ‘मल्हारी मार्तडाचे’ काम आहे असे समजून त्या आचरण करीत. लोकांच्या कामकाजाकडे लक्ष न देणे म्हणजे पाप करणे होय. असे त्या समजे ही त्यांच्या राज्यव्यवस्थेची गुरुकिल्ली होती.[८५]

अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात बटाई महसूलाची निश्चिती केली असली तरी वाजवीपेक्षा जास्त महसूल कधीच घेतला नाही. पैशाच्या रुपाने महसूल ठरविताना काळ्या बागायती जमिनीवर प्रत्येक बिघ्यामागे सव्वा रुपया दर निश्चित केला जात होता. याच काळात इतर संस्थानात मात्र हा कर

बिघ्यामागे चार रुपये होता. कमी दर योजनेमुळे प्रजा व शेतकरी सुखी होते. परिणामी उत्पन्न जास्त निघत होते.[८६]

महापूर, टोळधाड, गारांचा वर्षाव, अवर्षण इत्यादी नैसर्गिक प्रकोप आणि फौजेच्या हालचालीमुळे पिकांची झालेली नासाडी अशावेळी अहिल्याबाई आपल्या प्रजेस शेतसाऱ्यात सुट देत असे. महाल मक्त्याने देताना कामविसदारासमवेत पुढीलप्रमाणे करार केला जाई. ''लष्कराची पायमल्ली झाल्यास चौकशी करुन मजरा दिला जातील आफत फितुरी मुलूख शिरस्त्याप्रमाणे दिल्या जातील.[८७]

**५.७ होळकर राज्याच्या अन्य आर्थिक बाबी :-**

परगण्यातील अन्य जमेच्या बाबी म्हणजे दारु विक्री, कर (कलाली) वनचराई, यात्राकर, खिरप्या (देणग्या), आंबराईतून येणारे उत्पन्न, जरीबतमाखू, (दंड), खंडफुरोई(खटल्यात हरणाऱ्यांपासून घेतलेले दंड), हारकी, (न्यायालयात हरणाऱ्यांपासून घेतलेले शुल्क, फेराई, (अधिकारी फिरस्तीवर जात त्यावेळी रयतेपासून घेतलेला कर), मालजप्ती, हवालदारी हया होत.[८८] युध्दात पराभूत झालेल्या राज्याकडून खंडणी वसुल केली जात असे.

अशा प्रकारे अहिल्याबाई यांनी आपल्या राज्याला अन्य बाबींपासून उत्पन्न मिळण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. जेणे करुन आपल्या राज्यांची प्रगती होईल. असेच धोरण अहिल्याबाई यांनी आपल्या राज्यात राबविले. व त्यांचे हे धोरण यशस्वी झालेले देखील आपणास दिसून येते. आजच्या काळात देखील आपण पाहतो की आपल्या महाराष्ट्र राज्याला सर्वात जास्त महसूल दारु विक्रीतूनच झालेला दिसून येतो. हे अहिल्याबाई यांनी दोनशे वर्षापूर्वी ओळखले व त्या प्रकारचे कर आपल्या राज्यात लागू केले होते. न्यायालयात दाखल होणा-या प्रकरणांवर व न्यायालयात हरणाऱ्यांवर देखील कर लावले होते. व त्याच्यातून येणारे उत्पादनावर आपल्या राज्याची प्रगती केली होती. तसेच मालजप्ती व हावलदारी यांच्यातून मिळणारे उत्पन्न देखील त्या जनतेच्या व रयतेच्या प्रगतीसाठी खर्च करत असत. म्हणूनच त्यांना आपल्या राज्यात समाजउपयोगी कामे करता आली. त्यात प्रामुख्याने विहीरी,तलाव, पूल, रस्ते, धर्मशाळा, इत्यादी कामे राज्याची आर्थिक भरभराट असल्याशिवाय होत नाही. आर्थिक भरभराटीसाठी आर्थिक धोरण खूप महत्वाचे असते. हे सर्व अहिल्याबाई होळकर यांनी जाणले होते.

## ५.८ अहिल्याबाईकालीन न्याय व्यवस्था :

होळकर राज्याचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर यांचा अधिकांश वेळ हा युध्द क्षेत्र व विविध मोहिमा ह्यांच्यामध्ये व्यतीत झाल्यामुळे प्रशासनाची जबाबदारी ही अहिल्याबाईवर येऊन पडली. साहजिकच न्यायव्यवस्थेची सुध्दा जबाबदारी पडली आपल्या सासऱ्यांच्या म्हणजेच मल्हाररांवाच्या पध्दतीनसुार व मराठा राज्याच्या न्यायालयीन स्वरुपानसुार त्यांनी आपल्या न्यायदान पध्दतीचे स्वरुप ठेवले. त्यावेळी आजच्यासारखे लेखी कायदे, लेखी कायद्याची पुस्तके नव्हती. सारासार विचार करुन रुढी, परंपरा, नैतिकता, न्याय, अन्याय, चांगले वाईट या निकषांच्या आधारे न्याय दिला जायचा.

अहिल्याबाईंनी धर्मानुसार न्यायदान करण्याची मुहुर्तमेढ रोवली. त्यांची धारणा शक्ती दांडगी असल्यामुळे योग्य, अयोग्य , खरे, खोटे त्यांना तत्काळ समजत असे.

अन्यायाचा मूळापासून तिटकारा असल्याने त्यांनी आपले काम उत्तम न्यायधिशाप्रमाणे केले. त्यांच्या कानावर ज्या फिर्यादी येत त्या स्वत: ऐकत असत. तथापी काम तुंबून राहू नये यासाठी व राजकार्याच्या सुलभतेसाठी परगण्यातील फौजदारी कायदा राबविण्याची व शांतता सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी कामविसदारावर असे.[८९] या करिता कमाविसदार ठाणेदाराची मदत घेत असे.[९०]

अहिल्याबाईकडे जर कोणी जाऊ म्हटले, तर त्याला आपले गाऱ्हाणे आपल्या मनाप्रमाणे त्यांच्यापुढे सांगावयास सवड होती त्या त्यांचे म्हणणे चित्त देऊन ऐकत व त्यावर आपल्याला जे काही न्याय्य दिसेल ते त्या निर्भिडपणे करी. प्रजेच्या हितासाठी आपला जन्म आहे व प्रजाहित हेच आपले कर्तव्य आहे असे त्या समजत असल्याकारणाने कोणाचेही काम असेना ते त्यांच्याकडून निरलसपणे होत असे. अशा प्रकारे अहिल्याबाई उदार धार्मिक मनोवृत्तीच्या न्यायप्रिय प्रशासिका होत्या.

तथापि त्या काळात होळकर राज्यात नियमित न्यायालयाचा अभाव होता तरीही अहिल्याबाई जवळपास प्रत्येक दिवशी दरबारात प्रश्न ऐकून त्यावर न्याय देण्याचे काम करत होत्या.[९१]

"Ahilyabai took upon herself the direct management of affairs and sat everyday for a considerable time in open darbar, transacting business. Her first principle was moderate assessment and sacred respect for the rights of village officers and proprietors of land, and quick justice she referred cases to coursts of equity and arbitration

(panchayats) and her ministers for settlement, but when appeals were made to her decision she heard every complaint in person with great patience"[९२] अहिल्याबाईची साऱ्या व्यवस्थापनाची सूत्रे असून त्या रोज खुल्या दरबारात उपस्थित राहून कामकाजात सहभागी होई. नेमस्त भूमिका घेऊन ग्रामीण अधिकारी व जमीनधारकांच्या हक्काची जाणीव ठेवून त्वरीत न्यायदानावर त्यांचा भर असे.

महेश्वर सोडून अन्य ठिकाणाहून जे लिखित प्रश्न अहिल्याबाईंकडे पाठवले जात असे, त्यांचेही समाधान केले जात असत. संबंधित परगण्यातील अधिकारी त्या मामल्याची विचारपूस करून अहिल्याबाई त्यावर आपला निर्णय देत असे. परंतु असे फक्त मोठया-मोठया मामल्यांमध्येच होत असे. लहान-लहान मामल्यांमध्ये विचारपूस करून कमाविसदार किंवा अन्य अधिकारीच निर्णय देत असत.[९३]

प्रत्येक परगण्यात कमाविसदारास तर गावात पाटलास न्यायदान करावे लागे[९४] अहिल्याबाईच्या काळात न्यायदानासाठी पंचायत पध्दती होती. त्या लोकांवर अहिल्याबाईचा चांगला दबदबा असल्याने न्याय देणारे लोक अहिल्याबाईपर्यंत कागाळी जाऊ नये म्हणून न्यायदानाकडे अधिक लक्ष पूरवित असत. अहिल्याबाईच्या राज्यात न्याय खाते ही उत्पन्नाची बाब नव्हती.[९५] त्यांच्या राज्यात प्रजेला नाममात्र खर्चात योग्य न्याय मिळे. राजाचा जन्म प्रजेसाठी आहे व प्रजापालन हे त्याचे धार्मिक कर्तव्य आहे ही जी भारतीय पुरातन समजूत होती त्या तत्वानेच अहिल्याबाई कार्य करीत असे. त्यांच्या प्रत्येक कृतीत धर्माचे तत्त्व असल्याने त्यांनी आपले कर्तव्य चांगल्या रीतीने पार पाडलेले दिसते. प्रजेचे हित आणि आपले हित हे निराळे आहे असे त्या समजत नसे यामुळे त्यांच्या हातून प्रजेस चोख न्याय मिळे.

चोरी इत्यादीचा माल प्राप्त झाल्यावर त्या संबंधित व्यक्तीला परत केला जात होता. अपराध्यास ती स्त्री असली तरी सजा दिली जात असे त्याचबरोबर सार्वजनिक प्रकारे अपमानितही केले जात असे.[९६]

चुकून एखादया व्यक्तीकडून शासकीय अधिकारी अधिक रक्कम वसूल करत ते शासकीय कोषागारात जमा झाल्यावर पण जास्त रक्कम संबंधित व्यक्तीला परत दिली जात असत.[९७] कधी-कधी नि:संतान व्यक्तीचा मृत्यु झाल्यावर त्यांच्या निकवटवर्तीयांची अधिक तपासणी न करताच त्यांची संपत्ती शासकीय म्हणून घोषित केली जात होती. अहिल्याबाईंच्या वेळी असे तीन प्रकार

दिसून आले. त्यातील स्वर्गवासी झालेल्या लोकांच्या जवळील नातेवाईकांनी त्यांचे उत्तराधिकारी असल्याचे सांगितले होते. त्या प्रकारांची बारकाईने चौकशी केल्यावर त्यांचे म्हणणे खरे वाटल्यावर त्यांनी त्यांची संपत्ती परत केली[९८] अशा प्रकारे सिरोजचा खेमदास, इंदोरचा देवीदास, खरगोन येथिल तापीदास, बनारसीदास यांच्या विधवांना मातोश्रींनी दत्तक घेण्याची अनुमती दिली व आपल्या राज्यात दत्तकाचा कायदाच करुन टाकला.[९९]

अहिल्याबाईच्या काळात न्यायव्यवस्थेत लोकांच्या धार्मिक मान्यतेला आणि परंपरेला महत्त्व दिले जात होते ते पुढील उदाहरणावरुन स्पष्ट होईल. भीखनगावचा मंडलोई पृथ्वीसिंहचा मृत्यु नि:संतान अवस्थेत झाला त्यांच्या पत्निने पृथ्वीसिंहाच्या भावाच्या मुलाला दत्तक घेऊन पुत्र बनविले व मण्डलोई हे पद सुध्दा दिले. पृथ्वीसिंहाच्या भावाने अहिल्याबाईंना विनंती केली की याबाबतीत पृथ्वी सिंहाच्या विधवा पत्नीचे म्हणणे ऐकूण घेऊन मग निर्णय घेतला जावा. परंतु हिंदु परंपरेनुसार विधवांना एक वर्षभर घराबाहेर पडता येत नाही त्यामुळेच पृथ्वी सिंहाच्या विधवा पत्नीने घराबाहेर पडण्यास असमर्थता व्यक्त केली तेंव्हा तिच्या भावनेचा विचार करुन एका प्रतिष्ठीत व्यक्तीला तिचा साक्ष लिपिबध्द करण्याच्या हेतूने पाठविले.[१००]

गुन्हेगारांना शिक्षा देताना त्यांचा दृष्टीकोन उदार असे. माणूस वाईट प्रवृत्तीपासून परावृत्त व्हावा म्हणून त्या जशा कडक शिक्षा देत तसे कडक शिक्षा दिल्यामुळे त्याच्या आयुष्याचे नुकसान होऊ नये याचीही काळजी घेत मालेरावाचा मृत्यु झाला. त्यावेळी फंदफितुरी करणारा भागोजी नावांचा माणूस सुमारे अठरा वर्षांनी सापडला. त्याचा गुन्हा सतरा अठरा वर्षापूर्वीचा होता. तरीही अहिल्याबाईंनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले नाही. आणि त्याला मोकळेही सोडले नाही. त्याच्याकडून फंदफितुरी करणार नाही, असा लेखी जबाब घेतला आणि त्याला जातमुचलक्यावर चांगले वागण्याच्या अटीवर सोडून दिले.[१०१]

अहिल्याबाईचा एक आदेश असाही होता की, मल्हारराव होळकरांनी एका सावकाराकडून घोडे खरेदीसाठी कर्ज घेतले होते होळकर आणि सावकाराच्या मृत्युनंतर सावकाराचा नातू रानोजी शिंदे अहिल्याबाईंकडे कर्जाची रक्कम मागण्यासाठी आला. ते सर्व कागदपत्रे बघून राणोजीला सर्व कर्जाची रक्कम दिली जावी आणि ती ही त्वरीत असा आदेश दिला.[१०२]

अशाच प्रकारे १-९-१७९२ रोजी अहिल्याबाईनी भारमलदादाला लिहिले होते की - परगणा थालनेर मौजा बाघाडीच्या जाखोजी जगताप वर आरोप ठेवून त्यांच्याकडून चारशे रुपये

वसूल करुन ते तू सरकारी खजान्यामध्ये जमा केलेले आहेत परंतु चौकशी केली असता तो निर्दोष असल्याचे सिध्द झाले. सबब त्याचे चारशे रुपये त्वरीत त्याला देण्यात यावे.[१०३]

अशाच प्रकारे एका अधिकाऱ्याने एका बेवारस मृत व्यक्तिचे बाराशे रुपये सरकारी खजिन्यामध्ये जमा केले होते. काही दिवसांनंतर मृत व्यक्तीच्या एका भावाने याबाबतीत आपला दावा अहिल्याबाईसमोर मांडला त्याबाबतीचे पुरावे अहिल्याबाईना योग्य वाटले त्यांनी मृत व्यक्तीच्या भावाचे पैसे पुन्हा परत केले.[१०४]

ही अहिल्याबाईंच्या न्यायप्रियतेचे ज्वलंत उदारहरणे आहेत. याशिवाय पुणे दरबाराकडून एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला तर ते लोक अहिल्याबाईंकडे येत असत.

नाना फडणीसांनी एकदा व्यापाऱ्याबद्दल शंका घेतली असता, हे व्यापारी महेश्वर येथे आपली तक्रार घेऊन आले. त्यावेळी अहिल्याबाईनी नानास समजाविले की, ‘‘अशा प्रकाराने इतर व्यापाऱ्यांची पत नाहीशी होऊन तुमच्या व्यापारी मंडळास मोठा धक्का बसेल.’’[१०५] नाना फडणीसास अहिल्याबाईचा सल्ला पटला आणि त्याने व्यापाऱ्यांना न्याय दिला. अशाच प्रकारे शिंदे व होळकर यांच्यात एका भागावरुन वाद निर्माण झाला व तो विकोपास जाण्याची चिन्हे निर्माण झाली तेंव्हा महादजी शिंद्यांनी अहिल्याबाईंना विनंती केली की आपणच याचा न्याय निवडा करावा वास्तवीक या वादातील अहिल्याबाईच प्रमुख होत्या असे असताना महादजींनी त्याचेवरच न्याय देण्याची जबाबदारी सोपविली.

अहिल्याबाईंनी दोन्ही बाजूंचे कागदपत्र तपासून पहिले व असे लक्षात आले की दोघांचे ही सदर भुखंडावर हक्क सांगणे रास्त आहे. महादजी शिंदे व तुकोजींना समारोसमोर बोलावून त्यांनी न्याय निवाडा सांगितला .

दोन्ही पक्षकार त्या जमीनीवरील आपला अधिकार सोडून देऊन त्या जमिनीला गायरान म्हणून समजले गेले आणि कोणत्याही प्रकाराचा कर घेतला नाही. त्यानुसार हा मोठा भूखंड गायीसाठी सोडला गेला आणि मध्य भारताच्या निर्मिती पर्यंत त्याच रूपात राहिला.[१०६]

हया एका उदाहरणावरुनही अहिल्याबाईंची लोकप्रिय न्यायव्यवस्था व अहिल्याबाईप्रती लोकांची भावना समजून येते.

अहिल्याबाई ज्या ज्या प्रकरणात न्याय देत असे तो सर्वांस मान्य होत असे. त्याच्या न्यायीपणाबद्दल लोकांची खातरी झालेली होती. तशातच त्या ज्या काही करतात ते केवळ

परमेश्वराचे काम असे समजून करतात अशी लोकांची खात्री असल्यामुळे त्यांचा शब्द पवित्र मानून त्यास मान देत. अहिल्याबाई स्वत: म्हणत असत की ''मी आज जे काही सामर्थ्याच्या व सत्तेच्या बळावर करीत आहे त्याचा मला परमेश्वरापाशी जाब द्यावा लागेल.''[१०७]

अन्यायाचे खंडण हे तर कर्तव्याचे पालन हे त्यांच्या नि:पक्षपाती न्यायदानाची साक्षच होय.

## ५.९ अहिल्याबाई कालीन संरक्षणव्यवस्था :

संरक्षणसिध्दता हाच स्वसंरक्षणाचा उत्तम मार्ग हे अहिल्याबाईचे तत्त्व होते. सैन्य अपूरे किंवा दुर्बल असणे म्हणजे पाठीचा कणा मोडून घेणे होय. अशी वेळ येऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शिवाय पुष्कळ वेळा हक्क मिळालेले असतात. पण ते वापरण्यासाठी यांचे होते. कधी कधी बळाचा वापर करण्याची गरज असते. असे व्यवहारी धोरण अहिल्याबाई यांचे होते. त्या स्वत: धुरंधर सेनानी आणि राज्यकर्त्या असल्यामुळे राज्य चालविण्यासाठी सैन्याची असणारी आवश्यकता त्यांना माहित होती त्यासाठी सुभेदार मल्हारराव होळकरांच्या काळात असलेली सैन्य व संरक्षणव्यवस्था अहिल्याबाईनी तशीच पुढे चालू ठेवली होती.

सैनिकी भरतीच्या वेळी सैनिकाला कोणत्यातरी जबाबदार व्यक्तीची जमानत देणे आवश्यक मानले जात असे.[१०८] सैनिकांना नगदी वेतन मिळे सैनिकांच्या क्षमतेनुसार त्याचा पगार ठरविण्यात येई. स्वारांचा पगार दरसाल दर माणशी २५०रुपये, करोला बंदुकधारी सैनिकाचा दरसाल दर माणसी ३२५रु. तर भालेकऱ्यांचा पगार दरसाल २५० रुपये होता.[१०९] स्वारीस निघण्याअगोदर फौजेच्या तयारीसाठी शिलेदारांना वार्षिक वेतनाची एक चतुर्थांश किंवा तिजाई रक्कम देण्यात येई. त्याला नालबंदी म्हणत. बाकीची रक्कम लष्करात हजर झाल्यावर दर आठवड्याला ठराविक हप्त्याने त्यांना देण्यात येत असे. त्याला रोजमुरे म्हणत.[११०]

मुख्य सरदारांचा पगार त्याचा लौकिक व दर्जा लक्षात घेऊन ठरविला जात असे. सरदारांना मिळणाऱ्या पगारास ''जात तैनात'' असे म्हणत.तुकोजी होळकरांच्या तैनातीला असलेल्या पथक्या बाबुराव मानाजी वाघमारे[१११] याला रु.११३९८ ''जात तैनात'' लावून दिली होती. या जात तैनातीचा खर्च, पालखीचा खर्च, हत्तीचा खर्च यांचा समावेश होत असे.[११२] सरदारी खर्चात स्वार, करोल, भालेकरी इ. सैनिकांचा दर आसामी दरसालचा पगार व त्या शिपायांची संख्या याचा अंतर्भाव असे.[११३]

होळकरशाहीत नेहमीकरता सैन्यात भरती केलेले व तात्पुरत्या कारणाकरिता भरती केलेले असे दोन प्रकारचे सैनिक असत. मोठ्या मोहिमेच्या वेळी मोठ्या प्रमाणावर सैनिकांची भरती केली जात असे. नियमित सैनिकांची हजेरी व शिस्त हयाबाबतीत मल्हारराव फार दक्ष असत सैनिक, घोडे, उंट यांची रोज हाजिरी व्हावी अशी मल्हारावांची ताकीद असे.[११४] परवानगी न घेता सैनिक छावणी सोडून गेल्यास त्याला सैन्यातून काढून टाकण्यात येत असे. हिच प्रथा अहिल्याबाईने चालू ठेवली.[११५]

अहिल्याबाई ज्याप्रमाणे आपल्या राज्याचे संरक्षण करण्यासाठी सैनिकांचा उपयोग करत त्याप्रमाणे सैनिकांच्या मरणोत्तर आणि अगोदर सैनिकांच्या कुटुंबाच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी स्वत:वर घेत. जे सैनिक आपल्या प्राणाची पर्वा न करता होळकर राज्याच्या संरक्षणासाठी झटत होते त्यांची अहिल्याबाईंनी कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ दिली नाही. त्या सैनिकांच्या कुटुंबियांची चौकशी करुन त्यांना अत्यावश्यक असणाऱ्या वस्तु व त्यांच्या मूलभूत गरजा भागवत असत. सैनिकांचे पगार वेळेवर देत असत.[११६]

रणभूमीवर लढण्यासाठी गेलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना त्या काहीच उणीव भासू देत नसत याशिवाय फौजेस लागणारा दारुगोळा तयार करण्याचे कारखानेही काढले होते. पण त्याविषयी फार गुप्तता बाळगली. जात असे. पावसाळा संपत येताच तोफा, बंदुका आदी युध्द साहित्याची साफसफाई सुरु होत असे. याशिवाय तलवारी, ढाली, वाघनख्या, भाले यांची सफाई नित्य सुरु असे. याशिवाय हत्ती, घोडे, बैल यांच्या आजाराकडे अहिल्याबाईंचे लक्ष असे.[११७] याशिवाय किल्ल्याची डागडुजी, पुरवठा, संरक्षण व्यवस्था याकडेही विशष लक्ष दिले जात असे. होळकरशाहीतले प्रसिध्द किल्ले सात.

१. महेश्वर २. चांदवड ३. सेंधवा ४. अशीरगड ५. गाळणा ६. कुशलगड ७. हिंगलजगड या सातही गडांची डागडुजी व भरभक्कम बांधणीची योजना अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत मार्गास लागली.[११८]

महेश्वर किल्ला मोगलाईच्या काळात मातीचा होता. इ.स. १७९०-१७९३ अहिल्याबाईच्या आमदानीत याचे दुरुस्तीचे काम झाले. अहिल्याबाईनी याच किल्ल्यात आपले वास्तव्य केले होते.[११९] प्रत्येक किल्ल्यावर किल्लेदार, कारकून, फडणीस, सबनीस, जमादार, दफेदार, बरकंदाज, स्वार, प्यादे, भिल्ल इत्यादी असत.[१२०] त्यांचा खर्च परगण्यातील उत्पन्नातून

भागविला जाई व तेवढा खर्च वार्षिक खर्चात जमेत धरला जाई.[१२१] हिंगलाजगड किल्ल्याच्या शिबंदीचा वार्षिक खर्च रु.४५००० असून तो खर्च रामपूरा परगण्यावर लादलेला होता.[१२२]

चांदवड हे स्वदेश विभागातील होळकरांचे प्रमुख ठाणे होते. वऱ्हाड व नाशिकच्या वाटेवर असल्याने व्यापाऱ्यांचे मोठे केंद्र होते. मल्हाररावांनी तेथे टाकसाळ सुरु केली. हया टाकसाळीत तयार झालेल्या नाण्याला चांदवडी रुपया म्हणत. ही टाकसाळ इ.स. १८३० पर्यंत चालू होती.[१२३] येथील किल्लाही प्रसिध्द होता.

सैंधवा येथील किल्ला मल्हाररावाने बांधला. सेंधव्याच्या किल्ला म्हणजे खानदेश माळवा मार्गावरील सातपुड्याजवळील मोक्याचे ठिकाण असून उत्तर भारत व दक्षिण भारत यांना सांधणाऱ्या दुव्याचे केंद्र होते. सातपुड्यातील भिल्ल लोकांचा बंदोबस्त करण्याकरिता या किल्ल्याचा फार उपयोग झाला.[१२४] या किल्ल्यावर तुकोजी होळकरांचा भाऊ संताजी होळकर याची किल्लेदार म्हणून नेमणूक झाली होती.[१२५] याशिवाय उरलेल्या किल्ल्याची व्यवस्था उत्तम ठेवली होती.

संरक्षणव्यस्थेतील एक भाग पोलिस यंत्रणा हा सुध्दा होता. होळकर राज्यामध्ये मल्हारराव होळकरांनी ज्या पोलिस व्यवस्थेची सुरवात केली होती ती जवळपास मराठा पध्दतीच्या समानच होती. गावातील चौकीदार या व्यवस्थेतील सर्वात प्राथमिक घटकांच्या रुपात कार्य करीत होता. कमाविसदार परगण्याच्या कायदा व्यवस्थेचा अधिकारी असे त्यांच्या अधीन सैनिक येत असत. त्यांच्या मदतीने तो कायदा व्यवस्था हाताळीत असत.

अहिल्याबाई होळकरांच्या प्रशासन काळातील खालील पत्र प्राप्त झालेले आहे. यावरुन त्याकाळातील पोलीस व्यवस्थेवर प्रकाश टाकता येतो. खण्डो बाबूराव यांनी अहिल्याबाई यांना १४ आक्टोबर १७८९ ला पत्र लिहले. त्यात कोतवाल कृष्णाजी कोंडदेव कडून मोती नावाच्या माणसाला त्याच्या चुलतीवर केलेल्या अपराधाच्या शिक्षा स्वरूपात १२०रू. चा दण्ड दिलेला उल्लेख आहे.[१२६] यावरुन कोतवालाला आर्थिक दंड देण्याचा अधिकार होता हे सिध्द होते.

नगर कोतवाल हे पद अहिल्याबाईंच्या काळात इंदौरमध्ये स्थापित झालेले होते.[१२७] कोतवाल कमाविसदारास पूर्ण परगण्यात झालेल्या अपराधाची सूचना देत असत व अपराध थांबविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची सूचनाही कोतवाल देत असत.[१२८]

## ५.१० अहिल्याबाई होळकर यांचे परराज्याशी संबंध:

कोणत्याही राज्यांत शांतता प्रस्थापित करावयाची असल्यास परराज्यांशी असणारे संबंध सलोख्याचे व शांततेचे असणे गरजेचे असते. राज्याची प्रगती होण्यासाठी विनाकारण होणारी युध्दे टाळणे गरजेचे असते. युध्दावर खूप खर्च होतो राज्याची अधोगती होते. हे सर्व अहिल्याबाईंनी ओळखले होते. म्हणूनच त्यांचे परराज्यांशी असणारे संबंध सलोख्याचे होते. त्याचबरोबर अहिल्याबाईंचे काळात होळकरांचे राज्य इतरांना महत्त्वाचे वाटत होते म्हणून त्यांचे वकील महेश्वराला व महेश्वरचे वकील त्यांच्या दरबारात राहात त्यांची यादी अशी-

**होळकरांचे परराज्यातील वकील**

१. उदयपूर- भगवंतराव जगताप
२. हैद्राबाद - माधवराव लक्ष्मण
३. जयपूर- मार्तंडराव आप्पाजी
४. पुणे - आप्पाजी जाखदेव
५. शिंदे - यमाजी मोरेश्वर
६. नागपूर- व्यंकाजी कृष्णराव
७. लखनौ - मनोहर खंडेराव
८. भोपाळ - शिवाजी गिरमाजी
९. कोटा- बापुजी आनंदराव
१० दिल्ली- बहादुरसिंग
११ डंगरपूर- व्यंकोजी शिवाजी
१२ अयोध्या- खंडो जगदेवराव

**परराज्याचे महेश्वर येथील वकील**

१. पुणे- केसो भिकाजी, विसाजी शामराज
२. शिंदे- शिवाजी नारायण, भगवंत अनंत
३. मारवाड- जसकर्ण महता, दत्तराम
४. भरतपूर- भगवंत गोविंद
५. जयपूर- सवाईराम व शिवाजी

६.	उदयपूर-	काशीनाथ पंचोली

७.	जोधपूर-	कृष्णाजी जगन्नाथ

८.	सातारा-	रामराव सदाशिव

१)बढवाणी २) झाबुवे ३) सीतामऊ ४)देवास या संस्थानचा कारभार अहिल्याबाईंच्या सल्ल्याने चालत असे. परराज्याशी अहिल्याबाईचे सलोख्याचे संबंध असल्याने परराज्यात करावयाच्या धार्मिक कार्यात त्यांना कधीही अडचणी आल्या नाहीत.[१२९] तसेच अहिल्याबाईचे परराज्याशी वर्तुणूक व व्यवहार कसे होते हे पुढील प्रमाणे स्पष्ट होईल.

परराज्याशी वर्तुणूक या सदराखाली त्यांच्याशी मांडलिक या नात्याने राहणारे राजे आणि स्वतंत्र असून त्यांच्याशी व्यवहार ठेवणारे राजे हया दोहोंचाही समावेश होता.

त्यावेळेस होळकरांस खंडणी देऊन व त्यांच्या वर्चस्वाखाली राहणारी रजपूत लोकांची व नर्मदेच्या काठची गोंड लोकांची पुष्कळ संस्थाने असत.[१३०] त्या सर्वांशी अहिल्याबाईचे वर्तन मोठ्या नेकीचे होते. आपल्या सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी त्यांच्या बरोबर ठरलेल्या खंडणीपेक्षा अधिक खंडणी कधी मागितली नाही यामुळे त्यांच्याकडून ती येण्यास प्राय: विलंब लागत नसे आणि तसा कधी लागल्यास त्या त्यांस कडक पत्रे लिहून त्यात त्यांचा अन्याय असा स्पष्ट करुन दाखवित की त्यापासून ते शुध्दीवर येऊन ठरलेली खंडणी ताबडतोब पाठवून देत, व विलंब लाविल्याबद्दल त्यांपाशी क्षमा मागत. परंतु इतर मराठ्यांनी आपल्या हाताखालच्या खंडणी देणारांस फारच छळले. यामुळे ते लोक असंतुष्ट होऊन ते मराठ्यांचा द्वेष मात्र करावयास लागले. हा प्रकार शेवटी मराठ्यांस फारच अहितकारक झाला. कारण त्या लोकांस मराठ्यांपासून फार जाच झाल्याने ते मराठ्यांचे पक्के वैरी झाले. पण अशा कृत्यांत अहिल्याबाईने कधीही हातभार लावला नाही. बाईसाहेबांची मनापासूनची इच्छा आपल्याप्रमाणेच त्यांच्याही राज्यांची भरभराट व्हावी अशी असल्यामुळे त्यांना विशेष त्रास न पोचण्याबद्दल त्या फार खबरदारी घेत, व त्यांच्या अधिकारांचा अपहार करण्याचे कोणी मनांत आणिल्यास त्यास त्या शासन करीत. त्यांनी आपली राज्यव्यवस्था सुधारुन आपल्या रयतेस सुख द्यावे म्हणून सल्ल्यामसलत देण्याकरिता प्रत्येकांच्या दरबारी त्यांनी आपला एकेक हुशार वकील ठेविलेला होता. शिवाय त्या सर्वांनी संतुष्ट राहावे व आपल्या राज्यास कधी कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये म्हणून आपल्या कारकीर्दीत त्यांनी त्यांस विशेष प्रकारचे हक्क दिले होते.[१३१]

त्यांच्या भरभराटीवर आपली भरभराट आहे. त्यांच्या संतोषावर आपले स्थायिकत्व आहे हे अहिल्याबाई पक्के जाणून होत्या. प्रजाप्रेमाच्या बळावर राज्य करणे हे जे उत्तम राज्यकर्त्यांचे लक्षण ते अहिल्याबाईंच्या आचरणात चांगले दिसते. प्रजाप्रेमावर राज्य करण्याची त्यांची तयारी पाहिली म्हणजे, आमच्या रयतेची आबादानी तेच आमचे सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती व त्यांची कृतज्ञता तेच आम्हांस उत्तम फळ, असे आम्ही समजतो, रयतेच्या कल्याणाविषयीच्या आमच्या ज्या इच्छा आहेत त्या सिध्दीस नेण्यास सर्वशक्तीमान जो परमेश्वर तो आम्हास व आमच्या अधिकाऱ्यास सामर्थ्य देवो अशी प्रार्थना आहे.[१३२] हा अहिल्याबाईचा १७५८ सालचा जाहीरनामा आहे. अहिल्याबाईना आपल्या प्रजेची तर भीती नव्हतीच पण इतर राजेरजवाड्यांचीही त्यांना भीती वाटत नसे त्यांच्या संस्थानावर परकीय राजेरजवाड्यांनी कधीही स्वारी केली नाही. अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत चंद्रावतांनी बंड उभारले खरे, पण त्यांत त्यांना अहिल्याबाईविरुध्द काही करावयाचे नव्हते त्यांचे बंड जात्याभिमान व स्वसंरक्षण या हेतूने प्रेरित होऊन झाले होते. त्याचा अहिल्याबाईंच्या राज्यव्यवस्थेशी मूळीच संबंध नव्हता.[१३३]

त्यावेळची अशी स्थिती होती की, जो तो, आपल्या वरिष्ठास सारुन स्वत: बलाढ्य होण्याचा प्रयत्न करीत होते. इतकेच नव्हे तर स्वत:स आर्थिक फायदा मिळावा म्हणून ते लहान लहान संस्थानांस गिळंकृत करत पण अहिल्याबाईंचे वर्तन सर्वथैव हयाविरुध्द होते आपल्या आसपासचा समाज अधोगतीस जात असता त्या प्रचंड ओघाबरोबर आपण न जाणे हे फारच कठीण काम या दृष्टीने पाहता अहिल्याबाईंची योग्यता फारच मोठी आहे उदेपूर, जयपूर, जोधपूर, देवास, धार, बढवाणी, चरखारी झाबवा इत्यादी लहानमोठी संस्थाने त्यांच्याकडे आपले तंटे घेऊन येत. त्यांची उदाहरणे पुढील प्रमाणे

पाटीलबावांचा आणि गोहजवाल्यांचा लढा पडला होता. तेथील वकील जे वीरेश्वरपंत ते महेश्वरात आले. त्यांनी येताना अहिल्याबाईंस एक व माधवराव गंगाधर यांस एक अशी दोन पत्रे आणिली होती. अहिल्याबाईनी त्यांना भेटीस बोलावून त्यांची एकांती भेट घेतली त्यावेळी माधवराव हे ही होते. अहिल्याबाईंनी त्यांची पत्रे पाहिली व ते जबानीही कित्येक मजकुर बोलले, नंतर अहिल्याबाईनी माधवराव यास सांगितले, ''वकिलांचे तपशीलवार वर्तमान ऐकून ते मजला समाजवून सांगा.''[१३४]

माधवरावांनी वीरेश्वरपंतास आपल्या घरी बोलविले व त्यांस अहिल्याबाईच्या आज्ञेप्रमाणे तपशीवार वर्तमान विचारले. वकील साहेब म्हणाले की, ''शेषईवर इंग्रजांचे मसलतीवर पाटीलबाबा होते ते समयी मसलीतीची कोणत्याही प्रकारे विल्हे लागेना तदोत्तर पाटीलबावांनी गोहजवाले राणाजीस बोलावून इमान प्रमाण बेलभंडार होऊन उभयतांचा एक दिल झाला. राणाजींनी इंग्रजास भयभीत दाखवून त्यांस तेथून उखडले. पण ही मसलत एकीकडे झाल्यानंतर पाटीलबावा आमचेच मूळ खणू लागले! आम्ही त्यांस बहुत प्रकारे सांगितले परंतु ते न समजता यास्तव, पाटीलबावांनी (जो) बेलभंडार दिला आहे, तो श्रीमंताकडे न्यावा तर दूर पंथ! पाटीलबावांनी तर निकट केली आहे. यास्तव आपण वडील, वचनाचे सच्चे, कैलासवासी सुभेदारांनी ज्यांस वचने बेलभंडार दिले. ते निभावून हिदुस्थान हस्तगत (आपलेसे) केले. ती वहिवाट पाहून राजांनी आपल्याकडे पाठविले आहे. आम्हांस हाती घेऊन पुढील कामे काजे आमचे हाते घ्या.''[१३५]

माधवरावांनी अहिल्याबाईस हे सविस्तर सांगितले त्यावर अहिल्याबाईंनी उत्तर केले की पाटलबावांस पत्र लिहा की, ''सर्वांशीच आपण वाईट झाल्याने पुढे कोणी आपल्या बेलभंडारास पातेजून हिंदुस्थान हस्तगत (आपलेसे) कसे होईल? यास्तव यांसी प्रस्तुत सलूख राखून पुढील कामे करा. पुढे प्रसंगोपात हे आपले टाफेखालीच आहेत. आतांच यांसी बिघडू नये इंग्रजांचेही पारिपत्य पुरतेपणे झाले नाही. यास्तव प्रस्तुत राणाजीशी वकील येथे आहे त्यास आम्ही आपल्या जवळ ठेवून घेतले आहे. तुमचे उत्तर झाल्यावर वकिलाबरोबर येथून कोणी भला माणूस देऊन तुम्हांकडे पाठवू''[१३६] त्याचप्रमाणे अशाच प्रकारे दुसरे उदाहरण सांगता येईल.

खेची राघोगडवाला, त्याचा पुतण्या चेतसिंग, त्याने सिरोज व भेलसे या प्रांती उत्पात मांडिला मार्ग चालत नाही, हजार पांचशे जमाव जाहल्याखेरीज मार्ग शुध्द चालत नाही त्यामुळे खेचीचा वकील येथे अहिल्याबाईकडे आला आहे. आमचे संस्थान पाटीलबावांस सांगोन सोडवावे त्यावरुन अहिल्याबाईंनी वकिलास ठेवून घेऊन राजश्री सुभेदारांस पत्रे लिहिली आहेत की, याचा बंदोबस्त करुन देणे.[१३७]

याप्रमाणे त्या संस्थानातील व्यक्तीच्या प्रश्नांची निरवानिरव करुन देत त्यांच्यात आपसांत भांडणे लावून त्यांनी कधीही स्वत:चा फायदा करुन घेतला नाही. इतकेच नव्हेत तर त्यांचा आपसांत चांगला मेळ लावून दिला. अहिल्याबाईच्या विदेशनीती तत्त्वामध्ये प्रथम आणि प्राथमिक सिध्दांत होता. तो म्हणजे शेजारील राज्यांबरोबर शांती आणि मैत्री व्यवहार यदाकादचित शेजारील राज्यातील

प्रशासकीय व्यवस्थेमध्ये काही समस्या निर्माण झाली तर ती समस्या सोडविण्यासाठी त्या तत्पर राहत असत जेंव्हा शेजारील राज्यांमध्ये विद्रोह होत एखादी समस्या निर्माण होत ती सोडविणे त्या आपले कर्तव्य समजत कारण त्या राज्यापासून आपल्या राज्यालाही समस्या निर्माण होऊ शकते. त्यांची त्यांना जाणीव होती व त्यांची समस्या सोडविणे त्या आपले कर्तव्य समजत त्यामुळे अनेक संस्थानांशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते.

हैद्राबादच्या राज्याबरोबर त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते तेथील शासक अहिल्याबाईला कुशलमंगल विचारीत असे. त्यांच्या धार्मिक सहिष्णूतेने त्यांना मुस्लीम राज्यात लोकप्रिय बनविले होते. त्यांच्या बरोबर मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे मुस्लीम राज्यातील जनतेच्या धार्मिक भावनांचा देखील अहिल्याबाई आदर करत.

हैद्राबादच्या निजामाची राजवट काही काळ होळकरांचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीवर होती. मुस्लिम राजवटीत वाद्यांचा गजर मोठ्या आवाजात वाजविण्यास परवानगी नसे. पण मल्हारी मार्तंडाच्या मंदिरात वाद्ये मोठ्या आवाजात वाजविली जायची. त्यास निजाम सरकारची परवानगी घ्यावी लागे. ती परवानगी घेण्यासाठी निजामचे अधिकारी पैसे मागत म्हणून निजामाच्या दरबारातील अहिल्याबाईंचे वकील महादेव लक्ष्मण यांनी अहिल्याबाईंकडे पैशाची मागणी केली. याबाबत एकदा अहिल्याबाईंनी आपल्या वकीलाला कळविले मुस्लिमांना वाद्ये, गजर मोठ्याने वाजविणे पसंत नसते, त्यांच्या भावना दुखवू नका आणि आपण ही मागणी पुन्हा पुन्हा करु नका. फक्त मंजुळ वाद्ये वाजवा.[१३८] यावरुन अहिल्याबाई मुस्लिम धर्माविषयी किती सहिष्णू होत्या हे लक्षात येते. शिवाय त्यांच्या सर्वधर्मसमभाव दृष्टीकोनाला तोड नव्हती  हे स्पष्टही होते.याचप्रमाणे धारच्या पवाराच्या बाबतीतही दृष्टीकोन शांततेचा आपूलकी व जिव्हाळ्याचा व मैत्रीपूर्ण होता.

एक वेळेस सुभेदार तुकोजी होळकर यांची पत्नी रखमाबाई होळकर यानी जानकीबाई पवार हयांच्याशी भांडून त्यांच्याकडच्या दोन तोफा आणि आणखी काही वस्तु ओढून नेल्या इतके झाले तेंव्हा अहिल्याबाईंचे मस्तक भडकले त्यांनी रखमाबाईंना खरमरीत पत्र लिहिले, ''कैलासवासी सुभेदार आणि उदाजी पवार यांचा घरोबा पहिलेपासून चालत आलेला. तुमचे वागणे त्याला धरुन नाही. मामलेदारांनी दूरचे परिणाम न पाहता कलह केला. तुम्ही कलह तोडावा ते न करिता नसताच दुराग्रह धरलात ! अवतीभवती मागेपुढे पाहून चार समजुतीच्या गोष्टी कराव्यात ते केले नाहीत इतके दिवसांच्या भाऊपणावर पाणी ओतलेत. मामलेदाराचे ऐकून जाबसाल चढीला नेलात जानकीबाई

तुम्हांजवळ बोलण्यासाठी आली असता तिच्या मागून माधवराव बल्लाळ याजला पाठवून गावाची नुकसानी केलीत त्यांची चीजवस्तु ओढून नेलीत. यात होळकर सरकारचा फायदा नाही आणि प्रतिष्ठाही नाही. अस्तु. झाले ते होऊन गेले. अत:पर तरी विचार करुन आपले रितीस चांगले दिसेल, पवारांशी संख्य वाढेल असे वागले केले पाहिजे जानकीबाई पवार तेथे आहेच त्यांच्या दोन तोफा गुरेढोरे इतर चीजवस्तु तुम्हांकडे मामलतदराकडे किंवा आणखी कोठे असतील त्या त्यांच्याकडे परत गेल्या पाहिजेत सुतळीचा तोडासुध्दा आपल्याकडे राहता कामा नये. त्यांचे तोफा घेणेचे कारण नाही. आपले घरी तोफांस कमी काय आहे? पूर्वापारचे संबंध कायम राखिले की त्यात सर्व आले.[१३९]

अशा प्रकारे अहिल्याबाईचे छोट्या असो किंवा मोठ्या शेजारील राज्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार होते. शांती, न्याय, समतेची नीती हा अहिल्याबाईंच्या बाहयनीतीचा सिध्दांत होता.

### ५.११ भिल्ल आदिवासी जमातीसाठी अहिल्याबाईंनी केलेले प्रशासकीय कार्य :

होळकर राज्याच्या सीमा विंध्य व सातपुड्याच्या दुर्गम पहाडीमध्ये विस्तारल्या होत्या. त्यातील निमाड प्रदेश घनदाट वृक्षराजीने व्यापला होता. हया पहाडी भागामध्ये भिल्ल, भिलाले, गोंड तथा कोरकू जातीचे आदिवासी रहात होते. त्यांची उपजिविका ही अधिक तर लूटपाट, चोरी, दरोडा हयांच्यावर अवलंबून होती. त्यामुळे निमाडचा भाग हा नेहमी असुरक्षित समजला जायचा इंग्रजांच्या काळात म्हणजे २० व्या शतकाच्या सुरवातीला सुध्दा हे क्षेत्र असुरक्षित समजले जात. अशा प्रकारे अशा असुरक्षित क्षेत्रांमध्ये शांती व सुव्यवस्था प्रस्थापित करुन जनजीवन सुखद व सामान्य करण्यासाठी अहिल्याबाईंनी जी प्रशासकीय व्यवस्था केली ती व्यवस्था अभूतपूर्व होती हे जॉन मालकम सारखे इंग्रजदेखील मान्य करतात आणि ते अहिल्याबाईचे हे कार्य त्यांच्या प्रशासन कौशल्याचे अंग मानतात.[१४०] अहिल्याबाईंनी भिल्लांसाठी कशापध्दतीने प्रशासकीय कार्य किंवा व्यवस्था केली हे पुढील प्रमाणे सांगता येईल.

ज्या वेळेपासून निमाडचे क्षेत्र पेशव्यांच्या अधिपत्याखाली आले तेंव्हापासून निमाडच्या सेंधवा तथा नागलवाडीचा भाग हा होळकरांच्या अधिपत्याखाली होता मध्यंतरी येथील अव्यवस्थेच्या कारणास्तव १७६८ मध्ये पेशव्याने हा भाग पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. परंतु १७६९ मध्ये पेशव्याने पुन्हा सेंधवा तथा नागलवाडी हा निमाडमधील भागाचा ताबा अहिल्याबाईजवळ दिला. इ.स. १७७८ मध्ये पूर्ण निमाड क्षेत्र होळकर, शिंदे आणि धारचे पवार या मराठा सरदारांच्या ताब्यात आले.[१४१]

अहिल्याबाईंच्या काळाध्ये प्रवास हा शक्यतो,पायवाट बैलगाडीच्या रस्त्याने केला जायचा त्याकाळी नर्मदेच्या दक्षिण आणि उत्तर हया दोन्ही किनाऱ्यावर पसरलेल्या निमाडच्या भिल्ल्यांच्या पहाडी भागांमध्ये प्रवास पूर्णत: असुरक्षित होता. मार्गामध्ये लूटपाट, चोरी,दरोडा, खून हयांचे सदैव भय होते. एकटे दुकटे प्रवास करणे शक्यच नव्हते तर शंभर दीडशे लोक समुहाला सुध्दा हया भागातून प्रवास करणे धोकादायक होते.[१४२]

अहिल्याबाईंच्या ताब्यात हा भाग येण्यापूर्वी पेशव्यांनी रामचंद्र बल्लाळ भुस्कुटे यांच्याकडे निमाडचे दायित्व सोपविले आणि 'सर मण्डलोई' ही पदवी बहाल केली आणि त्या भागात शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणे तेथे वसाहत तयार करुन शेतीला प्रोत्साहन देणे हे कार्य सोपविण्यात आले. पण भुस्कुटेंनी सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी बलाचा वापर करण्याचा प्रयोग सुरु केला. त्याने अनेक भिल्लांना पकडले आणि चांगले वागण्याची जमानत घेऊन त्यांच्या गळ्यात पट्टे बांधून राहण्याची परवानगी दिली होती. जो चांगले वागण्याची जमानत देणार नाही, गळ्यात पट्टे बांधून हिंडणार नाही आणि लुटमार खून, खराबी करायचा धंदा बंद करणार नाही.  अशांचा निमाडमधील खरगोनच्या चबुतऱ्यावर फरशीने शिरच्छेद केला जायचा.[१४३]

इ.स. १७७८ मध्ये निमाडमधील आदीवासी भाग अहिल्याबाईंच्या राज्याकारभारांतर्गत आला तेंव्हा अहिल्याबाईंनी भिल्लांच्या प्रशासकीय व्यवस्थेचे कार्य आपल्या हाती घेतले.

संवेदनशीलपणे भिल्लांच्या मूळ समस्यांचा शोध घेतला त्यांच्याबाबत आधिच्या क्रुर कठोर नीतीचा वापर टाळला. हया नीतीबाबत सर जॉन मालकम म्हणतो, नर्मदेच्या किना-यावर लघुपट करणारे गोंड लोकांशी तसेच पहाडी भागात राहणारे भिल्लच्या बाबतीत अहिल्याबाईनी जो प्रशासकीय व्यवस्था केली होती ती खुपच सुखद होती. ज्याप्रमाणे त्यांनी इतर प्रशासकीय उपाययोजना केलेल्या होत्या. परंतु त्या पूर्णरित्या यशस्वी झाल्या नाही. त्यांची आंतरबाहय कारणे वेगवेगळी आहेत.।[४४]

अहिल्याबाईंच्या राज्यकारभारातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे भिल्ल, गोंड, रामोशी इ. ज्या गुन्हेगार जाती होत्या. त्यांचा त्यांनी योग्य बंदोबस्त करण्याचा केलेला प्रयत्न होय. त्याकाळी या लोकांनी धुमाकुळ उडवून दिला होता. त्यांच्या पासून प्रजेस मोठा त्रास होत असे. या लोकांचा चोरीचा धंदा पिढीजात होता. हा धंदा ते उघडपणे व मोठ्या संभावितपणे करीत, धाडा टाकणे, मारामारी करणे इ. कामे ते लोक आपले आद्य कर्तव्यच समजत. त्यापैकी कोणी म्हणत की,

''मी महादेवाचा चोर आहे, पृथ्वीवर लोक फार झाले, त्यांचा संहार करावा अशी आम्हास देवाची आज्ञा झाली आहे.''[१४५]

एकंदरीत दरोडा घालणे हे त्यांच्या धर्मकृत्यांचे एक कलमच होऊन गेले होते. आधुनिक काळातील एखादा सुशिक्षित तरुणही आपले कर्तव्य काळजीपूर्वक करणार नाही. इतक्या काळजीपूर्वक हे लोक आपला धाडा घालावयाचे कर्तव्य करीत अशा लोकांपासून आपल्या प्रजेची सुटका करणे किंवा त्यांना सुरक्षितता प्रदान करणे हे मोठे आव्हान अहिल्याबाईसमोर होते. पण त्यांनी त्यांच्याशी दंडेली न करता तथापि त्यास शिक्षा न देता दया व सामोपचार याची योजना करुन त्यांना मूळसमाजात आणण्याचा प्रयत्न केला.

अहिल्याबाईंनी सर्वप्रथम त्यांच्या उपजिविकेची साधन उपलब्ध करुन देण्यावर आपले लक्ष केंद्रित केले ज्यांच्याशिवाय त्यांना लुटमारीपासून परावृत्त करणे शक्य नव्हते त्यांना लुटमारीपासून परावृत्त करण्याचा दृष्टीकोनातून त्यांनी निर्णय घेण्यास सुरवात केली. त्यांस लुटालुट करुन निर्वाह करण्यापेक्षा दुसरे चांगले धंदे करण्याविषयी ताकीद दिली व त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीचा विचार करुन डोंगरातून जो माल जात येत असे त्यावर अगदी थोडा कर घेण्याविषयी त्यास परवानगी दिली. या करारास भीलकवडी असे म्हणत व तो मालाने लादलेल्या प्रत्येक बैलास मागे सुमारे अर्धा पैसा इतका असे.[१४६] याशिवाय अहिल्याबाईंनी भिल्लांच्या संदर्भात आपल्या अधिकाऱ्यांना हुकुम दिला की, प्रमुख भिल्लांच्या टोळ्यांची संख्या काढून त्या टोळ्यातील सगळ्या सदस्यांना उदरनिर्वाहाच्या दृष्टीकोनातून खासगी जहागिरीदारीमधून मदत द्यावी.[१४७] फक्त हुकूम देऊन अहिल्याबाई थांबल्या नाही तर काही भिल्लांना घाटाची रखवाली करण्यासाठी नियुक्त केले त्यांचे मासिक वेतन निर्धारीत केले. भिल्ल आणि त्यांच्या बायका हयांचे गट करुन त्यांच्याद्वारे यात्रेकरुंना सुरक्षा प्रदान केली. त्यांना पगार राज्याद्वारे दिला जाऊ लागला.[१४८] त्या रानटी लोकांस बाईसाहेबांनी काही पडित जमिनी इनामदाखल देऊन त्याबद्दल त्यांच्यापासून रस्ते सांभाळण्याचा व त्यांच्या हद्यीत काही माल चोरीस गेल्यास त्याचा पत्ता लावून देण्याचा करार करुन घेतला.[१४९]

उसके सिवाय अहिल्याबाईने उनकी स्वत: याशिवाय अहिल्याबाईनी त्यांची स्वत:बडूत जागजागी चौकी निर्माण केल्या भिल्लाकडून लुटपाट करण्याची एका प्रकारे बंदी लावली तसेच त्याच्याकडून भिल्लांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी एका प्रकारे प्रयत्न केला.।[१५०]

भिल्लांचा उपद्रव कमी करण्यासाठी प्रशासकीय व्यवस्थेबरोबरच अहिल्याबाई स्वत: सुध्दा वैयक्तिकरित्या कटिबध्द होत्या.

ओंकारेश्वर जवळ रामपूरवाला नावाचा भील्ल राजा भिल्लांचा प्रमुख होता. इ.स. १७८३ च्या नोव्हेंबर महिन्यामध्ये त्याने ओंकारेश्वरजवळ धुमाकूळ उडवून दिला. अहिल्याबाईंना ही खबर मिळताच तेथे पुन्हा शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रथम चार पाच हजार पेंढारी भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवून दिले. नंतर स्वत: सैन्य घेऊन त्यांच्या बंदोबस्तासाठी निघाल्या. आणि एका महिन्याच्या आत भिल्लांचा बंदोबस्त करुन डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये महेश्वरी परतल्या.[१५१]

अशा प्रकारे त्यांचे बंदोबस्तासाठी केलेले उपाय हे प्रभावहीन झाल्यावर अहिल्याबाईनी भिल्लांच्या बंदोबस्तासाठी कठोर उपाययोजनाचा अवंलंब केला. ज्या भिल्लांमध्ये परिवर्तन झाले नाही अशा गुन्हेगार भिल्लांचा केवळ नाइलाज म्हणून वध केला.

अहिल्याबाईंनी ज्यांचा वध केला त्या लुटारुंमध्ये मनरुपसिंग नावाचा नर्मदेच्या किनाऱ्यावर लुटमार करणारा लुटारुसुध्दा होता. हया संदर्भात मालकम म्हणतो ''मनरुपसिंग या चोरट्या सरदाराच्या वंशाजाचा दंगा मोडवयास मला सारखा तीन वर्षे त्रास झाला. त्यामुळे अहिल्याबाईंसाख्या शांत माणसालाही आपली शांती कशी सोडावी लागली हे माझ्या लक्षात आले.''[१५२]

अहिल्याबाईंनी प्रथमच काही कडक उपाययोजनांची योजना अगदी निरुपयाने अंमलात आणलेली होती त्यांनी केलेली नुकसानी मनात आणून आणि लोकांत चांगला वचक रहावा म्हणून त्यांच्या पुढाऱ्यास तोफेच्या तोंडी दिले. डाकू लुटेरांच्या मनात भय कशा पध्दतीने उत्पन्न करायचे हे अहिल्याबाईं चांगल्याप्रकारे जाणून होत्या. परंतु उदारता, चांगूलपणा संतुष्टकारी उपायांना प्राथमिकता देणे अहिल्याबाईंना आवडत होते. त्यांचा परोपकारी स्वभाव व त्यांची धर्मावर असलेली श्रध्दा पाहिली तर लुटमार करणाऱ्यांना शांत जीवन व्यतीत करता यावे हाच त्यांचा मुख्य मानसिक हेतू होता.

अहिल्याबाईंनी जी व्यवस्था पहाडी इलख्यातील भिल्लांच्या संदर्भात केली तीच व्यवस्था लुटमार करणाऱ्या गिरासियाच्याबाबतीत सुध्दा केली. त्यांच्या टाका किंवा तो जे कर घेत त्यास मान्यता देऊन शांतता प्रस्थापित केली महादजी शिंद्यांनी सुध्दा हयाच नीतीचा अवलंब करुन आपल्या राज्यात शांतता प्रस्थापित केली.[१५३]

अहिल्याबाईंद्वारा भिल्लांच्या पहाडी इलख्यामध्ये केलेल्या प्रशासकीय व्यवस्थेमुळे इंग्रजसुध्दा प्रभावित झालेले होते. त्याद्वारे इंग्रजांना हया गोष्टीचे ज्ञान प्राप्त झालेले होत की त्यांच्या परंपरागत व्यवस्थेत हस्तक्षेप न केल्यास त्यांचे परंपरागत अधिकार मान्य केल्यास त्यांना बाकीच्या सोयीसुविधांची अपेक्षा नसते.[१५४]

इंग्रजानीसुध्दा गिरासिया प्रमुख किंवा पहाडी भागातील भिल्ल हयांचे प्रश्न शांतपापूर्वक मार्गाने सोडविण्यासाठी अहिल्याबाईच्याच नीतीचाच अवलंब केला. या संदर्भात सर जॉन मालकम हे स्पष्ट शब्दात कबूल करतात की ''मला सुध्दा या वर्गाच्या लोकांबरोबर हयाच प्रकारच्या नीतीचा अवलंब करावा लागला.[१५५]

होळकर राज्याचे कारभारी तात्या जोग म्हणतात, अहिल्याबाईंनी त्यांच्या काळात उदारता भलाई, संतुष्टकारी उपायांनी त्यांच्याबरोबर मधूर संबंध प्रस्थापित केलेले होते.[१५६]

सामाजिक विषमतेचे बळी ठरलेले भिल्ल हयांना योग्य न्याय दिला. बळाच्या वापरानेच सर्व प्रश्न सुटतील असे नाही काही प्रश्न मायेने ममतेने सन्मार्गाने सोडविता येतात हयांचा आदर्श अहिल्याबाईंनी घालून दिला. इंग्रजांनी सुध्दा हयाच आदर्शाचा वापर पुढील काळात केलेला दिसून येतो.

एखाद्यास द्रव्यसाहय देऊन श्रीमंत करणे फार सोपे आहे पण अशिक्षित व धर्मवेड्या लोकांतील दृष्ट चालीरिती काढून त्यास सन्मार्गी लावणे हे कठीण असते पण अहिल्याबाईंनी आपल्या प्रशासनिक कौशल्याचा वापर करुन अशक्य गोष्ट शक्य करुन दाखविली. भिल्लांच्या उपजिविकेची साधने निर्माण केली. त्याद्वारे जनतेला सुरक्षा प्रदान झाली. राज्यात शांतता सुव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे व्यापाराची वाढ झाली. परिणामी राज्याचीही आर्थिक परिस्थिती सुधारली.

या एकाच घटनेत अहिल्याबाईंच्या अनेक गुणांचा सहज परिचय होतो. दु:खितांविषयी करुणा, प्रजाविषयक वात्सल्य आणि दूरदृष्टी यांचा समन्वय आढळतो. अपराधी अपराध का करतो हे न्याय व्यवस्थेने समजुन घेतले पाहिजे. भिल्ल व गोंड लुटालुट का करतात हे जाणून घेतल्यामुळे अहिल्याबाईंनी त्यांना उपजिविकेची साधने देऊन त्यांच्या वृत्तीत परिवर्तन घडवून आणले. दंड व उपदेशाने हे शक्य नव्हते. या बाबत जॉन मालकम म्हणतात, ''समाजशास्त्र हा शब्दही पाश्चात्य जगाला परिचित नव्हता. आणि ज्याला कोणी संरक्षण / विश्वास देत नाही, तो दुसऱ्याला संरक्षण

देण्यास समर्थ असत नाही. हे समाजशास्त्रीय नैतिक सूत्रही लोकांनाही अवगत नव्हते. ते या बाईंनी कसे अंमलात आणले याचे मला फार आश्‍चर्य वाटते.[१५७]

## ५.१२ अहिल्याबाई होळकरकालीन डाक व्यवस्था :

आपल्या देशामध्ये डाक व्यवस्थेचा इतिहास प्राचीन आहे. इतिहास काळात आत्ताप्रमाणे मनुष्याच्या गरजा वाढलेल्या नव्हत्या. गाव तेच राज्य, पाटील तोच राजा प्रांत तो ओळखीचा देश प्रत्यक्ष एक वस्तु देऊन दुसरी वस्तु घेणं ही बाजारी देवघेव असा प्रकार असल्यामुळे त्याकाळात टपाल पध्दतीचेही स्वरुप बरेच भिन्न होते. त्याकाळात गाव सत्तेपेक्षा राजसत्तेला टपालाची अवश्‍यकता पुष्कळच अधिक होती. तसेच या टपालाचे स्वरुपही हंगामी होते. केवळ ज्याच्या त्याच्या पुरते म्हणजे गावचे टपाल राज्याचे टपाल, आणि सावकार व्यापाऱ्यांचे टपाल असे तीन मुख्य भेद त्याकाळातील टपालाचे आढळतात. एकंदर महाराष्ट्र राज्याच्या सामान्यत: दोनशे वर्षामध्ये १६४७ ते १८४७ यापध्दती मध्ये बराचसा चढ उतार झालेला दिसतो.

सन १७०० नंतर माळव्यामधील सारी व्यवस्था भिन्न भिन्न झालेली होती. मराठ्यांच्या सैनिकी चढायामुळे अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे चालू डाकव्यवस्था देखील यापासून दूर राहू शकली नाही. शेर शहासूरी आणि मुगल सम्राट यांच्याद्वार स्थापन झालेली डाक व्यवस्थामध्ये निर्जीवता आली होती. मल्हारराव यांच्या मृत्युनंतर प्रशासनाची संपूर्ण व्यवस्था अहिल्याबाई होळकर यांच्या हाती आली. राज्याची प्रमुख म्हणून त्यांना राजधानी महेश्‍वरमध्ये राहणे क्रमप्राप्त झाले. त्याकाळात दळणवळणाची साधने फारच तुटपुंजी होती. अहिल्याबाईंचे धार्मिक कार्य पूर्ण भारतात सुरु असे. तुकोजी होळकरही दूरवरच्या मोहिंमांवर जात असत. होळकरांच्या दौलतीचे व खासगी जहागिरीचे अधिकारीही निरनिराळ्या प्रांतात कार्यरत असत. त्यांना वेळेवर आपले आदेश पोहचावेत, आपल्या प्रजेचे सुख दु:खे कळवित इतर राज्यकर्त्यांशी संपर्क राहावा या सारख्या अनेक कारणांसाठी अहिल्याबाईंनी पूर्वीच्या डाकव्यवस्थेत मुलभूत स्वरुपाचे बदल घडवून आणून तिची नव्याने रचना केली.[१५८] कारण हे बदल करणे आवश्‍यक होते. कारण काळानुरुप प्रत्येक व्यवस्थेत बदल होत असतो.

सरकारी व सावकारी अशी डाक व्यवस्था असे. शांततेच्याकाळात सरकारही सावकारी टपालाचा वापर करी. युध्दाच्या काळात मात्र सरकराची खास व्यवस्था असे. अहिल्याबाईंच्या काळात या व्यवस्थेला ‘डाक बसवणे’ असे संबोधले जाई. राज्या अंतर्गत ठराविक ठिकाणी ‘डाक चौकी’

निर्माण केलेली असे. दोन चौकी यातील अंतर साधारणत: १० कोसाचे राहत असे. पत्र घेऊन जाणाऱ्या कासीयाचे वर्ग किंवा श्रेण्या निर्माण करण्यात आल्या होत्या. हरकारा, राऊत, पियादा, रसनागिदान', जथेदार, जथेदाराला हेर म्हणून ओळखले जात. व तेच डाकव्यवस्थेचे टपाल पोहचविण्याचा मक्ता घेत. कासीद सामान्यत: पायी चालत. कासीद दोन व्यक्तीची एक जोडी राहत असे. तसेच काही काशीद जोड्या उंट, घोडे, यांचा वापर डाक पोहचविण्यासाठी करीत.[१५९] अशा प्रकारे अहिल्याबाई यांच्या काळात डाक व्यवस्थेचे काम चालत असे.

कधी पत्र शत्रुंच्या हाती पडू नये म्हणून निरोप पाठविला जाई, की अमुक व्यक्ती समक्ष निवेदन करतील त्यासाठी विद्वान माणसांचा उपयोग करीत. जासूद जोडीने पाठविला असे. संकटाच्यावेळी एकाची दुसऱ्यास मदत व्हावी, आजारी पडला किंवा शत्रुच्या हाती सापडला तर दुसरा सुरक्षित राहील हा या मागचा उद्‌देश होता. माणसांच्या हाती निरोप वा टपाल पाठविण्याची व्यवस्था परंपरागत होती. या व्यवस्थेत आयुष्य घालवून पारंगत झालेले अनेक लोक होते.

इ.स. १७५३ - ५४ मध्ये बापूजी महादेवला पुण्याहून पत्र पाठविले तेंव्हा कासीद जर पुण्याला असत भारतात विविध ठिकाणी सुरु असलेले बांधकामे, दानधर्म, धार्मिक कार्य, यांची माहिती त्यांना मिळवून त्यावर अहिल्याबाईंचे नियंत्रण राहत असे. डाक व्यवस्थेमुळे पुणे दरबाराशी सतत संपर्क राहून तिने पेशव्यांची विश्वास व आदर प्राप्त केला होता. पेशव्यांच्या काळात राज्यविस्तार वाढल्याने डाक व्यवस्थेचा विकास करणे आवश्यक होता. निरनिराळ्या ठिकाणाहून बातम्या गोळा करणे व ठिकठिकाणी त्या पोहचविणे यासाठी पेशव्यांनी काही खास माणसे नेमली होती. त्यांना डाक ठेवणे असे म्हणत. सरकारी निरोप पोहचविणाऱ्यांना सरकारी डाकवाले असे म्हणत. जनसामान्यांसाठी खासगी स्वरुपाची डाक व्यवस्था होती. त्याला सावकारी डाक व्यवस्था म्हटले जाई. जासूदाचा एक वर्ग असे. एका गावाची पत्रे दुसऱ्या गावाला पोहचविण्याचे काम तो करी. पत्रे देणारा व स्वीकारणारा या दोघांकडून त्यांना योग्य तो मोबदला मिळे. तेवढा मोबदला जास्त असे. सन १८३७ मध्ये पोस्टाचा कायदा मंजुर झाला. हा कायदा ईस्ट इंडीया कंपनीने केला व नवी डाक व्यवस्था अंमला येऊ लागली.

अहिल्याबाई होळकारांनी देखील आपल्या राज्यात डाक व्यवस्थेची उत्तम व्यवस्था ठेवली होती. १६ व्या दिवशी पोहचला तर ५०रु. १७व्या दिवशी पोहचला तर ४०रु. तर १८व्या दिवशी पोहचला तर ३०रु., १९व्या दिवशी पोहचला तर काही देऊ नये असे ठरले होते. पुणे ते दिल्ली

७०० मैल अंतर १६ दिवसांत म्हणजे दररोजची चाल ४५ मैल होती.[१६०] अशा प्रकारे सर्व व्यवस्था ठरलेली होती. त्यानुसारच काम चालत होते. पुणे ते महेश्वर आणि महेश्वर ते पुणे या अंतरातील डाक व्यवस्था पुढल प्रमाणे होती.

४० महेश्वर पासून थालनेर पर्यंत कोस

४० थालनेरहून चांदवड पर्यंत कोस.

३० चांदवडहून संगमनेर पर्यत कोस

४२ संगमनेरहुन पुण्यापर्यत कोस

१५२

यासी कासीद जोड्या पाच कोसाकोसांवर जोडी एकेक प्रमाणे जोड्या ३४ यास दरमहा रु. २४० डाक चौकीच्या जोड्या३० असाम्या ६० दर चार रुपये, ४८ सरबाईच्या जोड्या असाम्या आठ, दर ६९ प्रमाणे २८८,''[१६१] अशा प्रकारची व्यवस्था त्यांनी डाक व्यवस्थेसाठी केलेली होती.

इ.स. १७९२ मध्ये महेश्वर ते पुणे या अंतरासाठी ४८ तासी जोड्या नियुक्त करुन त्यांना २८८ रुपये पगार दिला होता. या स्वारांनी दर महिन्यास येऊन डाक पोहचती करावी. पाच सात दिवसांच्या अंतराने पुण्याची डाक घेऊन यावी आणि या वेळत जर कमी जास्त दिवस झाले तर किंवा कागदाची गफलत झाल्यास कासीदांना कामावरुन कमी करण्यात येत असे.

अहिल्याबाईंनी निर्माण केलेल्या या डाक निर्माण योजनेमुळे त्यांचा भारतभर संपर्क राहत असे. भारतात सुरु असलेल्या घडामोडी, पराराज्यातील आपल्या वकीलांमार्फत येणाऱ्या पत्रातून त्यांना कळत.

### ५.१३ अहिल्याबाई आणि कवायती कंपू :

ब्रिटिशांच्या राजकारणाला, डावपेचांना व महत्त्वाकांक्षेला अहिल्याबाई ओळखून होत्या. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी व विस्तारवादी धोरणाचा मुकाबला करण्यासाठी आपल्या जवळही शिस्तबध्द व प्रशिक्षित फौज असावी असे अहिल्याबाईस वाटत होते. म्हणून त्यांनी स्वत: इ.स. १७९२-९३ च्या सुमारास कर्नल जी.पी. बाईड नामक अमेरिकन सेनानीकडे पाश्चात्य पध्दतीची फलटण तयार करण्याची जबाबदारी सोपविली. पाश्चात्य लोक इतरांच्या सेवेत दाखल होताना जहागीर मिळावी, अथवा आम्ही स्वकीयांसोबत लढणार नाही अशा प्रकारच्या अटी घालीत असत. जी.पी. बॉईड सोबत केलेल्या करारात अहिल्याबाईची राजकीय दूरदृष्टी व चातुर्य दिसून येते.[१६२]

१)फलटण संघटित करण्यासाठी संख्या व वेतन ठरवून दिले

२) आवश्यक दारुगोळा सरकार आपल्या पैशाने पुरविल

३) १८११४ रु ४ आणा यापैकी ११४८९ रुपये पुणे येथे दिले जातील आणि बाकीचे ६६२५ रु ४ आणे महेश्वर येथे मिळतील

४) गणवेश व शस्त्रे खराब झाल्यास चौकशी केल्यावरच दिली जातील.

५) कर्नल बाईड दोन हजार पगार राहील दोन सरदार राहणार नाहीत

६) एक फलटण एकाचा सरदाराच्या नियंत्रणात राहील.दोन सरदार राहणार नाहीत.

७) हरकऱ्यांना महादजी शिंदे प्रमाणे वेतन दिले जाईल.

८) फलटणीने एक महिन्याच्या महेश्वरला यावे. तेथे भरतीची चौकशी होईल.

९) तोफा, बैलगाड्या, दारुगोळा तसेच त्यासाठी लागणारे लोक यांची संख्या व निश्चित केले ते २१००रु होते

१०) भरती केलेल्या लोकांना एक वर्ष नोकरी करावी लागेल

११) दरमहा शिपायांची हजेरी होईल त्यावेळी गैरहजर लोकांचा पगार वेतनातून कापला जाईल.

१२) सरकारचा आदेश मानून त्यानुसार काम करावे लागेल.

१३) फलटणीचे काम पाहण्यास दरबारात अप्पाजी चिमणाजी राहतील

१४) फलटण महेश्वरला आल्यावर करारावर शिक्कामोर्तब केले जाईल.

महेश्वर येथे कराराला स्वीकृती देऊन फलटण इंदोर येथे पाठविली २५ मे १७९३ रोजी कर्नल बॉईडने करार मान्य करुन एकनिष्ठेने सेवा करण्याचे कबूल केले. त्यानुसार त्याने इ.स. १७९५ पर्यंत अहिल्याबाई होळकरांची सेवा केली.[१६३]

### ५.१३.१ कराराची वैशिष्ट्ये :

भारतात सर्वप्रथम पाश्चात्य पध्दतीवर सैन्य सुसंघटित करण्याचे श्रेय म्हैसुरच्या हैदर अलीकडे जाते. त्यांचाच कित्ता त्याच्या मुलाने टिपूने गिरवला व पुढे निजामानेही त्याचे अनुसरण केले उत्तर हिंदुस्थानात सर्वप्रथम गोहदच्या राण्याने मेडो, सॅक्टर व टॉमस लेग हयांचे मदतीने पलटनी उभ्या केल्या.[१६४] डीबॉयनेही सर्वप्रथम गोहदच्या राण्याजवळच गेला होता. त्याने नाकारले नंतर शिंद्यांचा शत्रू जयपूरच्या राजाचे पदरी दोन हजार रुपये पगाारवर राहिला. इ.स. १७८४ च्या

सुमारास महादजीच्यादरबारी असणाऱ्या इंग्रज वकील अंडरसनच्या मदतीने तो शिंद्यांकड आले इ.स. १७८४ नंतर मराठाशाहीत इंग्रज पध्दतीच्या पलटणी उभ्या करण्याची लाट उसळली होती इ.स. १७९१ तुकोजी डयुड्रेनीकास आपले पदरी ठेवले. इ.स. १७९४ तर आणखी पलटणी वाढविल्या व पुढे प्लिमेट व गार्डनर यासही पदरी ठेविले. शिंद्यांच्या उपसेनेतही इंग्रजी अधिकारी घुसले लखबाबादादाकडे वाटरफोल्ड अंबाजी इंगळेकडे शेफर्ड व बेलासिस आप्पा खंडेरावकडे जार्ज टॉमस हे होते नंतर दौलतराव शिंद्यांनी जॉन हेसिंग मायकेल फिलोस कॅप्टन, ब्रानरिंग आणि कर्नल सेलर आपले पदरी ठेविले. आणि बाजीराव पेशव्याने मेजर टोन, मेजर बॉईड व कॅप्टन फोर्ड यास आपले पदरी ठेविले होते.[१६५]

वरील मराठाशाहीच्या सरदारांनी त्यांचे पदरी ठरविलेल्या युरोपीय अधिकाऱ्यांशी केलेले करारमदार अहिल्याबाईंनी कर्नल बॉइडशी केलेला करार यांचे वैशिष्ट्ये वेगळे आहे ही वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी प्रथम वरील मराठा सरदारांचे युरोपीय अधिकाऱ्यांबरोबर केलेले करार मदार जाणून घेणे आवश्यक आहे ते पुढीलप्रमाणे

१)आपण इंग्रजांविरुध्द लढणार नाहीअसा करार डीबॉइनने महादजींशी केला होता. २)हिंदी राज राजवाड्यांच्या नोकरीत जे युरोपियन होते त्यांचा करारच प्राय: असा असे की स्वकीयांविरुध्द युध्द उपस्थित झाले असता आपणास लढण्याची माफी असावी३) फौजेच्या खर्चाकरिता त्यांस जहागीर अथवा जायदाद दिली जात असे डीबाईनला सोळा लाखाची जहागरी दिली होती डयुड्रेनिकास नेकलाही नंतर खर्चासाठी रामपुऱ्यांत जायदाद दिल्याचा उल्लेख आहे. ४)अशा प्रकारे ते एक प्रकरे स्वतंत्र नबाब बनले फरक एवढाच की ते केवळ मिजासी नबाब नसून लढवय्ये होते.५) यांचा उपयोग परकीय सत्तेविरुध्द करता येण्याची गुंजाइशच मुळी त्यामुळे राष्ट्रीयता राखण्याचे कामी या पाश्चात्य पध्दतीचा सैन्याचा मराठेशाहीस काही उपयोग झाला नाही.६) हयांचे उलट यांचे बळावर आपसांत परिणामी सत्तास्पर्धा व वैमनस्य वाढून मराठेशाही खिळखिळी झाली ७) इंग्रजांसारख्या शत्रूसही केवळ जाहारनाम्यानेच हिंदी राजेरजवाड्याची युध्दाचे ऐन वेळी झाली क्षीण करणे सरळ झाले.[१६६]

थोडक्यात सांगावयाचे म्हणते ''कवाइती पलटणी आणि तोफा यांचे जोरावर जो दौलतराव शिंदे पेशव्यांसही डोईजड झाला होता.त्याचाही अशा प्रकारच्या करारामुळे इंग्रजांपुढे सहा महिनेही

टिकाव लागला नाही.[१६७] पण अहिल्याबाईने जो कर्नल बॉईडशी करार तो वरील प्रकारच्या कराराहून अगदी भिन्न होता तो करार किंवा त्या करारांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१.पाश्चात्य सेनापती स्वकियांशी लढणार नाही या अटीवरच कवायती कंपू तयार करीत असत. तरी सुध्दा भारतीय राज्यकर्त्यांनी त्यांना आपल्या चाकरीत घेतले कारण त्यांना आपसांत लढाया करावयाच्या असल्याने पाश्चात्य सेनापतीच्या या अटीचे गांभीर्य त्यांना कळलेच नाही. अहिल्याबाईंनी दूरदृष्टीने ही अट स्वीकारली नाही.

२. पाश्चात्य सेनापती जहागिरी मागतील व त्यांच्या जोरावर पुढे ते अनियंत्रित होतील या धोक्याची पूर्ण कल्पना अहिल्याबाईस असल्याने बॉईडला मासिक वेतनावरच नोकर ठेवले होते फलटणीतील सैनिकाही वेतनावरच होते हरकऱ्यांना महादजीप्रमाणे वेतन देण्याची अटच फक्त मान्य केली गेली.

३. सैन्यासाठी बंदुका व संगीनी खरेदी करु शकेल एवढीच रक्कम बॉईडला पुण्याला मिळणार होती. व बाकी रक्कम महेश्वरला मिळणार होती त्याला करार मान्य नसेल तर तो बंदुका ठेवूनच परत जाणार होता. त्यामुळे राज्याचे कोणतेही नुकासान होणान नव्हते.

४. करारानुसार दारुगोळ्यासाठी पैसे दिले जाणार नव्हते. कारण ताब्यात असलेल्या बंदुका व तोफा यांची भीती दाखवून त्याला कोणतीही राष्ट्रविरोधी कारवाई करता येऊ नये याची दक्षता घेतली गेली. दारुगोळ्यासाठी त्याला पूर्णपणे सरकारवर अवलंबून ठेवले गेले. दारुगोळा अभावी बंदुका व तोफा कुचकामी ठरणार होत्या. गणवेश व बेकार झालेली शस्त्रेही चौकशी शिवाय विकत घेता येऊ नये अशी करारात तरतूद करुन सर्व प्रकारे संभाव्य धोका टाळण्यात आला होता.

५. एकच सेनापती असल्याने संघर्षाची भीती नव्हती. शिवाय खर्चातही बचत करण्यात आली.

६. चौकशी नंतर करार व त्यानंतर आवश्यक साहित्य पुरविण्याचे ठरलेल्या व दारुगोळ्याचा खर्च सरकारकडे असल्याने धोका नव्हता. एकनिष्ठ सैनिकांच्या पगाराची व्यवस्था होती.

७. तोफखान्यातील २२२ लोकांपैकी फक्त २० लोक पाश्चात्य असून बाकी लोक भारतीय होते. एका पाश्चात्य गोलंदाजासोबत तीन भारतीय देण्यात आले होते. सैनिक शासनाच्या अंकीत ठेवून मासिक हजेरी व चौकशीचा अंकूश ठेवला.

८. कंपूला शासनाच्या आदेशानुसार काम करण्याची अट असून त्यातून कोणतीही सूट नव्हती.

९. ही व्यवस्था सुरळीत अंमलात येण्यासाठी दरबाराचा स्वतंत्र अधिकारी नेमण्यात आला होता. तो अतिशय विश्वासू असल्यामुळे यासंबंधी पूर्ण माहिती मिळत असे.

१० कोणालाही स्वतंत्र अधिकार दिला नाही अंतिम स्वीकृती त्यांनी आपल्या हातात ठेवली होती.[१६८]

अशा प्रकारे दोन्ही प्रकारच्या करारांत जो भेद दिसून येतो यावरुन असे म्हणता येईल की पहिल्या प्रकारचे करार आपल्याच लोकांचे व राजेरजवाड्यांचे सत्तेविरुध्द निजी वैयक्तिक बळ वाढविण्याचे उपयोगी होते तर अहिल्याबाईंनी केलेल्या करारात खऱ्या अर्थाने राष्ट्रीय बळ वाढविण्याची भावना दिसून येते  कराराचे वैशिष्ट्यही दिसून येते.

**५.१४ टाकसाळ व नाणी :-**

होळकरशाहीची नाणी पाडण्यास सुरुवात मल्हाररावांनीच केली. मल्हाररावांनी चांदवड या ठिकाणी टाकसाळ सुरु केली.[१६९] अहिल्याबाईंनी इंदोर येथे नाणी पाडण्यासाठी टाकसाळ इ.स.१७६६ मध्ये सुरु केली होती.ही टाकसाळ मनोहरदास यांस मक्त्याने चालविण्यास दिली होती. टाकसाळ चालविण्याची जबाबदारी एखाद्या व्यक्तिवर सोपविली असली तरी, नाण्याचा दर, धातुचा कस यावर सरकारचे नियंत्रण राहत असे. सावकारास सरकारकडून सव्वा रुपया मिळत असे. अहिल्याबाईंच्या काळात प्रामुख्याने तांब्याची व चांदीची नाणी पाडली गेली. महेश्वर येथे पाडण्यात आलेल्या नाण्यावर बेलाची पाने, शिवलिंग, जलधारी पुष्प परशु अशी चिन्हे असत. ही नाणी दानधर्मासाठी वापरली जात असत. इंदुरला पाडलेल्या नाण्यावर चंद्र सूर्याच्या आकृती असत.[१७०] अहिल्याबाईंनी सोन्याची नाणी पाडली नाहीत. चांदीची नाणी एक, दोन, चार, आठ आणे व रुपया असे असत.तर तांब्याची एक पैसा व अर्धा आण्याची  होती. तांब्याची  नाणी इंदुर तर चांदीची  नाणी महेश्वर असे विभागणी होती. तिच्या नाण्याला इतर राज्यातही महत्त्व होते. नाणी वजन व शुध्दतेच्या दृष्टीने उत्तम दर्जाची होती. मिश्रणाचे प्रमाण चांदीच्या नाण्यात पंधरास एक होते.[१७१] सन १७६७ पासून अहिल्याबाईंनी शिवार्पण केलेल्या राज्याचे प्रतिक म्हणून चांदीच्या नाण्यावर शिवलिंग बिल्वपत्रांनी बेलपाने शिवलिंग कोरलेली मुद्रा छापलेली होती.[१७२]

होळकर राज्याच्या सीमेमध्ये बऱ्याच काळापर्यंत सलीमशाही किंवा सालमशाही (शाह आलमशाही) प्रकारची शिक्के प्रचलित होते. अशा प्रकारचे शिक्के उदयपूर, प्रतापगड, देवला, कोटा, टोक, भोपाळ तथा ग्वाल्हेर राज्याद्वारे बनविले जात. अहिल्याबाईंच्या काळात काही राज्यांचे सालमशाही सिक्के होळकरराज्याच्या सिमेमध्ये प्रचलीत होते. त्यामुळे या सिक्क्याद्वारे व्यापारी आणि जनता त्यांना वस्तुंच्या देवघेवींच्यामध्ये मूल्यमापनाच्या दृष्टीने अडचणी निर्माण होत. अहिल्याबाईंनी सालमशाही सिक्के तयार करणाऱ्या राजसत्तेबरोबर या विषयी चर्चा करुन मोठ्या कुशलतेने आलमशाही शिक्क्यांची १२ % अवमूल्यन करुन आपली प्रजा व व्यापाऱ्यांना दिलासा दिला.[१७३]

**५.१५ अहिल्याबाईंची महत्त्वाची प्रशासकीय पत्रे :**

**पत्र क्रमांक १**

सु ११७६ रवि लखार ४

इ.स.१७७५ जुन ३

श्री.

मो. । अनाम देसाई व कानगो

पा. । नंदुरबार यांसी अहिल्याबाई

होलकर सुभासित सबेन मया व अलफे.

पा.। मजकुरी फौजेची पायमाली

जाल्याने रयत परागंधा जाली त्या

ची समजुती करुन अनावया करी

ता. मामलेदारास व तुम्हास पत्रे लिहीली.

रयतीस खातर जमेची कौल पाठविले

असता समजुत पडत नाही. प्रकारे खा

तर जमा होऊन मन माने तसे आरुचे जा

...........तेथील लावणी जाली किंव नाहीरि

तिने जाबसाल केल्यास अवघड पडत

नाही प्रस्तुत सरकारातून कारकुने

पाठविली आहे. पा । मारचे वर्तमान
त्याजला माहित करुन रयतेशी
खर्च विद्यमाने होऊन खातर जमो
करुन लावणीचा बंदोबस्त उत्तम

मोर्तब
सूद

अहिल्याबाई होळकर यांचे हे पत्र असून सामान्य रयतेसंबंधी असलेल्या त्यांच्या दृष्टीकोनावर या पत्रामुळे उत्तम प्रकाश पडतो. रयतेवर अन्याय होऊ नये फौजेमुळे शेतजमीनीची प्रसंगी नासधुस होते. त्यासाठी कानुगो देसाई यांनी काळजी घ्यावी. तसेच परागंदा झालेल्या रयतेस धीर देऊन आणि समजूत काढून पुनर्वसन करावे अशी तळमळ या पत्रामध्ये व्यक्त झालेली दिसते.

**पत्र क्रमांक २**

सु. ११७७ जौवल ११

इ.स. १७७६ जून २८

श्री

मो । आनाम देसाई व कानगो
पा । नंदुरबार यासी अहिल्याबाई
होलकर सुभा सबासनैन मयाव अल
फे गुदस्ता फौजेच्या येण्याजा
वयामुळे खर्च पडला असेल त्याची
पटी करुन परभारे येवज साधून
घेणे म्हणोन पेशजी तुम्हास व मा
..............दीकत करील त्याजला
ताकीद
चांगली निक्षूण करुन येवजाचा
निर्गम करुन घेणे. येविषईचा
फिरुन बोभाट यऊन देणे. जाणिजे

मोर्तन
सूद

१७५

छ.११जौवल

फौजेच्या हालचालीमुळे रयतेची जे नुकसान झाले आहे त्याची योग्य ती भरपाई करुन देण्याविषयी सूचना या पत्रामध्ये केलेली आहे. भरपाईचे बाबत कोणी जादा मागणी केल्यास त्याला ताकीद द्यावी असा इशाराही या पत्रात केलेला आहे.

**पत्र क्रमांक ३**

सु. ११७७ रजब ९

इ.स. १७७६ ऑगस्ट २४

श्री

मा । अनाम सीवशंकरदास देसा

ई कानगो पा । नंदुरबार यासी

अहिल्याबाई होलकर सु । सबा

बैन मयाव अलफे पत्र पाठविले पा.

वले साहेबी आज्ञापत्र सादर केले ते

थे आज्ञा की पा । मा ।। री श्रीमंता

चे वगैरे फौजेच्या दंग्यामुळे सीन

..............................

मागील सल्याहवायाचे ते लिहिले असे तुम्ही


बाजू .....................

व मामलेदार येक विचारे राहून प्रो।

माराचे लावणीचा बंदोबस्त उत्तम

प्रकारे करुन सरकार किफायेत हो

येते करणे जाणिजे छ ९ रजब




१७६

अहिल्याबाई होळकरांनी हे पत्र नंदुरबार परण्याच्या कानुगो देसाईला लिहिले असून पेशव्यांच्या फौजेमुळे जो दंगा झाला त्यासाठी जो शिबंदी खर्च लागला, त्याच्या पूर्ततेसाठी कर बसवून खर्च भरुन काढावा मामलेदारांचे सहाय्य घ्यावे असे पत्रात म्हटले आहे.

**पत्र क्रमांक ४**

सु. ११७७ रजब ९

इ.स. १७७६ ऑगस्ट २४

श्री

राजश्री भास्कर क।।र

४।। नंदुरबार गोसावी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राज

मान्ये श्री अहिल्याबाई होलकर

दंडवत सु।। सबासबैन मयाव

अलफे ४।। मजकुरी फौजेच्यद

ग्यामुळे सिंबदी खर्च जास्त लागला

...............


मागील बाजू

रासी हरयेकविषयी गौसीन वर्तणूक

करुन त्याचा आब रक्षून सरकार

कामाचा बदोबस्त करणे जाणिजे

इ.९ रजब बहुता काये लिहिणे




१७७

हे अहिल्याबाई होळकर यांचे पत्र असून शिबंदीवर झालेल्या खर्चाची तुट भरुन काढण्यासाठी कर बसविण्याचा आदेश हया पत्रात दिलेला आहे.

**पत्र क्रमांक ५**

सु. ११८२ रजब २९

इ.स. १७८१ जून २२

श्री

मा।। अनाम देसाई व कानगो ४।। नं.

दुबार यांसी अहिल्याबाई होलकर

सु।। ईसने समानीय मया अलफे मौजे

आछी व आमलया ४।। हे गाव खा

सगळीकडे आहेत तेथै गुदस्ता केसो

कृष्ण याचे दंग्यामुळे व चिरंजीव

राजश्री तुकबाचा फौजेसुधा

मुकाम जाल्याने तसनस जाली असावा

....................

मागील बाजू - मिलोन हरदो गावे पाये मालीची


चौकसी कारकून व जासूद याचे

वि।। करुन वाजवी नुकासान जाले

असल्यास महाल सिरस्त्याप्र ।। सु

र तूट देऊन जमाबंदीचा ठराव

करणे जाणिजे छ २९ जाखर मोर्तबसुद




१७८

अहिल्याबाई होळकर यांचे हे पत्र असून या पत्रामध्ये केसो कृष्ण यांच्या दंग्यामुळे आणि तुकोजी होळकर यांच्या फौजेच्या मुक्कामामुळे आरछी व आमलये या दोन गावांमध्ये नुकसान झाले तेंव्हा मामलेदार व देसाई या दोघांनी मिळून दोन्ही गावांच्या नुकसानीची चौकशी करावी व त्यानुसार महसूलामध्ये सूट देऊन जमाबंदीचा ठराव करावा असा उल्लेख या पत्रांमध्ये नंदूरबारच्या देसायांना उद्देशून केला आहे.

**पत्र क्रमांक ६**

सु. ११८९ जिल्हेज ९

इ.स. १७८८सप्टेंबर

श्री

मो। आनाम शीवशंकर दास दे

साई १ कानगो मो।। नंदूरबायासी

अहिल्याबाई होलकर सू ।। तिसा स

मानीन मयाव अलफे तुम्ही पत्र

४ ।। ते पावले. मातुश्री सुध्दा

श्री महयात्रेस जावे असे मानस आ

हे याविसी आज्ञा होऊन मार्गाचे

...............

मागील बाजू - निमित्य राजश्री महादजी सिंदे याज


ला पात्राविसी ली ।। त्यासी क्षेत्रमासी

सर्व यात्रकरी आहे यकर माफ ओ येसे

ऐकिल्यास आहे. त्यापक्षी पात्रा

चे कारण नाही. जाणिजे छ.९ जिल्हेज

मोर्तबसूद




१७८

अहिल्याबाई होळकर यांनी हे पत्र लिहिले असून शिवशंकरदास देसाई आपल्या आईस बरोबर उत्तरेतील काशी प्रयाग यात्रेसाठी जाणार असून त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य करण्यासंबंधी मजकूर या पत्रामध्ये आहे.

**पत्र क्रमांक ७**

सु. ११९० सवाजल १९

इ.स. १७८९ जुलै १३

श्री

मो । अनाम सीवशंकर दास

देसाई व कानगो ४ ।। नंदुरगार यांसी

अहिल्याबाई होलकर सु ।।

तीनशे मया व अलफै वौ ।

राजश्री निलकंठ भट बीन श्रुके

श्वर मजकूर याने हुजुर

येऊन विदित केले की माझा सा

सरा माझो स्त्रीस आमचे घरी

पाठवीत नाही याजकरिता

......................

मागील बाजूस -

सासऱ्यास च्यार गोश्टी जां

तीचे रीतीभातीच्या सम


जाऊन निक्षून सागोन यांची

स्त्री व वस्तभावजे असेल ते

................

पुन्हा बोभाट न ये ते करणे आणि

जे छ १९ सवाल मोर्तबसूद




१८०

या पत्रात कोणी नीळकंठ भट याने आपल्या बायकोस तिचे वडील आपल्याकडे पाठवत नाही म्हणून तक्रार केली आहे. तिची दखल अहिल्याबाईंनी घेतली असून नंदुरबारच्या कानुगो देसाईस भटाच्या सासऱ्याची समजुत काढून आपली मुलगी तिच्या पतीकडे पाठविण्यास सांगावे असे लिहिले आहे.

**पत्र क्रमांक ८**

सु. ११९० सवाजल १९

इ.स. १७८९ जुलै १३

श्री

मो । आनाम शीवशंकरदास दे

साई व कानगो मो । नंदूरबार

यासी अहिल्याबाई होलकर


सुभा इहिवे तिसेन मयाव

........................

प्रो । मामलेदाराचे नाव पत्र

पाठविले आहे ते पावले जाणि

जे छ.२६ रमजाने मोर्तब सूद




१८१

अहिल्याबाई होळकरांनी हे पत्र नंदूरबारच्या कानुगो देसाईस लिहिले असून उपसर्ग न देण्याविषयी मामलेदारांना लिहिल्याचा उल्लेख त्यामध्ये आहे.

## संदर्भ सूची


१.गुजर यादव , 'मल्हारराव होळकर व त्याचा काळ', नागपूर १९९१, पृ. २१८.

२. देव विश्वनाथ नारायण, 'देवी श्री अहिल्याबाई होळकर हिचे चरित्र', इंदौर १९९६ पृ. १४७.

३. उपरोक्त. पृ.१४७.

४. पाटील सुलोचना अशोक, 'होळकर कुलभूषण अहिल्यादेवी', जळगाव, २००० पृ.६५.

५. M. W. Burways life of Subhedar Malharao Holkar Indor १९३०, P.No.२२४,२३३.

६. उपरोक्त. पृ.२२४.

७. शास्त्री अवधुत, 'धर्मभास्कर देवी अहिल्याबाई होळकर विशेषांक', १९७२, पृ.८४,११५.

८. गुजर यादव, 'मल्हारराव होळकर व त्याचा काळ', पृ.२१७.

९. Malcom Sir Jhon Memior of Central India Vol II III$^{rd}$ calcatta,1988 P.no.28.

१० रामसेवक गर्ग, हीरालाल शर्मा, 'अहिल्या स्मरणिका', १९७०, इंदोर, १९७०, पृ.क्र.११.

११ उपरोक्त. पृ.क्र.११.

१२ पारसनीस द.ब., महेश्वर दरबाराची बातमीपत्रे-भाग-१, मुंबई, १९९०, पृ.क्र. २५१.

१३ ठाकूर वा.वा. 'होळकर शाहीचा इतिहास भाग १', इंदौर, १९४४ पृ.क्र.२६३, २६५.

१४. उपरोक्त. पृ.क्र. ५५.

१५ उपरोक्त. पृ.क्र. १५५.

१६ गुजर यादव, 'मल्हारराव होळकर व त्याचा काळ', पृ.क्र.२१८.

१७ इंगळे राम, 'अहिल्याबाई होळकर', नागपूर, १९८५, पृ.क्र.३५.

१८ गुजर यादव, 'मल्हारराव होळकर व त्याचा काळ', पृ.क्र. २१८.

१९ शर्मा उदयभानु, 'लोकमाता अहिल्या', इंदौर, १९६५, पृ.क्र. १०३.

२० उपरोक्त. पृ.क्र. १०४.

२१ उपरोक्त. पृ.क्र. १०४.

२२ उपरोक्त. पृ.क्र. १०५.

२३ उपरोक्त. पृ.क्र. १०६.

२४ उपरोक्त. पृ.क्र. १०७.

२५ उपरोक्त. पृ.क्र. १०५.

२६ उपरोक्त. पृ.क्र. १०६.

२७ उपरोक्त. पृ.क्र. १०६.

२८ उपरोक्त. पृ.क्र. १०७.

२९ उपरोक्त. पृ.क्र. १०७.

३० उपरोक्त. पृ.क्र. १०८.

३१ उपरोक्त. पृ.क्र. १०९.

३२ अहिल्यादेवी स्मारिका, अहिल्यादेवी होळकर, ट्रस्ट इदौर, १९७२, पृ.क्र.३४.

३३ उपरोक्त. पृ.क्र. ३६.

३४ Malcom Sir Jhon Meior of Central India Vol II III[rd] calcatta P.no.45.

३५ उपरोक्त. पृ.क्र.६.

३६ उपरोक्त. पृ.क्र.५४०, ५४१.

३७ उपरोक्त. पृ.क्र.४०.

३८ उपरोक्त. पृ.क्र. ५४०.

३९ उपरोक्त. पृ.क्र.१३.

४० उपरोक्त. पृ.क्र. १३,१४.

४१ उपरोक्त. पृ.क्र.१३,१४.

४२ उपरोक्त. पृ.क्र. १६,१७.

४३ उपरोक्त. पृ.क्र.१६,१७.

४४ उपरोक्त. पृ.क्र. १७.

४५ पाटील सुलोचना अशोक, 'होळकर कुलभूषण अहिल्यादेवी', जळगाव २००० पृ.क्र.६७.

४६ ठकुर वा.वा. 'होळकरशाहीचा इतिहास भाग १', इंदौर १९४५, पृ.क्र.१७८.

४७ उपरोक्त. पृ.क्र.१७८.

४८ उपरोक्त. पृ.क्र. १७८.

४९ उपरोक्त. पृ.क्र.१८१.

५० उपरोक्त. पृ.क्र.१८३.

५१ उपरोक्त. पृ.क्र.१८३.

५२ जहागिरदार विजया, 'तेजसस्विनी अहिल्याबाई होळकर', मुंबई २००५ पृ.क्र.५०.

५३ उदयभानु, लोकमाता अहिल्या इंदौर १९६५, पृ.क्र. ४७,४८.

५४ शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई ' नई दिल्ली १९८९, पृ.क्र.८०.

५५ उपरोक्त. पृ.क्र.८०.

५६ उपरोक्त. पृ.क्र.८०.

५७ उपरोक्त. पृ.क्र. ८१.

५८ जहागिरदार विजया, 'तेजस्वीनी अहिल्याबाई होळकर', पृ.क्र.४६.

५९ शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई ' नई दिल्ली १९८९, पृ.क्र.८१.

६० उदयभानु, लोकमाता अहिल्या इंदौर १९६५, पृ.क्र.४९.

६१ उपरोक्त. पृ.क्र.१२५.

६२ उपरोक्त. पृ.क्र.१२६.

६३ ठाकुर वा.वा. 'होळकरशाहीचा इतिहास भाग १', इंदौर १९६५, पृ.क्र.२८.

६४ उपरोक्त. पृ.क्र.१३०.

६५ शर्मा हिरालाल (संपादक), अहिल्या स्मारिका, अहिल्यादेवी होळकर चॅरीटेबल स्ट्रस्ट १९८४ इंदौर पृ.क्र. २१.

६६. कोळेकर हरिभाऊ, 'लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' सोलापूर, २०१५,पृ.क्र.७४.

६७ देवी विश्वनाथनारायण, देवी श्री अहिल्याबाई होळकर हिचे चरित्र, पृ.क्र.१२५.

६८ अहिल्या स्मारिका, अहिल्या चॅरिटेबल ट्रस्ट १९८४ इंदौर पृ.क्र. २१.

६९ उपरोक्त. पृ.क्र.२१.

७० उपरोक्त. पृ.क्र.२२.

७१ उपरोक्त. पृ.क्र.२२.

७२ उपरोक्त. पृ.क्र.२६.

73 Malcom Sir John Memori of Central India Vol II III[rd] calcatta1988 P.no.95.

७५ रामसेवक गर्ग (संपादक), अहिल्या स्मारिका, अहिल्या चारिटेबल स्ट्रस्ट १९८४ इंदौर पृ.क्र. २२,२३.

७६ उपरोक्त. पृ.क्र.२३.

७७ उपरोक्त. पृ.क्र. २३.

७८ Malcom Sir Jhon Meior of Central India Vol II III[rd] calcatta P.no.९५.

७९ पाटील सुलोचना, 'होळकर कुलभुषण अहिल्यादेवी', जळगाव २०००, पृ.क्र.७१.

८० शर्मा हिरालाल अहिल्याबाई , इन्दौर, १९८९ पृ.क्र.८७.

८१ लोही म.ना.'देवी अहिल्यादेवी होळकर' नागपुर २००१ पृ.क्र.४६.

८२ वीर मच्छिंद्र बाबासाहेब पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, औरंगाबाद १९९५,पृ.क्र.९२.

८३ पाटील सुलोचना, 'होळकर कुलभुषण अहिल्यादेवी', जळगाव , पृ.क्र.६९.

८४. Malcom Sir Jhon Meior of Central India Vol II III[rd] calcatta P.no.34.

८५ देवी विश्वनाथ नारायण, देवी श्री अहिल्याबाई होळकर हिचे चरित्र, पृ.क्र.२२.

८६ पाटील सुलोचना, 'होळकर कुलभुषण अहिल्यादेवी', पृ.क्र.६९.

८७ उपरोक्त. पृ.क्र.१७६.

८८ उपरोक्त. पृ.क्र.२०३.

८९ Malcom Sir John Meior of Central India Vol II III[rd] Edition P.no.537.

९० उपरोक्त. पृ.क्र.५५४.

९१ सं.का.दिक्षित, अहिल्या स्मारिका, अहिल्याबाई होळकर, चॅरिटेबल ट्रस्ट १९७६ इंदौर पृ.क्र.५५.

९२ Mujumdar R.C. The Maratha Supermacy Bombay 1977,P.No.176.

९४ पाटील सुलोचना, 'होळकर कुलभुषण अहिल्यादेवी', जळगाव , पृ.क्र.७२.

९५ उपरोक्त. पृ.क्र.१७६.

९६ अहिल्या स्मारिका, अहिल्याबाई होळकर चॅरीटेबल ट्रस्ट १९७६ इंदौर पृ.क्र.१५.

९७ उपरोक्त. पृ.क्र.२५.

९८ उपरोक्त. पृ.क्र.२६.

९९ डांगे अण्णासाहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सांगली, २०१५ पृ.क्र.१०२.

१०० स.कादिक्षित, अहिल्या स्मरणिका, अहिल्याबाई होळकर चॅरीटेबल ट्रस्ट , १९७६ इंदौर

पृ.क्र.८१.

१०१ कोळेकर हरिभाऊ, 'लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' सोलापूर, २०१५,पृ.क्र.८१.

१०२ शर्मा हिरालाल, अहिल्याबाई, नयी दिल्ली, १९८९, पृ.क्र.८४.

१०३ उपरोक्त. पृ.क्र.८५.

१०४ उपरोक्त. पृ.क्र.१०१.

१०५ उपरोक्त. पृ.क्र.१०५.

१०६ शर्मा हिरालाल, अहिल्याबाई पृ.क्र.८५.

१०७ देवी विश्वनाथ नारायण, देवी श्री अहिल्याबाई होळकर हिचे चरित्र, पृ.क्र.१७४.

१०८ आपटे द.वि.'चंद्रचुड दप्तर कला १ ली', पुणे, पृ.क्र.३१.

१०९ ठाकुर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास भाग १ होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदौर, इ.स.१९४५, पृ.क्र.२१६.

११० गुजर यादव 'मल्हारराव होळकर व त्याचा काळ' नागपूर, १९९१,पृ.क्र.२१९.

१११ उपरोक्त. पृ.क्र.२२०.

११२ ठाकूर वा.वा. (संपादक), होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-२, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदूर १९४४, पृ.क्र.२१६.

११३ ठाकूर वा.वा., होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, पृ.क्र.२१६

११४ ठाकूर वा.वा. (संपादक), होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१, इंदूर १९४५,. पृ.क्र.२०४.

११५. उपरोक्त पृ.क्र.२०५

११६ ओमप्रकाश वसंत नजन, 'अहिल्याबाई होळकर औरंगाबाद', २०११ पृ.क्र.५१.

११७ प्रा.बोडदे धनंजय, परिवर्तनाची गौरवगाथा लोकमाता अहिल्यादेवी होळकर, पृ.क्र.१२१

११८ शास्त्री अवधूत, (संपादक), धर्मभास्कर, इन्दौर, मे जून १९७५, पृ.क्र.६६

११९ उपरोक्त. पृ.क्र.१०२.

१२० ठाकुर वा.वा., होळकरशाहीचा इतिहास भाग १, २०३,२०४

१२१ उपरोक्त. पृ.क्र.२०३, २०४

१२२ उपरोक्त. पृ.क्र.१०६.

१२३ गुजर यादव मल्हारराव होळकर व त्याचा काळ, पृ.क्र.२२०.

१२४ ठाकुर वा.वा., होळकरशाहीचा इतिहास भाग १,२०४

१२५ उपरोक्त. पृ.क्र.२०६.

१२६ अहिल्या स्मारिका, अहिल्याबाई होळकर चॅरीटेबल ट्रस्ट, इंदौर, १९७७ पृ.क्र.३५.

१२७ उपरोक्त. पृ.क्र.३६.

१२८ उपरोक्त. पृ.क्र.३७.

१२९  ठाकूर वा.वा. 'होळरकरशाहीचा इतिहास' इंदौर १९४४, पृ.क्र.११०,१११.

१३० देव गजानन चिंतामन, 'श्रीमंत अहिल्याबाई होळकर' मुंबई १९७७, पृ.क्र.१२३.

१३१ उपरोक्त. पृ.क्र.१२४.

१३२ देव विश्वनाथ नारायण, देवी श्री अहिल्याबाई होळकर हिचे चरित्र, पृ.क्र.१२७.

१३३ उपरोक्त. पृ.क्र.१२६.

१३४ उपरोक्त. पृ.क्र.१२८.

१३५ उपरोक्त. पृ.क्र.१२९.

१३६ पारसनीस द.ब., महेश्वर दरबाराची बातमीपत्रे भाग-१, मुंबई, इ.स.,१९१०, पृ.१२४

१३७ पारसनीस द.ब., महेश्वर दरबाराची बातमीपत्रे भाग-२, मुंबई, इ.स.,१९११, पृ.१७०

१३८ शास्त्री अवधूत (संपादक), धर्मभास्कर, पृ.क्र.१८३

१३९ खडपेकर विनया, 'अज्ञात अहिल्याबाई होळकर', मुंबई, २००७पृ.क्र.१८३.

१४० शर्मा हिरालाल, रामसेवक गर्ग, अहिल्या स्मारिका, १९७५ पृ.क्र.१९

१४१ ल्युअर्ड सी.ई., इन्दौर स्टेट गजेटियर ज्ल्दि २, (अंग्रेजी में) पृ.क्र. २२३.

१४२ खरे वासुदेव वामन शास्त्री, ऐतिहासिक लेख संग्रह जिल्द ७ (मराठी में) पृ.३७५७

१४३ ल्युअर्ड सी.ई., इन्दौर स्टेट गजेटियर ज्ल्दि २, (अंग्रेजी में) पृ.क्र. २२२.

१४४ शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक (संपादक), अहिल्या स्मारिका, १७७३-७४, पृ.क्र.२२२

१४५ पारसणीस द.ब. महेश्वर दरबारची बातमीपत्रे भाग १ मुंबई, १९१० पृ.क्र.१०५.

१४६ देव गजानन चिंतामन, 'श्रीमंत अहिल्याबाई होळकर'  पृ.क्र.११.

१४७ गुगालिया एच.एस. देवी श्री अहिल्याबाई दिल्ली,२००० पृ.क्र.९८.

१४८ उपरोक्त. पृ.क्र.१००.

१४९ देव गजानन चिंतामन, 'श्रीमंत अहिल्याबाई होळकर'  पृ.क्र.११२.

१५० मालकम सर जॉन,ए मेमॉयर ऑफ सेंट्रल इंडिया एन्ड मालवा जिल्द १,पृ.क्र.१५२.

१५१ खरे वासुदेव वामन, 'ऐतिहासिक लेख संग्रह', पृ.क्र.३७६०.

१५२ मालकम सर जॉन ए मेमॉयर ऑफ सेंट्रल इंडिया एन्ड मालवा, पृ.क्र.१५१.

१५३ उपरोक्त. पृ.क्र.१५०.

१५४ उपरोक्त. पृ.क्र.१५२.

१५५ उपरोक्त. पृ.क्र.१५२.

१५६ उपरोक्त. पृ.क्र.१५२.

१५७ लेले सुमती, 'अहिल्यादेवी होळकर' मुंबई, २००९ पृ.क्र.२७.

१५८ पाटील डॉ.सुलोचना अशोक, होळकर कुलभूषण अहिल्यादेवी जळगाव प्रथमावृत्ती २०००, पृ.क्र.७८

१५९ शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक (संपादक), अहिल्या स्मारिका, १७७३-७४,

पृ.क्र.३८,३९

१६०. इंगळे राम, अहिल्याबाई होळकर,नागपूर, १९९४, पृ.क्र.३८

१६१ ठाकुर वा.वा.(संपादक), होळकर शाहीच्या इतिहासाची साधने भाग-२ रा इतिहास पृ.क्र.३७६.

१६२ पाटील डॉ.सुलोचना अशोक, होळकर कुलभूषण अहिल्यादेवी जळगाव प्रथमावृत्ती २०००, पृ.क्र.७५

१६३ शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक (संपादक), अहिल्या स्मारिका, १७७३-७४,

पृ.क्र.३८,३९१६४ उपरोक्त. पृ.क्र.३८-३९

१६४. शास्त्री अवधूत, धर्म भास्कर, पृ.क्र.१११

१६५ उपरोक्त

१६६ उपरोक्त. पृ.क्र.१११,११२.

१६७ उपरोक्त. पृ.क्र.११२.

१६८ इंगळे राम, अहिल्याबाई होळकर, पृ.क्र.४४, ४५

१६९ गुजर यादव, 'मल्हारराव होळकर व त्याचा काळा', पृ.क्र. २२१.

१७० उपरोक्त. पृ.क्र.६७.

१७१ उपरोक्त. पृ.क्र.३६.

१७२ उपरोक्त. पृ.क्र.३७.

१७३ शर्मा हिरालाल, गर्ग रामसेवक (संपादक), अहिल्या स्मारिका, १९७०,

पृ.क्र.९२

१७४ देशपांडे विजया, नेहेते उज्वला (संपादक), नंदूरबार दप्तर धुळे, २००३, पृ.क्र.२८,२९

१७५ उपरोक्त. पृ.क्र.३१.

१७६ उपरोक्त. पृ.क्र.३३.

१७७ उपरोक्त. पृ.क्र.३४.

१७८ उपरोक्त. पृ.क्र.५०.

१७९ उपरोक्त. पृ.क्र. ६५.

१८० उपरोक्त. पृ.क्र.६७.

१८१ उपरोक्त. पृ.क्र.६९.

## प्रकरण सहावे

## शिंदे होळकर कलह व लाखेरीचे युध्द

अहिल्याबाईंना त्यांच्या अखेरच्या काळात अनेक संकटांनी घेरले. १७९० मध्ये नातू नथोबा फणसेचा आजारात मृत्यु झाला. त्यानंतर एक वर्षानंतर १७६१ मध्ये जावई यशवंतराव फणसे यांचाही आजारपणात मृत्यु झाला. कन्या मुक्ताबाईने सहगमन केले. हे सर्व आघात एकामागून एक उतारवयात खंबीरपणे व शांत चित्ताने सहन करुन राज्यकारभार पूर्ण दक्षतेने पाहिला यासमयी शिंदे होळकर कलहाने वेग धरला पण ह्याची सुरवात खूप आधीपासून झालेली होती. ह्या कलहाची सुरवात कशी झाली व त्याचा शेवट कसा झाला हे पुढील प्रमाणे सांगता येईल.

पानिपतच्या मोहिमेपूर्वीपासूनच शिंदे आणि होळकर यांच्यात चित्तशुध्दी नव्हती. कुंभेरीवर खंडेराव होळकरांचा मृत्यु झाल्यानंतर मल्हारराव होळकराने प्रतिज्ञा केली की, सूरजमलचा शिरच्छेद करुन कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरच जन्मास आल्याचे सार्थक नाही तर प्राणत्याग करीन ही माहिती जाटाला समजताच त्याने आपला वकील तेजराम यास जयाप्पा शिंदेकडे सलोखा करुन देण्यासंबंधीचे पत्र व आपली पगडी पाठविली त्याचा जयाप्पा शिंदेने स्वीकार करुन त्यास अभयपत्र पाठविले, परिणामी मल्हारराव होळकरांचा मनात शिंद्यांविरुध्द द्वेष निर्माण झाला.

सवाई जयसिंहाच्या मृत्युनंतर जयपुरमध्ये गादीसंबधाने गृहकलह सुरु झाले. त्यात मल्हारराव होळकरांने प्रवेश करुन एकटयानेच प्रचंड अर्थलाभ पदरात पाडून घेतल्याने शिंदे यांनी होळकरांविरुध्द चीड व्यक्त केली तर मारवाड गादी प्रकरणाात जयाप्पा शिंदेची हत्या झाली तेंव्हा जयाप्पाच्या मृत्युस मल्हारराव होळकर कारणीभूत आहे असे शिंद्यांना वाटले. परिणाामी शिंदे विरुध्द होळकर असा संघर्ष सुरु झाला.

उत्तरेतील राजकारण करणारे शिंदे होळकर आपापल्या मतलबापुरते पाहत होते. यांच्या वैमनस्याची माहिती नजीबखानास होती. मराठ्यांचा तो प्रचंड द्वेष करीत असे त्याने पठाणशाहीचा पुरस्कार करुन दिल्लीचे राजकारण खेळवले प्राचीन बादशाही मराठे बुडवितात मुसलमानी धर्मावर आक्रमण करतात असा मतलबी कांगावा करुन त्याने अब्दालीला आमंत्रित केले. अशा खेळ्या नजीबखानास जिवंत सापडल्यास मारुन टाकावा असे पेशव्यांसहित अनेक मराठी सरदारांचे व

शिंद्यांचे मत होते. अशा या नजीबखानास मल्हारराव होळकरांने धर्मपूत्र मानून त्याचा बचाव केला.[१] कारण शिंद्यांचा नक्षा उतरावयाचा ही होळकरांची प्रतिज्ञा परिणामी नजीबखानाने भूलथापा देऊन जयाप्पा शिंदेस फसवून शेवटी त्यांचा घात केला.

उत्तरेचे राजकारण का बिघडले याबाबत स्वत: थोरले माधवराव पेशवे २१ डिसेंबर १७७० रोजी रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनीवाले यांना लिहितात. ''होळकर कोट्यास गेले ते शिंद्यांना पाहावेना परस्परांच्या कुरघोडयांमुळे शिंद्यांचे चांगले कार्य होळकरांना सहन होईना परस्पर फुट असल्याची माहिती व त्यामुळे चाललेल्या भांडणाची माहित सर्व राजपूत राजांना झाल्याने मराठयांचा बदलौकिक झाला सर्व एकत्रित असते तर जाट जिवंत कसा राहिला असता मराठयांची मगरमिठी बसली असता. जाटांची फौज सही सलामत कशी जाऊ शकली या सगळयांचे उत्तर घरातील दुही आणि परस्परांत सख्य नसणे हे आहे होळकरांच्या विद्यमाने मराठयांच्या गोटात नजीब खानाचा प्रवेश झाला. आणि त्याने जाटांच्या राजकारणात शिंद्यांच्या मध्यस्थीने मामलत न व्हावी असे राजकारण केले.[२] तेंव्हा या कारस्थानात होळकरांचाही सहभाग असल्याचे शिंद्यांचे मत झाले. परिणामी एकमेकांविषयी मने कलुषित झाली. व सघर्ष वाढत राहिला.

होळकरांच्या सरदारीत तुकोजीने आतापर्यंत काय केले. यासंबंधी स्वत: अहिल्याबाईने१४ ऑगस्ट १७७९ रोजी पत्राद्वारे तुकोजीला खडसावले व त्यांच्या नाकर्तेपणामुळेच शिंदे होळकर संघर्ष वाढत असल्याबद्दल ती म्हणते ते अप्रकाशित पत्र पुढीलप्रमाणे -''चिरंजीव राजश्री तुकोबास प्रति अहिल्याबाई होळकर आसीर्वाद उपरीयेथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित गेले पाहिजे. विशेष तुम्ही पत्रे दोन आधिक शुध्द १३ त्रयोदशीचे मितीची पाठविली ते पावोन सविस्तर लिहिल्याचे भाव ध्यानास आले कित्येक उच-नीच उणे अधिक लिहिले त्याची प्रत्योत्तरे बितपसील

१.गुदस्ता आषाढ मासापासून दौलतीचा नाश कसा जाहाला आणि आब कैसा गेला आम्ही आज्ञेविरहित काय करीत होतो वडिलाचे मर्जीस आले तेच घडले त्यामध्ये प्रसंगी शिंदे यांचा वडिला-वडिली भाऊपणा होता. यामुळे प्राणवाचोन दौलत राहिली म्हणोन विस्तारे करुन लिहिले यैशास तुम्ही देसी गेल्यावर तोतया वगैरे सरकारकामे पडली ते समई तुम्ही उभयतांस मोहिम सांगितली तेथे राजश्री महादजी सिंदे यानी अंगेजनी करुन गेले आणि तुम्हासही बालाविले तिकडे तुम्ही न जाता त्यांणीच जाऊन सरकार कामे करुन सरदारचा नक्ष राखिला त्यावर गायकवाडाचे कारभाराकरिता

भावांचा वगैरे कल सोडून आपली ओढ करुन वाफगावांस आल्यास दुरंदेसी विचार न करुन उपयुक्त मनसबा न करिता भावास गाठून आकाश ग्रासावे यैसी मसलत केली आणि सासवडास गेला व त्या संधीत आम्हास पत्रे पाठविली की आम्ही मनसबा केला आहे. दौलतीचा नाश करुन सरदारीचा आब गमाऊन आजापावेतो झोके खात आला याची विस्मृत्य होऊन आम्हास दोष ठेऊन लिहिता यास काय म्हणावे अशा पत्राची उत्तरे येथून लिहावी असे नाही परंतु तुम्हास चांगले उमजले पाहिजे. म्हणोन लिहिले असे. राजश्री महादजी सिंदे मध्ये येऊन दौलत राखिली हे त्यास उचित आहे आज त्याचा आपला प्रकार नवा नाही वडीलावडिली घरोबा चालत आला सांप्रत कैलासवासी ती सुभेदार यांच्या चालीने आपल्यासी चालतात त्यांस योग्य असे आपणांसही त्याजसिवाय दुसरा अर्थ काय आहे. त्यांत इतके दिवस इकडून कोठेतरी वाकडे न पडता हा प्रसंग संपादून लौकिक राखावा वडिलाचे नाव मोठे यांत जपत असता तुम्ही तो मार्ग सोडून ऐसे भाव लिहिता ह्या गोष्टी उत्तमच आहे .. कलम

१. देसी पत येका पैशाची राहिली नाही. सर्व भिस्त माहालावर पोट बांधून उपास करुन दौलत राखणे तैसी योजना करावी राजश्री महादजी शिंदे याजकडे यैवज देविला त्याचे जाब दोन वेला दोन प्रकारचे आले यैवजाचे वादापाणी करुन लिहिले पैसे प्राप्त व्हावा यैसा अर्थ दाखविला नाही. म्हणोन लिहिले त्यास तुम्ही माहालगाव खेडियाचे रसदेचा आजमास व कर्जापटीच्या आंखाची बेरीज लिहून पाठविली ते मनस्वी येखादे माहाली समयास पतीवर च्यार रुपये अधिक घेतले तो धोरणा धरुन घेईन म्हटल्यास देणार कैसा देईल येथे जेथवर कसोसी करावयाची ती करुन रसद ठरविली कर्जपटीचे आरव पैकी फणशे व बुले व वाघ याजपासून पहिल्या कर्ज पटट्या घेतल्या असून त्या अन्वये कमपेश ठराऊन येकंदर यैवज पैकी सालगुदस्ता कर्ज घेऊन तुम्हाकडे पाठविली तो वजा होऊन सावकाराच्या बाकी ऐवज महेश्वरी खर्च सुध्दा भरीस घालून वराता पैकी अैवज पाठवून दिल्हा याची याद अलाहिदा पाठविली आहे. येथील खर्चास पैसा नाही याजकरीता पेस्तर सालऐवजी सावकाराकडून कर्ज घेऊन नित्य कृत्य चालवावे लागले.

१. आमचा आब घ्यावा येविसी रा ।। येशवंतराव गंगाधर यांनी पाच लक्ष रुपये दरबार खर्च करुन नफा काय मेलविला हे वडिलास पुसोन केले असेल म्हणोन लिहिले यैसास ये विसीचा मजकुर तुम्ही पंत मशाल निलेची बोलिला असाल आणि त्यांणी ही तुम्हास सांगितले असेल...कलम

१. यैवजाचा हवांलीयात रा ।। माहादजी शिंदे आले तेंव्हा उगवणे त्यांसच प्राप्त झाले. आमचा बस राहीला नाही म्हणोन लिहीले. त्यास येथील माहाल संबंधी वगैरे कारभारास सिवाजी नारायण माहित आहे....कलम.

येकून कलमे च्यार लिहिली आहेत याचे मनन केलिया सर्व अर्थ ध्यानास येईल रा छ१ साबान सुा समानैन मया व अलफ बहुतकाय लिहिणे हे आशिर्वाद [३]

महादजीच्या लालसोट युध्दातील माघारीनंतर पुणे दरबाराने अली बहद्दर व तुकोजी होळकरांस हाताशी धरुन महादजीला त्रास द्यावयास सुरवात केली ह्याविषयी कृष्णाजी जगन्नाथ लिहितो ... ''जैपुरवाल्यांशी व राजे बिजे सिंगाशी आतून स्नेह जाहला आहे ... दोघांनीही महादजीच्या शत्रूंशी हातमिळवणी केलेली दिसून येते राजपूत संस्थानिकांनी अलीबहाद्दरास व तुकोजी होळकरास आश्वासन दिले की, ... मारवाडी जयपूरवाले याशी त्यांचे वचन कथन पक्केपणे झाले की आम्ही सारे एकत्र होऊन तुम्हास हिंदुस्थानचे मालक करितो तुम्ही आम्ही मिळोन शिंद्यास काढून देऊ पुढे कृष्णाजी जगन्नाथ लिहितो आलीबाहादरास मुखितयार करुन सुभेदारास आपल्या संमतात घेऊन राजश्री पाटील बावाशी लढवावे आपण दुरुन तमाशा पहावा[३४८] अशा प्रकारच्या कारवाया तुकोजी होळकर करीत असल्याने महादजी संतप्त होते. रियासतकार सरदेसाई लिहितात, 'महादजींच्या हालचाली व योजना, तुकोजी होळकर व अलीबहाद्दर यांजकडून राजपूतांस ताबडतोब कळत असत आणि ते सुध्दा मराठे सरदारांमधील या फुटीचा शक्य तितका उपयोग करुन वेळ मारुन नेत होते.[४]

पाथरगडच्या स्वारीपासूनच होळकरांनी शिंद्यांशी वाकड्या चाली सुरु केलेल्या होत्या अली बहाद्दर यासही गोसाव्यांच्या प्रकरणात त्यांनी त्याला सुध्दा शिंद्यांपासून वेगळे पाडले पाटण याठिकाणी शिंद्यांविरुध्द इस्माईलबेग व जोधपूरकर आणि जयपूरकर यांच्या लढाया सुरु असताना अलीबहादर शिंद्यांच्या शत्रूकडून नजराणे, बक्षीस व भेटी स्वीकारीत होता. वास्तवीक पेशव्यानी त्याला खास महादजींच्या मदतीकरिता राजस्थानात रवाना केले होते हे पाहिल्यावर महादजी संतापाने म्हणतो, ...''आमचे फौजेने लढाया कराव्या आणि शत्रुंची पारिपत्ये करावी आणि त्यांनी आमचे दुस्मान त्यांची वस्त्रे घ्यावीत घोडे बंदुका वगैरे बहुमान घ्यावा ह्या गोष्टी बऱ्या की काय? याजमध्ये लौकिक हिदुस्थानात कैसा होतो ...[५]

एकंदरीत नाना फडणीसांच्या पत्रावरुन अलीबहाद्दर व महादजी शिंदे यांच्यात खालील बाबीवरुन मतभेद झाल्याचे निदर्शनास येते. १) गोसावी प्रकरण २) अलीबहाद्दराच्या खर्चाची बेगमी ३) बुंदेलखंडाचे राजकारण हा मतभेद मिटविण्यासाठी तुकोजी होळकरांने जी मध्यस्थी केली त्या मध्यस्थीमुळे मतभेद दूर होण्याऐवजी वाढले.

### ६.१ महादजीस सांबरचा तह त्वरीत का करावा लागला यासंबधीची पत्रे :-

आपारामजी वकील नाना फडणीसास कळवितो की, '' ... सारांश गोष्ट की, आता फितुर होळकर व राजश्री अलीबहाद्दर यांचा असता जैतपूरवाल्यांशी तह केला व मारवाडी यांनी सलूख केला. या दोन्ही गोष्टी मोठ्याच जाहल्या या उभयतांचे पारपत्य सालमजकूरी यथास्थित होऊन दोन्ही राज्येच खाली व्हावी हाच प्रसंग होता परंतु घरचे फितुरामुळे देखला विचार तैसा करुन प्रसंगानुरुप आपला नक्ष राखून सरकारकाम करुन घेतले. ''महादजी शिंदे पेशव्यांना कळवितात की '' ...राजे बिजेसिंग जोधपूरी होते त्यासी गाठ घालून मारवाड्याचे पारपत्य करावे असाच विचार केला होता. त्या समयी होळरांकडील फौज व राजश्री अलीबहद्दर यांजकडील बळवंतराव सदाशिव हजार बाराशे स्वारानिशी होते ते मेडत्यांहून माघारे कूच करुन आले हे वर्तमान आम्हास मथूरेहून कळले त्यावरुन आम्ही मथूरेहून कूच करुन निघलो ते समयी उभयता सरदारही न आले आम्ही दरकूच सांबरानजीक आलो मारवाड्याचे पुरतेपणे पारपत्य करावे असाच विचार होता परंतु उभयतांचा फितूर याकरिता आम्ही जसा प्रसंग पाहिला तसा सलुख केला नाही तरी मारवाडी व इस्माईल बेग यांचे नाव न राहवे असाच प्रसंग होता ... महादजी शिंदे पुण्यातील वकील रामजी पाटील यास कळवितो की, '' शहावर पुढे असता उभयतांनी आपली फौज बलाउन घेतली काशिराव होळकर यासी बिजोसिंगाने फोडातोड फौजेची करावी याकरिता चार लाख अंतस्थ देणे केले. कासीराव व बापू होळकर यांनी मान्य करुन कूच केले. ...[६]

लालसोट युध्दातून माघार घेतल्यानंतर महादजीने रावराजा प्रतापसिंहाच्या अलवार किल्ल्याचा आश्रय घेतलेला होता सर्व राजपूत संस्थानिक महादजींच्या विरोधात होते. मात्र रावराजाने प्रामाणिकपणे महादजीस मदत केलेली होती.[७] अशावेळी रावराजाच्या प्रदेशावर होळकरांच्या मदतीने जयपूरकर आक्रमण करणार आहेत हे समजताच महादजी संतप्त झाला.

महादजीने उत्तर भारतात व राजस्थानात मिळविलेल्या आर्थिक, राजकीय व सामारिक वर्चस्वात निम्मा वाटा मिळावा म्हणून तुकोजी होळकराने केलेल्या मागणीच्या निमित्ताने शिंदे - होळकरातील वैमनस्य चांगलेच वाढले ४ डिसेंबर १७९१ रोजी महादजी शिंदे पेशव्यास लिहितो '' ...स्वामीचे दर्शन घ्यावयाचा बेत करुन मवाडतून येत असता उदेपूरकर राणाजीचे राज्याचा बंदोबस्त नाही. उमराव आपापले जागा मुलुख बळकावून राहिले. भीमसिंगकडे चितोडचा किल्ला तो भीमसिंग रावत राणाजीचे लक्षात नाही याकरिता राणाजी येऊन भेटले चितोड वगैरेचा बंदोबस्त करुन द्यावा म्हणोन (बजिदी) विनवणी केली त्यावरुन राणाजीसह चितोडनजीक येऊन मुक्काम केला. भीमसिंगाने गोळी वाजविली सबब मोर्चे लावून तोफांची निकड करताच भीमसिंग घाबरा होऊन बारावे दिवशी बोलणे लावून कार्तिक वद्य ६ गुरुवारी (१७ नोव्हेबर १७९१) येऊन भेटला किल्ला हस्तगत करुन त्यावर राणाजीचा बंदोबस्त करुन दिला. चितोडचा किल्ला ह्यापूर्वी अकबर बादशहांनी बारा वर्षांनी घेतला तोच स्वामीचे प्रतापे थोडक्याच दिवसांत हस्तगत झाला. ...'' सलुम्बरचा भीमसिंहास आपला पराभव अटळ आहे याची खात्री झाल्यावर त्याने राणेखान व आबा चिटणीस यांच्या मध्यस्थीने १७ नोव्हेबर १७९१ रोजी चितोडगड खाली करुन महादजीच्या हवाली केला. उदयपूरच्या महाराण्याचे कारभारी व आपले पाचशे लोक चितोडगड किल्ल्यात दाखल करुन महादजीने भीमसिंहाची भेट घेतली. नंतर भीम सिंहाची भेट करुन त्यांची आपसांत दिलजमाई केली. महाराण्याचे त्यांचे पूर्वीचे सर्व अपराध माफ केले.

''सलुम्बरचा रावत भीमसिंह हा अहिल्याबाई व तुकोजी होळकरांच्या मदतीनेच मेवाडमध्ये महाराणाच्या विरोधात कार्य करीत होता. तसेच तो होळकरांना खंडणीही कायम देत असे इ.स. १७८८मध्ये तुकाजी होळकरांस उत्तरेस रवाना करताना अहिल्याबाईंनी त्याला संगितले होते की, तुम्ही महादजीचा केवळ मदतनीस म्हणून न वागता काही तरी स्वतंत्र कारभार करावा आणि राजपूतांस मिळवून आपले पूर्वीचे हक्क शाबूत राखावे परंतु महादजी शिंदेनी तुकोजी होळकरांची पर्वा न करता सामरीक आणि लष्करी सामर्थ्यांच्या जोरावर सर्व राजपुतान्याचाच कारभार रगडून उरकला चितोडगड महादजीने सहज हस्तगत केल्याचे ऐकून अहिल्याबाईस वैष्यम्यच वाटले हे वर्तमान बाईस कळल्यावर तेथील जाबसाल होळकर यांचे मार्फतीने घडावा ने न घडले त्यामुळे असंतोष[८] किल्ला

सर केल्याचे महादजीचे पत्र आले नाही व अहिल्याबाईनेही त्यास किल्ला सर केल्याबद्दल अभिनंदनपर पत्र पाठविले नाही.

प्रतापगड देवळे हे संस्थान होळकरांच्या वर्चस्वाखाली होते. महादजीने दक्षिणेत येतांना देवळे संस्थानावर राणीजीची खेडी दाबल्याचा आरोप करुन संस्थानकडून दीड लाख रुपये घेतले ही गोष्ट गैररीतीची केली.[९] होळकरांचा वकील मकाजी गीतेने पत्राद्वारे अहिल्याबाईस कळविले की ''....सर्वप्रकारे धनीपणा व मरदूमी हे सर्व पाटीलाबावाची आहे त्यासी होळकर सुभेदार काही पदार्थ नाही त्यास पूर्वीचे खत श्रीमंत कै. सुभेदार यांच्या हातचे रुपये पधरा लक्षाचे आहे.....'' म्हणजेच मल्हारराव होळकरांच्या काळात उदयपूर संस्थान होळकरांच्या वर्चस्वाखाली होते. त्यावर आता शिंद्यांचे वर्चस्व झाले. याच सुमारास अहिल्याबाईचा जावई यशवंतराव फणसे याचा मृत्यु झाल्याने त्याची पत्नी मुक्ताबाई व दोन उपस्त्रिया सती गेल्या.[१०] अशा दु:खाच्या समयी महादजी अहिल्याबाईस न भेटताच ... नर्मदातीरी नवा घाट करुन त्या घाटाने उतरोन दक्षिणतीरी गेले ....[११] यावरुन शिंदे होळकरांत बिलकूल सख्य राहिले नव्हते. नाही तर महादजी नक्कीच अहिल्याबाईच्या परामर्शासाठी गेले असते.

शिंदे व होळकर याच्यातील संघर्षामुळे राजस्थानात एकछत्री अंमल प्रस्थापित करणे मराठयांना शक्य झाले नाही.''२३ मार्च १७८९ रोजीच्या पत्रात इंग्रज वकील पामर आपल्या वरिष्ठांना कळवतो की, शिंदे व होळकर यांचे परस्परांवर नियंत्रण ठेवून पुणे सरकारला आपले वर्चस्व कायम राखवायचे आहे परंतु यामुळे फायद्यापेक्षा तोटाच जास्त होणार आहे. ऑगस्ट १७९० मध्ये बादशाही फर्मान स्वीकारण्यासाठी मथुरेजवळ जो समारंभ झाला. त्यास तुकोजी होळकर स्वत: हजर न राहिल्याने महादजी शिंदे अतिशय संतप्त झाला.[१२]

सदाशिव दिनकर नाना फडणीसास कळवितो की, जयपूरकर व मारवाडकर आणि रोहिल्याचे वकिल तुकोजी होळकरांकडे आहेत. सगळ्यांनी एकत्रित होऊन महादजीच्या विरोधात लढाई करुन त्यास येथून हाकलून लावावे पुणे दरबराकडूनही मदत मिळणार नाही. '' ... सरकारचे पाटीलबावाचे नीट नाही होळकरांचे नीट नाही, त्यावरुन तमाम परस्परे राजेरजवाडे नाराजचे व रोहिल्याचे अनुमते बादशहा आदिकरुन सर्वास सूचना होऊन अवघ्यांनी आम्हांवर जूट बांधली आहे...[१३] अशा प्रकारे तुकोजी होळकरांच्या मदतीने जयपूर, जोधपूर, रोहिले, नाजराचे व मोगल बादशहा महादजी शिंदे

विरुध्द कटकारस्थाने करीत असल्याने महादजी तुकोजी होळकरावर संतप्त होणे स्वाभावीक होते.महादजी शिंदे कडे तुकोजी होळकर जेंव्हा राजस्थानात मिळविलेल्या संपत्तीत व जहागिरीत वाटणी मागतो तेंव्हा महादजी शिंदेकडून त्याला जी वाटणी मिळणार असते. त्याबद्दल तुकोजी होळकर अहिल्याबाईस लिहितो की " ...प्रथम बोलणे की एक करोड अठ्ठेचाळीस लक्ष जमा त्यात जायदाद सत्तर लाख बेचाळीस लक्ष खालसा पातशीही ऐवज वजा होऊन बाकी पस्तीस लाख राहिले पैकी थोडक्यासाठी आपण लिप्त कशास व्हावे? मुलुख मेळविला आहे. दरोबस्त श्रीमंतास द्यावा आणि आपण उभयतांनी नवी जागा सोडवून ते निम्मे निम्मे घ्यावी हल्ली मागती बोलणे आहे की आपला हिस्सा आपण घ्यावा त्यास हिश्शाचा प्रकार पस्तीस लाख कच्चे पक्के राहतात, त्याचा हिस्सा आपला आजमासे पाच -सात लाखांचा होईल. असा प्रकार आहे पाच -सात लाखांची बेरीज कागदोपत्री दिसावायास मात्र हाती लागते अखेर सालपावेतो दीड लाख लागतील याचे काय? हिस्सा घेऊन फळ नाही घेत नाही असे उत्तर करावे तरी वाकडे दिसते यास्तव वडिली ध्यानात आणून ये विषयीची आज्ञा लेखन करणे ....[१४]

लालसोटच्या युध्दात माघार घ्यावी लागल्याने तुकोजी होळकर आणि अलीबहाद्दरास महादजीच्या मदतीकरिता नाना फडणीसाने उत्तरेत रवाना केले होते. महादजी शिंदेनेही तुकोजीस पत्र पाठवून सत्त्वर येण्याची विनंती केलेली होती पण महादजीच्या विनंतीकडे दुर्लक्ष करुन तुकोजीने महेश्वरास मुक्काम केला होता.[१५] म्हणूनच महादजीने तुकोजीने वाटणी मागताच त्याला उपरोक्त उत्तर देऊन त्याची जागा दाखवून दिली.

१० सप्टेंबर १७९० रोजी बापू होळकर अहिल्याबाईस पत्राद्वारे कळवितो की, "मारवाड प्रांतीची ठाणी सुटली. आपल्याकडील कारकुन येथे वसुलीस गेले असता शिंद्यांकडील गोपाळ रघुनाथ यांनी कारकूनास मारवाड आमचे वाटणीचे आहे असे सांगून परत पाठविले तेंव्हा आम्ही सांगितले की, मारवाड तुमच्या वाटणीचे तर जयपूर आमच्या वाटणीचे आहे. तेथे कशाला खंडणी घेता.? तेंव्हा गोपाळ रघुनाथाने उत्तर दिले की, जयपुरात आमचा वाटा नाही हे खरे, परंतु श्रीमंतांचा हिस्सा समजोन घेणेकरीता कारकून पाठविले असे. पुढे १५ नोव्हेंबर १७९० रोजी बापू होळकर अहिल्याबाईस लिहितो,मेडत्यावरील लढाईत यश मिळाले लढाईनंतर विजयसिंहाचे वकील तहाच्या वाटाघाटीसाठी तेथे आले. त्यासमयी शिंद्यांकडील लोकांनी इतर कोणाशीही सल्लामसलत न करता

स्वत:च तहाच्या वाटाघाटी करुन अटी ठरविल्या. ''सल्ला अगर जाबसाल ठरणे तो उभयतांचे विचार ठरावा ही पूर्वीपासून चाल चालत आली असता अलीकडे रीतीभातीची एकही गोष्ट न ठेवता जो जाबसाल करणे तो  तेच करीतात .... महाल सुटेल तो त्यांनीच घ्यावा. लूट मिळेल तीही त्यांनीच घ्यावी. तेंव्हा येथे राहून लाभ काय?....'' रामराव आपाजी अहिल्याबाईस लिहितो, ''वाटणीचे वगैरे रीतीभातीचे जाबसाल तेथे राजश्री महादजीबाबा शिंदे यांचे कारभारी यांशी  बोलत गेलो त्याचे म्हणणे पडत गेले, आम्ही सेवक लोक आम्हास यजमानाची आज्ञा येईल ते केले  पाहिजे ..... त्याजकडून कोणतीही गोष्ट आपले मतलबाची होत नाही.''[१६] इ.स. १७९२ रोजी आबा चिटणीस आपल्या बंधूस कळवितात. '' ..... होळकरांनी ठाणे पाटीलबावाचे येक घेतले व दुसरे ठाणे घेणार म्हणोन गोपालराव यांचे पत्र घेऊन  पाठविली आहेत त्यांनी याप्रमाणे वर्तणूक केली तर उत्तम नाही तर लागात आलीयास लढाई करावी जयपूर राज्यातील भगवंतगड येथून आंनदारव गंगाधर लिहीतो....'' मुक्काम नजीक भगवंतगड प्रांत जयपूर येथे सरदारसुध्दा (तुकोजी होळकर) येथास्थित असो गोपाळराव रघुनाथ मौजे वैजुपाडयावर होते ते कूच करुन पुढे एक कोस माणपुरानजीक आले. डभईकडील पलटण व खंडेराव हरीकडील फौज याणी खोरी पहाडी वगैरे  ठाणी घेऊन मग कामास मोरचे लाविले होते. खुशाल पाग्या ठाण्यात आहे  बाहेर निघून लढाई केली तेथे लक्ष्मण अनंत याचा आप्त कामाचे लढाईत कामास आला, त्यावरुन ते दोन कोस माघारे येऊन मुक्काम केला. त्यावरुन रा सुभेदार यांनी पेंढारी व दाहा हजार रुपये खुशल्यास पाठविले.

''...... दौलतराम हलद्या आज तिसरे प्रहरी  येथे रा  आला सुभेदार संध्याकाळी गोटाबाहेर जाऊन त्यास घेऊन आले. याऊपर बोलणे होईल ते समजले.....''

''......अलीकडे जयपूरकर राजे याजकडील कारकून व कागदपत्रं बहूत सिलसिला आहे रा सुभेदारांनी जयपुरचे सुमारे यावे आम्ही (जयपूरकर) संरजाम करुन सत्वर बाहीर निघतो. पुढे लढाईस नमोद आम्ही होतो ऐसी बोलणी होतात दौलतराम हालद्या येथे  येऊन रा. सुभेदार यासी पकाईची बोलणी करुन रा सुभेदार यांचे आज कुचे करविले नदी बनास आलीकडील तीराने सेवाढचे सुमारे जावे राजे बाहेर निघाले म्हणजे सुभेदारंनी नदी उतरुन पलीकडे जावे यैसे ठराऊन दौलतराव व रामराव आपाजी कूच करुन बापूचे फौजेत गेले. रा.सुभेदारांनी जयपूरचा व गोपालराव यांचा मजकूर सविस्तर आहिल्यादेवीस लिहिला या वेळेस आम्ही माघे घेतल तर कोठे तोंड दाखवावयास ठिकाण

नाही. सोबत्याकडील (शिंद्यांकडील) फौजेने आगळीक केली. तेंव्हा मरण प्राप्त आहे. राजे बाहेर निघाले म्हणजे त्याकडील सरदार व दौलतराव आम्हाकडील पाराशरपंत व सरदार पुढे घालून गाठ घालू बनेल तसे करु. टाला दिल्याने ठीक  नाहीआपणाजवळ पागे पथके व सरंजामी आहेत त्याची रवानगी सत्वर करावी....'' ३ ऑक्टोबर १७९२ रोजी आनंदराव गंगाधर लिहितो, ''गोपाळराव रघुनाथने जयपूरकरांची बाळा हेडी घेऊन मानपूर या ठिकाणी जयपूरकरांकडून पंचवीस हजार रुपये खंडणी वसूल केली व त्यानंतर गीजगडास पोहचले. खेळोजी शिंदे व माधवराव फाळके यांनी अंतरवेदीतील गड मुक्तेश्वर व हाडप येथे शिंद्यांचे वर्चस्व बसविले. त्यानंतर खुर्ज्या गावास मोर्चे लावले.'' होळकरांच्या मते गोपाळराव रघुनाथाने जे कृत्य केले त्याबद्दल त्याला शिक्षा केलीच पाहिजे यासाठी तुकोजीने जयपूरकरांची मदत घेण्याचे ठरविले.

शिंदे होळकर यांच्यातील संघर्षाचा फायदा घेण्यासाठी जयपूरकर टपूनच होते.तेंव्हा त्यांनी शिंद्यांच्या विरोधात तुकोजीस मदत देण्याच्या निमित्ताने आपले प्रतिनिधी दौलतराम हलदिया, मीठालाल व मगीराम खवास यांना तुकाजीकडे ''इकडील पकाई करुन मीठालाल व  मागीराम खवास जयपूरास गेले. जमाव करुन राजास बाहेर काढावे राजे बाहीर निघाल्यावर दौलतराव पाराशरपंत यांनी जयपूरास जाऊन राज्याकडील पकाई पाहून पुढे कर्तव्य करणे ते करतील .....[१७]

इ.स.१७९२ जूनमध्ये जोधपूरमध्ये गृहकलह चालू असतो. त्यासमयी विजयसिंहावर महादजी शिंद्यांनी सांबरच्या तहान्वये खंडणी बसविलेली असते, तेंव्हा विजयसिंह शिंद्यांच्या विरोधात मदत मागतो ती मदत तुकोजी करावयास तयार होतो. हे महादजीस समजताच तो संतप्त होतो. जुलै १७९२ मध्ये महादजीचे स्नेही असलेल्या रावराजा प्रतापसिंहाच्या अलवार राज्यात होळकरांनी फौज पाठविली. तेंव्हा होळकरांच्या या कृत्याबद्दल महादजीने पेशव्यांकडे तक्रार केली. ''..... आमचे स्नेही यासी होळकरांनी जाऊन कजिया करावा हे उत्तम की काय .....'' महादजीच्या विरुध्द उभे राहण्यासाठी जयपूरचा राजा प्रतापसिंह याने ऑगस्ट १७९२ मध्ये बापू होळकरांस ससैन्य आपल्या चाकरीत घेतलेले होते तेंव्हा शिद्यांनी पेशव्यांना ही होळकरांची आगळीक कळविली व बापू होळरकांस परत बोलवावे अशी मागणी केली परत न आल्यास बापू होळकरांशी लढाई करावी लागेल. या प्रसंगी होळकरांची चांगलीच कोंडी झालेली होती. शिंद्यांच्या व सरकारच्या फौजा अलवार जयपूरच्या सीमेवर पोहोचल्याचे तुकोजीस समजाताच त्याने गर्वोक्तीने पुढील उद्गार

काढले. ''.....आता सिंद्याचा आमचा भाईपणा कशाचा राहिला मुलुक आहे आणि मी आहे. धवलपूराहून दिल्ली पावेतो मारुन जाळून पोळून उजाड करुन देईल चिंता काय आहे....'' हे वर्तमान महादजी शिंदे यास समजताच ते म्हणतात, ''....ज्या दिवसी होळकरांनी या कर्मास आरंभ केला ते दिवसी देस खानदेश माळवा ही ठाणी होळकरांकडील आहेत यात दरोबस्त अंमल बसवीन ....''[१८] सारांश, उभयता सरदारांत आपसांत लागली हे ठीक नाही.

## ६.२ शिंदे-होळकरांचा कलह संपुष्टात येण्यासाठी झालेले वाटणी संदर्भातील प्रयत्न

२४ जानेवारी १७९० रोजी हैद्राबादचा निजाम पत्रात अहिल्याबाईस सूचवितो की, तुकोजी होळकर व अलीबहाद्दर यांनी मिळून राजस्थानात महादजीच्या विरोधात कार्य केल्यास ''श्रीमंताच्या दौलतीत बखेडा होईल यात राजेरजवाडे जे जेर झाले ते शेर होतील'' महादजी आग्रही बीस्वामी कार्यावर उदार होईल तिकडे कार्य करतात यात खावंदाचे प्रतापे करुन होणार.

महादजी शिंदेच्या विरोधातील अहिल्याबाईचा तक्रार-अर्ज वकील जेंव्हा नाना फडणीसास दाखवितो तेंव्हा नाना फडणीस अहिल्याबाईस लिहितो, ''सोबत्या विषयीचा (महादजीचा) मजकूर श्रीमंत पंतप्रधान थोरले बाजीराव साहेब यांजपासोन उभयता सरदाऱ्या बरोबरीने राखीत आले. त्यात अंतर होणार नाही. वडील सरदारी तुमची, परंतु तुम्ही मात्र जागे व्हावे मागे चाकरी केली आता कशी करतो. याचा विचार करावा. पुढे नाना अहिल्याबाई असेही सूचित करतो की. ''.... सरदारीचे स्वरुप राहील असे करावे नारो गणेश व तुकोजीस वडीलपणे लिहून उभयंतांनी एक विचारे चालून सरकार कामे करावी व वाटणीच्या चाली पूर्वी पासू चालत आल्याप्रमाणे उभय पक्षी चालावे ....''[१९] तुकोजी होळकर वाटणी मिळावी यारिता रोजच कटकटी करु लागला. त्यासमयी आपाजी राम नाना फडणीस कळवितो की. ''.... सुभेदाराकडील वाटणीचा तगादा नित्य होत आहे. जो मुलख सुटेल त्याची निमे वाटणी द्यावी त्यास शिंद्यांनी उत्तर दिले की, तुम्ही वाटणी मागता यथार्थ आहे. परंतु पेशजी कैलासवासी मल्हारजी होळकर सुभेदार झाशीस लागले होते. ते समयी आम्ही कोट्यास होतो तेथे सुभेदाराराची पत्रे आम्हास आली की, आम्ही झाशीच्या शहरात गुंतलो आहो तरी तुम्ही येऊन कुमक करावी. तेंव्हा फौजसुध्दा सुभेदारापासी आलो. पुढे झासी घेतल्यानंतर वाटणीचा प्रकार पडिला तेंव्हा सुभेदारांनी आपल्या तोफखान्याचा खर्च आजीच वजा घालून बाकी राहिला त्याची वाटणी मात्र आम्हास दिली. त्यास हल्ली सुभेदार येथे येताच वाटणी दिल्ही इकडून कोणत्याही गोष्टीची दिकत

घेतली नाही .... सुभेदार वाटणी घेणे तर आमचा (शिंद्यांचा) फौज खर्च व तोफखाना पलटणे याचा खर्च वजा घालून बाकी राहील, त्याजपैकी मग वाटणी देणे तर देऊ ....''[२०] पथरगडाच्या स्वारीपासून होळकरांनी शिंद्यांशी वाकड्या चाली सुरु केलेल्या होत्या.

धोलपूर प्रांताच्या वाटणीसंदर्भात तुकोजी होळकर अहिल्याबाईस कळवितो की, ''....विशेष वाटणीचा मजकूर सोबत्याकडील (महादजी शिंदे) इनामी ढवलपूर वगैरे साडेचौलक्षाची जागा त्याप्रमाणे हल्ली मुलखाची वजावट होऊन बाकीस महाल अखेर पस्तीस लाखाचे राहिले. त्यापैकी आपले पाच लाखाचे इनामी जागा द्यावी बाकी राहिले. त्यास मेरठ वगैरे श्रीमंताकडील महाल ते श्रीमंताकडे द्यावे राहिले त्याची वाटणी करावी असे बोलण्यात येऊन आपल्याकडेस पाच लाख इनामी व वाटणीचे चार लाख एकूण नऊ लाखाचे महाल महाल यावे असे ठरले. अंतरवेदीत गढमुक्तेश्वर व हाडे हे दोन्ही महाल आपले पूर्वीचेच इनामी ते पाचाचे पेटियात लावून घेतले बाकी तीन लक्षात त्यांनी दोरेजा वगैरे महाल नेमले आहेत. परंतु हाली तेथील सायर पातशाहचे खालशात आहे ते खेरीज करुन महाल घ्यावे असे बोलणे सांप्रत आहे. त्यांस महालाचा अंमल एकीकडे व सायर दुसऱ्याकडे तेंव्हा बनेल कसे? जिकडे महाल तिकडे सायर हे आमचे बोलणे आहे....''[२१] सबब तुकोजीने सनदा परत पाठवून दिल्या त्या महादजीने ठेवून घेतल्या तेंव्हा अहिल्याबाई महादजीस लिहते, ''.... वाटणी वाजवीचे रुईने केली नाही त्यामध्येही मामलतीत दुसरा अंमल राहून नित्य उठून कज्जाच राहील त्यास निसुतक महाल लावून देणे''[२२] तेंव्हा महादजीने अहिल्याबाईच्या व तुकोजीच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. अशाप्रकारे होळकरांनी नऊ लाखाची वाटणी जी मिळणार होती तीही देण्याचे महादजीने स्थगित केले.

शिंदे, होळकर व अलीबहादर यांच्यातील कलह मिटविण्यासाठी शिवाजीपंत बापू व आपाजीराम यांनी पंधरा दिवस उभयतांशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अपयशी ठरला. आबा चिटणीस व निजामाकडील वकील जो महादजीच्या दरबारात असे तो बाबाराव गोविंद यांच्यासमोर दोघांच्याही आणा-शपथा होऊन दिलजमाई झाली तेंव्हाच महादजीने मथूरेकडे कूच केले. परंतु अलीबहादराने कूच केले नाही. तेंव्हा शोध करता असे लक्षात आले की, गोसाव्याच्या बदल्यात महादजीने अलीबाहादद्राच्या खर्चाची बेगमी करावी हे महादजीने मान्य करुन त्यास दोन लक्ष रुपये दिले परंतु अलीबहाद्दराच्या महादजीच्या म्हणण्यानुसार इस्मालई बेगच्या

पारिपत्यास फौज रवाना केली नाही तसेच आजपर्यंत लोक बेलभंडाराच्या शपथा घेत अगर देत होते पण अलीबहादराने श्रीमंताच्यापायाची शपथ घेऊनही करार पाळला नाही इस्माईल बेगचे पारिपत्य महादजीने केले त्यानंतर मारवाडकरांच्या पारिपत्यासाठी अलीबाहाद्दराने फौजेसह यावे म्हणूनही महादजीने खूप विनवणी कली ; परंतु ती व्यर्थच कमीत कमी लाडोजी शितोळे देशमुखांस फौजेस जयपूर प्रांताकडे रवाना करावे असे महादजीने सांगितले असता. अलीबाहदद्रातर्फे निरोप आला की, ऐवज घेऊनही फौज जयपूरकडे येण्यास तयार नाही.[२३]

या अशा प्रकारामुळे महादजी अली बहाद्दर व त्यांचा सल्लागार तुकोजी होळकर यांच्यावर खूपच चिडला, एकंदरीत परप्रांतात घरच्या माणसांची मदत महादजीस झाली नाही. तरी महादजीने जयपूर, जोधपूर, बंडखोर राजपूत सरदार व इस्माईल बेग यांचे पारपत्य केले.

शिंदे व होळकरांची वाटणी कशी करावी यासंबंधी स्वत: सवाई माधवराव पेशवे तुकोजी होळकरांस लिहितात, ''.... पूर्वी मल्हारजी होळकर झाशीचे मसलतीवर होते त्या समयी सिंद्यास कुमकेस बोलविले होते त्या समयी मसलत झाल्यावर वाटणीचा प्रसंग पडला तेंव्हा एकंदर बेरजेत तोफखान्याचा खर्च वजा करुन बाकीची वाटणी शिरस्तेप्रमाणे झाली त्यास याची माहीतगारी तुम्हास आहेच व आपणही हिंदूस्थानात मसलती बहुत केल्या ते समयीच्या चाली वाटणीच्या झाल्या असतील त्याची माहितगिरी परस्पर असेल तरी त्याचे तुमचे विचार एक तोड ठरवून उभयांताही चालावे. यात फाट दिसणार नाही व आब राहतो याजकरिता तुम्ही व ते मिळोन करने ते करावे. परस्परे विरुध्द न दाखविता सरकार काम उभयता एक विचारे करावे यात राजेरजवाडे याजवर दाब राहून काम होते तुम्हास मागील माहितगिरी आहेच. समजून ते करावे ....'' [२४] सवाई माधवराव पेशव्यांने ज्या पध्दतीने वाटणी करावयाचा मार्ग सुचविला, त्याच पध्दतीने शिंद्यांनीही वाटणीचा आग्रह धरलेला होता. परंतु या पध्दतीने होळकरांना वाटणी नको होती.

महादजी पुण्यास पोहचल्यावर त्याने शिंदे होळकरांचा कलह मिटावा अशी पुणे दरबाराला विनंती केलेली होती त्याचा असाही समज झाला की, पुणेकर मुत्सद्यांनी (नाना फडणीस ) होळकरास चढवून आपला घात योजला होता पण तो फसला. होळकर व शिंदे यांच्यातील संघर्षात पुणेकर मुत्सद्यी जास्त लक्ष न घालण्याचे कारण म्हणजे महादजीचा काटा जर होळकरांमार्फत निघाला

तर आपोआपच महादजीची शिरजोरी कमी होईल उपरोक्त पत्रावरुन स्पष्ट होते की, शिंदे व होळकर यांच्यातील कलह मिटला नाही तर तो वाढीसच लागला.

### ६.३ शिंदे होळकरांमधील लढाया :-

शिंदे-होळकरामध्ये प्रदीर्घ काळ चाललेल्या संघर्षामुळेच राजस्थानातील मराठयांची राजवट संपुष्टात आली.महादजीला राजस्थानातील मराठ्यांचे वर्चस्व टिकविताना तुकोजी होळकराने जो विरोध केलेला होता त्यामुळे महादजी संतप्त झालेला होता व पुण्यास येण्याचे तेही एक महत्वाचे कारण होते पुण्यास नाना फडणीसाने शिंदे होळकर संघर्ष मिटविण्याचा काही एक मार्ग काढला नाही. जे मार्ग सुचविले ते नाममात्र असून कालहरण करणारे होते. महादजीने पुण्यास येताना आपल्या सर्व अधिकाऱ्यांना होळकरांपासून सजग राहण्याचा इशारा दिलेला होता तुकोजी होळकर खंडणी गोळा करण्याच्या निमत्ताने राजस्थानात रेंगाळलेला होता. मुख्य हेतू मात्र शिंद्यांचा पाडाव करणे हाच होता. त्यासाठी तुकोजी व अहिल्याबाईने दोन वर्षे युध्दसाहित्याची व सैनिकांची जमावजमव केली होती.

''महादजीच्या अनुपस्थितीत शिंद्यांच्या फौजेचा समाचार घ्यावा यासाठी तुकोजी होळकर व त्याचे मुलगे मल्हारराव  व यशवंतराव प्रयत्नशील होते त्यास या बाबतीत अहिल्याबाईचाही पाठिंबा होता. त्यासाठी नवीन स्वारांची फौज उभारुन तिने ती तुकाजीच्या मदतीस पाठविली. राजस्थानातील होळकरांच्या या हालचालीवर शिंद्यांचा सेनापती गोपाळराव रघुनाथ याची बारीक नजर होती लढाई होणार हे निश्चित असल्याने त्याने डिबॉयन व लखबा दादा यास तातडीने बोलविले तेव्हा नऊ हजार पायदळ कंपू व तोफखाना घेऊन बनास नदीच्या काठी सुरौली या ठिकाणी त्वरित पोहचला.[२५]

या समयी कामा, प्रांत मथूरा या ठिकाणी शिंद्यांचे वर्चस्व होते कामा प्रांतात होळकरांच्या फौजेतील खुशाल कुंवर हा हजार बाराशे सैनिकांसह एका गढीत वास्तव्यास होता. तेंव्हा त्यास तेथून हुसकावून लावण्यासाठी गोपाळराव रघुनाथाने शिंद्यांची फौज रवाना केली. शिंद्यांच्या फौजेने मोर्चे लावले सत्तावीस दिवस लढाई चालली  या लढाईत तीन वेळा खुशालकुंवरने शिंद्यांचे मोर्चे कापले परंतु घरगुती भांडणात प्राण गेल्याने त्याचे सैन्य गोपाळरावास येऊन मिळाले अशा प्रकारे कामा या ठिकाणी शिंद्यांनी विजय मिळविला.[२६]

त्यानंतर बापू होळकरांने अलवार याठिकाणी माचेडीवाला बख्तावरसिंह यांच्या ठाण्यावर हल्ला चढवून तीन लक्षांची मागणी केली वास्तविक अलवार हे शिंद्यांचे अंकित आणि मित्रराष्ट्र होते. परिणामी त्या समयी गोपाळराव रघुनाथने बापू होळकरास संदेश पाठविला की माचेडीच्या राजाकडून आमचे दहा लक्ष रुपये येणे आहे. आमचा ऐवज वसूल होईतो तुम्हास तगादा करु देणार नाही. एवढेच सांगून न थांबता तो तेथे ससैन्य पोहचल्याने बापू होळकरांस खंडणी स्थगित करावी लागली.[२७]

महादजीच्या सर्वच अधिकाऱ्यांची होळकरांच्या लष्करी हालचालीवर कडक नजर होती. एकवार होळकरांची जिरविण्याचा त्यांनीही निश्चय केला. ‘‘महादजीनेही सरदारांना आदेश दिला की, ‘‘.... इतके दिवस मार्ग पाहिला आता तुम्ही बेलाशक जाऊन गळा पडावे गुंतोन राहू नये ....’’[२८] इकडे पुण्यात महादजी शिंदे होळकरांचा गुंता सोडविण्याच्या प्रयत्नात असताना तिकडे राजस्थानात तुकोजी होळकर शिंद्यांच्या ठाण्यावर हल्ला चढविण्याचे कार्य करीत होता. ‘‘होळकरांकडील पेंढाऱ्यांनी शिंद्यांकडील फौजेची लूट आणली. तितकेच कारण पूरे झाले. शिंद्यांचे सैन्य होळकरांचा पाठलाग करीत बनास नदीकाठी असलेल्या सुरौलीपर्यंत येऊन पोहचले त्या ठिकाणी सुभेदार तुकोजी होळकरांचा मुक्काम होता. [२९]

जयपूरची फौज होळकरांना येऊन मिळण्याच्या आतच हल्ला करण्यासाठी जोशांकडून मुहुर्ताची चौकशी करुन त्यानुसार अश्विन वद्य सप्तमी, रविवारी रात्री कूच करुन सडे दिवस उगवता गोपाळराव मेवाडनजीक पोहचले.उभय फौजांचा सामना सवाई माधोपुरनजीक बनास नदीचे दक्षिणेस सुरैली येथे झाला. आश्विन वद्य ८ सोमवारी ८ ऑक्टोबर १७९२ रोजी चार घटकांपर्यंत मातब्बर लढाई होऊन त्यात होळकरांच पराभव झाला पाराशर दादाजीने सुभेदारास घोड्यावर बसवून दोन हजार स्वार हुजरातीचे देऊन पुढे काढून दिले. या लढाईत होळकरांकडील माणिकचंद भंडारी व हिराजी वाघमारे हे दोघेजण ठार झाले, तर ४०-५० माणसे कामास आली.[३०] .... श्रीमंत राजश्री सुभेदार यांची राजश्री गोपाळरावभाऊ यासी लढाई जाली. सुभेदाराची फौजेस शिकस्त होऊन शंभर स्वारानिसी निघोन बुंदिकडे आले. वरकड बुणगे डेरे दांडे दरोबस्त लुटला गेला....[३१]

सुरौली येथील पराभवानंतर तुकोजी होळकर सैन्य व बुणग्यांसह चंबळ नदीच्या काठावरील झपात्या या गावी तळ ठोकून होता. शिंदेच्या फौजांनी १०ऑक्टोंबर१७९२ रोजी तिकडे कूच केले.

शिंद्यांचे सैन्य पोहचण्यापूर्वी तुकोजी होळकर दिवाणास ठेवून तेथून निघून गेलेला होता. दिवाणाने तीनशे सैन्यासह शिंद्यांच्या सैन्याशी मुकाबला केला.एक तासाच्या लढाईनंतर त्याचा पराभव झाल्याने त्याने माघार घेतली होळकरांच्या आठ तोफा शिंद्यांना मिळाल्या या लढाईत गोपाळरावाचा भाऊ जखमी झाला. होळकरांची ४० माणसे जखमी झाली.[३२] या लढाईबाबत जगन्नाथ विश्वनाथ नाना फडणीसास लिहीतो, ''..... सांप्रत होळकरांची व राजश्री गोपाळावभाऊ व जिवबाबदादा यांची लढाई झाली. होळकर खास सुभेदार सिकस्त होऊन इंद्रगड खातोलीचे सुमारे येऊन पाटण परगण्यात आले. म्हणोन वर्तमान आहे. कोणाकोणाचे कबिले कोट्यास येऊन पुढे जमेत धरुन सरकार फौजेसी (शिंद्यांच्या फौजेसी) लढाई द्यावी. वीरश्री बहुत धरिली. श्रीमंत मातुश्री अहिल्याबाई यांचे मानस सर्वस्व भरीस घालून येकवेळ बदनक्ष जाला. यास रुपास आणावे किवा बुडावे आपलाही शेवटचा दिवस आहे.याजकरिता श्री रेवातीरीचे घाटबंद करोन फौज ठेवावी याबद्दल सिलेदार लोकांस तमाम पत्रे पाठविली आहेत ....[३३]

तुकोजीच्या पराभवाची बातमी अहिल्याबाईंना समजताच त्या म्हणतात '' ....तुकोजीराव मारला गेला असता चिंता नव्हती. परंतु म्हातारपणी चाकराचे हातून बदनक्षीची गोष्ट'' अहिल्याबाईंनी पाच लक्ष रुपयांच्या हुंड्या सुभेदारांकडे पाठवून पत्रे लिहिले की, ''हिंमत न साडता हरामखोरांचे पारपत्य करावे. खर्चाचा व फौजेचा सेतू बांधते. म्हातारपणी जरब खाल्ली असल्यास लिहून पाठवावे. मी डेरेदाखल होते....[३४] महादजीस आपल्या सैन्याचा विजय झाल्याचे वर्तमान समजताच ते अंतर्मनी सेवकाच्या चाकरीवर प्रसंन्न झाले. मात्र वरवर असे घडायला नको होते असे बोलू लागले.[३५]

महादजी शिंदेच्या नोकराकडून म्हणजे गोपाळराव रघुनाथ, जीवबादादा , लखबादादा व डिबॉईन यांच्याकडून ८ ऑक्टोबर १७९२ रोजी बनास नदीकाठी सुरौली येथे तर ११ ऑक्टोंबर १७९२ रोजी चंबळ नदीच्या तीरावरील झपात्या या गावी झालेल्या पराभवाचे शल्य होळकर कुटंबाला चांगलेच झोंबले. त्यानंतर शिंदे होळकर यांच्यात या छोट्या मोठ्या चकमकी झडतच होत्या होळकरांच्या सैन्याने गनिमीकाव्याने शिंद्यांच्या सैन्याला हैराण केले. लष्कराच्या जोरावरच राजस्थानावर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले होते. ते लष्करी सामर्थ्यच आपसांत लढाया करुन नष्ट झाल्यास राजस्थानाावर मराठ्यांचे वर्चस्व राहणार नाही हे लक्षात घेऊन शिंद्यांकडील अधिकाऱ्यांकडून तहाचे बोलणे सुरु झाले. सुभेदार तुकोजी होळकराने संमती दर्शविल्याने

होळकरांकडील पाराजीपंत व बापू होळकर तर शिंद्यांकडून गोपाळराव रघुनाथ व जीवबादादा यांच्यात चर्चा होऊन यादी झाली. (होळकरांचा) बेलभंडारा तर (शिंद्यांची) उदी घेऊन परस्परे सफाई झाली. याप्रमाणे शिंदे व होळरांमधील वैमनस्य संपल्या सारखे झाले. हा झालेला तह मात्र अहिल्याबाईस पटलेला नव्हता. ''समेट झाला हा सर्वोपरी चांगला परंतु झाल्या गोष्टीची उजळणी न जाहली हे अंत:करणी खटकणी राहीली.''[३६]

परंतु तहाद्वारे राजस्थानला अल्पकाळात राजस्थानला लाभलेली शांतता ही युध्दापूर्वीची शांतता होती. दोन्ही बाजूंनी युध्दसाहित्याची व सैन्याची जमाजमव चालूच होती डिसेबर १७९२ मध्ये तुकोजी अहिल्याबाईस लिहितो, '' ..... सोबत्याचे फौजेने दगा करुन लौकिकाची हानी केली त्याचा सूड घेतल्याखेरीज लौकिकांत चांगले दिसणार नाही व उभे राहावयास जागाही असे केल्याने होईल नाही तर खावंद सुध्दा कोणी मानणार नाही. एक वेळ सूड घ्यावा तरी निर्वाह याजकरिता सर्वतोपरी अडचण तत्रापी मसब्यावर कसेही करुन करणे प्राप्त आहे. ही गोष्ट पोक्त जमाव झाल्यावाचून कशी घडते? अगोदर घरचा जमाव झाला पाहिजे यास्तव वडिली मशारनिल्हेस लेखन करुन पलटणे बोलावून घेतली पाहिजे ....''

दुसऱ्या पत्रात २३ डिसेंबर १७९२ रोजी तुकोजी अहिल्याबाईस लिहितो, ''सोबती सरळ होऊन आपला पाय हिंदुस्थानात नसावा ये विषयीची साधने त्यांची चालली आहे. त्यांचे (शिंद्यांच्या) मनात इकडील वर्चस्व राखून उभयतांचा तह पाडावा ऐसे आहे पैशाचा प्रकार पाहता कोठे ठिकाण नाही समय तर या प्रकारे प्राप्त जाहला त्याअर्थी वडिली वोढीत वोढ करुन चार पाच पलटणीचा ऐवज पाठवून तेथून एक पलटणे सुध्दा पाईट साहेबास बोलावून इंदूरी त्यास तयारी करावयासी सांगून जसी तयारी होईल तसी इकडे रवानगी करावी ..... पंढरपुराकडील बालेघाटचे सरदेचे हटकर सेलार धनगर पाखरे ढोणे सेलगड व जाट वगैरे ते चांगले त्याजला ठेवल्यास माणूस घोडे चांगले आणि सालस याकरिता फलटणचे न ठेविता बालेघाटाकडील नीट ते ठेवावे फलटणकडील काही अढळाचे चांगले असल्यास सोईचे वाटल्यास ठेवावे विना फौज नवी ठेवल्यावाचून कोणतेही ठीक नाही येथे जुनी फौज आहे ते काही उपयोगी नाही .... शिंद्यांच्या विरोधात आपली बाजू समर्थ व्हावी याकरिता तुकोजी होळकर गंगापार पाच हजार रोहिल्यांची मदत घेण्याची तयारी करतो. त्यासाठी

अहिल्याबाईने आर्थिक मदत द्यावी असे पत्राद्वारे कळवितो.[३७] गव्हर्नर जनरल कॉर्नवालिसकडेही अलाहाबादमधील फौजा पाठवाव्यात म्हणून तुकोजीने विनंती केली.[३८]

होळकरांच्या सर्व हालचालींची माहिती महादजीस पुण्यास समजत होती. शिंदे व होळकरांमधील कलह मिटविण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने त्यांनेही होळकरांशी लढाई द्यावी अशीच पत्रे आपल्या अधिकाऱ्यांना पाठविली उभयतांच्या फौजा संख्येने सारख्याच असल्या तरी शिंद्यांकडील तोफा जास्त व होळकरांपेक्षा उत्कृष्ट होत्या. टोक परगण्यातील सोनवा बागडी या गढयांवर नुकतेच होळकरांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले होते. शिंद्यांच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक रांगड्यांना मदत केल्यानेच त्या गढया पुन्हा वर्चस्वाखाली आणल्या तेंव्हा तुकोजीने अहिल्याबाईस कळविले की, होळकरांनी घेतलेल्या गढया रांगड्यांना देणे ही रीतीची गोष्ट झाली नाही.[३९]

पुन्हा लढाई करण्याच्या इराद्याने महेश्वराहून जमियत कुमकेस आली. होळकरांचा जमाव पोक्त सरंजामी जाहला. अशाही परिस्थितीत बापू होळकरांच्या मध्यस्थीने गोपाळराव रघुनाथांशी तह झाला. ‘‘.....सोबत्याकडील कारभारी फौजसुध्दा पन्नास कोस लढाईचा इरादा करुन चालून आले आणि चौ कोसाची तफावत राहता सलुखचे बोलणे लाऊन अगोदर राजश्री पाराशर दादाजी यासी भेटून मागून चिरंजीव राजश्री कासिराव व बापू यासही भेटून गेले....’’[४०] पुण्यात कलह मिटविण्याची चर्चा चालू असल्याने पूर्वीच्या चालीप्रमाणे चालावे असे निश्चित करुन तडजोड करण्यात आली. यानंतर मल्हारराव तेथे पोहचल्यावर तह झाल्याचे वर्तमान ऐकून तो चिडला.व आपल्या वडिलांची निर्भत्सना करुन तो म्हणाला ‘‘कंपूस एक दिवसांत मारुन बरबाद करीन आमच्या मनातून कोणत्याही प्रकारे सख्य करावयाचे नाही. त्याजला जमीनदोस्त करु’’[४१]

मल्हारराव होळकरांपुढे पाराशर दादाजी व बापू होळकरांचे काही चालेना त्यांचा नाईलाज झाला. मल्हाररावांने चढाईचे धोरण स्वीकारलेआणि त्यास तुकोजीनेही मान्यता दिली. अशा प्रकारे शिंदे विरुध्द होळकर युध्दाला पुन्हा तोंड फुटले.

### ६.३.१ किशनहलीची लढाई :-

होळकर सैन्याचे कासिराव, बापूजी व मल्हारराव असे तीन भाग करण्यात आले या तिन्ही पथकांनी शिंद्यांच्या सैन्यावर आक्रमण करण्यासाठी कूच केले शिंदे व होळकरांच्या सैन्याची लढाई

कोट्यापासून १५ कोसांवर असलेल्या किशनहाली या खेड्याजवळ २९मे १७९३ रोजी झाली. या लढाईचे वर्तमान हरी रामचंद्र पुढीलप्रमाणे कळवितो. ''..... राजश्री तुकाराम होळकर सुभेदार यांनी मागती जमाव करुन छ १० रोजी तीन टोल्या करुन पाटीलबावाकडील लोकांवर गेले तेव्हा कच खाऊन पंधरा कोस मागे (होळकर) आले. परंतु तेही (शिंदे) यांचे मागे चालून आले. याचा व त्यांचा मुक्काम साहा कोसाचे अंतरे राहिला. मग यांनी दुसरे लढाईचा प्रसंग कोट्यापलिकडे पंधरा कोसावर घेतला की आपण माघारे आलो असता आपल्या पाठीमागेच लागले तेंव्हा हे ठीक नाही ऐसी वरीश्री धरुन तीन टोल्या केल्या बापू व कासिराव उभेयता सुभेदार येकीकडे करुन गेला. परंतु याचा (होळकरांचा) गलाठा जाला आणि लोकांनी पळ कहाडला. सुभेदार मुकुंद दरबारीजवळ आले बापूजी व कासिराव बुंदीकडेस गेले. मल्हारराव कोठे आहेत. ही बातमी अद्याप लागली नाही.पाटीलबावाकडील फौजेचा मुक्काम कोट्यानजीक आहे. उदईक बापूजी व कासिराव सुभेदार यांजपासी येऊन दाखल होतील आता लढाई सुभेदारांनी द्यावी...'' होळकरांचे २०० घोडे ५० उंट व ४ उंटावर लादलेला खजिना इत्यादी लूट गोपाळराव रघुनाथाच्या हाती लागली. या लढाईत बापू होळकरांचा दिवाण रघुपतराव हा मारला गेला. कोट्याच्या महालात डिबॉईन व जीवबा दादा बक्षी युध्दाच्या तयारीनेच होळकरांवर लक्ष ठेवून होते. चारही बाजूंनी शिंद्यांच्या फौजांनी होळकरांच्या सैन्याला वेढलेले होते.[४२]

### ६.३.२ तराण्याची लढाई :-

शिंद्यांविरुध्दच्या लढाईत आपली बाजू बळकट राहाण्यासाठी तुकोजीने बॉईड यास ४-५ पलटणे तयार करण्यास सांगितले होते व यासाठी त्याने अहिल्याबाईकडून आर्थिक मदत घेतलेली होती. फिरंगी फलटण ठेवण्याबाबत पाईट साहेबांशी करार केला. त्या करारानुसार बॉईडने पलटणी तयार करुन तो महेश्वर येथे अहिल्याबाईच्या भेटीस पोहोचला. भेटीनंतर बॉईड तुकोजीकडे २ पलटणी व युध्दसाहित्य घेऊन जात असल्याची माहिती शिंद्यांच्या अधिकाऱ्यांना समजली तेंव्हा तो तुकोजीला मिळण्यापूर्वीच त्याचा समाचार घेण्याच्या दृष्टीने सदाशिव मल्हारच्या परवानगीने बाळोजी इंगळे, खडोजी गुजर, मिर्झा बेग, ओकारमल इत्यादी अधिकाऱ्यांनी १० तोफा व ४ पलटणींसह ७ ते ८ हजार सैन्यास बरोबर घेऊन बॉईडच्या पलटणीवर ३० मे १७९३ रोजी छापा घातला. वैशाख वद्य ५ रोजी प्रात:काळापासून दोन प्रहर पावेतो लढाई चालली शिंद्यांकडील शे - दोनशे माणूस

जखमी झाले. ४ घोडी व पाच बारागीर वगैरे गोसावी ठार झाले. होळकरांकडील माणसे ४० जखमी झाले १० माणसे कामास आली. दोन घोडी मेली बॉईड साहेबाने सरंजाम द्यावयास फारच अनमान केला. पण उपाय चालेना पराभव झालेला सरंजाम दरोबस्त तोफा बंदूका हत्यारे इत्यादी शिंद्यांच्या अधिकाऱ्यांनी घेतले काही गोरे धरुन लूटून घेतले. पूर्वी शिंद्यांकडे थोटा फिरंगी सरदार होता त्यासही पकडण्यात आले. त्यानंतर तराण्याची पेठही लुटण्यात आली.[४३] अशा प्रकारे बॉईड तुकोजीला मिळण्यापूर्वी तराणा या ठिकाणी शिंद्यांच्या लोकांनी बॉईडच्या पलटणीस संपूर्ण बुडविण्यात यश मिळविले व तुकोजीची सामारिक शक्ती कमी झाली.[४४]

### ६.३.३ लाखेरी युध्द :-

शिंदे व होळकरांच्या फौजा लाखेरीच्या आसपास होत्या. इंद्रगडच्या आग्नेयेला तीन मैलावर बलवान हे ठिकाण आहे बलवनच्या नैर्ऋत्येला सहा मैलावर लाखेरी हे ठिकाण आहे. लाखेरी जवळ कोट्यापासून इंद्रगडपर्यंत पसरलेली डोंगरांची रांग आहे.

''शिंद्यांच्या ९ हजार पायदळ व २० हजार घोडदळ व ४० तोफांचे नेतृत्व डिबॉईनचे होते. डिबॉईनच्या एका पलटणीत ५४० सैनिक होते. तर तुकोजी होळकरांचे ३० हजार घोडदळ व गोसावी फौज आणि ६० तोफा होत्या होळकरांकडील दद्रुनेकच्या एका पलटणीत ४०० सैनिक होते. दोन्ही बाजू युध्दौत्सुक बनलेल्या होत्या तुकोजी होळकराला शिद्यांचे लष्करी सामर्थ्य माहीत असल्याने त्याने लढाई टाळण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा तडजोडीचा प्रयत्न करुन पाहिला पण तो अयशस्वी झाला.[४५]

लाखेरीच्या खिंडीत डिबॉईनच्या फौजांनी व पलटणीने तुकोजीच्या सैन्याला गाठले. लाखेरीच्या खिंडीच्या टोकावर असंख्य तोफा दुद्रुनेकने मोक्याचे स्थान पकडून सज्ज ठेवलेल्या होत्या. लाखेरी खिंडीच्या उतरणीवर दाट जंगल असून पावसामुळे जमीन ओली व दलदलीची बनलेली होती. दोन्ही पक्षाकडून युरोपियन युध्द तंत्राचा वापर हे या लढाईचे वैशिष्टय असून ही घटना भारताच्या इतिहासात प्रथमच घडत होती. ''पायदळ व घोडदळ यांची अचूक कामगिरी पूर्णत्वास जाताच शिंद्यांच्या फौजांवर तुटून पडण्यासाठी राखीव घोडदळ तुकोजीने मागे ठेवले होते.

डिबॉईनने एक हजार पायदळासह लाखेरी खिंडीकडे कूच केले. त्याचेवळी लखबादादा घोडदळासह त्याला येऊन मिळाला. उंच ठिकाणी जाऊन त्याने शत्रुपक्षाची दुर्बिणीच्या सहाय्याने टेहळणी केली व ५०० घोडेस्वार पुढे पाठविले. पायदळाची आगेकूच शत्रूपक्षाला समजू नये हा त्या पाठीमागचा उद्‌देश होता. युध्दजन्य परिस्थिती कठीण वाटल्याने पायदळाचे नेतृत्व डिबॉईनने स्वत:कडे घेतले व नेहमीपेक्षा अधिक जलद गतीने व हुशारीने हालचाली सुरु केल्या.

१ जून १७९३ रोजी लाखेरीच्या खिंडीत सूर्योदयासमयी लढाईला तोंड फुटले. शिंद्यांचे कंपू व तोफखाना, त्याचबरोबर असंख्य गोसावी फौजांमध्ये सूर्योदयापासून चौदा घटका तोफांची लढाई झाली. दद्रुनेकच्या तोफखान्याने चांगलीच मारगिरी करुन शिंद्यांकडील सैन्याला प्रतिउत्तर करणे अवघड जात होते. अशातच दद्रुनेकच्या तोफखान्याच्या गोळयांच्या वर्षावामुळे डिबॉईनच्या तोफा वाहू नेणाऱ्या छकड्यांना आग लागली त्यामुळे सर्वत्र धूर पसरला व शिंद्यांच्या सैन्यातील ही गोंधळाची परिस्थिती पाहून होळकरांच्या  सैन्याने घोडदळाच्या सहाय्याने जोरदार हल्ला चढविला. जीवितहानी होऊ नये म्हणून डिबॉईनने आपले घोडदळ मागे घेतले. तसेच होळकरांचे सैन्य पुढे घुसु लागले. दाट झाडीत  पोहचताच डिबॉईनने आपल्या सैन्याला ऑर्डर देताच दाट झाडीतून शिंद्यांच्या तोफा होळकरांच्या सैन्यावर प्रचंड आग ओकू लागल्या. होळकरांच्या सैन्याने प्रतिकार करणे तर दूरच ते जीव वाचवून माघारे पळू लागले. खिंडीच्या रक्षणासाठी दद्रुनेक बरोबर १५०० सैनिक होते. त्यांनीही डिबॉईनच्या पायदळाला रोखून धरण्यासाठी पराक्रमाची शर्थ केली परंतु ते सर्व अधिकारी व सैनिक मारले गेले. लाखेरी खिंड डिबॉईनच्या ताब्यात आली. दद्रुनेकबरोबर प्रेताच्या ढिगाऱ्यात पडून राहून आपला जीव वाचवावा लागला होळकरांच्या पराभव होऊन सैन्याने पलायन सुरु केले. पळती फौज पाणी पंधरा वीस कोस नाबुंद. सुलतानपूराहून तीन कोसांवर तलाव होता. त्यात कर्दम शेष राहिला वस्त्रात घालून लोक पिळून प्याले लढाईत हजार बाराशे लोक जखमी व ठार झाले पाण्याच्या दिक्कतीने बुणग्यांतील हजार आठशे माणसे मृत्यु पावली मल्हारराव परवश होऊन  (दारु पिऊन) पाण्यात पडले. ज्यांचे भवशासवर लढाईला संमती दिली त्यांची ही दशा सुभेदार व त्याचे चिरंजीव इंदोरकडे पळून गेले. होळकरांच्या ३८ तोफा शिंद्यांना मिळाल्या.[४६]

### ६.३.४ पराभवाची कारणमीमांसा :-

काशिराव , बापूराव होळकर यांनी फितुरी केल्याने होळकरांचा लाखेरीच्या लढाईत पराभव झाला. बापू होळकर यांनी कमी केली. अपकीर्ती झाली म्हणून अहिल्याबाईंनी त्यांच्यावर दोष ठेवला. त्यावर पराजीपंत म्हणाले की, ''आम्ही बापूजी यांनी अंतर केले नाही मल्हाररावांनी कमी केले तह झाला त्यात काही गोष्ट सरदारांस पसंत पडली नाही व चिरंजीवाचे मसलतीवर काम केले तसे फळ प्राप्त झाले आम्हावर दोष देणे ठिक नाही.[४७] २७ ऑगस्ट १७९३ रोजी मुसा दद्रुकनेक व गोरे दोन असामी. एकूण तिघे गोरे व जमादार आसामी दहा यांनी अहिल्याबाईंची भेट घेतली. त्यासमयी अहिल्याबाईंने दद्रुनेकच्या कार्याची प्रसंशा करुन म्हटले की, ''तुम्ही लढाई चांगली केली परंतु पाराजीपंत यांनी तुमची मदत न केली त्याचे उत्तर मुसा दद्रुनेक यांनी केले की मदत त्यांनी करावी तर हे जवळ नव्हते आमच्या तोफा पाच सा दारुगोळा होता. तोवर मार जाली त्यांचा सरंजाम भारी यामुळे कमी पडली आमची माणसे आठशे नऊशे पडली होणार ते जाले.''[४८] दद्रुनेकने होळकरांच्या बाजूने पराक्रमाची शर्थ केली,. त्याचे बहुतेक लोक कापाले गले त्यांच्या ३८ तोफा डिबॉईनने घेतल्या डिबॉईनची अप्रतिम कल्पकता जलद गतीने केलेल्या हालचाली व आखलेले डावपेच आणि जीवबादादा बक्षीचे प्रसंगावधान यामुळेच लाखेरीच्या लढाईत शिद्यांचा विजय झाला. या युध्दाबाबत स्वत: डिबॉईनच लिहितो की, लाखेरीच्या समर भूमीइतके श्रम व चिंता मला या जन्मात केव्हाही घडली नाही.[४९]

### ६.३.५ लाखेरी युध्दाचे परिणाम :-

उत्तर हिदूंस्थानातील वर्चस्वासाठी साठ वर्षे चाललेला शिंदे - होळकरांचा संघर्ष लाखेरीच्या युध्दाने समाप्त होऊन शिंद्यांच्या राजस्थान वरील वर्चस्वास मान्यता मिळाली. होळकरांचे राजस्थानातील महत्त्व संपुष्टात आले. ''होळकर स्वरुप गमावून राहिले.[५०] होळकरांचे धनीपण कोठेच उरले नाही मराठी लष्करात परदेशी युध्दपध्दतीतील कवायती फौजेची सुरवात झाली. शिंदेशाहीत डिबॉईन व पेरॉन यांनी तर होळकरशाहीत दद्रुनेकने कवायती फौजा उभारल्या. या नव्या युरोपियन पध्दतीने मराठी शिलेदारीच्या फौजेला आणि तिच्या गनिमी काव्याच्या युध्दपध्दतीला लष्करातून हद्पार केले. वास्तवीक ही नवी युरापियन पध्दत मराठ्यांच्या लष्कारी पध्दतीत एकजीव

होणे आवश्यक होते. परंतु तसे घडले नाही मराठे या नव्या पध्दतीशी एकरुप होऊ न शकल्याने ते गनिमी काव्यातही वाकबगार राहिले नाहीत व युरोपियन युध्दपध्दतीतही कुशल बनले नाहीत परिणामी इंग्रजांपूढे मराठ्यांच्या (शिंदे, होळकरांच्या) लष्काराला पराभव स्वीकारावा लागला.[५१] शिंदे होळकरातील वैमनस्य प्रज्वलित करण्याचे कार्य जयपूरकर करीत असत. सुभेदार तुकोजी होळकर जयपूरचा मुख्य कारभारी दौलदराम यास बोलावून म्हणतो की ''ऐवजाचा इल्लाबिल्ला दाखवून आमचे आपसांत (शिंदे होळकरांत) कलह उत्पन्न केला. यावर दौलतराम हलादिया उत्तर देतो. की आम्ही त्यांचेही देवाळ व आपलेही देवाळ जो जबरदस्त असेल तो घेईल. तसेच तुकोजी होळकराला धन सैन्य व युध्दसाहित्य देण्याचे (खोटे) आश्वासन देऊनच महादजीच्या अधिकाऱ्यांबरोबर युध्द करण्यास प्रवृत्त केले.[५२] पण किशनहाली तराणा व लाखेरी इत्यादी संघर्ष सुरु होऊन होळकरांचा पूर्ण पराभव झाला तरीही जयपूरकरांचे सैन्य किंवा युध्दसाहित्य होळकरांकरीता युध्दभूमीवर पोहचले नाही. सबब शिंदे- होळकरांत आपसांत चाललेल्या संघार्षत दोघांचेही सामारिक सामर्थ्य नष्ट झाले व त्यामुळेच मराठ्यांचे वर्चस्व सत्ता व राज्य संपुष्टात आले पण राजस्थानातील सर्वच संस्थाने भारत स्वंतत्र होईपर्यंत अस्तित्वात राहिली.

लाखेरी येथील लढाईतील विजयाची बातमी पुणे येथे समजताच चिटणीसाने विजयदर्शक तोफा सोडण्याची महादजीकडे परवानगी मागितली परंतु महादजीने ती धिक्कारली आपल्यामागे सरदारांनी होळकरांची अवस्था एवढया स्वरुपात आणल्याबद्दल पाटीलबावास वाईट वाटून ते म्हणाले ''आपसांत कटकट करुन जन्माचे भाऊपणात पाणी ओतले. तोफा सोडाव्या असे मला वाटत नाही आपल्या सरदारांनी केलल्या अमर्यादेबद्दल त्यांनी गोपाळरावभाऊस भेलसे येथे कैदेत ठेवले.[५३] तर जिवबादादास पुण्यास बोलावून घेतले. उत्तर हिंदूस्थानचा कारभारी लखबादादा व जगोबाबापूकडे सोपविला व डिबॉईनला फौजेचे मुख्य बनविले. [५४]

महादजीला आव्हान ठरु शकेल अशी एकमेव सत्ता असलेल्या होळकरांच्या दारुण पराभवांच्या बातमीने पुण्यातील मुत्सद्यांनी महादजीशी सलोखा व तडजोड करण्याची भाषा सुरु केली तर आपसांतील संषर्घात मराठे अडकून पडल्याने राजपूत संस्थानिक खंडणी देण्यास टाळाटाळ करु लागले व राजस्थानावर महादजीने जे वर्चस्व मिळविलेले होते तेही नाहीसे होऊन अराजक सदृश्य परिस्थिती राजस्थानात निर्माण झाली.

यानंतर लवकरच १२ फेब्रुवारी १७९४ रोजी पुण्याजवळील वानवाडी येथे छावणीत महादजी शिंदेचा मृत्यु झाला.[५५] महादजी शिंदेचा मृत्यु हा मराठा साम्रज्याला फार मोठा धक्का होता. शिंदे होळकर संघर्ष हा सुरुवातीपासून म्हणजे मल्हाररावांच्या काळापासून सुरु होता. तरी सुध्दा महादजीच्या शिंदेच्या मृत्युची बातमी कळताच अहिल्याबाईना तीव्र दु:ख झाले. ''....पाटीलबाबांचा काल झाला, त्यांचे श्रम या उभयतांच होऊन नौबात बंद केली. बाई व सुभेदार श्रमी बहुत झाले.''[५६] अहिल्याबाईंनी लिहिले, ''ते असते तर विचारांचे माणूस व दूर अंदेश एकवेळ दुराग्रहाने गोष्टी जाल्या त्या अविवेकाने जाल्या हे ध्यानास घेऊन सरकारशी व भाऊपणाशी पूर्व चालीने चालून मार्गावर येते.''[५७] महादजीच्या मृत्युनंतरही शिंदे होळकरांतील भाऊपणा कायम रहावा अशी अहिल्याबाईंची इच्छा होती. महादजीनंतर शिंदे घराण्याची वस्त्रे दौलतराव शिंदेला द्यावयाची होती तेंव्हा अहिल्याबाईने लिहिले. ''राजश्री दौलतराव शिंदे याजला सरदारीची वस्त्रे द्यावयाची आहेत. ते चिरंजीव आल्यावर द्यावी यात भाऊपणा यांची वहिवाट राहून सरकार उपयोगही आहे.''[५८] शिंदे होळरांतील मतभेद संपुष्टात येऊन त्यांच्यातील सलोखा कायम राहावा अशी अहिल्याबाईंची इच्छा होती. हे स्पष्ट होते.

## ६.४ खर्ड्याची लढाई (इ.स.१७९५) होळकरांची कामगिरी :-

अहिल्याबाईंना स्वत:ला आप्तांच्या मृत्युमुळे ज्या प्रमाणे धक्के बसले. त्याचप्रमाणे मराठी सत्तेला अहिल्याबाईसमोरच मोठे धक्के बसले, पानिपतची लढाई, नानासाहेब पेशव्याचा मृत्यु या सर्वावर कळस ठरणारी गोष्ट म्हणजे तरुण माधवराव पेशव्यांचा मृत्यु आणि उत्तरेकडील मराठयांच्या सत्तेचा एक आधारस्तंभ महादजी शिंदे यांचा मृत्यु. या सर्व आघातामुळे मराठी सत्तेच्या इमारतीला धक्के बसत होते. मराठी सत्तेच्या राजकीय क्षेत्रात अस्थिरतेचे आणि अशांततेचे वातावरण पसरलेले होते. अशातच महादजीचा मृत्यु झाल्याने तुकोजीच्या मनातील भय जाऊन तो स्वत:ला हिदुस्थानचा अधिकारी झालो असे समजून अखंड मद्यपानात रमला होता.[५९] अहिल्याबाई त्यास पुण्यास जाण्याचा तगादा लावीत होती. परंतु तुकोजी पैशाचे कारण सांगून टाळाटाळ करीत होता. शेवटी अहिल्याबाईने तुकोजीच्या पैशाच्या संदर्भात असलेल्या समस्येचे निराकरण केले. ते कसे केले ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

''त्यादिवशी सारवाट उंट घेऊन येईनात डेरे खोलीनात व खर्चास काही नाही म्हणून अडून बसले. तेंव्हा तुकोजीने कपाळास हात लावला. व हा सारा मजकुर बाईकडे सांगून पाठविला. तेंव्हा बाईंनी आपले खिजमतगार जासूद पाठवून डेरे देवविले. दिवाणगिरीचा कारभार नारो गणेश यांच्या मुलाकडे सांगावा !असे बोलणे लाविले होते. फौजेचे जे मागील देणे होते त्याची आड पडली होती. शेवटी लोकांचे जे मागील देणे राहिले होते त्याचे फडसे करावे असे कबूल केले होते. पाच सात लक्ष रुपये पर्यंत जो ऐवज खर्चास लागले तो सद्या ऐवज मोबदल्यास द्यावा यास कोटे संस्थानाचा व बुंदी महाल, कोच वगैरे ऐवज लावून द्यावा. पुढे स्वारी खर्चास वगैरे २०लक्ष पर्यंत ऐवज खर्च करुन श्रीमंताजवळ जावे. ते जी मोहीम सांगतील ती मसलत मारावी. या प्रमाणे करार केले. दुसरे त्यांनी चार कलमे लिहिले होती की पंचपहाड महाल सोडावा., आंबाडची फडणवीसीची आसामी द्यावी. दरसालचा आमचा ऐवज आम्हास पूर्ववतप्रमाणे मिळावा. व पोतनिशीची आसामी आमची आम्हाकडे चालवावी, बाईनी इतक्या कलमास रुकार देऊन शिवाय आतून सर्वस्वी खातरजमा केली.[६०] तुकोजीच्या समस्येचे निराकरण केले. त्यामुळे शेवटी नाइलाजाने विविध बहाने करीत तुकोजी पुण्याकडे रवाना झाला. पुण्यात तुकोजींनी पेशव्यांची भेट घेतली हयाच सुमारास हैद्राबादच्या निजामाने मरायांची सरदेशमुखी व चौथरी जवळपास तीन कोटी रुपयांची रक्कम दिली नव्हती याशिवाय पस्तीस लक्ष रुपये वार्षिक उत्पन्नाचाही प्रदेशही मराठयांना देण्याचे तो टाळत होता इंग्रजांच्या मदतीने शेफारलेल्या व पाश्चिमात्य सेनांनी जनरल रेमांडच्या हाताखाली प्रशिक्षित झालेल्या कवायती कंपूच्या भरवशावर निजामाने थकित रक्कम देण्यास नकार दिला.[६१] त्यामुळे मराठयांचा निजामाशी संघर्ष अटळ ठरला.

पेशवा सवाई माधवरावने निजामाला तोंड देण्याचा निश्चय करुन शिंदे , होळकर भोसले, निंबाळकर परशरामपंत, श्रीनिवास, गायकवाड, घोरपडे, दरेकर, फडके, निंबाळकर, दहीगावकर, चव्हाण, ढमढेरे, पवार, मोहिते, रणदिवे, भोईटे, जाधव, शितोलेव, घाटगे इत्यादी सर्व सरदारांना तातडीने पुण्यास येण्याविषयी पत्रे पाठविली.[६२] अशा आणिबाणीच्या प्रसंगी खर्ड्याच्या मोहिमेसाठी जाणाऱ्या तुकोजीच्या खर्चाची तजवीज करुन कारभाराविषयी अहिल्याबाईंनी तुकोजी व इतर सरदारंना हितोपदेश केला. ''यासी दुसरी गोष्ट न करावी माझे जिवांत जीव आहे या आवधीत एखादी गोष्ट चुकेल, नाही असे नाही पण असे झाल्यास त्याबद्दल मला लिहावे उपरांतीक मी

तुम्हाला जसे सांगेल, तसे आचरण करावे. परभारे तुम्ही एखादी दुसरी गोष्ट करु नये[६३] याप्रमाणे शपथ प्रमाण करुन त्यांचे आपसांत हातात हात दिले. तसेच पारनेरकर, राजश्री शिवाजी गोपाळ, खंडो महादेव वगैर मंडळीस सांगितले की, ''तुम्ही दप्तरचे काम करावे., कारभारात बोलू नये, दिवाणांनी दप्तरी दाखला झाडून द्यावा. तुम्ही आपले कागदपत्र झाडून मागितला तो दिवाणास समजावीत जावा वरकड दरखदारांनी आपली कामे करावीत.''[६४] या प्रमाणे सांगितले. तसेच ''कोणी कोणाचा द्वेष करु नये सर्वांनी एकचित्ताने राहून आपली कामे करुन दौलत सांभाळावी. मागील गोष्ट झाली ती, ती झाली तिचे वैरभाव मनात स्मरु नये. वाहिली गंगा राहिले तीर्थ असे आचरण असावे. याप्रमाणे होऊन चार घटका दिवस राहता .... भोजनास घालून, दोन वस्त्र शकुनाची देऊन .... निरोप दिला.''[६५]

योग्य निरवा निरव करण्यास अहिल्याबाईचा हातखंडा किती होता हे दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांचा उपदेश साधूपणास किती शोभेसा आहे. हे ही दिसून येते.

सवाई माधवराव या खर्ड्याच्या मोहिमेस जातीन हजर होता. ११ व १२ मार्च १७९५ अशी दोनच दिवस लढाई चालली. दुसऱ्याच दिवसी निजाम अलीने तहाचे बोलणे केले. तहान्वये मराठ्यांना पाच कोटी रुपये देण्याची निजामाने मान्य केले होते. पण प्रत्यक्षात तीस लाख रुपये रोख व तीसलक्ष वसूलीचा प्रदेश मराठ्यांना मिळाला.[६६] मराठा राज्यासाठी होळकरांनी केलेली ही शेवटचीच कामगिरी ठरली.

तुकोजी दहा हजार सैन्यासह या सैन्या सहभागी झाला होता.[६७] सर्व सरदारांना या मोहिमेनंतर पेशव्यांनी सन्मापूर्वक निरोप दिला.

### ६.५ अहिल्याबांई निधन :-

राज्य कारभार, घरातल्या मंडळीचे मृत्यु, तशात म्हातारपण शिवाय उपासतापास यांमुळे अहिल्याबाई खूप थकलेल्या होत्या पण राज्य कारभार करण्याची धमक मात्र पूर्वीप्रमाणे होती. त्यांच्या कारकीर्दीतले शेवटचे पत्र पुढीलप्रमाणे सांगता येईल.

केसू भिकाजी लिहितो.

६ फेब्रुवारी इ.स.१७९५ सेवेशी विनंती सेवक कचो जनार्धन नि।। केसो भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ माहे रजब भृगवासर प्रात काल पर्यंत सेवकांचे वर्तमान यथस्थित असे विशेष ... गंगाजल निर्मल मातु:श्री अहिल्याबाई यांचे नावाचा लाखोटा होता. पावताच क्षणी जाऊन वर्तमान कानावर घातले. सायंकाळचे स्नान करुन जपात होती. खुणे करुन सांगितले की, भोजनोत्तर पत्रे श्रवण करीन ते दिवशी ग्रहणाची कर होती. स्नाने करुन, दाने करुन श्रमली होती. दिवसभर उपोषण रात्री भोजन जाल्यानंतर काही कचेरी झाली होती. ती बरखास्त करुन बिछान्यावर एकलीच बसून कारभारीया पैकी राजश्री विनायक बाजीराव व बाळाजी कृष्ण यांस बोलवून त्याजकडून पत्रे अक्षरशा श्रवण केली. सरकारचे पत्र एक व नबाबाकडील वकीलाचे पत्राची नक्कल एक होती. मजकूर, प्रेमसुख जोहरी यांचा होता. तो ध्यानात आणून सरकार आज्ञेप्रमाणे तेच क्षणी सव्वा प्रहर रात्रपर्यंत बसून जागा जागा घाटनाके येथील कामविसदार यांस पत्रे लिहून रवाना केली. व आसपासचे जवळ होते त्यांस समक्ष बोलावून ताकीद करुन बंदोबस्त करवीला. दक्षिणोत्तर पहाडाचे घाट व नाके चोरवाटा, व उभय रेवा तीर येथील नावघाट पायउताराचे तर नेमावर पर्यंत, याजकडील जिल्ह्यातील झाडून बंदोबस्त करवीला. राजश्री रघुनाथ पंत यांस बऱ्हानपूर येथे पत्रे पाठविली.... येथील कमविसदार यांस व जमीनदार भूमे वगैरे यांस ताकीदी सांगून पाठवून, नंतर सव्वा प्रहर रात्रीस निद्रा केली[६८]

यावरुन अहिल्याबाईची कामकाज करण्याची किती तयारी होती हे स्पष्ट दिसते. आपल्या जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत राज्यकारभाराची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडलेली दिसते. तसेच कर्तव्याप्रती जागरूक, निर्णयक्षमता, कामाप्रती तत्परता हे सर्व गुण यातून दिसून येतात.

श्रावण वद्य चतुदर्शी १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांचे महेश्वरास निधन झाले.[६९] अशा प्रकारे राज्यकारभारातील कर्तव्यदक्ष राज्यकर्ते अहिल्याबाई होळकर यांनी जगाचा निरोप घेतला.

## संदर्भ सूची

१. खरे ग.ह. 'ऐतिहासिक संकीर्ण निबंध', खंड ९ भा. इ.सं.म.त्रैमासिक, वर्ष ४६ अंक, १ते४, १९६८,पृ.क्र.६३,६४. सरकार जदुनाथ ए. हिस्ट्री ऑफ जयपूर, पृ.क्र.२४६.

२. अप्रकाशित पत्र, भा.इ.सं.मं.अर्काईव्ज, पुणे, चंद्रचुड दफ्तर, रुमाल क्र.३८,पत्र क्रमांक२८३९.

३. पारसनीस द.ब. जोधपूर राजकारणे, मुंबई,१९९५ पत्र क्र.१३.

सरदेसाई गो.स. महादजी शिंदे यांची कागदपत्रे, ग्वाल्हेर १९३७, पत्र क्र.५४६.

पारसनीस द.ब.दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणे भाग २ मुंबई १९१५ पुरवणी पत्र क्र.१४, दिल्ली भाग २ पुरवणी पत्र क्र.१४.

४. सरदेसाई गोविंद सखाराम, 'मराठी रियासत'खंड ७ मुंबई १९९१,. पृ.क्र.२२१.

५. ठाकूर वा.वा.(संपादक)होळकराशाहीच्या इतिहासाची साधने , भाग १ होळकर, इंदूर, इ.स. १९४०, पत्र क्र.३५०,पृ.क्र.३३६.

६. मशिका पत्र क्र. ५९१ पत्र क्र.५९३, पत्र क्र.५८५,

७. फाळके बी.ए. शिंदेशाही इतिहसाची साधने ग्वाल्हेर १९२९,भाग१,पत्र क्र.२५८

८. डिकसळकर डी.बी. शिंदेशाहीची राजकरणे भाग १. व सातारा १९३४,पत्र क्र.४०४.

९ डोंगरे के.बी. चंद्रचुड दप्तरातील निवडक पत्रे ग्वाल्हेर १९३४, पत्र क्र.१०२.

१० ठाकूर वा.वा.(संपादक)होळकराशाहीच्या इतिहासाची साधने , भाग १ होळकर, इंदूर, इ.स. १९४०, पत्र क्र.३५०,पृ.क्र.३३६.

११ शिंदेशाहीची राजकरणे भाग १. व सातारा १९३४,पत्र क्र.४०४.

१२ चोकसी आर.डी., ए.हिस्ट्री ऑफ. ब्रिटिश डिप्लोमशी अॅक्ट द कोर्ट ऑफ द. पेशवाज पुणे, १९५१ पृ.१०२,१०३.सरकार जदूनाथ, द.फॉल ऑफ मुघल एम्पायर, भाग४ दिल्ली १९९१, पृ.क्र.७९,८०.

१३ मशिका, पत्र क्र.५२६.

१४ होळकर साधने, भाग१. पत्र क्र.२४१.

१५ ठाकूर वा.वा. होळकरशाहीचा इतिहास, भाग १., प्रकाशक, -होळकर गव्हर्नमेंट प्रेस इंदोर, इ.स. १९४५, पृ.क्र.३२९.

१६ होळकर साधने, भाग१. पत्र क्र.२९३.

१७ शिंदे शाहीची राजकारणे, भाग-१, पत्र क्र.३७८, ३७९, ३८१, ३८३

१८ गर्गे, स.मा.शिंदेशाही इतिहासाची साधने, भाग १०, मुंबई १९९५, पत्र क्र.९६, १००, १०१, १०३, १०६,१०९.

१९ होळकर साधने, भाग१. पत्र क्र.३२४, उपरोक्त पत्र क्र.३३४,२९८.

२० मशिका, पत्र क्र.२९८.

२१ होळकर साधने, भाग१. पत्र क्र.२४९.

२२ होळकर इतिहास साधने, भाग१. पत्र क्र.३३६,३३७.

२३ मशिका, पत्र क्र.२५१,२८२.

२४ होळकर साधने, भाग१. पत्र क्र.३२३, ३२५, ३२६, असेच पत्र नाना फडणविसांचे आहे. पत्र क्र.३१३.

२५ हरबर्ट कॉम्प्टन ए पर्टिक्यलर अकाउंट ऑफ द युरोपयिन मिलिटरी अॅड डेव्हलपरर्स ऑफ हिदुस्थान १७८४,१८०३, लंडन १८९२ पृ.७५,७६, (येथून पुढे हरबर्ट क्रॉम्प्टन) जोशी एस.पी. राजस्थान महाराष्ट्र संघर्ष, धुळे १९४३, पृ.११९, हरबर्ट कॉम्प्टन पृ.७५,७६,संघर्ष, पृ.११९.

२६ होळकर इतिहास , भाग१. पत्र क्र.३४६,संघर्ष पृ.११९.

२७ उपरोक्त राठोड एन.जी., मजादजी शिंदे, उत्तर भारताचे राजकारण, नागपूर १९९१, पृ.क्र.१७५.

२८ मराठी रियासत, खंड ७, पृ.क्र. ३७८,३७९.

२९ उपरोक्त, शिंदेशाही, भाग१० पत्र क्र.१०८.

३० होळकर इतिहास भाग १. पृ.क्र. ३४६,३४७, शिंदेशाहीची राजकारणे, भाग १. पत्र क्र.३८४.

३१ शिंदेशाहीची राजकारणे, भाग १. पत्र क्र. ११३. संघर्ष पृ.क्र.१२०

३२ अप्रकाशित, भाईसम, पुणे चंद्रचुड संग्रह पत्र क्र. १४६,३९

३३ शिंदेशाहीची राजकारणे, भाग १०. पत्र क्र. ११४.

३४ होळकर इतिहास भाग १. पृ.क्र. ३४७.

३५ शिंदेशाही, भाग १०, पत्र क्र.११४

३६. होळकर इतिहास भाग १. पृ.क्र. ३४८. केळकर य.न. केळकरांची कैफियत पृ.११५, २१६.

३७ होळकर इतिहास साधने भाग १. पत्र क्र.३८४,३८५,३९०.

३८ सरकार जदुनाथ इंग्लिश रेकॉर्ड ऑफ मराठा हिस्ट्री, पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉण्डस, महादजी सिंधिया अॅण्ड नॉर्थ इंडियन अफेयर्स, १७८५, १७९९.

३९ होळकर इतिहास साधने भाग १. पत्र क्र.३४१.डोंगरे चंद्रचुड पत्र क्र.१२२.

४० जोशी आर एम., पूना आखबार, भाग ३ हैद्राबाद, १९५६, पत्र क्र.२२०.डोंगरे चंद्रचुड पत्र क्र.१२२.

४१ डॉ.रघूबीरसिंह, पूर्व आधिुनकि, राजस्थान का इतिहास उदयपूर १९५१ पृ.२१८.होळकर इतिहास साधने भाग १. पृ. क्र.३४८,३४९.चोकसी पृ.क्र.१०२, १०३, रघुबीरसिंह पृ.क्र.२१८.संघर्ष पृ.१२१.

४२ भागवत जी.जी. मराठ्यांच्या आपसातील लढया पुणे१९४०, पृ.७३. राजाध्यक्ष एन वाय जिवजी बल्लळ उर्फ जिवबादादा केरळकर यांचे चरित्र, मुंबई, १९०७, पृ.क्र.१६३.४५७, शिंदेशाहीची राजकरणे भाग १. पत्र क्र.४१८.

४३ शिंदेशाहीची राजकारणे, भाग १०. पत्र क्र. ४१७.होळकर इतिहास साधने भाग १. पत्र क्र.३८४, ३८५,३९६.

४४ राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ७, पुणे १९०५, पृ.२८, पूना, अखबार, भाग ३ पत्र क्र.२२१.

४५ फॉल भाग ४, पृ.कं. ८९. डोंगरे चंद्रचुडे पत्र क्र. १२३. १२५, हरबर्ट कॉम्प्टन पृ.७५,७६.

४६ होळकर इतिहास साधने भाग १. पृ. क्र.३९६.३४९.होळकर इतिहास साधने भाग १. पृ. क्र.३९६. मुजूमदार आर.सी.आणि व्ही.जी. दिघे मराठा सुंप्रीमसी खंड ८ मुंबई १९९१, पृ.४०६ मराठी रियासात भाग७, पृ.क्र.३७८. ३७९,३८०, भाग ४, पृ.८९ ते ९५, जिवबादादा बक्षी चरित्र पृ. १६३,१६४, केळकर के.ए.१८ वी. शती के हिंदी पत्र, मथूरा १९७०, पत्र क्र.४४.

४७ माल्कम कीर्तने, पृ.१५१.

४८ पारनीस डी.बी. महेश्वर दरबारची बातमीपत्रे, भाग २, मुंबई १९११ पत्र क्र.२३९.२४१.

४९ हरबर्ट कॉम्प्टन पृ.क्र.७५,७६.

५० शिंदेशाही भाग १०. पत्र क्र.११४.

५१ होळकरशाही इतिहास भाग १. पृ.३५७, मराठी रियासत पृ.३४३, ३४४, भागवत राजररामशास्त्री मराठ्यां संबंधान चार उद्गार प.६९, चोकसी प.१०३, संघर्ष प.१२४, सक्सेना आर के. मराठा रिलेशन्स बुईथ द मेजर स्टेटस ऑफ राजपूताना दिल्ली, १९७३, पृ.क्र.१६२,१६३.

५२ केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.११३. होळकर इतिहास, पृ.३४६. शिंदेशाही, भाग १०.पत्र क्र.१०२.

५३ केळकर य.न. होळकरांची कैफियत, पृ.११७.मराठी रियासत भाग ७ पृ.३८१,

५४ नातू व्ही.आर. अहिजाह बहादूनर महराज माधवरार उर्फ महादजी शिंदे चरित्र व कारकीर्द, बेळगाव, १९९४, पृ.२५८,२५९, हचिसन लेस्टर, युरोपियन फ्रिनटर्स इन. मुघल इंडिया, मुंबई, १९६४, पृ.१४३.

५५ शिंदे (सरकार), अशोकराव, महादजी शिंदे काळ व कर्तृत्व, इस्लामपूर, २३ जुलै २०१२, पृ.११६.

५६ सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड ७ पृ. ३९३,३९५, पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती इ.स. १९९१.

५७ पारनीस द.ब. होळकर दरबारातील हिंगण्याची वकिली प.७. तुकाराम जावजी मुंबई इ.स.१९११.

५८ उपरोक्त, पृ.क्र.२०.

५९ डोंगरे के.ब. (संपादक) चंद्रचुड दप्तरातील निवडक उतारे, १३३, ग्वाल्हेर स्रेक्रियट प्रेस इ.स. १९३४.

६० बळवंत नारायण देव देवी श्री अहिल्याबाई, . इंदूर वैशाख वद्य ८ शाके १८५५. पृ.क्र.३२६.

६१ उपरोक्त, पृ.क्र. ५०.

६२ उपरोक्त, पृ.क्र.६७.

६३ पारनीस द.ब. महेश्वर दरबारातील बातमीपत्रे भाग २ प्रकाशक निर्णय सागरप्रेस मुंबई इ.स.१९११.पृ.२६३.

६४ कुलकर्णी अ.रा. पुण्याचे पेशवे राजहंस प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती.पृ.क्र.२६३.

६५ बळवंत नारायण देव, देवी श्री अहिल्याबाई होळकर पृ.२७०.

६६ इंगळे राम डॉ. , अहिल्याबाई होळकर विद्याभारती प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती इ.स.१९९४. पृ.४७.

६७ मराठी रियासत खंड -७, पृ.४१

६८ ठाकूर साधने १, पृ.४१२.

६९ लुनिया ३, पृ.३३२.

## प्रकरण सातवे

## निष्कर्ष

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे प्राप्त होणारे निष्कर्ष हे स्पष्टपणे मांडले जातात. म्हणजेच निष्कर्षाचे प्रकटीकरण केले जाते. निष्कर्ष हे वस्तुनिष्ठ असावेत आणि तितक्याच प्रामाणिकपणे त्या निष्कर्षाचे प्रकटीकरण होणे हे शास्त्राचे मूलभूत तत्व आहे. या तत्वाला अनुसरून ''मराठयांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान'' या संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

जेव्हा संशोधन हे ऐतिहासिक कागदपत्रे संदर्भ आणि माहितीच्या आधारे केले जाते. अशा संशोधन पध्दतीस ऐतिहासिक साधन शोध पध्दती असे म्हणतात. साधन शोध संशोधन पध्दती ही चिकित्सेवर अवलंबून असते. यामध्ये संशोधक हा वेगवेगळया घटकांचे आणि संदर्भ साहित्याचे निरीक्षण करतो. संशोधनाची ही पध्दत इतिहास तज्ञ मानसशास्त्रज्ञ, तत्वज्ञ सामाजिक शास्त्राकडून अवलंबिली जाते. या पध्दतीद्वारे ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात उपयुक्त माहिती प्राप्त होते. इतिहासाची पुर्नरावृत्ती होते. या प्रेरणा घेऊन नवीन इतिहासाची निर्मिती व्हावी या उद्देशातून इतिहासाचे अध्ययन केले जाते. भूतकाळातील घटनांच्या आधारे भविष्यकालीन अंदाज करता येत असल्याने संशोधनामध्ये या पध्दतीचे महत्त्व अधिक आहे.

ऐतिहासिक संशोधनाद्वारे समाजासाठी विविध आधार संदर्भ म्हणून उपलब्ध होतात. भूतकाळातील जीवन विषयक मूल्य आणि सामाजिक मान्यतेचे निष्कर्ष कळण्यास मदत होते. भूतकालीन चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरते. आपली ऐतिहासिक संस्कृती, विचार, वारसा कळण्यासही पध्दती उपयुक्त ठरते. अनेक थोर व्यक्तींच्या इतिहासातून समाजाला दिशा व प्रेरणा मिळत असते. छ.शिवाजी महाराज, पहिला बाजीराव, माधवराव पेशवे, महादजी शिंदे, अहिल्याबाई होळकर इ. थोर जीवनचरित्रे सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होतात.

इतिहासात प्रतिभेला फार महत्त्व आहे. कारण सर्वसामान्य माणूस कायमच्या रूळलेल्या मार्गानेच जातो. परंतु श्रेष्ठ व्यक्ति आपल्या प्रतिभेच्या जोरावर संपूर्ण समाजाची दिशाच बदलतात.

अशाच प्रतिभा असलेल्या अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या प्रतिभेच्या व कार्याच्या बळावर मराठयांचा इतिहासाचा ठसा भारतीय इतिहासावर कायमचा उमटविला.

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत भारतीय इतिहासात अनेक कर्तबगार स्त्रियांनी आपापली कारकीर्द स्वकर्तृत्वाने गाजविली आहे. मध्ययुगीन कालखंडातही अनेक स्त्रियांचे कर्तृत्व व कामगिरी त्यांच्या कालखंडाला प्रभावित करणारी ठरली. मराठा कालखंडात जिजाबाई, आनंदीबाई गोपीकाबाई, ताराबाई, येसूबाई अशा कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या. याच कालखंडात अहिल्याबाई होळकरांसारख्या आपल्या कर्तबगारीने अजरामर ठरलेल्या राजकर्त्या होऊन गेल्या.

अहिल्याबाई होळकर यांच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती अराजकतेची, अशांततेची अशी होती. छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. वयाच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजेच ४ एप्रिल १६८० साली त्यांचे निधन झाले. छ.शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या घराण्यात वारसाबद्दल गृहकलह निर्माण झाला. गृहकलहावर संभाजी महाराज यांना राजगादी मिळाली. बादशहा औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन झाले. व संभाजी महाराज व मुगल यांच्यात संघर्ष निर्माण झाला. छत्रपती संभाजी महाराजांचा वध झाला. राजांच्या मृत्युने हिंदवी स्वराज्याला फार मोठा धक्का बसला. यातुन मराठे सावरू शकणार नाहीत. असा मोगलाचा समज होता. पंरतु प्रसंग ओळखून दु:ख बाजूला सारून मराठयांनी येणाऱ्या संकटाला धैर्याने तोंड दिले. राजाराम यांनी अष्टप्रधानांची नेमणूक करून मराठा राज्याचे अस्तित्व दाखवले व जिंजिहून स्वराज्याच्या कारभाराची व्यवस्था नव्याने करण्यात आली. अत्यंत प्रतिकुल व बिकट परिस्थितीत राजारामाने राज्य कारभार सुरू केला. औरंगजेबास याची कल्पना येताच त्याने ताबडतोब आपला सरदार झुल्फिकार खान यास जिंजिकडे रवाना केले. मराठयांनी मोगलाची रसद तोडून झुल्फिकार खानास जेरीस आणले. मोगल सैन्याने जानेवारी १६९२ मध्ये अत्यंत नामुष्कीने जिंजीचा वेढा उठवून आपले सैन्य मागे घेतले. याची चीड येऊन स्वत: औरंगजेब यांनी मराठयांची किल्ले जिंकून घेण्याचा निर्णय घेतला. व पुढील पाच वर्षापर्यंत महाराष्ट्रात हिंडत होता. किल्लेदारांना भक्कम रक्कमा देऊनच मोगलांना किल्ले घ्यावे लागले. सात-आठ वर्ष मोगल जिंजिवर तळ देऊन होते. पण त्यांना जिंजिचा किल्ला जिंकता आलेला नव्हता. सात फेब्रुवारी १६९८ रोजी असे ठरले की छत्रपती राजारामांनी जिंजितून निसटून जावे. असा मैत्रीपूर्ण सल्ला झुल्फिकार खानाने पाठविला तो मान्य केला गेला सर्व मराठे सुखरूपपणे स्वराज्यात पोहचले व झुल्फिकार खानाने जिंजी जिंकून घेतली. छत्रपती राजारामाचे स्वराज्यात पुनरागमन झाले पुढे २

मार्च १७०० मध्ये राजारामाचा मृत्यु झाला. यांच्या मृत्युनंतर ताराबाईंनी रामचंद्रामार्फत सर्व मराठा सरदारांना फर्मान पाठवून राजपुत्र शिवाजी यांचा राज्याभिषेक करून घेतला. शिवाजी केवळ चार वर्षाचा असल्यामुळे राज्यकारभाराची सर्व सुत्रे राजमाता म्हणून ताराबाईंनी आपल्या हाती ठेवली. त्यांनी आपला विलक्षण दरारा निर्माण केला. अनेक भागात किल्ल्यावर ताबा मिळविला. मोगल फौजेची धुळधाण उडविली. ताराबाई विरूध्द मोगल शेवटपर्यंत लढत राहिले. पण मराठयांचे बळ वाढत गेले.आपले साम्राज्य आपल्या डोळयासमोर कोसळत असल्याचे स्पष्ट चिन्हे औरंगजेबाला दिसू लागले. मराठयांचे पराक्रमाचे वृत्त ऐकत अत्यंत निराश मनस्थितीत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी औरंजगजेबाचा मृत्यु झाला. व या मृत्युबरोबरच मोगल मराठा संघर्ष जवळ-जवळ संपला. सत्तावीस वर्ष हा संघर्ष चालू होता. हे लोकयुध्दच होते. मराठयांच्या बाजूने सर्व सामान्य रयत एक होऊन प्रचंड मोगली साम्राज्या विरूध्द अस्तित्वाचा लढा दिला. हा मुकाबला जगातल्या इतिहासातील अद्वितीय असा अभूतपूर्व मुकाबला होता. येथून पुढे मराठयांच्या इतिहासात एका नव्या कालखंडाला सुरूवात झाली.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर झुल्फिकारखान या मातब्बर सरदाराच्या सल्ल्याप्रमाणे दिल्लीच्या तख्तावर आलेल्या आझमशहाने बंदिवासात असलेल्या शाहूची संभाजीराजांच्या मुलाची सुटका केली. शाहू मुक्त झाल्यावर राजारामाची विधवा राणी ताराबाई आणि शाहू यांच्यामध्ये संघर्ष होईल व मराठयांच्या राज्यात भाऊबंदकी माजून ते राज्य दुर्बल होईल अशी आझमशहा आणि झुल्फिकारखान यांची अपेक्षा होती. त्यांची ही अपेक्षा फलदायी ठरणार अशी चिन्हे सुरवातीलाच दिसू लागली. या घटनेसंबंधी पहिली प्रतिक्रिया महाराणी ताराबाईनी व्यक्त केली. महाराणी ताराबाईनी सुरवातीलाच शाहूराजांना तोतया ठरविण्याचा प्रयत्न करून पाहिला तो अयशस्वी झाल्यावर ताराबाईंनी मराठी स्वराज्यावरचा शाहूराजांचा अधिकारच अमान्य केला. यातूनच मराठी राज्यात दोन गट उघडपणे पडले. त्याची परिणिती खेड येथे लढाई होऊन शाहूस जय मिळाला. १७०८ मध्ये शाहूने साताऱ्याला स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला. ताराबाईंनीही कोल्हापूर जवळील पन्हाळगड या ठिकाणी आपला दुसरा शिवाजी याला गादीवर बसवून स्वतंत्र सत्ता प्रस्थातिप केली. महाराष्ट्रात छत्रपतीचा वारसा सांगणाऱ्या दोन सत्ता निर्माण झाल्यामुळे बेदिली वाढून मराठी राज्याला तडे जाणार अशी भीती निर्माण झाली. परंतु या धामधुमीच्या काळात बाळाजी विश्वनाथ या कर्तबगार पेशव्याने शाहूची बाजू बळकट केली. मराठे सरदारांमध्ये ऐक्य निर्माण केले. शाहू-ताराबाई संघर्षातील तीव्रता

कमी केली. आणि 'मराठा मंडळ' किंवा संयुक्त राज्य व्यवस्था निर्माण करून कर्तृत्ववान मराठे सरदारांना विस्तार करण्यास भारतामध्ये मोठे क्षेत्र उपलब्ध करून दिले.

बाळाजी विश्वनाथाने इ.स.१७१३ ते इ.स. १७२० या काळात मराठी राज्याची विस्कटू लागलेली घडी पुन: बसवली. कान्होजी आंग्रे, खंडेराव दाभाडे, उदाजी पवार यांना शाहूच्या पक्षाकडे वळविले. सरदारांच्या पराक्रमाला योग्य क्षेत्र मिळवून देण्यासाठी मराठा मंडळाची स्थापना करून नवी राज्यव्यवस्था निर्माण केली. इ.स. १७१९ मध्ये दिल्लीला जाऊन सय्यद बंधूच्या मदतीने 'स्वराज्य' आणि दक्षिणेतील सहा मोगली सुभ्यांतील चौथाई-सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क असलेल्या सनदा. त्या वेळच्या दिल्लीच्या तख्तावर सय्यदबंधूनी बसविलेल्या मोगल बादशहा महमूद खान याच्याकडून आणल्या. त्याचप्रमाणे शाहूची आई राजमाता येसूबाई हिची मोगलांची कैदेतून सुटका करविली. बाळाजी विश्वनाथाच्या सात वर्षाच्या कारकीर्दीत मराठी राज्याला वेगळा आकार प्राप्त झाला. दोन गादया स्थापन होऊन साताऱ्याची सत्ता प्रबळ झाली. या सत्तेला स्वराज्याची सनद बहाल करून मोगल बादशहाने मान्यता दिली.

बाळाजी विश्वनाथानंतर त्याचा मुलगा बाजीराव इ.स.१७२० मध्ये पेशवा झाला. आपल्या वीस वर्षाच्या कारकीर्दीमध्ये बाजीरावाने साऱ्या उत्तर हिंदुस्थानामध्ये दरारा निर्माण केला. तसेच पेशवाईच्या उत्तर काळात कर्तृत्ववान मराठा सरदारांमध्ये होळकर, शिंदे आणि पवार हयांची गणना होते. हया सरदारांनी अनुक्रमे इंदूर, उज्जैन आणि धार देवास, ग्वाल्हेर या ठिकाणी मराठी घराण्याची सत्ता स्थापन झाली. या सरदारांना पैलू पाडण्याचे श्रेय थोरले बाजीराव पेशवे यांना आहे. थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात मल्हारराव होळकरांचा प्रवेश मराठा दरबारात होऊन त्यांच्या कर्तबगारीने त्यांना मराठा दरबारात महत्त्व प्राप्त झाले. मल्हाररावांच्या भाग्योदयाला सुरूवात झाली. हयाच काळात दिल्लीची मध्यवर्ती मोगल सत्ता दुर्बल झालेली पाहून निजाम-उल-मुल्क या महत्त्वकांक्षी सुभेदाराने दक्षिणेत स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे दिल्लीच्या मुगल सम्राटाने घाबरून जाऊन माळव्याच्या संरक्षणाची जबाबदारी जमिनदार बहादूरवर सोपविली. गिरी व दयाबहादूर या दोघा चुलते पुतन्याबरोबर मराठयांना मोठया प्रमाणात संघर्ष करावा लागला.

मुगल शासन भारतात प्रस्थापित झाल्यानंतर हया मुसलमानांनी राज्यकर्त्याचा धर्म, संस्कृती, भाषा आणि राज्यपध्दती या हिंदूपेक्षा निराळया असल्यामुळे येथील समाजावर विविध प्रकारचा परिणाम होणे अपरिहार्य होते. हया राज्यकर्त्याच्या अत्याचारामुळे हिंदू जनता त्रस्त झाली होती. तसेच हया अत्याचारापासून दु:खी झालेली होती. अशा परिस्थितीत बाजीरावासारखा धडाडीचा सेना नायक मिळताच त्यांच्या निशाणाखाली हजारोंनी सैनिक जमा होण्यास वेळ लागला नाही. येसाजी सतकर, संताजी मोरे, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, उदाजी पवार, जिवाजी, तुकोजी पवार, घाडगे, घोरपडे, कदमबांडे, भोसले जाधव, रणदिवे, सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्यास पेशवे बाजीरावास वेळ लागला नाही. याच सैन्यानिशी नर्मदापार होऊन पेशव्याने माळव्यात प्रवेश केला. मोगल अंमलास कंटाळलेल्या माळण्यातील हिंदू जनतेने मराठयांचे स्वातगतच केले.औरंगजेब बरोबर युध्द होताच त्याला तंग करण्याच्या उद्देशाने मराठयांनी माळव्यावर आक्रमण केले.

माळवा विजयासाठी मराठयास सर्वात प्रथम सारंगपूरचे युध्द करावे लागले हे युध्द १७२४ मध्ये झाले. हे युध्द मोगल प्रतिनिधी राजा गिरिधर बरोबर झालेले होते. यामध्ये गिरिधर २९ नोव्हेंबर १७२८ मारला गेला. मराठयांचा विजय झाला.यामध्ये मल्हारराव होळकर आणि चिमाजी आप्पा यांचा मुख्य हात होता. यानंतर १७३१ मध्ये दयाबहादुर आणि मल्हाररावांची गाठ धार नजीक तिरला गावी पडली. लढाई होऊन दया बहादुर मारला गेला. याप्रमाणे माळवा प्रांत मराठयांना हस्तगत झाला. दयाबहादुरांची समाप्ती झाल्यानंतर माळव्याच्या सुभेदारीवर महंमद खान बंगशनामक एका मुसलमान सरदाराची दिल्लीपतीने नेमणूक केली. पण दिल्लीहून कुमक आल्याशिवाय मराठयांच्या प्रतिकार आपल्या हातून होणे शक्य नाही असे बंगबने लिहून कळविताच त्याला परत बोलावून जयसिंगाची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक करण्यात आली. १७३३ मध्ये सवाई मंदसोर जवळ सवाई जयसिंगाचा चंडोल कामास आला. होळकरांकडील शेदोनशे घोडी जााय झाली. व दहा-वीस माणसे कामास आली. शेवटी जयसिंग तह करण्यास तयार झाला. नाइलाजाने १७३३ मध्ये जयसिंग मंदसौर येथे मराठयांना शरण आला. त्याने मराठयांनी माळव्यात वसुल केलेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या खंडणी व्यतिरिक्त ६ लक्ष रूपये देऊन मराठयांशी समझोता केला. अशा प्रकारे मराठयांनी तह झाल्यावर सवाई जयसिंग जयपूरला परतला. नंतर त्याने माळव्याकडे मुळीच लक्ष दिले नाही.

ऑक्टोबर १७३० मध्ये पेशवा बाजीरावाने मल्हरराव होळकरांस माळव्यातील ७४ परगणे सरंजाम म्हणून माळवा प्रांत हवाली केले. याचाच अर्थ १७३० मध्ये माळवा प्रांतावर मराठयांचा प्रत्यक्ष ताबा प्रस्थापित झाला होता.

मल्हारराव म्हणाले, माझी सेवा लक्षात घेऊन माझ्या पत्नीला गौतमीबाईला खाजगी जहागिरी देण्यात यावी. अशी विनंती मल्हाररावांनी १७३३ ला केली. मल्हारराव चिमाजी आप्पांच्या दिमतीला होता. चिमाजीने बाजीरावास मल्हाररावांची विनंती मान्य करण्याची शिफारस केली. मल्हाररावांची माळव्यातील मोलाची कामगिरी लक्षा घेऊन त्यांची विनंती पेशव्यांनी मान्य केली. छत्रपती शाहुंच्या आज्ञेने बाजीरावाने मल्हाररावांस लिहून कळविले की, यानंतर खाजगी व दौलत वेगवेगळे राहतील. २० जानेवारी १७३४ रोजी बाजीरावाने गौतमीबाईच्या नावाने खाजगी जहागिर दिली. ही जहागिर प्राप्त झाल्यानंतर इंदौर संस्थानची खऱ्या अर्थाने स्थापना झाली. होळकरशाहीच्या गादीवर असणाऱ्या पुरूषांप्रमाणे त्यांच्या पत्नीकडे 'खाजगीचा' अधिकार देण्यात आला.

मल्हारराव होळकराने थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीत प्रत्येक युध्दात आणि मोहिमेत जातीने भाग घेऊन मदत केली. निजामाचा इ.स. १७४० मध्ये भोपाळ इथे पराभव करण्यात मल्हारराव होळकरांचा सिंहाचा वाटा होता.

पेशवे बाजीरावाच्या मृत्युनंतर २५ जून १७४० रोजी पेशवाईची वस्त्रे नानासाहेबांना मिळाली. याच दरम्यान जयपूरच्या उत्तराधिकारी संघर्षात मल्हरराव होळकरांनी भाग घेतला आणि मराठयांचा राजपुतान्यात प्रवेश झाला. इ.स.१७५४ च्या कुंभेरीच्या युध्दात मल्हाररावांचा एकुलता एक मुलगा खंडेराव होळकरला दि.१७ मार्च १७५४ रोजी जंजालेची गोळी लागून मृत्यु पावला. कुंभेरीच्या संग्रामातील खंडेरावांच्या मृत्युबरोबरच माळव्यातील राजकारणातही अहिल्याबाईचा प्रवेश झाला आणि मराठयांच्या इतिहासातील एका तेजस्वी पर्वाला सुरूवात झाली.

२३ जून १७६१ रोजी पेशवा नानासाहेब पर्वतीवर मरण पावले. नानासाहेब पेशव्यांनंतर तरूण आणि उमद्या वृत्तीच्या माधवराव पेशव्यांनी केवळ अकरा वर्षामध्ये (इ.स.१७६१-१७७२) मराठी राज्याची घडी पुन्हा नीट बसविली. त्यांचे चुलते रघुनाथराव यांनी बंड करण्याचा प्रयत्न केला. परंतु माधवरावांनी मोठया कौशल्याने गृहकलह टाळला. मल्हारराव होळकर आदी सरदारांच्या मदतीने निजामाचा राक्षसभुवन येथे दणदणीत पराभव झाला.

राक्षसभुवनचा प्रसंग आटोपल्यानंतर माधवरावाचा विचार उत्तरेचा कारभार हाती द्यावा असा होता. पण पैशाच्या अडचणीमुळे प्रथम त्याला कर्नाटकात (हैदर) जाणे जरूर भासले. त्यांनी शिंदे होळकरांचे सख्य जुळवून तेच उत्तरेचे माहितगार म्हणून त्यास त्या कामगिरीवर रवाना केले. हयाच कालखंडात मराठे पानिपतामुळे विस्कळीत झाले होते. तसेच अहमदशहा अब्दाली उत्तरेतून निघून गेल्यानंतर उत्तरेकडून राजकारणात नवीन प्रवाह निर्माण झाले होते. दिल्लीचा पातशहा हतबल होत्साता कोणाचे सहाय्य मिळेल या विवंचनेत होता. बंगाल, बिहार, ओरिसा या प्रातांची दिवाणी कंपनी सरकारच्या ताब्यात गेली होती. एकास नबाव करावे, दुसऱ्याची उचलबांगडी करावी आणि पुन्हा मागचाच बरा म्हणून स्थापावे असा प्रकार तेथे चालू होता.

दिल्ली येथील मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यामुळे एकेकाळी असलेले सुभेदार वंशपरंपरेने नबाब बनण्याच्या मार्गास लागले. बंगाल हा अशाच प्रकारचा सुभा सिराजउद्यौलाच्या कारकीर्दीत त्याच्या सेनापतीस फितवून ईस्ट इंडिया कंपनीने बंगालच्या राजकारणात प्रवेश करून घेतला. मिरजाफरास गादीवर बसवून सर्व सूत्रे कंपनीने आपल्या हातात घेतली. पुढे मिरजाफरास गादीवरून काढून मीरकासीमास कंपनीने गादीवर बसविले. मीरकासीम कर्तबगार होता. मीर कासीमने सर्वच व्यापारावरील कर उठविला त्याचा कंपनीच्या कारभारावर अनिष्ठ परिणाम झाला. कंपनीने त्यामुळे मीरकासीमला नबाब पदावरून दूर केले. पुन्हा मीरजाफरास गादीवर बसविले. मिरकासीम स्वस्थ बसणारा नव्हता. आपल्या सारख्याच स्थितीत असणाऱ्या दिल्लीच्या बादशहास व अयोध्येच्या सुजाउद्यौला नबाबास मिळून या त्रिवर्गाने बक्सार येथे १७६४ लढाई केली. यामध्ये त्रिवर्गाचा पराभव झाला. हा पराभव सुजाउद्यौलाच्या जिव्हारी लागला. त्याला पूर्वपरिचित मल्हारराव होळकरांचे स्मरण झाले. त्याने आपला वकील मल्हाररावांकडे पाठविला. मल्हारराव सुजाउद्यौला हयांच्यात करार झाला. सुजाउद्यौलाला मदत करण्याच्या दृष्टीने मल्हाररावांनी तयारी सुरू केली. हयावेळी अहिल्याबाई स्वारीत होत्या. पण त्या मथुरा वृंदावनाकडे देवदर्शन करत होत्या. मल्हाररावांनी ताबडतोब ग्वाल्हेरकडे जाऊन लष्कराची तयारी करण्याची आज्ञा केली.

अहिल्याबाईंनी देवदर्शन आटोपते घेतले आणि मल्हाररावांच्या आज्ञेनुसार युध्द साहित्याची निर्मिती व पुरवठा करण्यास सज्ज झाल्या. अहिल्याबाईनी लष्कर व युध्द साहित्य मल्हाररावांकडे पाठविल्यानंतर मल्हारराव शुजाच्या सैन्याला जाऊन मिळाले. अलाहाबादेवरून कूच करून फ्लेचरच्या नेतृत्वाखालील इंग्रजी सैन्याने मल्हाररावांवर चढाई केली पण अखेर ३/५/१७६५रोजी

कुराचे मैदानात इंग्रजांच्या तोफांपुढे व शिस्तबध्द सैन्यांपुढे मल्हाररावांचा गनिमी कावा अपयशी ठरला. मल्हारराव व शुजा यांचे सैन्य काल्पीपर्यंत मागे आले. अशाप्रकारे मल्हाररावांस माघार घ्यावी लागली. आधुनिक शस्त्रास्त्रांची आणि आधुनिक युध्दपध्दतीची गरज हया युध्दाच्या निमित्ताने मराठयांना निर्माण झाली. हयानंतर काही काळातच मल्हारराव झाशीजवळ आलमपूर येथे कानाच्या दुखण्याने २० मे १७६६ रोजी मृत्यु पावले. मल्हाररावांच्या मृत्युने अहिल्याबाईना तीव्र दु:ख होणे स्वाभाविकच होते. सासऱ्याच्या मृत्युमुळे दौलत सांभाळण्याची जबाबदारी अहिल्याबाईवर आली. आपले पती खंडेराव होळकरांच्या मृत्युनंतर जवळपास १२ वर्षापर्यंत मल्हाररावांच्या हाताखाली राज्य प्रशासनात व लष्करी प्रशासनात त्या तरबेज होत गेल्या. म्हणजेच १७५४ ते १७६६ हा कालखंड अहिल्याबाईच्या लष्करी व राजकीय प्रशासनाचा पहिला कालखंड आहे. हया कालखंडात मल्हाररावांच्या नेतृत्वाखाली राज्यकारभार विषयक लष्करी शिक्षणविषयक, बाबतीत अहिल्याबाई तरबेज होत गेल्या. राजकीय क्षेत्रातील ज्ञान, युध्दा साहित्य, युध्द तयारी या सर्व बाबतीत त्याकुशल बनत गेल्या. त्यामुळे अहिल्याबाईंचा स्वत:वरील विश्वास वाढत जाऊन राजकीय क्षेत्रात त्या आपला वेगळा ठसा उमटू शकल्या. मल्हाररावांच्या मृत्युनंतर होळकर शाहीच्या राज्यकारभाराची सूत्रे अहिल्याबाईनी हाती घेतली. म्हणजेच १७६६ ते १७९५ हा अहिल्याबाईच्या राज्यकारभाराचा दुसरा कालखंड .

मल्हारराव मृत्यु पावल्यानंतर सरदारीची वस्त्रे पेशवा माधवरावाने अहिल्याबाईचा पुत्र मालेराव यास २३ जुलै १७६६ रोजी दिली. पण मालेरावास मल्हाररावांनी संपादिलेली दौलत वारसा हक्काने मिळाली. पण तो अल्पायुषी निघाला.

मालेराव वारल्यानंतर गादीवर कोणाला बसवायचे असा प्रश्न उपस्थित झाला. चाळीस वर्षे ज्याने होळकरांची इमाने इतबारे सेवा केली त्या कारभारी गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ तात्यासाहेब यांची अशावेळी मती फिरली. पेशवा माधवरावाचे व चंद्रचुडाचे सख्य नव्हते. रघुनाथराव व माधवरावांचा पेशवाईसाठी संघर्ष सुरूच होता. चंद्रचुडाने रघुनाथरावाचा निरोप पाठविला ही दौलत बैतल माल झाली. त्यात आपण सुभेदाराचे चिरंजीव हे जघन्स ते पक्षी आपण दरमजल घेऊन दौलत समेटावी अशाप्रकारे चंद्रचुडाने रघुनाथरावाला प्रोत्साहन दिले. रघुनाथराव आपल्या सैन्यासह निघाला. ही बातमी अहिल्याबाईना कळताच त्यांनी संघर्षाला तोंड देण्याची सिध्दता केली. अशा परिस्थितीत गडबडून, घाबरून न जाता अहिल्याबाई राघोबाला तोंड दयायला न खंबीरपणे सिध्द

झाल्या. थोडक्यात असे म्हणता येईल की अहिल्याबाईने आलेल्या संकटाला यशस्वीपणे मुकाबला केलेला दिसून येतो. वैयक्तिक दु:खापेक्षा स्वराज्यावरील संकट मोठे आहे आणि त्याचे निवारण करणे हे प्रथम एका राज्यकर्त्याचे कर्तव्य आहे हे त्यांनी आपल्या कृतीतून सिध्द केले. आणि राजकीय मुत्सद्देगिरीचा परिचय सर्वांना करून दिला. माधवरावांपर्यंत हया वार्ता गेल्याच त्यांनी अहिल्याबाईना राघोबाचा मोड करण्याच्या कामी उत्तेजन दिले आणि मल्हाररावांने वाढविलेल्या एक आप्त आणि होळकर कुटूंबातला एकमेव पुरूष तुकोजी होळकर हयांना सरदारीचे काम दिले तसेच अहिल्याबाईनी तुकोजी होळकराच्या मदतीने कारभार पहावा असा निर्णय पेशव्यांनी दिला. अशाप्रकारे होळकरांच्या राज्यकारभारात तुकोजी होळकरांचा उदय झाला व तसेच मल्हाररावांच्या नंतर होळकर राज्याची धुरा ही अहिल्याबाई होळकर आणि तुकोजी होळकर यांच्या हाती आली.लष्करी कामगिरी तुकोजी होळकरांवर सोपविली गेली व अंतर्गत राज्यकारभाराची जबाबदारी अहिल्याबाईकडे आली ही जबाबदारी त्यांनी पुढील काळात यशस्वीपणे पार पाडलेली दिसून येते.

पुढील काळात माधवराव पेशव्याने उत्तरेची मोहिम हाती घेतली पानिपतावर गेलेल्या मराठयांच्या सत्तेची पुन:र्स्थापना करणे जाटांकडून आणि बुंदी व कोटयातील राजपुतांकडून थकीत खंडणीची वसूली करणे. इ.स. १७५४ पर्यत मराठयांच्या मदतीच्या मोबदल्यात बादशहाकडून मिळालेल्या दुआबातील प्रदेशावर हक्क प्रस्थापित करणे तसेच दिल्ली व आसपासच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करून शुजाउद्यौलास बादशहाचा वजीर नेमणे हया उद्देशाने उत्तर हिंदुस्थानची मोहिम मराठयांनी सुरू केली. रामचंद्र गणेश कानडे, पिसाजीकृष्ण बिनीवाले महादजी शिंदे, तुकोजी होळकर हयाच्या नेतृत्वाखाली उत्तरेची मोहिम सुरू झाली. जाटाचे पारिपत्य करण्यात आले. तसेच रोहिल्याचा पाडाव करण्यात आला. पुढील काळात तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार न करता तुकोजी होळकरांनी नजीबखानाचा मुलगा झाबेताखान हयास सहाय्य केले. अहिल्याबाईनी सुध्दा झाबेताखान प्रकरणाबद्दल तुकोजीला दोष दिला आहे. पुढील काळात झाबेताखानाने पुन्हा एकदा होळकरांचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पण हयावेळेस मात्र त्याचा सामना अहिल्याबाईशी होता त्यांनी झाबेता खान प्रकरणी तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार करून आपल्या राजकीय मुस-ेगिरीचा परिचय दिला. महादजी शिंदे रोहिल खंडात अंमल बसवू लागले तेव्हा झाबेताखानाने अहिल्याबाईकडे संधान बांधले झाबेताखानाने अहिल्याबाईस कळविले की, आमचा हेतू तुम्हापांशी येऊन काही दिवस रहावे आणि तुमच्या हातून आमचा बंदोबस्त व्हावा परंतु महादजी शिंदे हयाचा

सर्व रोष रोहिल्यावर आहे हे जाणून अहिल्याबाईनी झाबेता खानास मोघम उत्तर दिले की, तुकोजी होळकर त्या बाजूस मोहिमेस येतील तेव्हा बंदोबस्त करतील. यातून अहिल्याबाईच्या राजकीय मुत्सद्देगिरीचे दर्शन यातून होते. तसेच तत्कालीन राजकीय परिस्थितीची जाण त्यांना होती हे दिसून येते. सुरक्षित राज्यकारभार हे तत्व त्यांनी पाळलेले दिसते. उत्तरेची मोहिम रंगात आली होती इतरत्र विजय झाल्यामुळे मराठयांना नवी उमेद चढली होती. पण याच उमेदीच्या काळात माधवराव पेशव्यांचा मृत्यु झाला. त्यामुळे मराठेशाहीचे आतोनात नुकसान झाले. खंबीर नेतृत्व राहिले नाही आणि त्याचा परिणाम मराठा राजकारणावर पडल्याशिवाय राहिला नाही. शिवाजी महाराजांनी स्थापिलेले सुराज्याचे रक्तरंजीत राज्यात रूपांतर केव्हा झाले हे कळले नाही. मराठा राजकारणाचे रंग बदलत गेले.

नारायणरावांसारख्या अननुभवी पेशव्याला यथायोग्य मार्गदर्शन करण्याऐवजी व पाठिंबा देण्याऐवजी पेशवे दरबारात गटबाजीचे व कटबाजीचे राजकारण सुरू झाले. माधवरावांचा चुलता रघुनाथराव या राजकारणाचा सूत्रधार बनला आणि हया कारस्थानामध्येच शनिवारवाडयात नारायणराव पेशव्यांचा खून झाला. नारायणरावाच्या वधानंतर रघुनाथरावाने स्वत: पेशवे झाल्याचे जाहीर केले. पण रघुनाथरावाने कट कारस्थान करून हस्तगत केलेले पेशवेपद कोणालाही पसंत पडले नाही. म्हणून नाना फडणवीस व इतर मुत्सद्यांनी रघुनाथरावास पेशवे पदावरून उच्चाटन करण्यासाठी एक योजना आखली. नारायणरावांची विधवा पत्नी गंगाबाई गरोदर होती तिला पुत्र झाल्यावर त्याच्या नावाने पेशवाईचा कारभार चालवायचा असे हया बारा मुत्सद्दयांनी ठरविले. एकूण बारा मुत्सद्यांनी ही योजना आखलेली असल्यामुळे त्यास बारभाईचे कारस्थान असे संबोधले जाते. २७ फेब्रुवारी १७७४ रोजी छत्रपतींनी रघुनाथरावास पेशवेपदावरून दूर केल्याचे आज्ञापत्र काढले. राज्यातील मुख्य अडतीस लोकांना ते पाठविण्यात आले. त्यामुळे बारभाईची परिस्थिती मजबूत झाली. सवाई माधवरावांना वयाच्या ४० व्या दिवशी पेशवाईची वस्त्रे देण्यात आली पुढील काळात बारभाई आणि रघुनाथराव हयांच्यात संघर्ष उद्‌भवला बारभाईपुढे आपला टिकाव लागणार नाही असे वाटून रघुनाथराव माळव्याकडे होळकरांची मदत मिळविण्याकरिता निघाले आपण अहिल्याबाईकडे गेल्यास आपणास त्यांचा आश्रय मिळेल अशी रघुनाथरावांची अपेक्षा होती. तेव्हा अहिल्याबाईंनी आपली राजकीय भूमिका कशाप्रकारे निभावली हे पुढीलप्रमाणे सांगता येईल दादासाहेबांचा विचार महेश्वरास जाऊन होळकरांस आपलेसे करावे अशा बेताने कसरावदेवर आले तेव्हा अहिल्याबाईंनी

कृष्णाजी मुरार यांसबरोबर फौज देऊन रघुनाथरावांच्या मुकाबल्यास पाठविले या प्रसंगी आपले येणे अप्रशस्त आपण धनी आपल्यास प्रतिकूल कोण आहे पण प्राप्त प्रसंगाची हवा पाहिली असता आम्ही मारले जाऊन यास्तव आपणास नर्मदा उतरणेस सल्ला नाही तेव्हा रघुनाथराव अली मोहनचे राज्यातून महिचे सुमारे गेले. म्हणजेच अहिल्याबाईचे धोरण बारभाईस व पेशव्यास अनुकूल असेच होते. तसेच दादासाहेबांविरूध्द जी थोडी बहुत मंडळी होती त्यातच अहिल्याबाई सुध्दा होत्या.

याच दरम्यान बारभाईच्या कारस्थानात अहिल्याबाईंशी बोलणी करण्यासाठी हरिपंततात्या फडके हे इंदूरात कृष्णाजी मुरार यांच्याकडे आले असता त्यांनी उत्तर केले अशा गोष्टी इतके बाईसाहेबांपाशी आम्ही बोलण्या इतके पुण्य कोणाचेही नाही. येथे त्यांच्या मुखावाटे आज्ञा होईल तितका व्यवहार करून आहो उदास म्हणून गवताची पेंडी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाही. यावरून अहिल्याबाईची राज्यकारभारातील जरब दिसून येते. प्रशासनातील दरारा व शिस्त दिसून येते.

तसेच ज्यावेळेस हरिपंत तात्या हयांनी बारभाईत सामील होण्यासाठी बेलपत्र घेऊन शपथ घेण्यास सांगितले तेव्हा अहिल्याबाईनी हरिपंत तात्यास स्पष्टपणे नकार दिला व म्हणाल्या मनाची एकनिष्ठता खरी केवळ शिवावरी बेल उचलून देण्याचे नाटक केले ते खरे नव्हे बेल म्हणजे झाडाचा पाला म्हणजेच आपण आपल्या धन्याशी एकनिष्ठपणे बांधलेले आहोत हे हरिपंत तात्यांना दर्शवून दिले. याच दरम्यान अहिल्याबाई होळकर आणि तुकोजी होळकर हयांच्यातील बेबनाव पूर्णत: नष्ट झाला नाही. हयासाठी ते दोघे जबाबदार होते किंवा परिस्थिती कारणीभूत होती. दोघांच्या भांडणात नारो गणेशाने प्रमाणापेक्षा जास्त हस्तक्षेप केल्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पण त्यात तो यशस्वी झालेला दिसत नाही. महादजी शिंदेचे त्यांच्यातील मतभेद नष्ट करण्याचे तडजोडीचे प्रयत्न यशस्वी झालेले दिसत नाही. सर्वानी एकत्र जमून सामोपचाराने निकाल करण्याचा योग कधीच आला नाही. त्याचबरोबर अहिल्याबाईमधील करारीपणा बाणेदारपणा व निर्भयता, हे गुणही दिसून आले हया गुणाच्या बळावर त्या यशस्वीपणे राज्यकारभार करू शकल्या.

यानंतर मराठयांच्या इतिहासात सवाई माधवरावांचे लग्न, रघुनाथरावांचा मृत्यु, टिपू सुलतानाची स्वारी, टिपू सुलातानाच्या स्वारीच्या वेळी तुकोजी होळकरांना अहिल्याबाईनी केलेली मदत, लालसोटचे युध्द हया महत्त्वपूर्ण घटना घडल्या. लालसोट युध्दानंतर उत्तर हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती गंभीर बनली पण अहिल्याबाईनी लालसोट युध्दानंतर उद्भवलेल्या युध्दजन्य

परिस्थीतीत एखादया लढवय्या राज्यकर्त्याला शोभेल असे योग्य निर्णय घेतले. परिस्थितीवर योग्य नियंत्रण प्रस्थापित केले. त्याचप्रमाणे अहिल्याबाईवर महादजीस सहाय्यता केली नाही त्याच्या युध्दात व अन्य गोष्टीत सहाय्यता करण्याची जरूरी अहिल्याबाईना समजली नाही असे जो आरोप केला जातो तो दूर होण्यासाठी लालसोट नंतर उद्भवलेले मराठयांवरील संकट त्याचा अहिल्याबाईनी केलेला यशस्वी प्रतिकार यामधून हा आरोप आपोआप गळून पडतो. आपआपसांतील मतभेदापेक्षा मराठयांवरील संकटाचे निरसन करणे हे अहिल्याबाईना महत्त्वाचे वाटले. हा उत्तम राज्यकर्त्याचा गुण अहिल्याबाईमध्ये दिसून येतो. तसेच आपली सैनिकी प्रतिभा, राजनैतिक दूरदर्शिता सातत्य आणि साहसाच्या बळावर रघुनाथरावांविरूध्द तलवार न चालविता मुत्सद्येगिरीने रक्ताचा एक थेंब न सांडता युध्द जिंकले नाही तर चंद्रावंताविरूध्द आक्रमक युध्दनीतीचा प्रभावी वापर करून चंद्रावंताना पराभूत केले त्यांच्या सशस्त्र विद्रोहाला कुचलून टाकले व दक्षिण राजस्थान आणि मेवाडमध्ये पुन: मराठयांचे वर्चस्व प्रस्थापित केले. ही आश्चर्याची गोष्ट आहे की जेथे १७८७ मध्ये लालसोट येथे राजपुतांनी महादजी शिंदे सारख्या पराक्रमी दिग्गजांला माघार घेण्यास भाग पाडले त्याच रजपुतांना अहिल्याबाईनी पूर्णपणे पराभूत केले.

अशाप्रकारे अहिल्याबाईंनी होळकरांच्या राज्याची व पेशवाईची सेवा केली ती केवळ प्रवाहपतित बनून नव्हे तर दक्षतेने आणि कुशलतेने केली. राज्यात शांततेला आणि सुरक्षिततेला धक्का लागू दिला नाही. मल्हारराव होळकरांच्या मृत्यमुळे उत्तरेकडील राजकारणात आणि लढयांत जी पोकळी निर्माण होण्याची शक्यता होती ती कौशल्याने व सामर्थ्याने भरून काढली.

अहिल्याबाई होळकर यांनी केलेले सामाजिक कार्य महान आहे. त्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये अनेक सामाजिक कार्य केले. म्हणूनच हया सामाजिक सुधारणा करणाऱ्या राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. अहिल्याबाई होळकर यांच्या काळात राज्यात सर्वत्र शांतता होती. त्या काळात पुष्कळ जाती जमातीमध्ये व विशेषत: रोजेरजवाडयात बायकांना पडदानशीन ठेवण्याची पध्दती रूढ झाली होती. ती पडदा पध्दती अहिल्याबाई यांनी पाळली नाही. अशा पध्दतीच्या समाजातील रूढ चालीरीतीना विरोध करणे सोपे नव्हते. परंतु अहिल्याबाई होळकर यांनी ते धाडस दाखविले.

अहिल्याबाई होळकर धर्मसहिष्णू होत्या. सर्व धर्मांना त्या समान लेखत असे. हिंदुना त्याच्या धर्माप्रमाणे व मुसलमानांना इस्लाम धर्मानुसार न्याय देण्याची त्यांनी व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजात प्रजेला चोर लुटारूपासून उपद्रव होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. व त्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले होते. अहिल्याबाई होळकर प्रजाहितदक्ष होत्या त्यांनी आपल्या राज्यात प्रजेची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून अनेक ठिकाणी विहिरी बांधल्या होत्या. तसेच शेतीला व जनावरांना पाणी मिळवण्यासाठी त्यांनी नदीचे पाणी अडवून तलाव देखील बांधले होते. जेणे करून शेतीसाठी, जनावरासांठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी.

विहिरी व तलावाप्रमाणेच त्यांनी अनेक धार्मिक स्थळावर जलकुंभ बांधले होते. तसेच नदीच्या किनाऱ्यावर जाऊन अनेक लोक पाण्यात पडत असत व त्याचा मृत्यु होत असे म्हणून त्यांनी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अनेक घाट बांधले होते . जेणे करून तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाणाऱ्या स्त्री व पुरूषांना नदीच्या किनारी व्यवस्थीत अंघोळ करता येत असे. तसेच प्रवाशांची सोय व्हावी म्हणून अनेक धर्मस्थळांच्या ठिकाणी धर्मशाळांचे देखील नियोजन अहिल्याबाई यांनी केले होते.

अहिल्याबाई यांनी गावे एकमेकांशी जोडण्यासाठी अनेक नदयांवर पुल बांधण्याची कामे देखील केली आहेत त्यामुळे अनेक गावे व शहरे एकमेकांशी जोडली गेली व त्यामुळे त्याच्या राज्यात व्यापार वाढला. व राज्याची प्रगती झाली. त्याचप्रमाणे अठराव्या शतकात अहिल्याबाई यांनी स्त्री-पुरूष समानता आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या राज्यात सैनिकी प्रशिक्षण सुरू केले होते. केवळ पुरूषच नव्हे तर स्त्रियांनाही सैनिकी प्रशिक्षण दिले व त्यांना सैन्यात सामील करून घेतले होते. अशाप्रकारे स्त्री-पुरूष समानता आणण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या राज्यात केल्याचे दिसून येते.

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या काळात सर्वधर्म समभाव जपण्याचा देखील प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांची ही धार्मिक उदारता पाहून निजामांच्या राज्यातील मुसलमान अहिल्याबाई होळकर यांच्या आश्रयाला येऊन राहिले. त्यांनी मुस्लिम संताना जमिनी देऊन मस्जिद, दर्गेही बांधून दिले. अहिल्याबाई आपल्या राजधानीत म्हणजेच महेश्वर येथे सर्व जाती धर्माच्या कलावंताना बोलवत व त्याचा सत्कार करत त्यात वैद्य पंडित, ज्योतिबी, मुल्ला, मौलवी हे सर्व असत अशाप्रकारे त्यांनी आपल्या राज्यामध्ये सर्वधर्म समभाव जपण्याचा प्रयत्न केला.

अहिल्याबाई होळकर यांचा काळ सर्वार्थाने स्त्रीदास्याचा काळ होता. स्त्रीयावर अनेक बंधने होती. सतीची दृष्ट चाल आणि पतिव्रतेच्या भ्रामक कल्पना यामुळे पतीच्या मृत्युबरोबरच स्त्रीने आपलेही आयुष्य संपवावे असे अपेक्षित असे मुलगी आठ वर्षाची झाली की तिचे लग्न केलेच पाहिजे शिवाय या मुलीच्या नशिबी किती सवती असतील यावर निर्बंध नव्हता. वयस्कर विधवा स्त्रीला आपल्या संपत्तीचा विनियोग करण्याचा अधिकार नव्हता. लग्न बंधनातही परंपरावादी विचार होते. हुंडयाची जीवघेणी प्रथाही होतीच. अहिल्याबाई होळकर यांनी विधवाना दत्तक घेण्याची मुभा दिली होती हे सर्व पाहता असे लक्षात येते की, अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रीदास्य मिटवण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत.

अहिल्याबाई होळकर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी महेश्वराला आपल्या राज्याची राजधानी बनविले व वेगवेगळया प्रदेशातील विद्वांनाना कायम स्वरूपी जहागिऱ्या प्रदान केल्या. त्यामुळे हे विद्वान आपल्या उदरनिर्वाहासाठी इकडे तिकडे न भटकता महेश्वर मध्ये स्थायीक झाले व शिक्षणाकडे लक्ष देऊ लागले. अहिल्याबाई होळकर यांनी तेलंगणा, गुजरात, संगमनेर तसेच नर्मदेच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या वेगवेगळया विषयाच्या विद्वानांना महेश्वर मध्ये संरक्षण दिले. ते सर्व वेगवेगळया विषयात निष्णात होते. त्यामध्ये मल्हार भट्ट जाणोबा, पुराणिक, रामचंद्र रानडे, काशीनाथ शास्त्री, दामोदर शास्त्री निहिल भट्ट अशा प्रकारच्या अनेक विद्वानांना त्यांनी आपल्या राजधानीत ठेवले होते. व आपल्या जनतेची शिक्षणाची काळजी त्यांनी घेतली होती.

आपले राज्य समृध्द व्हायचे असेल तर प्रजेसाठी शिक्षण व आरोग्य हे घटक खूप महत्त्वाचे असतात. म्हणूनच अहिल्याबाई यांनी आपल्या राज्यामध्ये दवाखान्याची निर्मिती केली होती. त्यांनी आयुर्वेद शास्त्रातील औषधी वनस्पतीच्या बागा लावल्या होत्या. एवढेच नव्हे तर मानवी आरोग्य निरोगी रहावे यासाठी शासकीय सुविधा देखील निर्माण केल्या होत्या. मोफत औषधाची सुविधा उपलब्ध केल्या होत्या. व दवाखान्यासाठी लागणारे वैद्य देखील उपलब्ध केले होते.

अहिल्याबाई होळकर यांनी केवळ आपल्या राज्यातील जनतेसाठीच सामाजिक कार्य केले असे नाही त्यांनी आपल्या राज्यातील पशु-पक्षावर ही प्रेम केले. त्यांनी गायीसाठी कुरणे राखून ठेवली होती. सुगीच्या दिवसात त्या अंतराअंतरावर पिकांच्या शेतीचा एक वाटा पाखरांसाठी राखून ठेवत. याचप्रमाणे मोकाट हिंडणाऱ्या जनावरांची देखील काळजी घेत असते. पक्षासाठी धान्याने

पिकलेल्या जमीनीतील उभी पिके त्या विकत घ्यायच्या आणि हया पक्षासाठी खुली ठेवत असत. तसेच पक्षांना व जनावरांना पाणी पिण्यासाठी त्यांनी गावोगावी हौदाची निर्मिती देखील केली होती.

अहिल्याबाई होळकर यांचे पर्यावरण विषयक दृष्टिकोन देखील खूप मोलाचे आहे. त्यांनी रस्त्याच्या दुतर्फी ओसाड व पडिक डोंगरावर त्यांनी लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर यांची भरपूर झाडे लावलेली होती. या झाडामुळे झाडांची मुळे खोलवर दूरवर जाऊन जमिनीत नैसर्गिक गारवा टिकून राहत असे व पाऊसही मोठया प्रमाणावर पडत असे. त्यांनी असाही नियम केला होता. की प्रत्येक शेतकऱ्याने वीस झाडे लावलीच पाहिजे. त्यातील अकरा झाडे सरकारची तर नऊ झाडे शेतकऱ्याची होती. तसेच नदीचे पाणी खराब होऊ नये यासाठी मूळ प्रवाहापासून एक प्रवाह बाजूस वळवून त्याचा उपयोग स्नान, कपडे धुणे, जनावरांना पाणी आदी कामासाठी केला जात असे. एवढेच नव्हे तर त्यांनी वनीकरण, जलसंवर्धन, जलीकरण यास्तव स्वतंत्र खाते निर्माण केले होते. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे असा विचार त्याचा होता. अशाप्रकारे त्यांनी पर्यावरणासाठी कार्य केले आहे.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापना केली. पेशव्यांनी आणि त्यांच्या मराठा सरदारांनी माळव्यात मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोवली. प्रमुख मराठा सरदारांमध्ये होळकर, शिंदे, पवार यांची गणना केली जाते. पेशवा बाजीरावाने या तिन्ही सरदारांवर माळव्याची जबाबदारी सोपविली इंदूरात होळकर, उज्जैन मध्ये शिंदे व धार व देवास मध्ये पवारांनी आपापल्या घराण्याची स्थापना मध्य भारतात आपला प्रभाव निर्माण केला आणि नंतर उत्तर भारतात मराठी सत्तेचा विस्तार झाला. भारताच्या इतिहासात १८ व्या शतकाचा मध्यकाळ म्हणजे राजकीय अस्थिरता आणि प्रशासकीय अव्यवस्था यांचा काळ होता. असे ब्रिटीश इतिहासकारांचे अनुमान आहे. प्रशासनात अस्थिरता ही त्या काळातील सामान्य बाब होती. प्रबळ मोगल साम्राज्याचे विघटन व त्याबरोबर त्या क्षेत्रात अन्य सत्तांचा स्थिर होऊ घातलेला प्रभाव हे त्यामागे मुख्य कारण होते. उत्तर भारतात मराठयांच्या सत्तेची स्थापना १८ व्या शतकाच्या चौथ्या व पाचव्या दशकात झाली. तेथील मराठी सत्ताधिशांनी प्रस्थापित राज्यव्यवस्थेत विशेष बदल केला नव्हता. मल्हारराव होळकरांच्या काळात त्यांच्या राज्याची असलेली प्रशासन व्यवस्था थोडया बहुत फरकाने अहिल्याबाईच्या काळातही सुरू होती. मल्हाररावांच्या मृत्युनंतर अहिल्याबाई होळकर यांच्या हातात होळकरशाहीचे प्रशासन आले.

अहिल्याबाई होळकरांनी आपली प्रशासन व्यवस्था चोखपणे ठेवली व त्यामुळे त्यांनी तीस वर्षाहून अधिकाधिक काळ अत्यंत सफलतापूर्वक शासन केले.

मल्हाररावांच्या वेळेपासूनच होळकर राज्याचे प्रशासनाच्या दृष्टीने तीन भाग केलेले होते. ही व्यवस्था मल्हाररावांच्या वेळची असून तीच व्यवस्था अहिल्याबाईनी जशीच्या तशी चालू ठेवली. हयाच प्रशासन व्यवस्थेचे मल्हाररावांच्या मृत्युनंतर दोन भागात अधिकार विभागणी करण्यात आली. तुकोजी दक्षिणेत असला की अहिल्याबाई उत्तरेचे काम पाही. तुकोजी उत्तरेत असला की अहिल्याबाई दक्षिणेचे काम पाही. माळव्यातले म्हणजे मध्य भागाचे काम पाहण्याचा प्रसंग तुकोजीवर कधीही आला नाही.

अहिल्याबाईच्या जहागिरीचे खाजगी आणि दौलत असे दोन भाग होते. होळकरशाहीच्या अधिपत्याखाली १२६ परगणे होते. काही माळवा, काही राजपुतांना व नेमाड क्षेत्रात उरलेले दक्षिणच्या पठारात होते. निश्चित अशी प्राकृतिक सीमा नव्हती. १२६ ठिकाणाहून लक्षावरी वसुल येत असे. अर्थात वसुलीसाठी अहिल्याबाईनी चोख नोकरवर्ग ठेवलेला होता. वसुलीसाठी पत्रे पाठविली जात होती. राज्याचे उत्पन्न ७५ लाखावरून सव्वा कोटी पर्यंत नेले हयाच संपत्तीचा वापर हिंदुस्थानच्या एकूण हितार्थ केला. २८ वर्षे यशस्वीरीत्या राज्यकारभार केला.

राज्य यंत्रणेला वरचा भाग संरजामी सरदार त्यानंतर येणारे दिवाण सबनीस या सर्वांशी अहिल्याबाईचे आपूलकीचे जिव्हाळयाचे संबंध होते. त्याचबरोबर त्याच्यावर नियंत्रण सुध्दा होते. सरदारांवर अन्याय होणार नाही हयाची काळजी घेतली तसेच जनतेवर अन्याय होणार नाही याचाही काळजी घेतली म्हणजे राज्य अधिकारी जनता हयांच्यामध्ये समन्वय साधून त्यांनी आपले राज्य भरभराटीला आणले. आणि मराठयांच्या इतिहासात पुन्हा एकदा सुराज्य ही संकल्पना सत्यात उतरवली.

ज्याप्रमाणे प्रजा अधिकारी हयांना संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न अहिल्याबाईनी केला त्याचप्रमाणे खंडणी देणारे टाकेदार हयाच्याशी सुध्दा अहिल्याबाईचे संबंध चांगले होते.

त्यांच्या भरभराटीवर आपली भरभराट आहे. त्यांचे संतोषावर आपले स्थायीकत्व आहे हे तत्व त्या काळातील मराठयांनी पाळले नाही. त्यामुळे ते मराठयांचे पक्के वैरी झाले. पण अहिल्याबाईंनी टाकेदारास कधीही छळले नाही पण खंडणी देणारे टाकेदार खंडणी देण्यास टाळाटाळ करत आहेत

हे लक्षात येताच अहिल्याबाई त्यांना सक्तीचे पत्र पाठवून दहशत बसवून खंडणी घेत असे परंतू त्यांना छळले नाही.

अशाप्रकारे प्रशासनातील प्रत्येक घटक नियंत्रित करून प्रत्येक घटकामध्ये संतोष समाधान प्रस्थापित केले त्यामुळेच सलग २८ वर्षे त्यांनी शांतता व सुव्यवस्थेत राज्यकारभार केला. मराठयांच्या त्या काळातील कृष्णमय वातावरणात धवल युगाची निर्मिती केली. प्रजापालक व प्रशासक या भूमिका त्यांनी यशस्वीरीत्या निभावल्या.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात संपूर्ण देशात अस्थितरेचे वातावरण होते. आंतरिक अव्यवस्था ईषा द्वेष आणि गृहकलहाला महत्त्व दिल जात होत. पेशवे लष्करी मोहिमेमध्ये व्यस्त रहात होते. उत्तर भारतामध्ये रघुनाथराव आणि महादजी शिंदेच्या आक्रमणामुळे मराठे रजपुत तथा मुस्लिम शासक सतत युध्दामध्ये गुंतलेले रहात, सैनिकी कारवाया, आक्रमणे, युध्द, जाळपोळ या सर्व गोष्टीमुळे व्यापार आर्थिक व्यवहार यात सुसुत्रता राहिली नव्हती तसेच जनतेच्या आर्थिक जीवनामध्ये स्थिरता राहिली नव्हती. अशा आर्थिक परिस्थितीमध्ये अहिल्याबाई होळकरांनी राजकीय मुत्सदेगिरीचा वापर करून सुसज्ज अशा सैनिकी बळावर आपल्या राज्याचे संरक्षण केले.

राज्यातील आंतरिक शांतता आणि बाहय आक्रमणापासून राज्याचे संरक्षण यामुळे राज्यातील जनता सुखी संतुष्ट होत गेली तसेच आर्थिक जीवन देखील संपन्न झाले.

परगण्यामध्ये शेतसाऱ्याची वसुली, जमीनदार, मंडलोई, कानूनगो, पटवारी, पटेल करत सर्व परगणे कमविसदाराच्या अधिकाराखाली होते. अहिल्याबाईनी कायदयाच्या स्वरूपात कमाविस दाराचे कर्तव्य व अधिकार निर्दिष्ट केले होते. तसेच त्यांच्यावर होणाऱ्या संभाव्य कार्यवाहीची जाणीवही करून दिली.

त्यामुळे भ्रष्टाचार, अफरातफर हयाला आळा बसला. प्रजेची अतिरिक्त हानी टळली. राज्याचा आर्थिक स्त्रोत कमी आला नाही.त्याचप्रमाणे अहिल्याबाईच्या राज्यात शांतता, सुव्यवस्था, असल्यामुळे चितोड, सुरत, पुणे, अमरावती, कोटा, जयपूर, रतलाम, हैद्राबाद इ. शहराशी व्यापार चालत असे. आपल्या मालावर अथवा गुरांवर सायर माफ करून सुरक्षितपणे व सुरळीत आपला माल पोहचवून द्यावा. याबद्दल शिंदे, पवार, निजाम, पेशवे, अहिल्याबाईस विनंती करीत. त्यांच्या विनंतीचा मान ठेवीत अहिल्याबाईनी त्यांच्या मालावार जकात न घेण्याचे आदेश आपल्या अधिकाऱ्यास दिल्याचे दिसून येते. त्यांच्या हया व्यवहारामुळे शेजारील राज्याशी अहिल्याबाईचे

व्यापारी संबंध अधिकच दृढ झाल्याचे दिसतात. आयात निर्यातीमध्ये वाढ झालेली दिसते. त्या काळामध्ये मराठयाची आर्थिक स्थिती खालावलेली होती. त्याच काळात अहिल्याबाईच्या राज्यामध्ये आर्थिक सुबत्ता आलेली होती.

शेतीचे उत्पन्न बघून सारावसुलीची आकारणी होती. अतिवृष्टी, अनावृष्टी झाल्यास सारा माफ केला जात. वसुलीच्या कामात कोणी अफरातफर केली तर जब दंड आकारण्यात येत शिक्षा होत. पैशाच्या रूपाने महसूल ठरविताना काळया बागायती जमिनीवर प्रत्येक बिघ्यामागे सव्वा रूपया दर निश्चित केला होता. याच काळात इतर संस्थानात मात्र हा कर बिघ्यामागे चार रूपये होते. कमी कर योजनेमुळे प्रजा आणि शेतकरी सुखी होते.

त्यावेळी आजच्यासारखे लेखी कायदे, लेखी कायदयाची पुस्तके नव्हती. सारासार विचार करून रूढी, परंपरा, नैतिकता, न्याय, अन्याय चांगले वाईट या निकषाच्या आधारे न्याय दिला जायचा राजकर्त्याच्या सुलभतेसाठी परगण्यातील फौजदारी कायदा राबविण्याची व शांतता ठेवण्याची जबाबदारी कमाविसदारावर असे. याकरीता कमाविसदार ठाणेदाराची मदत घेत असे परगण्यात कमाविसदारास गावात-पाटलास न्यायदान करावे लागे. न्यायदानासाठी पंचायत पध्दत होती. ज्या मनुष्यास न्याय हवा असेल त्याला कोणताही खर्च करावा लागत नसे. अहिल्याबाईच्या राज्यात न्याय खाते उत्पन्नाची बाब नव्हती. अन्यायाचे खंडण हे तर कर्तव्याचे पालन हे त्यांनी आपल्या कृतीतून सर्वांना दाखवून दिले.

संरक्षण सिध्दता हाच स्वसंरक्षणाचा उत्तम मार्ग आहे हे अहिल्याबाईचे तत्त्व होते. मल्हारराव होळकरांच्या काळात असलेली सैन्य व संरक्षणव्यवस्था अहिल्याबाईंनी तशीच चालू ठेवली. सैनिक भरतीच्या वेळी जबाबदार व्यक्तीची जमानत आवश्यक मानली. सैनिकांना नगदी वेतन मिळे. स्वारीस निघण्या अगोदर फौजेच्या तयारीसाठी शिलेदारांना वार्षिक वेतनाची एक चतुर्थांश किंवा तिजाई रक्कम देण्यात येई. त्याला नालबंदी म्हणत. नेहमीकरीता सैन्यात भरती केलेले व तात्पुरत्या कारणाकरीता भरती केलेले असे दोन प्रकारचे सैनिक असत. सैनिक , घोडे, उंट यांची रोज हाजिरी घेतली जात. परवानगी न घेता सैनिक छावणी सोडून गेल्यास सैन्यातून काढून टाकण्यात येत.

पावसाळा संपत येताच तोफा, बंदुका आदी युध्द साहित्याची साफसफाई सुरू होत असे. हत्ती, घोडे, बैल यांच्या आजाराकडे अहिल्याबाईचे लक्ष असे. महेश्वर, चांदवड, सैंधवा, गाळवा,

कुशालगड, या सातही गडाची डागडुजी व भरभक्कम बांधणीची योजना अहिल्याबाईच्या कारकीर्दीत मार्गास लागली.

नगर कोतवाल हे पद अहिल्याबाईच्या काळामध्ये इंदौर मध्ये स्थापित झालेले होते. कोतवाल कमाविसदारास पूर्ण परगण्यात झालेल्या अपराधाची सूचना देत असत. व अपराध थांबविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची सुचनाही कोतवाल देत असत. म्हणजेच अहिल्याबाईनी संरक्षण सिध्दता हाच स्वसंरक्षणाचा उत्तम मार्ग आहे हे तत्त्व अंमलात आणल्याचे दिसते.

अहिल्याबाईच्या काळात होळकरांचे राज्य इतरांना महत्त्वाचे वाटत होते. म्हणून त्यांचे वकील महेश्वराला व महेश्वराचे वकील त्यांच्या दरबारात रहात. परराज्याशी अहिल्याबाईचे सलोख्याचे संबंध असल्यामुळे परराज्यात करावयाच्या धार्मिक कार्यात अहिल्याबाईगना कधीही अडचणी आल्या नहीत. अहिल्याबाईचे छोटया असो किंवा मोठया शेजारील राज्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार होते. शांती, न्याय, समतेची नीती हा अहिल्याबाईच्या बाहयनीतीचा सिध्दांत होता.

होळकर राज्याच्या सीमा विध्य व सातपुडयाच्या दुर्गम पहाडीमध्ये विस्ताराल्या होत्या. त्यातील निमाड प्रदेश घनदाट वृक्षराजीने व्यापला होता. हया पहाडी भागामध्ये भिल्ल, भिल्लाचे गोंड तथा कोरकू जातीचे आदिवासी रहात. त्यांची उपजिविका ही अधिकतर लुटमार, चोरी, दरोडा, यांच्यावर अवलंबून होती. त्यामुळे निमाडचा भाग हा नेहमी असुरक्षित समाजाला इंग्रजांच्या काळात म्हणजे २० व्या शतकाच्या सुरवातीला सुध्दा हे क्षेत्र असुरक्षित समजले जायचे अशा असुरक्षित क्षेत्रात शांती, सुव्यवस्था प्रस्थापित करून जनजीवन सुखद व सामान्य करण्यासाठी अहिल्याबाईनी जी प्रशासकीय व्यवस्था केली ती व्यवस्था अभूतपूर्व होती. सर जॉन माल्कम सारखे इंग्रज देखील मान्य करतात. आणि ते अहिल्याबाईचे कार्य त्यांच प्रशासन कौशल्याचे अंग मानतात.

अहिल्याबाईनी जी व्यवस्था पहाडी इलाख्यातील भिल्लांच्या संदर्भात केली तिच व्यवस्था लुटमार करणाऱ्या गिरासियांच्या बाबतीत सुध्दा केली. त्यांच्या टांका किंवा जो जे कर घेत त्यास मान्यता देऊन शांतता प्रस्थापित केली. महादजी शिंदयानी सुध्दा हयाच नीतीचा अवलंब करून आपल्या राज्यात शांतता प्रस्थापित केली.

या प्रशासकीय व्यवस्थेसंदर्भात इंग्रज देखील प्रभावित झालेले होते. त्याद्वारे इंग्रजांना या गोष्टीचे ज्ञान प्राप्त झालेले होते. की त्यांच्या परंपरागत व्यवस्थेत हस्तक्षेप न केल्यास त्यांचे पंरपरागत

अधिकार मान्य केल्यास त्यांना बाकीच्या सोयीसुविधाची अपेक्षा नसते. इंग्रजांनी सुध्दा भिल्लाचे प्रश्न सोडविण्यासाठी अहिल्याबाईच्या हयाच नीतीचा अवलंब केला होता.

होळकर राज्याचे कारभारी तात्या जोग म्हणतात अहिल्याबाईनी त्यांच्या काळात उदारता, भलाई, संतुष्टकारी उपायांनी त्यांच्याबरोबर मधुर संबंध प्रस्थापित केलेले होते. भिल्लांचे पुर्नवसन या एकाच घटनेत अहिल्याबाईच्या अनेक गुणांचा सहज परिचय होतो. दु:खिताविषयी करूणा, प्रजाविषयक वात्सल्य दूरदृष्टी यांचा समन्वय आढळतो. अपराधी अपराध का करतो हे न्यायव्यवस्थेने समजून घेतले पाहिजे भिल्ल आणि गोंड लुटालुट का करतात जे जाणून घेतल्यामुळेच अहिल्याबाईची त्यांना उपजिविकेची साधने देऊन त्यांच्या वृत्तीत परिवर्तन घडून आणले.

अहिल्याबाईनी निर्माण केलेल्या डाक निर्माण योजनेमुळे त्याचा भारतभर संपर्क रहात असे. अहिल्याबाई ब्रिटिशांच्या राजकारणाला, डावपेचांना व महत्त्वकांक्षेला ओळखून होत्या. ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी व विस्तारवादी धोरणाला मुकाबला करण्यासाठी आपल्या जवळही शिस्तबध्द व प्रशिक्षित फौज असावी असे अहिल्याबाईस वाटत होते. म्हणून त्यांनी स्वत: इ.स. १७९२-९३ च्या सुमारास कर्नल जी.पी.बाईड नामक अमेरिकन सेनानीकडे पाश्चात्य पध्दतीची फलटण तयार करण्याची जबाबदारी सोपविली. पाश्चात्य लोक इतरांच्या सेवेत दाखल होताना जहागीर मिळावी, अथवा आम्ही स्वकीयांसोबत लढणार नाही अशा प्रकारच्या अटी घालीत असत. पण ही अट अहिल्याबाईंनी स्विकारली नाही तसेच जहागिर न देता बॉईडला मासिक वेतनावर ठेवले. कवायती कंपूला शासनाच्या आदेशानुसार काम करण्याची अट असून त्यातून कोणतीही सूट नव्हती.कोणालाही स्वतंत्र अधिकार दिला नाही अंतिम स्वीकृती त्यांनी आपल्या हातात ठेवली होती.

अशाप्रकारे इतरांनी पाश्चात्याबरोबर कवायती कंपू संदर्भात केलेला करार आणि अहिल्याबाईनी कवायती कंपू संदर्भात केलेला करार यात भेद दिसून येतो. पहिल्या प्रकारचा करार आपल्याच लोकांचे व राजेरजवाडयांचे सत्तेविरूध्द निजी वैयक्तिक बळ वाढविण्याचे उपयोगी होते तर अहिल्याबाईनी केलेल्या करारात खऱ्या अर्थाने राष्ट्रीय बळ वाढविण्याची भावना दिसून येते.

होळकर राज्याच्या सीमेमध्ये बऱ्याच काळापर्यंत सलीमशाही किंवा सालमशाही (शहा आलमशाही) प्रकारची शिक्के प्रचलित होते.

अशा प्रकारचे शिक्के उदयपुर, प्रतापगड, देवला, कोटा, टोक, भोपाळ तथा ग्वाल्हेर राज्याद्वारे बनविले जात. अहिल्याबाईंच्या काळात काही राज्यांचे सालमशाही शिक्के होळकरराज्याच्या

सीमेमध्ये प्रचलीत होते. त्यामुळे या शिक्क्याद्वारे व्यापारी आणि जनता त्यांना वस्तुच्या देवाणघेवाणीमध्ये मूल्यमापनाच्या दृष्टीने अडचणी निर्माण होत. अहिल्याबाईंनी सालमशाही शिक्के तयार करणा-या राजसत्तेबरोबर याविषयी चर्चा करून इंदोर राज्याच्या शिक्क्यांच्या तुलनेमध्ये त्यांचे मूल्य १२ % कमी केले व आपली प्रजा व व्यापा-यांना दिलासा दिला.

अहिल्याबाईंची २८ वर्षांची राजवट प्रशासनदृष्टया आदर्श होती. इंदोर राज्यात शांतता सुव्यवस्थता आणि खुशाली नांदली. अहिल्याबाईंची प्रजाहित दक्षता आणि कडक शिस्त यामुळे हे शक्य झाले. अहिल्याबाईंचे प्रशासनीक योगदान आजही आदर्श व आदरणीय आहे. संपत्तीच्या व सामर्थ्याच्या जोरावर जे-जे त्यांनी केले त्याचा जाब त्यांना मार्तंडापाशी द्यावा लागेल असे उदगार त्यांनी काढून आपल्या राजकीय जीवनाचे सार जगापुढे मांडलेले आहे.

लाखेरीच्या युध्दाच्यावेळी अहिल्याबाईंच्या खंबीर राजकीय नेतृत्वाचा परिचय झाला त्यांच्या लष्करी संघटनाचा परिचय झाला. त्याचप्रमाणे लाखेरी युध्दाचे परिणाम देखील झाले. उत्तर हिंदूस्थानातील वर्चस्वासाठी ६० वर्षांसाठी चाललेला शिंदे होळकरांचा संघर्ष लाखेरीच्या युध्दाने समाप्त होवून शिंद्यांच्या राजस्थानातील वर्चस्वास मान्यता मिळाली. तर आपसातील संघर्षात मराठे अडकून पडल्याने राजपुत संस्थानिक खंडणी देण्यास टाळाटाळ करू लागले व राजस्थानावर महादजीने जे वर्चस्व मिळविले होते ते ही नाहिसे होऊन अराजक सदृश्य परिस्थिती राजस्थानात निर्माण झाली.

अहिल्याबाईंना स्वत:च्या आप्तांच्या मृत्यूमुळे ज्याप्रमाणे धक्के बसले त्याचप्रमाणे मराठी सत्तेला अहिल्याबाई समोरच धक्के बसले. पानिपतची लढाई, नानासाहेबांचा मृत्यू या सर्वांवर कळस ठरणारी गोष्ट म्हणजे तरूण माधवराव पेशव्यांचा मृत्यू आणि उत्तरेकडील मराठयांचा सत्तेचा एक आधारस्तंभ महादजी शिंदे यांचा मृत्यू या सर्व आघातामुळे मराठी सत्तेच्या इमारतीला धक्के बसत होते. मराठी सत्तेच्या राजकीय क्षेत्रात अस्थितरचे आणि अशांततेचे वातावरण पसरले होते. निजामाबरोबर झालेल्या खर्डयाच्या युध्दातील विजयामुळे काहीसे अशांततेचे व अस्थितरतेचे वातावरण निवाळल्यासारखे झाले होते. मराठयांच्या एकात्मशक्तीचा परिचय पुन्हा एकदा दिसून आला. अशा राजकीय वातावरणात आपल्या जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत अहिल्याबाईंनी राज्यकारभाराची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडलेली दिसते. अशाप्रकारे राजकारभारातील कर्तव्यदक्ष राजकर्त्या अहिल्याबाई होळकर यांनी १३ ऑगस्ट १९९५ रोजी जगाचा निरोप घेतला.

अहिल्याबाई होळकरांकडे सर्वधर्म समभाव असणारा दृष्टीकोन होता. त्यांनी पुनर्निर्माण केलेल्या शिवमंदीरात घृष्णेश्वर हे एक. त्यावेळी तो प्रदेश निजामाच्या ताब्यात होता. निजाम आणि पेशवे यांचे संबंध मैत्रीचे नसले तरी अहिल्याबाईंनी निजामाशी सख्य साधून घृष्णेश्वराचे पुनरुज्जीवन केले. निजामाने विरोध दर्शविला नाही. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात दर्ग्यांना व मशीदींना द्रव्य दिले. त्यांचा धार्मिक दृष्टीकोन एकांगी नव्हता. हे त्यांच्या राज्याचे विशेष आहे. त्याचप्रमाणे अहिल्याबाई होळकरांची धार्मिकता संकुचित नव्हती. सर्वधर्म समभावाची जी नीती आजची आपली सरकारे आणि समाज आत्मसात करु पाहतात. तिचा अवलंब दोन शतकापूर्वी अहिल्याबाई होळकरांनी केला. सिमेलगतच्या राज्यांशी सख्य साधून राज्यात शांतता राखत असत. अहिल्याबाई होळकरांच्या राज्यात प्रशासकीय अधिकारी किंवा सेनाअधिकारी प्रजेवर जुलुम जबरदस्ती करत नसत. अन्याय झालेली व्यक्ती अहिल्याबाईंना भेटू शकत असत. रामायण महाभारतातील राजधर्म आणि राजनीती अहिल्याबाई होळकरांकडे प्रत्यक्षरुपात होती.

हे त्यांचे कार्य पाहता अहिल्याबाई होळकर या मराठयांच्या इतिहासातील एक थोर कर्तबगार राज्यकर्त्या होत्या. त्यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व मराठयांच्या इतिहासात अजरामर होऊन गेले. अहिल्याबाईंचा तीस वर्षाचा कालखंड म्हणजे लांबलचक उन्हाळाच होता. स्वत: झळ सोसत असताना मात्र त्यांनी इतरांसाठी छत्रे उभारली. दु:खाचे डोंगर कोसळल्याने मूळ धार्मिक पिंड अधिक बळकट झाला. संकटापुढे त्या वाकल्या नाही, घाबरल्या नाही. अपयशाने त्या खचल्या नाही. यशाने हुरळूनही गेल्या नाहीत. अहिल्याबाईंनी आपल्या काळात एकीकडे राजकारण केले आणि दुसरीकडे देवधर्म या मागची त्यांची भूमिका होती स्वसमाजचे अस्तित्व आणि अस्मिता जागविणे. आपल्या आयुष्यात राजकारण समाजकारण यांचा सुरेख संगम अहिल्याबाई होळकरांना साधला.

अठराव्या शतकातील राजनीती अराजकता, अव्यवस्था, अनैतिकता, आणि विश्वासघात यांनी बरबटलेली होती. अशा राजकीय परिस्थितीत अहिल्याबाई होळकर स्त्री असूनही कर्तृत्वात कमी पडल्या नाहीत. त्यांनी मराठयांच्या इतिहासात सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, धार्मिक असे बहुमोल योगदान दिले.

# संदर्भ ग्रंथ सूची

## I. प्राथमिक साधने

### अ) मूळ साधने (मराठी)


१. आठवले सदाशिव,' हिंगणे दप्तर खंड-३', भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, इ.स.१९८६.

२. आपटे द.वि., 'चंद्रचुड दप्तर कला पहिली', भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, प्रथम वर्ष १९२०,

३. आठवले सदाशिव, रामशास्त्री प्रभुणे चरित्र व पत्रव्यवहार, श्री विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, इ.स.१९८८

४. खरे वा.वा. (संपादक), ऐतिहासिक लेखसंग्रह-भाग-३, कुरूंदवाड, प्रकाशन वर्ष नाही.

५. खरे वा.वा. (संपादक), ऐतिहासिक लेखसंग्रह-भाग-४, कुरूंदवाड, १९०१

६. खरे ग.ह. (संपादक),'हिंगणे दप्तर खंड-१', भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, प्रकाशन वर्ष १९४५.

७. खरे वा.वा.,(संपादक), 'ऐतिहासिक लेखसंग्रह भाग -१', कुरुंदवाड, प्रकाशन वर्ष नाही.

८. खरे वा.वा., (संपादक), 'ऐतिहासिक लेखसंग्रह भाग-६', नानाभाऊ छापखाना, इ.स.१९०८.

९. डोंगरे कें.ब. (संपादक), चंद्रचूड दप्तरापैकी निवडक उतारे, ग्वाल्हेर सेक्रियट प्रेस, इ.स.१९३४

१०. डिस्कळकर द.बा.,'शिंदेशाहीची राजकारणे भाग-१', सातारा इतिहास संशोधन मंडळ, इ.स.१९२४.

११. जोशी श.ना., थोरले माधवपेशवे शकावली, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

इ.स.१९२९

१२.जोशी.श.ना, थोरले माधव पेशवे शकावली, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

इ.स.१९२९

१३. ठाकूर वा.वा. (संपादक), 'होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-१', होळकर गव्हरमेंट,प्रेस इंदूर,इ.स.१९४४.

१४. ठाकूर वा.वा.(संपादक),' होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग-२' होळकर गव्हरमेंट,प्रेस इंदूर,इ.स.१९४४.

१५. पगडी सेतू माधव,(अनुवादित), 'मोगल आणि मराठे', तारीखे दिल्कुशा, साधन ग्रंथ, ठोकळ प्रकाशन पुणे. पहिली आवृत्ती,१९६३.

१६. पगडी सेतू माधव (अनुवादित), 'मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द', खाफी खानाचा साधन ग्रंथ, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे,२, इ.स. १९६२.

१७. पगडी सेतूमाधक (अनुवादीत) मराठे व निजाम (उर्दू फारशी साधने) मुंबई मराठी ग्रंथ

संग्रहालय, मुंबई, प्रकाशन वर्ष १९६१.

१८. पगडी सेतूमाधव (अनुवादीत) मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगीर साधन ग्रंथ)

प्रकाशन वर्ष नाही.

१९. पगडी सेतूमाधव, पानिपतचा संग्राम भाग-१, मुंबई मराठी ग्रंथमाला, १९६१.

२०.पारसनीस द.ब., 'महेश्वर दरबाराची बातमीपत्रे भाग-१', निर्णय सागर प्रेस मुंबई, इ.स.१९१०.

२१. पारसनीस द.ब., 'महेश्वर दरबाराची बातमीपत्रे भाग-२', निर्णय सागर प्रेस मुंबई, इ.स.१९११.

२२. पारसनीस दत्तात्रय,'होळकर दरबारातील हिंगण्यांची वकिली', तुकाराम जावजी मुंबई,इ.स.१९११.

२३. पुरंदरे कृ.पा. (संपादक), 'पुरंदरे दप्तर,भाग-१' भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, १९२९.

२४. पारसनीस द.ब., दिल्ली येथील मराठयांची राजकारणे भाग-२, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९११.

२५. बेन्द्रे वा.सि, महाराष्ट्रे इतिहासाची साधने (खंड ३) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६७.

२६. भावे ल.वि., मराठी दप्तर रूमाल, भाग ३, ठाणे, इ.स.१९०१

२७. भागवत अ.ना., 'होळकरशाहीच्या इतिहासातील साधने, खंड-१, होळकर सरकार पुस्तकमाला.

२८. भागवत अ.ना.'होळकरशाहीतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार,खंड-१२', अ.ना.भागवत इ.स.१९२५ इंन्दौर.

२९. राजवाडे वि.का. 'मराठयांच्या इतिहासाची साधने,खंड-१०', पुणे महाराष्ट्र साहित्य परिषद,इ.स.१९०९.

३०. राजवाडे वि.का., 'मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड-१२', इ.स.१९०९, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, इ.स.१९१२

३१. राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहायांच्या इतिहासाची साधने, खंड-१३', यशवंत

छापखाना, पुणे, इ.स.१९१८.

३२. वाड ग.चि.सवाई माधवराव पेशवा रोजनिशी भाग-१, डेक्कन व्हर्न्याकुलर ट्रान्सलेशन सोसायटी पुणे, इ.स.१९०८.

३३. वाड गणेश चिमणाजी, 'थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी भाग-१', डेक्कन व्हर्न्हाकुलर ट्रान्सलेशन सोसायटी, पूणे इ.स. १९११.

३४. सरदेसाई गो.स. 'पेशवे दप्तर,खंड-२' गर्व्हमेंट सेंट्रल प्रेस , मुंबई इ.स.१९३०.

३५. साने काशीनाथ नारायण, 'होळकरांची कैफियत', का.ना. साने, डेक्कन कॉलेज, १८८६

३६. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-२, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३०

३७. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-५, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३१

३८. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-७, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३१

३९. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-१६, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३१

४०. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-३०, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३१

४१. सरदेसाई गो.स.कुलकर्णी कृ.पा., काळे या.मा., ऐतिहासिक पत्रव्यवहार, सदाशिव रामचंद्र देसाई-पुणे

४२. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-२२, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३२.

४३. सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर खंड-२९, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई इ.स.१९३३

## ब) IIndary sources in English

1. Malcom sir john, "A Memoir of central India volume I Thanker Spinkand

company clalcutta, 3rd Edition,1880.

2. Malcom sir john, "A Memoir of central India volume II 3rd Edition,1888

11. Indor State Gazetter-Volume I&II , P.N.Shrivastav, Madhya Pradesh District Gazetters, Indore., First Edition 1971.

## II. दुय्यम साधने

### अ) प्रकाशित संदर्भ ग्रंथ (मराठी)

१. आठवले सदाशिव,'मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर, आवृत्ती दुसरी, इ.स.१९८२.

२. इंगळे राम, 'अहिल्याबाई होळकर', विद्याभारती प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती,इ.स.१९९४.

३. केळकर यशवंत नरसिंह, 'होळकरांची कैफियत', हनुमान प्रकाशन, प्रथमावृत्ती, इ.स.१९५४.

४. कुलकर्णी डॉ.मधुकर, नाना फडणीस आणि मराठी राज्य प्रशासन, पुणे, प्रथमावृत्ती, इ.स.२००४

५. कोळेकर हरीभाऊ, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी, सोलापूर, ३१ मे २०१५

६. कुलकर्णी अ.रा., 'अशी होती शिवशाही', राजहंस प्रकाशन पुणे, द्वितीय आवत्ती,इ.स.२०००.

७. कुलकर्णी अ.रा., 'मध्ययुगीन महाराष्ट्र', डायमंड प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती,इ.स.२००७.

८. कुलकर्णी अ.रा. आणि खरे ग.ह. (संपादक), 'मराठयांचा इतिहास खंड-१', कॉन्टीनेंन्टल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९८४.

९. कुलकर्णी अ.रा. आणि खरे ग.ह. (संपादक),'मराठयांचा इतिहास खंड-२'कॉन्टीनेंन्टल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रन २००६.

१०. कुलकर्णी श्रीधर रंगनाथ,'शिवकालीन राजनिती व रणनिती', पॉप्युलर प्रकाशन मुंबई,पहिली आवृत्ती,१९९४.

११. कोतकर शि.वा.(संपादक), 'महाराष्ट्र ज्ञानकोश',खंड-१, ज्ञानकोश कार्यालय पुणे,१९२०.

१२. खरे य.वा. 'मराठा राज्यांचा उत्तरार्ध खंड-१', य.वा. खरे मिरज इ.स.१९२७.

१३. गुजर यादव, 'मल्हारराव होळकर व त्यांचा काळ', डॉ.यादव गुजर नागपूर प्रथमावृत्ती,इ.स.१९९१.

१४. गायकवाड आर.डी., सरदेसाई बी.एन.,थोरात टी.डी, हनमाने व्ही.एन., मराठे कालीन संस्था व विचार एस.व्ही.फडके आणि कंपनी कोल्हापूर तृतीय आवृत्ती इ.स.१९९०.

१५. चितळे वि.सी. व जोशी र.ना. (संपादक), भाऊसाहेबांची बखर,अ.वि. गृह प्रकाशनासाठी, इ.स.१९५५.

१६. ठाकूर वा.वा.'होळकरशाहीचा इतिहास भाग -१', होळकर गव्हरमेंट प्रेस, इंदौर,इ.स.१९४५.

१७. ठाकूर वा.वा. 'होळकरशाहीचा इतिहास भाग-२', होळकर गव्हरमेंट प्रेस, इंदौर,इ.स.१९४५.

१८. पवार जयसिंगराव, 'मराठी सत्तेचा उदय' सी. जमनादास आणि कंपनी,द्वितीय आवृत्ती,इ.स.१९८८.

१९. पाटील सुलोचना अशोक, 'होळकर कुलभूषण अहिल्यादेवी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' प्रगती मंडळ जळगाव, प्रथमावृत्ती,२०००.

२०. पुरुषोत्तम, 'श्री अहिल्याबाई होळकर, चरित्र अनंत आत्माराम मोरमकर,' मुंबई आवृत्ती पहिली,इ.स.१९३३.

२१. बेडदे धनंजय (संपादक), 'लोकमाता अहिल्याबाई होळकर गौरव ग्रंथ', विद्याभारती प्रकाशन लातुर,द्वितीयावृत्ती इ.स.२०००.

२२. बेहेर ना.के,'पहिला बाजीराव पेशवा', मंगेश नारायण कुलकर्णी, इ.स.१९३०.

२३. लेले मुक्ताबाई, 'होळकर कुलभूषण देवी अहिल्याबाई', दामोदर सावळराम आणि मंडळी,मुंबई प्रथमावृत्ती, इ.स.१९३६.

२४. लोही. म.ना, देवी अहिल्याबाई होळकर वास्तव दर्शन, नागपुर, २ जून २००१

२५. सरदेसाई गो.स.'मराठी रियासत खंड-१', पॉप्युलर प्रकाशन मुंबई तिसरी आवृत्ती, इ.स.१९८८.

२६. सरदेसाई गो.स.'मराठी रियासत खंड-२', पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती, इ.स.१९९८.

२७. सरदेसाई गो.स.'मराठी रियासत खंड-७', पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती, इ.स.१९९१.

२८. साने का.ना. (संपादक), 'भाऊसाहेबांची बखर', अनाथ विद्यार्थीगृह, पुणे इ.स. १९६५.

२९.साने का.ना. (संपादक), 'पेशव्यांची बखर', मॉडर्न बुक डेपो, पुणे .

३०. मतकर गणेश शंकर, 'पुण्यश्लोक लोकमाता देवी', अहिल्याबाई होळकर वंशातील इंदूरच्या राजकर्त्याचा परिचय, श्री अहिल्या प्रकाशन, इन्दौर १९९५.

३१. हेरवाडकर र.वि. (संपादक), 'पेशव्यांची बखर', व्हिनस प्रकाशन, पुणे इ.स. १९७५.

## II. दुय्यम साधने (हिंदी)

### ब) प्रकाशित संदर्भ ग्रंथ


१. अलीअतहर एम., 'औरंगजेब कालीन मुगल वर्ग', भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, प्रथम संस्मरण १९७७.

२. पंजाबी बालकृष्ण, 'मल्हारराव होलकर की आर्थिक एवं प्रशासकीय व्यवस्था', १९८०.

३. रघुवीर सिंह, 'मालवा मे युगांतर या आराजकता', श्री मध्य भारत हिंदी साहित्य समिति १९३८.

४. लुनिया बी.एन.'मराठा प्रभुत्व भाग-१', लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा-३,द्वितीय संस्मरण,१९९१-९२.

५.लुनिया बी.एन.'मराठा प्रभुत्व भाग-२', लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा-३,प्रथम संस्मरण.

६. लुनिया बी.एन.'मराठा प्रभुत्व भाग-३', लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा-३,प्रथम संस्मरण.

७. शर्मा हिरालाल, 'अहिल्याबाई', नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नई दिल्ली, १९६७.

८. सरकार जदूनाथ, 'मोगल साम्रज्य का पतन खंड-१' शिवलाल अग्रवाल ॲण्ड कंपनी आग्रा-३.

९. सरकार जदूनाथ, 'मोगल साम्रज्य का पतन खंड-२' शिवलाल अग्रवाल ॲण्ड कंपनी आग्रा-३,१९७२.

१०. सरकार जदूनाथ, 'मोगल साम्रज्य का पतन खंड-३' शिवलाल अग्रवाल ॲण्ड कंपनी आग्रा-३,१९७२.

११. सरकार जदूनाथ, 'मोगल साम्रज्य का पतन खंड-४' शिवलाल अग्रवाल ॲण्ड कंपनी आग्रा-३,१९७२.

१२. सरदेसाई गो.स.' मराठों का नवीन इतिहास खंड-२', शिवलाल ॲण्ड कंपनी, आग्रा,तृतीय संस्मरण,१९७२.

१३.सरदेसाई गो.स.‘ मराठों का नवीन इतिहास खंड-३’, शिवलाल ॲण्ड कंपनी, आग्रा,१९६४.

**दुय्यम साधने इंग्रजी**

**क) प्रकाशित संदर्भ ग्रंथ**

1. Acharya K.A., Maratha Rajput Relations from 170to1795, K.A.Acharya Akola 1978.
2. Bakshi S.R.& Sharm S.K., Maratha State Under their Rulers, Deep & Deep Publications,New Delhi,2000.
3. BrijiKishor, Tarabai and her times, Asia Publishing House, Boamay,1963.
4. Burway M.W., Life and Work of Malharrao Holkar, Holkar State Printing Press Indore,1930.
5. Burway M.W., Life of Maharaja Tukojirao Holkar II, Holkar Printing Press Indor,1925.
6. Deodhar Y.N. Nana Phadnis and the External Affairs of the Maratha Empire, Popular Book Depot. Bombay First Pubished January,1962.
7. Dighe V.G., Peshwa Bajirao I & Maratha Expansion, Karnatak Publishing House Boabay 1944.

**स्मरणिका**

**नियतकालिके**

१. अहिल्या स्मरणिका वर्ष १९७०, अहिल्याबाई होलकर चॅरिटेबल ट्रस्ट, इंदौर प्रकाशित, संपादक स.का. दिक्षित, रामसेवक गर्ग, हिरालाल, शर्मा.

२. अहिल्या स्मरणिका, वर्ष १९७३-७४, संपादक-हिरालाल शर्मा, रामसेवक गर्ग.

३. धर्मभास्कर मे. जून १९७५ अंक १२.

४. भारत इतिहस संशोधक मंडळ पुणे वर्ष ९ वे त्रैमासिक अंक २ रा.

५. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे डिसेंबर १९३५ त्रैमासिक अंक ३ रा.

६. भारत इतिहास त्रैमासिक.

७. लोकराज्य ऑक्टोबर १९९४ पुण्यश्लोक अहिल्याबाई विशेषांक.


७. विविध ज्ञानविस्तार, नोव्हेंबर-डिसेंबर १९३३ अंक ११-१२.

८. विविध ज्ञानविस्तार, एप्रिल-मे १९३४ अंक ४५.

९. विविध ज्ञानविस्तार, नोव्हेंबर-डिसेंबर १९३५ अंक ११-१२.


१०.हरी ओम दर्शन दिवाळी अंक २०००

**परिशिष्ट क्र. १**


Map of Malwa
MALWA
1761-1818
MEWAD
Lalsot
Gohad
Bhind
Gwalior
Lakheri
Shivpuri
Mangrol
Kota
BUNDELKHAND
Raghogarh
Chanderi
Neemuch
Rampura
Gagron
Khichwada
Bhanpura
Mandsaur
Gagurni
Khilchipur
Pratapgarh
Sitamau
Sironj
Banswada
Sarangpur
Narsinghgarh
Nagda
Mahidpur
Bhilsa/ Vidisha
Tropic of Cancer
Bhopal
Raisin
Ratlam
Ujjain
Ashta
GUJARAT
Dewas
Jhabua
Hoshangabad
Indore
Amjhera
Dhar
Handia
Mandu
Maheshwar
Khandwa
Burhanpur
50 km
KHANDESH


परिशिष्ट क्र. २

अहिल्याबाईंच्या राजकार्याचा प्रदेश (इ.स. १७९५ पर्यंत) मध्यप्रदेश





संपादक-हिरालाल शर्मा, अहिल्या स्मारिका, वर्ष १९७६

## परिशिष्ट क्र. ३




सकुण्डे विनोद, महेश्वर दर्शन, इन्दुर, २०१५-१६

## परिशिष्ट क्र.४


महेश्वर
TO BHOPAL
Dewas
Ujjain
Indore
P.
Borwaha
Omkareshwar
Manpur
MAHESHWAR
Khargone
Mhow
Dhar
Mandu
Damnod
Kasrawad
Barwani
Bawangaja
M.
Jhabua
RAJASTHAN
GUJARAT
MAHARASHTRA
K.M.
M.P.
35

## परिशिष्ट क्र.५

### ग्राम विनेटो, टाटारमाली व केली ही तीन गावे उदयपूरच्या अरिसिंहाने अहिल्याबाईंना दिली. (इंदौर संग्रहालय)



अहिल्या बाई होलकर से सम्बन्धित ताम्रलेख

## परिशिष्ट क्र. ६

**लेखांक : ३६**

### अहिल्याबाईची प्रशासन व्यवस्था

**१३.७.१७८७**

**श्री**

महो दूलेराव मंडलोई पा इंदूर गोसावी यासी अहिल्याबाई होळकर सुमासमान समानैन मयावलफै तुम्ही दोन पत्रे पाठविली ते पाऊन लेखनार्थ अवगत जाला देवीसींग काटकूटकर यांनी आम्हास पत्र लिहिले त्याची जकल बजिनस पाठविली आहे मनन करून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे त्या अन्वये उत्तर लिहून पाठऊ आंबे सुमारे अडीचसे पाठविले आहेत. पावतील म्हणोन लिहिले असियासी देवीसींग मवासात राहूल लबाडी करीत फिरतो अशाने त्याचा परिणाम लागणार नाही जयवंतसिंग वडील त्याजला सरकारातून वस्त्रे देऊन बहातर गावची जमीदारी त्याने करावी असे ठरावून दिल्हे देवीसींगकडे तर्फे इंदुपुरा येथील बारा गावची जमीदारी सुदामत प्रमाणे नेमली आहे हुजूर येऊन रूजु होऊन जमीनदारीचे रीतीने वर्तणूक करावी ऐसा जामीन दिल्यास सदरहू बारा गांवचा बंदोबस्त करून दिला जाईल हे न घडल्यास सरकारातून जप्ती आहेच आहे तुमचे लिहिल्याप्रमाणे प्रविष्ट जाले जाणीजे २१ रमजान मोर्हबसुर

मोर्तब खुद

अप्रकाशित, आठल्ये दफतर, श्री नटनागर शोध संस्थान, अभिलेखाकार
सीतामऊ, मालवा, पत्रक्र ३६
देवास थोरली पाती संग्रह

## परिशिष्ट क्र.७

**लेखांक : ८**

### अहिल्याबाईने व्यापारी मार्गाचा केलेला बंदोबस्त

**१७७७**

**श्री**

राजश्री कृष्णाजी दादाजी किले कुसलगड गोसावी यांनी श्रो अहिल्याबाई होलकर दंडवत सु मा समान सितौन मया व अलफै मोजे सिमरूल पासून बलवाडिया पावेतो न्या हलकर्ण मंडलोई व विस्वेस्वर मोकाती यांजला मार्गाचा बंदोबस्त करावयासी सरकारांहून सांगितला आहे त्यासी इकडील बंदोबस्त मशारनिले करितील तिकडून भिलांचा वगैरे तुम्ही आपला येथास्थित राखणे तुम्हाकडून भील इकडे येऊन दंगा करितील त्याचे पारपत्य करावयास मशारनिलेस सांगितले तुम्ही मुलाहिजा न होणे जाणिजे छ २९

मोर्तब खुद

अप्रकाशित, आठल्ये दफतर, श्री नटनागर शोध संस्थान, अभिलेखागार
सीतामऊ, मालवा, पत्र क्र ८
देवास थोरली पाती संग्रह,

## परिशिष्ट क्र.८

**लेखांक : ४४**

### व्यापारी मार्गांचा बंदोबस्त

**२५.६.१७६७**

**श्री**

राजश्री रामचन्द्र माधव गोसावी यांसी श्री अहिल्याबाई होलकर दंडवत सु समान सीतैन मयांव अलैफ अदद मोजे सिमरूल पा इंदूर तदद मौजे बलवाडा पा बडवाहा येथील मार्गाचा बंदोबस्त साल ममरा पासून न्याहालकर्ण मंडलाई व विस्वेस्वर मोराजी यांसी सांगितला आहे तेथील बंदोबस्त ते करितील तुम्ही दखल गीरी न करणे ठाणे बंदीचा ही बंदोबस्त मशारनीलेच करतील तुम्ही उठोन येणे जाणीजे छ २९ या बहुत काये लिहिणे.

मोर्तब खुद

अप्रकाशित, आठल्ये दफतर, श्री नटनागर शोध संस्थान, अभिलेखागार
सीतामऊ, मालवा, पत्र क्र ४४
देवास थोरली पाती संग्रह,

## परिशिष्ट क्र.९

**लेखांक : ९**

### अहिल्याबाईने तंटा मिटविण्याबद्दलचे पत्र

**६.११.१७८२**

**श्री**

राजश्री खंडोबाबूराव कमा.पा इंदूर गोसावी याते अएवंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो अहिल्याबाई होलकर दंडवत सुभा सलास समानैन मयाव अलेफै दूलेराय मंडलोई व जेतकर्ण मंडलोई पा मा याचा आपसामध्ये कजिया तेजकर्ण मंडलोई याचे स्त्रिया कडील जिरायेताचे जमीनी बदल व जमीदारीचे दफ्तर कोणाचे घरी ठेवावे याजमुळे कर्जाचा लागला आहे त्यास अंगोधर जेतकर्ण मंडलोई याचे पत्र आले होते की आमचे जाब सालाची माहितगारी खंडोपंत आपाची तदेसी आहेत यास्तव तूर्त जाबसाल माघला असावा ते आल्यावर फडशा करतील म्हणोन त्यावरून तूर्त मामलेदार ये तो पर्यंत वहिवर चालती तसी चालू दणे या अन्वये दूलेराये मंडलोई याचे नावे पत्र लिहून दिल्हे आहे परंतु हली दूलेराये मंडलोई याने पत्र पाठविले आणि पूर्वी पंचाईत होऊन निवाडा जाला ते निवडपत्रच व जिनस पाठविले ते मनास आणिता ज्या जाबसालाचे लढे ते निवाड पत्रात डगवले आहेत त्या अर्थी निवाडपत्रा प्रमाणे उभयेतानी वर्तणूक करावी हे चांगले यास्तव हे पत्र सादर केले असे तरी तुम्ही उभयेतास ताकीद करून निवाड पत्राप्रमाणे समजूती पाडून वर्तणूक करवणे तथै

अप्रकाशित, आठल्ये दफतर, श्री नटनागर शोध संस्थान, अभिलेखागार
सीतामऊ, मालवा, पत्र क्र ९
देवास थोरली पाती संग्रह,

## परिशिष्ट क्र.१०

## अहिल्याबाई होलकर को सम्बोधित पेशवा माधवराव प्रथम का एक पत्र

### हीरालाल शर्मा

पेशवा माधवराव ने चांडवड़ परगने की वसूली आदि के संबंध में सोमवार, फरवरी १८,१७७१ ई. (फाल्गुन शु.४, सोमवार श.१६९२) को एक पत्र अहिल्याबाई होलकर को लिखा था । वह पत्र भारत इतिहास संशोधक मण्डलसंकीर्ण ग्रन्थमाला क्र.६८ के ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खण्ड-७, जिल्द-२७, क्र.१०७-०८-पृ.४० पर प्रकाशित किया गया है । पत्र के प्रकाशक श्री चि.ग.कर्वे ने स्पष्टत: कोई नाम निर्देश नहीं किया कि मूल पत्र किस संग्रह में संरक्षित है । साथ ही उन्होंने पत्र के एक पक्षीय महत्त्व की निरूपित करते हुए लिखा है कि ''इससे यह पता चलता है कि पेशवा माधवराव का कार्यभार किस प्रकार संचालित होता था । '' परन्तु, इससे भी अधिक यह पत्र होलकरों के इतिहास के लिये अपना महत्त्व रखता है । पत्र का मूल पाठ इस प्रकार है -

''गंगाजल निर्मल अहिल्याबाई होळकर यांसी स्नो माधवराव बलाल प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष राजश्री तुकोजी होळकर याणी रा.गंगाधर येशवंत यांचे विद्यमाने राजश्री मोरे बिनायेक व त्रिंबकराव सदाशिव यांजकडून सरकारचे नजरेच्या भरण्यांचा यैवज देवविला त्याचा व्याजसुध्दा निकाल होये तो पावे तो पो चांदवड येथील मामलतीची घालमेल करू नये या प्रों करार असतां मारनिलेचा दराबस्त येवज न दिल आणि मामलत काढ़ली त्यासही दोन सालें होत आलीं अद्याप रूपये दिल्हे नाहीं म्हणून विदित जाहालें यैशास सदरहू करारा प्रों सरकारची पत्रें मारनिले दीक्षित यांस दिल्हीं असें असता अवद्या यैवज न दिल्हा आणि मामलता काडली हे गोष्टी उत्तम न केली हाली हें पत्र लिहिलें तरी पेशजी च्या करारा प्रो रूपये दरोबस्त पावते करणे न केल्यास सरकारांतून बंदोबस्त करून घ्यावा लागेल हे समजोन पुन्हां बोभाट ये विशींचा येकंदर न ये ते करणे जाणिजे छ २ जिलकाद सुग इहिदे सवैन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद.''

## परिशिष्ट क्र. ११

रोजकींद
सुत समान सितैन
मपा व आलफ

राजमंडळ
स्वारी राजश्री दादा
छ १२ माहे मोहरम
दफाते पत्रे
तुकोजी होळकर याचे नावे जाब की तुम्हास
मालेराव होळकर मृत्यु पावले त्याचे सरदारीचा
बंदोबस्त सांगोन ऐवज करार रूपये
१५३०००० नजरे बाबद
१५००००० ऐन
३०००० चा गाठण्याबाबत
१५३००००
१३२००० किसा ऐवज खाजगी कडे नजराणा
करून घ्यावा
१००००० किल्ल्या बाबत अनपवलीचे
इमारतीचे
३२००० खरगोषचे मोंफाशा बाबत
सन आर्बा तारून सित
विसाला पौ करार
१३२०००
१६६२००००
येकून सौला लक्ष बासष्ठ हजार रूपये करार केले.
त्यापैकी भरणा रूपये
२५०००० रोख भरणा गुण विष्णु महादेव
ई वैशाख वद्य पंचमी ता जेष्ठ
शुध्द पौर्णिमा
२००००० जमा पोता
५०००० जमा पर भारे रद कर्ज
लेखा बाजार

२५००००
७५०००० सावकारी निशस आषाढ शुभ
प्रतिपदाचे मुदतीने
३००००० गुण विष्णू महादेव
२५०००० गुण सिदापा सटे बिखर
२००००० गुण गोपाल सभाजी
७५००००
१००००००
येणे प्रमाणे दहा लक्ष रूपये नजरे पैकी सरकारात
जमा जाहाला असेल म्हणोन
जाब
हुजूर

पे.द.हिंदुस्थान
रू.नं.२०४
१० जून १७६७

## परिशिष्ट क्र. १ २

श्री

राजश्रीचा विराजीत राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी
यासी
पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरो
येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष
मालराव होलकर मृत्यु पावले त्यांचे सोपून त्यासच
सरदारीची वस्त्रे येथे दिल्ही आसेत जो बंदोबस्त
होणे तो येथून जाला तुम्हाकडून यांचे माहालास
कोठे कोठे जप्त्या गेल्या आहेत म्हणोन विदित
जाले ऐसीयासी याचे महालास तुम्हा कडील
जप्ती गेली असेल ती उठवणे यांचे
महालास व गावखेडियास देखिल मशार निले कडील
कारकुनाचे गावखेडीयास कोणेविसी उपसणे न
न करणे जप्त्या गेल्या असेल ते उठवणे याचे महालास
व याचे निसबतीचे कारकुनाचे
गावास देखील उपसर्गन करणे जप्ती केली असेल
ते उठवून नेणे बहूत काय लिहिणे छा मोहरम
हे विनंती.


गो.स.सरदेसाई,
यांनी संशोधनासाठी
निवडलेल्या पत्रापैकी
द.क्र.२९
प.क्र.१८३
(१४.६.१७६७)
पौछ १९ मोहरम
सन समान जेष्ठमास

## परिशिष्ट क्र. १ ३



अहिल्याबाई होळकरांचे महेश्वर येथील घर (राजकार्य केलेला वाडा)
मध्यप्रदेश

## परिशिष्ट क्र. १४




अहिल्याबाई होळकरांनी बांधलेला महेश्वर येथील घाट (मध्यप्रदेश)

परिशिष्ट क्र. १५



चौंडी ता.जामखेड, जि.अहमदनगर या अहिल्याबाईंच्या
माहेरगावातील अहिल्येश्वर मंदिर